म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

म.

विषय

सं. नं.

सन १८

रामचंद्र

३६

कांद

# देवी सत्यभामा

अथवा

# गुजरातेंत पेशवाईची अखेर.

पूर्वार्ध

( इसवी सन १८११ ते १८१३. )

पुस्तक १ लें, संमेलन.—पुस्तक २ रें, संघट्टन.


लेखक

शंकर विष्णु पुराणिक, बी. ए.

माजी दक्षिणा फेलो, गुजरात कॉलेज.



प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

ग्रंथसंपादक व प्रकाशक.

किंमत १॥ रुपया.



मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

१५१७९

वडोदें येथें

' पूर्णचंद्रोदय ' छापखान्यांत छापिली.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.

उपोद्घात. ... १—४

**पुस्तक १ लें. संमेलन.**

भाग १. लूट. ... ... ... ... ... १—६
२. बढाई. ... ... ... ... ६—१०
३. प्रपंचसुख. ... ... ... ... १०—१६
४. बाजार. ... ... ... ... १७—२४
५. खलवत. ... ... ... ... २५—३२
६. तुटातूट. ... ... ... ... ३३—३८
७. शोक... ... ... ... ... ३८—४४
८. सारवासारव. ... ... ... ... ४४—४९
९. संमेलन. ... ... ... ... ५०—५८
१०. न्याय. ... ... ... ... ५८—६७

**पुस्तक २ रें. संघट्टन.**

भाग १. विनोद. ... ... ... ... ७१—७७
२. पावागड. ... ... ... ... ७७—८७
३. संदर्भ. ... ... ... ... ८८—९९
४. गृहसुख. ... ... ... ... ९९—१०६
५. टोळधाड. ... ... ... ... १०६—१११
६. कपटजाल. ... ... ... ... १११—११८
७. हळदकुंकू. ... ... ... ... ११८—१२४
८. छळ. ... ... ... ... ... १२४—१२९
९. मसा सुहाग. ... ... ... ... १३०—१४०
१०. पिराणा. ... ... ... ... १४१—१४७
११. दुष्काळ. ... ... ... ... १४७—१६१
१२. मातृशोक. ... ... ... ... १६२—१६९
१३. कारस्थान. ... ... ... ... १७०—१७९
१४. गांठीचा ताप. ... ... ... ... १७९—१९१
१५. स्वामी सहजानंद. ... ... ... १९२—२०१

# उपोद्घात.

गेल्या आठशें वर्षांत गुजरातेंत रजपूत, मुसलमान, मराठे व इंग्रज यांचा अंमल अनुक्रमें होऊन, हल्लीं तर मराठे व इंग्रज यांचा अंमल सुरू आहे. गुजरातेसारखा सुपीक प्रदेश व गुजराती लोकांसारखे धनाढ्य, उद्योगी, मितव्ययी व शांतताप्रिय लोक, हिंदुस्तानांत अन्यत्र नाहींत, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. या प्रांताच्या सुपीकतेमुळें यास सोन्याचा तुकडा किंवा हिंदुस्तानचा बाग अशीं नांवें दिलीं असतां शोभेल. अशा प्रांतावर राज्यकर्ते होऊन गेले, त्यांनीं आपल्या वैभवाचें व सत्तेचें स्मरण पुढील पिढ्यांस व्हावें, अशा प्रकारचीं टोलेजंग बांधकामें, स्वतःच्या ऐषआरामासाठीं व कित्येक प्रसंगीं लोकांसाठीं, करून ठेविलीं आहेत. रजपुतांनीं वसविलेलीं अणहिलवाडापट्टण, चांपानेर हीं नगरें व तेथील कामें, भाटांनीं वर्णिलेले त्यांचे पराक्रम, ह्यांमुळें आजही त्यांच्याविषयीं आदरबुद्धि व प्रेम जागृत होतात. ते तद्देशीय व तद्धर्मी होते, म्हणून गुजराती लोकांची त्यांच्याविषयीं विशेष पुज्यबुद्धि आहे, ह्यांत कांहीं नवल नाहीं. मुसलमान राज्यकर्ते विदेशी व विधर्मी असल्यानें, जरी त्यांच्याविषयीं तितकें प्रेम या लोकांत वसत नसेल, तथापि त्यांच्या कारकीर्दींतील दर्गे, मशिदी वगैरे सुबक बांधकामें आजही त्यांच्या अंमलाची ग्वाही देत आहेत.

सुमारें दोनशें वर्षे मराठ्यांचा ह्या प्रांताशीं संबंध जडला आहे; आणि त्यापैकीं ज्या भागावर श्रीमंत पेशवे यांचा अंमल होता, त्याची मालकी सार्वभौम इंग्रज सरकाराकडे जाऊन, बाकीचा सर्व प्रांत श्रीगुर्जरपति सेनाखासखेल समशेर बहादूर गायकवाड सरकार यांजकडे आहे. वास्तविक पाहिलें असतां, मराठे व गुजराती यांचा धर्म व आचारविचार हे बहुतांशीं एकाग्र स्वरूपाचे आहेत. उभयतांची भाषा व देश यांचाही निकट संबंध आहे. तेव्हां मुसलमानांपेक्षां मराठ्यांची कारकीर्द गुजराती लोकांच्या स्मरणांत राहावी, हें साहजिक आहे. परंतु ज्याप्रमाणें रजपूत व मुसलमान ह्यांनीं आपल्या कारकीर्दींत अवाढव्य कामें करून आपलीं नांवें कालपटा-

वर ठसठशीत कोरून ठेविलीं आहेत, तसें कांहीं चिरस्मरणीय श्रीमंतांचे अंमलांत झालें नसल्यानें, कालांतरानें त्यांची विस्मृति होणेंही साहजिक आहे. सार्वभौम इंग्रज सरकाराची तशी गोष्ट नव्हे. इंग्रजांनीं लोककल्याणार्थ रस्ते केले, पूल बांधिले, बिकट घाटांत बोगदे करून सुगम वाटा काढिल्या; इतकेंच नाहीं, तर टपाल, तारायंत्र, व आगगाड्या, यांमुळें त्यांचें स्मरण किती तरी शतकें हिंदुस्तानवासी लोकांस राहील. ह्याहींपेक्षां यांच्या अंमलांत आपल्यास स्वदेशाभिमानाची, हिंदुस्तानासारख्या खंडांतील निरनिराळ्या देशांचे, भाषेचे, धर्मांचे व आचारविचाराचे आम्हां लोकांस एकराष्ट्रत्वाची, कल्पना येत आहे, हें कांहीं लहानसहान कार्य घडत नाहीं. तसेंच इंग्रजांपासून, दृढनिश्चय, उद्योगिपणा, वेळेची किंमत, व्यवहारांतील सचोटी, व्यापारांतील पत, एककार्यव्यापृतत्व इत्यादि गुण आपल्यास अवश्य शिकले पाहिजेत; ते शिकून आपल्या अंगवळणीं पडण्यास आणि नंतर एकराष्ट्रत्वाची कल्पना सार्वत्रिक होण्यास, किती तरी शतकें आपण इंग्रज प्रभूंच्याच सत्तेखालीं कालक्रमण केलें पाहिजे! व तसा सुयोग राहावा म्हणून प्रत्येक सन्मार्गी व कर्तव्यपरायण देशभक्तानें ईश्वरापाशीं अनन्यभावें मागणें मांगितलें पाहिजे.

ही कसोटी लावून, गुजराती प्रजेनें मराठ्यांच्या अंमलांतून कांय धडा घेतला पाहिजे, तिला आठवण राहील असें त्यांच्या हातून काय झालें आहे, हा विचार करणें बरोबर होणार नाहीं. तत्राप मुसलमान किंवा रजपूत यांच्यासारखें तरी कांहीं झालें कीं नाहीं, याचा निर्णय इतिहासदृष्ट्या झाला पाहिजे. या प्रश्नाचें सप्रमाण उत्तर देण्यास सध्यां मी तरी असमर्थच आहें. परंतु हल्लींच्या इंग्रजी अंमलांतील गुजरातेवर श्रीमंत पेशव्यांचा अंमल होता, त्यास पुरें शतक देखील लोटलें नाहीं, तोंच त्या भागांतील प्रजेस त्या अंमलाचें सर्वथैव विस्मरण पडत चाललें आहे. फार तर काय, पण अमदाबाद, सुरत, भडोच, येथें पूर्वी मराठ्यांची सत्ता गाजत होती, ह्याचें स्मरण आपल्या लोकांना तरी येण्यास त्या त्या शहरीं आज मित्तीस काय आहे? त्या त्या शहरापासून दहाबारा मैलांचे आंतच गुर्जरखंडाचे अधि-

पति श्री. गायकवाड सरकार यांचा मुलूख लागून आहे; असें असतां ही स्थिति, तर मग गुजराती लोकांची रहणी, त्यांची विचारसरणी, त्यांचे कित्येक अनुकरणीय गुण, यांविषयीं आपले लोकांस माहिती नाहीं ती नाहीं, पण कित्येक प्रसंगीं आपली किती तरी खोडसाळ समजूत असते? आपले निकट देशबंधु, भाषेनेंही आपल्यास निकट, उद्योगप्रियता, मितव्ययिता, शांतताप्रियता, स्वावलंबन इत्यादि गुणांमुळें आपल्यास, म्हणजे जे आपण निश्चयानें परिश्रम न करितां पोकळ महत्वाकांक्षेस फळें यावीं म्हणून इच्छितों त्यांस, अनुकरणीय आहेत, आपण ज्यांच्यावर राज्य करीत होतों व आहों म्हणून शेखी मिरवितों, त्यांची आपल्यास इंग्रजांइतकी तरी माहिती हवी होती. इंग्रजांचा एवढाच गुण म्हटला तरी लक्षांत ठेवण्याजोगा आहे; त्यांनीं प्रत्येक प्रांत व त्यांतील लोक यांविषयीं मिळेल तितकी माहिती मिळवून प्रसिद्ध केली आहे.

सन १८८६ सालीं मी अमदाबादेस असतांना, वर लिहिल्याप्रमाणें विचार माझे मनांत घोळत असत. व्यापारासंबंधानें अमदाबादेची भरभराट पाहून, तेथील जुम्मा मशीद, शाहआलम, सरखेज, दादा हरीची वाव, कांकरीया तलाव, वगैरे स्थानें पाहून, व रासमालेसारखीं पुस्तकें वाचून, मला वाटूं लागलें कीं, मराठ्यांचें वैभव एकाद्या धूमकेतूप्रमाणें कालरूपी आकाशपटांत तेजोमय होतें, परंतु तेंच वैभव लयास गेल्याबरोबर इतर ग्रह किंवा तारे यांच्या तेजाप्रमाणें त्याचा मागमूस देखील त्या पटांत राहिला नाहीं. तेव्हां अशा प्रकारें महाराष्ट्रियांच्या सत्तेचा लोप झालेला पाहून, मला वाईट वाटावें यांत नवल नव्हतें. परंतु केवळ वाईट वाटून बसण्यानें भागत नाहीं, तर ज्यामुळें महाराष्ट्रियांचे इतिहासांतील हा लुप्त होत असलेला भाग स्मरणांत राहील व गुर्जर लोकांसारख्या उद्योगप्रिय व शांततेच्या काळांत भरभराटींत येणाऱ्या वर्गाविषयीं जास्त माहिती होईल, तें करून देण्यास काय केलें पाहिजे, याविषयीं विचार घोळूं लागले; आणि विचारांतीं असें दिसूं लागलें कीं, लोकांच्या रीतिभाति, स्थलांचीं वर्णनें, इत्यादि केवळ वर्णनरूपानें दिल्यास, हल्लींच्या

आपल्या वाचकवर्गाचे स्थितींत विशेष उपयोग होणार नाहीं, तर तेंच सर्व काल्पनिक अगर इतिहासाचा आधार घेऊन लिहिलेल्या गोष्टींच्या रूपानें वाचकवर्गापुढें मांडल्यास; विशेष प्रिय होईल व इष्ट हेतु तडीस जाईल.

या उद्देशानें अमदाबादेस असतांनाच मीं एक गोष्ट लिहिण्याचें सुरू केलें; ती **देवी सत्यभामा** होय. गुजरातेंत पेशवाईच्या अखेरीस कित्येक दुर्धर प्रसंग ओढवले होते; त्यामुळें त्यावेळचें एकादें कथानक घेतल्यास त्या ह्या प्रसंगाचें वर्णन सहजरीत्या येऊं शकेल, असें समजून ही गोष्ट लिहिण्यांत आली आहे. तिचा पूर्वार्ध वाचकांस प्रस्तुत सादर करण्यांत येत आहे.

हा पूर्वार्ध लिहिल्यानंतर सन १८८७ सालीं मला नोकरीच्या निमित्तानें बडोद्यास यावें लागलें; परंतु वर दर्शविलेल्या विचारांत म्हणण्यासारखा तफावत झाला नाहीं. अशा प्रकारच्या कादंबरींत स्थलांचें किंवा प्रसंगाचें वर्णन करण्याकडे विशेष लक्ष दिलें गेल्यास, कथानक मनोरंजक व्हावें तितकें न होण्याची भीति असते; तत्रापि ग्रंथकाराचे उद्दिष्ट हेतु लक्षांत वागविल्यानें वाचकांस अशा कादंबऱ्या अप्रिय होणार नाहींत असेंहि वाटतें.

वर्णनांत संस्कृत ग्रंथांप्रमाणें अलंकार असावे किंवा नसावे, अमुक वर्णनें पाल्हाळिक आहेत किंवा नाहींत, वास्तविक असून प्रासंगिक आहेत किंवा कसें, वाक्यरचना कशी असावी, अशा प्रश्नांसंबंधानें बराच मतभेद होईल हें खरें आहे; तथापि वाचकांपैकीं ज्यांना या ग्रंथांत दोष दिसून येतील, त्यांना स्वत: ग्रंथकार होण्याचा सुयोग आल्यास या पुस्तकांतील दोष टाळतां येतील, एवढें जरी कार्य पूर्वार्धापासून घडलें, तरी माझ्या लिहिण्याचें चीज झालें, असें मी मानीन.

उत्तरार्धांत कथानकाची संगति देण्यांत येईल, एवढें सांगून हा लेख पुरा करितों.

# देवी सत्यभामा.

(इ. स. १८११–१८१६.)

## पुस्तक १ लें.

**गुरुवार, ता० ११ ते रविवार ता० १४ जानेवारी १८११.**

## भाग १ ला.

### लूट.

**वाजे पाऊल आपुलें । ह्मणे मागें कोण आलें ।–रामदास.**

सुमारें ७७ वर्षांपूर्वी **गुजराथ**प्रांतांतील बराच भाग श्रीमंत **पेशवे** व **गायकवाड** ह्यांच्या ताब्यांत होता. त्यांपैकीं **अमदाबाद, विरमगाम** इत्यादि परगणे **पेशवे** व **गायकवाड** ह्यांच्या समाईक अमलाखालीं सुमारें ५० वर्षे होते. शके १७२५ त श्रीमंतांनीं **गुजराथें**तील प्रांतांचें आपलें उत्पन्न, सालीना ५ लक्ष रुपये खंडणी घेण्याचें कबूल करून, **गायकवाड** सरकारास तोडून दिलें होतें. परंतु ह्या प्रांताचा बंदोबस्त वगैरे करण्यासाठीं ह्मणून श्रीमंतांनीं एक सरसुभेदार नेमिला होता. तो बहुतकरून **पुणें** मुक्कामींच रहात असे, व आपलें काम आपला दुय्यम जो सुभा त्याकडून करवीत असे. हा सुभा **अमदाबाद** शहरांत राहून, **गायकवाडीं**तून नेमिलेल्या ह्याच प्रांताच्या सुभ्याच्या संमतीनें दरवर्षी आसपासच्या खालसा परगण्यांतील वसूल करण्याकरितां आपल्या तैनातींतील लोक पाठवीत असे.

शके १७३२ त **पौष** महिन्यांत **अमदाबाद** शहरच्या दक्षिणेस जीं लहान- सहान खेडीं होतीं तेथून वसूल आणण्यासाठीं **पेशव्यांचे** सुभेदार **रामचंद्रपंत मुळेकर** ह्यांनीं आठ लोक पाठविले होते. **मकरसंक्रांत** जवळ आली, ह्मणून ह्या लोकांनीं फार दूर न जातां घाईघाईनें एक दोन खेड्यांतून कुणब्यांनीं आणिलेले हप्ते जमा केले, आणि दरवर्षाचे ठरावाचे रकमेची तूट पुरी करण्याकरितां त्या गांवच्या बऱ्याच ऐपतीच्या २।३ सावकारांस बोलावून आणिलें, व अमुक रुपये कमी पडतात ते अमुक वेळच्या आंत पोहोंचते केल्यास ठीक पडेल, असें बोलणें लाविलें. पारख तरी भले वस्ताद. रुपये मुदतीच्या आंत आणून दिलेच, परंतु गांवाकडून जो वसूल येणें राहिला होता तो गोळा करण्याविषयीं त्या अधिकाऱ्यांकडून त्यांनीं चिठ्या घेतल्या, व **पेशव्यांचे** लोक गेल्यावर गांवकऱ्यांना जरब घालून दिलेल्या पैशापेक्षां जास्त रुपये गोळा केले. आपलें काम अनायासें पार पडलें त्याबद्दल आनंद मानून **संक्रांती**च्या पूर्वी एक दोन दिवस आपण शहरांत मजा मारूं, ह्या हेतूनें ते लोक परत

निघाले, ते शहरच्या दक्षिणेस चार कोसांवर हल्लीं जेथें **चंडोला** नांवाचा तलाव आहे त्याच्या थोडे खालच्या बाजूस एका झाडींत रात्रीच्या मुक्कामासाठीं राहिले. हे दिवस जरी थंडीचे होते आणि ह्या प्रांतांत हिंवाळा जरी अतिशय कडक असतो, तरीही सात आठ दिवस आकाशांत एकसारखीं अभ्रें येत असल्यामुळें थंडीचा किंवहुना अभावच होता. थंडीपासून फारशी पीडा होत नाहीं, हें पाहून मोठ्या आनंदानें रात्रीच्या पांच सात घटकांच्या आंत आपलें जेवणखाण आटोपून व घोड्यांना चंदी वैरण देऊन, एक मोठी आगटी पेटवून तिच्या भोंवतीं कोणी गात, कोणी गप्पा छाटीत, असे बरीच रात्र होईपर्यंत ते बसले. परंतु सकाळीं सूर्योदयापूर्वी आठ घटकेच्या आंत प्रातर्विधि आटोपून कूच करावें लागेल, ह्मणून प्रत्येकानें झाडाखालीं पडलेला वाळलेला पाला चांगला नीट जमवून त्यावर आपला दुपेटा आंथरून उशाला घोड्याचें जीन घेऊन ते झोंपीं गेले; आणि त्यांपैकींच एक ह्या निजलेल्या लोकांच्या चारी बाजूस आगट्या पेटवून व त्यांत वरचेवर वाळलेल्या फांद्या, कडब्यांचीं ताटें इत्यादि टाकीत व पहारा करीत त्यांच्या डोक्याशींच झाडाजवळ उभा राहिला.

जिकडे तिकडे सामसूम होऊन २ घटका झाल्या नाहींत तोंच ह्या पहारेकऱ्याला समोरच्या चिंचेच्या फांद्यांत कांहीं चळवळ होत आहे असें वाटलें. हा जात्या धीट होता, ह्मणून तो कांहीं हूं कीं चूं न करितां आणखी लक्ष्यपूर्वक तिकडेसच पाहूं लागला, तों त्याच्या अंगावर तिकडून २।३ चिंचा येऊन पडल्या. ह्या वेळेस चोहोंकडे कसलीही हालचाल नसल्यामुळें अतिशय शांतता होती. मधून मधून आसपासच्या झाडींतून घुबडांचें घुं घुं असें ओरडणें, आणि रातकिड्यांचा किर्र आवाज कायतो कानीं पडत होता. वारा पडल्यामुळें झाडांचीं पानें सुद्धां हालत नव्हतीं. चंद्र नुकताच उगवला, आणि त्याच्या प्रकाशानें आसपासचे पदार्थ थोडे जास्त स्पष्ट दिसूं लागले. वृक्षांची छाया पूर्वेच्या बाजूस लांबच लांब जमिनीवर पसरली होती, त्यामुळें जणू काय प्रत्येक वृक्ष आपल्या जवळच्याच पण पूर्वेस असणा[illegible] आपल्या ज्येष्ठ बंधूस छायामिषानें सा[illegible] प्रणाम करीत आहे, आणि त्यानें आप[illegible] अत्युच्च शाखांनीं त्याचे पाय धरिले आ[illegible] असें वाटलें. वरती आकाशांत कांहीं द[illegible] पूर्वेच्या बाजूस वर येऊं लागले होते. त्य[illegible] च्यावर चंद्राचा उजेड पडून जणू चांगल[illegible] पांढरा सफेत कापूस, आकाशपति जो इंद्र त्याच्या पिंजाऱ्यानें पिंजून ठेविला आहे; किंवा अतिशय काळे ढग त्या शुभ्र ढगांवर असल्यामुळें जणू आकाशांत हिमालयाचें प्रतिबिंबच पडलें कीं काय असा भास होई. चंद्राच्या भोंवतीही खळें पडून त्याच्या प्रकाशांत थोडी मंदता आली होती, यामुळें पूर्वेकडील मेघांना पाहून आपल्यास हे गिळून टाकितील कीं काय, ह्या भीतीनें त्यानें आपल्या भोंवती मंत्रानें भारलेलें वर्तुल काढलें असें वाटलें.

अशा वेळेस जेव्हां त्या चिंचा आंगावर येऊन पडल्या त्या वेळेस साधारण मनुष्य तर भेदरून जायचाच; परंतु ह्या पहारेकऱ्याला अशा प्रकारचे बरेच प्रसंग आले अ-

सल्यामुळें व स्वभावतः तो धीट असल्यामुळें कांहींएक न डगमगतां चिंचा कशा आल्या ह्याविषयीं तो विचार करूं लागला. एकवेळ त्याला असें वाटलें कीं, चिंचा फेंकणारा कोणी वानर असावा; पण जो भरदिवसा मनुष्याच्या अंगावर येत नाहीं तो रात्रीच्या वेळीं चिंचा टाकील हें संभवेल तरी कसें ? ह्मणून हें भूत अथवा कोणी चोर असावा. असा विचार करीत आहे, तोंच त्याला खोकण्याचा आवाज ऐकूं आला; त्याबरोबर जिकडून आवाज आला त्या दिशेला नें एक तीर सोडला. तीर सुटल्यावरु "अग आई" असा दाबलेला शब्द वराच पडला. ह्यावरून तर तो मनुष्यच त्यांचवा अशी त्या पहारेकऱ्याची पक्की खात्री वादगी. तेव्हां हा प्रकार कळविण्यासाठीं आव गगा अंमलदाराला उठवावें ह्मणून तो खालीं खाहला, इतक्यांत एका पाठीमागून एक अशा पंधरा वीस चिंचा व मातीचीं ढेकळें त्याच्या अंगावर आलीं आणि त्यांपैकीं कांहीं दोन तीन चिंचा अंमलदाराच्या अंगावरही पडल्या. त्या पडण्याबरोबर अंमलदार दचकून अर्धा जागा झाला आणि डोळे उघडून पहातो तों पहारेकरी वांकलेला असा त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां हा कोणी चोर माझा प्राणघात करण्यासाठीं आला आहे ह्या भीतीनें अतिशय गांगरून "चोर, चोर, मी मेलों" असें तो मोठ्यानें ओरडला. अंमलदाराला नीट सावध करण्याकरितां 'मी पहारेकरी **गुलाम कादर**', असें जरी तो पाहारेकरी ह्मणाला, व त्याला धरण्यासाठीं गेला, तरीही निजलेल्या चार लोकांनीं उठून विचार न करितां एकदम पहारेकरी ह्याच चोर असें समजून त्याला यथास्थित चोपिलें; आणि तो 'मी तो पहारेकरी, चोर नव्हे' असें ह्मणत असतां 'चोर असेंच ह्मणत असतो' असें ह्मणून त्यांनीं त्यास आणखी गुद्दे लगाविले. इतक्यांत त्यांपैकींच दोघेजण डोक्यावर पांघरूण घेऊन भीतीनें झोंपेचें मीष घेऊन निजले होते त्यांनीं हा **गुलाम कादराचा** स्वर आहे असें ओळखून लगबगीनें उठून त्या मारणाऱ्यांना 'अहो सर्व खरें, पण **गुलाम कादर** कोठें आहे' असें विचारिलें. हें ऐकतांच '**गुलाम कादर**' '**गुलाम कादर**' ह्मणून त्या लोकांनीं हांका मारिल्या, तेव्हां 'अहो मी तो **गुलाम कादर** मला मारूं नका मी पळून जात नाहीं' असें ह्मणतांच त्यांनीं त्याला नीट न्याहाळून पाहिलें आणि 'हाच तो **गुलाम कादर**' असें ठरविलें. अंमलदाराला 'चोर कोठें आहे' असें विचारतांच 'मला भास झाला' असें त्यानें उत्तर दिलें. पण **गुलाम कादरानें** सर्व हकीकत कळविली आणि 'त्या समोरच्या चिंचेवर कोण आहे याचा शोध करूं या', असें म्हटलें. परंतु अंमलदारास हें न रुचून 'गोळी घाला, म्हणजे आपसुखच कळेल काय असेल तें' असें त्यानें म्हटलें. त्याप्रमाणें केलें, परंतु कांहीं दृष्टोत्पत्तीस पडलें नाहीं, आणि चिंचा तर जवळ पडलेल्या पाहिल्या, ह्यामुळें ही भूतचेष्टा आहे अशी अंमलदाराची बालंबाल खात्री झाली. तो म्हणाला 'कशाला जातां वाटेस, जाऊं द्या काय असेल तें.' परंतु अशानें आपल्याला भेंकड समजतील म्हणून 'ह्याच लुच्च्या **गुलाम कादराचें** कांहीं कृत्रिम आहे' असें तो फिरून बोलला. हें ऐकतांच अ-

गोदर नाहक मार खाल्ला आणि त्यावर हा खोटेपणाचा आळ आला, यामुळें **गुलाम कादर** संतापून म्हणाला, 'असें काय? मी लुच्चा! चला तर, जमादार साहेब, आपण दोघे जण जाऊं, आणि काय असेल तें पाहूं' जमादार सावरून नेण्यासाठीं म्हणाला, 'अरे तुला झोंपबीप आली असेल, आणि तसें स्वप्न पडलें असेल. बाकी तुला त्याची जर खात्री करून घ्यायाचीच असेल तर ह्या **गोमाजी**ला घेऊन जा, आणि कळवा मला काय असेल तें.' **गुलाम कादर** जमादाराचें पाणी ओळखून होता, परंतु ह्याच्या शिफारसीशिवाय आपणास बढती मिळणें नाहीं असें जाणून तो **गोमाजी**ला घेऊन गेला आणि पाहतों तों तेथें कांहीं नाहीं. नंतर एक जळतें लांकूड घेऊन त्यांनीं नीट शोध करून पाहिलें, तों एके ठिकाणीं रक्तानें डागाळलेला तीर पडलेला दिसला आणि त्याच्यापासून थोडे अंतरापर्यंत रक्ताचे लाल थेंब दिसले. हें त्या जमादाराला कळविलें. जमादाराशिवाय बाकीच्या मंडळीनें 'कोणी चोर होता तो आपल्या गडबडींत तेथून पळून गेला' असा तर्क केला. जमादारानेंही वरकांती तसेंच म्हटलें, पण तें भूत होतें असेंच त्याच्या मनानें घेतलें; तेव्हां आपल्यास त्यापासून कांहीं अपाय न व्हावा म्हणून 'जय **भद्रकाळी**, तुला मी एक कोंबडा वाहीन' असा त्यानें नवस केला.

इतकें सर्व होईपर्यंत रात्र उलटली आतां कूच करण्याची वेळ झाली, समजून जमादारानें आपल्या टोळीला निघण्याविषयीं हुकूम केला. नंतर सुमारें एक घटकेनें ते सर्वजण घोड्यावर बसून मार्ग क्रमूं लागले. ह्या वेळेस अभ्रांनीं आकाश अगदीं व्यापून टाकिलें होतें; थोडी बहुत मेघगर्जनाही होत होती. ह्यामुळें आपल्या प्रियपत्नीस थंडीमुळें जी हुडहुडी भरली होती ती घालविण्यासाठींच आकाशानें पृथ्वीस मेघरूपी आच्छादन घातलें असें वाटलें. इतक्यांत एक दोन विजाही लल्या. जरी हा वर्षाकाळ नव्हता, तरीही त्या काळाप्रमाणेंच हवेमध्यें सर्व कांहीं फेरफार झाले होते, त्यामुळें घरीं जाण्याच्या सर्वांच्या आनंदाला थोडेंसें विरजण पडलें. कांहीं वेळ मुकाट्यानें मार्ग गेल्यावर जवळच्या घोड्यावर बसलेल्या इसमास जमादार ह्मणाला "कांहो **माणेकभाई**, तुमच्या ह्या **गुजराथेंत** सर्वच कांहीं विपरीत. आमच्या **दक्षिणेंत**—अरे **गुलामकादर** तुला हजारदां सांगितलें कीं तूं सर्वांच्या पुढें ऐस, इतका कां भीतोस." वास्तविक **गुलामकादर** हा सर्वांच्या पुढेंच होता, परंतु आपला अंमल बजविण्यासाठीं ह्मणा, किंवा असला गुडुप अंधार आवडत नव्हता ह्मणून ह्मणा, जमादार साहेबांनीं **गुलामकादरा**स वर सांगितल्याप्रमाणें दरडाविलें व तेंही त्यानें कांहीं प्रत्युत्तर न देतां ऐकिलें. जमादारसाहेब फिरून जवळच्या इसमास वळून ह्मणाले "हो खरेंच, **माणेकभाई**, मी काय ह्मणत होतों तें, आमच्या **दक्षिणेंत** ऐन हिंवाळ्यांत कधीं पाऊस पडलेला पाहिला नाहीं." **माणेकभाई** मनांत ह्मणाला "ज्या देशांत उपजीविका करितो त्या देशालाच हरामखोर नांवें ठेवितो;" पण मोठ्या नम्रतेनें उघड ह्मणाला "अहो **सदवाजी**-

**राव**' आमची आपली गरीव **गुजराथ**, येथें हवापाण्यामध्येंच नुसतें वैपरित्य आहे असें नाहीं. तुह्मीच पहा, तुमच्यासारखे पुरुष येथें किती उत्पन्न होतात. येथें पुरुष, ह्मणजे केवळ भागुबाई." हें सरतें शेवटलें जरा खोंचून होतें, पण त्याचा रोख न समजून **सटवाजीराव** ह्मणाला "हो हो, ह्यांत काय संशय; तुह्मीचसे काय, पण सर्व जगत ह्मणतें कीं, मराठे काय ते लढणारे आणि तुह्माला खरेंच सांगूं का, पण ह्या मराठ्यांमध्यें माझ्या सारखा शूर शिपाई मिळावयाचा नाहीं. ९ वर्षांपूर्वी जेव्हां **यशवंतराव होळकर पुण्यावर**—" इतक्यांत ज्या झाडाखालून ते जात होते त्याच्याजवळून खोल आवाजानें "ठाऊक आहे पुरुषार्थ तुझा" असें कोणी ह्मणाला. तें ऐकण्यावरोबर जमादाराच्या उरांत धडकी भरली, नीट शब्द उमटेना, हातापायाला कांपरें सुटलें, आणि घाबऱ्या घाबऱ्या घोगऱ्या आवाजानें त्यानें हळूच ह्मटलें "रे **गुलामकादर**, रे **गो-मा-जी** इकडे या." त्याच्याप्रमाणेंच **माणेकभाई**ची सुद्धां अवस्था झाली. इतक्यांत धाडधाड असे त्यांच्या उजव्या हाताला आवाज झाले, त्यावरोवर त्या दोघांची अतिशय गाळण झाली. घोडा बुजला तोही **सटवाजीरावा**च्यानें आपला ताब्यांत ठेववेना. **गुलामकादर** व **गोमाजी** ह्यांनीं आवाजाच्या अनुरोधानें वार काढले; परंतु ज्या वेळेस त्यांनीं घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकिले त्यावेळेस कसचा जमादार आणि कसचें काय ? त्या सर्वांनीं आपापल्या घोड्यास टांचा मारून धूम पळ काढिला. एक **सटवाजीराव** मात्र उरला; पण त्याला घोडा आवरतां आवरतां पुरें झालें, त्यांतून भीतीनें तो अगदीं गांगरून गेला होता; त्यामुळें त्याचे हात ढीले पडून घोड्याचा लगाम देखील त्याच्यानें नीट धरवेना, तेव्हां घोडा मागील दोन पायांवर उभा राहून गरगर फिरून **सटवाजीरावा**स जमीनीवर पाडून उधळत गेला व **सटवाजीराव** जमिनीवर आला.

ज्यांच्या आवाजानें मंडळीची दाणादाण झाली ते लोक लागलेच येऊन पोंचले. हे तिघेजण होते; त्यांत एक घोड्यावर असून दोन त्याच्या मागोमाग होते. ते येऊन पोंचल्यावरोबर आणखी एकजण जवळच्या झाडावरून झरझर खालीं उतरला. त्यास घोड्यावरचा इसम कांहीं विचारूं लागला, तेव्हां तो ह्मणाला "बाकीचे सारे पळाले, पण ते शेंदाड जमादार येथेंच कोठें तरी पडले असावे असें वाटतें." त्यावरून हळूहळू तपाशीत, **सटवाजीराव** पडला होता त्या जागीं ते येऊन पोंचले, तों एकाच्या पायास खालीं कांहीं लागल्यासारखें वाटून त्यानें खालीं वाकून चांचपून पाहिलें व ह्मटलें 'ह्या पहा कशा भागुबाई पडल्या आहेत.'

इतका वेळपर्यंत **सटवाजीराव** कसा तरी मुठींत जीव धरून पडला होता. एकाएकीं आवाज झाले, आपल्या लोकांची पळापळ झाली, घोडा कधींही भडकायाचा नाहीं तो भडकून उधळला, पूर्वे रात्रीं झालेला प्रकार आणि पडलेला गुडूप अंधार या एकंदर गोष्टींमुळें **सटवाजीरावा**च्या

मनाची अशी वालंबाल खात्री होऊन चु-कली होती कीं, हा खेळ सारा भूताखवीसांचा आहे. आणि तितक्यांत जेव्हां कां अंगाला कोणाचा पाय लागल्यासारखें वाटलें, तेव्हां तर त्याला दरारून घाम सुटून त्याची बोबडी वळली. तो अडखळत व अस्पष्ट असें बोलला " तूं कोण आहेस? तूं मला पछाडूं नकोस, मी एक बोकड बळी देईन. " हा आपल्यास भुतें समजून पराकाष्टेचा भेदरून गेला आहे असें त्या लोकांस समजतांच एकाच्या हातास किंचित जखम झाली होती त्यानें खोल व रेंकत आवाज काढून म्हटलें " रे मनुष्या, तुझे लोक माझ्या वाटेस गेले म्हणून मी तुला धरणार " आणि लागलाच एका कोल्ह्यासारखें रडूं लागला; घोड्यावरचा इसम मधून मधून त्याच्या अंगाला भाल्याचें फळ टोचूं लागला व वाकीचे मिळून त्याच्या अंगाला चिमटे घेत घोगऱ्या आवाजानें " खाईन " " खाईन " असें ओरडूं लागले; त्यामुळें विचारा पुरा भेदरून जाऊन त्याचें भान देखील गेलें. हा निश्चेष्ट पडला असें पाहून त्याच्या अंगावरचे सर्व कपडे काढून व कंबरेस ५० मोहरांचा कसा होता तो घेऊन ते सारेजण चालते झाले.

हे लोक बोलूनचालून वाटमारे होते. ज्याच्या हाताला जखम झाली होती, तो त्यांच्या टोळीपैकींच असून वाटेंत पा[illegible] वर होता मागें सांगितल्याप्रमाणें गुरु कादरास " चोर " " चोर " म्हणून डळी मारीत असतां जी गडबड झाली अवकाशांत तो निसटून आपल्या साथ दारास येऊन मिळाला व त्यांनीं नंतर ही लूट केली. एकानें झाडावर बसून प्र[illegible] मंडळीला हटकून भिवविलें व दुसऱ्यानें [illegible] वळच्या पडक्या मशिदींत दगडावर द[illegible] आपटून धाड धाड आवाज काढिले. त्यां[illegible] उद्देश मिळून इतकाच होता कीं, आपण पुष्कळजण आहोंत असें **सटवाजीरावा**च्या मंडळीस वाटावें. त्याप्रमाणें परिणाम तर झालाच, परंतु खुद्द **सटवाजीरावा**च्या विलक्षण कल्पनेमुळें ह्या वाटमाऱ्यांना आयतेंच साह्य झालें.

## भाग २ रा.

### फुशारकीला फसती न सुज्ञ ।

मागें सांगितल्याप्रमाणें **सटवाजीराव** भीतीनें अर्धमेला होऊन सुमारें एक घटका पडला होता. नंतर कांहीं वेळानें चोहोंकडे सामसूम झाली, असें पाहून त्यानें किंचित् डोळे उघडले. अगोदर अंगावर कपडे मुळींच नसल्यामुळें तो वराच कुडकुडत होता; खेरीज मला तीं भुतें फिरून धरायाला कदाचित् येतील, असें वाटून त्याचें सर्वांग लटलटा कांपत होतें. त्याला उभें राहण्याची तर शक्ति नव्हतीच. त्यानें डोळे उघडले खरे, पण आसपास पाहण्याला त्याचें धैर्य होईना. एकदां जीव मुठींत धरून त्यानें वर पाहिलें, परंतु चोहोंकडे अगदीं गुडुप अंधःकार झाला होता; मात्र लांबून गाडी दडदड पळवीत, त्याची

त्याप्रमाणें खोल गडगडणें त्याच्या कानीं आलें. मग तर त्यानें डोळे मुळींच उघडिले नाहींत.

ह्या वेळेस रात्र सुमारें ६ घटका उरली होती. कांहीं वेळानें गडगडणें बंद होऊन थोडा वारा सुटला, आणि दोन चार थेंब असें करितां करितां झपाट्यानें पाऊस आला. मग **सटवाजीरावा**ची अवस्था काय विचारावयाची? वरती आकाश, खालीं भिजलेला पाला व चिखल, आणि झाडाच्या पानांवरून मोठमोठे पाण्याचे थेंब टपटप पाठीवर. तरी पण तो तसाच तेथें पडून राहिला. कांहीं वेळानें आपल्या डोक्याशीं कोणी हुंगीत आहे, असें त्याला वाटलें; आणि टाप मारून एकदम मोठ्यानें घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज अगदीं त्याच्या कानाशीं झाला. त्याबरोबर दचकून **सटवाजीरावा**चे डोळे आपोआप उघडले, आणि सर्व भीति विसरून कदाचित् हा घोडा आपला असेल असें वाटून "**मोत्या**" ह्मणून त्यानें हांक मारिली. धन्याचा शब्द ओळखून घोड्यानें "हॉं हॉं हॉं" असा आवाज काढिला. हा निःसंशय आपलाच घोडा, अशी खात्री होऊन **सटवाजीराव** लगवगीनें उठला, आणि घोड्याच्या अंगावरून हात फिरवून पाहतो तों घोड्यावरील आपलें सर्व सामान जसेंच्या तसेंच आहे, व तरवार सामानावर बांधली होती ती देखील तशीच आहे; तेव्हां मोठ्या आनंदानें झटकन त्यावर बसून तो घोडा फेंकीत चालला.

आतां हा घोडा परत येथें कसा आला असा साहजिक प्रश्न निघेल; पण घोडा बुजून पळाला तो बाकीचे लोक ज्या बाजूस गेले तिकडे न जातां आडवाटेनें गेला, त्यामुळें वाटमाऱ्यांना तो सांपडला नाहीं. पुढें वाटमारे गेल्यावर ज्या वेळेस पाऊस पडूं लागला, तेव्हां घोडा अडोशाला ह्मणून ह्या झाडाखालून त्या झाडाखालीं असा जातां जातां **सटवाजीरावा**च्या जवळ आला; आणि आपला हा धनी असें जेव्हां त्यानें ओळखलें, तेव्हां पावसांतून आपल्या दोहोंचीही सुटका होईल, ह्मणून त्याला आनंद वाटून तो खिंकाळला.

पाऊस सुमारें अर्ध घटका पडून थांबला, आणि झाडी ओलांडल्यावर **सटवाजीरावा**लाही जीवांत जीव आल्यासारखें झालें. मग त्यानें घोड्यावरून उतरून, सामानांत दुसरे कपडे होते, ते आपल्या अंगांत घातले; फक्त डोक्यास पागोटें मात्र नव्हतें. नंतर पुनः घोड्यावर बसून आपली तरवार म्यानांतून काढून तो जिकडे वाट फुटेल तिकडे चालला. ह्याप्रमाणें जातां जातां तो ५।७ झोंपड्यांजवळ येऊन पोहोंचला. तेथें एक गाढव विचारें चरत होतें, त्यावर त्यानें तरवारीचा घांव करून तीं रक्तबंबाळ केली, आणि मग तो तसाच पुढें चालला. वाटेंत त्याला एक गरीब वाटसरू भेटला. त्याला एकदम दरडावून त्याजपासून त्याच्या डोक्याचें गुजराथी धर्तीचें पागोटें हिसकावून आपल्या डोक्यास घालून अगदीं उजेडायला तो शहराच्या **जमालपूर** दरवाज्यापासून सुमारें पाऊण कोसावर येऊन पोंचला. इतक्यांत समोर कोणी चारपांच स्वार घोडे भरधांव टाकीत आपल्याकडेस येत आहेतसें त्याला दिसलें. ते जवळ आल्यावर जीव मुठींत धरून 'कोण आहां' 'कुठें चालला' असें त्यानें

धमकीनें विचारलेंही. त्याबरोबर 'अहो, जमादार आले, बरें झालें' असें ते ह्मणाले. पण जेव्हां का त्यांनीं **सटवाजी**च्या अपूर्व वेषाकडे पाहिलें, तेव्हां त्यांची हंसतां हंसतां पोटें दुखूं लागलीं. नंतर 'आपण कसे सुटलां,' 'तरवारीला रक्त कशानें लागलें, असें त्यांनीं विचारिलें. तेव्हां' 'सांगेन कायतें मग,''काय बिशाद त्या भामट्यांची,' 'एका घावानें दोघे चीत,' 'अगोदर मला **भाऊसाहेबां**ना भेटलें पाहिजे' इत्यादि तो बडबडला.

'बरें, कांहीं का असेना?' 'सुखरूप आले तेवढें पुरें,' 'काय आहे तें कळेल,' 'चोरांनीं धरून नेलें नाहीं हें एक आश्चर्यच म्हणायाचें,' 'आपला हेलपाटा वांचला' असें पुटपुटत स्वारही परतले.

ह्या सुमारास अगदीं पहांटेची वेळ झाली असल्यामुळें, चोंहोंकडे एका प्रकारची रमणीय शोभा आली होती. झाडांवर पाऊस पडल्यामुळें तीं टवटवीत दिसत होतीं. पानांवर पावसाचे थेंब होते, ते मोत्यांप्रमाणें भासत होते. वाटेंत बोरी, फळांनीं अगदीं लवल्या होत्या. चिंचेच्या झाडांवर पुष्कळ चिंचा लागल्या होत्या. कांहीं ठिकाणीं वानरें झाडांवर बसून चिंचा तोडून खात बसलीं होतीं, व स्वार अगदीं जवळ आले ह्मणजे त्या झाडावरून दुसऱ्या लांबच्या झाडावर उडी मारून जात. ह्या प्रांतांत निरनिराळ्या जातींचे अनेक पक्षी आहेत. कांहीं शीळ घालणारे, कांहीं चिमण्यासारखेच पण राखेच्या रंगाचे—चंडोल, बुलबुल, पोपट, भारद्वाज इत्यादि चित्रविचित्र रंगाचे, व सुंदर पक्षी मोठ्या आनंदानें चिलबिल चिलबिल असा शब्द करीत आपल्या घरट्यांतून बाहेर पडत होते. पुष्कळ खारी आपलीं लहानशीशीं डोकीं आपल्या पुढच्या इवल्याशा दोन पायांच्यामध्यें करून झाडांच्या बुंध्यांवरून डहाळ्यांवर व वरून खालीं अशा अतित्वरेनें जा ये करीत होत्या.

पाऊस पडल्यामुळें वाटेनें बराच चिखल झाला होता, परंतु हे घोड्यावर असल्यामुळें त्यांना त्यापासून फारसा त्रास झाला नाहीं. रात्रीं जें कांहीं अभ्रांनीं औडंबर माजविलें होतें, त्याचा बराच लोप झाला होता. पूर्व दिशेला मात्र बऱ्याच मेघांनीं सूर्य क्षितिजावर आला असतांही त्याच्या प्रकाशाला झांकण घातलें होतें, त्यामुळें फारच मनोहर असा अंधुक प्रकाश अंतरिक्षांत व्यापून राहिला होता.

ह्यानंतर कांहीं वेळानें सूर्यानें मेघावरणाला भेदून आपले कोमल सुवर्णमय किरण चोंहोंकडे फेंकिले, त्याबरोबर पानांवरचे पाण्याचे थेंब हिरकण्यांप्रमाणें, चिंचेसारख्या झाडांचीं कोंवळीं पानें पाचेच्या खड्यांप्रमाणें अशीं दिसूं लागलीं. जेथें आकाश अभ्राच्छादित होतें, तेथें जणू कांहीं मोठा एक आगीचा लोळ पसरला आहे असें वाटलें, आणि जेथें निरभ्र होतें तेथें अतिशय निळें असल्यामुळें तें अति स्वच्छ जलाचा फारच खोल असा संचय आहे कीं काय असें भासलें. असो. ते कांहीं पुढें गेल्यावर त्यांना शहराचा भव्य कोट दिसूं लागला. हा कोट पक्क्या विटांनीं फारच मजबूत बांधिलेला होता. पुष्कळ ठिकाणीं हा पडका होता, परंतु तेथें पाहरे ठेवून शिवाय रात्रीं बाहेरून आंत येणारा

ला सुभेदारांनीं सक्त मनाई ठेविली होती. कोटाची भिंत साधारण १५ हात उंच व ७ हात रुंद होती, व तिच्या भोंवतीं सुमारें सोळा हात रुंद आणि ६ हात खोल असा खंदक होता. त्या खंदकांत कोठें कोठें पाणी सांचलेलें होतें. कोटाला ठिकठिकाणीं वरेच भव्य असे बुरुज होते. प्रत्येक बुरुजावर दोन अथवा तीन तोफा ठेविल्या होत्या, व कोटाच्या तटांतून गोळ्या मारण्यासाठीं दोन दोन हातांवर जंग्या ठेविल्या होत्या. हा तट ३॥ हात उंच व एक हात रुंद होता.

कांहीं वेळानें शहरचा दरवाजा दिसूं लागला. ह्या दरवाज्याचें नांव **जमालपूर** दरवाजा. दरवाज्यापुढील खंदकावर रहदारीसाठीं एक लांकडी पूल होता. ह्याच्या दोन्ही बाजूस दोन भले मोठे बुरुज होते. त्या बुरुजावर शिपाई पहारे करीत होते, आणि दरवाज्यावरच एका लहानशा ?परांत तेथल्या नाइकाची कचेरी होती. या दोन बुरुजांचे दरम्यान बारा हात उंच अशी एक भव्य कमान होती. ही कमान ८ हात रुंद होती. हिला सागवानी दीड वीत जाडीचा दरवाजा होता. त्या दरवाज्याला खंदकाच्या बाजूला लोखंडी पत्रा जडविला होता, आणि सुमारें सव्वा वीत लांब व भक्कम असे लोखंडी खिळे पुष्कळ लाविले होते. दरवाज्याला वीत चौरस असे तीन सागवानी अडसर होते.

सुमारें दोन घटका दिवस वर आला, त्या वेळेस हे स्वार दरवाज्याजवळ आले. नेहमींची पुसतपास झाल्यावर व तेथल्या रखवालदार अधिकाऱ्यानें **सटवाजीरावांची** पाठ थोपटल्यावर हे स्वार **भद्रें**त आपल्या मुक्कामीं जावयास निघाले. तेव्हां त्या दरवाज्यापाशीं असलेले ३ मनुष्य **सटवाजीरावांची** परवानगी घेऊन गावपुऱ्यांत जाऊं लागते. ‘ मी सुभेदारांना मुजरा करून परत येईपर्यंत तुह्मी चावडीवर माझी वाट पहात बसा; मी आतां येतों’, असें **सटवाजीरावानें** स्वारांस सांगून जो भरधांव घोडा काढिला, तो थेट दक्षिण वारीनें शहर वसविणार **अहमदशाह** यानें खुद्द बांधिलेल्या लहानशा टुमदार मशिदीवरून **भद्रें**त शिरला, आणि **भद्रे**च्या मध्यभागीं सरकारवाड्यांत जाऊन आपण आल्याची त्यानें वर्दी दिली. **भाऊसाहेब मुळेकरांना** भेटल्यावर आपल्या घोड्याच्या जीनाखालून १२५० रुपयांचे दोन तोडे काढून त्यानें हजर केले. तो म्हणाला, ‘ सरकार, हा वसूल आणिला. परंतु काय सांगावें, कोणींही विश्वास ठेविला नसता, पण वरें, लोक बरोबर पहायाला होते म्हणून, नाहीं तर—,

**सटवाजीराव** हा **मुळेकरांच्या** मर्जींतला होता; म्हणून त्यांनीं जरी डोक्यावर गुजराथी पागोटें व अंगभर यथास्थित चिखल असा ह्याचा थाट पाहिला, तरी यत्किंचितही न रागावतां पोट धरधरून हंसून ते म्हणाले, “ कां **सटवाजी,** आज आपण कोणत्या सोंगाची बतावणी करणार? हा कांहीं शिमगा नव्हे; तर मग इतका चिखल आणि हें थापट पागोटें तें कशाला? ”

**सटवाजी**—काय सांगूं? महाराज हें माझ्या शिपाईगिरीचें फळ, रात्रीं आम्ही येत असतां पंधरा वीस चोर एकाएकीं आमच्या अंगावर तुटून पडले. आम्ही पडलों थोडे. तो गुजराथी ब्राम्हण **माणे-**

**कभाई** आणि त्याचे दोन लोक कसले भेंकड. त्यांनीं त्या चोरांच्या नाइकाला सांगितलें कीं; ' बावांनो आमच्याजवळ कांहीं नाहीं. ह्या—मजकडे बोट दाखवून—**सटवाजीरावा**जवळ २५०० रुपये आहेत ते घ्या आणि जाऊं द्या आम्हांला. ' पण मी त्यांच्या बारशाचें जेवलेलों. मीं लागलेंच काय सांगितलें माझ्या लोकांना ' अरे पाहतां काय ? चालवा हात. ' असें म्हणण्याबरोबर ते चोर पळाले, आणि त्यांचे मागून माझे स्वारही गेले. मी सुद्धां पाठीस लागलों; पण त्या चोरांपैकीं चौघेजण जरा मागसले होते, ते एकदम माझ्या अंगावर चालून आले. त्यांपैकीं दोहोंचीं तर डोकीं उडविलीं, ( तरवारीवरील रक्ताकडे बोट दाखवून ) हें पहा. पण इतक्यांत एकानें मजवर वार केला. तो मी ढालीवर घेत असतां त्या चौथ्या हरामखोरानें माझ्या घोड्यावर आपला घोडा फेंकला, त्याबरोबर मी खालीं आलों. चिखल लागला. पागोटें गेलें. पण इतक्यांत मीं रिकबींतून पाय काढून तिसऱ्याला मोठा वार केला, हें पाहतांच चौथा भिऊन आडवाटेनें पळून गेला. मग तें माझें चिखलानें भरलेलें पागोटें न घेतां त्या चोरांपैकींच एकाचें पागोटें डोकीस घालून घोड्यावर बसलों, आणि माझ्या लोकांना जाऊन मिळालों. चमत्कार हाच कीं, बाकीच्या चोरांपैकीं एकही त्यांना सांपडला नाहीं. पण एकंदरीनें अलीकडे चोर फार धीट झाले, नाहीं तर ह्या **सटवाजीरावा**कडे ढुंकून पाहण्याची कोणाची मगदूर होती ? मग हत्यार चालविण्याची तर गोष्ट लांबच.

**मुळेकर**—असें काय ? एकूण तुम्हीं मोठी बाहाद्दरी केली. त्याबद्दल तुमची कांहीं वडेजाव केली पाहिजे. अशीं माणसें आतांशीं आहेत कोठें ? जा हो **गंगाधरपंत**, ह्यांना बांधा एक नारळी पदराचें पागोटें. आणि **सटवाजीराव**, आजपासून **भद्रकाळी**चा पहारा तुमच्याकडे.

---

## भाग ३ रा.

**जगीं सर्व सुखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधून पाहे ॥**

रामदास.

**कहांकी मात पिता सुत वनिता । को काहूको नाहीं** ॥ नानक. ॥

हल्लीं **एलीस** पुलावरून **अस्टोदिया** दरवाज्याकडे रस्ता जातो त्याच्या शेवटीं **माणिक चौका**च्या दक्षिणेस **माणेकभाई** व त्याचे दोन लोक येऊन पोंहचले. पुढें **माणेकभाईनें** घोडा जाण्यासारखा रस्ता संपताच आपला घोडा त्यांपैकीं एकाच्या स्वाधीन करून आपण डाव्या हाताला जी गल्ली लागते तींत शिरला. जरा पुढें गेलें ह्मणजे दोहोंबाजूला हींत कांहीं मोठमोठे वाडे आहेतसे दिसतात. हीच **लाखा पटेल**ची पोळ. पूर्वीं हल्लींच्या सडकेच्या मधोमध एक मोठी हवेली होती. ह्या इमारतीच्या दक्षिणाभिमुख जो दरवाजा होता तोच दरवाजा **लखापटेल**च्या पोळचा.

शके १६१०–२० त म्हणजे **औरंगझेबा**च्या उतार वयांत व नंतर त्याचे पश्चात् ही पोळ अगदीं मोडकळीस आली होती. त्या वेळेस **गुजराथें**त कोणी शास्ता नसल्यामुळें खरी मोंगलाईच होऊन राहिली होती. रजपूत ठाकूर आणि मराठे हे तर मोंगलांकडे असलेली **अहमदाबादे**ची नामशेष सुभेदारी हिसकावून घेण्यासाठीं त्या शहरावर वारंवार हल्ले करीत असत. हे हल्ले हटविण्याचें मोंगलांमध्यें सामर्थ्य नसल्यानें, आणि हिंदु व मुसलमान रय्यत ह्यांमध्यें वारंवार शहरांतच कलह उपस्थित होत असल्यानें, शहराची गरीब रय्यत अतिशय गांजून गेली होती. असली बेबंदशाही अरब, पठाण वगैरे मुसलमानांपैकीं आडदांड लोकांच्या फारच पथ्यावर पडली होती. त्यांनीं हिंदूंची कांहीं तरी बळेंच कुरापत काढावी, आणि नंतर दुकानें, पेढ्या वगैरे लुटून जें हातीं लागेल त्याची मनमानेल तशी नासधूस करावी. अशा वेळीं श्रावक व हिंदु रयतेच्या पुढारी लोकांनीं आपल्या संरक्षणासाठीं भिन्न धंद्याच्या किंवा जातीच्या लोकांना जुटीनें राहतां यावें, ह्मणून ह्या पोळांमध्यें राहण्याची सोय काढिली. जेव्हां मुसलमानांच्या ऐन अंमलांत दुष्टांस यथायोग्य शासन होत होतें, तेव्हां ह्या शहरांत हल्लींपेक्षांही किंबहुना विस्तीर्ण मार्ग असत. परंतु जेव्हां सर्वच बदललें, तेव्हां सुशोभित मार्ग तरी कोठून राहतील?

ह्या पोळांची रचना बरीच विकट असते. गैरमाहितीच्या मनुष्यास एखाद्या पोळांतून बाहेर येण्याचा मार्ग मोठ्या प्रयासानें देखील सांपडणार नाहीं. पोळाच्या दिंडींतून आंत जातांना आपण कोणाच्या वाड्यांत शिरतों कीं काय असें वाटतें. आंत गेल्यावर दुतर्फा हवेल्या लागलेल्या असतात. मधून मधून लहानलहानसे बोळ दोन्ही बाजूला लागतात. एकादे वेळेस अशा बोळानेंच जर बाहेर पडूं ह्मटलें तर फसावयाचेंच; कारण त्या वाटेनें गेल्यास एकादा दरवाजा लागेल, आणि त्यांतून आंत पहावें तों समोर घरांची एक ओळ आहे पण लोकांची रहदारी नसल्यामुळें ह्या रस्ता नाहीं हें ह्या घरांचें समईक अंगण आहे, असें समजून परत यावें लागेल. नंतर अशाच दुसऱ्या बाजूच्या वाटेनें गेल्यास फिरून फसूं असें वाटून थेट समोर जावें तों पुढें आडवें घर आलें आहे व कोठेंही बाजूला रस्ता नाहीं असें दिसेल. मग परतून कोणच्या तरी वाटेनें गेल्यास कदाचित दुसऱ्याच पोळांत वाट फुटेल आणि तसें गेल्यास पूर्वींचीही वाट चुकेल, कारण त्या पोळांत सुद्धां अशाच आडव्या तिडव्या वाटा गेलेल्या असतात. मग कंटाळून वाट विचारिल्यास कोणीतरी मनुष्य बरोबर येतो आणि आपल्यास एकाद्या घरांत घेऊन जातो कीं काय असें वाटतें. पुढें आपला वाटाड्या लगतच्या दोन घरामधील भिंतींतील एकाद्या लांकडी चौकटींतून आपल्याला घेऊन जाईल. येथें प्रकाशाचा बहुतकरून अभावच होत जायाचा, आणि वाट तर कित्येक ठिकाणीं फार झालें तर हातभर रुंद असायची. शेवटीं अशाच वाटेंतून दोन तीन चढउताराचीं वळणें चांचपत चांचपत घेऊन एकदाचें भलत्याच एका आडवाटेनें आपल्या पूर्वींच्या पोळांत येऊन पोंहोचतों. असो. कित्येक मोठ्या पोळांच्या तोंडांशीं किल्ल्याप्रमाणेंच चांगल्या भक्कम विटांच्या भिंती व सागवानी दरवाजे असतात. अशा पोळांत दुसऱ्या लहान-

सहान पोळाही बऱ्याच असतात. प्रत्येक पोळांच्या दरवाज्यावर एक रखवालदार असतो. त्यानें रात्रीं दरवाजे बंद करावे, चोरीबद्दलही तो जबाबदार. दरवाज्याची देखरेख व डागडुजी हीं पोळांतील राहणाऱ्यांचा पुढारी जो शेट असेल त्याकडेस असतात.

वर सांगितल्याप्रमाणें **माणेकभाई लाखापटेल**च्या पोळांत शिरून डाव्या हाताच्या वाटेनें एका घरांत गेला. हें घर पूर्वाभिमुख होतें. ह्याच्या दक्षिण बाजूला एक लहानसा बोळ जात होता, आणि उत्तर पश्चिम एकसारखीं घरें लागलेलीं होतीं. ह्या घराचे दोन भाग होते. पुढचा मजला मागच्या मजल्यापेक्षां सखल होता. ह्याच्या दक्षिण भिंतींत पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या दरम्यान पोपटांसाठीं लहानलहान भोंकें ठेविलीं होतीं. ह्या घरांत जातांना प्रथमतःच ह्याच्या पुढल्या दरवाज्यावरील काम पाहण्यासारखें होतें. दरवाज्याच्या चौकटीवर सुरेख वेलबुट्टी कोरलेली होती. दरवाज्याच्या दोन्ही बाजूला भिंतींतून अर्ध्या बाहेर असलेल्या मनुष्याइतक्या उंच अशा जयविजयाच्या दगडी मूर्ति होत्या. गणेशपट्टीवर गणपतीची मूर्ति सुरेख कोरलेली होती, आणि तिच्यावर सुमारें तीन हात व्यासाची अर्ध वर्तुळाकार लांकडी कमान होती. इजवर तर कोरींव काम फारच सफाईदार होतें. पक्षी व वेल ह्यांनीं ती गच्च भरून काढिली होती. लहानलहान पक्षी हुबेहुब पक्ष्यांप्रमाणें, कोणी आतां उडत आहेत, कोणी चोंचींनीं फळें टोंचीत आहेत, असे काढिले होते. आंत गेल्यावर लहानसें अंगण होतें. त्याच्यापैकीं पुढल्या अर्ध्या भागांत तुळशीवृंदावन होतें. मागच्या भागावर चुनेगची केली होती; तेथें खाऱ्या पाण्याची लहानशी एक हात व्यासाची विहीर आणि डाव्या बाजूला एक दगडी न्हाणी होती. इमारतीच्या आंत गेल्यावर पुढल्या म्हणजे पुरुषांच्या बसाउठायाच्या माडीवर जाण्यासाठीं उजव्या हाताला एक अरुंद व खडा लांकडी जीना होता. त्या जिन्याच्या पायऱ्या अरुंद होत्या, व पायऱ्यांच्या बाहेरच्या कडेला दांडे मारिले होते, त्यामुळें जिना चढायला अवघड होता. ह्या माडीपुढें एक लांकडी सज्जा होता, त्याला खालून कोरींव तीर दिले होते. खालच्या ओसरीवर एके बाजूस एक मोठा लांकडी चौरंग आणि दुसरे बाजूस झोंपाळा असे होते. पुढें एक लहानसा चुनेगची चौक होता. ह्या चौकाखालीं पावसाचें पाणी सांठविण्यासाठीं एक चुनेगची टांके होतें. ह्या टांक्याचें तोंड पाण्याच्या खोलीपुढें होतें; त्या तोंडावर एक तांब्याची कढई झांकण घातली होती. ह्या टाक्यांत पुढल्या माडीच्या छापरावरून तांब्याच्या नळांतून पावसाळ्यांत पाणी घेत. डावीला सर्पण वगैरे सांठविण्याची एक मोठी खोली आणि उजवीला तीन लहान खोल्या होत्या. ओसरीच्या लगतच्या खोलींत गोडें पाणी ठेवीत असत; दुसऱ्या खोलींत देवघर होतें; व तिसरींत स्वयंपाक करीत. चौकाच्या आंतल्या बाजूस माजघर (गजार) होतें; आणि त्याच्या मागें धान्याची खोली होती, हींत उजेड मुळींच नव्हता. हिच्या खालीं तळघर होतें. त्या तळघरांत जाण्यासाठीं भिंतींतून चोरजिन

होता. माजघर व धान्याची खोली ह्यांच्या वर दोन मजले होते. ह्यांना जिने भिंतींतून होते. पुढच्या माडीवरून मागच्या माडींत जाण्यास खालच्या चौका इतकीच जागा मोकळी ठेवून दोन्ही बाजूला गच्या केल्या होत्या. दोन्ही माड्यांवर खोल्यांच्या भिंती बहुतेक लांकडी होत्या. माजघरांत व मागच्या माडीवर बायकांचें बसणेंउठणें असे.

पुढल्या माडीवर जाऊन **माणेकभाईनें** आपले कपडे खुंटीवर काढून ठेविले. तो आलासें पाहून मागल्या माडीवर एक चौदा वर्षांचा एक मुलगा आणि १८-१९ वर्षांची स्त्री अशीं दोघेजण कांहींसा खेळ टाकून व चटकन् उठलीं. मुलगा ह्मणाला " ताई, **माणेकभाई** आले. " ती म्हणाली " बरें, आले तर आले जा, बाबांना कळीव; " आणि आपणही स्वयंपाकघरांत ब्राम्हणीस सांगावयास खालीं गेली. तो मुलगा येऊन देवघरांत उभा राहिला. तेथें एक सुमारें ५०–५५ वर्षांचा ब्राम्हण पूजा करीत बसला होता. ह्याचें कपाळ मोठें व भव्य होतें. ह्याचा रंग गोरटेला होता. वयाच्या मानानें ह्याच्या पाठीला थोडेसें पांक आलें होतें. ह्याचे डोळे पाणीदार, नाक सरळ व मोठें, मिशा कातरलेल्या, केश बरेच पांढरे झालेले, व गालांवर थोड्या सुरकुत्या अशा होत्या. कपाळावर ही बऱ्याच वळया पडल्या होत्या. त्या वेळेस तो डोळे झांकून शिवाची मानसपूजा करीत होता. त्याची त्या वेळची मुद्रा तर फारच सौम्य होती आणि ती पाहिल्याबरोबर हा मोठ्या उदार व कोमल अंतःकरणाचा पुरुष आहे असें वाटे. मानसपूजा आटोपल्यावर डोळे उघडून दाराशीं मुलगा पाहून तो म्हणाला " कां **आनंदशंकर** असा कां चोरासारखा उभा? तुला कांहा कोणीं मारिलें कां?" मुलगा म्हणाला " कांहीं नाहीं बाबा, **माणेकभाई** आले आहेत." जांवई आला असें ऐकतांच "**माणेकभाई** ४–५ दिवस झाले नाहींत तोंच कां आला? बरें जेवतांना खुलासा काढूं" असें पुटपुटून " त्यांच्या स्नानसंध्येची तयारी करण्यास **जयलक्ष्मी**ला सांग." असें तो मोठ्यानें म्हणाला, आणि आपण शिवकवच म्हणायाला लागला.

**माणेकभाई**ची स्नानसंध्या होईपर्यंत बारा तेरा घटका दिवस आला. जेवतांना **माणेकभाईनें** थोडासा आपल्या शौर्याचा गौरव करून सासऱ्यास लुटीची सर्व हकीकत कळविली आणि म्हटलें " आतांच मी **गायकवाडांचे** हवेलींत जाऊन **पंडित** सुभेसाहेब ह्यांस गांवकऱ्यांनीं भरणा केला हें कळविण्यास जातों." जांवयानें पराक्रम केला हें ऐकून **निळकंठभाईस** फारच संतोष झाला. तो म्हणाला "ऐकिलेंस कां **जयलक्ष्मी**, रात्रीं ह्यांच्यावर विकट प्रसंग गुदरला होता. परंतु **शंकर**कृपेनें ह्यांच्या पराक्रमाला यश आलें, म्हणून एक दोन ब्राम्हण घातले पाहिजेत."नंतर तो **माणेकभाई**स म्हणाला, " बरें अनायासें संक्रांतीच्या पूर्वीं आलां, तर आपण हिचें परवां संक्रांतीच्या दिवशीं डोहाळ जेवण करूं, आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं अघरणीचा वरघोडा काढूं म्हणजे झालें."

**निळकंठभाई** हे वडनगरा नागर ब्राह्मण, मूळचे **विरमगाम**चे राहणारे. हे गर्भश्रीमंत असून **गायकवाडींत** कामावर होते, व **अमदाबादे**स जाऊनयेऊन असत. ह्यांची पत्नी १० वर्षांपूर्वीं निवर्तली, परंतु आपल्या इष्टमि-

त्यांच्या आग्रहास न जुमानतां 'मला दोन मुली आहेत, वृद्धापकाळीं मला संभाळतील' असें ह्मणून त्यांनीं पुन: लग्न केलें नाहीं. ह्यांच्या थोरल्या मुलीचें नांव **गुणसुंदरी**, व धाकटी **जयलक्ष्मी**, ही **माणेकभाई**ची वायको. **गुणसुंदरी विरमगांवां**तच दिली होती; पण १० व्या वर्षी तिचा नवरा वारला. ती स्वभावानें वापासारखी होती. आपल्यास वैधव्य आलें त्याजबद्दल तिला समजूं लागल्यापासून तिनें कधींही **ईश्वरास** किंवा वापास दोष दिला नाहीं. ती थोडेंबहुत लिहिणेंवाचणें शिकली. प्रत्यहीं घरचें काम आटोपल्यावर ती देवाची पूजा करी व त्यापुढें पोथी वाचीत तिसरे प्रहरपर्यंत वसे. पुढें जेवणखाण आटोपून आपल्या वहीणीस व आसपासच्या लहानलहान मुलांस लिहिणें शिकवी. संध्याकाळीं महादेवाच्या देवालयांत पुराण ऐकायाला जात असे, आणि रात्रीं वाप घरीं आला ह्मणजे **नरसी मेहता, प्रेमानंद** ह्यांचीं भक्तिरसानें परिपूर्ण व प्रेमळ अशीं पदें म्हणून वापाची व आपली करमणूक करीत असे. असा तिचा रोजचा क्रम असे.

केवळ वायकोच्या आग्रहावरून **निळकंठभाईंनीं जयलक्ष्मी**चें लग्न **अमदावादे**चे रहेवासी **डाह्याभाई** ह्यांचा एकुलता एक मुलगा **माणेकभाई** यांजवरोवर लाविलें. **डाह्याभाई**जवळ संपत्ति वरीच आहे असा लोकांचा भ्रम होता, पण खेड्यांतील मुलगी आपल्या मुलाला केली हें पाहतांच तो भ्रम वराच दूर झाला. पुढें १०।५ वर्षांच्या आंत **डाह्याभाई**च्या घरांपैकीं **माणेकभाई** शिवाय दुसरें कोणीही राहिलें नाहीं. शेजारीपाजारी म्हणत कीं, 'ह्याच्या घराला कोणाचा तरी तळतळाट भोंवत आहे; मग खरें खोटें एक ईश्वरास माहीत. नाहीं तर, उगीच कां एकाद्या घराची धुळधाण होईल?'

**निळकंठभाई विरमगांवां**त असतांना त्यांच्या शेजारीं ह्यांच्याच जातीची एक विधवावाई रहात असे. ही मोठी साध्वी होती. **गुणसुंदरी**ची व हिची मैत्री जमली. तिचा नवरा शके १७२० त मराठ्यांच्या फौजेवरोवर **काठियावाडां**त गेला असतां तेथें त्याचा अंत झाला. पुढें जवळचे डागडागिने मोडून तिनें आपला व आपल्या दोन मुलांचा चरितार्थ ६।७ वर्षें कसा तरी चालविला. नंतर तिला ताप लागला, आणि त्याच्यांतच तिचा अंत झाला. तिचीं मुलें अगदीं उघडीं पडलीं असें पाहून व **गुणसुंदरी**च्या सांगण्यावरून **निळकंठभाईं**नें तीं मुलें आपल्या येथें आणून ठेविलीं. त्यांना तो अगदीं पोटच्या पोराप्रमाणें वागवी. त्यांपैकीं थोरला **जयशंकर** हा त्या वेळेस १५ वर्षांचा, आणि धाकटा **आनंदशंकर** हा ९ वर्षांचा असे होते. दोन्हीं मुलें स्वभावानें आणि स्वरूपानें फारच चांगलीं, मग तीं **निळकंठभाई**सारख्या कोमल व थोर अंत:करणाच्या मनुष्याचीं आवडतीं झालीं ह्यांत नवल तें कोणतें? **गुणसुंदरी** त्यांना अगदीं धाकट्या भावांसारखें वागवीत॰ असे. त्यांना सकाळींच उठवून स्नान स्वत: घाली, थोडेसें खायाला देऊन **आनंदशंकरा**ला वरोवर मनुष्य देऊन शाळेंत पाठवी, आणि **जयशंकरा**स खर्डे गिरविण्यास माडीवरती वसवून नंतर ती आपल्या कामाला लागे. **जयलक्ष्मी** सासरींच बहुतकरून असे; पण जेव्हां सासरीं **माणेकभाई**शिवाय कोणीही

राहिलें नाहीं, तेव्हां ती माहेरी येऊन राहिली. ती **जयशंकरा**पेक्षां एक वर्षानें लहान होती. तिला नुकतेंच समजूं लागलें होतें. सासरीं असतांना नवऱ्याचे जे कांहीं गुण तिनें पाहिले त्यांनीं तर तिचें मन सासुरवाडीविषयीं अतिशय विटलें होतें. तिची सासू **माणेकभाई**वर अतिशय प्रीति करीत असे, पण त्यानें आईचा पाणउतारा केल्याशिवाय एकही दिवस जाऊं देऊं नये. आपल्या बरोबरचीं आळींतील उनाड मुलें घेऊन त्यानें मध्यरात्रपर्यंत पुढल्या माडीवर दंगा करीत बसावें. नंतर शेजाऱ्यांनीं ह्याच्या दंग्याबद्दल ह्याची निर्भर्त्सना केली, तर रागावून आपला सगळा राग, आईला नाहीं नाहीं ते बोलून व **जयलक्ष्मी**ला जें हातीं लागेल तें घेऊन मारून, त्यांवर काढावा. त्यानें नेहमीं जेवणाची वेळ टाळून उशीरां जेवायाला यावें. एकादेवेळेस अगदीं तिनीसांज होईपर्यंत बापड्या म्हातारीनें याची वाट पाहत अन्नपाण्याशिवाय स्वयंपाकाच्या अगदीं गारगोट्या झाल्या तरी बसावें. बरें इतकेंही करून बाव्या उगीच राहत नसे. **जयलक्ष्मी** बाहेर जात असतां, हा समोर असूनही, जर त्याच्या एकदोन मित्रांनीं हिची थट्टा केली, तर हिनें निमुटपणें सहन केली पाहिजे; नाहीं तर त्यांच्या समक्ष तिला विचारीला शिव्या व बुक्या. अशा प्रकारचे ढंग जांवई करितो, हें **निळकंठभाई**च्या स्वप्नींही नव्हतें. त्याच्या कानांवर गेलें, तर 'असें कधींही होणार नाहीं, मुलगा आईला कधीं शिव्या देईल? ' असें त्यानें म्हणावें. ह्या भोळ्या स्वभावापुढें सर्वांचें पर्यायानें सांगणें व्यर्थ झालें. असो, पुढें आई वारल्यावर **माणेकभाई**स **निळकंठभाई**नें आपल्या वशिल्यानें **गायकवाडीं**त लावून दिलें आणि आपण **जयलक्ष्मी**स **विरमगांवीं** घेऊन आला. **गुणसुंदरी**प्रमाणेंच **जयलक्ष्मी**चेंहि प्रेम **जयशंकर** व **आनंदशंकर** ह्यांवर असे. **जयशंकर** खडें गिरवीत असतां तिनें वरती जावें, त्याच्या खोड्या कराव्या, व त्यांचीं भांडणें **गुणसुंदरी**नें तोडावीं. ह्याप्रमाणें सुमारें दोन वर्षें आनंदांत गेलीं; पण पुढें **गुणसुंदरी**ला क्षयाची भावना झाली, आणि तें दुखणें वळावत जाऊन सुमारें ६ महिन्याच्या अंत विचारीचा अंत झाला! त्या वेळचें दुःख काय विचारावें? असली सद्गुणी मुलगी गेली त्यामुळें **निळकंठभाई**लातर अतोनात दुःख झालें. ह्या दुःखानें त्याच्या अंतःकरणाला घरा पडला, तो सरते शेंवटपर्यंत बुझाला नाहीं. मनामध्यें जे काय क्लेश होत होते, ते बाकीच्या तीन मुलांकडे पाहून तो दाबून टाकी. **जयशंकर** व **जयलक्ष्मी** ह्यांना बरेंच समजत असल्यामुळें त्यांचे दुःखाचा आवेश मोठा होता; परंतु जसजसे दिवस जात चालले, तसतसें दुःखावर कालाचें दडपण पडत गेलें आणि यौवनावस्था असल्यामुळें त्यांची उदासीनता लौकर नाहीशीं होत गेली. आपल्यावर आईसारखें ममता करणारें मनुष्य गेल्यामुळें **आनंदशंकर** बरेच दिवस घरांत एकटाच सैरावैरा हिंडत असे; पण **निळकंठभाई**नें त्याला नेहमीं जवळ बोलावून त्याचें लक्ष दुसरीकडे लावावें. **गुणसुंदरी** निवर्तल्यावर **निळकंठभाई** **विरमगांवां**त फार दि-

वस राहिला नाहीं. आपली मुलगी वयांत आली, जांवई **अमदावादे**स एकटाच आहे, मुलांना त्या घरांत करमेना, इत्यादि कारणां-मुळें **विरमगांवां**तील आपला सगळा संसार आटोपून **अमदावादे**स येऊन**लाखापटेल**-च्या पोळांत वर सांगितलेलें घर त्यानें विकत घेतलें व तो जांवयासुद्धां एकत्र राहिला. ह्या वेळेस **जयलक्ष्मी** व **जयशंकर** ह्यांचा स्वाभाविक परस्पर ओढा जास्त वळावत चालला. तिच्या नवऱ्यापेक्षां **जयशंकर** गुणानें, रूपानें व विद्येनें सर्वथैव चांगला होता, आणि ३ वर्षे दोघांनीं एके ठिकाणीं आनंदांत दिवस घालविले होते, ह्मणून त्यांचें पूर्वींचें प्रेम दृढ झालें ह्यांत नवल तें कोणतें? पूर्वीं **गुणसुंदरी** असल्यामुळें त्या दोहोंच्या प्रेमाचा बराच ओघ तिच्याकडेस जात होता, परंतु तिच्या पश्चात् कांहीं हि-तगुजाची किंवा सुखदुःखाची गोष्ट सांगाव-याची असल्यास **जयलक्ष्मी जयशंकरा**-ला आणि तिला तो, असे सर्व कांहीं सांगत असत. बरें घरांत कोणी वृद्ध बायकोमनु-ष्यही नव्हतें, ह्यामुळें परस्पर दळणवळण दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेलें. तशांत **माणे-कभाई**ची वर्तणूकही आपल्या बायकोवि-षयीं केवळ निष्काळजीपणाची होती. बाकी त्याला ह्मणजे **जयशंकर** किंवा **आनंदशंकर** आवडत असे असें मुळींच नव्हतें. ही बंधुप्रीति निराळ्या थरास जाईल, असें **निळकंठभाई**च्या कधीं स्वप्नींही आलें नसेल. **गुणसुंदरी** अस-तांना तिच्या दाबानें म्हणा, किंवा सहवासानें म्हणा, किंवा ह्या दोहोंची अंतःकरणें बाल्या-वस्थेंतून नुकतीं बाहेर निघालीं असल्या-मुळें यौवनाचा मद पूर्ण अंगांत चढला न-व्हता म्हणून म्हणा, ह्या दोहोंच्याही निष्कलंक प्रीतीचें मुळींच रूपांतर झालें नव्हतें. पण तिच्या पश्चात् जसजसे हे एकमेक अधिक वेळ परस्परांच्या सहवासांत घालवूं लागले, तसतसें त्या प्रीतीला भलतेंच स्वरूप येऊं लागलें. असो, **गुणसुंदरी** गेल्यानंतर सुमारें आठ महिन्याच्या आंत शके १७३२ च्या आश्विनांत **जयशंकर** एकाएकी वांती होऊन मेला! कोणी म्हणाले, 'वाखा झाला'. कोणी म्हणाले 'मूठ मारि-ली'. कोणी म्हणे 'कांहीं तरी ह्यांत काळेंबेरें आहे'. असे नानाप्रकारचे तर्क निघाले. ह्या वेळीं तर **जयलक्ष्मी**ला अतोनात दुः-ख झालें. ती कांहीं केल्या प्रेतापासून ह-लेना; आणि "भाऊ, मला टाकून तूं क-सा रे गेलास? तुझ्या वांचून मी येथें कसे दिवस घालवूं" असें नानाप्रकारें ओरडूं लागली. **निळकंठभाई**स तर आपला कर्ता मुलगा गेल्याप्रमाणें दुःख झालें, परंतु पुष्कळदां दुःखाचा परिचय झाल्यामुळें तें धीर धरून होते. '**जयलक्ष्मी**, आतां **आनंदशंकरा**कडे पाहून तूं दुःख गिळून टाक; तूं जर अशी करूं लागलीस, तर त्यानें कोणाकडे जावें' अशी तिची त्यानें पुष्कळ समजूत केली. **जयशंकरा**च्या मरणानें जितकें **माणेकभाई** वर दाखवित होता, तितकें त्याला कांहीं दुःख झालें नव्हतें. ह्यानंतर सुमारें तीन महिन्यांनींच **माणे-कभाई** हा मागें सांगितलेल्या कामगिरीवर गेला होता.

# भाग ४ था.

## बाजार.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं **निळकंठभाई**च्या घरीं डोहळजेवणाची मोठी धामधूम चालली होती. शुक्रवार, शनिवार व रविवार या तीन दिवशीं आपले आप्तसोयरे त्यानें जेवायाला बोलाविले. शनिवारीं वरघोडा निघणार होता.

शुक्रवारीं सुमारें मध्यान्ह उलटल्यावर **माणेकभाई** पाठीमागच्या माडींत **जयलक्ष्मी**ला कांहीं निरोप सांगण्यासाठीं म्हणून गेला. तेथें ती व **आनंदशंकर** अशीं दोघेजण कांहीं सणगें फडताळांतून बाहेर काढीत होतीं, तें पाहतांच तो म्हणाला ' कां **आनंदशंकर**, तुला कांहीं आज लिहावयाचें नाहीं का ? जेव्हां पहावें तेव्हां बसला आहे बायकांत. आतां कांहीं तूं लहान नाहींस. तुझें कां हें डोहळजेवण आहे, म्हणून तूं ह्या सणगांच्या खटपटींत पडला आहेस ? चल, जा खालीं. वर फिरून आलास तर टाळकें सडकीन. त्याला वाटतें, जणू कांहीं मी घरचा मुखत्यार—'

**आनंदशंकर** भीत भीत म्हणाला ' मी आतांपावेतों लिहीतच होतों. ताईनें हांक मारिली म्हणून नाहीं कां आतां तुमच्या समोरूनच येथें आलों ? '

**माणेकभाई** रागावून म्हणाला ' चुप चुप, मला प्रत्युत्तर देतोस ? बोलून चालून भिकाऱ्याचें कारटें, खाल्लेल्या अन्नाला ओळखत नाहीं. जातोस कीं नाहीं ? '

**आनंदशंकर** विचारा थरथर कांपूं लागला. **माणेकभाई**चें आणि ह्याचें मुळींच पटत नव्हतें. **माणेकभाई**नें ह्याला एकटें पाहिलें, म्हणजे ह्याचा कान उपटावा, नाहीं नाहीं त्या शिव्या द्याव्या; म्हणून हा नेहमीं त्याला चळचळा कांपत असे. **निळकंठभाई**च्या कानावर ही गोष्ट गेली होती, पण ते म्हणत ' ह्यानें शिकावें म्हणून तो मारतो. त्याच्या असें कसें मनांत येईल कीं, ह्या गरीब पोराला त्रास द्यावा.' असो. ह्या वेळेस त्याचे डोळे पाण्यानें अगदीं भरून आले, गाल लाल झाले, अशी त्याची ती केविलवाणी मुद्रा पाहून कोणालाही द्रव आला असता. तो अगोदरच गोरापान, तितक्यांत नाका डोळ्यांची ठेवण अगदीं रेखलेली; कपाळ रुंद आणि केश काळेभोर व लांब. त्याच्या डोळ्याकडे पाहिलें, म्हणजे जणू कांहीं हा हंसत आहे असें वाटे. तशांतून तो इतर मुलांप्रमाणें व्रात्य असता तर गोष्ट निराळी. शिकण्यासंबंधानें तर त्याची मुळींच कुरकुर नव्हती. तर अशा गुणी व गोजिरवाण्या मुलाला पाहून कोणाचें बरें मन ओढणार नाहीं ? **जयलक्ष्मी**चा तर ह्या दोन तीन महिन्यांत तो अगदीं जीव का प्राण झाला होता. **निळकंठभाई**नेंही ' ह्याला मी मांडीवर घेईन ' असें एकदोनदा **माणेकभाई**च्या समक्ष बोलूनही दाखविलें. **माणेकभाई** मात्र नेहमीं हिडीसफिडीस करी व संधि सांपडली कीं त्याच्या नसत्या कागाळ्या **निळकंठभाई**च्या कानांवर घालवीत असे. बाकी त्या आळींतील लहानापासून थोरापर्यंत तो कोणाला नकोसा होता असें नव्हतें. ह्याला संस्कृत शिकवावें म्हणून आपले फार दिवसां-

चे मित्र **यज्ञेश्वर शास्त्री** यांच्या येथें आलीकडे १०।१५ दिवसांपासून **निळकंठभाई**ही त्याला पाठवूं लागले. तेव्हांपासून तर **माणेकभाई** मनांतल्या मनांत फारच जळफळूं लागला.

**आनंदशंकराचें** अगदीं गोरेंमोरें तोंड झालेलें पाहून, **जयलक्ष्मी** झटकन उठली व त्याचे डोळे आपल्या पदरानें पुसून ह्मणाली 'बाळा, तूं बाबांना ही साडी घेऊन दाखीव जा.' हे ममतेचे शब्द कानीं पडतांच त्याचें दाबलेलें रडें एकदम कोसळलें. तें त्याच्यानें कांहीं केल्या आवरेना. मूल अनाथ असलें, आणि त्यांतून आपल्या स्थितीविषयीं त्याला थोडें बहुत कळत असून त्याला कोणी जरा लावून बोललें, तर त्याला किती वाईट वाटेल बरें! आईबापाशिवाय लहानपणचें जिणें, म्हणजे केवळ ईश्वरीकोप आणि त्यांतून वडिलोपार्जित संपत्ति नसणें, म्हणजे तर त्या अनाथाची दशा दशा व्हावयाचीच. वास्तविक पाहिलें, तर **आनंदशंकरा**सारख्या पोरक्या पोराचा **माणेकभाईनें** हेवा न करितां उलट त्यास मदत करण्याची होती. स्वभावानें सालस, रूपानें मोहक, व बुद्धीनें तीव्र अशा सर्वपरी चांगल्या मुलाची आवड **माणेकभाईस** नव्हती ह्याचें कारण केवळ मत्सर होय. नाहींपेक्षां **आनंदशंकरा**मुळें त्यास कोणत्याही प्रकारें तोसीस लागत नव्हती, उलट घर कसें भरलेलें दिसे व **निळकंठभाईस** त्याकडे पाहून किती आनंद होई? पण म्हणतात ना, देणारा देतो, खाणारा खातो आणि पाहणाऱ्याचें पोट दुखतें. आतां हें खरें कीं, सासऱ्याची मिळकत **आनंदशंकरास** कदाचित जाईल ही भीति **माणेकभाईस** होती; तथापि पोटची मुलगी टाकून तिऱ्हाईत मुलास सर्व मिळकत **निळकंठभाई**सारख्या कोमल मनाच्या गृहस्थानें दिली नसती, हा विचार **माणेकभाईस** सुचला पाहिजे होता. आपण गेल्यावर आपल्यास तिळांजळी देण्यास कोणी असावें ह्याच इच्छेमुळें **आनंदशंकरास** दत्तक घेऊन कांहीं मिळकत द्यावी असा **निळकंठभाई**चा मानस झाला असावा. पण मत्सरानें अंध झालेला **माणेकभाई** त्यास हें दिसावें कोठून? हातीं कांहीं स्वतंत्र सत्ता नाहीं, तेव्हां वळेंच कुरापती काढून लोकांस आपण हेवा करितों हें न समजून येईल अशा रीतीनें त्यानें **आनंदशंकराचा** छळ करीत असावें व छळ केल्यानें तें अनाथ पोर कष्टी झालें म्हणजे त्याला अतोनात आनंद व्हावा. असो. **आनंदशंकराचें** रडणें थांबत नाहींसें पाहून त्याचा हळूच हात धरून ती त्याला दुसऱ्या जवळच्या खोलींत घेऊन गेली, आणि बाहेर येऊन त्या खोलीला कडी घालून रागानें म्हणाली 'कां बरें, त्यानें तुमचें कांहीं घोडें मारिलें? तुम्ही ह्याचा इतका हेवा कां करितां? किती सालस मूल! लोक असें मूल व्हावें म्हणून नवस करितात आणि दैवानें आपल्या इथें तें आलें आहे, तर त्यांचा छळ करायाचा?'

तिचें बोलणें पुरें होत आहे इतक्यांत **माणेकभाई** म्हणाला—'पुरे, मला आहे माहीत, **जयशंकर**सारखाच हा आपला भाऊ व्हावयाचा असेल वाटतें, म्हणून तर त्याच्याबद्दल इतकी शिफारस.' **जयलक्ष्मी**

खवताळून म्हणाली ‘ खबरदार, असें फिरून बोललां तर. **जयशंकराचें** नांव सुद्धां घेण्याची पुष्कळांची योग्यता नाहीं, आणि **आनंदशंकरा**सारख्या मुलाविषयीं असे आपले कुतर्क. धिक्कार असो त्या वाणीला !’

हें ऐकतांच तो जास्त न बोलतां निरोप सांगून परत गेला. जातांना ‘ मालक कसा होतो तें पाहतोना. एकतर गेलाच, आणि दुसरा...’ असें कांहीं पुटपुटला.

**माणेकभाई** गेल्यावर **जयलक्ष्मीनें** खोलीचें दार उघडिलें आणि **आनंदशंकर** ज्या अंथरुणावर पडला होता तेथें जाऊन ती त्याची समजूत करूं लागली. ‘ बाळ **आनंदशंकर,** ते रागे भरले, ह्मणून माझें कां ऐकायाचें नाहीं ! असें काय वरें वेड्यासारखें ’ असें ह्मणून तिनें त्याचे डोळे पुसले, आणि तोंड कुरवाळून एक दोन मुके घेतले. त्यावरोबर **आनंदशंकर** चटकन उठला, आणि आपलें रडवें तोंड जरा हंसरें करून ह्मणाला ‘ ताई, मी कां आतां अगदीं लहान बाळ ? पण माझा ते कां वरें इतका तिटकारा करितात ? त्यांनीं कांहीं जरी काम सांगितलें, तरी मी तें मोठ्या उल्हासानें करितों. ’ **जयलक्ष्मी** ह्मणाली ‘ ते कसे कां असेनात ? मी तर माझ्या सोनकुल्याला नाहीं विसंबत. वरें, तुह्मी आतां **यज्ञेश्वर शास्त्र्यां**कडे म्हणायाला जाण्याची वेळ झाली आहे. वाटेंत आज बाजार आहे, नीट संभाळून जा हो. तिनीसांजेस तुला आणायाला **वेचर**ला पाठवीन. ’ नंतर त्याच्या अंगांत एक पांढरा हिंदुस्थानी तऱ्हेचा अंगरखा व टोपी तिनें स्वतः हातांनीं घालू. त्याची पोथी जवळच्या फडताळांतून काढून त्याच्या स्वाधीन केली, आणि तोही मोठ्या उल्हासानें घरावाहेर पडला.

अव्वल मुसलमानी अंमलापासून ह्या शहरांत दरशुक्रवारीं एक मोठा बाजार भरत असतो. त्या वेळेस **अहंमदशहासा**रखे बादशाह खुद्द हा बाजार पहावयास स्वारीनिशीं बाहेर पडत असत. ती वहिवाट अजूनही चालू होती. **आनंदशंकर पाणकोर** नाक्याला येईपर्यंत मनुष्यांची कांहीं फारशी दाटी नव्हती. पण तेथून तें तहत **कारंज्या**पर्यंत एकसारखीं दुकानें व लोकांचे थवे ह्यांनीं ती विस्तर्ण जागा व्यापून गेली होती. ह्या मैदानाच्या मधोमध **तीन दरवाजे** नांवाची दगडी इमारत २४ हात उंच आहे. हिला तीन कमानी सुमारें १५।१६ हात एकसारख्या उंचीच्या आहेत. त्यापैकीं दोन बाजूच्या लहान कमानी सुमारें ८।९ हात रुंद आहेत. मधल्या कमानीच्या भिंती सुमारें २ हात रुंद आहेत. त्यांच्यामध्यें प्रत्येकींत तीन धाकट्या कमानी आहेत आणि तसेच कमानींचे कोनाडे शेंवटल्या दोन्ही भिंतींत आहेत. ह्या तिन्ही कमानींवर ६।७ हात उंच दगडी इमला होता. येथून शहरांत कांहीं धामधूम झाल्यास लोकांस कळविण्याकरितां शिंग फुंकीत. तिन्ही प्रहराला येथें चौघडा वाजवीत. कमानींच्या खांबांवर फारच सुरेख असें खोदींव काम आहे. मधल्या कमानीच्या उजव्या खांबांवर **रायबाजी**चा शके १७३६ चा एक शिलालेख आहे. ह्या **तीन दरवाज्याचे** दोन्ही बाजूला एकसारख्या दुकानाच्या रांगा लागल्या होत्या. डाव्या हाताची व मधली ह्या दोन रांगांत गुजराथी दुकानदार बसले होते

व उजव्याहाताचे रांगेंत परदेशस्थ व्यापारी वसले होते. कित्येक दुकानदारांनीं आपल्यास ऊन न लागावें म्हणून जमिनींत चार काठ्या पुरून त्यांवर गोणताट पसरलें होतें; कित्येकांनीं आपल्या चिनी छत्र्या आपल्या डोक्यांवर धरिल्या होत्या. प्रथमतःच जातांना कोठं धणे मिरच्या इत्यादि मसाल्याच्या सामानांचे ढीग पडले होते. दुसऱ्या बाजूस दोंदीलपोट्या हलवायांनीं तेलकटसा पंचा नेसून आपली मेवा मिठाई मांडली होती. जरा पुढें गेल्यावर बोहरी लोकांनीं अडकित्ते, सुऱ्या, विळे, नांगर इत्यादि लोखंडी सामान पसरलें होतें. त्यांच्या समोरच **कंदाहार खिलात**कडील काबुली व्रोही लोकांनीं डोक्याला उंच टोप्या घालून व केश मानेवर मोकळे सोडून अंगांत मेंढरांचीं कातडीं घालून व पायांत पुष्कळ सैल व घोळाच्या विजारी घालून आपल्यापुढें अंगूर, बदाम, मस्कती डाळींबं, बेदाणा, पिस्ते इत्यादि तिकडील मेवा मांडला होता. कांहीं टोपडे **अंग्रेज** छीटाचें कापड व कांचेचीं भांडीं विकीत होते. त्यांच्यापुढेंच **सिंध**च्या वनियांपैकीं कांहीं जण किनखावी टोप्या घालून व कांहीं बारीक पट्टीचें लाल पागोटें बांधून सुरेख लांकडी रंगीत डबे, करंडे, फण्या, रेशमी व कलाबतूच्या नकशीच्या टोप्या इत्यादि सामान विकीत होते. इकडल्या रांगेंत आमदाबादी कापडकरी निरनिराळ्या प्रकारचीं लुगडीं, पैठण्या, साड्या, साधे व जरीकांठी पितांबर, रेशीमकांठीं व जरीकांठीं उपर्णीं व धोतरजोडे विकीत होते. त्यांच्याच पुढें गुजराथी बायकांच्या कांतलेल्या लांकडी व हस्तीदंती बांगड्या विकत होत्या; समोर काश्मीरी लोक शालजोड्या, दुशाले, चोगे वगैरे लोंकरीचीं उबदार वस्त्रें विकीत होते.

**तीन दरवाजे** आणि **कारंजें** ह्यांच्यामध्यें कोठें लाखटलेलीं मडकीं, साधीं मडकीं, सुरया, कुजे, झाऱ्या, चिलमी वगैरे मातीचें सामान; कोठें खाटेचे रंगीत पाय, चौरंग इत्यादि लांकडी सामान; कोठें मुळा, मेथी, गाजरें, वांगीं, कांदे, इत्यादि भाजीपाला व निरनिराळ्या तऱ्हेचें फळफळावळ; कोठें मुसलमानांचीं कबाब व दुसरीं मासाचीं पक्वान्नें; कोठें जड जवाहीर, कोठें वर्ख, कोठें बेगड, कोठें तांबेंपितळेचीं भांडीं व देवादिकांच्या मूर्ति, कोठें धडोतीचें कापड, कोठें अत्तरें व दुसरीं सुगंधी द्रव्यें, कोठें उंच व धिप्पाड असे पांढरे **काठियावाडी** बैल, कोठें घोडीं, कोठें पिंजऱ्यांतून पोपट, बुलबुल, ससाणा, तित्तर असे पक्षी इत्यादि सर्व प्रकारचे अत्युपयोगी व चैनीचे पदार्थ मांडिले होते.

नुसत्या विकावयास आणिलेल्या पदार्थांत वैचित्र्य व नानात्व होतें असें नाहीं, तर विकत घेणाऱ्यांमध्येंही निरनिराळ्या देशाचे धर्माचे, व भाषा बोलणारे लोक होते. मधून मधून एकादा कर्नाटकी डोकीस पंचा व कंबरेस स्वच्छ धोतर गुंडाळून व कानांमध्यें कुंडलें घालून कपाळास काळी रेघ व कानशीलावर मुद्रा ठोकून फिरतांना दिसे. कोठें दोन तीन माध्व डोकीस शाल गुंडाळून पांढरा नाम व कुंकवाची रेघ लावून आपल्या तामील भाषेंत बोलत जातांना दिसूत येत. पुष्कळ मराठे लोक भव्य पांढरें आडवें गंध लाविलेले, कोणी शिंदेशाई, कोणी कोल्हापुरी,

कोणी पुणेशाई, कोणी वडोदेशाई लाल, हिरवीं, किरमिर्जी, गुलाबी इत्यादि रंगाचीं पागोटीं घालून इकडून तिकडे मोठमोठ्या कल्लेदार मिशांवर ताव देत व मोठ्यानें बोलत जात येत. कांहीं दक्षिणी ब्राम्हण खांद्यांवर शाल उडवीत व डोकीस पांढरीं व तांबडीं बडोदेशाई धर्तीचीं पागोटीं घालून चाललेले आढळत. कांहीं पारशी व कपोलवाणी डोक्याला लाल किंवा ठिपक्याचें काळें उभट पागोटें घालून व धोतर नेसून इकडे तिकडे हिंडत होते. कांहीं आमदाबादी लोक थापट कोकीचीं निगनिराळ्या रंगांचीं पागोटीं घातलेले, कांहीं सुरती वडोदेशाई व ब्राम्हणी पागोटीं घातलेले, कांहीं कच्छी पुढें वांकडी चोंच काढलेली अशा ठिपक्यांच्या छिटांचीं पागोटीं घातलेले असे तेथें फिरत होते. कोणी मुसलमान बारीक पिळांचीं मराठेशाई पागोटीं कानांवर घालून अत्तरांचे फाये कानांत कोंबून, दाढीमिशा नीट साफ विंचरून मोठ्या डौलानें इकडून तिकडे हिंडत होते. कांहीं गिरासिये ( ज्यांना दरबार ह्मणतात ते ) हातांमध्यें मोठी गुडगुडी ( हुक्का ) घेऊन व कंबरेस तुमानीवर बारीक रेशीमकांठीं जाड धोतर गुंडाळून व डोक्यास थोडे बहुत कांठ दिसत आहेत असें पीळ दिलेले उंच पटके बांधून बरोबर ५।६ लोक बंदुक, तरवार, ढाल, जंबिया इत्यादि हत्यारें घेऊन मोठ्या थाटानें बाजार करायाला आले होते. कांहीं आंधळे, पांगळे, मुके इत्यादि येणाऱ्या जाणाऱ्याजवळ भीक मागत होते. कोणी किनरी वाजवून, कोणी गाऊन, कोणी काशीचीं चित्रें दाखवून, कोणी जोशी भविष्य सांगून असे पैसे मिळवीत होते.

फक्त पुरुषच ह्या बाजारांत आले होते असें नाहीं. कांहीं वारयोषिता आज आपला सौंदर्यपाश लोकांवर घालण्याची उत्तम संधि आहे असें पाहून नट्टापट्टा करून नेत्रकटाक्ष व गति ह्यांनीं तरुण जनांचीं मनें आकर्षण करण्याचा यत्न करीत होत्या. कांहीं मुसलमानिनी डोळ्यांत काजळ घालून व विडा खाऊन ओठ रंगवून, पायांत तंग पायजमा घालून झिरझिरीत हिरवे किंवा गुलाबी वेलवुट्टीचे व ठिपक्याचे शेले अंगावर घेऊन आपले उंच कुचद्वय लोकांच्या नजरेस आणण्याविषयींच जणुकाय वारंवार पैंजणाचा झणत्कार करीत होत्या. कांहीं मारवाडिणी वेंबीखालीं ठशांच्या कापडाचे बोजड व मोठ्या घोळाचे लंघे नेसून ओळखीचा मनुष्य भेटल्यास आपला पदर त्याच्या बाजूनें तोंडावर घेऊन व दुसऱ्या बाजूस हंसत जात होत्या. कित्येक वाघरी व कोळी ह्यांच्या बायका डोक्यावर आपल्या पोटाला लाजविणारीं अशीं काळीं मडकीं घेऊन व रडत असलेलीं मुलें पाठीवर झोळींत घालून चालल्या होत्या.

**आनंदशंकर** संध्याकाळच्या ४ घटकापूर्वी हा बाजार ओलांडून **भद्रेच्या** जवळ येऊन पोंहचला. हा **भद्रेचा** किल्ला **अहमदशाह** ह्यानें शके १३३२ त बांधिला. ह्याच्या पुढला दरवाजा फारच भव्य आहे. ह्या दरवाज्याचे दक्षिणेस **आझिमखानाचा** महाल आहे. दरवाज्याच्या लगत **श्रीभद्रकाळीचें** देऊळ

किल्ल्याच्या भिंतीला लागून आहे. हा दरवाजा ओलांडून पुढें १५० हातांवर दोन मोठे भव्य ४०।५० हात उंचीचे व सुमारें १५० हात परिघांचे बुरूज आहेत. ह्या बुरजांच्या दरम्यान बुरुजांपेक्षां सुमारें ७ हात उंच असा तट होता; त्यावर **श्रीमंत पेशवे सरकार** ह्यांचा जरीपटका फडकत होता. ह्या बुरुजांमधून पुढल्या दरवाज्यासारखीच एक कमान आहे व पुढें जातांना एक वळण आहे. **आनंदशंकर** बाजारांतील गम्मत पाहून त्याच विचारांत **भद्रे**च्या पहाऱ्याजवळ आला, इतक्यांत आपला कोणीं हात धरिला असें त्याला वाटलें. वळून जों पहातो तों एक मराठा शिलेदार. हा शिलेदार काळेलासा होता. ह्याचे डोळे बटबटीत असून त्यांत पाणी ह्मणून मुळींच नव्हतें. ह्याचें डोकें चपटे व लहान असून त्यावर कुरळे असे थोडेसे राठ केश होते. ह्याच्या मिशा अकडबाज होत्या, व ह्याचा एकंदर झोंक एखाद्या नटवग्यासारखा होता.

ह्यानें हात धरल्यावरोबर **आनंदशंकरानें** हिसका दिला, परंतु बोलून चालून तें कोंवळें पोर; त्याचा हात कसचा सुटतो? इतक्यांत या शिलेदाराजवळचा दुसरा एक मराठा ह्मणाला ' कांहो जमादार साहेब, पोऱ्या तर मोठा मारू आहे. कांहीं म्हणा, पण माझ्या मनांत ह्याच्या सारख्या एखाद्या गुजराथी पोराचा तमाशा उभा करून यंदां शिमग्यांत **भाऊसाहेबां**ना खुष करावयाचें आहे. मी पुष्कळ ठिकाणीं हिंडलो, पण असा पोर मिळणें क्वचित. '

**सटवाजीराव**—अहो **विठूजी**, नुसते ४ दिवस झाले येथें आलों, इतक्यांत तुम्ही म्हणतां असा पोर पाहिला नाहीं. तुम्हीं जरा दम धरा. माझ्या बरोबर गांवांत याल तर तुम्हाला ह्याच्या पेक्षांही फक्कड पोरें दाखवीन. आणि ज्या अर्थी तुम्हीं मला आपला बेत कळविला आहे, त्या अर्थी तुम्ही विनदिक्कत असा. तुमचा तसा तमाशा उभा झाला ह्मणून समजाच. ( नंतर मुलाकडे वळून ) कायरे तूं कोठें चाललास? तुझें नांव काय?

**आनंदशंकरानें** आपलें नांव व ' **भद्रें**त जातों ' असें सांगतांच **सटवाजीराव** जमादार ह्मणाला 'तुला माहीत नाहीं का कीं, आज सुभेदारांची स्वारी येथून अर्ध्या घटकेनें बाजारांत जाणार आहे ह्मणून? तर तुला येथेंच राहिले पाहिजे;' आणि ' हाच पोऱ्या तुमच्या स्वाधीन करितों ' असें **विठूजी** सातारकर ह्याच्या कानांत हळूच बोलला.

**आनंदशंकर** भयभीत होऊन ह्मणाला 'जमादार साहेब, जाऊं द्या मला. **यज्ञेश्वरशास्त्री** मला रागें भरतील. मी तुमच्या पायां पडतों'.

हा आतां रडकुंडीस आला आहे, असें पाहून जमादार दरडावून ह्मणतात ' तुला वाटतें, बायकासारखें डोळ्यांतून पाणी आणिलें ह्मणजे मी सोडीन; परंतु तें कालत्रयीं होणार नाहीं. चल जा ह्या **विठूजी** सातारकरावरोबर. '

हें बोलणें होत आहे, इतक्यांत घोड्यांच्या टापांचा व शिंगाचा आवाज ह्यांच्या कानीं पडला. लागलीच त्या बुरुजां जवळ

च्या वळणांतून ४ मराठे वारगीर घोडे फेंकीत व पाठीमागून कुमायत व सारंग अशा दोन अरबी घोड्यांवर दक्षिणी ब्राह्मणांचे पोषाख केलेले दोघेजण, अशा सुभेदारांच्या स्वाऱ्या बाहेर पडल्या. त्यांचे घोड्यांबरोबर दहापांच हुजरे व दोन असामी अबदागिरी धरून धांवत होते, व मागून वीस स्वार घोड्यांवरून येत होते.

त्यांपैकीं कुमायत घोड्यावर **गायकवाडांचे** सुभेदार **केसवा पंडित**,व सारंग घोड्यावर **रामचंद्रपंत मुळेकर** होते. हे घोडे मोठे उमदे होते. त्यांना एकसारखेंच शृंगारिलें होतें; त्यांच्या गळ्यांत कैऱ्यांच्या माळा, पाठीवर सोन्याची गेंद जोडी, दुशालाचा जेरबंद आणि जीनांवरती भरगच्चीचा चारजमा पसरला होता. दोन्ही सुभेदार एकमेकांशीं बोलत, आपले घोडे हळू हळू चालवीत ऐटीनें आजूबाजूला जमलेल्या लोकांचे मुजरे घेत चालले. **केशवराव पंडिता**च्या डोक्याला पिंवळें पैठणी पागोटें, अंगांत पिंवळा रूदार अंगरखा आणि पायांत पंजाबी कलाबूत लाविलेला जोडा होता. तो शरीरानें धिप्पाड असून काळसर रंगाचा होता. त्याचें नेहमी हंसतमुख असे. त्याच्या बाजूला एका हुजऱ्यापाशीं पिशवींत बरेंच रुपयांचें नाणें होतें, तें तो हुजऱ्या वरचेवर गरीब लोकांत टाकी. सर्व रय्यत त्याला पाहून '**गायकवाड** महाराजकी जय " असें मोठ्या उल्हासानें ओरडे.

**रामचंद्रपंत** हा गोरा असून बांध्यानें लहान होता. त्यानें अंगांत उंची काश्मीरी चोगा घातला होता. त्याची दृष्टि फार चंचळ होती. **केशवराव पंडिता**प्रमाणें त्याच्याही हुजऱ्याजवळ नाण्याची थैली होती, आणि तें हुजऱ्या वाटीतही असे; परंतु सुभेदार **रामचंद्रपंत** त्यांच्या कपाळाच्या आंठ्या, तें ओठ चावणें इत्यादि प्रकारांवरून अशा सत्कार्यीं त्यांचें मन मुळींच नव्हतें असें स्पष्ट दिसून येई. मधून मधून लोक, "**पेशवे** महाराजकी जय " असें आपण जर न म्हटलें तर सुभेदार रागावेल, ह्या भीतीनें ओरडत.

ही स्वारी जवळ आल्यावर **सटवाजीरावानें** मोठ्या अदबीनें लवून मुजरा केला. **रामचंद्रपंतांनीं** लागलीच **केशवरावा**कडे वळून म्हटलें 'मी मघाशीं जे म्हणत होतों तेच हे शूर **सटवाजीराव** जमादार.' **सटवाजीनें** लागलेंच तोंड वेंगाडून हांजी हांजीनें **केशवरावांनाही** मुजरा केला. परंतु **केशवरावांचें** लक्ष्य दुसरीकडेसच होतें. बाजूस जमलेल्या लोकांमध्यें **विठूजी** तमासगीर **आनंदशंकराला** 'रडूं नको' म्हणून दाबीत उभा होताच. त्याला पाहतांच त्या 'त्या दोघांना इकडे आणा' असें **पंडितांनीं** जवळच्या मनुष्यास सांगितलें. जवळ आल्यावर 'तुम्ही कोण ? हा मुलगा कां रडतो ?' इत्यादि त्यांनीं विचारिलें. **विठूजीनें** उत्तर दिलें 'महाराज, मी तो **विठूजी** सातारकर. ह्या शिमग्यासाठीं म्हणून **पुण्याहून** मला **भाऊसाहेबांनीं** चार दिवसांपूर्वी येथें आणविलें. हा गुजराथी मुलगा जमादार साहेबांनीं पळून जाईल म्हणून माझ्या स्वाधीन केला.' **आनंदशंकर** भीतीनें अगदीं गांगरून गेला होता. मान

खालीं घालून तो मुळुमुळु रडूं लागला. त्याला वाटलें कीं, मी ह्या वेळीं येथें आलों, म्हणून सुभेदार माझें डोकें उडवितात कीं काय.

**सटवाजीराव**ाला साहजिकच उत्तर देणें भाग पडलें. तो म्हणाला 'कांहीं नाहीं, महाराज. हा मुलगा येथें येण्याच्या अगोदर दंगा करीत होता, म्हणून त्याला चौकीवर अडकविण्यासाठीं **विठूजी**च्या स्वाधीन केला.' परंतु मुलाच्या तोंडाकडे पाहतां ह्या सांगण्यानें **केशवरावां**ची खात्री होईना, म्हणून त्यांनीं **आनंदशंकरा**ला म्हटलें 'मुला भिऊं नको, तुला कोणी मारीत नाहीं. तूं कोणाचा, येथें कशाला आलास, हें खरें खरें सांग वरें.' **आनंदशंकरा**नें थोडी मान वर करून **पंडितां**कडे पाहिलें, तेव्हां त्याला वाटलें कीं, हा मनुष्य आपल्याला कांहीं मारणार नाहीं; म्हणून त्यानें सर्व हकीकत जशीच्या तशी सांगितली.

हें सर्व **रामचंद्रपंत** निमूटपणें पाहत होते. इतक्या लांबून आपण तमासगीर आणिला, हें **पंडितां**ना कळलें म्हणून तो मनांत शरमला. पुढें ज्या वेळेस **आनंदशंकरा**नें 'मी **यज्ञेश्वरशास्त्र्यां**कडे जात होतों, मी खोडी केली नाहीं' वगैरे सांगितलें, त्या वेळेस आपली बाजू सांवरून नेण्यासाठीं त्यांनीं **सटवाजी**ची वरकांती फजीती केली. ते म्हणाले 'मुलानें जरी दंगा केला असला, तरी त्याच्या वयाकडे पाहून त्याला नुसती धमकी देऊन सोडून द्यायाचें होतें. तसें न करितां व **विठूजी** हा शिपाईही नसतां त्याच्या स्वाधीन तुम्ही मुलाला कसा केलांत, याचेंच **सटवाजीराव** मला आश्चर्य वाटतें. हो, आमची स्वारी निघायाच्या वेळीं **भद्रें**त जाण्याची मनाई करा म्हणून आज सकाळीं सांगितलें होतें, परंतु विद्यार्थी मुलांना कांहीं ही मनाई नव्हती. असो, मुला तुला उगाच येथें चुकीनें अडकवून ठेविलें होतें, म्हणून मी **यज्ञेश्वरशास्त्र्यां**ना कळवीन वरें. तूं अगदीं भिऊं नकोस.'

**केशवरावां**ची पक्की खात्री झाली कीं, **सटवाजीराव** हा कुच कामाचा मनुष्य आहे व मुलगा अगदीं निरपराध आहे. परंतु तसें उघड बोलल्यास उगाच **भाऊसाहेबां**ना राग येईल, म्हणून ते **सटवाजीराव**ाला मुळींच बोलले नाहींत. मुलाला मात्र जवळ बोलावून ते जवळच्या हुजऱ्यास म्हणाले '**गुणाजी**, ह्या मुलाला **यज्ञेश्वरशास्त्र्यां**च्या येथें पोंचवून **शास्त्रीबोवां**ना सर्व मजकूर कळीव, आणि वाटेंत जातांना मुलाला कांहीं खाऊ घेऊन दे वरें.' नंतर सुभेदारांची स्वारी बाजारांत गेली; आणि **गुणाजी आनंदशंकरा**ला **भद्रें**त घेऊन गेला.

**सटवाजीराव** मनांत फार खजील झाला, परंतु मिशांवर ताव देत 'काय चिंता आहे? आतां पळालास, पण तुझ्याकडूनच माझी दौलतजादा करवीन, तरच मी नांवाचा **सटवाजीराव**. पण तो रडतांना किती सुरेख दिसत असे. वरें **माणेकभाई**नें सांगितला, तो तर हा नसेलना?' असें कांहीं पुटपुटला.

# भाग ५ वा.

## दुष्टजन तेची होती । स्वार्थ साधाया पाहती ॥

### खलवत.

सुभेदारांच्या स्वाऱ्या मुक्कामांवर परत जाईपर्यंत संध्याकाळ झाली. ह्या वेळेस बाजारामधील दाटीही वरीच कमी झाली होती. प्रत्येक दुकानदार निरवानिरव करण्याच्या ( आपआपला राहिलेला माल गोळा करून ठेवण्याच्या ), व शेजारच्या दुकानदाराशीं 'आज किती विक्री झाली? सुभेदार तुमच्याशीं बोलले का? मला तर एक मोठें खडतर गिऱ्हाईक भेटलें होतें.' इत्यादि गप्पा मारण्याच्या नादांत गुंतले होते. कोणी आनंदानें आपल्या नफ्याविषयीं विचार करीत, कोणी दुःखानें 'आज मुळींच प्राप्ति झाली नाहीं, तर उद्यां पोटापाण्याची तजवीज कशी करावी' अशी काळजी करीत, तिनीसांजेपूर्वी बहुतेक दुकानदार राहिलेला माल परत घेऊन घरीं गेले. आणि एक घटका रात्र लोटली नाहीं तोंच ह्या ठिकाणीं थोड्या वेळापूर्वीच मोठा बाजार भरला होता, लोकांचे थव्यांचे थवे जात येत होते, ह्यांचें दर्शक, रस्त्यामध्यें कित्येक ठिकाणीं काट्या पुरण्याकरितां केलेले खळगे, कित्येक ठिकाणीं नासका भाजीपाला, कित्येक ठिकाणीं विटांचे व मडक्यांचे तुकडे, आणि इकडून तिकडून हिंडणारीं व कांहीं चघळावयास मिळण्यासाठीं जेथेंतेथें हुंगणारीं बरींच कुत्रीं व एकादें दुसरें मांजर, एवढेंच कायतें.

भयंकर पूर येऊन गेल्यावर ठिकठिकाणीं रेतींत कोठें झाडांचीं पानें व डाहाळ्या, कोठें खापरें, कोठें गाळ इत्यादि अडकून राहिलेलीं व एकेबाजूनें लहानसा प्रवाह जात आहे अशा एकाद्या विस्तीर्ण पात्राच्या नदीप्रमाणेंच जणू काय हें मोठें मैदान या पडलेल्या कचऱ्यामुळें व तुरळक रहदारीमुळें झालें होतें.

वास्तविक पहातां जगाची राहटीच अशी आहे. आपली कीर्ति अजरामर रहावी, ह्मणून एकादा सत्ताधीश एकादें अवाढव्य व अचाट असें कांहीं तरी करून ठेवितो, पण त्याच्या पश्चात् बराच काळ लोटल्यावर त्या कामांपैकीं मृत्पाषाण हेच कायते शेष राहतात, आणि कालगतीनें तेही नाहींसे होतात; मग त्याच्या कर्त्याचें नांव कोठून राहणार? असो.

नुक्ताच पाऊस पडून गेल्यामुळें ह्या वेळीं नेहमीपेक्षां जास्त थंडी वाजत होती; ह्मणून जो तो धोतर गुरगुटून घेऊन नाक तोंड झांकून व कानाला झोंबणारा वारा लागूं नये ह्मणून पागोटें बांधून, किंवा आपल्या पागोट्याखालीं आपलें उपरणें घालून कोणाशींही फार न बोलतां लगबगीनें जात होता. सूर्य अस्तास गेल्यावर तर वारा फारच झोंबूं लागला. सूर्यास पिटाळून लाविल्यानें जणू कांहीं आनंदित अशा तमोराशी पूर्वेकडून पृथ्वीवर झरझर उतरूं लागल्या; किंवा आपल्या श्रेष्ठ व उग्र धन्याच्या तेजाचा लय

झाला, ह्मणूनच तमोरूपानें हबसी दाससंघ* पृथ्वीवर नाचावयास लागला. जसजसा अंधार जास्त पडत गेला, तसतसे आकाशांत नवीन नवीन ताऱ्यांचे पुंज दिसूं लागले; त्यामुळें जणू प्रियपतिविरहानें सूर्याच्या स्त्रिया आकाशगव्हरांत बसून आपले काळेभोर लांब केश सर्व अंगभर पसरून व त्या केशांतून आपल्या अलंकारांतील रत्नांची शोभा दाखवीत शोक करीत होत्या; किंवा पुन: पतिसंगोत्सुक अशा त्या त्याचें मन रिझविण्यासाठीं ह्मणूनच जणू आकाशपटावर रांगोळी काढीत होत्या; किंवा आपल्या द्यौमातेची धाकटी बहीण जी पृथ्वी तीस तमापासून क्लेश न व्हावा, ह्मणून जणू देवांगनांनीं आपले रत्नदीप घरांतून हळूहळू आणून आकाशांत ठेविले. पूर्वपश्चिम जे लहान लहान ताऱ्यांचे फारच जवळ जवळ असणारे आकाशगंगेंतील पुंज ते जणू सूर्याची मळलेली वाट आहे असें दिसलें.

तीन घटका रात्र लोटल्यावर एक मनुष्य थंडी न लागावी ह्मणून छातीवर हात आडवे धरून व सर्व अंग आकुंचित करून कुडकुडत **शाहपुऱ्यांतून भद्रे**कडेस येत होता. चोहोंकडे अतिशय अंधार होता, तरीही तो माहितगार असल्यामुळें खाचखळग्याच्या रस्त्यानें बेधडक न धडपडतां जात होता, व सुमारें अर्ध घटकेच्या आंतच **भद्रे**च्या पुढच्या दरवाज्याच्या चौकीवर येऊन धडकला. लागलाच पाहरेकऱ्यानें ‘ तूं कोण ’ ह्मणून साद घातला. ‘ मी रयत ’ असें म्हणतांच ‘ जा ’ असें तो म्हणाला. पण हा पुढें न जातां तेथल्याच चौकीवर **सटवाजीरावाचा** शोध करीत गेला. **सटवाजीराव** नुक्ताच जेवणखाण आटोपून तंबाखू खात एका खाटेवर बसला होता. जवळच शेकावयासाठीं आगटी पेटविली होती. बाजूस एक मनुष्य चिलिम भरीत होता. आलेल्या मनुष्याला पाहिल्याबरोबर **सटवाजीराव** चटकन उठला व म्हणाला ‘या **जीवनलाल** या, आज ह्या वेळीं इकडे कोणीकडे वाट चुकलां ? ’ नंतर ‘ आपण बसावें, आपण बसल्याशिवाय मी बसणार नाहीं ’ अशी वरीच शिष्टाई झाल्यावर **सटवाजीरावानें जीवनलाला**चा हात धरून त्याला बळें खाटेवर बसविलें. **जीवन जव्हेरी** हा जातीचा श्रावक होता. ह्याची उंची मध्यम होती. ह्याच्या तोंडावर कळा मुळींच दिसत नव्हती, मग तो आगटीच्या उजेडाच्या जरा दूर बसला होता म्हणून फिक्कट दिसत होता कीं काय कोण जाणे. ह्याचें वय तिशीच्या आंत होतेंसें दिसत होतें; पण वयाच्या मानानें ह्याला मिशा फार तुरळक होत्या. हा मोठा काबेबाज असावासें वाटे; कारण याची दृष्टि नेहमीं भुईकडे असे, पण लोकांची नजर चुकवून भोंवतालचें सर्व कांहीं तो हळूच पाहून ठेवीत असे. खाटेवर बसल्यानंतर तो म्हणाला ‘ जमादारसाहेब, ह्या दोन दिवसांत थंडी अतिशय पडते. मी तर अगदीं कांकडून जातों. पण म्हटलें आपली एकदां भेट घ्यावी. मला त्या बु-

* प्रसिद्ध **विल्बरफोर्स** ह्याच्या दीर्घ उद्योगामुळें गुलामगिरीचा व्यापार त्याच, सुरास बंद होण्याच्या मार्गावर होता.

**लाखीनें** आजच सांगितलें कीं, आपण मोठी कामगिरी केली आणि त्याबद्दल बहुडतीही मिळाली. मग तर मला केव्हां भेट घेईन असें झालें. ( जवळ कोणी नाहींसें पाहून हळूच ) पण कांही थोडीशी फुरसत आहे का? हळू बोलाहो.'

हलकट मनुष्यास योग्यतेपेक्षां जास्त अधिकाराचें काम मिळालें, म्हणजे तिऱ्हाईत लोकांस आपल्या अधिकाराचा तोरा दाखवून तो आपली किंमत मात्र करवून घेतो. पण अंमलदारीचा अंमल एकदां कीं चढला, म्हणजे त्यास कर्तबगारी व शहाणपण यांची घमेंड वाटून तो बेपर्वाईनें वागूं लागतो. **सटवाजीरावास भद्रे**चा पाहरा मिळाल्यापासून आपले हात गगनास पोंचले असें झालें होतें. **उथळ पाण्यास खळ खळ** फार ह्या न्यायानें आणि आधींच मर्कट स्वभाव व त्यांत अधिकाररूपी मद्याची भर पडली ह्मणून तो केवळ उन्मत्त झाला होता. **जीवनानें** जो सरते शेंवटी इशारा दिला तसें त्यास सांगितलेंच पाहिजे होतें. तरीही लोकांना ऐकूं जाई इतक्या हलक्या आवाजानें तो म्हणाला ' मला आणि फुरसत. हें विचारितां कशाला? कांहीं काम आहे का ? '

आतां ह्याच्याशीं हळू बोलून उगाच लोकांना आपलें बोलणें ऐकण्याविषयीं उत्कंठा मात्र लागेल, हें जाणून तो मोठ्यानें म्हणाला. ' कांहीं मोठेंसें नाहीं, पण जरा दोन घटका मजबरोबर याल तर खुष—'

**सटवाजी** (मध्येंच) ' हात्तिच्या, हेंच अगोदर कां नाहीं सांगितलें? मग इतका वेळ तरी गेला नसता. '

नंतर आपल्या हाताखालच्या नाईकाला ' मी येईपर्यंत नीट खबरदारी ठेवा ' असें सांगून व पोषाख करून तो **तीन दरवाज्या**कडे **जीवन**बरोबर जाऊं लागला. वाटेनें आपल्या आसपास पुढें पाठीमागें कोणी फिरकत नाहींसें पाहून **जीवननें** हळूच त्याच्या कानांत सांगितलें '**फत्तेशा**च्या पोळेंत कांहीं जरूरीचें काम आहे, तर तुम्ही अगत्य मोठ्यानें न बोलतां मजबरोबर चला. तुम्ही खूष व्हाल.' पुढें बराच वेळ ते दोघेही न बोलतां गेले. वाटेंत त्यांच्या अंगांवर मधून मधून कुत्रीं मात्र भोंकत आणि रस्त्यानें येणाराजाणारांची चाहूल त्यांना मधून मधून लागे. नंतर ते **रतन**पोळांतून **फत्तेशा**च्या पोळाकडे वळले. ह्या भागांत श्रावक लोकांची दाट वस्ती आहे. ह्या वेळेस तेथें रस्त्यानें एकसुद्धां मनुष्य फिरकत नव्हतें. येथें खाऊन यथास्थित पुष्ट झालेले खरे, परंतु गलिच्छ व कित्येकांच्या सर्व अंगभर व्रण व खवडे असणारे असे श्रावक लोकांचे कुत्रे प्रत्येक बोळाच्या तोंडाशीं होते. त्यांना मनुष्याची चाहूल लागली कीं, एकानें भोंकण्याची सुरुवात करावी, आणि नंतर त्या पोळांतील सर्व भिकारड्या कुचक्यानासक्या कुत्र्यांनीं एकच कल्होळ करावा आणि त्या मनुष्याच्या पाठीस लागावें; ह्यामुळें पुढच्या आळीच्या कुत्र्यांनासुद्धां एका प्रकारची वर्दीच पोंहचत

असे. **जीवन** पुरा माहितगार असल्यामुळें कुत्र्यांना दबकावीत तसाच पुढें चालला. **सटवाजीरावा**ला मात्र केव्हां यांच्या तडाक्यांतून सुटेन असें झालें. तो **जीव-न**चा हात धरून चालला होता म्हणून बरें, नाहीं तर एकाद्या कुत्र्यानें ह्याच्या पोटरीचा चांगला लचकाच घेतला असता. मधून मधून ' झक मारिली, तुझ्याबरोबर आलों. चांगला स्वस्थ गुरगुटून पांघरूण घेऊन घोरत पहाऱ्यांत पडलों असतों, तें टाकून तूं चांडाळा मला येथें थंडींत कुडकुडत येण्याची भर दिलीस. पहा हीं कुत्रीं नव्हत, खरोखरीं पिशाचें आहेत. ' असा तो जळफळत होता. बरें नुसती रस्त्यांत मनुष्यांची सामसूम होती असें नव्हतें, तर आजूबाजूंच्या घरांतही हालचाल दिसत नव्हती. श्रावक लोक नेहमी आपलीं जेवणें दिवसाउजेडीं करितात; आणि रात्र झाली कीं, सर्वजण दारें खिडक्या लावून आंत बसतात किंवा निजतात; मात्र मधून मधून सुमारें सात आठ घटका रात्र होईपर्यंत एकाद्या श्रावकाच्या घराची खिडकी उघडलेली वाटते, आणि आंतून एकादी बाई येऊन सज्जांतून घाणेरडें पाणी रस्त्यावर टाकिते. ह्या लोकांची राहणी एकंदरीनें गलिच्छ असते. ह्यांच्या वस्तींतून गेलें असतां वाटेमध्यें चोहोंकडे ओंगळ ओघळ दिसतात, आणि अतिशय कुजट अशी दुर्गंधी येत असते. एक तीं भिकार कुत्रीं, दुसरें किळस आणणारे मार्ग आणि तितक्यांत वरतून तो अभिषेक या तिहींचा समुच्चय नरकवासाला किंबहुना लाजवील.

पशूंसही अयोग्य अशा घाणेरड्या रीतीनें राहण्याचें मुख्य कारण म्हटलें, म्हणजे ' **अहिंसा परमोधर्मः** ' ह्या चांगल्या वचनाचा भलत्यासलत्या ठिकाणीं अप्रयोजक व हास्यास्पद रीतीनें केलेला उपयोग. घाणेरडें पाणी गटारांत सांचलें असतां किडे होतील! टाका तें रस्त्यावर. श्वासोश्वासानें किडे मरतील! तोंडाला लावा फडकें. सकाळींच उठून तोंड धुतलें असतां, पाण्यानें जमीनीवरचे किडे मरतील! १०–१५ घटका दिवस वर आल्यावर धुवा तोंडें. साप निघाला, मारूं नका; तर त्याला धरून मडक्यांत घाला आणि शहराचे बाहेर सोडून द्या. मग मनुष्य मेला तरी कांहीं चिंता नाहीं. कुत्रा पिसाळला, धरा कैचींत, घाला गाड्यांत आणि द्या जवळच्या खेड्यांत सोडून. वानरें आलीं, घाला त्यांना मालपुवा. कुत्र्यांची तरी किती बडेजाव. दुष्काळ पडला, खायाला मिळालें नाहीं, तरी पण कुत्र्यांना थोडेंबहुत अन्न मिळालें पाहिजेच. फार काय सांगावें, पण जर रस्त्यांत पावसाच्या पाण्यानें किडे झाले तर ते गोळाकरून पांजरापोळामध्यें किंवा दुसरे ठिकाणीं खोल्यांमध्यें नेऊन ठेवावयाचे, कारण ते पायाखालीं चेंगरून मरतील. याप्रमाणें हे लोक आपल्या आयुष्याची व ऐहिक सुखाची राखरांगोळी करितात, असें म्हणायला कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. **दया दीनेषु सर्वदा** ह्या वचनाचें अवलंबन करून खरोखर **जे कां रंजले गांजले** त्यांच्या दुःखाचें परिमार्जन करील तोच खरा दयालु म्हणावा. नाहींपेक्षां कुळांस वाटेल तसें छळून व शेवटीं

देशोधडीस लावून त्यांच्या पैक्यांवर गचर व्हावें आणि मुक्या पण दुष्ट अशा जनावरांचा संभाळ करावा ह्यांत कसें पुण्य साधत असेल तें असो.

**सटवाजीराव** कंटाळून गेला होता खरा, परंतु एकटें जाण्याची छाती नसल्यामुळें म्हणा, किंवा **जीवन**च्या अगदीं कह्यांत होता म्हणा, तो तसाच श्रावकांना, त्यांच्या कुत्र्यांना वगैरे शिव्या झाडीत चाललाच होता; आणि कर्मधर्मसंयोगानें त्याच्या रागालाही भर पडली. ते तसेच जात असतां मध्येंच एक वळणाजवळ कोणी खिडकी उघडलीसें त्यांना वाटलें, आणि लागलेंच पाणी पडल्याचा खळखन आवाज व **सटवाजीरावा**चें 'अरेरे, कोणरे ही घाण! इशइशरे, माझी शाल व अंगरखा कीं रे नासला' असें विवळत ओरडणें हीं एकदम **जीवन**च्या कानीं पडलीं. **जीवन** विचारीत आहे, तोंच **सटवाजीराव** अतिशय संतापून आपला हात हिसकावून ओरडला 'कोणत्या रांडेनें हें पाणी माझ्या अंगावर ओतिलें? जर ती सांपडेल तर तिळतिळ तुकडे करून टाकीन. मी **सटवाजीराव** जमादार हें एथल्या भिकारड्यांना माहीत नाहीं वाटतें.' आणि नंतर मोठ्या त्वेषानें वर पाहून 'कायग रांडे, काय समजलीस तूं. मी जात होतों हें तूं कसें नाहीं पाहिलेंस?' असें तिच्या पिढ्या उद्धरून म्हणाला. रागाच्या आवेशांत आपण सयुक्तिक बोलतों किंवा नाहीं, ह्याचा मनुष्य मुळीं देखील विचार करीत नाहीं. **सटवाजीरावा**नें आपल्याला न पाहिल्याबद्दल पाणी टाकणारीला दोष दिलेला पाहून हळूच **जीवन** म्हणाला 'अहो पण पाणी टाकणारें आहे कोठें? व तुम्ही बोलतां कोणाला?' ती कां इतका वेळ तुमचें बोलणें ऐकत उभी राहिली आहे? मघाशींच खिडकी लाविल्याचा आवाज नाहीं कां ऐकिलांत? बरें तितक्यांत ह्या काळोखांत तिनें तरी आपल्याला कसें पाहावें?'

हें बोलणें ऐकतांच **वड्याचें तेल वांग्यावर** ह्या म्हणीप्रमाणें आपला राग काढायाला जवळ दुसरें कोणी नव्हतें म्हणून **सटवाजीराव** ओढलेल्या आवाजानें म्हणाला '**जीवन** एकंदर मी समजलों. माझी अशी फजीती करावी, म्हणूनच तूं मला असें आडवाटेनें कांहीं तरी बहाणा करून आणिलेंस. पण बच्चाराम माझ्याशीं गांठ आहे.' (त्वेषानें आपली कट्यार उपसून) 'हा पहा तुला होता कीं नव्हतासा करून टाकितों.' हा फार चवताळला आहे असें पाहून **जीवन**नें गरीबीनें उत्तर दिलें '**सटवाजीराव** तुम्ही एक अर्ध घटका थांबा, म्हणजे मी उगाच तुम्हांला आणिलें कीं काय त्याबद्दल खात्री होईल. आपल्यासारखा शूर सरदार मजसारख्या गरीब भाबड्या मनुष्याचा जीव कधींही घेणार नाहीं. बाकी माझें एथें राहणें नाहीं. अर्थात् ह्या नगरांतील लोकांची ओळखही नाहीं, म्हणून माझें ह्यांत कांहीं अंग नाहीं, अशी आपली खात्री झाली असेलच. शिवाय मला मारून तें काय मिळणार? तुम्हांला फिरून परत जातांना वाट कोण बरें दाखवील?'

आपली स्तुति व सरतेशेंवटला मुद्दा ह्या दोन्ही गोष्टी **सटवाजीरावा**ला सयुक्तिक वाटून जरा शुद्धीवर येऊन तो मो-

त्या डौलानें ह्मणाला 'वरें ह्या वेळेस तुला जीवदान देतों, पण खबरदार पुनः माझ्या वाटेस गेलास तर.' अशी शिताफी करून त्यानें आपली कट्यार फिरून जेथल्या तेथें ठेविली.

ह्या मूर्खांच्या तावडींतून एकदांचा आपला जीव वांचला असें पाहून **जीवन**नें त्याचे वरकांती पुष्कळ आभार मानिले, व स्तुति गाईली; आणि त्याचा हात धरून तो पुढें चालूं लागला.

कांहीं वेळानें ते एका जैन मंदिरांत गेले. आंत सभामंडपांत एक दिवा टिकटिक जळत होता. पतंग वगैरे त्या दिव्यावर जाऊं नयेत आणि त्याला वारा लागूं नये, ह्मणून त्याच्या भोंवतालीं तारेची जाळी लाविली होती. हे आंत आलेसें पाहून एक श्वेतांबर जैन **महावीरस्वामी**च्या मूर्तीजवळून चटकन उठून ह्मणाला, '**जीवनलाल,** एकादांचा आलास, वरें झालें. किती वेळ मी वाट पाहत होतों. हेच कां ते जमादारसाहेब?' **जीवन**नें मानेनें होय ह्मणून खूण करून आपण त्या मूर्तीच्या पुढें एका पितळेनें मढविलेल्या चौरंगावर थोडे तांदूळ टाकून ह्मटलें '**घणीखमा अरिहंता, जय महावीरस्वामी**' नंतर **सटवाजीरावा**ला घेऊन त्या श्वेतांबराच्या मागून उजव्या हाताच्या तळजिन्यानें तो तळघरांत गेला. ह्या तळघरांत तीन लामणदिवे वरच्या दिव्यासारखे मिणमिणीत नव्हते, पण झगझगीत जळत होते. येथें दोन खोल्या होत्या. जी मोठी होती ती वरच्या सभामंडपाएवढीच होती. इच्यावर संगमरवरी दगडाची लादी होती. या फरशीच्या मधोमध पांढऱ्या पिंवळ्या व लाल अशा दगडांचें कमल होतें. दरवाज्याला पितळी पत्रा होता व त्यावर पुष्कळ कोरींव काम केलें होतें. प्रथम जातांना दरवाज्याशींच एक दगडी कांसव जमिनीवर खोदलेलें होतें. त्याच्या दोन्ही बाजूस दगडाचे दोन शंख कोरले होते. लहान खोली वरच्या निजमंदिरा (देवघरा) इतकीच मोठी होती. हींत सर्वसंग परित्याग करून व्रम्हानंदांत केवळ निमग्न झालेल्या साधूंच्या मुद्रेप्रमाणें ज्यांच्या तोंडावर वीतरागत्व दर्शविण्याचा कारागिरांनीं यत्न केला आहे, ज्यांनीं कमलासन घातलें आहे, आणि ज्यांनीं आपल्या नाभीकमळापाशीं एकावर एक हात उताणे ठेविले आहेत, अशा तीन ओवडधोवड संगमरवरी मूर्ती होत्या. ह्यांचे डोळे हिऱ्याचे होते. ह्यांपैकीं मधली मूर्ति मनुष्यापेक्षां चौपट मोठी होती, आणि दोहोंबाजूच्या साधारण दुप्पट होत्या. पाटणीच्या आधाराला म्हणून मध्यभागीं चौरस साधून तळघराच्या छताला ४ संगमरवरी अष्टकोनी खांब दिले होते.

जैनदेवळांची साधारण एकसारखीच बांधणी असते. ज्या देवळांत दरवाज्याच्या दोन्ही बाजूला भिंतींतून अर्धे बाहेर असे ७।८ सोंडेचे ऐरावत काढलेले असतात तें जैनाचें मंदिर म्हणून समजावें. दरवाज्याच्या पुढच्या मंडपांत लांकडी मेहरंपीवर कांहीं ओवडधोवड पुतळ्या कोरिलेल्या असतात. ह्या पुतळ्यांच्या कंवरा वारीक असतात व त्या एकेबाजूस कललेल्या अशा काढिलेल्या असतात. दरवा-

ज्याशीं दगडी कांसव असतेंच. तळघरांत ज्याप्रमाणें सभामंडप व निजमंदिर असतें त्याप्रमाणें वरही असतें, व जमिनीवर तशीच संगमरवरी लादी केलेली असते व खालीं उजेड व हवा जावी म्हणून त्या लादींत दोन चार जाळ्या वसविलेल्या असतात. ठिकठिकाणीं खालच्या सारखेच खांब असतात. देवघरांत तितक्याच मोठ्या किंवा कधीं कधीं लहानही अशा तितक्याच मूर्ती असतात; फक्त फरक एवढा कीं, वरती चोहोंबाजूला भिंतींत लहान लहान कोनाडे असतात, त्यांत तीन तीन अशा लहान लहान संगमरवरी **पारसनाथ, आदिनाथ, धर्मनाथ, नेमिनाथ,** इत्यादि त्यांच्या निर्वाणपदाला पोंहोचलेल्या **तीर्थंकारा**च्या मूर्ति बसविलेल्या असतात. ह्या देवळांवर अष्टकोनी तीन शिखरें असतात. मधलें शिखर मोठें असतें, दुसरीं दोन लहान असून सारखीं असतात. हीं शिखरें अर्ध दीर्घ वर्तुळाकृती कमानीचीं केलेलीं असून थोडींथोडीं निमुळतीं होत गेलेलीं असतात. येथें एक सोनेरी कळस असतो व शिखराला पताकेऐवजीं लहानसें निशाण, लहान लहान घंटा व पांखरांस बसावयास फळ्या असतात.

**सटवाजीरावा**नें आंत जाण्यापूर्वी अंगावरच्या जुन्या शालीवर पडलेले डाग लोकांच्या नजरेस पडूं नयेत, ह्मणून ती हळूच गुंडाळून एका कोंपऱ्यांत ठेविली, आणि नंतर पागोटें नीट सांवरून मिशांवर ताव देत तो आंत शिरला. त्याबरोबर तेथें बसलेले दोघेजण लगबगीनें उठले आणि त्यांनीं अदबीनें त्याला सलाम केला. 'काय आमच्यावर ही मेहेरबानी. गरीबांच्या घोलण्याला मान देऊन येथपर्यंत येण्याची तसदी घेतली. केवढा पण आपला थोरपणा?' असा त्यांनीं गौरव करून त्याला तक्याशीं नेऊन बसविलें, आणि आपण बसतां बसतां ह्मणाले 'कांहीं म्हणा, पण ह्यामुळें तरी साहेबांचें दर्शन अगदीं आयत्या वेळीं झालें.'

हें बोलणें होत असतां तो श्वेतांबर जैन वरच्या सभामंडपांत जाऊन आल्यागेल्यावर नजर ठेवण्यास बसला, व जातांना तळघराच्या जिन्याचें दारही त्यानें लावून टाकिलें.

बसलेल्यांपैकीं एकजण सुमारें ४० वर्षांचा व दुसरा ३०।३२ वर्षांचा असे होते. दोघेही जातीचे मेश्री वाणी होते. त्यांपैकीं मोठा **चंग** पोळांत राहत असे. ह्याचा देह स्थूल होता. पुष्कळ गुण उधळल्यानें म्हणा, किंवा डोकें हलकें होतें म्हणून म्हणा, ह्याच्या डोक्याच्या रांठ केशापैकीं बरेच पांढरे झाले होते. हा शरीरानें उंच होता. ह्याच्या चेहऱ्यांत मार्दव व नीटसपणा नव्हता; एकंदर चेहरा ओबडधोबड व ठसठशीत होता. ह्याच्या तोंडावर तुरळक देवीचे वण होते. ह्याची गर्दन भरलेली, आणि डोकें व चेहरा मोठे असे होते. ह्याच्या गुणामुळें ह्याला त्या आळींतले लोक '**हल्या**' म्हणत. स्वतःच्या प्रतापामुळें दोन तीनदां सरकार दरबारही ह्याला पाहवा लागला होता. ह्या वेळेस हा शुभ्रकांठी रेशमी किनारीचें धोतर नेसला होता, व अंगावर कैरीकांठी जरीचें उपर्णें घेतलें होतें. जवळच त्याची उंच पिंवळी शाल पडली होती.

लहान वयाचा जो दुसरा तो **शहापुऱ्यांत भाटवाड्यां**त राहात असे. ह्याचें नाक आंखूड व नकटें, कपाळ लहान, एका डोळ्यांत

फूल पडलेलें, चेहरा ओढलेला, आणि गळ्याला गंडमाळेचे डाग असे होते. ह्याचा खालचा ओंठ मोठा व पुढें आलेला होता. ह्याचे कान नाकाच्या मानानें वरेच वर होते. ह्याची उंची मध्यम व वर्ण गोरा होता. एकंदरीनें हा उद्धट, निर्लज्ज, खुनसी व विषयी असावा असा दिसत होता.

**सटवाजीराव**ाशिवाय बाकीचे तिघेजण अतिशय निंद्य कामें करून आपलें पोट भरीत असत. हे पक्के भूम्ये ( म्हणजे त्या ठिकाणचे माहीतगार) असल्यामुळें रयतेस फार पीडा सोसावी लागे. ती ह्यांना **चाहाड्ये** म्हणजे चाहाडखोर म्हणे. मराठेशाहीच्या अगदीं अगदीं अखेरीस हे दुष्ट फारच माजले होते. **पेशव्यां**च्या सुभेदारांची जसजशी धनतृष्णा बळावत चालली तसतसा या नराधमांचा उपयोगही सरकारकामीं जास्त पडूं लागला. ' फलाण्याजवळ दुराचारानें मिळविलेली अतोनात संपत्ति आहे, अमकीचें पाऊल कुमार्गी पडलें आहे, अमका वदफैली आहे ' इत्यादि नानाप्रकारचे दोषारोप करून आणि क्वचित खरी व बहुश: खोटी अशी माहिती देऊन गरीब रयतेस त्यांनीं अगदीं गांजून टाकिलें. असले आरोप सुभेदारांच्या नफ्यावरच; कारण हीं सर्व दंड घेण्याचीं कलमें. ह्या दंडांतून माहिती देणारांचा थोडाबहुत चव्वा असायचाच. कधीं कधीं तर ह्या नरपशूंनीं अगदीं निरापराध अशा कुलीन व सज्जन गृहस्थास एखाद्या बाजार बसवीकडून देखील कौमार्यहरण केल्याबद्दलची नाहक धमकी देववावी. मग काय बिचाऱ्यांनीं ह्यांचें तोंड दाबण्याकरितां म्हणून जें मागतील तें घरदारदेखील विकून द्यावें. कारण केवळ निर्दोषतेवर हवाला ठेवण्याचा तो मुळींच काळ नव्हता. तितक्यांत ह्यांना पडला राजाश्रय, म्हणून रयतेलाही यांना यथायोग्य शासन करण्याचें धैर्य होत नसे.

वास्तविक पाहतां ह्यांत बराच दोष प्रभूकडे होता. जर स्वत: प्रभूनें थोडीशीही अन्यायाकडे प्रवृत्ति दाखविली, तर नानाप्रकारें आपलें कपटजाळ पसरण्याला दुष्ट लोकांना फावतें, ह्यांत नवल तें कोणतें? असो.

सर्व बसल्यावर **सटवाजीराव** त्यांपैकीं थोरल्यास म्हणाला ' **बुलाखीदास**, हा पुष्कळ दिवसांनीं भेटीचा योग आला. आतां मी **बुलाखीदासां**च्या भेटीस जातों असें **जीवनलालां**नीं मला कळविल्यावरून जरूरीचें काम एका बाजूस ठेवून तसा आलों. बरें हे आपल्याजवळ बसलेले कोण ? ह्यांना मी पाहिलें नाहींसें वाटतें.' **बुलाखी** ह्मणाला 'हे **शहापुऱ्यां**तील **उत्तमलाल**. ह्यांनीं सरकारांची दोन तीन कामें फार पसंत रीतीनें तडीस नेलीं. **भाऊसाहेब** ह्यांना चांगले ओळखतात. '

नंतर दुसरें कांहीं बोलणें होऊन ते हळूहळू बोलायाला लागले. मग **जीवन**नें बेलभंडार आणवून **सटवाजीरावा**पुढें ठेविला व तो त्यानें उचलिला. कांहीं वेळानें पानसुपारी खाऊन ते सर्वजण उठले, व त्या जैनाला हांक मारून ' आम्ही जातों, हे दिवे मालवून टाक ' असें सांगून ते मंदिराबाहेर पडले. त्यांपैकीं **बुलाखी** तर अतिशय आनंदित दिसला व 'आज सहा महिने वाट पाहत होतों, उद्यां ह्यावेळेसच...... ' असें कांहीं जातां जातां बोलला. **सटवाजीराव**ही 'हे आयतेंच कामांत काम, व १०० रुपये. मला ग्रह फार अनुकूल आहेतसें दिसतें ' असें पुटपुटला.

## भाग ६ वा.

### मन चिंती एक ईश्वर घडवी अनेक.

आज संध्याकाळीं अघरणीचा वरघोडा निघणार, त्यामुळें स्वाभाविक **जयलक्ष्मी**-ची अगदीं पाहाटेपासून धांदल झाली होती. साधारणतः बायकांना मिरवणूक ही आवडायाचीच, मग ती कोणाच्यासंबंधानें कां असेना. आणि तितक्यांत त्या मिरवणुकीचें प्राधान्य आपणाकडेसच असलें, मग तर त्या स्त्रियेची तारंबळ कोण विचारावी? बरें तशांतही स्वतःच्या अंगीं इतर स्त्रियांपेक्षां जास्त मोहकपणा आहे, अशी जर तीची समजूत असली, तर मग तिचा आनंद गगनांतसुद्धां मावणार नाहीं. 'मी अमकीच पैठणी नेसेन; मला चंद्रकळा, बाई, फार चांगली शोभते; ती अमुकच चंपकळी घालीन; तशीच वेणी घालीन, नाहीं तर नुसता बुचडा बांधीन; कांग कमले, मला ही नथ शोभते कां?' इत्यादि लाडें लाडें बोलत, व समारंभाच्या अगोदर ५।६ घटका नटून इकडून तिकडे मुरडत चालत, केव्हां एकदां मिरवीन असें तिला होतें. त्याप्रमाणेंच **जयलक्ष्मी**चीही अवस्था झाली होती.

'अजून किती रात्र आहे बाई? ही संपणार कीं नाहीं कोण जाणे' असें वारंवार ह्मणत, ती अंथरुणावर बराच वेळ लोळत होती. मग एकदांची लोकांची उठण्याची चाहूल लागतांच चटकन, आतांच जणू काय जागी झाली, असें दाखवीत डोळे चोळीत चोळीत ती खालीं आली.

थोडक्या वेळानें शेजारीण **हरकुंवरबाई** ही 'काय बया, किती उशीर केलास हा? आतां न्हाऊन त्या **भोलानाथभाईं**च्या येथें गेलें पाहिजेना' असें ह्मणत आली. नंतर **हरकुंवरबाई**नें तिच्या अंगाला गव्हला-कचरा वगैरेचीं सुगंधी उटणीं व तेलें लावून तिला चांगलें न्हाऊं घातलें, व जरीकांठी पैठणी नेसवून **रायपुरांत आकाशेट**च्या कुव्याच्या पोळांत **भोलानाथभाई**च्या घरीं तिला व **आनंदशंकरा**ला उजेडल्यावर पोंचविलें; कारण **भोलानाथभाई**च्या घरून रात्रीं वरघोडा काढणार होते, व तो **चकलेश्वर** महादेवाच्या देवळावरून मिरवीत **लाखापटेल**च्या पोळांत **निळकंठ-भाई**च्या येथें येणार होता. **भोलानाथ** हा **निळकंठभाई**चा लांबचा नातेवाईक होता. वास्तविक **माणेकभाई**नें सासरीं न राहतां निराळें बिऱ्हाड केलें पाहिजे होतें, परंतु काय थोडी वडिलोपार्जित संपत्ति होती, तिचा थोड्या काळांत विनियोग करून स्वतः अगदीं कफल्लक झाला. हा बहुत-करून व्यापारांत बुडाला, असा तर्क करून त्याला **निळकंठभाई** वरचेवर पैसे पोंचवीत असे; व त्यानें मागें सांगितलेली चाकरीही लावून दिली होती. पुढें त्यासही **जयलक्ष्मी** ही एकटीच मुलगी राहिली, आणि निराळें बिऱ्हाड झाल्यास दिवसांतून बराच वेळ मुलीचा वियोग होईल जाणून, **माणेकभाई**च्या अगदीं मनाप्रमाणें त्यानें एकत्र बिऱ्हाड केलें. असो.

**माणेकभाई**नें सकाळींच स्नान करून सासऱ्याच्या सांगण्यावरून 'कोणी ब्राह्मण आल्यास मजकडे पाठवून दे' असें गड्याला सांगितलें. कांहीं वेळानें नेहमींचा भिक्षा मागणारा **केशवभट** हा 'नारायण, विश्वनाथ, आज मकरसंक्रांत, पुण्यपर्वणी, ब्राह्म-

णास दान ' असें ह्मणत आला. ह्या ब्राह्मणानें आपल्या पांढऱ्या पागोट्यावरून एक जुनी मळकट शाल घेतली होती; डोक्याला आपल्या ब्राह्मण्याचें सूचक असें भव्य कपाळभर आडवें पांढरें गंध लाविलें होतें. ह्याचें नाक तपकीर ओढून ओढून चोंदलेलें होतें. हिंवाळ्याचे दिवस ह्मणून प्रत्यहीं लसूण खाल्यामुळें याच्यापासून बरेंच दूरपावेतों घपकन लसणाची घाण येई. याच्या खांकेंत एक गोणताटी पिशवी भिक्षेनें भरलेली होती, व उजव्या हातांत एक पितळी लोटा, आणि त्यावर एक तुपासाठीं व एक कुंकवाची अशा दोन वाट्या होत्या. लोक ह्मणत कीं, हा भट इतकी भिक्षा दररोज मागून ती विकतो, व आपण कोठें तरी बाहेर जेवण काढतो. तो आलासें पाहून **बेचर** थट्टेनें ह्मणाला–' चल तुला **माणेकभाई** गायकवाडींत घेऊन जाणार आहेत, ५००० रुपये असून भिक्षा मागतोस, नाहीं कां ?'–आणि त्याला धरूं लागला. मग काय, **केशवभट** मोठा कांगाव करून विव्हळत बोलूं लागला ' अरे बापरे, अरे कोठले ५००० रुपये घेऊन बसलास? मला जर हवेलींत अडकविलें, तर माझ्या दोन बायका उपाशी मरतील. अरे चंडाळा, मला सध्यां भिक्षा किंरे मिळत नसल्यामुळें एक बायकोसुद्धां विकावी लागेल.' हें त्याचें लाघव पाहून **बेचर** हसूं लागला. इतक्यांत ' हा कसला दंगा चालला आहे ? ( भटजीला पाहून ) या भटजी, दान घ्या. ' असें **माणेकभाई** ह्मणाला. **केशवभट** मोठ्या हर्षानें आंत जाऊन एका पाटावर बसला, आणि 'आपण कोण ब्राह्मण ? ' असें **माणेकभाईनें** विचारतांच 'मी **तरवाडी मेवाडा**' असें त्यानें उत्तर दिलें. नंतर **माणेकभाईनें** त्याची पूजा करून त्याला एक तिळाचा लाडू दिला. ह्या लाडूंत एक रुपाया ठेविला होता. या दानाला 'गुपित ( गुप्त ) दान' ह्मणतात. पूजा होत असतां **केशवभटानें** ' पुराणिबाबा ने नव लाडु खावा, अक्षताः आपवामि; जोशीने बुलावा ने छ लाडू आपवा, दक्षणा आपामि' असा मंत्र ह्मटला.

वाः काय विद्वत्ता व आचरण ह्या ब्राह्मणाचें ? बहुतकरून इकडील पुष्कळ ब्राह्मण असेच. विद्येचा गंध नाहीं, मंत्र तर ऐकिले नाहींत, तंत्रावर सगळा मारा; पण ते तंत्र तरी शास्त्रोक्त; छेः भलतेंच. उच्चारही सदहूंप्रमाणें. **तरवाडी** ह्मणजे **त्रिवेदी** हें देखील कोणीं सांगावें त्या वेळीं कळणार. असो.

पांच सहा घटका दिवस उरला, तेव्हांपासून **निळकंठभाई** वरघोड्याच्या तयारीला लागला. **माणेकभाई** व **बेचर** ह्यांना घरीं ठेवून आपण व **मोहन** आचारी असे उभयतां **भोलानाथांच्या** येथें गेले. तेथें बराच वेळ 'कोठें बोलावणी करावयाचीं राहिलीं कीं काय ? पालखी **हेमाभाईनीं** अद्याप कशी पाठवून दिली नाहीं ? वाजंत्री केव्हां येणार ? उशीर होत आहे ' असें ह्मणत इकडून तिकडे **निळकंठभाई** फिरत होता. **भोलानाथभाईनें** पुष्कळ सांगितलें कीं, ' सर्व तयारी झाली आहे, उगाच कां येरझाऱ्या करितां ? थकून जाल, कांहीं कमी पडलें तर आह्माला दोष द्या. ' तरी देखील **निळकंठभाईचा** जीव खालीं पडेना. खरेंच आहे, ह्यातान्या बापाला आपल्या एकुलत्या एक मुलाच्या कार्याचें किती कौतुक वाटत असतें ? त्याला काय

करूं न् काय ठेवूं असें होतें. मुलाची जर आई जीवंत असली, तर तिची बहुतकरून त्याप्रमाणें किंवा किंबहुना जास्तच अशी आतुर अवस्था होते. परंतु तिच्या पश्चात् बापाला ' माझ्या बाबीला नहाण आलें, ती गभीर झाली' असें समजलें, ह्मणजे त्याच्या मनाची फारच चमत्कारिक आनंदातिशय-युक्त अशी स्थिति होते. ह्मातारपणीं एकुलत्या एका मुलीचे सोहाळे पाहणें, हें त्या ह्मातान्याला स्वर्गसुखाहूनही किंबहुना जास्त आनंददायी. सर्व प्रकारचीं सांसारिक दुःखें भोगून ह्या जगाचा वीट आलेल्या वृद्ध मनुष्यास एकच मूल असणें, हीं केवळ त्याला परलोकापासून पराङ्मुख करणारी एक मोठी शक्ति होय. अति कडक थंडीमुळें फक्त पर्णहीनशाखा राहिल्या आहेत, असा एकादा वृक्ष वसंतागमानें त्यांवर लहान लहान पर्णांकुर धारण करितो, तद्वत् सांसारिक दुःखांनीं पर्याकुल असा मनुष्य तनयसहवासानें पुनरपि सुख अनुभवतो, ह्यांत आश्चर्य मुळींच नाहीं. पुत्र हा, वृद्धापकाळीं पित्याला यमदंष्ट्रेपासून सोडविणारा होय. अहाहा, प्रवाश्यास ओसाड अरण्यांत जलसंचयाप्रमाणें, दुष्काळपीडितास अन्नाप्रमाणें, समुद्रांत गटंगळ्या खाणाऱ्यास नांवेप्रमाणें, ज्यांना वार्धक्यावस्थेंत सुपुत्र असतात, ते खरोखर ' धन्य ह्मणावे प्राणी. '

ऐन संध्याकाळीं **भोलानाथा**च्या घराबाहेर वरघोड्याची सर्व तयारी झाली. बोलविलेली सर्व मंडळी दिवाणखान्यांतून बाहेर आली. भोईसुद्धां पालखीजवळ उभे राहिले. तासेवाले आपले तासे विस्तवाशीं शेंकीत होते. '**जयलक्ष्मी**, किती उशीर करायाचा आहे अजून? बाहेर लोक वाट पाहत केव्हांचे उभे आहेत; जा **आनंदशंकर**, ताईला बोलाव ' असें **निळकंठभाई** ह्मणाला. कोणत्याही कामांत बायकांची जितकी पहिल्यानें उतावळ असते, तितका त्या आयत्या वेळीं उशीर पण करितात. निघण्यापूर्वीं पहिल्यानें तिच्या अंगावर सव्वा मण सोन्याचे दागिने घातले; ह्यालाच ' वाघ करणें ' ह्मणतात. परंतु इतकें ओझें हिला सहन होणार नाहीं, म्हणून ते काढून ठेविले. नंतर तिची ओटी भरल्यावर लागलीच ती लाजत लाजत पुढें येऊन **निळकंठभाई**, **भोलानाथ** व वडील बाया ह्यांस नमस्कार करून पालखींत बसायाला ह्मणून दरवाज्याबाहेर आली; आणि दोघी बायांनीं तिला पालखींत बसविलें.

ती बसल्याबरोबर एकदम वाजंत्री वाजूं लागली व भोयांनीं पालखी उचलल्यावर सर्व लोक चालूं लागले. सर्वांच्यापुढें एक तुतारीवाला तुतारी ( भुंगळ ) मधून मधून फुंकीत होता; व दोन धिप्पाड गडी भले मोठे दोन दोन तांब्याचे हंडे डोकीवर घेऊन व त्यांवर पितळी कळशा ठेवून चालले होते. नंतर तीन तासेमरफ्यांचे जोड होते. हे तासेवाले कसून वाजवीत होते, असें ताशांच्या कडकड आवाजावरून वाटे. पाठोपाठ कांहीं मराठे सुस्वर सनया वाजवीत होते, व कांहीं संबळीवर ताल धरीत होते. नंतर अंगांवर शालजोड्या घेतलेले व डोकीस उंची पागोटीं घातलेले व जरीकांठी धोतरें नेसलेले असे सुमारें सव्वाशें नागर लोक होते. ह्या समुदायांत कांहीं **निळकंठभाई**च्या फार ओळखीचे असे दक्षणी ब्राम्हण, व गुजराथी ब्राह्मणही होते. **निळकंठभाई** हा **आनंदशंकराचा** हात धरून आपल्या

जवळच्या एका दक्षणी ब्राम्हणाशीं बोलत
व वरचेवर पाठीमागें पालखीकडे पाहत चा-
लला होता. पुरुषांपाठीमागून **जयलक्ष्मी**ची
पालखी व तिच्या मागून **हरकुंवरबाई,**
**भोलानाथा**ची बायको व सून, आणखी चार
पांच नातेवाईक नागर बायका, उंची शाल
काष्टा न घालतां नेसून व डावीकडून डोकी-
वरून व उजव्या हातावरून पदर घेऊन
तो कंबरेला डावे बाजूस खोवून, पायां
तोरड्या, किंवा कल्ले, घालून छण् छ
असा पदोपदीं त्यांतून आवाज काढी
वरचेवर आपला सुशोभित असा डावा हा
खालीं वर करीत व मधून मधून वरच
गवाक्षांकडे व सज्जांकडे पाहत पाहत, च
लल्या होत्या. बहुशः नागरांमध्यें कुरूप बाय
विरळा, आणि तितक्यांत अशा नटलेल्
मग तर ह्या इंद्रलोकींच्या अप्सराच
लोकीं मनुष्यांच्या सहवासाचा अनुभव
सावा ह्मणून आल्या कीं काय, असें वा
ह्यांच्या मागून पांच सहा गुजराथी गडी
होते, व मधून मधून अंतरावर बारा म
लजी आपल्या मशालींवर तेल घालून प
ळीत चालले होते.

तो मशालींचा झगझगीत उजेड, ढ
ग्यांचा ढवढव आवाज, कानठळ्या
णाऱ्या कडकड ताशांच्या आवाजामधून
सनईचा सुस्वर, त्या पुरुषांच्या निरनिरा
रंगांच्या शाली, त्या बायकांचे नूपुरर
शालूंवरील जरीचें काम, व मधोमध
तांबड्या पालखींत वरच्या कमानी
गोंड्याला डाव्या हातानें धरून वस
व लाजून खालीं तोंड घातलेली ती
**लक्ष्मी** व बाजूनें उंच हवेल्या व प्रे
ांनीं एका प्रकारची अप्रतिम शोभा दिसत
ोती.

**जयलक्ष्मी** तर ह्या वेळेला फारच मोहक
ेसत होती. ज्या वेळेस ती पालखींत
ावयाला ह्मणून बाहेर आली, त्या वेळेस
्या मशालींच्या उजेडांत तिचा एकंदर
ांधा फारच खुलला. ही बांध्यानें मध्यम
रंगानें निमगोरी होती. हिचें कपाळ मोठें
डोक्यावर काळेकुळकुळीत केश होते,
ते कपाळ व कान ह्यांजवळ कुरळे होते.
ेचे डोळे मोठे असून बुबुळें काळींभोर
ोतीं, व पापण्याचें केश लांब व सुरेख
ोते. हिच्या वरच्या पापण्या बहुतकरून
ोळ्यांवर पडलेल्या असत. हिचें नाक
रळ होतें. एकंदरींत ही जरी अतिरूप-
ती स्त्रियांमध्यें गणली गेली नसती, तरीही
हिच्या चेहऱ्याची एकंदर ठेवण फारच मो-
क होती.

हिला सहावा महिना लागला असूनही
तके महिने हिला लोटले आहेत, असें कांहीं
देसत नव्हतें. ही बांधेसूत बायको होती.
हिची आंगलट थोडीशी गुबगुबीत होती,
त्यामुळें व यौवनाचा प्रादुर्भाव झाल्यामुळें
हिच्यावर अप्रतिम तेज झळकत होतें;
ह्मणून पाहणाऱ्यांचें मनोहरण झाल्याशिवाय
ाहत नसे. अगोदर दिव्याच्या उजेडांत
रूप खुलतें, आणि तशांत **जयलक्ष्मी**सा-
रखी यौवनानें आक्रांत व स्वरूपानेंही चां-
ली अशी स्त्री किती सुंदर भासेल बरें ?
ी जरतारी पैठणी नेसली होती. त्या
ैठणीवर जरीचे ठिपके ठिपके होते. अंगांत
जरीकांठी घट्ट कांचोळी घातली होती.
ायांत शिंदेशाई सांखळ्या व कल्ले होते.
डाव्या हातांत वांकी व मोठे बाजूबंद कोंप-

रावर घातले होते. दोन्ही हातांत गोंठ, व बांगड्या होत्या. बोटांत हिऱ्याची आंगठी होती. नाकांत ६ टपोरीं मोत्यांची नथ घातली होती. ह्या मोत्यांमधोमध एक हिरकणी होती. तिनें कपाळावर एक टिकली लाविली होती. कानांत मोत्याचे कुडुक व कर्णफुलें, डोकींत केवडा व नाग व पुढें बिंदीबिजवरा घातला होता.

अशी श्रृंगारलेली **जयलक्ष्मी** पाहण्याकडे सर्वांचें आपोआप लक्ष लागलें. तिच्या त्या नाकावर लाजेमुळें किंवा श्रमानें आलेले घर्मबिंदु तिच्या तोंडाला फारच शोभवीत होते. तिचा अधरोष्ठ रसरसीत दिसत होता. तिच्या पडलेल्या पापण्यांवरून, ती नुकतीच जागी झाली आहे, किंवा हिच्या अंगांत यौवनाची धुंदी भरली आहे, असें वाटे. ही मनाची फार कोमल असे, ह्मणून हिच्या प्रीतींतल्या प्राण्याला जर यत्किंचितही दुःख झालें, तर हिला तें न सहन होऊन, तें घालविण्यासाठीं ती अतोनात खटपट करी.

हिचा जो सर्व अंगभर पसरलेला सुकुमारपणा, त्यानेंच हिच्या हृदयाला जणू काय कोमल केलें होतें. हिच्या नाकावर यौवनस्वातीवर्षावानें घर्मबिंदूंचें मिष करून, लहानसहान मोतींच चिकटलीं आहेत असें वाटलें. हिच्या अधरोष्ठाचा ओलेपणा अधरमधुपदाला सार्थकत्व आणी, किंवा सुवर्णखचित अशा पुढल्या दंतपंक्तीला भिऊनच तो आर्द्र झाला, असें वाटे. तिचे ते वर्तुल व पीन कुचद्वय, मदनाच्या सतत येणाऱ्या हल्ल्यांपासून कोमल हृदयाचें संरक्षण करणाऱ्या बुरुजांप्रमाणें शोभत होते. यौवनानल हृदयांत तन्नितर भडकूं लागला, ह्मणूनच त्याच्या धगीपासून तिच्या कोमल चर्मावर होणारा अपाय, स्तनांच्या रूपानें पर्यवसान पावला, व स्तनांचीं अग्रें हीं त्या यौवनानलाच्या धूम्रानें कृष्ण झालीं, असें दिसत होतें. तिचें कपाळ तिलकानें, सूर्योदयापूर्वी शुक्राच्या चांदणीसहित आकाशाप्रमाणें वाटलें. तिच्या विस्तीर्ण कपाळावर असलेले कुरळ केश, मुखचंद्राला पाहून भ्यालेल्या केवळ तमोराशीच वाटत होत्या. तिचे ते अर्धविवृत नयन, श्वेतकमलान्तर्गत भ्रमरच; आणि मदनावर टाकण्यासाठींच जणू शराप्रमाणें तिच्या पापण्याचें लांब केश. अशी ती **जयलक्ष्मी** पालखींत बसली असतां, आपल्या जरतारी पैठणीमुळें खग्रास सूर्यग्रहणानें थोडेवहुत तारे चमकूं लागले आहेत अशा गगनतलाप्रमाणें भासली. तिचें सौंदर्य, नथेंतील व आंगठींतील हिऱ्यांच्या मिषानें लोकांचे डोळे दिपवी. असो.

ह्याप्रमाणें वरघोडा जात जात रायपुऱ्यांतील **चलकेश्वर** महादेवाच्या देवळाजवळील वळणानें **लाखापटेल**च्या पोळाकडे ह्मणून वळला. पुरुषांचा मेळा पुढें गेल्यावर एकाएकीं कोणी शीळ घालीत आहे असें भासलें; आणि लागलीच पांच सहा मशालजींनीं आपल्या मशाली विझविल्या. इतक्यांत कांहीं घोडेस्वार दौड करीत येत आहेत असें वाटलें, व 'धरा,' 'मारा' असे शब्द मंडळीच्या कानीं पडले. मग कसचा वरघोडा न् कसचें काय. पुष्कळ लोक, जी वाट सांपडेल, तिकडून पळाले. भोयांनीं पालखी टाकून धूम पळ काढिला. पाठीमागच्या वायकांनीं व गड्यांनीं वाट धरिली. येऊन जाऊन सुमारें दहा बारा जण राहिले. बिचारा **निळकंठभाई** 'अहो, पळूं नका.

काय आहे तें पहा. चोर असल्यास त्यांना शासन केलें पाहिजे. **जयलक्ष्मी, आनंदशंकर,** भीऊं नका. अहो **भोलानाथ,** इकडे या.' असें ओरडत होता. पण ऐकतो कोण? जिकडेतिकडे आरडाओरड व एकच कल्होळ. जवळच्या आळींतल्या लोकांनीं तरी मदतीस यावें; पण तेंही नाहीं. त्यांना वाटलें, मोठा दरवडा आला आहे, तर आपण आपलें नीट संभाळून असावें. असल्या धुमाकुळीला निबिड अंधःकाराची भर पडली. एक **जयलक्ष्मी, निळकंठभाई, मोहन,** दोन तीन दक्षणी गृहस्थ व दोन तीन नागर ब्राह्मण एवढेच काय ते राहिले; बाकी, घोडेस्वार जवळ येईपर्यंत सर्व धूम पळून गेले. हिंम्या करून राहिलेली मंडळी पालखीजवळ उभी होती, व **जयलक्ष्मी** पालखींतून बाहेर निघत आहे, इतक्यांत कांहीं लोकांनीं 'पालखींतल्या बायकोला पकडा' असें ह्मणून चाल केली. मग काय, जे ह्मणून धीर धरून राहिले होते, त्यांपैकीं चार पांच जणांनी तर लागलाच पळ काढिला. **निळकंठभाई**च्या डोक्यावर काठीचा मार बसून, तो '**जयलक्ष्मी**, मी मेलों' असें कण्हत पडला. बिचारा **मोहन**ही धन्याला उचलून नेण्यासाठीं वांकला असतां, पाठींत सोटा खाऊन जेथल्या तेथेंच बेशुद्ध होऊन पडला. एका दक्षण्यानें मात्र हळूच वांकून एका दरवडेखोरास चीत केलें; आणि त्याचें ओरडणें त्याच्या साथीदारांना ओळखूं जाण्याच्या पूर्वीच त्याचें तोंड बांधून आपण खचकन पाठीवर बसला, व त्याचे हातपायही बांधून टाकिले. घोडेस्वारानें इतक्यांत इकडून तिकडे हिंडतांना एका मुलास पकडिलें; आणि **जयलक्ष्मी**स ही तोंडांत बोळा देऊन पालखींत घालून कांहीं जण घेऊन गेले.

हें सर्व २५।३० पळांच्या आंतच झालें. वास्तविक घोडेस्वार एकच होता, परंतु मनुष्यांची साहजिक वृत्ति अशी असते कीं, एकानें कुई केली कीं, लागलीच सगळे घाबरले; कांहींही अकस्मात भयंकर गोष्ट घडून आली, अशी बातमी लागल्यास त्यावद्दल विचार न करितां एकदम अविचारी पशूंप्रमाणें पळ काढायाचा. नाटकगृहांत कोणी 'आग लागली' ह्मणून ओरडला, तर लोक किती गांगरून जातात, व एकदम जें दार असेल त्या दारानें पळण्यासाठीं ह्मणून एकाच ठिकाणीं कसे घुसतात; आणि त्यापासून किती प्राणहानी होतें बरें?

---

# भाग ७ वा.

चोहोंकडे सामसूम झालीसें पाहून तो दक्षणी उठला, आणि आपल्याजवळ कोणकोण पडले आहेत हें पाहण्यासाठीं तो आसपास चांचपूं लागला. बराच वेळ होईपर्यंत बिचारा **निळकंठभाई** डोक्यावर सोटा बसल्यामुळें बेशुद्ध पडला होता, तो ह्यापूर्वीच थोडा वेळ सावध झाला होता. सर्व गोष्टी एकामागून एक अशा अकस्मात घडून आल्यामुळें व जखमेच्या वेदनांमुळें आपण कोणत्या ठिकाणीं आहों, हें सर्व स्वप्न तर नसेल ना, असें कांहीं वेळपावेतों त्याला वाटलें. परंतु जेव्हां आपण जमीनीवर पडलों आहों व डोक्याला हात लावून पाहतां खोंक पडली आहे, अशी

त्याची खात्री झाली, तेव्हां सर्व गोष्टी वास्तविक निःसंशय घडून आल्या असें वाटून त्याच्या जीवाला अतोनात दुःख झालें. जखमेच्या सर्व वेदना विसरून तो विचार करूं लागला. कांहीं वेळानें **मोहन**ही सावध झाला व आपल्या धन्याला हांका मारून उठवायाला लागला. **मोहना**चा स्वर ओळखून, हा सर्व केवळ भास असेल असा पुनः संशय पडून **निळकंठभाई**नें हळूच विचारिलें '**मोहना,** आपण कोठें आहों, वरघोड्याहून परत केव्हां आलों?' त्याच्या मनांत हेंच कीं, 'मघाशींच परत आलों, तुह्मांला भोंवळ आली व एथें आंगणांत पडलां' असें कांहीं तरी **मोहन** वांछित उत्तर देईल. केव्हांही व कोणतेंही अशुभ वृत्त जर आपल्या कानीं पडलें किंवा आपल्या दृष्टिगोचर झालें, तर हें कदाचित मिथ्या असेल व इंद्रियांनींच आपली फसवणूक केली असें एकदम निश्चयात्मक ठरविण्याविषयीं आपल्या मनाची साहजिक प्रवृत्ति होते; मग तितक्यांत **निळकंठभाई**सारख्या वृद्ध मनुष्यास असें वाटावें, त्यांत कांहीं नवल नाहीं. **मोहन** उडवाउडवी करून ह्मणाला 'बराच वेळ घेरी येऊन आपण एथें पडलां आहां, तर जलदी उठा व घरांत चला, नाहींतर ही थंडी आपल्यास बाधेल.'

त्या दक्षण्याच्या कानीं हे सरते शेवटले शब्द पडतांच तो लगबगीनें शब्दाच्या अनुरोधानें जवळ आला, व **मोहना**चा शब्द व भाव ओळखून ह्मणाला '**मोहन,** तूं कां **निळकंठभाईं**ना अजून घरांत घेऊन जातोस? मघाशींच गेला असशील ह्मणून मला वाटलें.'

स्वर ओळखून **मोहन** ह्मणाला 'कां **गोविंदराव,** अजून तुम्ही घरीं गेला नाहीं? ते आतांच सावध झाले आहेत, मी आतां त्यांना घेऊन जातों.' व जवळ येऊन त्यानें कानांत हळूच सांगितलें 'माझी पाठ फार सडकली आहे, तर तुम्ही माझ्या पाठीवर त्यांना मेहरबानी करून बसवा, व जरा आमच्या वाड्यापर्यंत चला. होतां होईपर्यंत काय झालें त्याची त्यांना ओळख द्यायची नाहीं, बरेंका. पण दरवडेखोरांपैकीं आसपास नाहीं ना?' **गोविंदरावा**नें उत्तर दिलें 'कोणी नाहीं, फक्त एका दरवडेखोराच्या मुसक्या बांधून मीं ठेविलें आहे. मी त्याला घेऊन तुझ्या बरोबर सोबतीस म्हणून येतों. वाटेनें मी कांहीं त्यासंबंधीं बोलणार नाहीं. मग काय होईल तें पाहूं.'

**निळकंठभाई**नें कण्हत **मोहनाला** विचारिलें 'तूं मला टाकून कोठें गेलास? कां **गोविंदराव** रात्र किती झाली? वरघोड्याहून तुम्ही घरीं कां गेला नाहीं? **यज्ञेश्वरशास्त्री** तुम्हाला रागें भरतीलना?'

'कांहीं रागावणार नाहींत' असें उत्तर देऊन **मोहना**च्या पाठीवर **निळकंठभाई**स देऊन व आपण त्या दरवडेखोराला घेऊन तो चालूं लागला; व वाटेनें '**मोहन** तूं आतां जवळच्या वाटेनें घराहून आलास आणि लागलीच कशी तूं वाट विसरलास? फार झालें तर घरीं जायाला ४।५ पळें लागावींत. मला वाटतें तूं भलत्याच वाटेनें जातोस. बरोबर दिवा तरी आणावयाचा होतास. मोठा वोवा विसराळू तूं?' असें बोलत चालला. पण जसजसा घरीं पोंचण्यास वेळ जास्त लागूं लागला, तस

तसा **निळकंठभाई**चा धीर खचत चालला. ह्या सर्व गोष्टी खरोखर घडून आल्या, असें त्यास वाटूं लागले, व त्याचा आशांकुर जेथल्या तेथेंच कोमेजून गेला. नंतर आपल्या मनाची संशयनिवृत्ति करण्यासाठीं म्हणून त्यानें वारंवार '**जयलक्ष्मी** कोठें गेली ? ते दरवडेखोर पळाले कां ?' असें स्पष्ट विचारिलें; परंतु ह्यांनीं तिकडे न लक्ष देतां, आपसांतच बोलण्यामध्यें गर्क झालों आहों, असें दाखवून जास्त जलद चालावें. अगदीं घराजवळ आले असतां **निळकंठभाई** त्रासून ओरडला 'काय हे दुष्ट आहेत ? काय तें एकदाचें मला कळवा. तुमचे कान फुटले कां ? मी इतका कंठशोष करीत आहे, तरी तुम्ही ऐकत नाहीं. रे **मोहन्या** बोलतोस कीं नाहीं ?' अति वाईट वाटून **मोहन** म्हणाला 'आपण घरीं आलों' आणि लागलीच दार ठोठावूं लागला; व **गोविंदराव** एका बाजूस उभा राहिला.

दार ठोठावण्याचा आवाज ऐकूं आल्या बरोबर **माणेकभाई** हातांतील फांसे टाकून जवळच्या दोघांस म्हणाला 'करा गोळा तें सर्व सामान, आणि टाका त्या फडताळांत. झोंपेचें मिष घेऊन पडले रहा बरें. **बेचर** मंडळीला घेऊन आलासें वाटतें. एकटा **बेचर** आला असला, तर त्याला फिरून शोधाला म्हणून पिटाळूं आणि मग आपला खेळ आहेच.' नंतर हातांत दिवा घेऊन त्यानें दार उघडिलें व **मोहना**ला पाहतांच म्हटलें 'अरे **बेचर**, इतका वेळ तुला कशानें लागला ? कां पोळाचें दार बंद केलें होतें ? अरे, मला कोण काळजी लागली आहे.' इतक्यांत त्याचें चऱ्हाट मध्येंच बंद करून **मोहन** रागानें म्हणाला 'बरें, वाटेंतून दूर व्हा. मी तो **मोहन**.' आणि आंत शिरून पाठीमागल्या मार्डीवर **निळकंठभाई**स घेऊन गेला. लागोपाट दरवडेखोराची मोटकुळी घेऊन **गोविंदराव**ही आंत गेला, व त्यानें दार लाविलें. त्यास पाहतांच **माणेकभाई** कळकळ दाखवून म्हणाला 'कांहो **गोविंदराव**, काय झालें तें सर्व सांगा. **भाईंना** हें काय झालें ? आमची ती कोठें आहे ? मला वरघोड्याला गेलेले लोक सांगत आले कीं, घाला आला. म्हणून लागलीच मी ते परत आलेले गडी **बेचर**बरोबर देऊन शोध करावयाला पाठविले; आणि आतां येतील मग येतील अशी काळजी करीत घरांत कोणीं असावें म्हणून बसलों आहे. बरें हा कोण ?'

**गोविंदरावा**नें सर्व सांगून म्हटलें 'चला, **निळकंठभाईं**ना लागलें आहे, त्यांना औषधपाणी केलें पाहिजे. तेथपावेतों ह्या हरामखोराला माजघरांत असाच बांधलेला ठेवून देऊं.' असें म्हणून व **माणेकभाई**ला घेऊन तो वर गेला.

**मोहना**नें दिवा लावून कांहीं मलम **निळकंठभाई**च्या डोक्याला लाविलें. त्याचा तर एक सारखा विचारण्याचा सपाटा चालला होता 'माझी **जयलक्ष्मी** कोठें आहे ? त्या दुष्टांपैकीं कोणी सांपडलें कां ? **माणेकभाई** शोध करून केव्हां परत आला ? **आनंदशंकर** वाट चुकला वाटतें. त्याला कोणीं पाहिलें कां ?' इतक्यांत **माणेकभाई** व **गोविंदराव** वर आलेसें पाहून त्यानें विचारिलें '**जयलक्ष्मी** सांपडली कां ?

**माणेकभाईनें** तोंड वेंगाडून 'नाहीं हो आली, तिला कोठें टाकिली?' असें विव्हळत उत्तर दिलें. मग काय, एकच कल्होळ. इतका वेळपावेतों **निळकंठभाई** कसा तरी धीर धरून होता, पण जांवयाच्या तोंडचे असे शब्द कानीं पडतांच मोठा गळा काढून तो रडायाला लागला. त्यानें रडें दावण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो सर्व निष्फळ झाला. एखाद्या नदीला पावसाळ्यांत महापूर आला, म्हणजे तो मोठे मोठे वृक्ष व मातीचे बांध जें पुढें येईल तें चट समूळ उपटून किंवा फोडून टाकितो, तद्वत् **निळकंठभाईची** स्वाभाविक शांतता ह्या अकस्मात दैवकोपामुळें लयास गेली. तो संतापून ह्मणाला 'अरे अधमानो, माझ्या हरिणीसारख्या गरीब बाळीला तुम्हीं कां घेऊन गेलां? तिनें काय तुमचें वाईट केलें हातें? जी कधींही कोणाला एक शब्दसुद्धां लावून बोलणार नाहीं, ती तुमची रे नीचानो कशी वैरीण झाली. जिला कधीं परपुरुषाचें तोंड माहीत नाहीं, ती तुम्हां चांडाळांपुढें काय बोलेल? अरेरे, ह्या वेळेस जर ते दुष्ट माझ्यापुढें असते, तर त्यांना जिवंत चिरले असते. (थोडा शांत होऊन) नाहीं, पण त्यांना तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे? हा ईश्वराचाच कोप, तेथें दुसऱ्याचें काय चालणार? प्रभूच्या जर मनांत नसतें, तर दुष्टांना तशी वाईट बुद्धि कां म्हणून झाली असती? छेः छेः मी चुकलों, हे प्रभो क्षमा कर. मी तुला दोष देत होतों, पण माझे अपराध तूं पोटांत घाल. माझेंच पूर्व जन्मींचें दुष्कृत मला आतां भोंवतें आहे. मींच कधीं पूर्वजन्मीं कोणाचें तरी एकुलतें एक मूल नेलें असेल, म्हणून मला हें सोसावें लागतें. (दुःखावेशानें) अरेरे ती माझी एकुलतीच मुलगी होती ना? तिला सुख म्हणून मुळींच लागलें नाहीं. बिचारीची आई गेली, बहीण गेली, सर्व गेलें. मी कायतो एकटा तिला होतों, पण मीं तरी कधीं तिचे लाड पुरविले का? नाहीं. हाय हाय, काय करूं, कोठें जाऊं? अहो, **गोविंदराव,** अहो तुह्मी मला ती आणून द्या. मला ह्मातारपणीं तिच्यावांचून दुसरें कोणीहो नाहीं. मी तुह्माला माझी सर्व संपत्ति देईन. अहो ती फार सालस आहे. तुह्मांला संपति दिल्याबद्दल ती कधींही मला दोष लावणार नाहीं. दोष तिच्या स्वप्नींही येणार नाहीं. (मोहित होऊन) पण मी हें काय बोलतों. ती खालीं बोलत आहे वाटतें. अरे **आनंदशंकर,** उठ, ताई आली. तिला घेऊन ये जलदी पाहूं. **जयलक्ष्मी,** ये पाहूं जवळ. कितीहो माझी बा सुंदर आहे? नवरा आहे ह्मणून लाजूं नकोस. तुला मुलग होईल बरें—तुह्मी दोघे सुखी असा—सर्व लोक जमले वाटतें जेवायाला. **जयलक्ष्मी** ये मला एकदां तुझ्या तोंडावरून हात फिरवूं दे. अरे हाय, ती नाहीं. गेली. कोणी नेली? मला द्या ती. पैसे पाहिजेत? घ्या ते. माझा जीव पाहिजे? घ्या तो, पण तिची भेट करवा आणि मग पाहिजे तें घ्या. (दांतओंठ खाऊन) अरे मांगानो, तुह्मांला तिच्या ओरडण्याची कांहींच का दया आली नाहीं? तुमचें निसंतान होईल. तुह्मी सडून मराल. माझा ह्माताऱ्याचा शाप तुह्माला भोंवेल. तिचे दागिन्यांसाठीं कां इतकें तुह्मीं नीच

काम केलें? मजजवळ मागावयाचे होते, मीं ते दिले असते. पण दागिन्यांसाठीं नसेल! तर काय तिच्यासाठीं? ह्या पवित्र नागरकुलांत जन्म घेतलेली जी सती तिचा तुझी अभिलाष धरितां? तिच्या शापानें दग्ध व्हाल हें तुझांला माहीत नाहीं? रे **माणेकभाई**, असा काय बायकोसारखा बसलास? उठ आणि आपल्या पत्नीची लाज राख. **मोहन**,माझी तरवार आण, आणि त्या पवित्र देहाला विटाळून टाकणाऱ्यांला शोधून काढून त्यांना, अत्युच्च जे आह्मी नागर ब्राह्मण, ते आपल्या नाजूक स्त्रियांच्या पातिव्रत्या-विषयीं किती कळकळ बाळगितात हें दाखवितों. तरवार आणतोस कीं नाहीं? मला वाटतें तुझें व ह्या लुच्या **गोविंदरावाचें** ह्यांत कांहीं अंग आहे. मी पुष्कळ दिवस ऐकत होतों कीं, हे मराठे फार विषयासक्त असतात, तें माझ्या प्रत्ययास आलें वाटतें. **माणेकभाई** पाहतोस काय? धर त्या दुष्टाला. तरीच ह्या दोघांनीं मला थापा देऊन जेथें तिला लपवून ठेविलें होतें तेथून आणिलें. **माणेकभाई**, ह्यांना मार. अरेरेरे **माणेकभाई**ला आपल्या बायकोविषयीं कांहींच त्वेष येत नाहीं! काय तुह्मी मला वेडे समजतां? मी ह्मातारा झालों ह्मणून काय झालें? (विचार करून) छत् छत् **यज्ञेश्वरशास्त्र्याचा गोविंदराव** कधींही असें करणार नाहीं. **गोविंदा**, मी तुझी क्षमा मागतों. पण ती नाहींचना. मी येथें रडत बसून तिची कशी सुटका होईल? तिला ते छळतील. छळतील, तर दुष्टांच्या नरडीचा घोंट घेईन.'

याप्रकारें शोक करीत असतां **मोहन** व **गोविंदराव** ह्यांचें हृदय अगदीं भडभडून गेलें. **माणेकभाई** सर्व लोकांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें रडत होता. सर्वांनीं **निळकंठभाई**ला समजावितां समजावितां शिकस्त केली, पण त्याचें देहभान गेल्यामुळें तो कांहीं केल्यानें ऐकेना. एकसारखें 'तिला सोडविण्यासाठीं मी जातों. मी मरेन, पण तिच्या देहाला कलंक लागूं देणार नाहीं' असें ह्मणत होता.

खरेंच आहे. ह्मातारपण हाच केवळ नैराश्यरूपी वैराण प्रदेश; त्यामध्यें तनयरूपी अंकुर; आणि ताच कोण्या दुष्टानें कोमेजवून किंवा खुडून टाकण्याचा यत्न केला, तर तो नैराश्य प्रदेश किती भयानक दिसेल बरें! अमावास्येच्या दिवशीं आकाश सजल मेघानीं व्याप्त असावें, आणि त्या वेळच्या निबिड अंधःकारांत एकाद्या झोंपडींतील लहानसा दिवा एकाद्या वाट चुकलेल्या पांथस्थास जसा अमूल्य ठेव्याप्रमाणें भासतो, तद्वत् एकुलतें एक मूल ह्मातान्याला असतें; आणि तोच दिवा जर कोण्या दुष्टानें जाणून बुजून मालविला,तर बाहेरही अंधःकार वृद्धिंगत होतो व पांथःस्थाच्या मनाच्या अंधःकाराची सीमाच झाली ह्मणावयाची. प्राणाहून प्रिय असा तरुण पति मरणोन्मुख पडला असतां जशी धृतनूतनकुचभारा मुग्धवधू दुःखित होते, तद्वत् किंबहुना अधिकच त्या वृद्धाची स्थिति दुःखप्रद व्हावयाची. कृपणास संचितधननाश, डोळशास चक्षुनाश, स्वदेशाभिमान्यास स्वातंत्र्यनाश हे जितके क्लेशप्रद असतात, तितके सर्व एक समयावच्छेदेंकरून बिचाऱ्या वृद्धापकालीं एकुलत्या एकच अपत्याचा नाश ऐकणारास

असतात. वरें, एकदाचें काय वाईट व्हायाचें असेल तें झालेलें ऐकिलें, म्हणजे मनाची क्षुब्ध वृत्ति शांत होते; पण तसें नसलें, म्हणजे मूल जिवंत तर नसेलना, तिचा देह दूषित तर केला नसेलना, तिचा. नाना प्रकारें छळ करतील का, असे नाना प्रकारें चिंतातरंग क्षुब्ध हृदयसागरांत हेलकावे घेऊं लागतात. विचाररूपी नौका ह्या अशा अघटित दुःखपर्वतावर आदळून शतशः विदीर्ण होते. आणि अशा वेळीं '**सुख पहातां जवापाडे। दुःख पर्वताएवढें**' अशी भगवद्भक्त **तुकोबाच्या** वाणीची आठवण होऊन संसार पराङ्मुखता प्राप्त होते. असो.

ह्या इकडे असा गोंधळ चालला असतां मध्येंच रस्त्यावरील दार कोणी खडखड वाजवीत आहे असें वाटून '**जयलक्ष्मी** आली वाटतें' असें **निळकंठभाई** उत्सुकतेनें म्हणाला. बाकीच्या तिघा जणांना दार वाजविलेलें मुळींच ऐकूं आलें नाहीं. लागलाच **मोहन** खालीं गेला व थोड्या वेळानें **आनंदशंकराला** वर घेऊन आला. **आनंदशंकराला** एकटाच आलेला पाहून **निळकंठभाई** अगदीं हताश झाला, परंतु शोकावेश बराच कमी झाल्यामुळें त्यानें गहिंवरून त्याला जवळ घेऊन विचारिलें 'बाळा, तूं इतका वेळ कोठें होतास? तुला कोणीं धरिलें होतें का?' **आनंदशंकरानें** रडत उत्तर दिलें 'ज्या वेळेस दंगा झाला त्या वेळेस आपले **सारभाई** आहेतना, ते माझा हात धरून वाटेंत भेटणारांना "दंगा होत आहे, तुम्ही हत्यारें घेऊन मदत करा" असें सांगत आपल्या घरीं आले. तेथें आम्ही बराच वेळ होतों. मग ते कंटाळून दोघा चौघा शेजाऱ्यांना बरोबर घेऊन शोधास म्हणून गेले, तों त्यांना वाटेंत आपला **बेचर** भेटला. त्यांनीं लागलेंच घरीं परत येऊन मला **बेचराचे** स्वाधीन केलें; व "मी जास्त शोध करून आतां येतों" असें ते म्हणाले. नंतर **बेचर** इकडे आला.' ह्या सर्व हकीकतींत **जयलक्ष्मी**विषयीं कांहीं माहिती नव्हती, म्हणून **निळकंठभाईचें** हृदय अगदीं फाटून गेलें; परंतु मुलाच्या तोंडाकडे पाहून त्यानें बराच वेळ धीर धरिला.पण जेव्हां का **आनंदशंकरानें** विचारिलें 'बाबा, ताई कोठें आहे?' तेव्हां बिचाऱ्या म्हाताऱ्याचें रडूं कोसळलें.त्याचा कंठ भरून आला. मुलाला पोटाशीं धरून, 'बाळा ताई गेली सोडून आपल्याला. आतां कसली ताई भेटते आपल्याला' असें तो पुष्कळ बोलला, व कांहीं वेळानें 'मी आतां तिच्या शोधास जातों' असें शांतपणानें म्हणाला.

ही वेळ बरी आहे असें जाणून **गोविंदरावानें** पकडून आणिलेल्या दरवडेखोराबद्दल **निळकंठभाईस** सांगितलें. त्यानें **मोहनाला** त्याला वर आणावयाला सांगून म्हटलें 'त्याच्याकडून कांहीं तरी सुगावा लागेल.' परंतु **मोहन** परत एकटाच आला, आणि सांगूं लागला 'तो मनुष्यही नाहीं व **बेचर** सांगतो कीं, **माणेकभाई** व त्यांचे दोघे मित्र हे थोड्या वेळापूर्वीं बाहेर गेले.' **गोविंदरावाला** हें थोडेसें चमत्कारिक वाटलें, परंतु तो कांहीं बोलणार, इतक्यांत **साराभाई** वर आला, आणि सांगूं लागला '**निळकंठभाई**, आपण कांहीं भिऊं नये. साधारण बराच सुगावा

लागला आहे. आपल्या **जयलक्ष्मीबाईची** पालखी जे पळवून नेत होते, त्यांना **रायपूरच्या** चौकीदाराच्या सांगण्यावरून कांहीं लोकांनीं अडविलें हल्लीं **जयलक्ष्मी** त्या दुष्टांच्या हातून सुटली आहे असें खास वाटतें. कारण मी घरीं पळत जात असतां वाटेंत कांहीं हत्यारबंद लोक दिवा घेऊन जातांना भेटले. ते मला सज्जन असावेसें वाटलें. त्यांनीं पळण्याचें कारण विचारितां मीं सांगितलें कीं, " एका नागर वरघोड्यावर घाला आला आहे, तर तुम्ही मेहरबानी करून सुटका करावयास जा." " आम्ही आतां तेथेंच जातों " असें म्हणून ते दिवा विझवून त्या बाजूला पळत गेले; आणि कांहीं लोकांनीं त्या भामट्यांना अडविलें म्हणून चौकीदार सांगतो, त्या अर्थी मला भेटलेले ते तेच लोक असावेत. तर आपण निष्काळजी असा. बाहेर शोध करायाला जाऊं नका, कारण आतां तोफ होईल; नंतर रहदारीची सक्त मनाई आहे. उद्यां सकाळीं सर्व शोध काढूं. मी इकडे येतांना **नानासाहेब कोतवाल** ह्यांस सर्व हकीकत कळविली, आणि तेही म्हणाले " माझा **निळकंठभाईंना** निरोप कळवा कीं, आपण अगदीं निष्काळजी असा. आपली मुलगी ती माझीच आहे असें मी समजतों. तिच्या एका केशालाही मी धक्का लागूं देणार नाहीं. मला सर्व लुच्चे लोकांचे अड्डे माहीत आहेत, आणि जर ती तेथें नसली तर दुसरीकडे कोठेंही ती असल्यास ती अगदीं माझ्या घरींच आहे असें समजा. सुमारें पाहटेच्या ४ घटकांच्या सुमारास मी तिला घेऊन स्वतः आपल्याला भेटावयास खास येतों." बरें तर मीही घरीं जातों; उगाच ती वाट पाहत काळजी करीत बसली असेल.'

**निळकंठभाईस** त्या माहितीमुळें बराच धीर आला. मग त्यानें **आनंदशंकराला** थापटीत अंथरुणावर निजविलें व **मोहनाला गोविंदरावाची** निजण्याची सोय करावयास सांगून आपण उशासींच विचार करीत बसला. **गोविंदरावही** मनुष्य कसा सुटून गेला ह्याविषयीं तर्क करीत बिछान्यावर बराच वेळ तळमळत पडला होता, व नंतर तसाच झोंपीं गेला.

## भाग ८ वा.

**कामुक होउन कां मुकतां परमार्थ सुखाला देहविका ।—रामजोशी ॥**

भाऊच्या पोळेंतील **नानासाहेब कोतवाल** ह्यांच्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरील एका बाजूच्या खोलींत तिघेजण सुमारें १ घटका रात्रीस दिव्याशीं बोलत बसले होते. त्यांपैकीं एक **नोकऱ्याच्या** थाटणीवरून दक्षणी असावा असा तर्क होई. हेच **नानासाहेबांचे** ज्येष्ठ चिरंजीव **बाबासाहेब**. हा वयानें तिशीच्या आंत असून मोठा ऐय्याश व दखणा होता पानें व तंबाखू ह्यांनीं ह्याचा बोकाणा नेहमी भरलेला असे.

**नानासाहेब**-अहो **बुलाखीदास**, तुम्ही तरी असें वेड्यासारखें काय करितां? करा **माणेकभाई**चें बोलणें कबूल, म्हणजे तुमच्यावरचें आलेलें कड्याळ टळेल. नाहीं तर पडाल फशीं.माझें ऐका तुम्ही,समजलां. **माणेकभाई** मागतात ते २००० रुपये उजाडण्यापूर्वी मजजवळ अनामत ठेवा, आणि त्यांनीं तो तुमचा-देव भला करो-**वेलजी** सोडला, म्हणजे मी ते रुपये त्यांच्या स्वाधीन करीन. म्हणजे मग सर्वच तंटा मिटला.

**बुलाखी**-अहो साहेब, आपणही असे म्हणूं लागला, तर माझा निभाव लागेल कसा? **माणेकभाई** काय सांगतो व आपण काय ऐकतां? एवढी मोठी रक्कम मी आणूं कोठून? आणि त्याच्या त्या बायकोबद्दल इतके रुपये! इतक्या रकमेनें तर मोठमोठ्या पतिव्रताही.—

**माणेकभाई**—खबरदार, **बुलाखी**, माझ्या बायकोविषयीं नालस्ती करशील तर. मुकाट्यानें रुपये आणून दे, नाहीं तर **कोतवालसाहेब** आहेत आणि तूं ही आहेस. माझ्या बायकोवर डोळा ठेवतो, आणि त्याबद्दल त्याजवर दया करून त्याचे पारिपत्याविषयीं यत्न न करितां त्याशीं अब्रू वांचवावी म्हणून खटपट करावी, तर ह्याला त्याची किंमत कोठें समजते?

**बुलाखी**—चल, मला आला आहे मोठा शिकवायला. ती वाईट चालीची होती, म्हणून तोहमत आणून तुझें नाक चिरून टाकीन. ठाऊक नाहीं वाटतें मी काय करीन तें? आणि फार कसल्या गमज्या करितोस? मला तो **वेलजी**ही माहीत नाहीं व ह्या घाल्यांत माझेंही कांहीं अंग नाहीं आणि फिरून जर माझें अंग आहे म्हणून बोललास, तर थोबाड फोडीन.

**बाबा०**—अहो शूर **बुलाखी**, माझ्या येथें मात्र मी कोणाचें थोबाड फोडूं देणार नाहीं. बाहेर जाऊन तुम्ही वाटेल तसा गोंधळ घाला. बरें पण जर **माणेकभाईनीं वेलजी** पुढें केला, तर तुम्ही सुटाल कसें तें एकदां सांगा पाहूं.

**बुला०**—हें त्यांत काय आहे. साहेबांच्या मेहरबानीनें. आपणच कळविलें कीं, हा **बलाखी** माझ्यायेथेंच संध्याकाळपासून होता तर माझें पुष्कळ काम होईल.

**माणेक०**-पण **वेलजी** आणखी एका-दोघांचीं नांवें सांगतो. कसेंही केलेंस तरी तूं सुटत नाहींस. तावडींत पक्का सांपडला आहेस. आपण बरेच दिवस एकमेकांना ओळखतों.

**बाबा०**—**वेलजी** आणखी दहांचीं का नांवें घेईना बापडा.माझ्या मनांत **बुलाखी**ला सोडवावयाचें असल्यास त्याच्यासारख्या कसपटांनीं कांहीं व्हावयाचें नाहीं;समजलांत **माणेकभाई**. बरें **बुलाखी**, असा ह्या कोंपऱ्यांत ये पाहूं. (कानांत हळूच) तूं कांहीं म्हण, पण तुझ्यावर मोठें संकट आलें आहे. बाबा तर तुझ्यावर अगदीं हत्यार पाजळून तयार आहेत. सांपडलास कीं पुरे, घालतीलच पक्क्या गोत्यांत. तर संभाळून ऐस व **माणेकभाई**चें बोलणें कबूल कर. तो कांहीं बावग मागत नाहीं. आणि नंतर त्याजवळून ते पैसे कोणत्याही रितीनें उगवून घे, म्हणजे झालें. **सटवाजीरावा**सारख्या हलकट मनुष्यावर हवाला ठेविलास

हा एक मूर्खपणा. दुसरें हें काम पैशानें साध्य असतां बळजोरीनें तडीस नेऊं लागलास हा दुसरा मूर्खपणा. **निळकंठभाई** काय करितो विचारा चांगले पैसे चारिले असतेस, तर सर्व कांहीं बिनधोक मनासारखं पार पडलें असतें. बरें असो, एकदां गोष्ट हातांतून गेली ती गेली पण आतां तरी खबरदारी ठेव व सुटका करून घे. माझ्यावरती विश्वास ठेवशील तर फसशील! कारण तो न्यायाधीश असला खडतर आहे कीं, माझ्या मनांतलें सर्व तूं जें काहीं सांगितलेंस, तें विचारविचारून काढून घेईल. आणि मग पस्तावशील. तर असें कांहीं करूं नकोस. माझें ऐक, ( ऐकत नाहींसें पाहून ) नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे संभाळ; येथल्या येथें कैद करीन व बाबांना कळवीन कीं, घाला घालणारा मुख्य सांपडला.

**बुला०**–( मनांत ) ह्यांना सर्व कळविलें ह्मणून घात झाला. हा बटकीचा **माणेकभाई** येथें कशाला आला, कोण जाणे. नाहीं तर **वेलजी** काय सांगतो व मी काय फसतो. आतां **माणेकभाई** तर **बाबासाहेबांना** न्यायाधिशापुढें नेल्याखेरीज राहणार नाहींत आणि नेल्यास ह्यांची अशी धमकी ह्मणून ( मोठ्यानें ) बरें, मी आतां घरीं जाऊन तितके रुपये आपल्या मनुष्याबरोबर पाठवून देतों. मग पुढचें आपल्याकडेसच. ( **माणेकभाई**कडे वळून ) **भाईसाहेब** एकादा अधिक उणा शब्द गेला असल्यास मनांत राग धरूं नका बरें. माझ्या हातून मोठा प्रमाद घडत होता; परंतु कर्मधर्मसंयोगानें आपल्यासारख्या मित्राच्या पत्नीविषयीं माझी वाईट इच्छा सफल झाली नाहीं, ह्यामुळें पश्चात्ताप होऊन फार आनंद वाटत आहे. त्या बाई आपल्या पत्नी आहेत अशी माझी पक्की खात्री असती, तर असें कधींही झालें नसतें. बरें पण गुन्हा माफ ना?

**माणेक०**—माफी ती काय मागावयाची आहे? तुमच्या मनांत जर माझ्याच बायकोविषयीं कांहीं काळेंबेरें नव्हतें, आणि माझी बायको ती जर तुम्ही दुसऱ्याच कोणाची बायको होती असें समजलां होतां, तर त्यांत तुमच्या मनांत मजसंबंधीं पाप मुळींच नव्हतें. रकम पोंचती झाली कीं, मी **वेलजी** सोडलाच. त्याबद्दल अगदीं बिनधास्त असा. ( मनांत ) काय बेटा मला फसवूं पहात आहे? तुमचीच ती बायको असती असें मला माहीत असतें काय... सगळा लुच्चांचा बाजार. त्याला वाटतें कीं, मी जसा कांहीं बोळ्यानें दूध पितों. असो आपल्याला काय, दोन हजार रुपये मिळाले. हा आयताच फायदा.

**बुलाखी**बरोबर आपला गडी देऊन **बाबासाहेब** पुनः वर आले आणि ह्मणाले ' काय लुच्चा, माझें ऐकत नव्हता. पण जेव्हां का थोडें जमदग्नीस्वरूप दाखविलें, तेव्हां पडली नांगी थंड. बरें **माणेकभाई** तुमचें काम झालेंना?'

**माणेक०**—( हर्षानें ) आपल्यासारख्यांचं हातीं काम पडल्यावर तें तडीस गेल्याशिवाय राहील कीं काय? आपले मोठे मजवर उपकार झाले आहेत, तर त्याचा उतराई केव्हां व कसा होईन, कोण जाणे.

**बाबा०**—उपकाराचें राहूं द्या. एकमेकांच्या उपयोगी अडचणीच्या वेळीं पडूं नये

तर मानुषकी ती काय राहिली. असो, तुम्ही रुपये घेऊन जा,व त्या मनुष्याला सोडून द्या. नानासाहेबांना मात्र वाटेंत भेटूं नका. ते शोध करीत वाटेनें हिंडत आहत. थोड्या वेळानें तोफ होईल व पोळांचे दरवाजे बंद होतील. तो मनुष्य आलासें वाटलें. मधून मधून येत जा बरें. व तुमच्या पत्नी बऱ्या झाल्या, म्हणजे आमच्या तिला एकदां भेटवा. मघांशीं जेव्हां तिनें वरघोड्यावर घाला आला म्हणून ऐकिलें तेव्हांपासून 'ती कोण होती, सुटली कां,'असें विचार विचारून माझा अगदीं पिच्छा पुरविला आहे. जयजय. ( तो गेल्यावर मनांत ) ह्या कार्यापासून बहुतकरून मला मौजच होईल.

इकडे माणेकभाई रुपये घेऊन घरीं आला व तळघरांत जाऊन हळूच बेलजोस मोकळा करून बाबासाहेबांच्या गळ्यासमक्ष त्यानें त्यास बाहेर लावून दिलें. नंतर पोळाचीं व घरचीं दारें बेचरास बंद करावयास सांगून तो घरीं आला; व ते रुपये तळघरांत पुरून आपण सासऱ्याच्या भेटीस वर गेला, व 'तिचा पुष्कळ शोध केला, पण ती दुष्टांच्या हातून सुटली ह्याशिवाय जास्त कांहीं माहिती मिळत नाहीं, पण नानासाहेब कोतवाल शहरांतून शोध करीत हिंडत आहेत' असें त्यानें सांगितलें. सासऱ्यानें 'बरें माणेकभाई, तुम्हाला तर फारच यातायात सोसावी लागली. तुम्ही थकलां आहां, म्हणून जाऊन निजा. ईश्वरकृपेनें सर्व कांहीं ठीक होईल.' असें म्हटलें. नंतर लागलीच कांहीं पळांनीं रात्रीच्या ११ घटकेस तोफ झाली, व चोहोंकडच्या पोळांचे दरवाजे रखवालदारांनीं बंद केले.

ह्या वेळेस प्रत्येक नागर ब्राम्हणाच्या घरांत घाल्याविषयीं बोलणीं चाललीं होतीं. बराच वेळपर्यंत कोणालाही झोंप म्हणून लागली नाहीं. कांहीं कांहीं घरांत तरुण मुली एके ठिकाणीं जमून 'जयलक्ष्मीला कोण घेऊन गेला असेल? तो सुंदर असेल नाहीं बरें? तो दक्षणी असेल कां गुजराथी? कांग संजूबा, तुला अशी नेली असती, तर तूं काय केलें असतेस?' असें एकमेकींत बोलत व एकमेकींची थट्टा करीत व मध्येंच मांजरानें किंवा उंदरानें खुडबुड आवाज केला कीं, भिऊन अगदीं गप्प राहून एकमेकींच्या गळ्याला घट्ट मिठ्या मारीत. दीपप्रकाशांत त्या तरुणी सुवर्णमयलता एकमेकांमध्यें खिळून झालेल्या जाळीप्रमाणें शोभत होत्या; किंवा पीतसरोवरांत ह्या पुंडरीकसमुदाय कीं काय अशा भासल्या. एकट्या मुखचंद्राची बरोबरी करितां करितां फजिती पावलेला जो गगनचंद्र तो जणू इतक्या मुखचंद्रांशीं सामना केला असतां पाठच दाखवावी लागेल, ह्या भीतीनें कृष्णपक्षाचें मीष करून अंतर्धान पावला; किंवा तो आपल्या अंतःपुरांतील तारकापत्नींना कंटाळून मानुषी परंतु अमानुष लावण्याच्या नागर स्त्रियांना भुलून त्यांच्या मुखांचा वियोग न व्हावा म्हणून त्या मुखांमध्यें सदैव राहता झाला; अथवा इतक्या सुवर्णकमलांची प्रभा एकवटून त्या दीपाच्या ज्योतीच्या मिषानें ती दरस्थ लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आली. कांहीं वृद्धबाया जमून बोलत होत्या 'काय मुलींनीं गडबड

मांडली आहे? पुरुषांचा तरी काय दोष? ह्याच नानाप्रकारचे चाळे करितात आणि त्यांचें मन हरतात, आणि मग ते त्यांना मिळविण्याविषयीं असली दंधे खटपट करितात. आपण जेव्हां लहान होतों, तेव्हां बाई आपल्याला नाहीं माहीत असले ढंग. आतां काय, देव नाहीं, धर्म नाहीं; पाहिजे तसें खिदळावें, कोणी रस्त्यानें जात असल्यास त्याच्याकडे निर्लज्जपणानें पाहावें. आणि मग असले परिणाम. बिचाऱ्या म्हाताऱ्या आईबापाची परवड. पोरी झाल्य म्हणून काय झालें. आम्ही नव्हतों कां कधीं पोरी? तो डावा हातच वर कर, वरतीच मुरडून पहा, इत्यादि चाळे पाहिजेत कशाला? आम्हाला नाहीं कोणी भुलत ते? जशा ह्याच कांहीं मोठ्या सजतात. पण आम्ही ह्यांच्या सारख्या गांवभर नागव्या नाहीं नाचत.' त्यांपैकीं एक कुरूपसी उतार वयाची विधवा म्हणते 'बाई काय सांगू? पण बाई मला लाज वाटते. तो मेला आपल्या समोरचा **गौरीशंकर**, तो माझ्याकडे पाहूं लागला. त्याला बाई काय म्हणून ह्या पोरी स्वरूपवान म्हणतात कोण जाणे? मी चवताळून त्याच्या अंगावर गेलें. म्हटलें "मेल्या, डोळे फोडून टाकीन. दुसऱ्यांच्या सुंदर स्त्रियांकडे कां पाहण्याकरितां डोळे केले आहेत?" इतक्यांत त्यापलीकडच्या खोलींतल्या मुलींनीं हें ऐकिलें आणि एकदम खो खो हसत त्या आंत आल्या. त्यांपैकीं **संजूबा** म्हणाली 'ओहो **बालालक्ष्मी, गौरीशंकर** तुमच्याकडे पाहत होता हें हो तुम्हाला कसें उमजलें? (ह मान मुरडून) तो स्वरूपवान नाहीं का?'

**बालालक्ष्मी** खरोखरी चवताळून म्हणाली 'उगी बस, चहाटळ नाहीं तर. मोठ्या बायांमध्यें तुमच्यासारख्या टवळ्यांनीं कशाला तोंड घालावें? असला तो स्वरूपवान तर पहा त्याच्याकडे, म्हणजे नवरा पाठच फोडील. काय निलाजरी, (**संजूबा**सारिखा कोमल स्वर काढण्याचा यत्न करून) म्हणे "तो स्वरूपवान नाहीं का?" हें ऐकल्याबरोबर सर्व बाया अतिशय हंसूं लागल्या व **संजूबा** आपल्या जवळच्या मुलीच्या कानाशीं लागून व नंतर तिच्या तोंडाशीं तोंड नेऊन मोठ्यानें म्हणाली 'समजलीस, पण तो ऐकेना'. ह्यामुळें तर सर्व मुलींनीं **बालालक्ष्मी**भोंवतीं एकच गोंधळ केला. **बालालक्ष्मी** अतिशय रागावून हातपाय आपटीत निजावयाला म्हणून खोलींत गेली, व ओक्साबोक्सी रडत 'ती द्वाड कारटी **संजूबा** कोठून पाहत होती, कोण जाणे. चुलींत कां नाहीं तडफडली' असें पुटपुटली.

कोणे घरीं तरुणजन जमून हें कसें झालें असेल, ह्याविषयीं विचार करीत व **जयलक्ष्मी**च्या सौंदर्याची वाखाणणी करीत होते. कांहीं वृद्ध 'ह्या राज्यांत असला जुलूम. काय म्हणावें ह्याला. राज्यकर्ते तर हिंदू म्हणवितात आणि असली बेबंदशाही. यावनी असती तर गोष्ट निराळी. काळ बदलला' असें म्हणत होते. तसेंच कांहीं वृद्ध भिक्षुक म्हणत होते 'आजचें आयतें उत्तम भोजन बुडालें. काय ह्या वेळेलाच धाल्याची धाड ओढून आली, कोण जाणे.'

पाहटेच्या सुमारास **निळकंठभाईस** थोडा डोळा लागत होता, इतक्यांत गो-

ळेच्या दाराशीं कोणी खडखड वाजवीत आहे असें वाटलें. लागलेंच त्यानें **मोहनास** उठवून रखवालदाराला दार उघडण्याबद्दल सांगायाला सांगितलें, व आपण **आनंदशंकरास** थंडी न लागावी ह्मणून विसकटलेलें पांघरूण नीट साफ अंगावरून घालून खालीं आला. उत्कंठेमुळें त्याचा जीव अगदीं ओंठापर्यंत आला होता. इतक्यांत **नानासाहेब कोतवाल** एका मनुष्यास घेऊन आंत आले. **जयलक्ष्मी**ला पाहिलें नाहीं ह्मणून पहिल्यानें तर **निळकंठभाई**ची कंबर खचली; परंतु **नानासाहेबांचे** तोंडचे शब्द ऐकतांच त्याच्या जीवांत जीव आला. **कोतवाल** ह्मणाले '**जयलक्ष्मी** खुशाल आहे हो **निळकंठभाई**. आतां सर्व धास्ती सोडून द्या. ज्यांनीं तिला त्या दुष्टांचे हातून सोडविली, ते हे **हरिसिंह**.' हें ऐकतांच मरणोन्मुखास संजीवनी, त्याप्रमाणें **निळकंठभाईस** झालें. त्यानें येऊन **हरिसिंगाचे** हात धरिले आणि सद्गदीत होऊन ह्मटलें 'आपण मला कन्यादान केलें. आपले उपकार जन्मोजन्मीं फिटणार नाहींत' ती कशी सोडविली हें थोडक्यांत सांगून **हरिसिंग** ह्मणाला 'आपल्याला त्या बाईच्या भेटीकरितांच ह्मणून घेऊन जाण्यासाठीं मी येत होतों. इतक्यांत आपली चौकसी करीत असतां मला ह्यांनीं पाहिलें व लागलीच मला ते जलदी येथें घेऊन आले. आपण आतां स्नान करून तो कोण **आनंदशंकर** नांवाचा मुलगा आहे त्याला घेऊन चलावें, ह्मणजे भेटीचा लाभ होईल.' बिचारा **निळकंठभाई** आनंदानें अगदीं भांबावून गेला. त्याला सांगायाचाच उशीर होता. त्यानें घरांतल्या सर्व मंडळीला उठवून '**जयलक्ष्मी**ला भेटायाला चला' असें सांगितलें, व त्या आनंदाच्या लहरींत तिलाच कां आणिलें नाहीं असें विचारितां 'रात्र होती ह्मणून नाहीं' हें उत्तर मिळतांच तो समाधान पावला. 'बरें स्नानाशिवाय आलें तर काय चिंता आहे? मी तसाच येतों. ही मंडळी पाठीमागून येईल.' असें तो ह्मणाला; पण **कोतवाल** ह्मणाले 'सर्व मंडळींनीं जायाला कांहीं नको. **आनंदशंकर** व तुह्मी दोघेजण जा. स्नान करा, नाहीं तर तिला तुमची जखम व रडून सुजलेले डोळे पाहून जास्त वाईट वाटेल. बरें तर मी जातों व दुपारून त्याविषयीं चौकशी करीं.'

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

# भाग १ वा.

## संमेलन.

**रायपुरां**तील **भाटवाड्यांत सुरजमल्ल** भाटाच्या घरीं अगदीं पहाटेस मोठी गडबड चालली होती असें दिसत होतें. घरांतील सर्व मंडळी जागी होती. पुढल्या माडीवर अंथरुणें गोळाकरून दोन तरुण पुरुष एक जाजम पसरीत होते; त्यांपैकीं एक जण ह्मणाला-कांरे **केसरीसिंग** तुला झोंप लागली होती का रात्रीं ? मला तर त्या बाईच्या किंकाळ्या ऐकून मुळींच डोळा लागला नाहीं. आपण होतों ह्मणून तरी तिची सुटका झाली. नाहीं तर त्या बिचारीची हेलना त्या चांडाळांनीं केली असती. बरें **हरिसिंग** गेला तो अजून तिच्या बापाला कसा नाहीं घेऊन आला ! एकदां तिची व तिच्या बापाची दृष्टादृष्ट झाली ह्मणजे बराच गोंधळ मिटेल, नाहीं बरें ?

**केसरीसिंग**-मला नाहीं वाटत हें रामायण इतक्यांच आटपेलसें मला वहिनी आतांच सांगत होती कीं, तिला रात्रभर मुळींच डोळा लागला नाहीं. मध्येंच ती खदखद हंसे; नंतर हातवारे करी; कधीं मोठ्यानें किंकाळ्या फोडी. आतां तर तिच्या अंगांत सपाटून ताप भरला आहे व मधून मधून ती कांहींसें बरळते. काय सांगू, **माधोसिंग**, रात्रभर तिच्याजवळ तुझी आई बसली होती व आह्मी बाहेर कांहीं वेळ ऐकत उभे होतों. पण ती शुद्धीवर मुळींच नव्हती. तिचें तें हंसणें व लागलेंच रडणें ऐकून मला तर मोठी भीति वाटली. तूं निजायाला गेल्यानंतर मी अर्धं घटका भाऊशीं बोलत उभा होतों इतक्यांत-( मध्येंच थांबतो ).

**माधोसिंग** ( उत्सुकतेनें )-मग काय झालें ? तुझ्या सांगण्यावरून तर तिला भूत लागलें असावेंसें वाटतें. तुला काय वाटतें ?

**केसरीसिंग**-हिला बाधा झाली अशी माझी केव्हांच खात्री होऊन चुकली होती. कारण तूं नाहीं का पाहिलेस तिचे ते कावरेबावरे डोळे; आणि जेव्हां तिच्या तोंडांतून वहिनीनें बोळा काढला त्यासरशीं तिची ती किंकाळी ऐकून मला डवडवून घाम आला, आणि वहिनी तर पडलीच होती, परंतु तुझ्या आईनें सांवरिली. बरें, काय सांगत होतों तें ? हो, भाऊन् मी तसे बाहेर उभे होतों, इतक्यांत वहिनी धावऱ्या धावऱ्या बाहेर आली, आणि कांपत ह्मणाली ' भावोजी आंत या, त्या कांहीं आम्हाला ऐकत नाहींत. ' आम्ही लागलीच आंत गेलों नि पाहतों तों---

**माधोसिंग** वयानें लहान होता, ह्मणून भिऊन **केसरीसिंगा**जवळ येऊन दबलेल्या आवाजानें ह्मणाला-मग.

**केसरीसिंग**-तिचे केश मोकळे पाठीवर पडले होते, डोळे ताठलेले, आणि उभी राहून ती पळण्याच्या आवेशांत होती. आम्ही लगेच तिचे जाऊन हात धरिले. परंतु

का॑धा दोघांनाही ऐकेना. नंतर आम्ही
श॑अनन्च निजविलें, व वहिनीनें तिच्या
त्व॒रवर थंड पाणी टाकिलें. तुझी आई
धा ॊगली, कीं हा झटका कशाचा आहे
॑ह्योण्यासाठीं तो हरीलाल पंचाक्षरी
.ग॒वा. पण भाऊ ह्मणाला ' तें कांहीं
.प्रम॒ ती झ्याली आहे. थोड्यावेळानें
.ग ॊध होईल. ती पळून जायाला लागली
॒ार मला बोलवा.' नंतर आम्ही इकडे
॑आलों. पण खरेंच सांगू का, ती त्यावेळीं
॑फार चांगली दिसत होती. तिच्या चेह-
ऱ्यावर एका प्रकारचा तजेला होता ह्मणून
सगन मधून मला वाटे कीं, भूत लागलें
रस्सितें, तर तिच्या तोंडावर इतकी टव-
टवी नसती. मग काय असेल कोण जाणे.
चोरू कांहीं ह्मण पण तिचे आळोकेपिळोके व
पुरें, काळया ऐकून अंथरुणावर पडल्यावर
ऱ्हाव॒ एकाएकीं रडूं कोसळलें. वहिनी तर
॑कसारखी आसू गाळीतच होती. फार
काय, पण भाऊचासुद्धां ओंठ हलतांना पा-
हिला, आणि मी त्याकडे बघत आहें असें
पाहिल्याबरोबर आपल्या डोळयावरून एक-
दोनदां त्यानें हात फिरविला.

**माधोसिंग**–मज्या मनांत पुष्कळ तेथें यावयाचें होतें, परंतु मला त्या किंकाळया ऐकून जें कांहीं भडभडून आलें तें कांहीं विचारूं नकोस. पण ही भूतबाधा असली तर मात्र त्या बिचाऱ्या बापाच्या येण्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं. बरें पण ती **दिवाळी** सुईणरे मघाशीं कशाला आली ?

**केसरीसिंग**–तुला काय त्याच्याशीं करावयाचें आहे ? हो, खालीं भाऊ आलासें वाटतें. चल अगदीं उजाडलें आहे, तर हा दिवा टाक मालवून. समजलास का, पण ह्यासंबंधीं शेजारापाजाऱ्याजवळ कांहीं बडबडूं नकोस, बरें का.

लागलेंच **हरिसिंगानें निळकंठभाईस** वर आणून बसविलें व आपण आंत गेला. ह्यांच्याबरोबर **आनंदशंकरही** आला होता. परत येऊन **हरिसिंग** ह्मणाला ' बाईना आतांच कोठें डोळा लागला आहे तर–' **निळकंठभाईनें** घाईघाईनें उत्तर दिलें ' तर मग मी वाट पहात बसतों. जागी झाली कीं मला कळवा.' आपण आंत गेलों असतां आपल्या चित्तवृत्ति स्वाधीन राहणार नाहींत अशी **निळकंठभाईची** खात्री होती, ह्मणून तो तसाच **आनंदशंकराला** जवळ घेऊन **हरिसिंगाशीं** बोलत बसला. एके बाजूला **केसरीसिंग** व **माधोसिंग** ह्या दोघांना पाहात उभे होते. त्यांना पाहून ' हे कोण ' असें **निळकंठभाईनें** विचारिलें. **हरिसिंगानें केसरीसिंगाकडे** बोट दाखवून उत्तर दिलें ' हा माझा धाकटा भाऊ **केसरीसिंग** व ( **माधोसिंगाला** बोलावून ) हा चुलतभाऊ **माधोसिंग**. हे दोघेजण काल माझ्याबरोबर होते'. **निळकंठभाईनें** त्या दोघांना आपल्याजवळ आणून बसविलें व त्यांची वाखाणणी केली.

हें घर **हरिसिंगाचा** काका **सुरजमल** ह्याचें होतें. चुलता मरून बरींच वर्षे झालीं होतीं. आतां काय ती चुलती, तिचा मुलगा **माधोसिंग**, हे दोघे भाऊ व थोरल्याची बायको एवढींच कायतीं माणसें होतीं. हे जातीचे भाट होते, रजपूत

राजेरजवाड्यांची वंशावळ व त्यांची कीर्ति हे भाट रास किंवा पोवाडे करून गातात. हे आपल्यास रजपूत ह्मणवितात. भाट लोकांसमक्ष दिलेलें अभिवचन राजांना बहुतकरून तडीस न्यावेंच लागे. भाटांनीं दिलेले अभयदान पक्कें खात्रीचें, मग शत्रु बलाढ्य असला तरी अभयदान दिलेल्या मनुष्याच्या केशालासुद्धां धक्का त्याच्यानें लाववत नसे. भाटाच्या शरीराला यत्किंचितही दुखापत झाली असतां सूर्यनारायण कोपेल ह्या भीतीनें त्यांनीं धरणें घेतलें असतां त्यांच्या सर्व अटी लोकांस कबूल कराव्या लागत. हे कधीं कधीं आपला अभिशाप शत्रूला लागावा म्हणून त्रागा ( आत्महत्या ) नांवाचा असुरी उपाय करीत. त्यांच्यासमक्ष झालेले सर्व व्यवहार व वचनें त्यांच्या शापाला भिऊन लोक मोडीत नसत; ह्यामुळें चोहोंकडे बंडाळी होती तेव्हां रयतेला त्यांचा पुष्कळ उपयोग होत असे. **नासिक**चे उपाध्ये किंवा गयावळ ह्यांच्याजवळ जशा वह्या असतात, तशा रजपूत घराण्यासंबंधी वह्या त्यांजपाशीं असतात. आपल्या यजमानांच्या गांठी घेण्यासाठीं हे पावसाळयानंतर त्यांच्या गांवीं जातात, व उभ्या वर्षांत जे कांहीं फेरफार झाले असतील ते आपल्या वहींत नोंदून ठेवितात. प्रत्येक भाटाजवळ कट्यार ही असावयाचीच.

त्यावेळीं **हरिसिंग** सुमारें २६-२७ वर्षांचा होता. त्याचा वर्ण गोरा होता. हा हाडापेरानें बळकट व शरीरानें भिप्पाड होता. हा फार तेजस्वी दिसत असे. त्यानें आपली दाढी हनवटीच्या मधोमध दुभागून दोहों बाजूला साफ विंचरून नीटने होती. त्याच्या मिशा मोठ्या होत्या. त्याच्या नाकाडोळ्याची ठेव रेखलेली होती, त्यामुळें व त्याच्य कपाळामुळें हा मोठा सुरेख व भव्य असे; फक्त त्याच्या डाव्या डोळ जखमेचा आडवा वण होता. त्याची रुंद व भरलेली, बाहू पिळवटलेले ० गर्दन मांज्या व पोटऱ्या भरलेल्या हो त्याचें तें विशाळ व तालमीनें कसलेलें शरी तो चेहऱ्याचा नीटसपणा व पाणी आ एकंदर बोलण्याची ऐट–त्यांवरून हा के मोठा हुद्देदार स्वपराक्रमानें मोठ्या योग व नांवालौकिकाला चढला आहे असें व खरोखरच हा आपल्या नांवाला शोभवी. इष्टमित्रांस, दीनांस व दुःखापन्नांस शायी **हरि**प्रमाणें रक्षणकर्ता, व इ दुष्टांस व मदोद्धतांस वनविहारी सिंह णेंच होता. त्याच्या शुभ्र कपाळाच्या वि लतेला भुलून कीर्तीनें तेथें वास्तव्य केलें पौरुषाचें प्रधान जें शौर्य त्यानें युक्त असा हा देहधारी मदनच. त्याच्या मुखकांतीनें सूर्यप्रकाशवत् अधमांचे डोळे दिपत व कौमुदीवत् सज्जनांच्या मनाला आल्हाद होत असे. हा **हरिश्चंद्रा**प्रमाणें वचन पाळणारा, **युधिष्ठिरा**प्रमाणें सत्यवक्ता, भगवान् श्री**रामचंद्रा**प्रमाणें (परस्त्रीविषयीं पराङ्मुख) एकपत्नीव्रत आचरणारा, **भीमा**प्रमाणें साहसी परंतु **परशुरामा**प्रमाणें कोपवश असा होता. त्याच्या गंभीर हृदयाला पाहून सर्व क्षुद्र प्राण्यांच्या हृदयांला कांपविणारी जी भीति ती स्वतः धडकी भरून पलायन करिती झाली. कसाही बिकट प्रसंग आला तरी हा डगमगणारा नव्हता.

धाकटा भाऊ **केसरीसिंग**ही अनुरूप होता. तो वयानें सुमारें ्चा होता. तो बांध्यानें वडील ां ठेंगणा व एकंदरीनें त्यापेक्षां जास्त होता. परंतु हे दोघेजण **अश्वि** **.रा**प्रमाणें सौंदर्यानें, व **रामकृ** प्रमाणें बंधुत्वानें शोभत होते. **माधो** **.** हा **आनंदशंकरा**पेक्षां दोन वर्षांनें । होता. त्याला नुक्ती मिसुर फुटत ोती. तो स्वरूपानें मध्यम होता, परंतु भावाचा फार गोड असे.

समानवयस्क एके ठिकाणीं जमले म्हणजे रस्परांकडे त्यांचा ओढा लागतो आणि ओळख होईतोंपर्यंत ते एकमेकांकडे हळूच चोरून पाहत असतात. ओळख झाली कीं पुरें, मग त्यांची लुबलुब बोलण्याला सुरवात व्हावयाचीच. त्याप्रमाणें **माधोसिंग** व **ानंदशंकर** ह्यांचें झालें. तारुण्यवस्थेंत **हरीसिंगा**चा नुक्ताच प्रवेश झाला असल्याकारणानें तो वडिलांसमक्ष मौन धरी, व त्यांच्या पश्चात् बालजनांस योग्य अशा चेष्टा करी, म्हणून त्यावेळीं तो स्तब्ध बसला होता. मुलें एकमेकांत बोलूं लागलीं, असें पाहून **हरिसिंगा**नें हळूच **निळकंठभाई**स एका जवळच्या खोलींत नेलें, व **जयलक्ष्मी**ला ताप आला आहे, ती बरळत होती व बायका कांहीं म्हणत होत्या, असें कांहींसें सांगितलें. मग तर बिचारा म्हातारा मुलीला पाहण्याविषयीं फार उत्कंठित झाला व 'मला तिकडे घेऊन चला ' असें म्हणाला. अति आग्रह धरिल्यावरून **हरिसिंगा**नें त्याला **जयलक्ष्मी**च्या खोलीच्या दारापाशीं नेलें व हळूच बोटानें दारावर टकटक वाजविलें. लागलीच खोलीबाहेर सुमारें १६-१७ वर्षांची स्त्री आली व **निळकंठभाई**स न पाहतां म्हणाली 'जरा दम धरा. आतां त्या जाग्या होतील. त्यांच्या वडिलांशीं आणखी थोडावेळ बोलत बसून त्यांची करमणूक कराल तर—( इतक्यांत **निळकंठभाईं**ना भींतीच्या कोंपऱ्यापाशीं पाहून ती दचकून हलक्या स्वरानें म्हणाली ) अगबाई, मला सांगायचें तरी होतें. हेच का ते ? किती बाई, त्यांचा दुःखानें चेहरा कोमेजून गेला आहे ? '

**निळकंठभाई** हें सर्व दुरून बघत होता, व ती इतक्यांत आंत जाणार असें पाहून तो चटकन पुढें आला. त्याचे डोळे अगदीं भरून आले होते. तो म्हणाला ' मुली, जरा थांब. ( नमस्कार केलासें पाहून ) अष्टपुत्रा अखंडसौभाग्यवती हो बरें. मला एकदांची माझी **जयलक्ष्मी** कशी आहे तें सांग पाहू. ती केव्हां निजून उठेल ? ' त्या स्त्रीनें लाजत लाजत व ओंठ कांपत उत्तर दिलें 'त्या अगदीं खुशाल आहेत. बहुतकरून आतां उठलाश्या वाटतात. तर मी पाहून येतें' **हरिसिंग** हें बोलणें होत असतां संकोचानें दुसरीकडेसच पाहत होता.

दाराजवळ जेव्हां ही स्त्री उभी होती, त्यावेळीं हिचे केश विखुरलेले होते. हिचे डोळे जागरणानें लालसर झाले होते, जणू काय प्रातःकाळीं अरुणाची स्पर्धा करण्यासाठीं म्हणून त्या डोळ्यांनीं त्यावेळीं ही लाली पत्करिली होती. कागदी लिंबाच्या त्वचेसारखा किंवा केवड्याच्या क-

णसाच्या आंतल्या कोमल पानासारखा, किंवा केळीच्या गाभ्यांतून नुकत्याच उकललेल्या पानासारखा हिचा वर्ण गोरागोरापान होता. हिची वस्त्रें त्यावेळीं थोडीशीं अस्ताव्यस्त होतीं, त्यामुळें हिच्या हृदयाचे जयविजयासारखे गोल व पीन कुच पाहटेस भक्तासच हृदयमंदिरांत प्रवेश व्हावा म्हणून द्वारपाळ होऊन राहिले होते, ते **निळकंठभाई**ला पाहून तिनें वस्त्रें सांवरून झांकल्याबरोबर प्रभुदर्शन देऊन शयनमंदिरीं गेले असें वाटलें.

ही छापाची साडी नेसली होती व इच्या पाठीवरच्या पदरावर कमळ काढिलेलें होतें. त्या साडीच्या छापाचें काम काळें होतें व छापाजवळ लालट रंग होता. बाकीचा सर्व भाग पांढरा होता; हिनें अंगांत रेशमी जरीकांठी कांचोळी घातली होती. हृदयावर मदनाच्या शराचे आघात न व्हावे म्हणूनच तिनें वक्षस्त्राणाप्रमाणें फक्त उरोभागावर चोळी घातली होती असें वाटे.

हिचें मुख पराकाष्ठेचें रमणीय होतें. ही खरोखर मृगनयना होती, कारण हिचे नयन इतके विशाल होते कीं, त्यांचे कोन कर्णाला भिडायाला जातात कीं काय असें वाटे. हिचें नाक कदलीपुष्पाच्या (केळफुलाच्या) आंतील गीर गाभ्याप्रमाणें नीट सरळ होतें. हिचे ओंठ लालभडक होते, त्यामुळें रक्त गळतें कीं काय असें वाटे. हिचे केश सुटले असतां जघनापर्यंत पोंचत. हिचे हात व पाय गोंडस होते. हिच्यामध्यें न्यूनाधिक कोठेंही दिसत नव्हतें. फक्त हिच्या उजव्या गालावर एक काळा तीळ होता, त्यामुळें फारच खुलत असे. नेहमीं आप तर्जनीवर ठेवून ठेवून त्या सुकु त्वचेवर तो तिळाच्या रूपानें कि किंवा चंद्राची पूर्ण साम्यता करण्य म्हणून, किंवा दृष्ट न लागावी म्हण वानें तो तिलरूपी कलंकच ठेविला हो

केश तोंडावर आले असतां राहूनें ग्रस्त अशा चंद्राप्रमाणें तिचें मुख . किंवा जघनरूपी ऐरावतगंडस्थलांना व कून सुगंधी व अधरमधूनें पूर्ण असें मुखकमळ त्यावर केशाच्या रूपानें अलि वर चालला आहे असें वाटे.

हिचें अंग अतिशय गोंडस व नाः असल्यामुळें अस्थिविरहीत केवळ मांस अशी अद्भुत पुतळी वाटे, किंवा मृत लोकीं प्रियपति जो अनंग त्याचा प्रभ आपल्यावर किती पडेल, हें जाणण्य ठींच केवळ रतीनें असा अलौकिक देह धारण केला, असें वाटे. हिच्या प यांत ते कडे (रुप्याचे मोठे वाळे) पाहून जणू भूलोकांतून हिला सुरलोकांत उडून जातां येऊं नये, म्हणून रौप्यशृंखलाच घातल्या कीं काय असें वाटे. पौर्णिमेचीं चंद्रकिरणें एकवटून व दृढ होऊन हिच्या हस्तपादांच्या अंगुलीरूपानें राहिलीं. हिचें स्तनद्वय श्वेतकपोताप्रमाणें शोभत. हिनें स्मित केलें असतां कपोलांत निम्नता येई, व 'हिची शुभ्र दंतपंक्ती मधून मधून दृष्टीस पडे, तेणेंकरून केवळ स्मिताचाही आयास कपोलांस सहन होत नाहीं व आननांत असलेल्या मोगरीच्या कलिका विकास पावतात असें वाटे. किंचित श्रमानें किंव

कानीं पडतांच ओष्ठांचा रक्तिमा कपोलांवर पसरत असे, तेणेंकरून गुलाबाच्या पांकळ्याच त्यांवर पसरल्या असें वाटे. हिच्या ऊर्ध्वोष्ठाचा प्रांत अधरोष्ठ रक्षणार्थ जणू मदनानें ठेविलेल्या स्वधनुष्याप्रमाणेंच शोभे.

फार काय सांगावें, परंतु हिच्या भृकुटीमिषानें मकरध्वजशरासन, नयनकनीनिकामिषानें जनमनःकर्षिणी गुटिका, नासिकारूपानें हृदयविदारिणी कुठार व कपाळावरच्या कुंकुमबिंदुमिषानें तरुणजनहृदयरक्तच कीं काय असें वाटे. विडा खाल्ला असतां पानांला इचे ओंठ आपली लाली देत, मग मनुष्यासारिख्या सजीवाला ते रंगवूं शकत ह्यांत नवल तें कोणतें. हिचा कंठ इतका मधुर होता कीं, गंधर्वांनीं कलियुगाचें मिषकरून पलायन केलें. हिच्या मुखांत लावण्यरूपी उन्मादक आसव, उरोभागांत कुचरूपी नैष्ठुर्य व सर्व देहांत संजीवनी ओतःप्रोत भरली होती. तिच्या अंगभर यौवन खिळून गेलें होतें व केवळ लावण्यानेंच ती रसरसलेली होती.

इंद्रियसौष्ठवानें जशी ही बाह्यतः सर्व स्त्रियांमध्यें अग्रेसर होती, तशीच ती नैसर्गिक गुणांनींही अप्रतिम होती. तिचा तो पतीच्या ठायीं विश्वास व प्रेम, ती अंतःकरणाची कोमल प्रवृत्ति, तें पापविचारानें अकलुषित मन, तो ऋजुपणा, इत्यादि सद्गुणांनीं (केवळ नामधारी नव्हे अशी) ती स्त्रीरत्न होती. **जयलक्ष्मी**ला नवऱ्यानें त्या स्थितींत घरीं आणिलें, तरी आपल्या नवऱ्याविषयीं यत्किंचितही किंतु इच्या मनांत आला नाहीं, मग **जयलक्ष्मी**विषयीं मत्सरभाव कोठून राहील. **जयलक्ष्मी**चें तें दुःख पाहून हिचा जीव नुसताच तिळतिळ तुटला असें नाहीं, तर तिनें स्वतः **जयलक्ष्मी**च्या दुःखशमनार्थ अंगमेहनतही कमी केली नाहीं. नाहीं तर, जगांत बहुतेक दुसऱ्याच्या दुःखामुळें फुकाची स्वतःला कळकळ आहे असें दाखविणारे, परंतु दुःखशमनार्थ किंचितही खटपट न करितां तें आपल्यापासून दूर असल्यास आपल्या मनाची व्यग्रता तरी होणार नाहीं ह्मणून लांब जाणारेच लोक फार असतात. परदुःख पाहून त्यांतच आनंद मानणाऱ्या नराधमापेक्षां नुसती कळकळ दाखविणारे लोक पुष्कळ बरे? कारण ह्या मार्दवानें दुःखितांचें बरेंच दुःख वाटलें जाऊन लवकर लयास जातें, परंतु तशा मार्दवाचा तादृश कांहीं अर्थ नसतो.

असो. ही नवयौवना आंतून एक पळाच्या आंतच बाहेर आली व खालीं मान घालून ह्मणाली ' त्या आतांच उठल्या, आतां अगदीं शांत वृत्ति आहे. आपल्याविषयींच चौकसी करीत होत्या'. हें बोलणें संपलें न संपलें इतक्यांत **हरिसिंगा**चा हात धरून **निळकंठभाई** मोठ्या घाईनें आंत गेला.

**जयलक्ष्मी** ही एका खाटेवर निजली होती. हिच्या उशाला एक ४५ वर्षांची विधवा बाई होती. जवळ कांहीं ओलीं व मळलेलीं चिरगुटें पडलीं होतीं. एका कोपऱ्यांत अजून दिवा जळत ठेविला होता. **निळकंठभाई** आंत गेल्याबरोबर ती तरुण स्त्री व **हरिसिंग** बाहेर येऊन दार अर्धें लावून उभीं राहिलीं. आपण कांहीं कामांत गुंतलों आहों, असें दाखवीत ती

म्हातारी तेथेंच काय होतें तें पाहत बसली होती. **जयलक्ष्मी**च्या अंगावर डागिने मुळींच नव्हते, व शालूच्या ऐवजीं तिला एक पातळ नेसविलें होतें. ती बरीच दु-खणाईतशी दिसत होती. आतां अंगांत ताप नव्हता, परंतु थकवा फार आल्या-मुळें तिच्यानें फारसें बोलवत नव्हतें. बाप येत आहे हें तिला अगोदरच त्या म्हाता-रीनें सांगितल्यावरून ती दाराकडेसच ब-घत होती. बाप आंत आल्यावर तिनें आपला एक हात पसरून खाटेबाहेर ठे-वून कण्हत डोळे झांकले, व 'बाबा, आलां ?' असें हळू म्हटलें. **निळकंठभा-ईनें** आंत येतांना दृढ निश्चय केला होता कीं, तिला त्रास होईल म्हणून मनोवृत्तींचा निग्रह करावयाचा. परंतु जेव्हां आपल्या मुलीची अशी अवस्था पाहिली, तेव्हां कसला निश्चय नी कसला विवेक. बिचारा म्हातारा दांत ओठ दाबून आपला हुंदका गिळून दोन्ही हात पसरून खाटेजवळ जातां जातांच मटकन खालीं बसला, आणि आ-पल्या हातांत तिचा हात धरतांच काळीज अगदीं भडकून जाऊन स्फुंदस्फुंदून मो-ठ्यानें रडूं लागला. तो म्हणाला 'अरे, हीच का माझी कालची गोजिरवाणी **जयल-क्ष्मी** ? हिची अवस्था अशी कशानेंरे झाली ? हा दैवा, अरे हिच्यावरचा माझ्या-वर कां नाहीं कोपलास ? मी म्हातारा बरा होतों. ही अजून कोंवळी बाळ ! हिच्या-वर कसा डाव साधलास, तुला दया कशी नाहीं आली ?' ह्याप्रमाणें तो पुष्कळ बोलूं लागला. आंत गडबड झाली हें पाहून **हरिसिंग** आंत आला. बिचारी **हरि-सिंगा**ची बायको बाहेर मुळमुळ रडूं लागली. त्या वृद्ध बाईनें व **हरिसिंगानें** आपले रडें आवरून त्या म्हाताऱ्याला पु-ष्कळ समजाविलें. ते म्हणाले 'अहो भा-ईसाहेब, विवेक करा. त्यांच्या अवस्थे-कडे पहा. आपण जर इतका शोक त्यांच्या समक्ष केला तर काय परिणाम होईल बरें ? त्यांची भेट झाली ह्याबद्दल आनंद न मा-नतां उलटा दैवाला दोष देतां ह्याला काय म्हणावें ?' बापाचा शोक पाहून **जयल-क्ष्मी**च्या डोळ्यांतून एकसारखें पाणी चा-ललें होतें. तिला मोठ्यानें रडण्याची मुळींच शक्ति नव्हती. हे दोघेजण त्याला सम-जावीत असतां मोठ्या कष्टानें तिनें अंग उचलून आपल्या दोन्ही हातांनीं बापाच्या गळ्याला मिठी मारिली व बारीक आवाजानें ती हळूहळू बोलली 'बाबा मी आहेंना? तुम्हीं असें करूं नका, मला त्रास होतो.' हें ऐ-कतांच **निळकंठभाई** शुद्धीवर आला व मोठा निग्रह करून आपलें सर्व रडें आटो-पून आनंद झाला आहे असें दाखवून म्हणाला 'बेटा, तुला आतां कसें वाटतें ? माझी बया मला सांपडली, मला आतां कांहीं नको.' नंतर तिच्या तोंडावर आ-लेले केश मागें सारून तिच्याकडेस बराच वेळ तो पाहत बसला, मग त्यानें मोठा उसासा टाकला. कांहीं वेळानें विचार क-रितां करितां त्याला मोठा हर्ष झाला आहे असें त्याच्या मुद्रेवरून दिसूं लागलें. पूर्वीचा सर्व शोक विसरून तो तेथेंच तिच्या तों-डावर हात फिरवीत बसला. कांहीं वेळानें **जयलक्ष्मीनें** हळूच विचारिलें 'बाबा, **आनंदशंकर** कोठें आहे ?' हे शब्द

कानीं पडतांच, **हरिसिंग** जात असतांही, तिला साफ निजवून **निळकंठभाई** मोठमोठ्या ढांगा टाकीत **आनंदशंकराला** पुढल्या माडीवरून उचलून घेऊन आला व 'ती पहा, तुझी ताई सांपडली' असें बोलला. **आनंदशंकरानें** तिला पाहतांच 'ताई तुला काय झालें, तुला कोणीं मारलें?' असें रडत रडत विचारून तिचा एक हात धरिला. **जयलक्ष्मी** खोल स्वरानें म्हणाली 'कांहीं नाहीं बाळा, मी आतां चांगली होईन' व जवळ बोलावून त्याला कुरवाळूं लागली.

आंत फारशी गडबड नाहीं असें पाहून **हरिसिंगाची** बायको आंत आली. तिला पाहून ती वृद्ध बाई म्हणाली '**सदुबा**, तूं बाहेर काय करीत होतीस? भाईसाहेब, ही ओमच्या **हरिसिंगाची** बायको बरें.' जसजसा **निळकंठभाई** कालच्या रात्रींचा प्रसंग व आतांची स्थिति ह्यांविषयीं विचार करूं लागला, तसंतसें त्याच्या मनांत आनंदाचें भरतें येऊं लागलें. तो सगळ्यांशीं मोठ्यानें व नैसर्गिक गंभीरता सोडून बोलूं लागला. जशी एकाद्या जन्मांधाला चक्षुःप्राप्ति झाली असतां हें सर्व जगत् इंद्रलोकच्या नंदनवनाप्रमाणें शोभिवंत दिसूं लागून एका प्रकारचा अवर्णनीय आनंद होतो, तद्वत् **निळकंठभाईला** झालें. किंवा वादळानें सुकाणूं, डोलकाठी, शीड वगैरे जाऊन एकादें लहान पडाव भर समुद्रांत सांपडलें असतां त्यांतल्या मनुष्यांनीं अकस्मात दुरून आपल्याला सोडविण्यासाठीं ह्मणून गलबत येत आहे असें पाहिलें असतां त्यांना जलसमाधींतून सुटल्यामुळें जो हर्षातिशय होतो, तसा त्या ह्मातान्याला झाला. कृष्णसर्पाच्या दंशापासून सुटावें ह्मणून वडाच्या पारंबीला लोंबत असतां खालीं वाघानें अगदीं अंगावर झडप घालण्याच्या आवेशांत असावें, अशावेळीं दैवानुकूलतेनें सापाला घारीनें व वाघाला गोळीनें एकसमयावच्छेदेंकरून मरण यावें व आपली सुटका व्हावी, ह्मणजे जो सुखातिशय होतो तो **निळकंठभाईला** ह्यावेळीं झाला. त्यानें बाहेर येऊन **हरिसिंगास** विचारिलें—पण कांहो तुह्मी मजकडे इला अगोदर कां घेऊन आला नाहीं?

**हरिसिंग**--घाल्यांतून सोडविल्यावर आपल्या घरचा वरघोडा होता, हें एक माहीत नव्हतें. दुसरें, ती वेळ ऐन घाईची. एक करितां भलतेंच होण्याची भीति. ह्मणून आह्मीं ह्यांना घरीं आणिलें, व मनांत हेंच कीं, ह्यांना विचारून त्यांच्या घरीं वर्दी द्यावी. ह्मणून घरांतून तोंडांतला बोळा काढविला. पण झालें भलतेंच. नानाप्रकार करूं लागल्या. मध्येंच किंकाळ्या मारीत, डोळे फाडीत. आह्मांला वाटलें भूत लागलें. परंतु काय करावें हें कांहीं सुचेना. बाहेर जाऊन पंचाक्षरी आणावा, तर लोकांत वाच्यता होईल व आह्मींच ह्यांना पळविलें असा वहीम यायचा, ह्मणून स्वस्थ बसलों. आमची काकी मात्र एथें रात्रभर जागत होती. मध्यरात्रीनंतर ह्या बरळूं लागल्या व '**निळकंठभाई आनंदशंकर** अशीं कांहीं नांवें घेतात' असें मला काकी ह्मणाली व तिनें मला सुईण आणायालाही सांगितलें. पुढें शोधा-

अंतीं आपला शोध लागला. व कोतवाल साहेबांनींही आपणास सर्व कांहीं सांगितलें आहेच. त्यांचे डागडागिने मी काढवून एके बाजूस ठेविले आहेत, ते आपण फुरसतीअंतीं पाहून घेऊन जा.

**निळकंठ—हरिसिंगजी**, मी स्वतःच्या चर्माचे जोडे जरी करून आपल्या पायांत घातले, तरी आपले उपकार जन्मोजन्मीं फिटणार नाहींत. आपण फार थोर व सज्जन आहां. आपल्या सुंदर पत्नीसहीत आपल्याला ईश्वर चिरकाळ सुखी राखो, हीच माझी त्याजवळ प्रार्थना आहे. वरें मी आतां मेणा आणवून **जयलक्ष्मी**ला घरीं घेऊन जातों. तिचा नवरा उगाच काळजी करीत बसला असेल. दुपारून चौकशी होणार आहे ह्मणून **नानासाहेब** ह्मणत होते. पाहवें कोण सांपडतात ते. पण **जयलक्ष्मी** रात्रींपासून उपाशी असेल नाहीं का?

**हरिसिंग—**आह्माला तसें वाटलें ह्मणून काकींनें मधून मधून पत्नीनें गाईचें ऊन दुध पाजिलें. ह्या नागर आहेत असें आह्माला काल वाटेंतच समजलें होतें, ह्मणून अन्न देतां आलें नाहीं.

**निळकंठभाई** ह्यानंतर कांहीं वेळानें सर्वांना विचारून मुलीला व **आनंदशंकरा**ला मेण्यांत घालून घरीं घेऊन गेला.

---

# भाग १० वा.

## न्याय.

आपला बत फसल्यामुळें त्या चाहाड्यांची वरीच पांचावर धारण बसली. त्यांनीं आपल्याकडून पुष्कळ खबरदारी घेतली होती. **जीवनलालानें बुलाखीला** शनिवारीं संध्याकाळीं **बाबासाहेबांक**डे जाऊन बसायाला सांगितलें होतें, व आपण स्वतः अपासऱ्यांत जाऊन बसला. त्यानें मशालजींना फितवून ठेवविलेंच होतें; व **चकलेश्वर** महादेवाच्या देवळांत जी मंडळी लपवून ठेविली होती त्यांना फक्त, वरघोडा आला ह्मणजे 'धरा मारा' असें ह्मणून दंगा करावयाचा, एवढेंच काय तें सांगितलें होतें. **बुलाखीनें वेलजी**, बरोबर मेणा व भोई पाठविले होते. परंतु **वेलजी** व **सटवाजीराव** ह्यांखेरीज बाकी दंगा करणारांपैकीं कोणालाही आपण कोणाचें काम करीत आहों, आपल्याला पैसे दिले कोणीं, ह्याविषयीं कांहीं देखील माहिती न व्हावी, अशी **जीवनलालानें** वस्तादगिरी केली होती. देवळांत ते भा-

डोत्री दंगेखोर संध्याकाळीं जमले, तेव्हां मात्र आपसांत 'तूं कशाला आलास? तुला कोणीं पैसे दिले' वगैरे विचारूं लागले, तों त्यासंबंधीं कोणाचाच तर्क जुळेना. फक्त दंगा करावयाचा व पैसे कोणी तरी निरनिराळ्या मनुष्यांनीं दिले एवढेंच काय तें सिद्ध झालें. **जीवनलालानें** शहरांतल्या उनाड व कज्जेखोर भामट्यांना आपल्या वळणांतील निरनिराळ्या दलालांकडून छपवून पैसे देवविले होते. आपल्यावर कधींही संशय येऊं नये, म्हणून त्यानें संध्याकाळीं बाहेर जाऊन बसण्याची तजवीज केली. तो मोठा दूरदर्शी होता. यदाकदाचित **वेलजी** सांपडून दंग्यांत आपलें व **बुलाखी**चें अंग आहे असें सिद्ध झाल्यास, **नानासाहेब** कोतवाल आपल्याला कधींही शिक्षा केल्याशिवाय सोडणार नाहींत, म्हणून त्यानें दुसऱ्या एकाद्या भुक्कड बारगिरास न मर्थावितां **भाऊसाहेब मुळेकर** ह्यांच्या खास मर्जीतील **सटवाजीराव** ह्याला गोंवून टाकिलें होतें. शिवाय **निळकंठभाई** हे **गायकवाडीं**तले विश्वासू व जुने नोकर आहेत, तर कदाचित **केसवा पंडित** ह्याविषयीं जास्त शोध करवितील, तो न व्हावा म्हणून **पेशव्यां**च्याच पदरच्या मनुष्याचा हात गुंतवून टाकावा, म्हणजे **मुळेकरां**विरुद्ध **पंडितां**ना जातां येणार नाहीं, हें तो समजून होता. वास्तविक हा असल्या धोक्याच्या कामीं कधींच पडला नसता, परंतु **बुलाखी**चा कांहीं कारणांनीं मिंधा असल्यामुळें ह्याला त्याच्या आग्रहाप्रमाणें करावें लागलें.

परंतु शहरांत ५।६ घटका रात्रींस एका नागराच्या वरघोड्यावर घाला आला व तो फसला अशी दाट बातमी पसरली, तेव्हां ह्यांचें धाबें दणाणलें. **बुलाखी बाबासाहेबां**च्या येथून जेवणाचें निमित्त करून घरीं आला, व पाहतो तों **वेलजी** परत आला नाहीं. मग तो तसाच परत **बाबासाहेबां**कडे गेला व त्यांना त्यानें सर्व हकीगत कळविली, कारण **बाबासाहेब** आपली साक्ष देऊन प्रसंग पडल्यास सोडवितील अशी त्याला पक्की खात्री होती. तो पुष्कळदां **बाबासाहेबां**च्या कामीं पडला होता, म्हणून ह्यावेळीं तसें झालेंही असतें. परंतु कर्मधर्मसंयोगानें **माणेकभाई** हा **वेलजी** ओळखून **बुलाखी**च्या घरीं आला व शोध करितां 'आतांच जेवून **बाबासाहेबां**कडे गेले' असें समजल्यावरून त्यांच्या घरीं गेला, व मागें सांगितलेला सर्व प्रकार घडून आला. ज्या स्त्रीविषयीं **बुलाखी** इतका लंपट झाला, ती कशी असेल, तिला एकदां डोळ्यांनीं पाहवें, अशी **बाबासाहेबांना** इच्छा होऊन त्यांनीं **बुलाखी**ला अगदीं हताश केलें व **माणेकभाई**ची मर्जी संपादण्यासाठीं म्हणून रुपये दिलेच पाहिजेत, अशी **बुलाखी**ला सक्ती केली, असें मागें सांगितलेंच आहे.

**जीवनलालानें** आपला मनुष्य पाठवून सर्व माहिती काढिली, त्यामुळें त्याला **सटवाजीरावा**कडेही जातां येईना व **बुलाखी**च्या एथें जाण्याचें तर नांवच नको होतें, कारण वहिमावरून एखादे वेळेस **नानासाहेब** कोतवाल आपण दोघे चाहाड्ये एकेठिकाणीं सांपडल्यास अडकवून

ठेवतील अशी त्याला धास्ती होतीच. **सटवाजीरावा**कडे गेल्यासही तो उगेंच एकादें भलतें बोलतां बोलतां बोलून जाईल, व आसपासच्या बारगिरांची साक्ष उगीच विरुद्ध पडेल, ह्मणून तो घरून मुळींच हालला नाहीं. बाकी काय तो **उत्तम** राहिला. परंतु तो **शाहपुऱ्यां**त असल्याकारणानें त्याला दुसऱ्या दिवशीं सकाळीं हें सर्व कळलें.

**वेलजी** घरीं आल्यावर आपण धोक्यांतून सुटल्याबद्दल **बुलाखी**चा जीव एकदांचा खालीं पडला. सरकारांत पैसे भरून ह्यापेक्षांही मोठ्या गुन्हेगारांची सुटका होत असे, परंतु ह्यांच्यावर कोतवालांचा बरेच दिवसांपासून दांत असल्यामुळें आपण अशा सुलभ रीतीनें सुटूं अशी मुळींच आशा नव्हती, ह्मणून **बुलाखी** व **वेलजी** हे सुटल्याबद्दल मोठा आनंद मानूं लागले.

इकडे **सटवाजीराव** आपण पकडलेल्या इसमाला घेऊन पाहऱ्यावर आल्यावर **गुणाजी** पाहारेकऱ्याला 'ह्याला आंत माझ्या खोलींत घेऊन जा, व मी परत येईपर्यंत ह्याचे हातपाय व तोंड सोडूं नको.' अशी त्यानें ताकीद केली, व आपण तो इसम कोण हें न पाहतां **विठू** सातारकराला ह्मणून बोलावयाला गेला. कांहीं वेळानें **सटवाजीराव विठूजी**ला घेऊन परत येऊन पाहाऱ्यावरच्या आपल्या खोलींत गेला, आणि त्यास ह्मणाला '**विठूजी**, ती पहा फिरून शिकार सांपडली. रांडेची पळत होती, परंतु तेथल्या तेथें बिंगवून टाकिली. पाहतां काय, सोडा तिचे हातपाय व काढा तोंडांतला बोळा. मग शिकवा थोडीशी कसरत'. असें ह्मणून आपण मिशांवर तांव देत दाराकडे, कोणी येत आहे कीं काय, हें पाहत पाठमोरा उभा राहिला. **सटवाजीरावाचें** बोलणें **विठूजी**ला उमजलें नाहीं, तरीही त्यानें सांगितल्याप्रमाणें त्या इसमाला मोकळें केलें, व पाहण्यासाठीं ह्मणून **सटवाजी**ला हांक मारण्याकरितां तोंड जों उघडतो तों त्या इसमानें चटकन उठून त्याच्या कानशीलावर सणाटून चापट लगाविली. चापटीचा आवाज व **विठूजी**चा घाबरून ओरडत धाडकन पाठीवर पडण्याचा आवाज हे दोन्ही एकेवेळीं झाल्यामुळें **सटवाजीराव** दचकून एकदम खोलीबाहेर पळाले. त्यांना वाटलें कीं, आपल्या खोलींत एकादा चोर लपून बसला होता व त्यानें हा दंगा केला. परंतु आंत 'रांडेच्या मला मारतोस? अहो **सटवाजीराव**, आंत या. मला ह्या खवीसाच्या हातून सोडवा. हा पोर नव्हे, पिशाच्च आहे. हरामखोरा, मिशा उपटूं नकोस. हाय! हांय!! **सटवाजीराव**, अहो तुमच्या मित्राची अशी एखाद्या ओंगळ व द्वाड पोराकडून थट्टा करावी, हें तुह्माला शोभतें काय? अहो सोडवा मला. आंत या. गाढवा, तोंडावर कां थुंकतोस?' असें **विठूजी** ओरडूं लागला. तें ऐकतांच धीर धरून **सटवाजीराव** 'हा मी आलों. कोण आहे तो? त्याची पक्की खोडकी जिरवितों?' असें ह्मणत हळू हळू जरा तोंड दरवाज्याच्या आंत घालून बघतो, तों एक पोरगेलासा **विठूजी**च्या उरावर बसून त्याला मारीत आहे, असें त्यानें पाहिलें. मग अवसान आणून तो डौलानें हातांतील काठी उगारून आंत गेला. पाठी-

मागून कोणी येत आहे, अशी चाहूल त्या मुलाला लागतांच चटकन **विठूजी**ला सोडून तो **सटवाजी**वर घसरला, व पापणी लवते न लवते इतक्या वेळांत **सटवाजी**च्या हातची काठी हिसकावून घेऊन एका मागून एक अशा ४-५ काठ्या त्याच्या तोंडावर पाठीवर जेथें सांपडेल तेथें ओढून, **विठूजी** मारायाला उठत आहे, इतक्यांत अर्ध्या उघडलेल्या दारांतून उडी मारून पळत सुटला. **सटवाजीरावा**ला हा अचानक प्रसाद मिळाल्यामुळें बरीच दुखापत झाली. त्याचा घोळणा फुटून मिशांवर रक्त पडत होतें, त्यामुळें आपल्याला मोठी जखम झाली आहे, असें वाटून तो जमिनीवर कण्हत पडला. ही सर्व गडबड जवळच्या खोलींतल्या बारगिराला ऐकूं जाऊन तो आंत आला, व **विठूजी**च्या मदतीनें **सटवाजीरावा**ला उठवून व त्याचें तोंड धुवून साफ करावयाला लागला; इतक्यांत पाहरेवाल्यानें त्या पोराला पळून जातांना पाहून पकडून जमादारसाहेबापुढें आणिलें व ' हा जबाब दिल्याशिवाय जात होता तर ह्याला काय करावें ' असें विचारिलें. **सटवाजी**नें तोंड पुसून त्याकडे पाहिलें व बोलणार, इतक्यांत **विठूजी**नें त्याच्या कानांत ' हाच तो आपल्याला मारून पळून जाणारा नसराणी कारटा. ह्याला मुळीं सोडूं नका ' असें सांगितलें. **सटवाजी**नें लागलेंच म्हटलें ' ह्याच्या मुसक्या बांधा व चौकीवर अडकवून ठेवा. मी आतां येतों. हा बोलूं लागला तर ह्याचे तोंडाला बोळा द्या. नाहीं तर तसें कशाला? ह्याला बांधून एथेंच ठेवा. मग मी थोड्यावेळानें ह्याला तेथें पाठवीन. ( बांधलेसें पाहून ) बरें तर तुम्ही सर्वजण जा आतां. '

त्या पोराचें एवढा वेळ तोंड चाललेंच होतें. तो ह्मणे ' काय जमादार, तुम्ही शूर आहां. **चकलेश्वर** महादेवाचें देऊळ चांगलें नाहीं का ? ' परंतु पुढें हा जास्त बोलेल असें पाहून **सटवाजीरावा**नें त्याचें तोंड बांधविलें, व मंडळी गेल्यावर त्याला लाथाबुक्यांनीं बेदम होईपर्यंत मारिलें. त्याच्या तोंडावर थुंकलासुद्धां. बिचाऱ्या पोराच्यानें तोंड बांधल्यामुळें ओरडवेना; ह्मणून त्याला मुकाट्यानें हुं कीं चुं न करितां माराच्या वेदना सोसाव्या लागल्या ! तो पोरगा भला खंबीर व दांड होता, ह्मणूनच टिकला; नाहीं तर केव्हांच त्यानें राम म्हटलें असतें. नंतर कांहीं वेळानें त्याला चौकीवर पोहोंचविल्यावर **विठूजी** आठवलेंसें करून म्हणाला—ह्याला कां तुम्ही त्या दिवसाचा पोऱ्या समजून एथें आणिलें ? मला वाटतें ह्या अंधाऱ्या रात्रीमुळें अशी गफलत झाली. हा राकट किती व ह्याचें स्वरूप काय ? शक्ति तरी किती लठ्याच्या अंगांत ?

**सटवाजीराव**—तसें कांहीं नाहीं. हा भामट्या **चकलेश्वर** महादेवाजवळ चोरी करीत होता, तो मीं पकडला, व सहज मस्करीनें तुम्हाला बोलविलें, व त्या दिवसाचा पोऱ्या आणिला आहे असें सांगून फसविलें. परंतु हा असला द्वाडपणा करील असें मला काय बरें माहीत ? त्याला सोडतांना तुम्ही कांहीं त्याची खोडी केली का ?

**विठूजी**—कांहीं नाहीं, फक्त त्याला एकदोन सडकून चिमटे घेतले.

**सटवाजीराव**—तरीच त्यानें चवता-

ळून तुमची बत्तीशी रंगविली. परंतु मीं काय त्याचे बापाचें घोडें मारिलें होतें ? पहा तर खरें. त्याला तीन दिवस उपाशी ठेवितों. बरें, ह्याबद्दल तुम्ही मजवर रागावणार नाहींना ?

**विठूजी**—ह्यांत रागावयाचें तें काय ? तुह्माशीं कोठें तो हरामखोर नीट वागला, तर मला वागवील. ( **सटवाजी** रागावलासें पाहून ) जाऊं द्या परतें, त्यांत काय ? ही आपली गोष्ट षट्कर्णी होऊं द्यायाची नाहीं, बरें.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं **नानासाहेब** कोतवाल **निळकंठभाईस** घेऊन, **भद्रें**त **भाऊसाहेब मुळेकरां**कडे गेले. दंग्याविषयीं सर्व जी कांहीं माहिती मिळाली होती ती कळवून 'ह्याबद्दल सरकारांतून नीट चौकशी होऊन बंदोबस्त झाला पाहिजे.' अशी त्यांनीं शिफारस केली. **केसबा पंडितां**नाही सकाळीं **निळकंठभाई**संबंधी ही हकीकत कळली; ह्मणून त्यांनीं सुद्धां **भाऊसाहेबां**ना 'शहरांत असे दंगे फिरून न होण्याबद्दल कांहीं तजवीज करालच, परंतु माझ्याकडून कांहीं होण्यासारिखें असल्यास तयार आहें' असा निरोप पाठविला, व दुपार उलटल्यावर आपण स्वत: आले.

खटला तयार होण्यापूर्वींच फौजदारी कामदाराकडे पाठवून उगाच एखादा वेडा वांकडा फैसला होऊन रयतेचीं मनें न्याय मिळत नाहीं ह्मणून नाखुष होतील, ह्यासाठीं कितपत खटला तयार होतो हें पहाण्याकरितां दोघा सुभेदारांनीं **नानासाहेबां**च्या सहायानें आंतून बारकाईनें चौकशी चालविली, व 'दुष्टांचें यथायोग्य पारिपत्य करितों' असें **निळकंठभाईस** आश्वासन देऊन घरीं जाण्यासाठीं निरोप दिला.

खटल्याचा निकाल झाल्यावर 'त्या **हरिसिंगा**स सरकारांतून इनामादाखल ह्मणून कांहीं पोंचतें करूं' असें **निळकंठभाईस** जातांना **पंडितां**नीं अभिवचन दिलें.

नंतर उभयतां सुभेदारांनीं प्रथमत: **हरिसिंग, केसरिसिंग,** व **माधोसिंग** ह्यांना बोलावून आणून दंग्यासंबंधी माहिती विचारिली. **मुळेकरां**च्या मनांत ह्यांच्यापैकीं कोणावर तरी हें शेकवायाचें होतें, व त्यांनीं पुष्कळ आडवेतिडवे प्रश्नही घातले. परंतु **पंडित** होते ह्मणून व तिघांच्या बोलण्यांत साधारण मेळ पडला ह्मणून कांहीं झालें नाहीं. भाटांनीं इतकेंच कायतें सांगितलें '**शाहपुऱ्यां**तून **रावपुऱ्यां**त आह्मी घरीं येत असतां पळत जाणाऱ्या लोकांनीं, नागराच्या वरघोड्यावर घाला आला, म्हणून आम्हांला सांगितलें. आह्मी पुढें गेल्यावर कांहीं लोकांची चाहूल लागल्यावरून कांकडा पेटवून पाहिलें, तों एक दक्षणी घोडेस्वार एका मनुष्याला घोड्यावर आडवा घालून भरधांव चालला होता, व एक पालखी पाठीमागून कांहीं लोक नेत होते. त्यांना आह्मीं अडविलें, व पालखीच्या नादांत गुंतलों असतां ते पळून गेले. जातांना ते एवढें मात्र कांहीं पुटपुटत होते. 'कोणीकडे न्यावयाची हें आह्मांला तरी कोठें माहीत आहे? डागिने मिळाले असते तर बरें झालें असतें.' नंतर आह्मी ती पालखी घेऊन घरीं आलों, व बाकीचें **नानासाहेबां**ना माहीत आहेच'.

**गोविंदराव** स्वतः होऊन आले. त्यांनीं आपण पकडलेल्या मनुष्याबद्दल सर्व कांहीं सांगितलें. त्यांची **नानासाहेबां**नीं व **पंडितां**नीं स्तुति केली. नंतर **माणेकभाई** व **बेचर** ह्यांना त्या पळून गेलेल्या मनुष्याबद्दल विचारिलें. **माणेकभाई** म्हणाला 'मला आश्चर्य तें हेंच वाटतें कीं, तो चांगला बांधलेला होता आणि तसा पळून गेला. मला वाटतें त्याच्याजवळ चाकू होता.' हा उत्तर देतांना बराच घाबरलेला दिसे, परंतु ह्याच्या बायकोवर आलेल्या संकटाची आठवण होऊन ह्याला वाईट वाटत आहे, असें वाटून **भाऊसाहेबां**च्या मनांत त्याला जास्त विचारावयाचें असतांही **पंडितां**नीं 'म्हटलें जा व गतगोष्टीबद्दल वाईट वाटूं देऊं नका.' **बेचरा**नें 'तो मनुष्य मीं मुद्दल पाहिलाच नाहीं' असें सांगितल्यावरून व दुसऱ्या एकंदर याच्या संबंधींच्या माहितीवरून त्याला त्यांनीं जाऊं दिलें.

परंतु ह्या सर्व हकीगतीवरून मूळ हा दंगा उपस्थित केला कोणी व ह्यांत सामील होते कोण, ह्याचा मुळींच थांग लागेना. नंतर **निळकंठभाई**च्या येथें शनिवारीं कोण कोण संशय घेण्याला योग्य असे लोक आले होते, ह्याची चौकशी करितां **केशवभट** व आणखी ३ ब्राम्हण दान घेण्यासाठीं सकाळीं आले होते, अशी बातमी लागली. त्यांना स्वार पाठवून धरून पकडून आणविलें. ते बिचारे ब्राम्हण लटलट कांपत होते; परंतु आपण निरपराध आहों ह्मणून आपल्याला **श्री रणछोडजी** दया करून सोडवील असें ह्मणत होते. **केशवभटा**खेरीज बाकीचे तिघेजण फारसे बोलत नव्हते; मनामध्यें मात्र ते ईश्वराचें नामस्मरण करीत होते, असें त्यांचे ओंठ हलत होते यावरून दिसे. परंतु **केशवभटा**चें तोंड सारखें चाललें होतें 'अरे मारा बापा, हवे शुं थशे? मारी पाहे तो कंई नथी? हुं तो नबळो छुं. मारी बे बायडियो मारा वगर शुं करशे? हुं मरी जईश. मारा ५००० रुपया हंताडी नाख्या छे, ते मारा पाछळ कोने मळशे? मने लाडवो ने नरुं घी मुवा पछी केम मळशे?'

**पंडितां**नीं त्या ब्राम्हणांना 'खरें सांगितल्यास तुमच्या केशालाही धक्का लागणार नाहीं' असें आश्वासन दिलें, व त्यांना ह्या दंग्यासंबंधीं कितपत माहिती आहे हें काढण्यासाठीं कांहीं प्रश्न विचारिले. त्या सर्वांनीं 'आम्ही भिक्षावर्ति (वृत्ति) करितों. काल सकाळीं **निळकंठभाई**च्या येथें 'गुपित' (गुप्त) दान घ्यायाला गेलों होतों. असलें निंद्य काम आम्ही कधीं करणार नाहीं. निदान हें तरी केलें नाहीं, व तें कोणीं केलें हें माहीतही नाहीं' असें उत्तर दिलें. ह्यांच्याकडून कांहीं सुगावा लागत नाहीं असें पाहून त्यांना सोडून देण्यांत आलें.

हा वेळपावेतों खटल्याला मुळींच स्वरूप आलें नव्हतें म्हटलें तरी चालेल. एक कायती त्या दक्षणी घोडेस्वारांसंबंधीं कांहीं माहिती काढावयाची राहिली होती. परंतु शहरांत असले स्वार पुष्कळ, ह्मणून त्या पुढल्या चौकशींतून विशेष तथ्यही निघणार नव्हतें, व हें प्रकरण जेथल्या तेथें विझणार होतें. परंतु **सटवाजीरावा**च्या कल्पनाशक्तीमुळें ह्या चौकशीला निराळेंच स्वरूप

आलें. कालच्या दंग्याबद्दल **भाऊसाहेबां**-समोर चौकशी चालली आहे, असें ऐकतांच चौकींतून त्या मुसक्या बांधलेल्या पोरास बरोबर घेऊन **सटवाजी भाऊसाहे**-बांच्या वाड्यांत आला व आंत सांगून पाठविलें कीं, 'मीं त्या कालच्या दंगेखोरांपैकीं एक मनुष्य पकडून आणिला आहे. आज्ञा झाल्यास हुजुरापुढें आणीन.'

'जमादारांना मनुष्य घेऊन आंत येऊं द्या' असें **भाऊसाहेबांनीं** हुजुऱ्यास सांगून **पंडीतां**कडे वळून ते म्हणाले 'मला वाटलें कीं कांहींच शोध लागत नाहीं; परंतु ह्या जमादारांनीं तर तितक्यांत बहादरी करून एक मनुष्य पकडला आहे. पाहावें काय निघतें तें. जमादार एकंदरीनें हुशार खरे. ( मनांत ) ह्या **सटव्यानें** कांहीं चमत्कारिकच करून नाहींना ठेविलें? बेटा आहे खुळसट. छत् ह्यावेळीं तरी तसें नसेल.'

इतक्यांत **सटवाजीराव** पोराला घेऊन आंत आला, व त्यानें लवून अदबीनें प्रथम **भाऊसाहेबां**ना थोडेंसें गालांत हंसून व नंतर **पंडित** व **नानासाहेब** ह्यांना मुजरा केला व म्हटलें 'हा पहा भामटा आणिला. ह्याला सर्व माहिती आहे.' असें ह्मणून त्या पोराला एकदोन गचांड्या दिल्या. हें पाहून **नानासाहेब** म्हणाले 'जमादार, आतां तुम्ही त्याला असें वागवूं नका. समजूत देण्याचा प्रसंग आल्यास तुम्हालाच बोलावूं.' तेव्हां **भाऊसाहेबांनीं** थोडेंसें रागानें **सटवाजीं**कडे पाहून त्या पोराचें तोंड सोडण्याविषयीं हुकूम केला व त्या पोराची जबानी घेतली. पोरानें सांगितलें 'माझें नांव **रहिमान**. मी **मिरझापुरांत** राहतों. मजुरी करून आईचें व माझें पोट भरतों. काल सकाळीं एका मनुष्यानें मला बाजारांत पाहून हळूच एके बाजूस बोलाविलें. त्यानें हातांत एक रुपया दिला व विचारिलें कीं, 'तूं तिनीसांजेस एक काम करशील?' मी उत्तर दिलें कीं, चोरी खुनासारखें वाईट काम असल्यास नाहीं. तो ह्मणाला 'तसें मुळींच नाहीं, फक्त **रावपुऱ्यां**तील **चकलेश्वर** महादेवाजवळ जाऊन नागराचा एक वरघोडा येतांना पाहिलास कीं आरडाओरड कर' मला वाटलें कीं, ही वरघोड्याच्या मंडळीची थट्टा करावयाची असेल, म्हणून मी हो म्हटलें, व आणखी दिलेले दोन रुपये घेतले. माझा ह्याशिवाय दुसरा कांहीं तर्क झाला नाहीं. ( उत्तर ) तो मनुष्य मी ओळखत नाहीं. दाखविला तर कदाचित ओळखेन. ( उत्तर ) मीं कधीं चोरी केली नाहीं. आईला कधीं चोरून आणून दिलें नाहीं. आई नेहमीं वाईट मार्गाला जाऊं नको, त्यापेक्षां उपाशी मेलेलें बरें असें सांगते. रुपये आईजवळ दिले नाहींत. ते मजजवळ आतां आहेत. ( उत्तर ) कोठून आणिले म्हणून विचारील, म्हणून दिले नाहींत. आम्ही फार गरीब आहों. आई सूत काढते.

( उत्तर ) नंतर संध्याकाळीं मी **चकलेश्वर** महादेवाजवळ गेलों. तेथें कांहींजण आपसांत बोलत उभे होते, व कांहीं देवळांत उभे होते. मी त्यांच्याशीं बोललों नाहीं. वरघोडा **आकाशेट**च्या कुव्याच्या पोळांतून वळतांना ते लोक व मी एकसारखे ओरडूं लागलों. ( उत्तर ) मी नुसता ओरडत होतों, व दुसरे बरेच 'धरा मारा' म्ह-

णत होते, व एक घोडेस्वारही 'मारा' म्हणणाऱ्या मंडळींत होता. ( उत्तर ) तो केव्हां आला हें मला माहीत नाहीं. ( उत्तर ) हो; हे जमादारसाहेबच घोड्यावर होते. ( उत्तर) मला हे घेऊन आले म्हणून, व त्यांच्या आवाजावरून. (उत्तर) दुसरा घोडेस्वार कोणीही नव्हता.

'मारा धरा' शब्द ऐकून ही केवळ थट्टा नाहीं, कांहींतरी वाईट आहे असें समजून, सर्व लोक पळत जात आहेत असें वाटून, मीही भिऊन पळायाला लागलों. इतक्यांत एका मनुष्यानें येऊन देवळाच्या भिंतीजवळ मला पाडलें, व तोंडांत बोळा देऊन माझ्या मुसक्या बांधल्या; व मला घोड्यावर घालून आपण घोड्यावर बसला. ( उत्तर ) ते हे जमादार. त्यांनीं घोडा पळवितांना कोणाचेंसें नांव घेऊन ती पालखी घेऊन जा असें ह्मटलें. ( उत्तर ) तें नांव **लालजी** का **मुलजी** का **वेलजी** असें कांहींसें होतें, मला पक्कें आठवत नाहीं. वाटेंत ३।४ लोकांनीं उजेड करून त्या पालखीच्या भोयांना अडविलें, व आमचा घोडा जमादारांनीं भरधांव पळविला. नंतर **भद्रे**च्या पाहाऱ्यावर आलों. हा **भद्रे**चा पाहरा हें मी सकाळीं ओळखलें. ( उत्तर ) मला एका खोलींत, **गुणाजी** नांवाच्या मनुष्याला हांक मारून, ह्या जमादारानें ठेवविलें. कांहीं वेळानें जमादार व एक मराठा असे दोघेजण आले. दुसऱ्या माणसानें मला सोडतांना आईवरून शिवी दिली व चिमटे घेतले, त्यामुळें मी संतापून त्याच्या थोबाडींत दिली, व उरावर बसून त्याला बुक्या मारिल्या. त्याला **विठूजी** ह्मणून जमादारांनीं हांक मारिली. व हे **सटवाजी** जमादार, असें **विठूजी**च्या ओरडण्यावरून माहिती झालें. (उत्तर) बाकी काय बोलले, हें कांहीं मला समजलें नाहीं. जमादार पाठमोरे होते ते **विठूजी** पडल्यावर बाहेर गेले. ते काठी घेऊन आंत येण्याची चाहूल लागतांच, मी चवताळून त्यांच्या अंगावर जाऊन काठी घेऊन एकदोन काठ्या लगावल्या व तेथून पळालों. मला **गुणाजी**नें धरिलें, व जमादारांच्या सांगण्यावरून पुनः माझ्या मुसक्या बांधून त्यांच्या खोलींत ठेविलें. त्यांनीं मला खूप मारिलें ( वळ दाखवितो ). तेथें **विठूजी**शिवाय दुसरें कोणी नव्हतें. मी सकाळपासून कांहीं खाल्लें नाहीं. आपण गरीबपरवर आहां. मी मिस्कीन आहें. माझी आई उगाच काळजी करीत असेल, तर मला मेहरबानी करून जाऊंद्या. मी यांत कांहीं खोटें बोललों असेन, तर माझी जबान झडेल व पैगंबर मला यथायोग्य शासन करील."



ही साक्ष होत असतांना मधून मधून **भाऊसाहेब** 'जाऊंद्या; ह्या मुलाच्या साक्षींत कांहीं अर्थ नाहीं. त्याला पकडलें, ह्मणून तो जमादारांवर आळ घेत आहे. त्याला या सोडून' असें पुष्कळदां ह्मणाले; परंतु तें ऐकलें न ऐकलेंसें करून **पंडित** सरतेशेवटपर्यंत प्रश्न विचारीत गेले, व 'नसला अर्थ तर सोन्याहून पिंवळें झालें. आपण थोडेच ह्या साक्षीवर निवाडा करणार आहों. सांगेना विचारा काय वाटेल तें' असें मात्र मधून मधून ह्मणत.

माझें बोलणें नुसतें ऐकून ह्या पोराला सजा करतील, व मला **भाऊसाहेब** शाबासकी देतील, असें **सटवाजीरावा**-

ला वाटत होतें. परंतु हें सर्व विपरीत झाल्यामुळें तो अगदीं काळा ठिक्कर पडला. तो मधून एकदां जायाला सुद्धां लागला, परंतु **नानासाहेबांनीं** तें पाहून ' अहो जमादार, जरा **भाऊसाहेबांना** विचारून मग बाहेर जायाचें असेल तर जा ' असें ह्मटलें. ह्यामुळें **भाऊसाहेबांना** मुकाट्यानें ' कोणी बाहेर जायाचें नाहीं ' असें ह्मणावें लागलें.

मुलाची साक्ष संपल्यावर **पंडितांनीं** ' त्याला कांहीं खायाला द्या, व **भाऊसाहेब** सांगतील तोंपर्यंत त्याला मोकळा सोडूं नका' असें दोघा शिपायांना सांगितलें; व '**भाऊसाहेब**, जमादारांना आतां कांहीं थोडेसें विचारावें, नाहीं का ? ' असें **मुळेकरांना** विचारिलें. **भाऊसाहेब** त्रासून व कपाळाला आंठ्या घालून ह्मणाले ' पाहिजे तें करा, कोठून तरी शोध लागला, ह्मणजे झालें.' त्यांच्या आंठ्या पाहिल्याच नाहींत असें दाखवून, **पंडित सटवाजीला** विचारूं लागले.

**पंडित**–धरून आणिलेला पोरगा तुह्माला कोठें सांपडला ?

**सटवाजी–चक्रलेश्वर** महादेवाजवळ, महाराज.

**पंडित**–कोणत्या वेळीं ?

**सटवाजी**–एकदोन घटका रात्रीं.

**पंडित**–त्या वेळेस तो काय करीत होता ?

**सटवाजी**–तो 'धरा मारा ' ह्मणून दंगा करीत होता.

**पंडित**–दंगा करितांना तुम्हीं पाहिलें ?

**सटवाजी**–हो पाहिलें तर.

**पंडित**–काळोखांत तुम्हाला एकून दिसतें ?

**सटवाजी**–मी पाहिलें नाहीं, ऐकिलें.

**पंडित**–बरें तें असो. तुम्ही तेथें काय करीत होतां ?

**सटवाजी**–मी लोकांना दंग्यांतून सोडवीत होतों, तों हा पोर दंगा करितांना सांपडला.

**पंडित**–बरें, किती लोक सोडविले, व ते कोठें आहेत ?

'**सटवाजी**–दहापांच. मला माहीत नाहीं.

**पंडित**–बरें दंगा होणार आहे, ह्मणून तुम्हाला कसें समजलें ?

**सटवाजी**–मला एका मित्रानें सांगितलें. ( व लागलेंच घाबरून ) नाहीं, मला वाटलें, कीं दंगा होईल.

**पंडित**–तुम्हाला एकंदर भविष्य समजतें. बरें तेथें तुम्ही केव्हां गेलां ?

**सटवाजी**–दंग्यापूर्वीं १०-५ पळें.

**पंडित**–तुम्हाला पाहरा सोडून जाण्याबद्दल परवानगी होती ?

**सटवाजी** -नाहीं.

**पंडित**–मग तुम्ही हें शिपायाला अयोग्य असें काम कसें केलें ?

**सटवाजी**–( घाबरून ) मी दंग्यांत नव्हतों. दंग्यांत दुसरे होते. मी एका मुलाला पकडायाला गेलों होतों.

**भाऊसाहेब** हें सर्व रागानें ऐकत होते; व ह्यांत **जमादाराचें** खास अंग आहे आहे, अशी त्यांची पक्की खात्री झाली. तो आतां जास्त विचारल्यास आपल्या साथीदारांचीं नांवें सांगेल, व नंतर त्यांना दंड

करून ह्याची सुटका करणें कठीण पडेल, असें जाणून ते मध्येंच म्हणाले 'केशवराव, ह्या चौकशींत कांहीं विशेष अर्थ नाहीं. ह्यांतून सटवाजीची एक चुकी मात्र सिद्ध होते, बाकी कांहीं नाहीं. ती ही कीं, आपला पाहरा आमच्या परवानगीवांचून सोडून हा भलते ठिकाणीं गेला. आतां तो ऐन दंग्याचे वेळीं तेथें कसा गेला, ह्यांत कांहीं विशेष गूढ आहे असें नाहीं. बोलून चालून काल संक्रांत होती. तर तो रायपुरांत आपल्या मित्रांना तिळगूळ द्यायाला गेला असेल; आणि वाटेंत हा दंगा पाहिल्याबरोबर त्यानें मदतीसाठीं म्हणून आपला घोडा आंत घातला, व एका पोराला कैद केलें. पण एकंदरीनें त्या पोराचें विशेष अंग दिसत नाहीं; म्हणून त्याला एक दिवसाच्या मजुरीचे पैसे देऊन सोडून द्यावें. बाकी कोणी जर अशी शंका घेईल कीं, सटवाजीराव स्वत: ह्या दंग्यांत सामील होता, तर ही शंका सकृद्दर्शनीं खोटी व वेडेपणाची दिसते. कारण एक तर तो श्रीमंतांच्या पदरचा शूर शिपाई, म्हणून असलें निंद्य काम करणार नाहीं. दुसरें यदाकदाचित सामील झाला असें म्हटलें, तरीही त्याच्यासारखा शाहाणा मनुष्य आपल्या घोड्यावर बसून डामडौलानें लोकांना ओळखूं जाईल अशा रीतीनें कधींही जाणार नाहीं. एवढें मात्र कीं, काकतालीय न्यायाप्रमाणें हा त्या वाटेनें जायाला व दंगा व्हायाला एक गांठ पडली. बाकी कांहीं नाहीं. परंतु सटवाजीला आमची आज्ञा उल्लंघन केल्याबद्दल कांहीं शासन पाहिजे म्हणून त्याची जमादारी काढून त्याचें नांव नाइकांचें पटांत घालावें. केशवराव, मला वाटतें कांहीं दिवस हा आपल्या तैनातींत असूं द्या. नानासाहेब, असे दंगे फिरून होऊन रयतेला पीडा होणार नाहीं, अशी तजवीज ठेवा. मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. व निळकंठभाईना सांगा कीं, शोध चालू आहे व आपण बेफिकीर असा.' ह्या बोलण्यानें पंडिताचें व कोतवालाचें सर्व बोलणें थांबलें. उघड रीतीनें त्यांच्यानें विरुद्ध जाववेना. आपलेच दांत व आपलेच ओंठ, तितक्यांत मुळेकरांचे म्हटलें म्हणजे मोठें पारडें होतें, कारण ते पडले पेशव्यांचे सुभेदार. म्हणून ते गप बसले, व कांहीं वेळ इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलून आपापल्या घरीं गेले.

## संमेलन नामें प्रथम पुस्तक समाप्त.

# देवी सत्यभामा.

## पुस्तक २ रें.

( इ. स. १८१२ ).

संघट्टन.

# देवी सत्यभामा.

## पुस्तक २ रें.

## संघट्टन.

### भाग १ ला.

### विनोद.

मागें सांगितलेला मासलेवाईक न्याय होऊन सुमारें एक वर्ष लोटलें होतें. नुकताच फाल्गुन सुरू झाला होता. अशा वेळीं एके दिवशीं **निळकंठभाईच्या** येथें **सदूबा** गेली, तिला पाहून **जयलक्ष्मी** ह्मणाली—काय बाई, किती दिवसांनीं तूं दृष्टीस पडतेस ही? घरीं करीत तरी काय असतेस? काकी बहुतकरून सर्व काम स्वतःच आटोपीत असतात. नवरा घरीं असता, तर ती गोष्टच निराळी. मग तुझें दर्शन आह्माला एव्हांसुद्धां झालें नसतें.

**सदूबा**—ताई, हें ग काय? मी परवां नव्हतें कां आलें? आपण मात्र महिना महिना आमच्या इकडे ढुंकून पाहायाचें नाहीं, आणि जरा माझ्याकडून दोन दिवस अलीकडे का पलीकडे झाले, ह्मणजे लागलाच बोल लावायाचाना? आतां समजलें, तूं कां येत नाहींस ती? घरच्यामुळें नव्हेंका? माझें कांहीं असें नाहीं बरें. **देवगडास** जायाचें होऊन तीन एक महिने झाले, पण त्यापूर्वीं देखील मीं कधीं येणें चुकविलें, असें तुला कधीं आठवतेंका? मग उगीच कां ह्मणून बोलावें?

**जयलक्ष्मी**—तूं तर अगदीं नाकावर माशी देखील बसूं देत नाहींस. बरें तें राहूं दे. **हरिसिंगजी** केव्हां येणार?

**सदूबा**—(किंचित लाजून) मला थोडेंच सांगणें झालें होतें. पण काकी कांहीं दिवसांपूर्वीं ह्मणत होत्या, कीं शिमग्याच्या आंतच बहुतकरून येणें होईल. आतां शिमग्याला किती दिवस आहेत बरें?

**जयलक्ष्मी**—भली वस्ताद आहेस तूं. काय ह्मणे, 'मला थोडेंच सांगणें झालें होतें.' जसें कांहीं मला माहीत नाहीं. जातांना काय गोंधळ केलास तूं. **हरिसिंग** काय! बिचारा विरघळला. माझ्या सारखा कडा पाहिजे होता, ह्मणजे समजलें असतें, रडून काय मिळतें तें. त्यानें नाहीं का तुला सांगितलें कीं, 'अग रडूं नको. मी लौकरच शिमग्याला येथें येतों.'

**सदूबा**—(रागावून) कोण असें ह्मणतें? सगळें कुभांड आहे. मला वाटतें,

तुझ्या मनांत मला चिडवावें असें आलें आहे.

**जयलक्ष्मी**–( हंसून ) असें का? खात्री करून देतें तर. **माधोसिंगा**ला आतां बोलावतें. तूं मात्र त्याला खुणावूं नकोस म्हणजे झालें. '**माधोसिंग**, अहो **माधोसिंग**. रे बाळा **आनंदशंकर, माधोसिंगा**ला घेऊन इकडे ये पाहूं बरें.'

**सदूबा**–( त्रासून ) ते काय सांगतात, नी तूं काय ऐकतेस. पण त्या भाऊंना कशाला बोलावतेस?

**जयलक्ष्मी**च्या हांका ऐकून ते दोघेजण पुढल्या माडीवरून खालीं माजघरांत आले; व **माधोसिंग जयलक्ष्मी**स म्हणाला–ताई, आम्हांला कां बोलाविलें?

**जयलक्ष्मी**–**माधोसिंग**, तुम्ही इकडे तिकडे न पाहतां मजकडेसच पहा, आणि मग खरें खरें सांगा बरें. **हरिसिंगा**च्या जाण्याच्या वेळीं घरांत काय काय गमत झाली, ती मला फिरून एकदां सांगता का?

**सदूबा**–( मध्येंच ) ते कांहीं नाहीं सांगत?

**माधोसिंग**–( मोठ्यानें हंसून ) आतां कसें? वहिनी मी सांगूं का? ( **सदूबा** मानेनें 'नको' म्हणून खूण करिते. पण न पाहिलेंसें करून ) वहिनी रागावूं नको बरें. कांहीं नाहीं ताई. दादाला बाहेर यायला थोडा उशीर झाला, म्हणून मला त्या **जालमसिंगां**नीं त्याला बोलावून आणायाला सांगितलें. मी आंत जाऊन 'दादा दादा,' म्हणून पुष्कळ हांका मारिल्या. पण त्यानें ओ दिली नाहीं, म्हणून मी ह्या खोलींतून त्या खोलींत त्याला शोधूं लागलों. आणि तसाच वहिनीच्या खोलींतही गेलों. मला पाहून दादानें वहिनीला म्हटलें 'मी शिमग्याच्या आंतच जलदी परत येतों, आतां अगदीं रडूं नको बरें.' आणि मग तो माझ्याबरोबर बाहेर आला नी काय.

**जयलक्ष्मी**–( हंसून ) कां, कोणाला सांगणें झालें होतें?

**सदूबा**–( अगदीं रडकुंडीस येऊन ) **माधो** भावोजी, तुम्ही तरी बरेच आहां. मला वचन सुद्धां दिलें होतें कीं, मी कोणाला सांगणार नाहीं म्हणून; आणि तें असेंच कां पाळलेंत? जा, मी तुमच्याशीं आजपासून बोलणार नाहीं. ( **जयलक्ष्मी**कडे वळून ) ताई, तुला माझी थट्टा करायाची असेल, तर ही मी जातें.

असें म्हणून **सदूबा** उठून जाऊं लागली, इतक्यांत शेजारीण **हरकूंवरबाईची** नुकती माहेरीं आलेली मुलगी **कमळा** आपल्या दीडवर्षाच्या मुलाला कडेवर घेऊन आंत आली, व **सदूबा** जातेसें पाहून म्हणाली–कां **सदूबाई**, अशा घाईनें कोठें चाललां? बोलायाचें नाहीं वाटतें? **जयलक्ष्मी**, कांग ही रागावली?

**जयलक्ष्मी**नें **सदूबा**ला आणखी खिजविण्यासाठीं **हरिसिंगा**चें सर्व बोलणें तिखट मीठ लावून सांगितलें. त्यामुळें तर **सदू** अतिशय रागावली. परंतु राग कोणावरतीही काढतां न आल्यामुळें ती शेंवटीं स्फुंदस्फुंदून रडूं लागली. आपण केलेली थट्टा इतक्या थराला गेली, हें पाहून **जयलक्ष्मी**ला फार वाईट वाटलें. म्हणून ती

उठली, व **सदू**जवळ जाऊन तिची समजूत करूं लागली. ती ह्मणाली ‘ असें काय बरें? तूं का आतां लहान आहेस? तुला थट्टा देखील समजूं नयेना. बरें तितक्यांत **हरिसिंगा**नें तुला सांगितलें असें जरी खरें असलें, तरीही तुला ह्मणून कां राग यावा? तुझा बोलून चालून तो नवराच, तर त्यानें तुजजवळ बोलावें, ह्यांत वावगें तें काय? जातांना तूं अशीच रडत असशील, तेव्हां त्याच्यानें तुझें समाधान केल्याशिवाय जाववलें नसेल नी दुसरें काय. हा वेडे! ’ **सदू** मधून मधून ‘ आतां समजलें. पुरें झालें, ताई, किती संपादनी करशील? पण मला घरीं गेलेंच पाहिजे ’ असें ह्मणत होती. शेंवटीं **जयलक्ष्मी**नें तिच्या गालाला आपलें बोट लाविलें आणि कानांत कांहींसें सांगितलें. त्याबरोबर **सदू** थोडेंसें गालांत हंसून ‘हें ग काय? मला आतां त्रास नको देऊं हो’ असें ह्मणाली. तिच्या कपोलावर अश्रुबिंदु झळकत असून मध्येंच त्या मंद स्मितानें जो रक्तिमा आला, त्यामुळें प्रातःकाळीं दहिंवर पडून सूर्याचीं कोमल किरणेंच एका सुंदर पद्मावर पडलीं आहेत कीं काय असें वाटलें. नंतर सर्व राग जाऊन तिनें आपल्या पदरानें आंसवांचे थेंब पुसून टाकिले, त्यामुळें अभ्राच्छादित चंद्र नुकताच अभ्रांपासून मुक्त झाला असें वाटलें.

हा सर्व विनोद पाहून **माधोसिंग** व **आनंदशंकर** मोठ्यानें हंसत माडीवर गेले; व **सदू कमले**च्या मुलाला घेऊन कुरवाळूं लागली.

‘ हा लबाडा **प्रेमू**, मला एक गोड पापा दे बरें ’ असें म्हणून तिनें त्या मुलाचा एक मुका घेतला. **जयलक्ष्मी**नें हें पाहून म्हटलें–**कमळाबाई**, पाहिलेंत का? आतां **सदू**ला मुलें देखील आवडूं लागलीं. बरें, मागच्या वर्षीं कोणाचें मूल मुततांना पाहिलें म्हणजे ‘ नकोग बाई, इश्श कोण घाण? तीं घाणेरडीं बाळंतीं नी, तीं मळकट व तेलकट चिरगुटें, त्यापेक्षां मूल नसलेलें पुरवलें, ’ असें ही ह्मणत असे; आणि आतां......खरेंच आहे, घरीं माणसें नसलीं, म्हणजे बायकांना करमणुकीसाठीं मूल असावेंसे वाटतें. (**सदू**कडे वळून ) **सदू**, तुलाग कसें वाटतें? **सदू** ( संतापून )–ताई, मी हजारदां तुला सांगितलें कीं, तूं माझ्या वाटेस जाऊं नकोस. तुझ्या मनांत मी येथें येऊं नये असें आहे कां? मी कधीं मूल नको म्हणून म्हटलें? लोकांचीं शेंबडीं लेंबडीं मुलें मला कोठें नाहीं तरी आवडत आहेत? हा **प्रेमू** कांहीं तसा नाहीं. मी कधीं एकादे वेळेस घाणेरड्या मुलांविषयीं किळस दाखविली असेल, नी आमच्या ताई तर काय, लागलीच त्यावरून आपल्या पदरची भर घालून कांहीं तरी खोटेंनाटें माझ्या अंगीं लावितात. हें नाहीं बाई मला मुळीं आवडत.

**जयलक्ष्मी**नें हळूच **कमळा**बाईस सांगितलें–आतां ही पाहिजे तें का म्हणेना, परंतु इच्या पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितींत बराच फरक पडला आहे. पूर्वीं चांगलें जरी सोन्यासारखें मूल असलें, तर हें मुतेल का, असा कांहींतरी कुतर्क काढून त्याला तिनें घेऊं म्हणून नयेच. आतांशीं वरीक तें सर्व बदललें आहे.

हें कुजबुजणें पाहून **सदू** म्हणाली–कायग ताई, आणखी कांहीं आपल्या

मनचेंच माझ्याविषयीं सांगतेस कीं काय ? कमळाबाई, इचें तुम्ही मुळीं ऐकूं नका बरें.

हें सर्व बोलणें एकादे वेळेस फिरून पहिल्या थराला जाईल, असें पाहून कमला म्हणाली–पण कांहो, जयलक्ष्मीबाई, हरिसिंगजी, कोणत्या कामावर गेले आहेत.

जयलक्ष्मी–ते वही घेऊन देशावर करण्याकरितां गेले आहेत. देवगडास रावळ तख्तसिंग त्यांचे यजमान आहेत, व चांपानेरास भाऊसिंगजी ठाकोर आहेत. त्या दोघांना भेटून ते लौकरच परत येणार आहेत. सदू, असेंच ना ?

सदूनें उत्तर न देतां मान हालविली.

इतक्यांत निळकंठभाई माडीवरून वामकुक्षी करून खालीं आला. त्यानें सदूला पाहतांच 'कां सदू, हरिसिंग केव्हां येणार' असें विचारिलें. तिनें कांहीं उत्तर दिलें नाहींसें पाहून जयलक्ष्मी म्हणाली–बाबा, आम्हीं सुद्धां असेंच मघाशी इला विचारिलें होतें. तेव्हांपासून ती काय म्हणून आम्हांवर रागावली आहे, कोण जाणे. कांहीं विचारिलें, म्हणजे नंदीबैलासारखी मान मात्र हालविते. बोलत कांहीं नाहीं.

निळकंठभाई ( हंसून )–जयलक्ष्मी तूंच कांहीं तरी तिची खोडी केली असशील म्हणून ती रागावली आहे नी काय. बरें पण सदू, मी तर नाहींना तुला कांहीं बोलले मला तर उत्तर देशीलना ?

सदू ( खालीं मान घालून हळूच )– केव्हां येणें होईल हें सर्व ताईला माहीत असून, मला मघांपासून उगीच त्रास देत आहे.

निळकंठ०–तें सारें खरें, पण मला नाहींना माहीत. मग मला तर सांगशील; तुझी ताई कांहीं मला सांगत नाहीं हो.

सदू (बळेंच कपाळाला आंठ्या घालून)– शिमग्याच्या पूर्वीच यायाचें होईल, असें ह्मणणें झालें होतें.

कमला व जयलक्ष्मी (एकदम)–मग एकूण त्यांनीं तुला सांगितलें होतें तर.

सदू–( लाजून )–हेंग काय ? बाबा, पाहिलेंतना, ह्या कशा अर्थाचा अनर्थ करितात त्या.

निळकं०–त्या कांहीं का बोलेनात. तिकडे तूं मुळींच लक्ष देऊं नकोस ह्मणजे झालें. किंवा खरेंखुरें तेवढेंच बोलतात. ह्मणून ह्यांचें पारिपत्य करण्यासाठीं हरिसिंग आले ह्मणजे त्यांना सांग. मग सदूची थट्टा करण्याची कोणाची मगदूर आहे ?

सदू (रडकें तोंड करून)–हें हो काय ? तुह्मी देखील ह्यांच्यासारखें बोलतां. मी आज सकाळीं कोणाचें तोंड पाहिलें होतें कोण जाणे. जे उठतात ते माझ्याच पाठीस हात धुवून लागतात. हा सर्व खेळ ताईनें मांडला आहे. बरें ताई, कधीं तरी ह्याचा वचपा निघेल, ध्यानांत ठेव.

हें बोलणें होत असतां बाहेरून एक ब्राह्मण आला. ह्याच्या काखेंत खारव्याची झोळी व हातांत टाळ होता. ह्याच्या पागोट्यांत पंचांग गुंडाळून ठेविलें होतें. गळ्यांत तुळशीची माळ होती. डोक्याला लाल टोपी होती. कपाळावर कुंकवाचा उभा नाम रेखून लाविला होता. हा ओसरीवर आलासें पाहून जयलक्ष्मी म्हणाली 'बाबा ते

व्यास नारण पुराणी ( नारायण पुराणिक आले आहेत. ' निळकंठभाईनें त्यांना ओसरीवरील लांकडी चौरंगावर बसविलें; व कांहीं कथा करावयास सांगितलें. माडीवरील मुलें खालीं झोपाळ्यावर येऊन बसलीं. त्या ब्राम्हणानें भजनी सुरानें व मध्यें मध्यें यथास्थित अनुस्वार व हकार घालून हीं पुढील पद्यें म्हटलीं.

## प्रबंध.

श्री रा(ह)म कृ(ह्)ष्ण गो(ह)विंदे(ह)।
म्हणा मिळोनी वैष्णव वृंदे ॥ टेक ॥

केशव करुणालय सुखकंदे, नगधर नटवर नंदननंदे, माधव मुरारि परमानंदे, वंसीधर वृंदावनचंदे, श्री राधिकारमण गोपिकेश, गुणनिधि गोकुलेश, गोपेंद्र गदाधर,गरुडध्वज गोपाल गुणाकर, गोवल्लभ गोवर्धन वल्लभ, नंदलाल नागर नटनायक, ललित त्रिभंगी मनोहरमोहन, दामोदर मदनाभिराम, अखिलेश्वर आमंदकंदे ॥ १ ॥ म्हणा मिळोनी वैष्णववृंदे ॥ आनंदकंदे ॥ १ ॥

शेष महेश रटति आनंदें, सनक सनंदन सनत सनंदे, सतत प्रशंस सकल श्रुति छंदे, त्यासि सोडिला ते मतिमंदे, हरिनामामधीं समधे तीरथ, नेमवृत धर्म कर्म तप जप यज्ञ अष्टांग योग अध्ययन ब्रह्मशुचि दान ज्ञान विज्ञान ध्यान अवघें आह्रिकलें निगमचें वदनीं हा वर दुसरा समुल पाप संताप भेटाया हरि भेटाया उपाय नाहीं, भाव कुभावें श्रीकृष्ण किरतनीं वांये जात नाहीं, अतुलित प्रताप दयाराम ह्मणे त्यासाठीं मज मनासि पडिला कृष्ण नामाचा छंदे ॥ २ ॥ ह्मणा० ॥

राग–कालंगडा.

छानि मानि वात मारी
राख प्यारारे ॥ धृ० ॥
में तूं अकेलो दीठो हठीलो
रीस चढीनें मार्‍योरे ॥
लाज तजीनें गाळो हजी तें
दिधी, तुथी तूं शाणोरे ॥ १ ॥
कहे किसनजी, तारि हुं मरजी
ओळखिने करुं राजीरे ॥
राधा रुपाळी आय वाहाली
रंग रमीये; हांजीरे ॥ २ ॥

गुप्तगोष्ट ठेवि सख्या सांगतें तुला ॥धृ०॥
जवळी दुजाना हृष्ट बघुनि मीं ।
कोप येउनि ताडीला ॥
लाज नसे परि दुर्वच बोलसी ।
समज कसा त्वां टाकीला ॥ १ ॥
कृष्ण ह्मणे ' मी जाणत मर्जी ।
राजि करीन गडे तुजला ॥
सुंदर राधे अधिर प्रिये चल ।
खेळुंगे रंग ' रुचे तीजला ॥ २ ॥

राग–मांड.

मेरे मन,कांहेकुं रोवत सभुदिन ॥धृ.॥
बिषय सुखोंमें दिल ललचाकर ।
जतन किया नहीं तब तन ॥१॥
जगत जंजालसे फसकर मूरख ।
छांड दिया तें सुख धन ॥२॥
जब जमराज बुलाकर मारे ।
वालि तुझे नहीं ततखण ॥३॥
तुजसम अधमकों राम उधारण ।
नहिं छुटकारा हरिबिन ॥ ४ ॥

मम मना संतत कां शोक करिसी ॥धृ०॥
न करून जतन तनूचें मोहून ।
विषयसुखाश्रय धरिसी ॥ १ ॥
जगतपसाऱ्या मूर्ख तूं भुलसी ।
तरि सौख्यधन अंतरसी ॥ २ ॥
पापीहि पाहुन दंडील यम तुज ।
वाली न कोणी तुजसी ॥ ३ ॥
उद्धरि राम हि तुजसम अधमा ।
हरिवीण सुटका कैसी ॥ ४ ॥

हीं पदें झटल्यावर व्यास कांहींवेळ स्तब्ध वसला. **निळकंठभाईनें** त्याला अर्ध रुपया दिला. **कमळाबाई** म्हणाली 'पण बावा, आई म्हणत होती कीं, हे पुराणिक जोशीपणाही करितात. तर आमच्या **सदू**ला मुलगा केव्हां होईल, ते सांगूं शकतील, नाहीं वरें.' हें ऐकून **जयलक्ष्मी**ला मोठा आनंद झाला, परंतु आणखी कुरापत काढावी म्हणून ती म्हणाली 'पण बावा, अगोदर **हरिसिंग** केव्हां येतील, असें **सदू**ला झालें आहे. तर जोशीबावांना विचारावें, नाहीं का?'

**सदू** मध्येंच म्हणाली 'ह्यापैकीं कांहीं एक नको विचारायाला. तुम्ही जर विचारीत असलां, तर ही मी कानांत बोटें घालून बसतें.'

तिच्या मनांत विचारावयाचें फार होतें, परंतु ह्या आपली टर उडवितील म्हणून तिनें वरकांती आढेवेढे वरेच घेतले. **जयलक्ष्मी** व **कमळा** ह्यांच्या मनांत केवळ थट्टा करावयाची होती. परंतु **निळकंठभाई**स वस्तुतः ह्याविषयीं जिज्ञासा होऊन त्यांनीं **नारायण** भटाला विचारलें. **नारायण** भटानें **सदू**ला पुढें बोलाविलें. ती पुढें येत नव्हतीच, परंतु त्या दोघींनीं तिला धरून वळें पुढें नेली, व तिचा डावा हात पुढें धरिला. ती आपली खालीं मान घालून लाजत उभी होती, व ह्या दोघीजणी एके बाजूला तिची गडबड पाहून हंसत होत्या. हिचें व हिच्या नवऱ्याचें नांव वगैरे सर्व कांहीं माहिती **जयलक्ष्मीनें** त्या भटाला सांगितली. मग त्यानें '**हरिसिंगजी** केव्हां येणार, म्हणून म्हणाल होते', असं विचारिलं. **जयलक्ष्मी** म्हणाली, 'ह्या शिमग्याच्या आंतच.'

कांहींवेळ 'वृश्चिक' 'मकर' 'धन' 'चांद' वगैरे वडबडून व बोटें घालून व विचार केलासें दाखवून त्या भटानें म्हटलें—ते आजपासून ९ दिवसांचे आंत पूर्वेकडून खास येतील. ते आल्यानंतर एक दोन ब्राम्हणांना हिनें कांहीं दान दिलें असतां वृश्चिक ग्रह जो अनिष्ट आहे तो संतुष्ट होईल.

**जयलक्ष्मी** म्हणाली—**सदू** ऐकिलेंसना? त्यांचें यायाचें लौकर होणार आहे बरें. आतां अगदीं खंत करूं नकोस. भेटीला मुळीं उशीर लागणार नाहीं. पण जोशीबोवा मुलाचें कांहीं सांगितलें नाहीं!

त्यानें म्हटलें—कागद व दऊत लेखणी आणा.

तीं आणिल्यावर त्यानें पुष्कळ आंकडे मांडिले, व पुष्कळदां ते पुसून नंतर कांहीं वेळानें आनंद दाखवून म्हटलें—दोन वर्षांच्या आंत मुलगा तर होणार, परंतु **बेचराजी** माता फार कोपाविष्ट झाली आहे, व मंगळ रास तर अनिष्ट स्थानीं पडली आहे. ह्मणून ह्यांनीं सहा महिने साखर न खाण्याची बाधा

(नेम) पाळली पाहिजे व मंगळाला खुष करण्यासाठीं दहा ब्राह्मणांना व्यतीपाताच्या दिवशीं जेवूं घातलें पाहिजे, ह्मणजे सर्व कांहीं सुरळीत सिद्धीस जाईल.

**निळकंठभाई** हें ऐकत होताच. मंगळाला राशीच्या वर्गात व वृश्चिकाला ग्रहाच्या वर्गात दडपून दिलेलें पाहून त्याला बराच अचंबा वाटला. परंतु 'हें ज्योतिष आहे, ह्यांतील आपल्याला तरी काय माहिती. जर थोतांड असतें, तर ह्या भटानें **हरिसिंग** ९ दिवसांत येणार म्हणून कसें सांगितलें असतें? अशी त्यानें आपल्या मनाची समजूत केली व भटाला आणखी अर्धा रुपया दिला.

कांहीं वेळानें संध्याकाळ झालीसें पाहून **सदू** घरीं जावयाला निघाली. तिच्या मनांत अतिशय आनंद झाला होता, तरीही जातांना थोडेसें वाईट तोंड करून ती ह्मणाली—ताई, यायचें झालें ह्मणजे कनई आम्ही बहुतकरून **शाहपुरांत** राहायाला जाऊं, असें एकदां म्हणायाचें झालें होतें मग कनी आपली भेट फारा दिवसांनीं होत जाईल, हें मनामध्यें आणलें म्हणजें मला मुळीं चैन पडत नाहीं. बरें तर आतां येतें.' नंतर **माधोसिंगाला** बरोबर घेऊन मोठ्या उल्हासानें जोश्यानें सांगितलेलें सर्व कांहीं काकीला पर्यायानें कळविण्याचा बेत करून ती [illegible] गेली.

**सदूचें** सरतेशेवटलें बोलणें ऐकून हल्लीप्रमाणें तिचें वारंवार येणें होणार नाहीं, ह्यामुळें 'आतांच जणूं भावी वियोग मी अनुभवितें' असें **जयलक्ष्मीला** वाटलें व तेणेंकरून सर्व दिवसभर तिच्या मनाला मुळींच उल्हास वाटला नाहीं.

## भाग २ रा.

### पावागड.

शके १७३३ माघ शुद्ध १३ स **हरिसिंगजी देवगडाहून चांपानेरास** येऊन पोंहोचला. तेथें ठाकोर **भाऊसिंगजी** यांना भेटून उभ्या वर्षांत त्यांच्या घरांत ज्या कांहीं मोठमोठ्या घडामोडी झाल्या त्या आपल्या वहींत नोंदून, व त्याबद्दल रिवाजाप्रमाणें वेतन घेऊन, त्यानें फाल्गुनाच्या शुक्लपक्षांत तेथून घरीं **अहमदाबादेस** यावयाचें ठरविलें.

त्यावेळीं हा प्रांत **अलिजाबहाद्दर दौलतराव शिंदे** ह्यांच्या ताब्यांत होता. येथें **अलिजाबहाद्दरांचे** व्याही **बापूसाहेब पाटणकर** सुभेदार होते. बापूसाहेबांचे चिरंजीव **आपासाहेब** हे **अलिजाबहाद्दरांचे** जामात होत. **चांपानेर** व **पावागड** (या डोंगरी किल्ल्याचीं **पावकगड, पावनगड**, किंवा **पवनगड** अशींही नांवें आहेत) ह्यांच्या दरम्यान सुमारें एका कोसाचें अंतर आहे, व हीं दोन्हीं रम्य स्थलें **अहमदाबादेच्या** आग्नेयेस सुमारें ३० कोसांवर आहेत.

सुमारें १००० वर्षांपूर्वी प्रसिद्ध **चावडा** वंशाचा कुलदीपक, **अनहिलवाडा पट्ट-**

णाचा संस्थापक जो गुर्जराधिपति **वनराज** त्याच्या कारकीर्दीत **चंपा** नांवाच्या एका वाण्यानें **चांपानेर** हें शहर वसविलें. दोनशें वर्षांनंतर हें शहर **तुवार** वंशीय रजपूतांकडे गेलें. शके १२२० च्या सुमारास जेव्हां **दिल्हीतख्ताधिपति शाह अल्लाउद्दिन खिलजी** ह्यानें **चव्हाण** रजपूतांचा **मेवाडांत** मोड केला, तेव्हां ते **चव्हाण** ह्या प्रांतांत येऊन **पावागडाचा** आसरा धरून राहिले, व डोंगराच्या पायथ्याशीं असलेलें **चांपानेर** येथें त्यांनीं आपली राजधानी केली. पुढें सुमारें १९० वर्षांनीं हा डोंगरी किल्ला व शहर हीं **अहमदाबादे**चा प्रतापी **बादशाह, महमदशाह बेगडा** यानें काबीज केलीं. रजपूत निकरानें लढले, परंतु त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. त्यांचा खासा **रावळ जयसिंगजी** हा जखम लागून शत्रूंच्या हातीं जिवंत सांपडला. ह्या स्थलांची रमणीय शोभा पाहून **महमदशाह** फार खुष झाला, व त्यानेंही **चांपानेर** आपली राजधानी केली. त्यानें आपल्या कारकीर्दींत या ठिकाणीं टोलेजंग वाडे, मशीदी, नगराभोंवतीं विस्तीर्ण कोट, टुमदार बागा व सुरेख रस्ते करविले; त्यामुळें पूर्वीं जें हें लहानसें गांव होतें, तेंच **अहमदाबादे**शीं टक्कर मारण्याजोगें मोठें व शोभिवंत शहर झालें. परंतु **चांपानेरा**ची ही भरभराट **बाहादुरशहा**च्या पश्चात्, ह्मणजे शके १४७० चे सुमारास लयाला गेली; व त्यानंतर सुमारें २५ वर्षांनींच येथें मोठी राजधानी होती, याचें दर्शक, पडके वाडे, घुमट पडलेले दर्गे व मशीदी, लहानसहान झुडुपें उगवलीं आहेत अशा पडक्या भिंती, ओसाड व अस्ताव्यस्त झालेल्या बागा, एवढेंच कायतें राहिलें होतें. शके १६४९ त हें शहर व जवळचा **पावागड** नांवाचा डोंगरी किल्ला अशीं **कृष्णाजी कदमबांडे** ह्यांनीं सर केलीं, व पुढें सुमारें ४० वर्षांनीं या सर्व प्रांतभर **शिंदे** सरकाराचा अंमल सुरू झाला.

**अहमदाबादे**स जाण्यापूर्वीं एकदां **पावागडा**वरील **श्रीकालिका**मातेचें जागृतस्थान पहावें, ह्या हेतूनें फाल्गुन शुद्ध १ स मध्यान्हीच्या पूर्वीच जेवणखाण आटोपून **केसरीसिंग** व आणखी ४ भाट बरोबर घेऊन, **हरिसिंग कसबीण** तलावावरून† **चांपानेरा**च्या कोटाबाहेर पडला, व नैऋत्येस **पावागडाला** जाणाऱ्या एका पायवाटेनें चालला. सर्वांपुढें एक **नाइकडा*** जातीचा वाटाड्या चालला

† हा चतुष्कोणी दगडी तलाव **चांपानेरा**च्या कोटाच्या पश्चिम दरवाज्याच्या लगत बाहेर येतांना डाव्या हाताला आहे. ह्याला पूर्वीं थेट तळापावेतों पायऱ्या होत्या. हा **सकरखान** नांवाच्या **चांपानेरां**तील एका श्रीमान् पठाणानें सुमारें ३०० वर्षांपूर्वीं बांधिला. या तलावाच्या बाजूलाच **सकरखाना**ची कबर सुरेख बांधिलेली आहे.

* **पंचमहाल** परगण्यांत **नाइकडा** ह्मणून भिल्ल लोकांसारखीच एक जंगली लोकांची जात आहे. यांपैकीं कांहीं लोक **चांपानेरां**तील श्रीमान् मुसलमानांच्या मोतद्दारांचे आपण वंशज आहों, व कांहीं **बागलाण**च्या राजानें **चांपानेरा**च्या **पाटाई रावळाला** कुमकेस पाठविलेल्या फौजेचे आपण वंशज आहों, असें ह्मणतात.

होतां. हा शरीरानें ठेंगणा व सडसडीत होता खरा, परंतु कसलेला होता, ह्मणून तो मोठा कांटक व चपळ असून प्रसंग पडल्यास डगणार नाहीं असा दिसत होता. तो काळा रोम होता. त्याचा चेहरा रुंदट असून त्यांत मार्दव मुळींच नव्हतें. त्यानें आपल्या कंबरेभोंवतीं एक मळकटसें चिरगूट गुंडाळिलें होतें. डोक्याला एक लांब चिंधी बांधिली होती, पण त्याचे लांब व अस्ताव्यस्त असलेले राठ केश बहुतेक बाहेर दिसत होते. त्यानें कंबरेला एक कट्यार खोवून डाव्या हातांत एक कमटा घेतला होता. वाटाड्याच्या पाठीमागून **हरिसिंग** व **जालिमसिंग** नांवाचा एक वयस्क भाट असे बोलत चालले होते. बाकीचे तीन भाट व **केसरीसिंग** हे साधारण समवयस्क असल्यामुळें आसपासच्या झाडींत जात, व **जालिमसिंगा**नें हाक मारिली, ह्मणजे परत येऊन त्यांना मिळत.

या प्रदेशांत दाट जंगल होतें; त्यामुळें हिंस्र जनावरांपासून वाटसरांस फार जपावें लागे, ह्मणून प्रत्येक भाटाजवळ कट्यार, ढाल, तरवार व तोड्याची बंदूक होती. येथून तहत् **पावागडा**पर्यंत एकसारखी खडकाळ प्रदेशांतून चढण आहे. वाटेनें आजूबाजूला निरनिराळ्या प्रकारचे वृक्ष होते, व पायवाट सोडून जरा आडबाजूला गेलें तर किर्र झाडी लागलेली असे. पायवाटेवर वाळलेला पाला व घास पडल्यानें जोडा घालून चालणाराचा पाय पुष्कळदां निसरत असे. भरदिवसां हिंस्रश्वापदांची फारशी भीति नसे, परंतु **भिल्ल**, **नाइकडे** वगैरे रानटी लोक वाट मारीत, ह्मणून त्या भाटांनीं तो **नाइकडा** वाटाड्याबरोबर घेतला होता. जातांना **हरिसिंगा**नें **जालिमसिंगास** व वाटाड्यांस निरनिराळ्या बाजूंच्या झाडांविषयीं माहिती विचारिली; परंतु त्यांनाही सर्व झाडांचीं नांवें सांगतां आलीं नाहींत.

शिशिर ऋतु संपत आला होता, व वसंतागमाचे सूचक असे ह्या वनराजीवर फेरफार झाले होते. उंबरांना नुकतींच फळें येऊं लागलीं होतीं. मधून मोहाच्या झाडांला तांबूस फुलें येत होतीं. आंब्यांना मोहोर येण्याची सुरवात झाली होती. सागाला पिंवळट मंजुळा येत होत्या. धावड्याचीं पांढुरकीं फुलें पाहून प्रियमित्र जो शिशिर त्याचा वियोग सहन न होऊन त्याला श्वेत अश्रूच आलेसे दिसे. वड, पिंपळ आणि सादड ह्यांची लालट आणि हिरवी अशी कोंवळी नूतन पालवी भावीवसंतागमहर्षसूचक होती. आपल्या लाल पालवीनें व बारीक व लहान पानांनीं नांदुरकी व पिंपरी, प्रियतम हेमंताचा अंत झाल्यामुळें शोकानें लाल झालेले नयन व कृशता दाखवीत होत्या. आपल्या पीतपुष्पांनीं जणू शीतत्राणासाठीं ह्मणूनच काय सूर्यताप अंगीं धारण केला आहे, असें बकुल, पलाश व बब्बुल ( बाभळ ) दाखवीत होते. दृढपरिचय झाल्यामुळें आपल्या मैत्रीची कांहीं खूण इंगुदी ( हिंगण ), बाभळ, शमी व शाल्मली ( शेवरी ) ह्यांजवळ रहावी, ह्मणून हेमंतशिशिरांनीं शीतदर्शक कंटक त्यांना दिले होते. हिंवाळ्याच्या कडक जाचांतून एकदांचे आपण सुटूं, ह्मणून आनंदानें खिरणी, वेल, कंवठ, सरस, अडुळसा हे आपलीं पांढरीं

फुलें व फळें उधळूं लागले होते. ऐहिक क्षणभंगुरतेला कंटाळून करंज्याच्या झाडांनीं राखेच्या रंगाच्या फुलांनीं आपले अंग भरवून जणू वैरागी होण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. बालवसंताला खाऊ देण्यासाठीं ह्मणून सीताफळ, अंजीर व चाराचे वृक्ष ह्यांनीं शाखाहस्तांत फळें धरलीं होतीं. प्रातःकाळीं अतिशय श्रम करून थकल्यामुळें सूर्याचा सारथी अरुण हा मध्यान्हीं अशोकावर वामकुक्षी करीत होता. आम्र, निंब, बकुल, देववाभळ ह्यांनीं आपला सुवास चोंहोंकडे फेंकिला होता. चिंचा, तणस, बिबला, वाहवा, खैर, बोरी, कळंब, नीव, वावळा, टेम्बुर्णी, गोंदणी वगैरे झाडांची तर गर्दी झाली होती.

मधून मधून लहानसहान झुडपांचे झांकरही होते. कुडा, करवंद, तरवड, अंकोळ, धावरी वगैरे झुडपें व खाजकुयरी, गजगा, रानदोडका यांचे वेल मधून दृष्टीस पडत.

वाटेनें बरींच बांडगुळें लागलीं. एक तर फारच सुरेख होतें. एका विस्तीर्ण वडाच्या बुंध्यांतून मधोमध एक उंच माड सुमारें ४०।४५ हात वर गेला होता. त्यामुळें तो ह्या अरण्याचा राजा व तो वटवृक्ष त्याचें सिंहासन असें दिसलें; किंवा सूर्यकिरण अव्याहत प्राशन करण्यासाठीं आपल्या सामर्थ्यानें माडाच्या रूपानें वटांतःस्थित मोठ्या तपस्व्यानें आपलें मस्तक वर उचललें आहे कीं काय असें वाटलें.

सरस, तमाल ह्यांचीं काळीं पानें असल्यामुळें जणू भिल्ल, नाइकडा इत्यादिकांपासून नित्य सहवासामुळें त्यांनीं कृष्णवर्ण घेतला. केवळ हिम सहन न झाल्यामुळें अंजिरांच्या पानांवर रोमांच उभे राहिले. मधून भगवद्भक्त देवनळ ब्रह्मानंदांत वायूबरोबर डोलत होते. सागाच्या मंजुळा व आम्र व निंब यांचा मोहोर हे वसंताचे यौवनबिजांकुर होते. कित्येक ठिकाणीं पुष्पवती लता वृक्षांना दृढ आलिंगन देऊन आपल्या सुकुमार पागोऱ्यांनीं त्यांच्या नूतन पालवीचें व फुलाचें वियोगसंतापहारी असें चिरकाळ चुंबन घेत होत्या; यौवनातिरेक सूचक असे पल्लवित बाहु त्यांनींही स्वप्रियांच्या कोमलभुजांच्या आटोक्यांत यावे म्हणून खालीं वांकविले. कलियुगांत धर्माचा लय होतो असें पाहून आपले पुण्यवान लंबकूर्च महर्षी वटरूपानें वायुप्राशन करीत तप आचरीत होते; व पारंब्यांच्या मिषानें वटपुत्र स्वमाता पृथ्वीस भेटण्यासाठीं म्हणून पित्याच्या खांद्यावरून खालीं उतरत होते.

चित्रविचित्र रंगांच्या पुष्पांनीं, नूतन पालवींनीं, व सुवासानें जणूकाय ही चिरकालविरहिणी वनराजी वसंतसंगलोलुप होऊन स्वदेहमंडनच करीत होती. नंदनवनाचा गर्व हरण करण्यासाठीं ह्मणूनच विधीनें हें रमणीय वन उत्पन्न केलें. हा दिवस आहे, अशी शंका कदाचित घेऊन महाकाली आपल्यास आलिंगनसुख देणार नाहीं, ह्मणून महादेवानें ह्या निबिड वनांत आपलें केलिमंदिर केलें होतें; किंवा प्रियपुत्र मूषकवाहन ह्यास विधात्याच्या सृष्टिवैचित्र्याची ओळख व्हावी, म्हणून सकल वनस्पतींनीं व जंतूंनीं परिपूर्ण असें सर्वसंग्रहालयच ह्या स्थलांत त्यानें केलें होतें; किंवा आपल्या अफाट सृष्टीचा लहानसा एक नमुना ब्रह्मदेवानें येथें करून ठेविला होता. दंड-

कारण्यें व विंध्यारण्यें ह्या अपूर्व वनाच्या हेव्यानें पर्णहीन झालीं होतीं; किंवा पशुपतिप्रियतमा महाकाली ह्या अरण्यांत सदैव वास करून ह्याला पूत करिते, व आपण अतिपापी म्हणून तिचें केवळ दर्शन सुद्धां नाहीं, ह्यामुळें पीत व शुष्क पर्ण आणि शाखा यांच्या मिषानें त्यांनीं सन्यास घेतला असावा असें वाटे. पार्वतीला सूर्यकिरणांपासून ताप न व्हावा, म्हणून शंकरानें वृक्षमिषानें गगनचुंबित छत्रें रोविलीं होतीं. या अरण्यांत वसंतमित्राबरोबर फिरण्यापुरतेंच कायतें चंद्रमौलीपासून अनंगाला अभयदान मिळालें होतें, असें कामवश सचेतन व अचेतन यांच्या कृतींवरून दिसे. येथें हेमंतापासून शीत नव्हतें, ग्रीष्मापासून ताप व खेद नव्हता, वर्षापासून पर्जन्य नव्हता; त्यामुळें येथें सदा वसंतच सार्वभौम आहे असें वाटे. कारण सूर्यकिरणें येथील वृक्षांची घनदाट छाया भेदू शकत नव्हतीं, व पल्लवावरणामधून घनवृष्टीला वृक्षांच्या तळाशीं येणें फार दुर्घट होतें, मग अशा दाटझाडींत बिचारी थंडी कोठून रिघाव करील? जगांतील सर्व जातींच्या पशूंच्या व पक्ष्यांच्या श्रेष्ठ नायकांनीं हें अरण्य आपलें वसतिस्थान केलें होतें; व भिन्न जातींच्या प्राण्यांमध्यें कलह उत्पन्न झाल्यास प्रियासांनिध्यामुळें येथें असलेल्या पशुपतीजवळून ते लौकर न्याय मिळवून देत असत. ह्या वनाचा गर्व हरण करण्यासाठीं सूर्य, चंद्र, इंद्र, ह्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले.

ही वेळ ऐन दुपारची होती, ह्मणून सूर्यप्रकाश झाडांवर पडून फारच अप्रतिम अशी शोभा आली होती. मनुष्यांची रहदारी नसल्यामुळें येथें एका प्रकारची मोहक शांतता होती. मधून मधून झाडांवर बसलेल्या चित्रविचित्र रंगांच्या पक्ष्यांचे मात्र मंजुळ स्वर कानीं पडत होते. कांहीं घारी आपले विस्तीर्ण पंख पसरून व चिल्‌चिल् असा कर्कश व लांब आवाज करीत, आकाशांत गिरके घालीत, किंवा संथपणानें उडत होत्या; त्यामुळें जणू ह्या रात्रीच्या मुली अंधःकाररूपी स्वपित्याच्या ज्येष्ठबंधूला पाहून हर्षभरित होऊन ओरडत व बागडत तेजोनिधीला भेटायाला जात आहेत, किंवा आकाशमहासागरांत ह्या लहान नौकाच आपलीं शिडें उभारून गमन करीत आहेत, असें वाटे. तसेंच कांहीं गीध आपलीं मळकट पंखें पसरून फरारे मारीत होते; ह्यामुळें पृथ्वीवरील सर्व प्रकारचा दुर्गंध व घाण ह्यांचा स्वप्रकाशानें सूर्य संहार करीत असतां, त्यांनीं ह्या पक्ष्यांच्या रूपानें आपलीं मुलें रदबदली करण्याकरितां पाठविलीं आहेत असें वाटे. कित्येक पोपट सुरेख व लांब शेंपट्या व हिरवे पंख आपल्या लाल चोंचींनीं विंचरीत निंबाच्या व आंब्याच्या झाडांवर बसले होते. इतका वेळ नानाप्रकारचे पशुपक्ष्यांस पीडा होण्यासारखे उपयुक्त व्यासंग करून कांहीं कृष्णमुख शाखामृग आपले लहानसे चंचळ डोळे इकडे तिकडे फिरवीत, झाडांवर विश्रांतीसाठीं ह्मणून मुखचेष्टा करीत बसले होते. कांहीं शाखामृग एका हुप्याच्या सभोंवार वर्तुळाकार बसले होते; त्यामुळें आपला पूर्वज जो अंगद त्यानें पूर्वी कशी शिष्टाई केली, ह्याचा नाट्यप्रयोगच त्यांनीं चालविला आहे कीं काय असें वाटलें, किंवा **या उपरी काय कर्तव्यता** याचा विचार त्यांनीं चालविला आहेसें दिसलें. कांहीं मोर आपला पिसारा उभारून

लांबोरींना शोभा दाखवीत होते, त्यामुळें अकाळीं इंद्रधनुष्य पडल्याचा भास होई. सूर्याच्या तुरळक किरणांनीं तोष पावून कांहीं सर्पटोळी वेलांच्या वरल्या भागावर जात होत्या, हें केवळ त्यांच्या जाण्याच्या सळ् आवाजानें व पानें हलण्यानें मात्र समजे. वृक्षाच्या शाखेवरून एकादा नानेटा पतंगास धरीत आहे, हें पतंगाच्या गडबडीनें उडण्यानेंच कायतें कळून येई. स्वाभाविक धर्मास अनुसरून एका मर्कटानें पाल्यामध्यें पडलेल्या एका वातेऱ्या फुरशास दुखापत केली व त्याला स्वकर्मप्राप्तिही झाली, हें त्याच्या दुःसह वेदनेमुळें ओरडण्यानें व गडबडां लोळण्यानें समजत होतें. एक खोकट पिंपळाच्या बुंध्याच्या पोकळींतून आपलें तोंड बाहेर काढून, जवळच्या भोंकांतून कांहीं ससे जा ये करीत होते, त्यांना रात्रीं कसें पकडावें, याचा विचार करीत बसला होता. कांहीं रानडुकर झाडांच्या बुंध्यांशीं आपले दात घासीत होते. एक काळवीट व कांहीं चित्रांग निर्भयपणें एका विस्तीर्ण वडाखालीं बसले होते. दोन नीळगाई आपल्या शेंपट्या उभारून सहज लीलेनें शिंगांनीं टकरा देत होत्या. एकंदरीनें सर्व पशुपक्षी उदरपोषणार्थ इतका वेळ केलेले सर्व व्यापार टाकून देऊन त्या शांत वेळेला वश होऊन स्वस्थ बसले होते; त्यामुळें आपण कोणा पुरातन ऋषीच्या आश्रमांत तरी नाहीं आलों, असें त्या हरिसिंगाच्या टोळीला वाटलें असावें. मधून मधून पशुपक्ष्यादिकांत थोडीबहुत हालचाल होई, पण ती केवळ या वाटसरांच्या येण्यामुळें; कारण जसजसे हे वाटसरू पुढें जात, तसतसे वरच्या शाखांवरील पक्षी चिलबिल आवाज करून उडून जात, वानरें आपली सभा बरखास्त करून व आपल्या लांब शेंपट्या पाठीवर धरून व त्यांच्या माद्या पोटांशीं मुलें घेऊन चीं चीं आवाज करीत पळून जात. हरणांची तर तारंबळ विचारायाला नकोच. थोडी चाहूल लागली कीं, तीं आपले सुंदर नयन फिरवीत चपलतेनें उड्या मारून केव्हांच दृष्टीआड होत.

ही अपूर्व शोभा पाहत पाहत हे पांथस्थ हळूहळू वाटाड्यामागून जात होते. केसरीसिंगाला व त्याच्या तीन सोबत्यांना ज्यानीमुळें नानाप्रकारचे पशुपक्षी व ते गगनचुंबित वृक्ष पाहून साहजिक अति आनंद झाला, व त्यांना एका प्रकारचा उत्साहही आला. 'हा पहा तित्तीर उडाला, त्या पलीकडच्या जाळींत एकादा वाघ असेल, नाहीं वरें. आपण परत येतांना त्याला हात दाखवूं. काय करावें हा दिवस आहे. रात्र असती तर ह्या वाटेनें आपल्याला वाघ, चित्ते, तरस, लांडगा, कोळसुंदा अशीं जनावरें पाहायाला मिळालीं असतीं. अरे हरिसिंग, ह्या पिंपळाला पालवी किती मजेदार फुटली आहे; ती पहा तर खरी. काय हो तो पक्षी सुरेख आहे. काय त्याला चाष ह्मणतात. मला नाहीं वाटत तो असेलसा. त्याच्या पंखावरचा चित्रविचित्र रंग तर पहा' याप्रमाणें ते मोठ्यानें बोलत चालले होते. जातांना वरतीं नीळेंभोर आकाश मधून मधून उंचचउंच दिसत होतें; त्यामुळें ते आकाशभाग स्वच्छ व खोल जलाशय आहेत, किंवा वृक्षस्तंभांवर नीलमण्यांचे

दीर्घवर्तुल घुमट आहेत, असें वाटलें. कोमल व चकचकीत अशा हिरण्यागार व लाल पालवीवर सूर्यकिरणें पडून अलकाधिपति कुबेराच्या उद्यानांतील मरकतपर्णे व प्रवालमणी येऊन ह्या वनांतील वृक्षांना चिकटले कीं काय असें वाटलें. कोठें पिंवळीं, कोठें लाल, कोठें पांढरीं, निळीं, जांभळीं, पारवीं, गुलाबी अशीं वेलींवर फुलें पाहून जणू वनदेवतांनीं आपल्या अंगावर तशा ठिपक्यांचे उंच हिरवे दुकूल घेतले आहेत असें वाटलें. अगदीं सूर्य डोक्यावर आल्यामुळें ह्या मंडळीला थोडें ऊन लागलें, परंतु त्यापासून त्यांना ग्लानि न वाटतां उलटा तें सुखप्रद वाटलें.

कांहीं वेळानें ते **पावागडा**च्या ईशान्येस अगदीं पायथ्याशीं येऊन पोंचले. येथून चढण फार बिकट होती. डोंगराच्या पूर्व बाजूशिवाय सर्व दिशेस एकसारखे उभे कडेच तुटलेले होते, त्यामुळें तेथें झाडीही नव्हती व चढाव तर मुळींच नव्हता. ईशान्येच्या पायथ्यापासून तो थेट **कालिके**च्या शिखरापर्यंत सुमारें२कोस चढाव आहे. डोंगराच्या पूर्वेकडील बाजूवर चांगला भक्कम तट व बुरूज आहेत. किल्ल्याची रुंदी ( ईशान्येपासून तो नैर्ऋत्येपर्यंत ) पाऊण कोसावर आहे, व लांबी ( आग्नेयेपासून तो वायव्येपर्यंत ) एक कोसावर आहे. किल्ल्याचें अत्युच शिखर जमिनीपासून अजमासें १७०० हात उंच आहे.

**पावागडा**च्या उत्पत्तीविषयीं अशी कथा आहे कीं, पूर्वी ह्या स्थानाजवळ **विश्वामित्र** ऋषि तप करीत होता. एके दिवशीं **वसिष्ठा**जवळून घेतलेली त्याची कामधेनू येथील कड्यावर चरत असतां पाय चुकून खालच्या खोल दरींत पडली. तेथून तिला बाहेर निघतां येईना, ह्मणून तिनें आपल्या दुधानें ती दरी भरून काढली, व त्या दुग्ध सरोवरांतून ती पोहून ऋषीच्या आश्रमीं आली. पुन: असें होऊं नये, ह्मणून **विश्वामित्रा**नें आपल्या तप:सामर्थ्यानें एक मोठा पर्वत त्या दरींत टाकिला. त्या पर्वताच्या $\frac{3}{4}$ नें दरी बुझाली, व बाकीचा $\frac{1}{4}$ हल्लींचा **पावागड** (ह्मणजे पाव गड) होऊन राहिला.

डोंगराच्या ईशान्येकडील पायथ्यापासून सुमारें पाव कोस खडकाळ चढणावरून वर गेल्यावर **हरिसिंगा**च्या मंडळींना किल्ल्याचा बाहेरील तट लागला. येथें रखवालदाराची परवानगी घेऊन **अटक** महाद्वारानें ते आंत शिरले. पुढला दरवाजा साधारण मोडकळीस आला होता; परंतु वळणाचा दुसरा दरवाजा भक्कम व शाबूत होता. ह्या खालच्या तटाला जागोजाग मोठे जंगी बुरुज होते. आंत सुमारें ४५० कदमांवर त्यांच्या उजव्या बाजूला **हीना** नांवाचा एक चतुष्कोण तलाव व **हीना** महाल असे होते. पुढें पाव कोस चढल्यावर त्यांना दुसरा तट लागला. ह्या तटाच्या मोठ्या दरवाज्यानें आंत गेल्यावर ७५ कदमांच्या आंतच त्यांना एका पाठीमागून एक असे लागोपाठ वळणावळणावर तीन दरवाजे लागले. पहिला लागला त्याला **बुढीया** ( भाल्याचें बूड ) दरवाजा ह्मणतात; व सरतेशेवटल्याला **भालाफळ** ह्मणतात. हें काम फार मजबूत आहे, व वरच्या दरवाज्यावरून खालच्या दरवाज्यांवर गोळा चालवितां यावा अशी त्यांची बांधणी आहे.

ह्या मोठ्या दरवाज्याच्या आंत सुमारें ४०० हात जमीन सपाट आहे, व डाव्या हाताला एक कडा आहे, तेथपावेतों हा दुसरा कोट बांधून नेला आहे. नंतर तिसरा तट लागतो. ह्याच्यांतून आंत जाण्याला डोंगरावर पायऱ्या खोदलेल्या आहेत, त्यावरून वळणें घेऊन **सदनशाह** दरवाज्यानें ते आंत गेले. हा तट फारच मजबूत आहे; व दरवाज्याचे वुरुजही भक्कम व पुष्कळ उंच आहेत. ह्या तिसऱ्या तटाच्या आंत गेल्यावर उजव्या हाताला सुमारें १५० कदमांवर डोंगराला कडा लागतो. कड्याच्या अगदीं शेंवटाशीं स्वस्तीकाकृति चिरेबंदी खोली आहे, हींत चिऱ्यांच्या फटींतून पाहिलें ह्मणजे एक समाधि दिसते. 'ह्या समाधींत एक रजपूत राजकन्या जिवंत पुरली होती' असें त्यांच्या नायकड्या वाटाड्यानें सांगितलें. ह्या समाधीजवळ **सातमहाल** नांवाचा एक वाडा त्यांनीं पाहिला. त्यापैकीं चार मजले कड्यावर असून तीन डोंगराच्या तळांत कोरून केले होते. अगदीं तळमजल्यावरून खालीं पाहिलें तरी पाहणाराचे डोळे फिरतात इतकी खोल ती दरी आहे. **सातमहाला**च्या पश्चिमेस डोंगराचा कणा उत्तरेस उतरत गेला आहे. ह्या कण्यावरही एक तट आहे. ह्या तटाला **जुलानवदन** नांवाचा दरवाजा होता. ह्या तटाच्या आंत नागर ब्राम्हणांची राहण्याची **नागर हवेली** नांवाची इमारत होती. ह्या हवेलीच्या आग्नेयेस सुमारें ८०० हातांवर डोंगराच्या कपारीवर **पेहलवान** दरवाजा आहे. ह्या दरवाज्याचे थेट दक्षिणेस तितक्याच अंतरावर **चिरपाळा** दरवाजा आहे. **सदनशाह** दरवाज्यापासून सुमारें २०० कदमांवर डाव्या हाताला **माची हवेली** होती. येथें कांहीं दिवसांसाठीं ह्मणून **आपासाहेब पाटणकर** येऊन राहिले होते. हवेलीजवळच **तेलिया** तलाव आहे. ह्या तलावाच्या पश्चिमेस १४० कदमांवर **अन्नपूर्णा** तलाव आहे. ह्या **अन्नपूर्णा** तलावाच्या उत्तरेस सुमारें ३०० कदमांवर एक लहान तलाव व पांच विहिरी आहेत. ह्या पांचकुव्यांजवळ एक विटांची मशीद होती.

डोंगराच्या आग्नेयेस अगदीं टोंकावर तीन मोठे घुमट दिसत होते. ही मक्याची कोठारें होतीं. ह्यांच्याखालीं कडा एकसारखा ६०० हात तुटलेला आहे. ह्या कोठारांजवळच्या लहानशा तटाच्या आंत **श्री भद्रकाळीचें** देवालय आहे. तिचें ह्या भाटांनीं दर्शन घेऊन जवळचे **मोती** व **जव्हेर** तलाव पाहिले. तेथून ते पश्चिमेस थोड्या अंतरावर **पावागडाच्या चव्हाण** कुलांतील **पाटाई रावळांच्या** महालांत गेले. ह्या सर्व इमारती मोडकळीस आलेल्या पाहून त्यांना फार वाईट वाटलें. ज्या रजपुतांनीं आपल्या शौर्यानें मुसलमानांस त्राही त्राही केलें होतें, त्यांच्या वसतिस्थानांची दुर्दशा पाहून साधारण यःकश्चित मनुष्याला देखील खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं; तर मग त्या रजपुतांचें शौर्य, औदार्य, साहस, पराक्रम इत्यादि गुणांचे पोंवाडे गाणारे जे भाट त्यांना जिवाला आपलें वैभव लयास गेलें ह्मणून अतोनात संताप झाला, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. **हरिसिंगाला** थोडाबहुत क्रोध आला, व मनांत तो उद्विग्नही झाला. तो दांतओठ चा-

वून आपल्याशींच बोलूं लागला. 'काय चमत्कार आहे पहा. ही बोलून चालून आमची जन्मभूमि. परंतु इची सत्ता कोणाकडे तर परकी लोकांकडे. पूर्वीं अविंधांनीं नानाप्रकारें छळ व उध्वंस केला. आतां ह्मणायाला एवढें तरी सुख आहे कीं, सत्ताधीश निदान हिंदु तरी आहेत. हाय हाय, जेथें पूर्वीं **पाटाई रावळांचा** ध्वज फडकत होता, तेथें सर्पादिकांनीं आपली वस्ती करावी! धिक्कार असो आम्हाला! आमच्या शूर रजपुतांच्या हातांत बांगड्या भरल्या होत्या का? त्यांचें वैभव कसें लयाला गेलें? किंवा कालचक्रापुढें बापडा मनुष्य काय करणार? *श्री **भद्रकाळीचाच** क्षोभ झाला तेथें मानवी शक्तीचा पाड काय?'

**पाटाई रावळच्या** महालापासून वायव्येस सुमारें पावकोसावर १००० हात उंच असा डोंगरमाथा लागतो. ह्या रस्त्याला चढण फार आहे. ह्या माथ्यावर **महंमदशाह बेगडा** यानें आपला **मौलीय** नांवाचा बालेकिल्ला बांधला होता. हा दक्षिणोत्तर सुमारें $\frac{1}{2}$ कोस व पूर्वपश्चिम $\frac{1}{4}$ कोस असा आहे. ह्याला **पाटाई रावळच्या** महालाकडून येतांना **पाटियापूल** दरवाजा लागतो. ह्या दरवाज्यापुढें डोंगरांत बरीच खोल अशी खिंड खोदलेली होती, व त्यावर लांकडी तक्ते (पाटिया) घातले होते, म्हणून त्याला **पाटियापूल** दरवाजा म्हणतात. पुढें सुमारें ६०० कदमांवर ते डोंगरमाथ्याच्या कड्याच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचले. पुढें उत्तरेस कडेकडेनें वळणें घेऊन सुमारें ८०० हातांवर **तारा** दरवाजा लागतो. तेथून दगडी पायऱ्यांनीं सुमारें२०० हात कडा चढल्यावर एक चतुष्कोणी इमारत लागते. हिच्या पुढल्या भागाला **सूरज** (सूर्य) दरवाजा ह्मणतात, त्याच्या पाठीमागच्या बाजूस नगारखाना होता. **सूर्य** दरवाज्याच्या कमानीच्या आजूबाजूच्या भींतींत कांहीं जैन मूर्ती आहेत. नगारखान्याच्या दक्षिणोत्तर दोन्ही बाजूंस दहा हात उंच व मजबूत अशी दगडी भींत होती. ह्या माथ्याच्या बाकीच्या बाजूस सुमारें १४० हात एकसारखा कडा तुटलेला आहे, म्हणून संरक्षणासाठीं बांधीव कामाची जरूर नव्हती.

नगारखान्याचे थोडेसें वायव्येस थोडथोड्या अंतरावर कांहीं टांकीं आणि **सूरज, जमना** व **गंगा** कुंडें आहेत. त्याच्या थेट पश्चिमेस डोंगराच्या कपारीवर **नवलाख कोठार** म्हणून धान्य साठवायाच्या,विटांनीं भक्कम बांधलेल्या, अशा ७ खोल्या आहेत. ह्यांवर घुमट आहेत. नगारखान्यापासून थोड्या अंतरावर दक्षिणेस **विश्वामित्र** कुंड व तेथून सुमारें ६०० हातांवर **साचा** तलाव

---

* असें ह्मणतात कीं, **पाटाई रावळ श्री जयसिंह** ह्याच्या कारकीर्दीत नवरात्रांत एके रात्रीं कांहीं बायका गर्भे गात होत्या. तेथें तो **रावळ** गेला व त्या स्त्रियांपैकीं एकीच्या अप्रतिम लावण्याला मोहून त्यानें तिचा पदर धरिला. परंतु ती वस्तुतः **भद्रकाळी** मानवी रूप धारण करून नवरात्राच्या उत्सवांत गर्भे गायाला आली होती. त्यानें पदर धरतांच तिनें 'तुझें राज्य लौकरच लयास जाईल', असा त्याला शाप दिला, व पुढें त्याप्रमाणें घडून आलें.

आहे. या तलावाजवळ कांहीं लहान टुमदार जैन देवळें आहेत, त्यांवरचें कोरींव काम सुरेख आहे. तलावासमोर सुमारें १७० हात उंच टेंकडी आहे; त्या टेंकडीच्या पाठीमागें **दुधिया** तलाव आहे.

या टेंकडीवर जाण्यासाठीं **अलिजा बहाद्दर महादाजी शिंदे** यांनीं सुमारें १०० वर्षांपूर्वी २२६ पायऱ्या बांधिल्या होत्या. टेंकडीवर फड्या निवडुंग व वडाचीं झाडें बरींच आहेत. अगदीं टेंकडीच्या माथ्याशीं **श्री कालिकामातेचें** देऊळ आहे. मधली **श्री कालिकामातेची**, तिच्या डावीला **बेचराजीमातेची** व उजवीला **महाकाळीची**, अशा या देवळाच्या गाभाऱ्यांत तीन मूर्ती पूर्वाभिमुख आहेत. या देवळाच्या शिखरावर **सदनशाह** पिराचा दर्गा आहे. म्लेंच्छांनीं आपल्या देवींची विटंबना करूं नये, म्हणून हा दर्गा तेथें असल्याचें पुजाऱ्यांनीं उठविलें आहे, असें सांगतात.

**श्री कालिकेचें** दर्शन घेऊन त्या भाटांनीं तेथें थोडा वेळ विश्रांति घेतली. **जालिमसिंग** तर बिचारा अगदीं थकून गेला होता, म्हणून तो सभामंडपांत कांहीं वेळ आपलें धोतर हांथरून त्यांवर पडून **हरिसिंगाशीं** बोलत होता. **केसरीसिंग** व ते तिघेजण त्या नायकड्याबरोबर टेंकडीवरून आसपासची शोभा पाहत होते.

ते अत्युच्च स्थानीं असल्यामुळें त्यांना चोहोंकडची मजा फार लांबवर दिसत होती. ज्या अरण्यांतून ते गेले तें एका लहानशा बागेसारखें दिसत होतें. पूर्वेच्या बाजूस कायती झाडी दिसत होती. बाकीच्या बहुतेक बाजूंस वृक्षादिकांचा अभावच होता; तेथें तुटलेले कडे व खोल दऱ्या यांशिवाय कांहीं नव्हतें. दऱ्यांत मात्र थोडीशीं झाडें वीत दीडवीत उंच अशा झुडुपांप्रमाणें दिसत होतीं. ते ज्या मार्गानें आले तो मार्ग वरून पाहिला असतां, इतका त्रासदायक व विकट असावा, असें मुळींच त्यांना दिसलें नाहीं. कारण तो मार्ग नीट झाडून साफसूफ केल्याप्रमाणें दिसत होता. **अटक** दरवाज्यांतून कांहीं मनुष्यें व स्वार येत होते, ते फार तर वीत उंच आहेतसें दिसत होतें. **माची** हवेली, मोठा दरवाजा इत्यादि कामांवर सूर्यप्रकाश पडून तीं जणू कांहीं सुवर्णाच्छादित आहेतशीं वाटलीं. डोंगरावरील निरनिराळ्या तलावांवर सूर्य किरणें पडून त्यांतील पाणी चांदीच्या रसाप्रमाणें चकचकीत दिसत होतें. **कालिका** मातेनें कोपयुक्त होऊन आपल्या असद्भक्तांस कड्यावरून लोटून दिल्यानें ते वृक्षमिषानें डोंगराच्या कपाऱ्यांतून जणू आसरा धरून राहिले होते. **गिरिजारमणानें** स्वप्रियेसाठीं नभरूपानें इंद्रनीलमणींचें निष्कलंक वितान पसरलें होतें, व तिला सूर्य हा दीप दिला होता. पृथ्वीस ताप देण्यासाठीं सूर्य सरसावला असतां तिचा पुत्र **पावागड** आपल्यास दंड करण्यासाठीं वर उच्च होत आहेसें पाहून, त्यानें सायंकाळ साधून आकाशांत पलायन केलें, व भीतीनें त्याचें तेजपतनही होऊं लागलेसें भासलें.

अशी ती अवर्णनीय शोभा पाहत असतां त्यांना मुळींच कंटाळा आला नाहीं. ती पाहण्यांत ते अगदीं गुंग झाले होते. 'जातां-

ना रात्र झालेली चांगली नाहीं, आतां पाहुणे पुरे झाले. काय आहे, त्या खोऱ्यांत व झाडांत पाहायाचें, कोण जाणे. चलतां कां नाहीं, कां आम्ही पुढें जाऊं ?' असें जेव्हां **जालिमसिंगानें** ५–६ दां म्हटलें, त्यावेळेस **केसरीसिंगा**ची मंडळी मोठ्या कष्टानें व नाखुशीनें तेथून माघारी परतली. त्या टेंकडीवरून ते खालीं उतरले, तों त्यांना दोन मराठेशाई पोषाख केलेले शिपाई भेटले. त्यांपैकीं एकानें **हरिसिंगा**ला म्हटलें ' मला वाटतें, तुला मीं कोठें तरी पाहिलें आहे. तूं कोठून आलास?' **हरिसिंगानें देवगडाहून** आलों, वगैरे सांगितलें व म्हटलें ' आपण त्यापेक्षां थोडी जास्त सभ्यता दाखवाल, तर ठीक पडेल. अरे तुरे करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं'. तो मराठा शिपाई म्हणाला 'मला दरडावतोस ? तुला माहीत नाहीं मी कोण आहे तो ? **बाबासाहेबां**ना सांगून एकदम तुला अडकवून टाकीन समजलास.' **हरिसिंग** रागावून म्हणाला 'माझ्या अंगाला हात लावण्याची कोणाची मगदूर आहे ती पाहतोंना. मी एवढेंच म्हणतों कीं, अनोळखी मनुष्याला एकदम अरे जारे करण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं. आणि फिरून तसें बेअदबीनें बोलाल, तर माझ्या कामीं मुळींच पडणार नाहीं.' हें भांडण विकोपास जाईलसें पाहून त्या शिपायाचा सोबती त्याची समजूत करूं लागला. तो म्हणाला 'जाऊं या, **सटवाजीराव**, तुम्ही त्या यात्रेकरू भाटांच्या नादीं कां लागतां ? (व **जालिमसिंगाकडे** वळून) म्हातारेबुवा, मुलाला आपली कडक तब्यत ताब्यांत ठेवायाला सांगाल तर बरें होईल. सहज कोणी अरेजारे म्हटलें, म्हणजे त्याच्या मनांत अपमानच, करावयाचा असतो असें होत नाहीं. बरें तें राहूं द्या. तुम्ही सर्व जण मिळून नंतर जाणार कोणीकडे ?' **जालिमसिंगानें** '**अहमदाबादेस**' म्हणून सांगतांच, '**सटवाजीराव**, अहो त्यांच्याशीं भांडण्यांत मुळींच अर्थ नाहीं; कारण त्यांची सोबत आपल्याला कदाचित् मिळेल,' असें हळूच त्यानें **सटवाजी**च्या कानांत सांगितलें. **सटवाजीनें** नंतर विचारिलें 'बरें बावाजी, आपण केव्हां निघणार ?' 'परवाच्या दिवशीं' असें **जालिमसिंग** म्हणाला.

'मग तर फारच नामी गोष्ट, कारण **बाबासाहेब कोतवाल** व आम्हीं त्याचदिवशीं **अहमदाबादेस** जाण्यासाठीं येथून कूच करणार आहों. त्यामुळें एकमेकांना आपली सोबत फार कामीं पडेल. आम्हांला कळविल्याशिवाय मात्र जाऊं नका, व बोलल्याचालल्याचा राग मानूं नका. बरें तर येतों, रामराम ' असें तो दुसरा शिपाई म्हणाला.

ते भाट गेल्यावर **सटवाजी** म्हणाला 'विठूजी गड्या, फार छान गोष्ट झाली. आतां आपण बेदरकार असूं.'

## भाग ३ रा.

### संदर्भ.

सत्संगें खलजन साधु सत्य होती । साधूंना परि खलता न दुष्ट देती ॥
मातीला कुसुम सुवास देत पाहे । मातीचा कुसुम न वास घेत आहे ॥
सुभाषित ॥

वर सांगितलेले भाट **पावागडावरून** उतरून गेल्यावर संध्याकाळीं **माची** हवेलीच्या उत्तराभिमुख सज्ज्यांत दोन तरुण गृहस्थ एका गालिच्यावर बोलत बसले होते. त्यांपैकीं एकजण वयानें सुमारें वीस बावीस वर्षांचा होता. हा तक्याला टेकून बसला होता. हा फारसा गोरा नव्हता, परंतु ह्याचे तोंडावर ऐश्वर्याचें तेज झळकत होतें. ह्याचा चेहरा नेहमीं हंसतमुख असे. एकंदरीनें हा मनाचा मोकळा व कारस्थानांचा मनापासून तिटकारा करणारा असावा, असें दिसत होतें. मग ह्याची ही नैसर्गिक प्रवृत्ति होती, किंवा वैभवामुळें व जगाचा नुकताच अनुभव घेऊं लागल्यामुळें ह्याच्या उदारवृत्तींत पालट झाला नव्हता, कोण जाणें. हा मोठा उरसील व कसलेल्या अंगाचा होता, आणि ह्याचा बाणा वीरश्रीचा व मर्दुमकीचा होता. ह्यानें डोक्यावर सर्व केश ठेविले होते, ते तेल लावून व साफ विंचरून बांधिले होते. ह्याला फारशा मिशा आल्या नव्हत्या, तरीही पण त्यांना तो वरचेवर हातानें पीळ देत बसला होता. ह्यानें हनवटीच्यामध्यें दाढी करून बाजूला गलमूछ ठेविले होते. ह्याच्या उजव्या कानांत टपोऱ्या मोत्यांची भीकबाळी होती. उजव्या दंडाला सोन्यानें मढविलेल्या भारलेल्या ताइताची पेटी बांधली होती, व उजव्या मणगटावर पोहोंची होती तिजवर एक मोठें माणीक बसविलें होतें. बोटांत पाणीदार हिऱ्याची आंगठी होती. बोलतांना उजवा हात खालीं वर होत असे, त्यावेळीं पाहणाराचे डोळे त्या हिऱ्याचे तेजानें एकदम दिपत. ह्याच्या गळ्यांत पाचेची कंठी व अरगज्याची माळ होती, आणि पायाच्या अंगठ्यांत रणजोडवीं होतीं.

ह्याच्या डोक्याला उंची चंदेरी शिंदेशाई धर्तीचें बांधलेलें गुलाबी पागोटें होतें. कानांत उत्तम गुलाबी अत्तराचा फाया होता. अंगांत खंबायती वादली बंडी आंतून व वरून आगावानीचा साधारण पायघोळ अंगरखा घातला होता. मणगटांवर अस्तनीच्या शेवटीं उलटलेले कुलाबे होते, व अस्तन्यांना कोपरापर्यंत चुण दिली होती. पायांत गजनीचा चोळणा घातला होता. डाव्या हाताला एक सुवासित जरीकांठी गुलाबी शेला ठेविला होता. हा उजवी मांडी पालथी घालून लोडाशीं टेकून बसला होता, व ह्याचे पुढेंच एक सुबक तरवार होती. हिचें म्यान जरतारी मखमलीनें मढविलेलें होतें. कवज्यावर सुरेख जडावाचें काम असून त्यांत एक मोठा पाचेचा खडा बसविला होता.

ह्यांच्या डाव्या हाताला गालिच्याचे टों-कावर दुसरा इसम मांडी घालून बसला होता. ह्याचे डोक्याला बडोदेशाई ब्राह्मणी-घाटी केशरी पैठणी पागोटें होतें. अंगांत नुसता महमुदीचा कंबरपटीचा अंगरखा घातला होता. हा वीतभर रेशमी करवती कांठाचा धोतरजोडा नेसला होता. बाजूला केशरी शेला ठेविला होता. ह्याचे कानांत एक मोठी भीकबाळी, बोटांत सोन्याचें जोडवें व वळें आणि गळयांत सोन्यानें मढविलेले बारीक रुद्राक्ष व मोती ह्यांची कंठी होती. हेच ते **अहमदाबादचे बाबासाहेब कोतवाल**; व पहिले मराठे, **बापूसाहेब पाटणकर** सरसुभेदार यांचे चिरंजीव सरदार **आपासाहेब** हे होत.

कांहीं इकडलीं तिकडलीं बोलणीं झाल्यावर **बाबासाहेब** ह्मणाले—आपण कांहीं म्हणा, पण साहेब आज आपली कांहीं नेहमीची उल्लासवृत्ति दिसत नाहीं. कोणता तरी हृद्रोग चैन पडूं देत नाहीं, असें आपली उदासीन मुद्रा पाहिली म्हणजे वाटतें. मजकडून त्याचा परिहार होण्यासारखें असल्यास आपण कळवालच. परंतु आपण ज्या अर्थी इतका वेळ चिंतातुर बसून कांहींच त्याविषयीं उल्लेख करीत नाहीं, त्या अर्थी तें कांहीं खेददायी प्रकरण असावेंसें वाटतें; व त्यामुळें मला जास्त भीति व शंका वाटूं लागली आहे.

**आपासाहेब-बाबूराव,** तुह्मी म्हणतां, तितके कांहीं आम्हीं गूढ विचारांत पडलों नाहीं, व त्यामुळें आमच्या वृत्तींत तसे फेरफारही झाले नाहींत. तुमच्यापासून छपवून ठेवण्यासारखेंही विशेष कांहीं नाहीं, व यदाकदाचित तसें असतें तरीही आम्ही म्हणजे तुम्हाला कळविल्यावांचून राहिलों असतों असें कालत्रयीं घडलें नसतें. कारण ज्या कामीं आम्हाला विचार पडला, तेथें तुमच्या सारख्याचा सल्ला अवश्यमेव उपयोगी पडायाचा, हें आम्ही समजून आहोंतच. विशेष म्हणण्यासारिखें कांहीं नाहीं. फक्त दोन घटकांपूर्वी जासुदांबरोबर हें पत्र **बाबासाहेबांकडून** आलें. त्यांतील रोख जरा लावून आहे, म्हणून वाईट वाटतें. हें पत्र मोठ्यानें वाचा, म्हणजे आमच्या समजुतींत कांहीं तफावत केली पाहिजे कीं काय, हें समजेल, व तुमच्याही ध्यानांत सर्व मजकूर येईल.

**बाबा०**—( पत्र घेऊन वाचतो ).

## श्री शंकर.

चि. राजेश्री **आप्पासाहेब** मु. किल्ले **पावागड** यांसि अनेक आशिर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत मित्ती माघ वद्य १३ रोज गुरुवार शके १७३३ पावेतों ठाणें **द्राहद** ( दोहद ) येथें श्री शंकरकृपेंकरून सुखरूप असों विशेष. तुह्माकडून जासूद जोडीबराबर पत्र आलें तें पावलें. सर्व मजकूर समजला. आपले व्याही रा. **दौलतराव शिंदे** अलिजाबहादूर यांजकडोन शहर **उज्जैन** येथून स्वाराबराबर शुद्ध पंचमी मित्तीचा कागद आल्यांत तिकडील सर्व मंडळी सुखरूप असलियाचें समजलें. संतोष जाहला. **शिंदे** अलिजाबहादूर मातबर सरदार आणि फौजबंद. श्री सांबकृपेनें त्यांचा आमचा शरीरसंबंध घडों आला. आह्मी त्यांजसीं बरोबरी न करावी. गोष्ट खरी. तथापि संबंध घडलियावर वागणूक संबंधाप्रमाणें राहावी हेंच वाजवी. मशारनि-

ण्यांत प्रमदाजाळांत कसे गोंवले जातात ते. तेव्हां आपल्या वडिलांनीं सूचनार्थ राग येण्यासारिखें लिहिलें असावें. हेतु मिळून इतकाच कीं, तशी बुद्धि वळल्यास आपलें लिहिणें अंजनाप्रमाणें व्हावें; बाकी कांहीं नाहीं.

आपा—तुह्मी म्हणतां तें सर्व खरें, तथापि त्यांनीं टोचून लिहावयाचें नव्हतें; कारण आमचें पाऊल न्याय्य मार्ग सोडून भलत्या ठिकाणीं पडणार नाहीं, अशी त्यांची बालंबाल खात्री होऊन चुकली आहे. आतां वेळ आली म्हणून बोलतों. आमच्या मनाचा ओढा तिच्याकडे नाहीं असें कांहीं नव्हे. दोन वर्षें होतील आम्हीं तिला पाहिलें होतें. तेव्हांपासून आजतागाईत तिच्या मूर्तीशिवाय परकीला आमच्या हृदयांत ठाव नाहीं. तिच्या वयाची कोणतीही परकी स्त्री आमच्या दृष्टीस पडली कीं, ती पुढें येऊन अगदीं डोळ्यापुढें उभी राहते. म्हणून म्हणजे तिच्यासाठीं लौकिकाला लांछनास्पद रीतीनें आजतागाईत वागलों नाहीं, आणि पुढें तर वागण्याचें नांवच नको. मनाच्या बाह्य प्रवृत्तींवर आपला दाब ठेववत नाहीं, तर तो मर्द कसला?

बाबा—(मनांत) काय डौल मारतो आहे पण? अजून विशी उलटली नाहीं तोंच इंद्रियनिग्रहाच्या बाता झोंकतो आहे. बाबा, कामराजाचा जोंपर्यंत पूर्ण अंमल बसला नाहीं, तोंपर्यंतच ह्या सर्व गप्पा. अजून कसरत, शिकार इत्यादि गोष्टींत मन रिझलें आहे, म्हणून स्त्रियांना अवसर मिळत नाहीं. थोडे जास्त दिवस जाऊं द्या, म्हणजे मदनाचा इंगा समजेल, बरें. (मोठ्यानें) विचार करून पाहतां आपण म्हणतां ह्यांत बरेंच सत्य आहे. परंतु हल्लींच्या काळांत असे इंद्रियदमन करणारे पुरुष फारच विरळा. त्यांच्यानें म्हणजे इंद्रियें स्वाधीन ठेववणार नाहींत असें मुळींच नसतें, परंतु त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना लहानपणापासूनच असें वळण मिळालें असतें कीं, कोणीकडून तरी सुखानें कालक्षेप करावयाचा. प्रस्तुतच्या सुखसाध्य क्षणिक भोगाकडे लक्ष देऊन आपल्या ऐहिक व पारत्रिक चिरकालिक सुखावर पाणी सोडावयाचें; ह्याचा दोष बहुश: शिक्षण, संगति ह्या बाह्य कारणांवरच अवलंबून असतो. मनाचा साहजिक कल दुराचाराकडे जरी असला, तथापि सुसंगतीमुळें त्या कलावर बराच दाब बसतो, व स्वाभाविक वाईट प्रवृत्तीचा मनुष्य, प्रसंगानुसार सज्जनही बनतो, तर मग ज्याची प्रथमत:च साहजिक निंद्य कामाविषयीं उदासीन वृत्ति तो महत्संकटांत मोह पावणार नाहीं हें सत्य आहे; तितक्यांतही नित्य कुसहवासामुळें त्याचें देखील व्रत कदाचित् ढळण्याचा बराच संभव असतो. पण मला असें वाटतें कीं, अशा मनुष्याचें कुमार्गी पाऊल पडल्यास तो म्हणजे सर्वथैव दोषास पात्र होतो असें नाहीं.

आपा०—काय तुम्ही सांगतां, बाबूराव? आमचा तर असा पक्का ग्रह झाला आहे कीं, जे मनुष्य केवळ बाह्य कारणांवरच हवाला ठेवितात त्यांच्यांत आत्मसंयमन, स्वाश्रय इत्यादि पुरुषलक्षणांचा अभावच म्हणावयाचा. बाह्यकारणांनीं पुरुष म्हणविणाऱ्या मनुष्यावर आपला अंमल बजावावा, ह्यासारखें त्याला लांछनास्पद

दुसरें कांहीं नाहीं. कधींही न डगमगतां मी-पणा जो गमवीत नाहीं तोच धन्य व शूर.

**बाबा०**-(मनांत) जगाचा ह्यांना पूर्ण अनुभव आला नाहीं, म्हणूनच असें मुग्धत्वाचें बोलणें. ह्या बोलण्याची थोडक्या काळांतच परीक्षा होईलसें, ह्या पत्रावरून दिसत आहे. (उघड) साहेब, माझ्या बोलण्यानें म्हणजे खात्री होईल असें नाहीं. परंतु कालगतीप्रमाणें प्रसंग पाहून अगदीं मी मी म्हणविणाऱ्याला सुद्धां पाठ द्यावी लागते, असा मला पुष्कळदां अनुभव आला आहे. आपला अनुभव कदाचित् आजतागाईत निराळा झाला असेल. परंतु ह्या उपरांत कधीं ना कधीं तरी आगंतुक कारणामुळें चांगल्या मनुष्यालाही कसें वांकावें लागतें, ह्याची प्रचीति आपल्याला आल्याशिवाय राहणार नाहीं, असें मला खास वाटतें.

**आपा०**-(हंसून) भविष्य सांगण्यांत तुम्ही बरेच निष्णात दिसतां. बरें तें तूर्त राहूं द्या. तें पत्र द्या पाहूं. ( पत्र घेऊन फिरून वाचून विचार करितो व म्हणतो) पण आमचे श्वशुर असें लौकिकाविरुद्ध मार्गणें लावितील, असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. ते रीतिरिवाजाविषयीं अनभिज्ञ आहेत, अशी शंका घेणेंच म्हणजे प्रमाद होय. पण आमचे **बाबासाहेब** तर स्पष्ट पत्रीं कळवितात कीं, अलिजा बहादुरांनीं खास तसें शिष्टसांप्रदायाला सोडून लिहिलें आहे म्हणून. ह्यांत कांहीं तरी निःसंशय गूढ आहे. ह्याचा उलगडा झालाच पाहिजे. कांहो **बाबूराव**, तुमच्या बुद्धीला काय येतें?

**बाबा०**-हें प्रकरण बरेंच नाजूक आहेसें वाटतें. आपल्यास **उज्जैन** मुकामीं बोलाविलें आहे ह्यांत तिलप्राय संदेह नसावाच; कारण आपले वडिलांनीं तसें स्पष्ट लिहिलेंच आहे.

**आपा०**-मग आमचे श्वशुरांनींच असें लिहिलें म्हणतां?

**बाबा०**-माझ्या अल्पमतीचा तर्क असाच झाला आहे. परंतु तसें जरी खरें असलें, तथापि त्यामुळें म्हणजे आपल्या श्वशुरांवर अनभिज्ञतेचा दोषारोपच होईल असें मुळींच नाहीं.

**आपा०**-(रागावून)असें कसें म्हणतां? एक जर पूर्वोक्त खरें, तर श्वशुर दोषार्ह होतातच.

**बाबा०**-असें मुळींच होत नाहीं. त्यांतही पर्याय आहेतच. आपले श्वशुर राज्यधुरंधर आहेत, तर त्यांना ही क्षुल्लक गोष्ट अवगत नसेल हें संभवेल तरी कसें? म्हणून हें खास कांहीं तरी कारस्थान आहे.

**आपा०**-(संतापून) मग तर फारच शरमेची गोष्ट म्हणावयाची.

**बाबा०**-शांतपणानें खुलासा निघेलसें वाटतें. आपण न रागावतां मेहेरबानीनें मला कांहीं गोष्टी कळवाल, तर—

**आपा०**-(घाईनें) त्यांत रागावण्याचें आम्हाला मुळींच कारण नाहीं. कोणीकडून तथ्य निघाल्याशीं कारण. काय विचारावयाचें तें विचारा.

**बाबा०**-( हळूच ) अलिजाबहादुरांच्या मनांत आपल्या वडिलांनीं सकुटुंब राजधानींत आपल्याजवळ येऊन राहावें असें कांहीं वागत असेलका? परस्पर त्याह्यांचे संबंध आपल्याला पूर्णपणें माहीत असल्यामुळें आपण हें सांगूं शकालच.

**आपा०**–फक्त आम्हांला बोलाविलें ह्यावरून जर तसा सिद्धांत काढला, तरच तसा हेतु आहे असें म्हणतां येईल.

**बाबा०**–पण ह्यापूर्वी कधीं पर्यायानें तसा उल्लेख केल्याचें आठवतें का?

**आपा०**–(स्मरून) सुमारें दोन महिन्यां. पूर्वी 'आपल्या भेटीची आम्हांस फार उत्कंठा झाली आहे' असा एके पत्रीं मजकूर होता. परंतु आमचे **बाबासाहेबांना** ह्यामुळें फार राग आला.

**बाबा०**–कां बरें, ते रागावले असावेत?

**आपा०**–आम्हीं **चिंतोपंत** कारकुनांना ह्याविषयीं खाजगत विचारिलें. ते म्हणाले 'ह्या परगण्यांतील कांहीं साहुकारांनीं आपल्या वडिलांविरुद्ध **उज्जैन** मुकामीं खोटा गिल्ला केला. तो खरा वाटून **शिंदे** अलिजाबहादूर ह्यांनीं असा भेटीचा निरोप पाठविला, अशी वडिलांची समजूत झाली असावी.'

**बाबा०**–झालें तर मग; आतां बहुतेक सर्व ग्रंथ लागला. अलिजाबहादुरांनीं पाहिलें कीं, पर्यायानें प्रथम निरोप पाठवून कार्यसिद्धि झाली नाहीं. म्हणून त्यांनीं हा दुसरा निरोप जास्त खुबीदार असा पाठविला. ही त्यांनीं मसलत योजिली. कारण आपले वडील आपल्यास एकटें न पाठवितां पूर्वीच्या भेटीचा मजकूर लक्षांत आणून कुटुंबासह राजधानींत येतील, व तेथेंच त्यांना कांहीं काम देऊन आपोआप मालस्तीचा निकाल लागेल, असें आपल्या श्वशुरांना वाटलें असावें. आणि गिल्ल्याचा पूर्ण तलास करूनच त्यांनीं असा मनसुबा केला असावा. कारण कागाळ्या खऱ्या असोत किंवा खोट्या असोत, जर रयत नाखुष आहे, तर कोणत्या तरी रितीनें कोणाचेंही मन न दुखवितां आपल्याकडे वेडेपणाचा दोष घेऊन हें त्यांनीं केलें ह्यांत मुळींच संशय नाहीं. परंतु आपल्या वडिलांच्या पत्रांवरून पाहतां, ही मसलत एकंदर फसली असें दिसतें, व त्यामुळें त्यांची मर्जी नाखुष झाली आहे. त्यांच्या मनांत एकंदर निराळाच घाट घालण्याचें आलें आहे.

**आपा०**—(मनांत) रयत नाखुष कां आहे, हें माझ्या मनाला माहीत. आपण काय बोलावें येथें? आपलेच दांत व आपलेच ओंठ. घाटही समजला, परंतु आपल्याला बाबांविरुद्ध जातां कामा नये. बाबांशीं सामोपचारही कामीं पडणार नाहीं. जें जें होईल तें निमुटपणें पाहण्याची वेळ आतां आली आहे. इकडे आड व तिकडे विहीर. अलिजाबहादुरांचें करणें न्याय्य व दूरदर्शी आहे. आणि बाबांना तें न रुचून झुंजार करून रयतेवर केलेल्या जुलमाला न्याय्यपणा आणवूं पाहतात. तरीही बाबांची आज्ञा मोडतां येत नाहीं, व उघड त्यांना बोलतां येत नाहीं. त्यांनीं जो पक्ष स्वीकारिला तो मान्य झालाच पाहिजे. मघांच्या बोलण्याला कीं हो ह्या चमत्कारिक बिकट प्रसंगानें हरताळ लागणार. ह्यांतून सुटण्याचा उपाय तर सुचत नाहीं. असो, भिऊन काय कामीं पडणार? (उघड उदास होऊन) **बाबूराव,** सर्व ध्यानांत केव्हांच येऊन चुकलें. आम्ही मोठ्या फिकिरींत पडलों आहों. एकंदर प्रसंग मोठा आणीबाणीचा आला आहे. पण असें उदासीन बसणें आम्हांला मुळींच शोभत नाहीं.

प्रसंगाला तयार असलें पाहिजे, झालें. मग जें व्हायाचें असेल तें होवो.

बाबा०—साहेब, आपण त्याविषयीं विचार करून जीवाला उगाच खेद मात्र करून घेत आहां. श्रीसांबकृपेनें सर्व कांहीं सुरळीत शेंवटास जाईल,व व्याह्यांमधील हल्लींचा बेबनाव थोड्याच दिवसांत मिटेल. व्यर्थ काळजी करून काय मिळणार?

आपा०—बाबूराव, तुम्ही म्हणतां तें सर्व खरें, व आमचें मनही आम्हाला तसेंच सांगतें. पण काय करावें? हें वर्तमान ऐकिल्यापासून कांहीं केल्यानें मनाची पूर्वीची शांत वृत्ति परत येत नाहीं.

बाबा०—( मनांत ) ह्या व्यग्र चित्तवृत्तीला पूर्व स्थितीवर आणणें फारसें दुर्घट होणार नाहीं. ( उघड ) आपली मर्जी असल्यास मी विठूजी सातारकराला बोलावून आणूं का? त्याचा गळा चांगला आहे व घटकाभर तो सहज करमणूक करील. आतां वेळही फार नामी आहे, तर मग—

आपा०—( मध्येंच,आनंदानें म्हणणें कबूल करून ) हो हो बोलवा त्याला. एवढेंच कीं, परवांसारखी चीज काढल्यास मात्र आमच्या कामीं पडणार नाहीं. सर्व वेतानें असूं देण्याविषयीं ताकीद द्या, म्हणजे झालें.

थोड्या वेळानें बाबासाहेब विठूजीला घेऊन आंत आले. विठूजी आपला डफ घेऊन एकटाच आला होता. त्यानें आपासाहेबांना लवून मुजरा केला. चुडी पौर्णिमा झाल्यापासून एकसारखा गडावरील मराठे लोकांत लावण्यांचा सपाटा चालला होता; व पुढें विठूजी सातारकर आल्यावर तर एक रात्रही तमाशावांचून सुनी गेली नाहीं. वास्तविक आपासाहेबांना तमाशाचा कंटाळा असे. ते म्हणत 'ह्या असल्या बाईल, अप्रयोजक व हलकट व्यवसायामध्यें शिपायांनीं शिकारीसारखे पुरुषांस योग्य असे व्यासंग टाकून रमावें हें निंद्य आहे;' व त्याप्रमाणें ते परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें तमासगिरांसारख्या भुक्कड मंडळींना कोणत्याही प्रकारचें उत्तेजन देत नसत. दोन तीन दिवसांपूर्वी बाबासाहेबांच्या आग्रहावरून म्हणून त्यांनीं वाड्यांत विठूजीचा तमाशा करविला. परंतु विठूजीनें स्वधर्मास अनुसरून आपासाहेबांस विभत्स रस आवडेल असें समजून आपल्या पोऱ्याकडून फाजील हावभाव करविले. आपासाहेबांस हें मुळींच रुचलें नाहीं; परंतु भर बैठकींमधून उठून लोकांचें मन दुखवावें हें त्यांना प्रशस्त वाटलें नाहीं, म्हणून तमाशा संपेपर्यंत ते तसेच मोठ्या नाखुषीनें तेथें बसले, व त्यांनीं बाबासाहेबांना नंतर बराच दोषही दिला. असो.

विठूजी थोड्याच अंतरावर जाऊन बसला,व डफावर थाप मारून कडकड आवाज काढून पुढील लावण्या तालावर व सुरावर म्हणूं लागला.

*किति कुसुमायुध निर्दय
अंतक पाठवि मेघासुरा ।
धनुष्य ज्याचें इंद्रचाप जें
वर्षे धारा शरा ॥ ध्रु० ॥
कोकिलकूजित चूतयष्टिनीं
ताडित मी जर्जरा ।
तप्ततैल कीं भासत कर्णा
अलिगुंजारव खरा ।

* एक विरहिणी मदनास उद्देशून म्हणते.

नूतन पल्लव फुटति पाडुनी
माझ्या हृदया चिरा ।
वसंत साह्या घेउनि मदनें ।
छळिलें मज पामरा ॥
तशांतही ग्रीष्मवीर सरकला ।
कामाहुतिला देह बरा दिसला ।
तापाविण्यातें मनिं किंतु न धरिला॥
विरहास्त्रानें कृशातनू जी
मार न हिजला बरा ।
कोण करी मम रक्षण ह्यांतुन
दिसत नसे आसरा ॥ १ ॥
प्रियसंगोत्सुक कशि तरी कष्टें
करितें कालक्रमा ।
मजला छळणें उचित नसें तुज
कथितें मदनाधमा ॥
शंबरसदनीं कशि झाली स्मर
तुजविण तव प्रियतमा ।
येइ जरी मम प्राणविसावा
कधीं न करि तो क्षमा ॥
क्षणांतही पळविल तुज तो कसा ।
कोपें शंकर त्रिनेत्र उघडी जसा ।
तव शौर्याचा कोणि न धरि भरंवसा।
मदनवीरहो सोडुन द्या मज
रति भगिनी मी स्मरा ।
दुष्ट न ऐकति मोह पावतें
भ्रांवा, पडतें धरा ॥ २ ॥

२

हे सखे तुं धीर धरी ।
सहन करी । विरह तरी ।
होन काय भेट खरी ॥ ध्रु० ॥

१ ' प्रवासास जातों ' असें म्हटलें असतां प्रियेची कशी अवस्था झाली, हें एकजण आपल्या मित्रास सांगतो.

फिरुन संग होत नसे गमे उमेला ।
नयन जलें भरुन येत शोक करी ।
' उगि उमे न शोक करी ' ॥ १ ॥
कमल जणू अश्रुबिंदु झळकती वरी।
पुसुन करीं हृदयताप दूर करी ।
' जाइ मी न भय न धरी ' ॥२॥
हंसुन तिनें वदन वरी उचलिलें जरा।
करुन त्वरा चुंबियलें म्हणत परी ।
' फसवणूक काय बरी ' ॥ ३ ॥

३ स्त्रीप्रशंसा.

जळतरंग । कळे न अंतरंग ।
न करि स्त्रीसंग । कवी किति सांगे ।
असत्य अवघें दुष्ट कवींच्या
द्वेषभाव मनिं वागे ॥ ध्रु० ॥
कशि इला । ह्मणूं चंचला ।
इनें झुलविला । सकल लोक तरि ।
पर्वतयुग धरि पर्वतसमपरी
स्थीर असे अंतरीं ॥ १ ॥
तळ नसे । उदधिजळ जसें ।
विबुधजन कसे । तिच्याप्रति जाती ।
गंभिरता गुण दूषित नाहीं
सुज्ञां गुणप्रीती ॥ २ ॥
नदि जशी । जाय जलधिसी ।
जनांस ही तसी । गती सुमुखीला ।
बलवंताचा उचित असे तो
आश्रय धरण्याला ॥ ३ ॥
कशि बली? । होत निर्बली ।
भृंगपरिमळीं । श्रेष्ठ कोणता ।
आकर्षण जो करी जीववी
तोषवि जो चित्ता ॥ ४ ॥

४

*[स्त्री म्हणते]—

उडविली कशीं पिचकारी ।
पाहिली शालु जरतारी ॥ध्रु०॥

[पुरुष म्हणतो]—

दिन रंगपंचमी आज ।
कां नसति धरीजे लाज ।
रंग टाकला । डाग झांकला ।
शालु नासला नाहीं ।
अग भिऊं नको तूं कांहीं ॥ १ ॥

[स्त्री म्हणते]—

कशि आतां बाहेर जाऊं ।
भिजविला पदर हा दावूं ।
मैत्रिणि बघती । थट्टा करिती ।
बोल बोलती साहूं ।
मी वरति कायहो पाहूं ॥२॥

[पुरुष म्हणतो]

उगि कशास कष्टी होसी ।
मी शालु फेडि तो नेसी ।
दुसरा वर तो । पदर आणितों ।
नवरा मी तो कांगे ।
तूं अंग चोरिसी मागें ॥ ३ ॥

ह्याप्रमाणें लावण्या म्हटल्यावर विठूजीला रजा देण्यांत आली.

आपा०—बाबूराव, ह्या सरतेशेंवटल्या लावणीशिवाय आज विठूजीनें फारसा ताळ सोडला नाहीं, हें बरें झालें. पण एका लावणींत स्त्रियांची इतकी स्तुति केली आहे, ती जास्त आहे असें नाहीं तुम्हांला वाटत ?

* रंगपंचमीच्या दिवशीं तरुण दंपत्यामध्यें झालेला विनोद.

बाबा०—हो खरेंच, ह्या प्रश्नानें मला बरी आठवण झाली. यःकश्चित साधारण वेडसर मनुष्यही ज्या चुका करणार त्यापेक्षांही किंबहुना जास्त ढोबळ चुक्या, मनुष्य एकदां का स्त्रियांच्या मोहजालांत सांपडला, म्हणजे करितो, व आपला जीव धोक्यांत घालतो. मग तो किती कां शहाणा असेना. त्याचें शहाणपण या धुंदीमध्यें एका बाजूलाच राहतें. म्हणून स्त्रियांचे ठायीं सामर्थ्याचा आरोप एकाएकीं खोटा म्हणतां येणार नाहीं.

आपा०—बरें, जें तुम्ही इतकें प्रतिपादिलें, त्याला कांहीं प्रमाण ?

बाबा०—होय, तेंच मी सांगतोंना आतां. आमच्या अमदावादेसच असें एका स्त्रीलंपट पुरुषाकडून घडलेल्या प्रमादाचें उदाहरण झालें. गेल्या वर्षी ह्याच दिवसांत, किंवा मला वाटतें कीं पौषांत असेल, एक बुलाखीदास नांवाचा, अमदावादेचा प्रसिद्ध सावकार, वयानें सुमारें ३५ वर्षांचा म्हणजे साधारण उतार वयाचा म्हटला तरी चालेल असा, एका गरती नागर तरुण स्त्रियेला भाळला. त्याचा काम कांहीं दिवसांनीं इतका बळावला कीं, त्यानें द्रव्यादि सामोपचार तिच्या घरच्या माणसांच्या भीतीमुळें न योजतां तिला पळविण्याचा बेत केला.

आपा०—काय, इतका अधमपणा करावयास तो तयार झाला ? त्याचा तो बेत निष्फळ झाला असेल, नाहीं बरें.

बाबा०—( मनांत ) मी तिजवर किती सध्यां आसक्त आहे, हें जर ह्याला समजेल, तर हा मला कधीं तरी दाराशीं उभा करील

का? एकंदर हा मोठा पापभीरु आहे. जर असे सगळे लोक होतील तर किती सुरेख होईल? एकंदर हें पापभीरुत्व बहुश: लौकरच लयाला जातें, हें पाहून माझ्या सारख्याला सुद्धां वाईट वाटतें. ( उघड ) प्रथमदर्शनीं तो बेत सफळ होण्याच्या अगदीं रंगांत आला होता. तिच्या डोहाळेजेवणाचा समारंभ होऊन वरघोडा मोठ्या डामडौलानें नेहमींप्रमाणें दिवसाउजेडीं न काढतां अवसीं रात्रीस काढण्याचा तिच्या बापानें बेत केला. तो **बुलाखी**ला समजला. नंतर त्या कामांधानें एका बारगिराच्या सल्ल्यानें हल्ला करून तिची उचलबांगडी करण्याचा घाट घातला.

**आपा॰**—असा दुष्ट बारगीर होता तरी कोण? बहुतकरून मुसलमान असेल. बरें, पुढें.

**आपा॰**—तो मुसलमान तर नव्हताच, पण ह्या गुजराथेंत जन्मापासून राहिलेला एक मराठा शिलेदार आहे. तो पूर्वीं श्रीमंतांच्या पदरीं होता, व हल्लीं तो सेनाखासखेलांकडेस आहे. तो आपल्या पाहुण्यांत देखील आहे.

**आपा॰**—काय ह्मणतां, आमच्या पाहुण्यांत? सेनाखासखेलांकडील माणसें तुमच्याबरोबर आलेलीं कायतीं आमच्या पाहुण्यांत सध्यां आहेत. काय तो **विठूजी** शिलेदार आहे? तो नुसता तमासगीरच असावेसें वाटलें होतें.

**बाबा॰**—तो नव्हे, त्याचा सोबती **सट...**

**आपा॰** -(मध्येंच अचंबा दाखवून) काय **सटवाजीराव**? छे: छे: तुह्मी चुकतां. तो मनुष्य खास तसा नाहीं. आपण तरवार गाजविल्याबद्दल त्यानें आम्हांला किती म्हणून सांगितलें? तो खोटें सांगेलसें वाटत नाहीं, आणि तुम्ही तर असें सांगतां. खरेंच का तोच ह्या निंद्य कामांत पुढारी होता? त्याला कोणीं तरी फसवून भर घातली असावी.

**बाबा॰**—साहेब, आपल्याला त्याची पूर्णपणें ओळख झाली नाहीं, म्हणून त्याविषयीं आपला असा चांगला ग्रह झाला आहे. पुढें जें मी सांगणार आहे, त्यानें आपली खात्री होईलच. मग त्या **बुलाखी**नें कांहीं लोकांना पैसे देऊं करून त्या वरघोड्यावर अडचणीच्या जागीं घाला घातला, व कांहीं इसम तिला धरून त्याच्या घरीं घेऊन जाऊं लागले. पण पाप केलेलें झांकत नाहीं. तिला नेत असतां कांहीं लोकांनीं तिला सोडवून बापाच्या स्वाधीन केलें.

**आपा॰**—(आनंद दाखवून) एकंदर छान झालें, आणि त्या नरपशूंना ह्याबद्दल यथास्थित शासन झालेंच असेल.

**बाबा॰**—छे: तसें झालें असतें, तर बरें होतें. पण त्या लुच्चयांपैकीं बहुतेक सर्व फरारी झाले. एक मुसलमानाचा मुलगा सांपडला. व तो **सटवाजीरावा**नेंच सरकारांत हजीर केला. पुढें चौकशीअंतीं असें कळून आलें कीं, **सटवाजी**चें त्यांत अंग आहे. मग **भाऊसाहेब मुळेकरां**नीं श्रीमंतांच्या पदरच्या मनुष्याची फटफजिती होणार, असें पाहून पुढें चौकशी न चालवितां **सटवाजी**ची जमादारी काढून घेतली, व त्याला **केसवा पंडितां**कडे पाठवून दिलें. पुढें तपास न

चालविल्यामुळें **बुलाखी** वगैरे लुच्यांवर शाविती झाली नाहीं, व ते सुटले.

**आपा०**–पण तुम्हांला **बुलाखीचें** अंग आहे म्हणून कसें समजलें ?

**बाबा०**–(मनांत) ह्याला खरें सांगून आपल्यामध्यें वितुष्ट मात्र येईल. **पंडितां**नीं व बाबांनीं मला त्या चाहज्या लोकांच्या फंदांतून सोडविण्यासाठीं म्हणून **बडोद्याला** कामाचें निमित्त काढून **सटवाजी** बरोबर देऊन पाठविलें, हें आपण सांगा कशाला ? (उघड) पुढें **पंडितांनीं** मजबरोबर **सटवाजीला** देऊन कामावर **बडोद्याला** पाठविलें, तेव्हां मीं बारकाईनें कांहीं दिवसांपूर्वीं **सटवाजीकडून** दंग्याविषयींचा सर्व शोध काढिला. **पंडितांनीं सटवाजीला** बाहेरगांवीं पाठविण्याचा इतकाच उद्देश कीं, रयतेला ह्या दंग्याच्या खऱ्या स्वरूपाविषयीं कुणकुण समजून तिनें नाखुष न व्हावें.

**आपा०**–मग एकूण **सटवाजी** इतका हलकट मनुष्य आहे तर. ह्याला व **बुलाखीला** शासन झालेंच पाहिजे होतें. तुह्मी आतां लौकरच तिकडे जाणार आहां, तर ही सर्व माहिती **पंडितांना** कळवून निदान **बुलाखीला** तरी आठवण राहीलशी शिक्षा करवा. **भाउसाहेबांची** केवळ ह्या कामांत मोठी चूक झाली. त्यांनीं असले क्षुल्लक विचार मनीं आणून दुष्टांचें पारिपत्य केलें नाहीं. ह्यांचीं काळिजेंच उफराटीं. ह्यांच्यानें असें राहवलें तरी कसें ?

**बाबा०**–मी परवां **अमदाबादेला** जाण्यासाठीं येथून निघणार आहे. गेलों म्हणजे ह्याचा पूर्ण बंदोबस्त करण्याचें माझ्याही मनांत फार दिवसांपासून घोळत आहे. बरें तर; आतां रात्रही फार झाली आहे, तर मला येण्याची परवानगी असावी.

मुजरा करून आपले बिऱ्हाडीं गेल्यावर **बाबासाहेब** आपल्याशींच ह्मणूं लागले, 'फार झाले, तर दहा दिवस **आपासाहेबांची** व माझी ओळख होऊन झाले असतील; आणि तितक्यांत त्यांची इतकी मर्जी मीं संपादन केली. एकंदर हा मनुष्य फार सरळ व सचोटीचा दिसतो. परंतु चोहोंकडे आसपास लबाडीचा बाजार भरला असतांना ह्याची दशा कशी होईल, कोण जाणें ? निदान आपण तरी अशा मनुष्याला वाईट कामीं पडण्याविषयीं कधींही भर देणार नाहीं. बरें झालें, शिमग्याच्या आंतच मला बाबांनीं घरीं **सटवाजीला** घेऊन बोलविलें आहे; नाहीं तर, जरकरितां **बापूसाहेब** आल्यानंतर माझें येथें राहणें झालें असतें, तर मात्र पितापुत्रांमधील वैमनस्य मोडतां मोडतां बेजार झालों असतों, व कदाचित् मला प्राणासही मुकावें लागलें असतें. **बापूसाहेबांत** मुलापैकीं एकही गुण आढळत नाहीं, काय चमत्कार आहे पहा.

'बरें, आपल्याला भाटांची सोवत मिळत आहे, असें मघांशीं **विठूजी** म्हणत होता. हें एक आयतें बरें झालें, कारण **सटवाजी**वर विश्वास ठेवून वाटेनें आयत्या हातघाईच्या प्रसंगीं समूळ नुकसान व्हायाचें. पण ह्या **सटवाजीच्या** मागें त्या **विठूजीचें** कशाला शुक्लकाष्ट लागलें आहे, कोण जाणे? ह्या उभ्या वर्षांत ज्या गांवीं जावें तेथें **विठूजी** आहेच. **अमदाबादेला** गेल्यावर **विठू**

जीचें प्रस्थ मोडून काढलें पाहिजे. सध्यां कांहीं बोलत नाहीं, कारण प्रवास आहे; एकादा मनुष्य जास्त असला तर वाटेंत उपयोगी पडेल. पण त्याचा तो द्वाड पोऱ्या, तें तुणतुणें, तो डफ, याचा मला अगदीं मनापासून कंटाळा आला आहे.

'पण त्या जयलक्ष्मीची भेट होईल का? काय बाबा धूर्त आहेत? त्यांनीं केली माझी उचलबांगडी. पण छेः, त्यांच्या हें नसेल लक्षांत आलें. थोड्याच दिवसांत पाहूं काय आहे तें. बरें आतां जेवावें (उघड) भाऊ, पान वाढ, मी आलों.'

# भाग ४ था.

## गृहसुख.

प्रवास करितां गृहसुख कैंचें शिणदुःखा पाही ।
घरासारिखें प्रिय दुसरें ह्या जगतीं स्थल नाहीं ॥

फाल्गुन शुद्ध दशमीं रोजीं **बाबासाहेब** मंडळीसहित **अहमदाबादेस** सुखरूप येऊन पोंहचले. वाटेंत म्हणण्यासारखें कांहीं विशेष झालें नाहीं. **सटवाजी** व **हरिसिंग** यांची मात्र एके मुक्कामीं कांहीं क्षुल्लक कारणावरून बोलाचाली झाली; व तंटा मिटविण्यासाठीं म्हणून त्या दोघांमध्यें **विठूजी** पडला असतां, **सटवाजी**ला त्याची मध्यस्थी न आवडून त्या दोघांमध्यें जोडाजोडी होऊन विनाकारण वितुष्ट मात्र पडलें. **विठूजी**नें आपल्याकडून **सटवाजी**शीं समेट करण्याच्या इरायानें पर्यायानें पुष्कळ यत्न केले, पण ते सर्व निष्फळ झाले; व अखेरीस ते **अहमदाबादे**ला येईपर्यंत दोघांचें मिळून बोलणें झालें नाहीं. दूरवर विचार केल्याशिवाय अनोळखी मनुष्य एकदम जें मित्रत्वाचें नातें लावितात, त्याचा बहुतकरून असाच शेवट व्हावयाचा. आणि तितक्यांत जर करितां मूर्खांशीं व बढाईखोरांशीं प्रसंग असला, म्हणजे तर जीवश्चकंठश्च सलोखा व्हावयालाही वेळ लागत नाहीं, व त्या शीघ्र सलोख्याचाच परिणाम शत्रुभावांत होण्याला फारसा वेळ किंवा कारण लागत नाहीं. असो ही दोहोंमध्यें झालेली दुफळी पाहून त्या भाट मंडळींना वाटेंत बरीच करमणूक झाली, व सर्वांचा बाकीचा प्रवासही आपसांत तंटे न होतां मोठ्या आनंदानें पार पडला. त्या दोघांनीं मात्र **जालमसिंगास** आपापल्या कागाळ्या कळवाव्यात, व प्रसंगीं एकमेकांच्या उपयोगीं पडल्याचें विसरून गेल्याबद्दल त्यांनीं त्याजवळ परस्परांच्या अधमपणाबद्दल गाऱ्हाणें गावें. त्या दुहीमुळें कज्जांचें जें मूळ तेथेंच कुऱ्हाड लागल्याप्रमाणें झालें, व त्यामुळें **बाबासाहेबांना** देखील बरेंच समाधान वाटलें.

**हरिसिंग** व **केसरीसिंग** घरीं पोंचल्यावर त्यांच्या चुलतीला व **माधवसिंगाला** साहजिक आनंद झाला. **सदूला** वरचेवर हर्षाच्या उकळ्या फुटत होत्या. परंतु आपण बाहेर आनंद झाल्याचें दाखविलें, तर आपली चेष्टा करतील, ह्या भीतीनें ती फारशी कोणाशीं घरांत न बोलतां, कामांत गुंतल्याचें मिष करून, कोण काय बोलतें, आपल्या नवऱ्याचा हाच स्वर, तो काय बोलतो, **निळकंठभाईच्या** येथें झालेली आपली थट्टा **माधोसिंग** नवऱ्याला सांगतो कीं काय, हें मोठ्या उत्कंठेनें ऐकण्याच्या नादांत ती दंग झाली होती. आपला हर्षातिशय दाबण्याविषयीं ती आपल्याकडून पुष्कळ यत्न करीत होती, तरीही बोलून चालून ती मुग्ध स्त्री असल्यामुळें व बाह्येंद्रियें स्वाधीन ठेवून आपले विचारतरंग लोकांच्या दृष्टिगोचर कसे पाडूं नयेत ह्याविषयीं साधारण अनभिज्ञ असल्यामुळें, तिच्या मनाची उल्लसित वृत्ति तिच्या किंचित आरक्त कपोलांवरून, तिला नकळत आलेल्या मंदस्मितेंकरून, व एकंदर मुखाच्या टवटवीवरून स्पष्ट दिसत होती. तिला भान न राहिल्यामुळें ती आपल्या आवडत्या गाण्याचें कडवें हळू हळू म्हणत होती. नंतर कांहीं वेळ विचारतरंगांत गर्क होऊन व हातांतील काम टाकून ती एकसारखी टक लावून चित्रासारखी पहात बसली, आणि आपल्याला कोणी ममतेनें हांक मारीत आहेसा भास होऊन 'केव्हां येणें झालें' असें साधारण जवळच्या मनुष्याला ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें लडिवाळपणानें म्हणाली. जेथें ती बसली होती, तेथें दुसरें कोणीही नसल्यामुळें बरीच शांतता होती, व असल्या शांततेंत आपलाच स्वर कानीं पडल्यामुळें एकदम दचकून 'हें काय आपण वेड्यासारखें बोललों. मला तर कोणी देखील हांक मारिली नाहीं. माझें बोलणें कोणीं ऐकिलें तर नसेलना' असें ती स्वतःशींच पुटपुटली. तिची एकंदर चित्तवृत्ति बावरली होती. तिचें सर्व लक्ष आपला प्रियपति काय बोलतो व करितो हें समजून घेण्याकडेसच लागलें होतें. इतर इंद्रियांचे व्यापार स्तब्ध पडल्यामुळें तिचें श्रवणेंद्रिय ह्यावेळेस अतिशय तीक्ष्ण झालें होतें, व मनाची एकाग्रता असल्यामुळें तिला नवरा दूरच्या खोलींत असूनही त्याविषयींचें सर्व बोलणें नीट ऐकूं येत होतें. इतर व्यवधानाविषयीं उदासीन असल्यास सकलब्रह्मांडनायक सृष्टिस्थितिप्रलयकर्ता इंद्रियांना अगोचर जो परमात्मा तो देखील तुकाराम, चैतन्य यांसारिख्या निःसीम भगवद्भक्तांस एकाग्रतेनें साध्य होतो, तर मग यःकश्चित इंद्रियग्राह्य मनुष्यप्राणी त्याच उपायांनीं साध्य होणार नाहीं असें कधीं देखील होईल काय? जिच्या अंगांत यौवनाचें वारें खिळून फार दिवस झाले नाहींत, अशी प्रेमपाशांनीं बद्ध झालेली मुग्धवधू आपल्या हृदयवल्लभाचें कायावाचामनेंकरून किंबहुना साधूपेक्षांही जास्त निरिच्छतेनें भजन करिते; कारण साधूला मोक्षप्राप्तीविषयीं तरी आकांक्षा असते, परंतु मुग्धवधूला आपल्या प्रियतमाच्या सुखाव्यतिरिक्त कशाविषयींही इच्छा नसते. ब्रह्मानंदासही तुच्छ करणारा असा हा नूतन प्रेमाचा महानंद होय. ब्रह्मप्राप्ति व वल्लभप्रेमप्राप्ति ह्या दोहोंतही मनुष्य एकदां गुंतला, म्हणजे तो त्यांशिवाय दुसऱ्या सर्व बाह्य वस्तूंस विसरतो. परंतु ब्रह्मप्राप्तीपासून केवळ त्या मनुष्यासच आनंद, आणि वल्लभप्रेमापासून त्या मनुष्याला व वल्लभाला अत्यानंद होतो, म्हणून वल्लप्रेमप्राप्तीची योग्यता कमी मानिल्यास वावगें होणार नाहीं काय?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सदूचें चित्त ठिकाणीं तर नव्हतेंच, परंतु तें केवळ हरिसिंगमय झालें होतें. नुसत्या हरिसिंगाच्या स्मरणानें व स्वरानें तिची अशी तल्लीनता झाली होती, तर तत्सांनिध्यानें काय झालें असतें बरें? यौवनाक्रांत स्त्रियांच्या चंचलतेला लोक साहजिक दोष देतात, परंतु त्या तारुण्याच्या भरांत किती प्रियवश आणि तस्मात् परवश असतात, ह्याची यत्किंचित् तरी कल्पना ते करूं शकतात काय? नासिका असूनही ज्याचें घ्राणेंद्रिय आपलें काम बरोबर करूं शकत नाहीं, असा प्राणी सुगंध व दुर्गंध ह्यांचा भेद न जाणून व तेणेंकरून सौगंधिक सुखाला मुकून जर प्रगल्भतेनें सुवासलोलुप भ्रमराला दोष लावील, तर तो दोष योग्य होईल काय? तद्वत्च यौवनमद अनुभवून साधारण कालपरत्वें त्याच सुखाची बरीच विस्मृति पडली आहे, अशा वृद्ध मनुष्यांनीं, आणि तें सुख पूर्णपणें जे घेऊं शकत नाहींत, अशा तरुणांनीं केवळ कुत्सित बुद्धीनें तरुण कामिजनांस जर दोष दिला, तर तो शोभणार नाहीं. प्रेमाचा केवळ भास दाखवून अप्रबुद्ध व निष्कपट तरुण जनांस पशुवत् आचरण करून फशीं पाडणारे नराधम दोषास्पद किंवा दंडार्ह होत नाहींत, असा मात्र सिद्धांत ह्यापासून मुळींच निघत नाहीं.

हरिसिंगाबरोबर तिचे प्राण प्रवासालाच गेले होते, असें म्हणायाला कांहीं चिंता नव्हती. कारण तो परत आल्यावर त्याचा केवळ स्वर कानीं पडल्याबरोबर तिच्या जीवांत जीव आला, असें तिच्या मुखाच्या टवटवीवरून व डोळ्यांतील झळकणाऱ्या तेजावरून दिसत होतें. त्याचा स्वर तिचें कर्णामृतच. तिनें त्याला येतांना ओझरतें पाहिलें होतें, त्याबरोबर तिचें मुखकमल प्रफुल्लित झालें; व त्यावेळीं अकस्मात् दोहोंची दृष्टादृष्ट होतांच जणू त्यांचे प्राण नयनांमध्यें येऊन एकमेकांला भेटण्याविषयीं आतुर होऊन भ्रूविक्षेपांच्या मिषानें परस्परांना आकर्षण करूं लागले होते. जशी ही भेटीविषयीं अधीर होती तसा तोही होता; परंतु पुरुषस्वभावाला अनुसरून त्यानें आपली उतावळ लोकांच्या नजरेस पडूं दिली नाहीं.

शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं कुशलतेचीं बोलणीं झाल्यावर आपण गेल्यावर घरांत कसें काय झालें, ह्याविषयीं हरिसिंगानें आपल्या चुलतीला विचारिलें. तिनें 'सर्व सुखरूप होतों, विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं' असें उत्तर दिलें; व ती म्हणाली 'चला, जलदी स्नानें आटपा. केव्हांची तुम्हांला भूक लागली असेल. अग सदू, त्या खोलींत ती काय करितेस? चल लौकर बाहेर ये, आणि ह्यांना पाणी तर देशील. मी आतां स्वयंपाकाला लागते. काय बाई, आतांच्या पोरींना बसायाला सांगा; बाकी काम म्हणून मुळीं नको. नवरा किती दिवसांनीं घरीं परत आला, तर कशी हुशारी दाखवावी.'

हरिसिंग व केसरीसिंग हे आपले धुळीनें भरलेले कपडे काढून ठेवून खालीं ओसरीवर आले. सदूनें झटकन् पाण्यानें भरलेली एक तपेली आणून ठेविली; व आपण स्वयंपाकघराजवळ चौकांत खालीं मान घालून व मधून वांकड्या नजरेनें हळूच आपल्या नवऱ्याकडे व केसरीसिंगाकडे पाहत तिरकस उभी राहिली. केसरीसिंग स्नानाला गेलासें पाहून हरिसिंग स्वयं-

पाकघराच्या दारांत काकीशीं बोलत व मधून सदूकडे नीट न्याहाळून पाहत उभा राहिला. इतक्यांत माधोसिंगही तेथेंच आला. गोष्टी निघतां निघतां एक दोन दिवसांत शाहपुरांत आपले घरीं निराळें बिन्हाड करण्याचा बेत हरिसिंगानें ठरविला. काकी म्हणाली–तुम्ही गेल्यावर मला व माधोसिंगाला मुळीं येथें करमणार नाहीं. ह्या वर्षभर तुम्ही होतां, तर घर कसें गजबजलेलें होतें. आतां गेल्यावर मात्र चोहोंकडे बुचें बुचें वाटूं लागेल.

हरिसिंग–काकी, आम्हांला सुद्धां तसेंच वाईट वाटत आहे. बाबा गेल्यापासून तूं आम्हाला अगदीं विसंबली नाहींस. आमच्याही मनांत सर्वांनीं एकत्र मिळून राहवें असें पुष्कळ येतें, परंतु करावें काय? तिकडे जर बिन्हाड न करावें, तर आपले भाऊबंद त्या घरावर मालकीचा हक्क चालविल्याशिवाय राहणार नाहींत. बरें, इकडचें सोडावें, तरी तसीच हरकत. भाऊबंद कोठें आपल्याला निवांत राहूं देत आहेत? पुढें सरकार दरबार करण्याचा प्रसंग येऊं नये, म्हणून जालमसिंगांनीं मला मागें ४ महिन्यांपूर्वींच ही युक्ति सांगितली होती. परंतु पुढें जाणें झालें म्हणून बिन्हाड बदलण्याचा बेत तहकूब ठेवावा लागला. पण आतां तसें करितां येत नाहीं. उगाच कां आपल्या हातांनीं भाऊबंदांना भांडण्याची पाळी आणावी? आणि एकदां ह्या वर्षी केसरीसिंग व माधोसिंग ह्यांचीं लग्नें केलीं, म्हणजे तुला सुद्धां घरीं सून आल्यामुळें बरीच मदत होईल. मधून कोणाला कंटाळा आला कीं, एकमेकांच्या येथें ८-१५ दिवस खुशाल जाऊन राहावें. आपण कांहीं लांब नसणार. फक्त दोन ठिकाणीं बिन्हाडें असल्यानें आपल्या घरांवर कोणत्याही प्रकारें पुढेंमागें दावा उपस्थित होणार नाहीं.

काकी–हरिसिंग, तूं म्हणतोस तें सर्व खरें. परंतु बाबा वाईट वाटल्याशिवाय राहत नाहीं. तशांत या सदूला चोप म्हणून मुळीं नाहीं. घरांत कोणी मोठें बायकोमनुष्य असलें, म्हणजे लहान मुलींना संसाराची वागणूक समजते. कांहीं झालें कीं, मला मात्र हजारदां येरझारा कराव्या लागतील, नी दुसरें काय. तिच्यानें तुम्हा दोघांचे काम रेटेल कीं नाहीं, ह्याचाच मला संशय वाटतो. काम करण्याची संवय नाहीं, म्हणून एकादे वेळेस काम जरी वेळेवर झालें नाहीं, तरी उगाच तिच्यावर रागावून तिला भेवडावूं नका म्हणजे झालें.

माधो०–(मध्येंच) दादा, आई म्हणते त्याप्रमाणें सर्वांना तुम्ही लांब राहायाला जाऊं नये असेंच वाटतें. गेल्या बुधवारीं वहिनी व मी निळकंठभाईच्या येथें गेलों होतों. परत येतांना वहिनी ह्याविषयीं जयलक्ष्मीताईजवळ बोलली. पण ताईलासुद्धां अतिशय वाईट वाटलें.

माधोसिंग बोलत आहे, हें पाहून कदाचित हा आपली फजीती व जोशाचें भानगड वगैरे सहज बोलतां बोलतां बोलून जाईल, अशी सदूला धास्ती पडली होती. परंतु तसें कांहींच झालें नाहीं, कारण लागलीच हरिसिंग स्नानाला चालता झाला. पण केसरीसिंग आंत आलासें पाहून सदू म्हणाली–भाऊजी, तुम्ही बरेच कोठें

वाळलांत. वाटेनें दगदग फार सोसावी लागली वाटतें.

**केसरीसिंग**-वहिनी, बोलून चालून तो प्रवासच, तर मग श्रम झाल्यावांचून राहतील? बाकी मी कांहीं वाळलों आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं.

**सदू**-तें उगाच आपलें म्हणणें. स्वतः माणसाला थोडेंच दुसऱ्यानें सांगितल्याशिवाय हें समजत असतें. पण वाटेनें कांहीं दंगाधोपा तर नाहींना झाला.

**केसरी०**-कांहीं म्हणण्यासारखा नव्हता. फक्त **पावागडावर** दादाची व एका शिलेदाराची—

**सदू**-(घाबरून) काय त्यांना? भाऊजी, तुम्हा पुरुषांना माया म्हणून नाहींच. कोठें वार बीर तर लागला नाहींना. तरीच मला वाळलेले आहेत असें दिसलें. अग बाई, काय तरी माणसें हीं? मला अगोदर कांहो नाहीं सांगितलेंत—

**केसरी**-(हीं सर्व भीति पाहून हंसत) काय वेडी आहेस तरी? अगोदर ऐकून घ्यायाचें नाहीं, आणि मग 'अग बाई, वार बीर लागला का.' तुला एक दादा लोण्याच्या गोळ्यासारखा मऊ दिसत असेल, पण तो दुसऱ्यांना जखमा करणार. आणि त्याविषयीं तूं उगाच काळजी करीत असते. काय म्हणे 'तो वाळला.' माझ्यापेक्षांही त्याला प्रवास जास्त मानवला आहे. तुझा बोलण्याचा रोख मी मघाशींच जाणून होतों. परंतु म्हटलें, जाऊं द्या; आपण होऊन उगाच खोल पाण्यांत जाऊं नये. कांहीं नाहीं; एका शिलेदाराशीं भांडण होण्याचा प्रसंग आला होता, परंतु तो **जालमसिंगांच्या** मध्यस्थीनें टळला.

**सदू**-(ओशाळून) भाऊजी, मीं खरोखर तुमच्याविषयींच विचारिलें होतें.

इतक्यांत **माधोसिंग** स्वयंपाकघराच्या खोलींतून बाहेर धांवत आला व **केसरीसिंगास** मोठ्यानें म्हणाला-भाऊ, तुला एक गमत सांगावयाची मी अजीबात विसरलों. आम्ही **निळकंठभाईच्या** घरीं गेलों होतों—

**सदू**-(मध्येंच) **माधो** भाऊजी, जरा काय बोलायाचें तें हळू तरी बोला. आसपासचे लोक ऐकतील. (काकुळतीस येऊन) आणि **माधो** भाऊजी, हें काय बरें? न बोललां तर नाहीं चालायाचें? मी कधीं तरी तुमच्या वाटेस जातेंका?

**माधो०**-भाऊ, पाहिलेंसना? मी वहिनीविषयीं कांहीं तरी बोललों होतों का? पण ध्यानीं असें तें स्वप्नीं दिसें. ही जर कांहीं बोलली नसती, तर मीही तुला कांहीं सांगितलें नसतें. पण हिनेंच माझें बोलणें आपल्या अंगीं लावून घेतलें आहे, म्हणून मी आतां दादाला सुद्धां ऐकूं जाईल इतक्या मोठ्या आवाजानें बोलणार. आणि वहिनी, तूं मुळीं देखील मजवर रागावूं नकोस, कारण तुझा हा भित्रेपणा काढून टाकला पाहिजे, समजलीस. (मोठ्या आवाजानें) भाऊ, मग त्या **निळकंठभाईच्या** येथें एका जोशानें वहिनीला-(इतक्यांत **हरिसिंग** येतोसें पाहून) काय बरें, (आठवलेसें करून) हो तुम्ही आज उद्यां इतक्यांत येथें याल असें सांगितलें होतें.

**हरिसिंग** जवळ येऊन म्हणाला–इतकें-चना? मग त्यांत त्या जोशानें काय मोठें भविष्य सांगितलें? आम्ही फाल्गुनी पौर्णि-मेच्या आंत येथें परत येतों, असें जातांना सांगितलेंच होतें. **माधो**, तुझ्या एकंदर बो-लण्याच्या झोंकावरून मला वाटलें कीं, त्या जोशानें दुसरें कांहीं तरी सांगितलें.

**माधो०**–( हंसत ) दादा, तूं म्हणतोस तसेंही आहे; परंतु वहिनी रागावेल.

नंतर **माधोसिंग** व **केसरीसिंग** आंत गेले, व तेथें **माधोसिंग** हळूच बोलला–भाऊ, तूं ही साखर घेऊन वहिनीला आप-ल्यासमक्ष खायाला सांग, म्हणजे मोठी ग-मत होईल बरें. तूं म्हण कीं, सुखरूप घरीं पोंहचल्यावर साखर वाटण्याचा नवस केला होता म्हणून.

**केसरीसिंग**–ह्यांत कसलीरे गमत?

**माधोसिंगानें** हळूच **केसरीसिंगा**-च्या कानांत कांहींसें सांगितलें; त्यावरोबर **केसरीसिंग** मोठ्यानें हंसून म्हणाला–असें का? तर मग, आपण दादाच्याअगोदर जेवण आटोपून त्याला ऐकूं जाईल, अशा तऱ्हेनें गमत करूं हो.

संकेत केल्याप्रमाणें **माधोसिंग** व **केस-रीसिंग** हे घाईघाईनें जेवून **हरिसिंगा**-पूर्वी उठले, व हात धुवून **सदू**जवळ आले. नंतर हळूच **केसरीसिंगानें** थोडीशी सा-खर घेऊन 'वहिनी, आम्ही सुखरूप परत आलों, म्हणून नवस'प्रमाणें ही साखर मी वा-टतों. तर ह्यांतून थोडी तूं घे. ती खाल्ल्या-शिवाय टाकूं नको बरें.' असें तो **हरि-सिंगास** ऐकूं जाईल अशा आवाजानें म्हणा-ला. **सदूला** मोठी पंचाईत पडली. जर साखर खावी, तर नेम मोडतो. बरें, न खावी, तर **केसरीसिंग** विचार विचारून पिच्छा पुरवील. बाकी नवसाचें उगाच ढोंग केलें आहे, असें **माधोसिंगा**च्या चेहऱ्या-वरून तिला स्पष्ट समजलें होतें. तो एके-बाजूला तोंड फिरवून हंसें दावण्याचा पुष्कळ यत्न करीत उभा होता. परंतु सरतेशेंवटीं तें न आवरून तो मोठ्यानें खो खो करीत एकसारखा पोट धरधरून हंसूं लागला; आणि जसजसा तो हंसें दावण्यासाठीं जास्त प्रयत्न करूं लागला, तसतसें त्याचें हंसें अ-नावर होत गेलें; व त्याचें पोट दुखूं लागून त्या हंसण्याच्या अत्यावेशामुळें त्याच्या डोळ्यांतून पाणीही वाहूं लागलें.

**सदू** विचार करीत आहेसें पाहून **केस-रीसिंग** म्हणाला–वहिनी, तूं साखर खाल्ल्या-शिवाय मी कांहीं येथून हालणार नाहीं.

**सदू**–( हलक्या आवाजानें ) भाऊजी, तुमच्या मनांत काय आहे तें मी समजलें. ह्या **माधो** भाऊजींनीं किनई माझा पिच्छा पुर-विला आहे. काय त्यांना मला चिडवून मि-ळतें, कोण जाणें. पण गडे, तुम्हांला काय बोलायाचें असेल तें जरा हळू बोलाना. असें काय बरें?

**माधो०**–( हंसतां हंसतां घोगऱ्या व मोठ्या आवाजानें ) भा-ऊ-हो हो हो. सा-ख-र-कां खात ना-ही तें वि-चार' तर खरें.

**माधोसिंगा**च्या त्या अनावर हंसण्यानें **केसरीसिंगा**च्या ओढून आणिलेल्या भार-दस्त मुद्रेंत थोडा थोडा फरक पडत चाल-ला, व सरतेशेंवटीं तोही मोठ्यानें हंसूं ला-गला व त्यानें **सदूला माधोसिंगाचा** प्रश्न केला.

 

मनोविकारांच्या बाह्य चेष्टांचा असा कांहीं गुण आहे कीं, एक मनुष्य हंसत, रडत असला, तर त्याच्या जवळील मनुष्याच्या मनावर व शरिरावर तसेच विकार होतात; आणि क्षुल्लक कारणानें जर एकादा मनुष्य तशा चेष्टा करीत असला, तर मात्र त्या चेष्टांविरुद्ध परिणाम जवळील मनुष्यांवर होतात. ह्या दोन न्यायांस अनुसरूनच **केसरीसिंग माधोसिगाचें** हंसें पाहून हंसूं लागला, व आपल्या मतें निष्कारण अशी **सदू**ची भीत व लज्जित स्थिति **माधोसिंगानें** पाहून त्याला वाईट न वाटतां त्याउलट हास्यरसाचे विकार मात्र त्याजमध्यें बळावले.

**सदू**ला पहिल्यानें आपली थट्टा केल्याबद्दल अति वाईट वाटत होतें, परंतु ह्या दोघांची हंसण्यानें मुरकुंडी वळलेली पाहून तिच्या केंविलवाण्या व रडव्या तोंडावर हंसण्याची; थोडी झांक दिसूं लागली. तथापि तिनें तसेंच गयावयां तोंड करून **केसरीसिंगाला** उत्तर दिलें ' भाऊजी, मी नेम केला आहे म्हणून हो. तुम्हांला माहीत असून मला कां उगीच छळतां? '

हा सर्व गोंधळ चुलती व **हरिसिंग** ऐकत होतेच. हे दोघे अति हंसतातसें पाहून चुलती म्हणाली–कायरे **माधो**, अरे **केसरी**, इतका तुम्हाला कसला आनंद झाला आहेरे ? तुम्ही फार हंसतां हें चांगलें नाहीं बरें. बाळा **माधू**, तूं त्या पोरीच्या पाठीस लागतोस हें चांगलें नव्हे. अरे ती तुजपेक्षां वयानें व मानानें थोर आहे. तिची आतां थट्टा करणें तुला शोभत नाहीं बरें. **केसरी**, तिच्या नेमाविरुद्ध तूं कशाला आ-तोस ? **माधू**ला दे ती साखर. केव्हांच; तो चट्ट करील.

त्या म्हातारीचें हें ममतेचें रागें भरणें ऐकून दोघेजण हंसणें थांबवून म्हणाले–वहिनी, रागावूं नको बरें. आम्ही आजपासून मुळीं थट्टा करणार नाहीं.

**सदू**–( मान मुरडून हळूच ) पुरें ठाऊक आहे. भाऊजी असेंच दर वेळेला म्हणतां, आणि फिरून दररोज येरे माझ्या मागल्या.

**हरिसिंगानें** चुलतीस हळूंच विचारिलें–पण काकी, तो नेम कसला केला आहे ? उगाच नेमनूबीम पाहिजेत कशाला ? तुला विचारिलें तरी होतें का ? कां इतक्यांतच मुखत्यार झाली म्हणून वाटतें ?

**चुलती**–कांहीं नाहींरे **हरिसिंग**. तूं तिला रागें नको भरूं बरें. जर नुसतें तुला रागावलेलें तिनें पाहिलें,तर ती थरथर कांपूं लागते, आणि तशांत तिजवर रागावलास तर तिला धडकी भरेल कीं काय कोण जाणे. ती कांहीं वावगें करीत नाहीं. **निळकंठभाईनीं** एका जोशाला इला मुलगा केव्हां होईल म्हणून विचारिलें, व त्यानें साखर खाण्याविषयीं नेम पाळल्यास दोन वर्षांच्या आंत मुलगा होईल म्हणून सांगितलेंनी काय. मीं तिला तसें करावयास लागलीच सांगितलें. फारच सालस पोर आहे. लोकांच्या मुलींप्रमाणें विचारल्याशिवाय कांहीं करीत नसते. माझ्याही मनांत आपले घरांत एकादें रांगतें मूल असावें असें किती वाटतें. पण ईश्वर तो सोन्याचा दिवस दाखवील तेव्हां खरें.

**हरिसिंग** हें सर्व मुकाट्यानें ऐकत गालांतल्या गालांत हंसत होता. काकी चुलतसुनेवर पोटच्या मुलीप्रमाणें माया करिते, हें त्याला ठाऊक होतें. त्या एकोप्यामुळें घरांत सर्वजण हंसून खेळून असत. कदाचित् आपण बायकोवर रागावूं व तसें झाल्यास आपला राग अनावर, म्हणून काकीनें सुनेविषयीं केलेली शिफारस ऐकून त्याला कौतुक वाटलें; कारण थोड्या वेळापूर्वीच तिनें सुनेच्या आळशीपणाला दिलेला दोष त्याच्या लक्षांत होताच.

थोड्या वेळानें तो जेवून उठला व तिसरे प्रहरीं गांवांतील इष्टमंडळींना भेटण्याकरितां घराबाहेर पडला. **माधोसिंग** व **केसरीसिंग** काकीला विचारून त्यापूर्वीच **शाहपुरांत** घर नीट झाडून सारवून साफ करून घेण्यासाठीं म्हणून गेले. आणि लौकर काम आटोपून चुलतसासू **सदूला** बरोबर घेऊन मंडळी आल्याची आनंदाची बातमी **जयलक्ष्मीला** कळविण्यासाठीं म्हणून **निळकंठभाईच्या** येथें गेली.

## भाग ९ वा.

**धाड जशी टोळांची पडतां होतोच नाश शेताचा।**
**गांवांतिल टोळांची दृष्टि पडे घात कीं कुटुंबाचा॥**

शुक्रवारीं दुपारीं जेवणखाण आटोपून **बुलाखी बाबासाहेबांच्या** भेटीला त्यांचे घरीं गेला. ते आले आहेत, असें त्याला गुरुवारीं संध्याकाळींच समजलें होतें. घरीं गेल्यावर पाहतो, तों **माणेकभाई बाबासाहेबांशीं** बोलत बसला होता. हा आलासें पाहून **बाबासाहेब** म्हणाले—या **बुलाखीदास.** आज किती दिवसांनीं आपली भेट होत आहे? पण दिवस कशाला, वर्ष म्हटलें तरी चालेल. बरें तुमची प्रकृति तर बरी आहेना? इकडील कांहीं कमजास्त माहिती घाल कीं नाहीं? कां आमच्यावर राग आहे?

**बुलाखीदास**—वः साहेब वः, आज माझी टर उडविण्याचाच बेत केलासें दिसतें. ( **माणेकभाईकडे** वळून ) कां भाईसाहेब, तुम्ही तर ह्यांत सामील नाहींना? कारण म्हणाल, बरेच महिने झाले आहेत; आतां बरा तावडींत सांपडला आहे, तर घ्या दोन हात उगवून. **बरें,** थट्टेचा प्रकार नंतर फुरसतीं अंतीं. ( **बाबासाहेबांकडे** वळून ) एकूण आपल्याला **बडोदें** मानवलें नाहींसें दिसतें. कां बरें, तिकडची हवा येथल्यापेक्षां वाईट आहे कीं काय? आपण म्हणे, गडावरून आलां. तेथें थंडीपासून फारसा उपद्रव झाला नसेलच, कारण हिंवाळा केव्हांच संपला.

बाबा०—आमचें कायहो घेऊन बसलां ? तुम्ही तर गेल्या वर्षांत चैन करीत येथें निवांत बसला होता. तुम्हाला आमची आठवण तरी कशाला झाली असेल ? आम्ही तिकडे थंडीनें कुडकुडत होतों, आणि तुम्ही तर इकडे गुबगुबीत गरम बिछान्यावर लोळत पडलां होतां. मग आमच्यासारख्या मित्राचें कोठून स्मरण होणार ? कांहो **माणेकभाई**, असेंच कीं नाहीं ?

**माणेकभाई**—साहेब, तें मला तरी काय माहीत ? ह्यांच्यासारखे दूरदर्शी व कार्यसाधु गृहस्थ फारच विरळा. पण नाहीं म्हणतां म्हणतां त्यांनीं आपण गेल्यानंतर एक दोन तरी मोठीं कामें साधलीं. असेंचना **बुलाखीदास**—

**बुला०**—( मनांत ) माझा एक डाव फसला, म्हणून जेथें तेथें मला हा टोमणे मारीत आहे. पण बचाराम, माझ्याशीं गांठ आहे. कधींना कधीं तरी तुझे दांत तुझ्या घशांत न घालीन, तर मी खऱ्या बापाचाच नव्हे. ( उघड ) भाईसाहेब, आपणही थट्टा मांडली आहेसें दिसतें. खाशी केलीत एकंदर. अहो नीट पहिल्यानें बोलूं तर द्या, मग थट्टा आहेच.

**बाबा०**—( मनांत ) बावांचा ह्याजवर राग असून हा माझी भेट घ्यायाला आला, याला म्हणावें तरी काय ? **माणेकभाई**समोर ह्याला उघड ' जा ' म्हणून सांगतां येत नाहीं; व **माणेकभाई**पासून तें काम करण्याविषयीं अभिवचन घेतल्याशिवाय त्याला जाऊं देतां येत नाहीं. असो, बावा घरीं येईपावेतों सर्व सुरेख धिमेपणानें पार पाडलें पाहिजे. संतापून कांहीं अर्थ नाहीं. पण जरका बावांना हे गृहस्थ मजकडे आल्याचें समजलें, तर मात्र गेल्या दर्षांप्रमाणें चीप न बसतां माझी तोंडावर भर चौघांदेखत पूजा करतील. म्हणून मोठ्या सावधगिरीनें असलें पाहिजे. ( उघड ) पण **बुलाखीदास**, थट्टा एके बाजूला राहूं द्या. तुमचे ते मित्र **जीवनलाल** हल्लीं कोणच्या महत्कार्यांत गुंतले आहेत, व तुम्हीं काय काय कामें केलींत, तीं सांगाल तर खरें ?

**बुला०**—साहेब, कसलीं महत्कार्यें घेऊन बसलां ? ते दिवस गेले बरें; आतां थोडा विपरीत काळ आला आहे. ( मनांत ) काय चिंता आहे, थोडे दिवसांतच ह्या **नानासाहेबांचीच बडोद्यास** बोळवण केली, म्हणजे झालें. पण हें करणें जरा जड जाईल. पाहूं तर खरें, एकदां धडपड करून.

**माणेक०**—( मनांत ) हा कशाला मध्येंच आला आहे, कोण जाणे. नाहीं तर केव्हांच दाव.साहेबांची मर्जी कशी काय आहे, हें कळलें असतें. ( उघड ) **बुलाखीदास**, अहो अगदीं खाजऱ्यासारखें कां बोलतां ? हे कांहीं दिवस वाईट नाहींत. मला वाटतें कीं, आतां काय, काळ वाईट आला, व्यापार बुडत चालला, म्हणून सावकारांनीं नेहमीं रड गायाचीच.

**बुलाखी०**—( संतापून ) आम्ही रड गातोंका, भाईसाहेब ? तुम्ही तरी बरेच दिसतां. अहो आमचा प्राण अगदीं गळ्यापर्यंत आला, तरीही आम्ही कांहीं बोलूं नये, कीं हुं कां चूं करूं नये. शाबास भाईसाहेब शाबास. आपल्यासारख्याच संभावित लोकांनीं आमचा व्यापार बुडविला.

**बाबा०**–( मनांत ) काय यांचा व्यापार? लोकांचे गळे कापायाचे, हाच ना? खरेंच, **आपासाहेब** हें बोलणें नीट समजून ऐकायाला पाहिजे होते, म्हणजे कां त्यांनीं ह्याला जीवंत उभें चिरलें असतें, कां जाळलें असतें, कोण जाणे. पण माझी वृत्ति पहा, कशी चमत्कारिक झाली आहे. **आपासाहेबां**बरोबर असतांना मला ह्या **बुलाखी**चा मनापासून कसा कंटाळा आला होता; आणि आतां तोच मजजवळ बोलत असतां इतका कंटाळा वाटत नाहीं. ( उघड ) अहो **बुलाखीदास**, आम्हीच तुम्हाला **माणेकभाई**च्या वतीनें विचारितों कीं, ह्यांच्यासारख्या संभावित लोकांनीं आपला जगद्विख्यात व्यापार कसा बुडविला तो.

**बुला०**–( मनांत ) पहा, कसा ओढा लागला आहे? अरेरेरे, मला साध्य नाहीं ती नाहीं, आणि हा मधल्यामध्यें अपहार करणारना. असो, एक वर्ष तर फाफा मारीत बसला होता, ह्यांतच मी आनंद मानीन. पण तसें तरी कां; मिळेना ह्याला. पुढें कोठें जाणार? पण **माणेकभाई**ची तर पक्की खोडकी जिरवितां येईल. (उघड) साहेब, आपणच हें विचारितां तरी कसें? आमचाच धंदा हे ब्राह्मण करूं लागले, तर आमच्या व्यापाराला कशी बरें तेजी येईल?

आतां उगीच फार वेळ बोलणें लांबविल्यास **नानासाहेबां**ना कळेल, म्हणून **बाबासाहेब** कपडे करूं लागले व म्हणाले–**बुलाखीदास**, उद्यां तुम्हाला अंथ्यावर भेटूं. आम्हाला सध्यां हवेलींत भेट घ्यायाची आहे, तर माफी असावी. ( नंतर **माणेकभाई**कडे वळून ) चला **माणेकभाई** आमच्याबरोबर. तुम्हालाही तिकडेसच जावयाचें आहेना?

**माणेक०**—हें काय विचारावयाचें? माझी तिकडेसच असामी आहे. आज आपल्या भेटीला म्हणून अंमलदाराची रुखसत घेऊन एक घटका येथें आलों; नाहीं तर फुरसतीचें नांवच नको.

**बुलाखीदासा**नें खट्टू होऊन लवून 'सलाम' केला, व घरची वाट धरली; आणि हे दोघेजण बाहेर पडले.

वाटेनें जातां जातां ह्या दोघांना रस्त्यावर व बाजूंच्या झाडांवर पुष्कळ टोळ बसलेले दिसले. **माणेकभाई** म्हणाला–साहेब, हे पाहिलेतना टोळ कसा झाडांचा फडशा उडवीत आहेत? हे आल्यामुळें शेतकऱ्यांचें फार नुकसान होणार. कारण हे जेथें जातील तेथें शपथेला सुद्धां हिरवें पान राहूं देणार नाहींत.

**बाबा**–आम्हाला देखील काल येतांना शहरानजीक ह्यांचे लहान लहान थवे मधून मधून झाडांवर बसलेले दिसत होते. पण आज तर हे अतोनात आले आहेत. हें कांहीं चांगलें लक्षण नाहीं. अहो **माणेकभाई**, तुम्ही वरती आकाशाकडे तर पहा. चोहोंकडे टोळांनीं तें कसें व्यापून टाकिलें आहे?

**माणेकभाई**–ओहोहो! एकसारखे थव्यांवर थवे लागलेले दिसत आहेत! अगदीं उंच पाहिलें, म्हणजे ते लहान मुंग्यांसारखे दिसतात. आणि एका पाठी मागून एक अशा किती टोळ्या येत आहेत ह्या? अहो हे आले. तरी कोणीकडून? जणू काय ह्यांचा पाऊसच पडत आहे.

बाबा०—आमचे बावा आज सकाळीं म्हणत होते कीं, हे उत्तरेकडून पिकाची धुळधाण करून इकडे वळले आहेत; नुकसान तर अतोनात होणार, व अगदीं वर्षाच्या कडेला असें अशुभ चिन्ह मुळींच कल्याणकर नाहीं. पाहवें काय होतें तें. (हळूच) पण **माणेकभाई**, तुम्हाशीं कांहीं एकांतीं बोलावयाचें आहे, तें बोलून नंतर आपण हवेलीकडे वळूं. तर चला आपण ह्या **रणछोडजी**च्या मंदिरांत घटकाभर बोलत बसूं.

ह्यापूर्वी दोन दिवस थोडेबहुत टोळ येऊं लागले होतेच, आणि ह्या दिवशीं तर टोळांनीं कहर केला होता; त्यामुळें जणू पूर्वीचे टोळांचे लहानसहान थवे टोळांच्या फौजेचे बिनी होते असें वाटलें. एकदोन महिने ही टोळधाड मेवाड व काठियावाड प्रांतांत राहून तेथें कोठेंही हिरवा पाला शिल्लक न ठेवून, हळू हळू **अमदावादे**च्या सभोंवतालच्या दसक्रोई (दशक्रोशी) परगण्यावर उतरली.

हे टोळ रंगानें पिंवळट व तांबूस असतात. त्यांची लांबी साधारणत: १ पासून ६ बोटें असते. त्यांच्या पायांना करवतीसारखे पकडीसाठीं लहान लहान कांटे असून नाकावर झुरळांसारखे दोन लांब सूक्ष्म तंतु असतात. हे प्राणी इतके जरी लहान असतात, तरीही त्यांच्यामध्यें प्राणिमात्रांस उपद्रव करण्याची शक्ति अतिशय असल्यामुळें त्यांचें आगमन कधींही कोणालाही आनंददायी नसतें. ह्या वेळेस घरांच्या कौलांवर, झाडांवर, व रस्त्यांवर त्यांच्या झुंडीच्याझुंडी बसल्या होत्या, आणि वरतीं त्यांच्या थव्यांच्या रांगा एकावर एक अशा लागल्या होत्याच, व एकसारख्या नवीन नवीन येतही होत्या. कोणी मनुष्य जवळ आल्यास रस्त्यावर बसलेला थवा झटकन् उडून दुसरे निवांत ठिकाणीं जाई. एकदां जेथें ते तळ देत, तेथें सर्व समूळ भक्षण केल्याशिवाय मुळींच ते उठत नसत. एकाद्या झाडावर बसले तर प्रथम कोंवळी पालवी, नंतर जुनाट पानें वगैरे खाऊन, पुढें उपाय चालत नाहीं, म्हणून केवळ पर्णहीन खांद्या ठेवून ते पुढच्या मुक्कामावर जात. खालीं जमिनीवर बसले, तर तेथें उगवलेलें हिरवें गवत अगदीं मुळापर्यंत कुरतुडून खात. त्यांच्या तडाक्यांतून केवळ वाळलेलीं पानें व गवत कायतें राही; मग तें रंगसादृश्यानें कींव येऊन ते टाकीत कीं काय, कोण जाणे. ह्या असल्या त्यांच्या खादाडपणामुळें व सर्वभक्षीपणामुळें त्यांच्या पश्चात बहुतकरून दुष्काळ आपलें उग्र स्वरूप दाखविल्यावांचून राहत नसे. पण असल्या उपद्रवी प्राण्यांसही एकाद्या झाडावरून हांकूं लागल्यास एकादा पिंवळा टिळा लाविलेला जैन येऊन म्हणायाचा 'छे: जाऊं द्या; त्या गरीब प्राण्यांच्या वाटेस कशाला जातां? खाऊंद्या बिचाऱ्यांना.' परंतु त्यांच्यामुळें पुढें मनुष्य अन्नाला मोताद होऊन कदाचित् प्राणालाही मुकतील, ह्याची त्याला विशेष परवाही नसे. फक्त मनुष्यजातीला त्यांचें आगमन भोंवतें असें नाहीं, तर त्यांव्यातिरिक्त बाकीच्या तृणोपजीवी पशुपक्ष्यांसही त्यांपासून अतिशय पीडा सोसावी लागते. गवत नसल्यामुळें

गुरेंढोरें प्राणास मुकतात, व पुरतें धान्य नसल्यामुळें मनुष्यवर्गाला क्लेश सोसावे लागतात. असले हे केवळ शलभरूप घेऊन यमाचे दूतच जगतांत संहार करण्याकरितां फिरत असतात; किंवा ह्या जगांत यज्ञयाग होत नाहींतसें पाहून महेंद्र कोपाविष्ट होत्साता अलवृष्टीच्याऐवजीं ह्यांची वृष्टि कधींकाळीं पाठवितो.

ही दुपारची वेळ असल्यामुळें ह्यांच्या पंखांवर सूर्याचे किरण पडून ते चकाकत होते. अगदीं भिडून गेलेल्या गच्च रांगांनीं सूर्याचा प्रकाश अंधुक झाला होता, त्यामुळें जणू कांहीं आकाशांत राखेच्या रंगाच्या कापडाचें छत दिलें आहे, व त्या छतांत तांबूस व पिंवळे काचमणी बसविले आहेत, असें वाटलें. किंवा शिशिर ऋतूमुळें सूर्याचीं किरणें आकुंचन पावून व एकवटून तीं शलभमिषानें वसंतामध्यें वातावरणांत संचरूं लागलीं, व तेणेंकरून प्रकाशही कमी झाला. किंवा ही टोळधाड भावी धुळवडीची सूचकच होती. वसंतामुळें कदाचित् पुष्पबाण बळावेल, या भयानें मृडानीपति एकवार तृतीय नेत्र उघडून शलभरूपी ज्वाला नूतन पल्लव व पुष्पें ह्यांचा लय करण्याकरितां अंतराळांत प्रेरिता झाला. त्या टोळधाडीपासून फक्त कावळे, घारी, गीध वगैरे जीवजंतूंवर उपजीविका करणाऱ्यांना कायतो आनंद. मनुष्य जातींपैकीं कोळी, वाघरी, भोई इत्यादि जातींना हे टोळ पक्वानांसारखे वाटतात. बाकी सर्वत्र ह्यांपासून सर्वथैव अपाय. टोळधाड ही हानीची सीमा, अनुपयोगितेची पराकाष्ठा व दैवकोपाचा परमावधि होय. अशा क्षुद्र जंतूंपासूनही त्यांच्यापेक्षां शरिरानें, बलानें व बुद्धीनें श्रेष्ठ प्राण्यांना देखील यातायात सोसावी लागते; यावरून जुटीपासून लहानशा प्राण्यांना कर्तुमकर्तुम् शक्ति किती येते, हें सिद्ध होतें. एवढी खालच्या प्रतीच्या प्राण्यांची योग्यता, तर मग ज्यांची बुद्धि प्राणिवर्गांत परिपक्वदशेप्रत येऊन पोहोंचली आहे, अशा मनुष्यवर्गास काय असाध्य आहे बरें? आतां एवढें खरें आहे कीं, टोळांसारख्या जीवांना नाश करण्याचीच कायती शक्ति असते, परंतु मनुष्यांमध्यें ही शक्ति असूनही सर्व प्राणिमात्रास सुख देण्याची दैविक शक्ति देखील असते, म्हणून मनुष्यमात्रांनीं आपल्या सच्छक्तीचा उपयोग करावा, हें त्यांना सर्वथैव उचित आहे. असो.

कांहीं वेळ **रणछोडजी**च्या मंदिरांत खलबत करून **माणेकभाई** व **बाबासाहेब** हे दोघेजण बाहेर पडले. बाहेर पडतांना **बाबासाहेब** म्हणाले—**माणेकभाई**, तुम्ही त्याची बिलकुल काळजी करूं नका. तसा प्रसंग लौकरच मी आणवितों, व तुम्हाला तसली शंका धरण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं, अशी खात्रीही करवितों.

**माणेकभाई**—साहेब, आपण आमच्यावर लोभ करितां, म्हणून हें उगीच बोलायाचें. वास्तविक दृष्टीस पडल्यास तसा लोभ राहील कीं नाहीं, म्हणून मी बोलतों.

**बाबा**०—तुम्ही तरी बरेच आहां. आपल्या वस्तूविषयीं इतकी कां तुम्ही खात्री देऊं शकत नाहीं? पसंतीचें कलम तर निरर्थक आहे, कारण आमच्यावरच सर्व त्याविषयीं अवलंबून राहणार. आणि आम्ही म्हणजे उलट अभिप्राय देऊं, असें कधींही

होणार नाहीं. असा आमचा पुष्कळ दिवसांपासून दृढ निश्चयही झाला आहे. येऊन जाऊन राहिली कबूली. आपलीं माणसें आपण संभाळावींत. पण त्याविषयीं तूर्त बोलणें राहूंद्या. पहिल्याविषयीं मघां सांगितल्याप्रमाणेंच लौकर योगायोग आणवितों. बाकीच्याविषयीं तुम्ही मोठ्या सावधगिरीनें तजविजींत असा म्हणजे झालें. काम फत्ते झाल्यास तुम्ही सुद्धां खुप व्हालच. चला तर, वेळ झाली. आपण हवेलींत जाऊं.

उच्च सत्पथावरून मनुष्याचें स्वेच्छेनें अध:पतन व्हायाला लागलें, म्हणजे तो अमुकच निंद्य काम करून थांबेल, असें कधींहीं कोणीं समजूं नये. रसातळास पोंहचल्याशिवाय त्याच्या मनाची तृप्तीच होत नाहीं.

## भाग ९.

त्यांचा संग नको मजलागीं । त्यांच्या तोंडा लागो आगी ॥ध्रु०॥
वरिवरी वचनें दाविति गोड । अंतरिं दुर्बुद्धीचा मोड ॥ १ ॥

आनंदतनय.

**बाबासाहेबांशीं** बोलणें झाल्यापासून **माणेकभाई** हा घरीं मोठ्या मनमिळाऊ स्वभावानें वागूं लागला. आपल्या बायकोला अमकी एक गोष्ट आवडत नाहीं, तर ती गोष्ट मुद्दाम करून तिचें मन जो पूर्वीं पदोपदीं दुखवीत असे, तो त्या दिवसापासून तसें करीनासा झाला. **आनंदशंकराशीं** गोडीगुलाबीनें वागल्यापासून **जयलक्ष्मीला** आनंद होईल, हें जाणून त्यानें त्याच्याशीं सुद्धां फारच सलोख्याची व ममतेची वर्तणूक ठेविली. एकही दिवस कर्णकटु बोलल्याशिवाय ज्यानें जाऊं दिला नाहीं, त्या **माणेकभाईंत** आपल्याविषयीं अशी चांगली बुद्धी झालेली पाहून, **आनंदशंकराला** बरेंच नवल वाटलें, परंतु ह्यांत कांहीं तरी मानभावीपणा असावा, असें त्याच्या कधींही लक्षांत न येऊन 'पूर्वीं मीच वाईट वागत असेन, म्हणून ते मला नेहमीं बोलत. आतां मी तसा कांहीं द्वाडपणा करीत नाहीं, म्हणून तर ते ह्या १०-१२ दिवसांत किती मजवर माया करितात' असें म्हणून तो सुखासमाधानांत दिवस घालवूं लागला. **जयलक्ष्मीला** तो एके दिवशीं म्हणाला 'ताई, आतांशीं भाई मला कधीं रागें भरत नाहींत. नेहमीं कचेरींतून आल्यावर माझ्याजवळ बसतात, व आज काय शिकलास वगैरे विचारतात व अक्षर पाहून कधीं कधीं वळणही देतात.' ह्यांत कांहीं तरी काळेंबेरें आहे, अशी **जयलक्ष्मीची** पूर्णपणें खात्री होतांच; प-

रंतु तशी शंका येऊन उगाच सुखांत असणाऱ्या **आनंदशंकराचें** मन दुःखित करूं नये, म्हणून ती म्हणाली ' बाळा, ते किनई तुझ्या बऱ्यावरच आहेत. एकादे वेळेस ते बोलतात; परंतु त्याकडे लक्ष देऊं नये, म्हणजे झालें. ( मनांत ) पण असला कृत्रिम प्रेमा किती दिवस टिकेल, कोण जाणे. '

हिच्या मनांत साहजिक **माणेकभाई**च्या एकंदर वर्तनांतील खरेपणाविषयीं बराच संशय होता; तथापि तो त्याच्या नजरेस न पाडतां पूर्वी जी नवऱ्याशीं अगदीं बोलण्याची टाळाटाळी करी व कंटाळा दाखवीत असे, तसें सध्यां न करितां वरकांती उल्लास दाखवून ती त्याच्याशीं थोडें बहुत काम नसतांही बोलूं चालूं लागली. ह्या तिच्या स्वभावांत पालट झालीसें पाहून **माणेकभाई**ला बराच आनंद झाला; व आपला इष्ट हेतु सिद्धीस नेतां येईल असा त्याला धीर आला. डोहाळेजेवणानंतर तिच्यावर जो प्रसंग आला होता, तेव्हांची ह्याची उदासीन वर्तणूक थोडीबहुत तिच्या कानांवर **मोहना**कडून गेली होती; व आपण ज्यांवर ममता करितों, त्यांवर हा बहुशः सापासारिखा डाव धरितो, अशी तिची खात्री झाली होती. ह्या दोन्ही कारणांनीं ती गेल्यावर्षांत ह्याशीं अगदीं अडल्याखेरीज कधींही बोलली नाहीं. आपल्या संसाराची साधारण माती झाली आहे, असें जरी ती पक्कें जाणून होती, तरीही आपल्या वृद्ध पित्यास व शेजाऱ्यापाजाऱ्यांस वस्तुस्थिति कळल्यास उगाच त्या बिचाऱ्याला काळजी, व लोकांत आपली फटफजीती होईल, म्हणून ती वरकांती आनंदवृत्ति ठेवून आपलें दुःख गिळून टाकीत असे. लोकांसमक्ष तिनें नवऱ्याला कधींही टाकून बोलूं नये; परंतु एकांतांत जर प्रसंग पडला, तर ती त्याला बोलल्याशिवाय राहत नसे. पूर्वी ही लहान असतां जसा तो मारून मुटकून तिला चीप बसवीत असे, तसें आतां करण्याची ह्याची छाती नव्हती, म्हणून त्याला मुकाट्यानें जळफळत सर्व बोलणीं ऐकून घ्यावीं लागत. कारण सर्व विकोपाला गेलें असतां, कदाचित् आपला मनोदय सिद्धीस जाणार नाहीं, म्हणून तो दम धरून स्वस्थ बसे. एकमेकांचीं उणीं नवराबायकोला माहीत असलीं, व त्या उणेपणापासून त्यांपैकीं एकाला कांहीं कार्यभाग साधून घ्यायाचा असला, म्हणजे असाच सुखाशिवाय काळ लोटावा लागतो. नवराबायकोंत भांडणें तर व्हायाचींच;. परंतु नेहमीं बेवनाव असणें व कधींमधीं भांडण होणें, ह्यांत महदंतर आहे. आणि तशांत भांडणाभांडणांतही अंतर आहेच. कारण कित्येक प्रेममूलक व प्रेमपर्यवसायी भांडणें असतात, व कित्येक द्वेषमय भांडणें असतात. त्यांपैकीं दुसऱ्या तऱ्हेच्या भांडणांनीं संसाराची राखरांगोळी होते; परंतु पहिलीं भांडणें दंपत्याच्या परस्पर प्रेमाला व्यंजनाप्रमाणें रुचकर व उत्कर्षदावी असतात. अतएव केवळ भांडणानेंच मनुष्य संसारसुखाला अंतरतो, असें कदापि समजूं नये.

त्याच दिवशीं रात्रीं **जयलक्ष्मी** खोलींत आलीसें पाहून **माणेकभाई** म्हणा-

ला–हों, मला वरी आठवण झाली. मला ते **गोविंदराव वकील** आज दुपारीं कचेरींत भेटले होते. त्यांनीं सहज गोष्ट काढतां काढतां आपल्या **आनंदशंकराची** फारच प्रशंसा केली. त्यांच्या सांगण्यावरून याचें संस्कृतांत बरेंच अध्ययन झालें आहे-सें दिसतें. मी एक दोन दिवसांत त्याची परीक्षा घेऊन माझी खातरी झाल्यास एक सोन्याची अंगठी त्याच्या बोटांत घालीन. कारण आपण जर त्याला मुला-प्रमाणें वाढविलें, तर आपल्या योग्यतेस साजे असा त्याचा डामडौलही ठेविला पा-हिजे, नाहीं बरें ?

**जयलक्ष्मी**–( मनांत ) काय कावा क-रण्याचें मनामध्यें आणलें आहे, कोणजाणे. काय विद्वत्ता रडती आहे, ती जशी काय मला ठाऊक नाहींच. परीक्षा घेण्याचें तोंड तर पहाना. ( उघड ) पण त्याला ती अंगठी कशाला द्यायाला हवी ? बावांनीं कांहीं कमी केलें नाहीं. उगाच जास्ती लाडावून तो बिघडेल मात्र.

**माणेकभाई**–माझी पक्की खात्री झाली आहे कीं, तो कांहीं बिघडणार नाहीं. प-रंतु तुम्ही म्हणतां म्हणून ती सध्यां देत नाहीं. पुढें एकादा चांगला सणावाराचा दिवस पाहून त्याला ती दिल्यावांचून मात्र मी कांहीं राहणार नाहीं. कारण त्याला जितका परकेपणाचा विसर पडेल, तितकें करण्याकडे आपण झटलें पाहिजे.

**जय०**–( मनांत ) हे म्हणतात, त्याप्र-माणेंच त्यांच्या मनांतही चांगले विचार आ-हेत का ? परंतु कोण जाणें तसेंही असेल. अगदीं जगांतून उठलेले लोकही कधीं कधीं सदुपदेश व सत्संगति ह्यांनीं मार्गावर येतात. त्याप्रमाणेंच यांच्यामध्येंही तसा बदल झाला असेल का ? तसें झालें, तर अजून सुद्धां संसार उभारतां येईल. पण छे; मी बोलून चालून अभागी. माझ्या कपाळीं इ-तकें सुख कोठून असणार ? प्रत्यक्ष ह्या बो-लण्याविरुद्ध ह्यांची करणी होईतोंपर्यंत, मी तरी असे कुतर्क काढून उगाच जीवाला ताप देत नाहीं. जगदंबेच्या कृपेनें ह्यांच्यांत पालट झाला असेलच. ( उघड ) मी कांहीं सांगितलें पाहिजे, असें मुळींच नाहीं. कारण माझी तितकी बुद्धि नाहीं व योग्यताही नाहीं. जें कराल तें योग्यच असणार.

**माणेक०**–( मनांत ) बायकांत पुरुषां-इतके डावपेंच नसतात. म्हणून हिचें बो-लण्यांत लबाडी असेल, असें मला वाटत नाहीं. असो, ही वेळ एकंदरींत वरी आहे; तर पर्यायानें खुलासा काढूं. ( उघड ) उ-गाच अंगीं वेडेपणा घ्यायाचा, नाहीं का ? काय म्हणे माझी बुद्धि नाहीं ? तुमच्यासा-रखी शाहाणी बायको विरळा. मला त्याचा पुष्कळदां अनुभव येऊन चुकला आहे, व यामुळें बऱ्याच गोष्टींविषयीं पूर्वीचे माझे विचार दे-खील बदलले. मी कधीं कोणाची फारशी स्तुति करीत नसतों, व यदाकदाचित् मीं केली, तर उगाच भलत्यासलत्या कुचकाम्या-ची कधींही करीत नसतों, समजलांत ?

**जय०**–(मनांत) देवा, हें स्वप्न तर ना-हींना ? इतकें गोड बोलणें कधीं ऐकिल्याचें मला तर आठवत नाहीं. सुखांत नांदण्याला मला अधिकार नाहीं, तरीही हे भवानी तूं कृपाळू होऊन अज्ञानांत घडलेले माझे सर्व अपराध पोटांत घालून, मला हा सो-

न्याचा दिवस दाखविलास, ह्याबद्दल मी कोणत्या रितीनें उतराई होऊं? (उघड डोळे भरून येऊन) मला इतकें गौरवाचें व ममतेचें बोलणें कधींही माहीत नव्हतें. म्हणून केव्हांही मजकडून मूर्खपणामुळें आचरणांत किंवा बोलण्यांत अपराध झाले असतील, तर ते पोटीं घालून ही आपली बटीक समजून आजच्याप्रमाणें नेहमीं सेवा घेत जावें, हेंच माझें मागणें आहे.

**माणेक०**–(मनांत) आतां बहुतकरून अगदीं ताब्यांत आली आहे. तर कांहीं सांगितलेलें मुकाट्यानें करीलच. (उघड) हें काय, इतकें गहिंवरायाला कशाला पाहिजे? गेल्या गोष्टींची आठवण काढून हल्लींच्या सुखांत कां विरजण घालावें? माझ्या मनांत तुजविषयीं कांहीं देखील राग नाहीं बरें.

असें त्यानें म्हणून तिच्या वरकांती चंद्रबळाला न जुमानतां तिला जवळ घेतलें, व आपल्या धोतराच्या पदरानें तिचे डोळे पुसले. अशा प्रकारची नवऱ्याची वागणूक तिला कधींही माहीत नसल्यामुळें तिच्या मनावर सद्यःसुखातिशय व पूर्वानुभूत दुःखें ह्या दोहों विकारांचा चमत्कारिक परिणाम झाला. एकदम सुखातिशय झाल्यामुळें तिला आपला देह ताब्यांत न ठेवितां आल्यानें देहभान जाऊन नैसर्गिक स्त्रीलज्जादि विकारांचा लोप होऊन नकळत त्याच्यावर तिनें आपला देह टाकिला. सद्यःस्थितीशीं पूर्वानुभूत दुःखांची तुलना करून तिला अतोनात रडें कोसळलें, व त्या रडण्यांत आनंद व दुःखाचें मिश्रण होतें; तथापि असला सुदिन दृष्टीस पडला, म्हणून तिला विशेष हर्षविकारच झाला होता. साधारणतः आपल्या लोकांत पूर्वीपासून पति हें मुख्य दैवत, प्रेमाचें साहजिक स्थान, व संसारसुखाचें आगर असें मानण्याचें लहानपणापासूनच स्त्रियांचे मनांत बिंबविल्यामुळें, त्या यदाकदाचित् कुमार्गाकडे नैसर्गिक प्रवृत्तींनीं म्हणा, किंवा पुरुषांच्या कपटजालानें म्हणा, जरी गेल्या, तथापि त्यांचा साहजिक ओढा पतीकडे असायाचाच. निःपक्षपातानें विचार करूं लागलें असतां, आपल्यास असें आढळून येईल कीं, बहुशः पुरुषच स्त्रियांना अनयपथाकडे घेऊन जातात, व कितीही यौवनभरानें पीडलेली व कामानें विव्हल झालेली स्त्री असली, तथापि ती स्त्रियांचें नैसर्गिक भूषण जी लज्जा ती टाकून परवश होते अशीं उदाहरणें फारच विरळा. अशी जर साधारण स्त्रियांची गोष्ट, तर जिच्या अधःपतनाला थोडाबहुत प्रत्यक्ष नवरा कारणीभूत असतो, तेथें तिचें वाईट पाऊल पडल्याबद्दल ती सर्वथैव दोषास पात्र होईल काय? आतां ह्यावर कदाचित् असा आक्षेप येईल कीं, प्रत्यक्ष लग्नाच्या बायकोविषयीं उदासीन असणारे लोक किंबहुना नसतातच; व जरी असले तथापि स्त्रियांनीं स्वधर्म सोडणें हें दंडार्ह आहे. जगांत प्रकृतिभिन्नत्व असतेंच, त्यामुळें अशा नराधमांचा केवळ अभावच कल्पणें, म्हणजे आपण सत्ययुगांत हल्लीं कालक्रमण करीत आहों असें होईल. बाकी स्त्रियेला वाममार्ग मोठ्या कष्टानें स्वीकारणें भाग पडल्यास, तिला दंड नसावा, असें कोणाही समजंस मनुष्यास वाटणार नाहीं. परंतु पुरुष कुमार्गाकडे आपखुषीनें वळला असतांही आपण हल्लीं ज्या न्यायानें फार झालें तर तो वाईट चालीचा आहे, एवढें म्हणून स्वस्थ

बसतो, व सामाजिक निर्भर्त्सनेचा त्याला पतित स्त्रियांप्रमाणें त्रास भोगावा लागत नाहीं, त्याच न्यायानें आपण तशा स्त्रियांची मोठ्या नाखुषीनें ह्यांतून घडलेली चूक जर पाहायाला लागलों, तर हल्लींच्या सामाजिक स्थितींत जी त्यांना पीडा सोसावी लागते, ती योग्य होईल काय? शारीरिक व मानसिक शक्तींनीं व तसेंच अनुभवानेंही पुरुष स्त्रियांपेक्षां बलवत्तर असतात. आपल्या इंद्रियांच्या बाह्य चेष्टेवर ते साहजिक त्यांपेक्षा जास्त दाब ठेवूं शकतील. अशा सर्व तऱ्हेनें पुरुष स्त्रियांपेक्षां अधिक शक्तिमान् असूनही, एकाच योग्यतेचा अपराध झाल्यास दोहोंच्या शिक्षेंत अंतर–पुरुषाला कमी शिक्षा व स्त्रियांना जास्त–हा न्याय विचारशून्य पशू देखील करणार नाहींत; तर मग सदसत् जाणणारे व न्यायीपणाची शेखी मिरविणारे पुरुष असा अन्याय करावयास धजतात हें केवढें आश्चर्य! शिवाय वर सांगितलें आहेच कीं, पुरुषांप्रमाणें स्त्रिया सहसा धजत नसतात. तर अशा अबलांस कपटजालामुळें फसून सर्व प्रकारें कमी गुन्हा केल्याबद्दल, जास्त दंडाई व निःसंशय जास्त अपराधी असे जे पुरुष त्यांपेक्षांही जास्त कडक शिक्षा, ह्या अन्यायसीमेला काय ह्मणावें बरें! आतां एवढें खरें आहे कीं, ह्या असल्या धरसोडीच्या व अन्यायमूलक शासनाबद्दल समाजाकडेस बराच दोष लागतो. ह्या योगानें व्यक्तिमात्रांस समाजाच्या ढिलेपणामुळें वाटेल तें करण्यास फावतें.' परंतु अशी समाजाची शोचनीय स्थिति सुधारण्याचें काम समाजाच्या पुढारी म्हणविणाऱ्या शिष्ट मंडळीकडेसच आहे. स्त्रीपुरुषांच्या संबंधानें सद्यःस्थितीपेक्षां अधिक शुचिर्भूत विचार व आचरण जोंपर्यंत समाजांत होणार नाहींत, तोंपर्यंत उत्कर्ष मिळविण्याविषयीं समाज योग्यच होणार नाहीं. कारण ज्या ज्या राष्ट्रांत अशा प्रकारची सुधारणा होत आहे, तीं तीं राष्ट्रें उदय पावत आहेत; ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. असो.

अशी पश्चात्ताप होऊन गाहिंवरलेल्या **जयलक्ष्मी**ची पतिवश स्थिति पाहून साधारण विचारी मनुष्याच्या हृदयांत तिच्या सारखेच विकार झाल्याशिवाय राहिले नसते. परंतु **माणेकभाई**वर ह्या अनुरक्ततेचा तसा हृदयंगम प्रकार मुळींच झाला नाहीं. गाढवास गुळाची चव काय, ह्या म्हणीप्रमाणें त्यावेळीं त्याची वर्तणूक होती. बायको आपलें म्हणणें आतां बहुतकरून ऐकेल, असें वाटून त्याला बराच आनंद झाला; व त्यामुळें प्रेमाभिभूत झालों असें त्यानें तिला भासविलें. एकंदरीनें **जयलक्ष्मी**च्या मनाप्रमाणें **माणेकभाई** नव्हता; परंतु नित्य खडाष्टक जेथें असे, तेथेंच अशी प्रसन्न मुद्रा पाहून ती स्वाभाविक त्याविषयींचा आपला तिटकारा विसरून आनंदसागरांत हेलकावे घेऊं लागली, ह्यांत कांहीं नवल नव्हतें. तिचा आशांकुर फिरून जोमानें बाहेर पडूं लागला, व इतके दिवस नवऱ्यानें आपल्याला वाईट वागविलें, ह्याचा विसर लवकरच तो आपल्या भावी सद्वर्तनानें व मायाळुपणानें पाडील, असें तिला पूर्णपणें वाटूं लागलें. आपली योग्यता नसूनही बायको मनासारखी सुरूप नसल्याबद्दल पुरुष जितका खेद करितात, व तशी अप्रयोजक बाबत काढून परस्त्रियांशीं निंद्य व्यवहार ठेवि-

तात, तितक्या कांहीं बायका आपल्या योग्यतेनुरूप सुरूप व मनासारखा नवरा नसतां नाहीं खिन्न होत नाहींत; व त्या सबबीनें वाईट मार्गाकडे सहसा जात नाहींत. निदान हल्लींच्या आपल्या बायकांच्या स्थितीमध्यें तरी आपल्या प्रस्तुतच्या संसारस्थितीस न कंटाळतां आनंदानें पतीच्या इच्छेनुरूप कालक्रमण करणाऱ्या साध्वीच फार मिळतील. कदाचित् ह्या चांगुलपणाला पाश्चिमात्य सुधारणेचें वारें लागून एकादे वेळेस त्याचें स्थित्यंतर न होवो म्हणजे झालें. चुकीनें भलत्या मार्गाकडे जाणारी स्त्री जर अनुताप होऊन परत सन्मार्गाकडे वळेल तर तिचें विशेष अभिनंदन केलें पाहिजे. तिला धीर दिला पाहिजे. स्त्रियांचें हृदय प्रेमानें परिपूर्ण असतें. आपलें प्रेमभांडार कोणावर तरी ओतल्याशिवाय त्यांच्या जीवाला सुख समाधान नसतें. त्यांच्या प्रेमभांडाराचा पति हाच सर्व प्रकारें अधिपति. आणि त्यानें त्या भांडाराचा विनियोग तिच्या कल्याणाकडे व सुखाकडे लक्ष्य देऊनच केला पाहिजे. शिवाय बोलून चालून स्त्रिया अबला. त्यांना कोणाचा तरी आधार पाहिजेच. आणि यौवनावस्थेंत पतीशिवाय दुसरा योग्य आधार त्यांना कोठून असणार? म्हणून पतीनें सदा आपल्या प्रियेविषयीं काळजी वाहून तिच्या सुखास्तव झटलें पाहिजे, हेंच त्याचें कर्तव्यकर्म. सर्व प्रकारें साधु व शुचिर्भूत असा मनुष्य सांपडणें फारच विरळा. म्हणून मुग्धावस्थेंत गैरसमजुतीनें नरपशूंच्या फुसलावणीनें सत्पथापासून कोणी च्युत झालें आहे असें समजलें, तर त्याची नैसर्गिक प्रवृत्ति कशी आहे, हें त्याच्या समजूं लागल्यानंतरच्या आचरणावरून पाहून नंतर त्याला दोष द्यावा. असें केल्यानें संसारांत सुखवृद्धि होते. उगाच दांभिक साधुत्वाचा आव घालून मनुष्याच्या हातून दुर्घट असें आचरण होत नाहीं, म्हणून व्यर्थ त्याची निंदा करावयाची, त्यांत शाहाणपण नाहीं व तादृश अर्थही नाहीं. मनुष्यमात्रांत मानवता असणें हेंच त्याला शोभतें. जो केवळ आपल्या निष्कलंक पुण्याचरणाचा गर्व वाहतो तो बहुश: भोंदू असावयाचाच. निष्कलंक बाह्याचरण व अंत:करणशुद्धि हीं दोन्ही एकत्र सांपडणें फारच विरळा; किंबहुना आधुनिक खटाटोपीच्या काळांत तीं सांपडण्याचें नांवच नको. गुणदोष पाहतां साधारण मनुष्यापेक्षां अमक्या मनुष्यांत गुणाधिक्य सांपडतें, असें मानवतेची कसोटी लावून आढळल्यास तो मनुष्य सज्जन आहे असें म्हणायाला कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. असो.

**जयलक्ष्मी**ला अत्यानंद झाला. तिच्या मुखचंद्रावर संतोषाचें व शांतीचें तेज झळकूं लागलें; त्यामुळें जणू धुक्यांतून नुकताच चंद्र पूर्णपणें मोकळा झाला असें वाटलें. अति भयंकर वादळांतून हिसके खातां खातां सुटलेलें तारूं समुद्राच्या किनाऱ्यावर शांत वेळीं नांगर टाकून एकदां निवांत स्थळीं पडलें, म्हणजे जसा तारवावरील नावाड्यांना आनंद होतो, तसाच परस्परविरोधामुळें संसारसुखास आंचवलेली **जयलक्ष्मी** पुन: शांत प्रेमसुख अनुभवूं लागली, व तसेंच तें कायम राहील ह्या आशेनें हर्षभरित झाली. संसार सुखदायी होण्याला फारसें कांहीं लागत नसतें. केवळ समाधान, शांति,

व प्रेम ह्या तिहींची सांगड असली म्हणजे स्वर्गाचें सुखच संसारांत असून मिळतें. ह्या मायाभ्रमाचें लौकरच निरसन होईल, असें ह्या वेळीं तिच्या स्वप्नींही नव्हतें. पतीचे ठिकाणीं तनमन अर्पून, जसा गारुड्याच्या पुंगीच्या नादाला नाग लुब्ध होतो, तद्वत् ती त्याच्या आधीन झाली होती. हा केवळ मोहाचाच झपाटा म्हणावयाचा; कारण नयन असून तिनें तें कृत्रिम आचरण पाहिलें नाहीं, स्मृति असून पूर्वीचीं दुर्वर्तनें विसरली, व बुद्धि असून कापट्य ओळखिलें नाहीं. तिजकडे तरी काय बोल? दैवताविषयीं शंका कधीं तरी संभवेल काय?

तिचें सांत्वन करून व तिला कुरवाळून **माणेकभाई** म्हणाला–छत्, असें वेड्यासारखें करूं नकोस. जशा कांहीं किती दिवसांनीं एकदांच्या गांठी पडल्या. मजजवळ पदर पसरण्याचें कांहीं कारण नाहीं. गतगोष्टी मी सर्व विसरलों बरें. त्याची आठवण काढून तूं उगाच हृद्रोग लावून घेतेस. त्यामुळें सोन्यासारखें अन्नही अंगीं लागत नाहीं. नीट चांगलें आनंदानें असावें म्हणजे झालें. (अंगावरून हात फिरवून) पण किती तरी तूं वाळत चालली आहेस?

**जय०**–माझा देह आपल्या कारणीं झिजला, तरच सौभाग्यसुख. आपल्याला आनंद तरच मला आनंद. मी इतके दिवस अंध होतें. मीं काय केलें पाहिजे होतें, हें न समजून माझे किती अपराध झाले, तें सर्व लक्षांत आलें, म्हणजे अगदीं भडभडून येतें. आपण दया करून अपराध पोटीं घालतां, परंतु आपले चरणाच्या धुळीला सुद्धां स्पर्श करण्याची माझी योग्यता नाहीं. मी कशी उतराई होऊं?

**माणेक०**–छेः छेः असें बोलूं नये. अजून काय झालें आहे? इतक्यांतच अशी विरक्तासारखी काय बोलतेस? (पायांशीं लोटांगण घेतलेलें पाहून) पण मी तुला सांगतोंना, मी सर्व विसरलों म्हणून. ऊठ, असें काय बरें? वेडी नाहीं तर माझ्या पोटांत कांहीं नाहीं बरें. फक्त माझे सांगण्याप्रमाणें करीत गेलीस, तर आपले सर्व दिवस आनंदांत जातील.

**जय०**–(मनांत) देवा हा गोड दिवस तूं मला सरतेशेवटीं दाखविलासना. एकदाचें घोर अंधारांतून उजेडांत सुखसोहाळे पाहण्यास मला बाहेर काढलेंस. मी जन्मोजन्मीं जरी तप केलें, तरीही हें सुख भोगण्यास मी योग्य होणार नाहीं. (उघड) आपल्या शब्दाबाहेर गेल्यास मला रौरव नरक नाहीं भोगावा लागणार? आजपासून आपल्या शब्दांवर माझें जीवन. आपल्या सांगण्याबाहेर मी कधींही जाणार नाहीं. माझ्या गळ्याची शपथ. मी जर खोटें बोलत असेन, तर माझी जीभ किडे पडून सडेल, बरें. आपली आज्ञा पाळणार नाहीं, अशी शंका सुद्धां नको घ्यायाला.

**माणेक०**–(मनांत) आतां काम झालेंच फत्ते. व तेंही किती सोप्या युक्तीनें. ह्याला म्हणावें शिताफी; नाहीं तर दुसरे बावळट काम करायाला जातात, व तोंडघशीं पडतात. आतां राहिलें कायतें, एकदाचें खुबीखुबीनें सांगायाचें. पण ती नाकबूल जाईल का? छेः मला नाहीं तसें वाटत.

बायकांचा ओढा साधारण तिकडेसच असतो. पण तसें कशाला? स्पष्ट कांहीं तशी गोष्ट सध्यां काढूं नये. अगोदर दृष्टीस पाडवावी, मग पाहूं काय होतें तें. (उघड) मला खात्री आहेच, परंतु उगाच तसें सांगायाचें, म्हणून सांगतों. बरें, आतां रात्रही बरीच झाली आहे, व अशा दुःखकारक गोष्टीपासून जीवाला मात्र क्लेश होतात; म्हणून गतगोष्टींविषयीं फिरून कधींही बोलायाचें नाहीं, बरें. पण, होय बरी आठवण झाली. तुला ते **बाबासाहेब कोतवाल** माहीत आहेत का?

**जय०**–**नानासाहेबांचे**ना? होय, पण मीं त्यांना कधीं पाहिलें नाहीं.

**माणे०**–होय तेच ते. त्यांचें कुटुंब **सरस्वतीबाई** तुला फार विचारीत होत्या म्हणे गेल्या वर्षाच्या वरघोड्याच्या प्रसंगापासून त्यांच्या मनांत तुझी ओळख व्हावी असें फार आलें आहे.

**जय०**–असें का? मला तरी बाई काय माहीत? गेल्या चैत्रांत त्यांच्या येथून हळदकुंकवाला, कीं कशाला कोण जाणे, बोलावणें आलें होतें; परंतु मला चैन नसल्यामुळें मी तिकडे गेलें नाहीं.

**माणेक०**–त्याचें आतां काय? परंतु ते इतकी विचारपूस करितात, तर त्यांच्या येथें जात जा.

**जयलक्ष्मी** 'होय जात जाईन' असें म्हणाली; व नंतर दोघेजण आनंदानें झोंपीं गेलीं.

---

## भाग ७.

### हळदकुंकू.

तिसरे दिवशीं **नानासाहेबांच्या** येथें चैत्राचें हळदकुंकू होतें. त्या दिवशीं त्यांच्या थोरल्या दिवाणखान्यांत पुष्कळ आरास केली होती. जिना चढून दिवाणखान्यांत जातांना एक लहानशी खोली होती. पायांची धूळ वगैरे झाडून टाकण्यासाठीं म्हणून तींत एक खरबरीत तरट ठेविलें होतें. दिवाणखान्यांत जाजम पसरून त्यांवर मधोमध्य दोन्ही बाजूंला सारख्या लांबीरुंदीचे दोन सुरेख गालिचे घातले होते. दरवाज्याच्या समोरच्या भिंतींतल्या कमानींत सिसवी लांकडाची कोरींव मेहरपींची चौकट बसविली होती. चौकटीच्या पुढल्या वरच्या भागावर बेगड लाविलें होतें. त्या चौकटीपुढें भिंतीला लागून. पेट्यांवर पेट्या ठेवून सुमारें अडीच हात उंच व तीन हात लांब व दीड हात रुंद जागा केली होती. त्या पेट्यांपुढेंच सुमारें दीडवीत वरच्यापेक्षां खालपट

व मागच्यापेक्षां दोन्ही बाजूंस दीडवीत सारखी जागा सोडून धाकट्या पेट्या ठेविल्या होत्या; व ह्या रीतीनें हळू हळू पायऱ्यापायऱ्यांनीं जागा निमूळती करीत उतार केला होता. अगदीं सरतेशेंवटीं त्या भिंतीपासून सुमारें ५ हातांवर एक दीडवीत उंचीचा चौरंग ह्या उतारामुळें ठेवावा लागला होता. ह्या पेट्यांवरून तिन्ही बाजूंनीं अमदावादी किनखाब पसरला होता. दोन्ही बाजूंस दीड हात उंच अशा दोन पितळी समया लाविल्या होत्या. चौकटीच्या आंत सुमारें दोन हात उंच घडवंचीवर एक चौरंग ठेवून त्यावर गोरीना कोरींव चंदनी लांकडी डोल्हारा ठेविला होता. त्या डोल्हाऱ्यांत पूर्वाभिमुख देवीची मूर्ति ठेविली होती; व पुढें चांदीच्या तवकडींत एक बाळकृष्ण ठेविला होता. चौरंगाच्या दोन्ही बाजूंस दोन चांदीच्या समया ठेविल्या होत्या. त्या कमानीच्या पुढच्या उतरणीवर चांदीच्या ताटांत अनरसे, करंज्या, लाडू वगैरे फराळाचें सामान नीट व्यवस्थेनें लावून ठेविलें होतें. जवळच एका चांदीच्या तबकांत हळदकुंकू, बुका, फणीकरंडा, आरसा, व ओटीचें सामान ठेविलें होतें. दोन्ही बाजूंस चांदीच्या घरांत ( सोंगट्यांत ) सुवासिक विजापुरी अगरबत्त्या लाविल्या होत्या; व फुलांच्या माळा टांगिल्या होत्या. खालच्या भागावर कारलीं, दोडके, आंबे, केळीं, पपनस, पेरू, डाळिंबें, द्राक्षाचे घड, मक्याचीं कणसें, ऊंस, मुळे, चिंचा, वांगीं, हरतऱ्हेच्या शेंगा, वगैरे हुबेहुब **गोकाकचीं** प्रसिद्ध लांकडी चित्रें, कांतलेली हस्तीदंती बुद्धिबळें, रंगीत लांकडी खेळणीं, व नानातऱ्हेचीं **पुण्याचीं** मातीचीं व कागदाचीं चित्रें मांडिलीं होतीं. खरबूज, कांलिंगड, पेरू, खिरण्या इत्यादि फळफळावळही तेथें ठेविलीं होतीं. समयांच्या पुढल्या बाजूस **पट्टण** येथील मातीच्या कुंड्यांत गव्हांचीं शेतें होतीं. अगदीं खालीं दोन्ही बाजूंस दोन लटोपटीचीं लहान मुलें गजनीची कुंची घालून गौरीकडे तोंड करून बसविलीं होतीं.

कमानीच्या वरती सर्व भिंतीभर मोठे विलोरी आरसे लाविले होते. दिवाणखान्याच्या सुरेख कडीपाटाच्या कोरींव छताला पांच पांच हंड्यांच्या तीन रांगा होत्या. प्रत्येक रांगेत पांढरी, हिरवी, तांबडी, हिरवी व पांढरी अशा अनुक्रमानें कांचेच्या हंड्या लाविल्या होत्या. उत्तर व दक्षिण भिंतींना चार चार खिडक्या होत्या. आंत बाहेरचा प्रकाश येऊं नये, म्हणून या खिडक्यांस मश्रूचे पडदे लाविले होते. ह्या भिंतींवर रामरावणादिकांचीं युद्धें, अंगदशिष्टाई, पांडवांचा वनवास, द्रौपदीवस्त्रहरण, कृष्णाच्या बाळलीला वगैरे चित्रें हुबेहुब काढिलीं होतीं. त्या चित्रांवर रंगाची चकाकी दिसत होती. भिंतींच्या मधोमध थोरले **बाजीराव पेशवे** व **दमाजी गायकवाड** यांच्या तसविरी टांगल्या होत्या. भिंतींच्या खांचांत छताजवळ उदबत्त्या लाविल्या होत्या. कमानीच्या उजव्या बाजूस एका चांदीच्या गंगाळांत भिजविलेले हरभरे व चांदीच्या ताटांत खरबुजांच्या फांकी व बत्तासे ठेविले होते. डाव्या बाजूस जवळच्या खोलींत जाण्यासाठीं एक दार होतें. त्यावर एक चिकाचा पडदा सोडला होता. चांदीचे तबकांत पानसुपारी व चांदीच्या वाट्यांत हळदकुंकू होतें.

संध्याकाळच्या ५।६ घटकापूर्वीपासूनच बायकांची येण्याची सुरुवात झाली होती. ह्यानंतर सुमारें दोन घटकांनीं सर्व बायका गेल्यासें पाहून एक बरीच वयस्क स्त्री सुमारें २५ वर्षांच्या तरुण स्त्रीस म्हणाली—कायग **सरस्वती**, गुजराती बायकांना कांहीं बोलावणीं केलीं आहेत का? अजून कोणी आल्या नाहींत त्या?

**सरस्वतीबाई** म्हणाली—होय, केलीं आहेत तर. **अमृतलाल, साराभाई, निळकंठभाई** ह्यांच्या येथें बोलावणेंकरी पाठविला होता. मला वाटतें, त्या सगळ्या जणी मिळून येतील.

ह्यांचें हें बोलणें होत असतां आंतल्या खोलींत दुसऱ्या बाजूनें **बाबासाहेब** येऊन सुमारें १२।१३ वर्षांच्या पोरीस म्हणाला—कायग **गोदे**, आज तुला अगदीं बागडायाला व मिरवायाला मोकळीक आहे, नाहीं का? सासरीं असें करायाला मिळत नसेल, म्हणून आज नट्टापट्टा करून कशी उड्या मारीत इकडून तिकडे हिंडत आहेस? तुला कांहीं हळदकुंकू द्यावें लागत नाहीं का?

**गोदू** म्हणाली—भाऊ, आतांच कनई मी कोठें मोकळी झालें आहे. कोणी बायका आल्या, म्हणजे लगेच आई हांक मारीलच. पण तूं कशाला इकडे आमच्या राज्यांत आलास?

**बाबा०**-(हंसून) कां, तुझी कांहीं भीति आहे का? पण कायग अजूनपर्यंत कोण कोण येऊन गेल्या? कोणी गुजराती बायका आल्या होत्या का?

**गोदू०**—भाऊ, तुलारे बायकांची पंचाईत कशाला? कोणी येवो अथवा न येवो, पुरुषांनीं आमच्या कामांत उगाच लक्ष घालूं नये. बायकांत पुरुष लांबोडा न भाजून खातो कोंबडा.

**बाबा०**—पुरे, चाहाटळ नाहीं तर. मी एवढ्यासाठींच विचारितों कीं, बोलाविल्यांपैकीं कोणाकडील माणसें आलीं, कोणाकडील नाहींत, हें कळावें म्हणून. ही मजजवळ यादी आहे. ह्यांतून कोण कोण आले सांग पाहूं. मी ही वाचतों. नीट ऐक.

त्यानें ५।७ नांवें घेतल्यावर **निळकंठभाईचें** नांव आल्याबरोबर 'गुजराती बायकांपैकीं अजूनपर्यंत कोणीही आल्या नाहींत' असें ती बोलली; व 'आई, ही मी आलें' असें म्हणून ती तशीच गडबडीनें दार न लावतां चिकाचा पडदा बाजूला करून दिवाणखान्यांत गेली.

**गोदावरी** ही **नानासाहेबांची** धाकटी मुलगी. ही माहेरीं नुकतीच आली होती. ही **बडोद्यास गुप्त्यांच्या** येथें दिली होती. ही भावाप्रमाणेंच गोरीपान व नाकाडोळ्यांनीं सुरेख होती. अजून हिला समजूं लागलें नव्हतें, म्हणून तिचा स्वभाव बराच अल्लड होता. ही आईबापांची फार लाडकी होती, म्हणून माहेरीं येण्याबद्दल तिचा फार ओढा असे. माहेरीं असतांना लहानांपासून थोरांपर्यंत बेधडक मुरवत न धरितां लुबलुब बोलायाला ही मुलीं भीत नसे. हा केवळ तिच्या मुग्धपणाचाच परिणाम होता. फार वेळ एके ठिकाणीं कधीं नीट निवांत बसलेली ती क्वचितच आढळायाची. तिचा लहानपणाचा चंचलपणा अजून कांहीं गेला नव्हता.

त्यां वयस्क बायकोचें नांव **गोपिकाबाई**. ती **नानासाहेब कोतवाल** ह्यांची पत्नी होय. ही स्वभावानें फार सालस असे, व नवऱ्याच्या अगदीं आज्ञेंत असे. ही पूर्वी स्वरूपवान असावी, असें दिसत होतें. आतां वयपरत्वें तिच्या अंगावर सुरकुत्या पडल्या होत्या, व चेहरा सुकलेला व ओढलेला दिसे. नवऱ्याचे मानानें ही जास्त थकली आहेसें, दिसत होतें. हिला मुलांचा भारी लळा असे. ही घरच्या आश्रीत मंडळींनाही मोठ्या ममतेनें वागवी.

**सरस्वतीबाई** ही **बाबासाहेबांची** बायको. ही **चिटणिसांची** मुलगी. **बाबासाहेबां**पेक्षां ही दोन वर्षांनीं लहान होती. ही स्वरूपानें साधी होती. हिच्या समोर **बाबासाहेब** नेहमीं वचकून वागत असे. एकंदरींत हिचा नवऱ्यावर पगडा बराच होता; व ही समंजस असल्यामुळें त्या पगड्याचा लोकांना जाच होई असा वाईट उपयोग न करितां ती आपला मान राखून असे. हिला एक तीन वर्षांचा **गणपति** नांवाचा मुलगा होता. हिच्या शाहाणपणाविषयीं सासऱ्याची पक्की खात्री होती. जोंपर्यंत ही नवऱ्यावर आपला दाब ठेवूं शकत आहे, तोंपर्यंत **बाबासाहेबाला** विशेष भीति नाहीं, हें तो समजून होता. आपण रूपवान नाहीं, त्यामुळें नवऱ्याच्या पसंतीस आपण विशेष नसणार, हें समजून ती आपला प्रेमा, कंटाळा येईल ह्या भीतीनें, त्याला फारसा उघड दाखवीत नसे. तिला आपल्या नवऱ्याविषयीं साधारण कुणकुण कळत असे. पण उगाच भलत्या कामीं चिकित्सा करून प्रस्तुतच्या स्थितीपेक्षां वाईट स्थिति आणणें, हें तिला मुळीं पसंत नव्हतें; म्हणून जणू काय आपण त्या गांवचेच नव्हेत असें एकंदर वर्तनांत ती नवऱ्याला दाखवीत असे, व मनांतल्या मनांत काळजी करीत असे. बायकोला आपले ढंग माहीत पडत नसतील, असे तो मनांत मांडे खात असे; व जर बायकोला माहीत नाहीं तर आईबापांना कांहींच ठाऊक नसेल असें तो समजत असे. त्याचा दुसरा समज कांहीं अंशीं खरा होता. फक्त त्याच्या बापालाच कायतें गतवर्षीं एवढें माहीत झालें होतें कीं, हा **बुलाखी**सारख्या हलकट लोकांच्या संगतींत आहे; व हें चांगलें नाहीं असें समजून त्यानें **बडोद्यास पंडितां**च्या वशिल्यानें ह्याला रोजगारही देवविला होता.

वहीण बाहेर गेल्यावर नवीन बायका कोण कोण आल्या हे फटींतून पाहत तो चिकाच्या पडद्याजवळ उभा राहिला, तों त्याला कांहीं गुजराती बायका आंत वसलेल्या दिसल्या. त्यांत त्यानें **जयलक्ष्मी** ही पाहिली, व ती हीच अशी **माणेकभाईनें** सांगितलेल्या खाणाखुणांवरून व साडीच्या रंगावरून त्याची खात्री झाली. तिच्या चेहऱ्यावर तो हंड्यांतील अंधुक प्रकाश पडून ती नेहमीपेक्षां जास्त मनोहर दिसली, व तिची एकंदर बांधेसूत अंगची ठेवण पाहून **बाबासाहेबा**सारख्या रंगेल मनुष्याला आल्हादही झाला.

त्या बायकांच्या हाताला कोंपरापर्यंत चंदनाचें गंध लावून, व त्यावरून वज्री ओढून नंतर **गोदावरी** त्यांना हळदकुंकूं देवूं लागली. **सरस्वतीबाईनें** त्यांच्या ओट्या भरल्या. नंतर कांहीं वेळ बसून त्यांनीं

इकडल्या तिकडल्या गोष्टी काढिल्या. **गोपिकाबाईंनीं** त्यांपैकीं एका वृद्ध बाईस त्यांचीं नांवें वगैरे विचारिलीं. त्या बाईनें ' ही **संजूवा साराभाईची** मुलगी, ही **दिवाळी अमृतलालांची** सून; पलिकडली, **रुक्मणी** ( रुक्मिणी ) माझी मुलगी. ही माझ्याजवळ बसलेली **निळकंठभाईची** मुलगी, **जयलक्ष्मी** ' वगैरे सांगितलें. ' ह्याच का **जयलक्ष्मी** बाई ? गेल्यावर्षीं तुम्ही कांहीं आमच्या येथें हळदकुंकवाला आलां नाहीं. बरें झालें, आतां तरी ओळख झाली. दोन तीनदां मला विचारणें झालें होतें. तुम्ही आमच्या येथें कधींमधीं अगत्य येत जा. संकोच धरूं नका ' असें **गोपिकाबाई** म्हणाली, व नंतर त्या बाया उठून घरीं गेल्या.

इतक्यांत **गोदू** चटकन आंतल्या खोलींत गेली. **बाबासाहेब** तिला पाहतांच चपापून मागें सरला. ती म्हणाली–कायरे भाऊ, तूं चोरांसारखा लोकांच्या बायकांकडे कां पाहत होतास ? मी वहिनीला सांगेन बरें.

वरच्या संभाषणानें **बाबासाहेबा**च्या मनांतील संशय दूर झाला होता, ह्यामुळें तो फारच आनंदित झाला होता. तो थट्टेनें बोलला–**गोदे**, तूं मला दटावतेस का ? जाऊन सांगेनास. मी तिच्याचकडेस पाहात होतो, जा.

**गोदू** मान हालवीत म्हणाली—असें काय ? तुला भाऊ हांक मारितो म्हणून जाऊन तिला सांगूं का?

असें म्हणून गडबडीनें बाहेर जाऊन, तिनें हळूच **सरस्वतीबाईस** तसें सांगितलेंच. **सरस्वतीबाई** म्हणाली—वन्सें, तुम्ही उगाच नेहमीप्रमाणें थट्टा तर नाहींना करीत. पण मी नाहीं जात. तुमच्या मनांतलें हांका मारणें झालें असेल.

हें बोलणें ऐकून **गोपिकाबाई** म्हणाली–**सरस्वती, गोदू** कांहीं खोटें नसेल सांगत. बाबाला कांहीं पेटींतून पाहिजे असेल. जाग, त्याला काय हवें तें दें.

**सरस्वतीबाई** आंत जाऊन कोणी नाहींसें पाहून बाहेर आली, व **गोदू**जवळ जाऊन हळूच कानांत म्हणाली–वन्सें, तुम्हीं वऱ्याच किंहो आहां ? आतां तरी हा पोरकटपणा टाकून द्या.

**गोदू**–वहिनी, कां बरें, भाऊ नव्हता का तेथें ? तो गेला असेल आपल्या खोलींत. पण माझ्या गळयाची शपथ तो मघाशीं तेथें बोलत उभा होता.

आणखी कांहीं बायका येऊन गेल्यावर अगदीं तिनीसांज झाली. आंत फक्त कायतो हंड्यांचा व समयांचा उजेड पडला होता. छताचें सुरेख प्रतिबिंब आरशांत पडलें होतें. प्रतिबिंबांत आरशाच्याजवळचे छतापासून तो तहत जिन्याच्या दरवाज्यापर्यंत छत हळू हळू उंच होत गेलेलें दिसत होतें. त्यांत हंड्या तर फार नामी दिसत होत्या. व तिकडेसच पाहूं लागलें, म्हणजे त्या बाजूला दुसरा अशाच छताचा एक दिवाणखाना आहे, असा भास होई.

ह्या दिवाणखान्यांत उदबत्त्या व अगरबत्त्या ह्यांचा चोहोंकडे घमघमाट सुटला होता. मधून मधून बायकांचा समुदाय येऊन तेथें फारच शोभा दिसे. **भद्रे**मधील दक्षिणी बायका कृष्णपर्पास लाज-

विणाऱ्या वेण्या घालून निरनिराळया कांठांचीं उंचीं लुगडीं नेसून व अलंकार लेऊन आल्या होत्या, त्यामुळें त्यांचें साहजिक सौंदर्य दसपट दिसलें. ह्या सर्वांत **गोदावरी** ही लहान असूनही फार सुरेख दिसत होती; व हिच्या चपलपणामुळें इतरांपेक्षां जास्त श्रम होऊन मुखावर जास्त लाली व टवटवी दिसत होती. ही अंजिरी पैठणी नेसली होती, व मोठ्या आवडीनें आईनें आपले सर्व मोठमोठे डागिने हिलाच घातले होते. त्यामुळें ती कुऱ्यानें व डौलानें इकडून तिकडे आपले डागिने इतर बायकांच्या नजरेस पडतील, अशा रीतीनें जाये करीत होती.यौवन नुकतेंच इजकडे पाहण्यासाठीं म्हणून वळलें होतें. पुढें तिच्या उरावर आपलें बिऱ्हाड करावें, ह्या हेतूनें खुणेसाठीं म्हणून मदनानें आपल्या तांबूस पादुका तिच्या स्तनांच्या ठिकाणीं ठेवून दिल्या होत्या. मदनाला हिचा बळी द्यावा, ह्या इच्छेनें बालपणानें तिला गुबगुबीत केलें होतें. अनंगानलामुळें आपला वियोग होईल, म्हणून अलंकारांनीं यावेळीं तिला दृढ आलिंगन दिलें होतें. टुशीनें गळ्याला घट्ट मिठी मारिली, कंबरपट्ट्यानें कंबरेस विळखा दिला. सरीनें वज्रटिकेनें, गळसरीनें, पुतळयांची, मोहरांची वगैरे माळांनीं व चंद्रहारांनीं तिच्या हृदयावर शयन केलें. शिंदेशाई साखळयांनीं व तोरड्यांनीं पायालाच मिठी मारिली, व कांहीं केल्या त्या तिला सोडीनात. जोडवीं, मासोळया ह्यांनीं, नीच असलों म्हणून काय झालें आपण निदान तिच्या पायांच्या आंगठ्यांनीं व बोटांनीं पवित्र होऊं, म्हणून तेथेंच वास्तव्य केलें. नथेंतील चौकड्यानें दोन्ही ओठांचें एकदम चुंबन घेतलें व खालच्या लोलकांनीं (झिरमिळ्या) अधरोष्टाचें तृप्ति होईपावेतों अमृत चाखिलें. कर्णफुलें, किडूक हे आमचा अव्हेर करूं नकोस, म्हणून तिच्या कानांजवळ गुणगुणत होते. बुगड्या मोत्यांच्या वेलांनीं तिच्या केशाचा आधार धरून कानांवर बसल्या होत्या. बिंदीबिजवरा निर्दय मदनापासून तिचें संरक्षण करण्यासाठीं म्हणून तिच्या मुखचंद्राचें रक्षण करीत होता. केवडा, व शीषफुलें पाहून, व केश हे आपले काळे वर्णाचे बंधू आहेत असा भ्रम पावून, पिंवळा नाग तिच्या डोक्यावर बसला. हिला दृष्ट लागूं नये, म्हणून हिच्या हनवटीवर व गालावर गोंदलें होतें. हिच्या कपाळाची शुभ्रता व विशालता पाहून हा आपला जेष्ट बंधु चंद्रच असें समजून, कुंकुमतिलकमिषानें मंगल ह्या अपूर्व भेटीचा आनंद अनुभवूं लागला. हिच्या कपोलांवर अरुण कधीं कधीं विश्रांति घेत असे; व निळीं कमळें अरुण आहे म्हणून सूर्य असेलच असें समजून हिच्या डोळयांत येऊन राहिलीं. हिनें आपल्या नथेंतील व चंद्रहारांतील हिऱ्यांना व बोटांतील अंगठीला आपल्या मुखाचें व दांताचें शुभ्र तेज दिलें होतें.

कामराजासाठीं ब्रह्मदेवानें नवीन उत्पन्न केलेलें सिंहासनच; किंवा आपल्या नील केशांनीं अरुण, मंगळ, चंद्र इत्यादिकांच्या वास्तव्यानें आकाशासही लाजविणारी, अशी ही रतीची भावी सवत होती.

रात्र पडल्यावर बायका येण्याचें बंद पडलें, म्हणून **सरस्वतीबाई** व **गोपि-**

काबाई आंत गेल्या. नंतर कांहीं वेळानें बाबासाहेबानें आपल्या मित्रमंडळीस आरास पाहण्यासाठीं बोलावून त्यांस फराळाचें दिलें. अंगाला चंदन व बुका लाविला. 'व: काय छानदार आरास केली आहे, बाबासाहेबांची टापटीप व बेत पाहून घ्यावा? काय ह्या फुलांना खुषबो येत आहे? कायग गोदूताई, तूं आपल्या नवऱ्याचें नांव सांग पाहूं.' असें बोलून व पानसुपारी घेऊन ते आपआपल्या घरीं गेले; व बाबासाहेब विचार करीत फराळाला बोलावयाची वाट पाहत तेथेंच बसला.

## भाग ८.

### छळ.

धनलोभास्तव मारी मातपितावंधु मित्र सुतभार्या ।
लोभी न धरी लज्जा भीति दया, परि करी असत्कार्या ॥

नानासाहेबांच्या येथील हळदकुंकू झाल्यावर चवथे दिवशीं सकाळीं जयलक्ष्मी आपल्या खोलींत आंतून कडी घालून उजव्या हातावर कपाळ टेंकून व उजवी मांडी घालून विचार करीत बसली होती. ही पुष्कळ रडली असावी, असें तिच्या लाल व सुजलेल्या डोळ्यांवरून दिसत होतें. आतांही हिचे डोळे पाण्यानें भरलेले दिसत होते. हिच्या नाकपुड्या लाल झाल्या होत्या. ह्यापूर्वीच दोन घटका माणेकभाई रागानें पाय हापटीत व जोरानें दाराच्या फळ्या एकमेकींवर आपटून निघून गेला होता. जातांना धमकी देऊन तो म्हणाला 'नीट विचार करून मला फिरून संध्याकाळीं मनाजोगतें उत्तर दे, समजलीस. रडून कांगावा केलास, तरी तो माझ्या मुळींच कामीं पडणार नाहीं. माझें ऐकिलेंस, तर तुझें सर्व कांहीं चांगलें होईल. जर न ऐकिलेंस, तर माझ्याशीं गांठ आहे. पूर्वीचें विसरूं नकोस. तेंच सरकारांत कळविल्यास काय गत होईल, तें मी सध्यां सांगत नाहीं. काय आव आणते आहे ? जसें कांहीं कासोट्याचेंच पाणी प्यावें. पण ह्यानें मी फसणार नव्हें. तुला वाटेल तें कर. जा, पाहिजे तर आपल्या बापाला जाऊन सांग, किंवा त्या आपल्या आवडत्या बुळकट भावाला सांग. कांहीं केलेंस, तरी तूं माझ्या पूर्ण तावडींत सांपडली आहेस. एक तर ऐकिलें पाहिजे, नाहीं तर तोंडाला काळोखी लावून अब्रू घालवून घराबाहेर निघालें पाहिजे. कोणतें पत्करतें तें सांग. माझे पाय कशाला धरतेस ? निलाजरी नाहीं तर. तुजसारख्या निर्माल्याची माझे पाय धरण्याची योग्यता नाहीं. सोडतेस कां नाहीं, कां देऊं लाथ? काय तिला वाटतें, कोण जाणें ? जणू

कांहीं **दमयंती, तारामती** यांसारखी-च आपण एक आहे, असें ती समजते. परंतु बाजार वसवून अशा प्रकारचें ढोंग केल्यास कोण फसणार? ज्याला माहिती नसेल तो; मी नव्हे वरें. माझ्या कह्या-बाहेर जाणार नाहींस, तर पूर्वीचें झालें त्या सर्वांबद्दल क्षमा करितों. फिरून सांगत वसत नाहीं. जीव दिलास, तरीही तुझी अब्रू कायम राहील असें तूं समजूं नकोस. तुझें सर्वथैव नुकसान करण्याचें माझ्या हातीं आहे, समजलीस.'

'तिला माझें म्हणणें मान्य केलेंच पा-हिजे. पण ती इतके आढेवेढे कां घेते वरें? एकदां खालचें सोडून डोक्याला गुंडाळलें; मग पुन: तसें करायाला प्रत्यक्ष आज्ञा मि-ळत असतां कां तसें होऊं नये? होय समजलों. मला वाटतें, असा साध्वीचा डौल दाखवून पूर्वीच्या अपराधावर झांकण घालायाचें, किंवा तो मुळींच आपल्याक-डून झाला नाहीं, असें दाखवायाचें तिच्या मनांत असेल. पण छे: ती गोष्टच राहूं द्या. कशी अगदीं कबज्यांत आणिली आहे? आतां यदाकदाचित् तिनें जाऊन मूर्खपणानें त्या **निळकंठभाई**ला माझें म्हणणें कळ-विलें, तरीही हल्लींची माझी ममतेची व सर्व-प्रकारें दोषरहित अशी वर्तणूक पाहून त्या-च्यानें एकाएकीं तिजवर भरंवसा ठेवणार नाहीं; व शेजाऱ्यापाजाऱ्यांना सुद्धां हीच लबाड आहे असें वाटेल. प्रसंग पडल्यास, हीच वाईट चालीची आहे, अशी मला कुण-कुण समजली आहे, हें जर मी त्यांना सां-गितलें, तर त्यांना माझेंच बोलणें खरें वाटेल. आणि तितक्यांत आपली वाईट वर्तणूक नवऱ्याच्या नजरेस आली, म्हणून ही नव-ऱ्यावरच असला असंभवनीय आरोप करूं पाहत आहे, असें माझें म्हणणें जास्त सयु-क्तिक दिसेल. वरें, पुढें सरकार दरबार झा-ल्यास हिची पुरी फजिती होणार. एकंदर पाहतां मी सर्व प्रकारें जय मिळविणार.



'परंतु खरेंच आपल्या बायकोची अब्रू गेल्यास आपली नाहीं कां त्यांत फटफजिती? छे: असें समजणारे लोक खरोखर मूर्ख आ-हेत. बायकांची अब्रू, आणि ती जाते, हें सर्व खूळ आहे. पैसा जातो; घरदार जातें; परंतु अब्रू जाण्याचें उगीच थोतांड आहे. कोणत्याही आचरणामुळें जर संपत्तीची हानी होईल, तरच तें आचरण निंद्य म्हणावें. नि-दान माझा तरी असा समज आहे' असें तो बाहेर आल्यावर स्वत:शींच पुटपुटला.

प्रत्यक्ष नवऱ्याच्या तोंडांतून असली कु-ळाला कलंक लावणारी निंद्य आज्ञा ऐकून **जयलक्ष्मी**ला पराकाष्ठेचें सखेदाश्चर्य वाटलें. आपण स्वप्नांत तर नाहींना असें तिला प्रथ-मत: वाटलें; परंतु जसजसा **माणेकभाई** जास्त स्पष्ट रीतीनें उघड बोलत गेला, तस-तसा तोही आधार हळूहळू नाहींसा होत चालला; व खरोखरीच असलें भयंकर भा-षण आपण जागृतावस्थेंतच ऐकत आहों, अशी तिच्या मनाची खात्री झाली. तिनें काकुळतीस येऊन त्याची पुष्कळ विनवणी केली, ती पायां पडली; परंतु सर्व तिचें रड-णें व्यर्थ गेलें. तिच्या हृदयाला धक्का बस-ल्यासारखें होऊन, नवऱ्याच्या बोलण्याचा नीचपणा व निंद्यपणा तिच्या लक्षांत पूर्णपणें आला नाहीं. रात्रीं तिला मुळीं झोंप आली नाहीं; मध्यरात्रीच्या सुमारास **माणेकभा-**

ईला गाढ झोंप लागली; पण ही तरमळत जमिनीवर लोळत होती. तिला ह्या अवघड प्रसंगांतून कसें सुटावें, ह्याविषयीं कांहीं सुचेना. विचार करकरून आतां डोक्याच्या नाड्या फुटतात, किंवा डोक्याची कवटी ताडकन दुभागते कीं काय, असें तिला वाटूं लागलें. अगदीं पहाटेस नवरा जागा झाला, असें पाहून तिनें नानाप्रकारें पुन: त्याची काकळूत केली. नंतर प्रेमातिशय दाखविल्यास हा कदाचित वळेल असें समजून, तिनें त्याच्या गळयाला मिठी मारिली. ममतेनें व लडिवाळपणानें त्याचें मन वळविण्याविषयीं तिनें आपली लज्जाही एके बाजूला ठेविली; परंतु तो कसला चांडाळ? त्याला कांहीं देखील कींव न येऊन सरतेशेंवटीं त्यानें आपलें म्हणणें फिरून लाविलें. तिनें रडून आकांत केला. आपलें डोकें सुद्धां फोडून घेतलें. परंतु त्याचें एकसारखें दटावणें चाललें होतें.

धिक् असो असल्या कुलांगारांना! स्वत: हातांनीं आपल्या संसारभांडाराची किल्ली दरवडेखोरांच्या स्वाधीन जो करितो, त्याला पशु म्हणून गरीब बिचाऱ्या पशूंची देखील निंदा होते. आपल्यावरतीं स्त्रीनें अवलंबून असावें हें आपल्याला भूषण असून, तेंच भूषण चांगलीं पंचपक्वानें टाकून देऊन अभक्ष्यभक्षण करणाऱ्या सूकराप्रमाणें त्यानें सारासार विचार न करितां टाकावें, ह्यासारखें जगांत दुसरें मौर्ख्य नाहीं. जसें कोंबड्याला रत्न चांगलें न वाटून त्यानें तें टाकून दिलें, तद्वत्च आपल्या घरीं असलेलें स्त्रीरत्न असले नराधम दवडितात. परंतु हे नराधम दोषास जास्त पात्र असतात. कारण कोंबड्याप्रमाणें ह्यांना त्या रत्नाची पारख करितां येत नाहीं असें नसतें. केवळ द्रव्यासाठीं असला अतिगौण व्यवहार करावयाचा, ह्याला काय उपमा द्यावी कोण जाणे. द्रव्य हें श्रमसाध्य आहे; श्रम प्रत्येक मनुष्य करूं शकेल. परंतु स्त्रीरत्न प्रेमसाध्य असून दैविक अमूल्य ठेवा आहे. श्रमाप्रमाणें प्रेम हातचें नसतें. प्रेमाची योग्यता अनुपम आहे. हृदयाच्या सौजन्यावर, कोमलतेवर व प्रसादावर तें बहुश: अवलंबून असतें. तर असल्या सर्व प्रकारें दु:साध्य व प्राप्त झाल्यावर यत्नानें जतन करावयास उचित, अशा प्रेमाचा अव्हेर स्वत: होऊन करावयाचा, त्याची बुद्धि चळली, किंवा त्याला दुर्दैवानें घेरलें, किंवा तो सैतानाचा बंदा गुलाम झाला, असें म्हणायाला कांहीं प्रत्यवाय नाहीं. गृहलक्ष्मी दवडून द्रव्याभासानें तिच्या थोरल्या बहिणीस तो घरीं जागा देतो. यमानें असल्यासाठींच रौरव नरक केला आहे. अधमता देखील ह्याच्या कृतीला पाहून स्त्रियांचें भूषण जी लज्जा ती धारण करून कंटाळून परत जाते. अशांचें फक्त दर्शन झाल्यास प्रायश्चित्त घ्यावें, तीर्थस्नान करावें, व पापक्षालनार्थ रामनाम घ्यावें असें वाटतें. अशांच्या केवळ स्मरणानें पुण्यें सुद्धां एकदम जळून भस्म होतील, असा ह्यांचा प्रताप. दुनियेवर बदफैली जास्त करण्यासाठीं सैतान आपले हुजरेच ह्यांच्या रूपानें पाठवितो. असे हे जन्मचांडाळ, मूर्खशिरोमणी होत. पण अशा लोकांतही एक अतिनीच वर्ग आहे. स्वजातीयांव्यतिरिक्त परजातीय परदेशस्थांकडून आपल्या गृहभूषणांचा अपहार केवळ द्रव्यलोभानें जे करवितात,

त्यांची सर्व जगांत तुलना करायाला दुसरें कांहींही सांपडणार नाहीं. चमत्कार हाच कीं, असले निंद्य व्यवहार व अगम्यगमनादि निषिद्ध महापातकें मनुष्यवर्गातच सांपडतात. पशूंत असे निंद्य व्यवहार चालतात; परंतु त्यांना विवेचकता नसल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं तीं पातकें संभवत नाहींत. मनुष्यांची तशी गोष्ट नव्हे.

अमुक एक गोष्ट निषिद्ध आहे, तर ती कां निषिद्ध आहे, त्यांत कांहीं तरी वैलक्षण्य असावें, तें काय आहे तें पाहावें, अशी मनाची साधारणतः प्रवृत्ति होते. आणि अशी जर मनुष्याची स्थिति आहे, तर पापाचरणाकडे दुसऱ्यानें त्याचें मन वळवावें, म्हणजे आगींत तेल ओतल्याप्रमाणें किंवा माकडाला दारू पाजविल्याप्रमाणें व्हायाचेंच. ह्या प्रवृत्तीचें संयमन करण्याचीं सदुपदेश, सदाचरण वगैरे जीं साधनें त्यांचा पुरवठा ओतःप्रोत जवळ ठेवून मनुष्याला चांगल्या मार्गाला लावणें, हेंच आपलें इहलोकीं मुख्य कर्तव्यकर्म. परंतु त्या प्रवृत्तीलाच भर घालणें ह्यासारखा वेडेपणा नाहीं; कारण वाममार्गाकडे एकदां कां मनुष्य बहकला, म्हणजे वल्हें व सुकाणूं जाऊन तो कोठें जाऊन आदळेल ह्याचा नेम नसतो. असा जर साधारण ओळखीच्या मनुष्यांचा परस्पर धर्म आहे, तर ज्यांचा संबंध अतिनिकट आहे, व ज्यांचें नातें आधाराधेय भावमय व गुरुशिष्यभावमय असतें, अशीं लग्नाचीं स्त्रीपुरुषें त्यांमधील पुरुषानें स्वतः प्रियेला कुमार्गाकडे वळवावें, ह्यासारखें अनर्थावह अन्य नाहींच; आणि तशांत ती स्त्री स्वतः होऊन असल्या सर्वक्षयी फूसलावणीला न भुलून आपल्या कर्तव्यकर्मास जागृत असली, तर तिजवर वळजबरीचा प्रसंग यावा, म्हणजे केवळ तिजवर दुःखाचा कडेलोटच.

**माणेकभाई** बाहेर गेल्यावर **जयलक्ष्मीची** अशीच अवस्था झाली होती. त्याचे सरतेशेवटले शब्द तिच्या कानांत अद्यापपावेतों गुणगुणत होते. ती शांतपणानें विचार करण्याचा यत्न करूं लागली. परंतु सर्व अंतरंग जेथें क्षुब्ध झालें होतें, तेथें शांतपणा इतक्या लौकर कोठून येणार? ती आपल्याशींच बोलूं लागली. 'रे देवा, मीं पूर्वजन्मीं कोणचें असें महत्पातक केलें होतें कीं, हें जडभारी संकट मजवर ओढवलें आहे? काल संध्याकाळीं असें होईल, असें मला स्वप्नींही वाटलें नाहीं. ह्यांनीं हा असा कसा डाव साधिला? तें उच्चारायाला ह्यांचें मन तरी कसें धजलें? मी त्यांची अर्धांगी आणि तिला असला सल्ला! इतक्या दिवसांनीं पुनः सोन्याचे दिवस आले, म्हणून मी किती आनंदित झालें होतें? त्याचा कधीं कोणीं ऐकिला नाहीं व पाहिला नाहीं व सांगितलें असतां कधीं कोणीही विश्वास ठेवणार नाहीं, असा शेवट व्हावाना? अथवा माझें दैवच ओढवलें, म्हणून सर्व जगाविरुद्ध मला ही शिक्षा! देवा, तुला माझी कांहींच का करुणा येत नाहीं? पण छेः तसें त्यांच्या मनांत येईल तरी कसें? मीच वाईट, म्हणून माझ्या मनाला त्यांनीं थट्टेमध्यें बोललेलें सर्व खरें वाटतें. किंवा मी पूर्वीप्रमाणेंच वाईट आहें कीं काय, हें पाहण्यासाठीं म्हणून एकादे वेळेस ही तोड काढिली असावी. त्यांनीं माझा किती अंत पाहिला? पण एकंदर पाहतां तसें नाहीं. त्यांची पूर्वीची वर्तणूक

काय चांगली होती? त्यांचे पहिल्या प्रतीचे जिवश्चकंठश्च मित्र **हरिलाल** व **केशवराय** ह्यांनीं माझी थोडी का त्यांच्या समक्ष विटंबना केली? तेव्हां नव्हता त्यांना राग येत. बरें जेव्हां पाऊल वाईट पडलें, तेव्हां हे कसे स्वस्थ बसले होते! म्हणून त्यांना माझ्याविषयीं विशेष क्षिति वाटत नाहीं. पण मी त्यांची प्रत्यक्ष लग्नाची बायको ना? आणि तिजविषयीं असले विचार! हर हर हर! देवा, कलियुगांत सर्वच कांहीं बदललें का? हें समजल्यापासून माझ्या काळजाला घरे पडले. आतां कसचें सुख घेऊन बसलीस? ज्यानें तुझें संरक्षण केलें पाहिजे, तोच जर तुझा विक्रय करूं लागला, तर मग तुझ्यासारखी हतभाग्य कोणी तरी सांपडेल का? छे: छे: छे: हें संभवेल तरी कसें? नाहीं, हें सर्व खरेंच आहेसें वाटतें. उगाच त्यांनीं मला लटका प्रेमा दाखवून आपला कार्यभाग साधण्याचा घाट घातला होता. मला पहिल्यापासून ह्या पंधरा दिवसांत ह्यांच्या वर्तणुकीविषयीं संशय होता. परंतु मी काय; भोळी म्हणून फसलें. मेलें मन बोलून चालून कोंवळें, लागलीच बसला विश्वास. पण कोळसा उगाळावा तितका काळाच. हा काळमांगा, त्यापेक्षां कोणीकडे जीव कां नाहीं दिलास पण खरेंच त्यांना तरी कसा दोष लावावा? त्या चांडाळानें (**बाबासाहेबानें**) ह्यांना धमकी दिली असेल. परंतु तसें असलें तर काय झाले? ह्यांच्या जीवावर तर बेतलं नव्हती? आणि ह्यांच्या बोलण्यावरून त्यानें धमकी दिली असावी, असें मुळींच निघत नाहीं. ह्यांचेच एकंदर काळीज उफराटें. जनलाज नाहीं, मनलाज नाहीं, केवळ पैशासाठीं माझासुद्धां विक्रय मांडला आहे. हाय हाय! बरें, ते पैसे तरी चांगल्या कामासाठीं कोणा अनाथाला द्यायाचे असते, तर गोष्ट निराळी. पण त्याचें नांव नको. उडवा जुगारांत व चंगी भंगी लोकांत. कशी मी अभागी मी, यांच्या गळ्यांत पडलें?

'पण खरेंच, बाबांना सांगून कांहीं तरी फायदा होईल का? पण मी कोणत्या तोंडानें त्यांना सांगूं? अगोदर त्यांचें म्हातारपण, आणि असें सांगून त्यांच्या चित्तशांतीवर आग टाकायाची. बरें सांगूनही ते मजवर कसा विश्वास ठेवतील? आणि हा चांडाळ मग आपली धमकी खरी केल्याशिवाय राहील का? देवा देवा, मी आतांच मेलें तर किती बरें होईल. जीव देऊं का? बरें पुढें बाबा काय करील? तो तडफडून प्राण टाकील. आणि **आनंदशंकर**—छे: छे: ह्यांनाच तडजोड काढली पाहिजे. आलिया भोगासीं असावें सादर. चुकून लहानपणीं वाईट पाऊल पडलें, त्याचें प्रायश्चित्त मला आतां भोगावें लागतें. काय चमत्कार आहे पहा. पुरुषांनीं हजारदां शेण खाल्लें असतां, ते शपथ घ्यावयास व साधुपणाचा डौल मारावयास तयार; आणि आम्हांला मात्र कळंक एकदां का लागला कीं, मग तो अगदीं वज्रलेपाप्रमाणें. हर हर, त्यांत माझी काय बरें चूक होती? ह्या चांडाळानेंच मला समजून उमजून खाईत लोटून दिलें, तरीही मलाच दोष. मी वाईट करीत आहें, असें कोणी तरी सांगायाला पाहिजे होतें. आणि ह्या दुष्टानें तसें कां केलें नाहीं? ह्याला दिसत नव्हतें? पण हा कसला मांग, ह्याच्या मनांत पुढें हा सूड उगवायाचा होता ना? पण

एकदां नकळत दोष घडला, तर मला पूत होण्याची आशा नाहीं काय? एकदां अंध होऊन वाट चुकलें. परंतु **जयशंकर**ची मोहनी कशी होती? तींतून मोठी पतिव्रताही सुटली असती का? पण छे: आपली पतिव्रतेशीं तुलना करण्याची मुळींच योग्यता नाहीं. मी चुकलें. हाय हाय, तो असता तर मीं जास्त पापें केलीं असतीं, हें पाहून ईश्वरानें त्याला नेलें वाटतें. परंतु असें जर तुझ्या मनांत होतें, तर देवा, मला तूं आजचा भयंकर प्रसंग दाखवावयाचा नव्हता. हे जगदंबे, काय करूं? कांहीं सांग मला. मी वेडी झालें आहे. नाहीं म्हणून म्हणूं का? पण पुढील फटफजिती व बाबांना अतोनात शोक. नकोग मला, तें मनीं आणिलें कीं, उरांत धस्स होतें. लाज दवडून जगांत कशी तोंड दाखवायाला राहूं? त्यापेक्षां जीव दिलेला वेहेत्तर. परंतु बाबा कसे राहतील? काय करूंगे परम कृपाळू माते? सांग सांग, मला कांहीं तरी सांग. मी अनाथ आहें. मी मोठी पातकी आहें; परंतु घे मला पदरीं, मी येथून हलणार नाहीं. तुजशिवाय मी दुसरीकडे कोठें जाऊं? ह्या संकटांतून कशी पार पडूं? तुला माझी कींव येऊं दे? आमची अब्रू कांचेसारखी आहे खरी, परंतु मला अनुताप झाला आहे. मी दीन आहे. मला सोडीव ह्या प्रसंगांतून.'

सकाळीं ही बराच वेळ वाहेर आली नाहींसें, पाहून **निळकंठभाई माणेकभाई**ला विचारूं लागला. **माणेकभाई** म्हणाला 'थोडें तिचें कपाळ दुखत होतें, म्हणून ती तेथेंच असेल;' व खोलीजवळ जाऊन दार ठोठावूं लागला. 'केवळ अंत पाहण्यासाठीं म्हणून मी बोललों' असें हा वहुतकरून सांगेल, ह्या आशेनें मोठ्या उत्कंठेनें आपले केश व वस्त्रें सांवरून तिनें दाराची कडी काढिली. **माणेकभाई** आंत गेला, व दार लावून कांहीं वेळ तेथें राहिला. नंतर तो बाहेर आला, व त्याच्या पाठीमागून **जयलक्ष्मी** उसासे टाकीत आली.

**निळकंठभाईनें** तिला विचारतांच ती त्याचे डोळे चुकवून एके बाजूला पाहत मोठ्या कष्टानें म्हणाली—कांहीं नाहीं, बाबा; रात्रीं कपाळ फार दुखत होतें. आतां तें वरें आहे.

**निळ०**—तुला फार पित्त झाल्यामुळें असें झालें आहे; तर तूं आल्याचें चाटण खा, म्हणजे तुझें पित्त उतरेल.

ती म्हणाली—वरें बाबा. ( मनांत ) हर हर देवा, मी मोठी पापीण. आजचा एकंदर प्रसंग मोठा कठीण होता. माझें हृदय तर फाटून गेलें होतें. हाय हाय! पण आतांच थट्टा म्हणून जें सांगतात त्यावर विश्वास ठेवावा का?

दुपारून जेवण झाल्यावर **माणेकभाई** थेट कचेरींत न जातां **निळकंठभाई**जवळ गेला. उभयतांचें कांहीं बोलणें होऊन **निळकंठभाई** सरतेशेवटीं म्हणाला 'वरें, आपण म्हणतां त्याप्रमाणें ह्या शेजारील घरीं एकदोन दिवसांनीं बिऱ्हाड करा. म्हणजे मलाही फारसा कन्यावियोग होणार नाहीं, व लोकचाराप्रमाणें आपलेंही निराळें घर होईल.' **माणेकभाई** वाहेर येऊन आपल्याशींच बोलला 'आतां कांहीं चिंता नाहीं. एकदां फसली, म्हणजे पुढें सुरळीत चालेल. सामोपचार व कपटच योजिलें पाहिजे. पण **बाबासाहेबांचा** घरीं येण्याचा प्रघात पाडला पाहिजे. त्यांना सोंगट्या व बुद्धिबळें आवडतात, नाहीं वरें? तर तसा अड्डा घालावा म्हणजे झालें.'

# भाग ९.

## मूसा सुहाग.

नवसें कन्या पुत्र होती । तरि कां करणें लागे पती ॥
॥ तुकाराम ॥

### झडप घेतली पण थप्पड खाल्ली.

उन्हाळ्यानें आपलें कडक स्वरूप धारण केलें होतें. हा ज्येष्ठ महिना असल्यामुळें तर उष्मा अतिशय होत होता, कारण हे पावसाळ्यापूर्वींचे दिवस असतात. सूर्योदय होऊन एकदोन घटका झाल्या नाहींत, तोंच अंगाची लाही लाही होऊं लागते. पुढें जसजसा सूर्य वर येऊं लागतो, तसतसा जास्त त्रास होऊं लागतो; आणि भरदुपारीं तर उन्हाच्या धगधगीनें जीव अगदीं गुदमरून जातो. अष्टौप्रहर अंगांतून घामाच्या धारा चालतात. रात्रीं बहुतकरून वारा पडलेला असावयाचाच. त्यामुळें अंगाची आग आग होऊन व चिलटांच्या व ढेंकणांच्या त्रासामुळें झोंप म्हणून नसावयाचीच. पहाटेस कोठें थोडा डोळा लागावयाचा. ही पहाटेचीच वेळ थोडी शांत व थंड असते. बरें दिवसां यदाकदाचित् वारा असला, तर तो अंगाला भाजतोच कीं काय इतका ऊन असतो. आणि असला वारा ऐन दुपारीं असला, म्हणजे झळ लागून मनुष्य मरावयाचाच. सूर्य मावळल्यावरही जमिनींतून एकसारख्या वाफा निघत असतात. असला अति कडक उन्हाळा सुमारें ४० दिवस असतो. तितक्या काळांत प्राणिमात्रांस अतिशय क्लेश सोसावे लागतात. कितीही पाणी प्यालें, तरीही तृप्ति म्हणून होत नाहीं; कारण अंगाचा दाह एकसारखा होतो, व तहान भागविण्याचीं शीत साधनें आपला धर्म सोडतात. पंख्यानें वारा घेतल्यास तो थंड व गोड न लागतां उलटा ऊन व त्रासदायक होतो. पाणी प्यावें तर तें कोंबट असतें, व एकाद्या भांड्यांत उन्हाच्या बाजूला ठेविलें, तर कधीं कधीं चांगलें कढत होतें. असल्या उन्हाळ्यांत विहिरी, झरे व नद्या हीं आटून जातात; व वृक्षांचीं पानें वाळून गळल्यामुळें त्यांची छायाही कमी होते. ह्या सर्व कारणांमुळें जर ह्या भयंकर काळांत मनुष्यांची दशादशा होते, तर पशुपक्ष्यांचे हाल काय सांगावेत? कित्येक वेळां पक्ष्यांचे थव्यांचे थवे झळा लागून व वेळेवर पाणी न मिळाल्यामुळें झाडांखालीं मेलेले सांपडतात. ह्या ऐन उन्हाळ्यांत बहुश: आवश्यक कापडेंच कायतीं मनुष्याचे अंगावर असतात. साधारण बायकापुरुषांचा वरचा भाग बहुश: आच्छादित नसतो. एक तर एकसारख्या अंगांतून घामाच्या धारा, दुसरें कडक तापामुळें घामोळें किंवा मोठमोठे फोड, आणि अंगाचा दाह व घामोळ्यांचें तडतडणें, ह्यामुळें अंगावर कापड मुळींच खपत नाहीं. असो.

ह्या दिवसांत एके सोमवारीं संध्याकाळीं **फातिमा** नांवाची म्हातारी मुसलमानीन **हरिसिंगा**च्या घरीं **सदू**ला भेटण्यासाठीं म्हणून आली होती. ही ह्यांच्या घरापासून १०-१२ घरें टाकून एका झोंपडींत राहत होती. ह्यांचा बराच परिचय झाला होता. म्हातारी फार सालस स्वभावाची असल्यामुळें ती वरचेवर **हरिसिंगा**चे घरीं येत असे, व कांहीं काम पडल्यास उपयोगीही पडत असे. हिला एकच मुलगा होता, व तो गेल्या प्रकरणाच्या शेंवटल्या भागांत आलेला **रहिमान** होय. मुलावरतीं तोहमत आलेली पाहून ह्याला बहुतकरून संगत चांगली नाहीं, असें समजून म्हातारीनें आपलें बिऱ्हाड **मिरझापुरांतून** काढून **शाहपुरां**त त्या झोंपडींत आणून ठेविलें. ह्यांचें जवळचें संबंधी कोणी नव्हतें, व हल्लीं हे अति निकृष्टावस्थेस येऊन पोंहचले होते. हे पूर्वीचे कुलीन **मालेक** घराण्यापैकीं होते. ज्या शूर मुसलमान शिपायांनीं **महंमदशाह बेगडा** ह्याच्या कारकीर्दींत **पावागड** सर केला होता, त्यांना त्या पराक्रमाबद्दल त्या उदार बादशाहानें वंशपरंपरा **पंचमहाल** परगण्यांत जमिनी तोडून दिल्या होत्या; म्हणून त्या शिपायांच्या वंशजांना **मालेक** म्हणतात. तशीच पुष्कळ जमीन **हुसेनखान** नांवाच्या **रहिमाना**च्या पूर्वजाला तोडून होती. परंतु तिच्या वांटण्या होतां होतां **रहिमाना**चा बाप जो **दाऊदखान** ह्याच्या वांट्याला कायती एकच बिघा जमीन आली होती.

हे अस्सल पठाण होत. ह्यांचा मान व इतमाम मोठा होता. प्रत्यक्ष **दाऊदखाना**च्या हयातींत त्याला मोठी असामी होती. त्याच्या पूर्वजांनीं वारंवार तरवार मारून नांवलौकिक संपादन केला होता. परंतु मुसलमानांचा डामडौलाखालींच बहुतकरून चुराडा उडत असतो. अंगापेक्षां बोंगाच मोठा असावयाचा. कर्ज करतील व सरतेशेंवटीं अगदीं धुळीस मिळतील; परंतु आपल्या लवाजम्यांत किंवा थाटमाटांत होतां होई तोंपर्यंत यत्किंचितही कमी करणार नाहींत. पुढें सावकाराजवळ पत राहिली नाहीं, जमीन व दुसरी मिळकत गाहाणवट पडून सोडविण्याची जवळ ऐपत नाहीं, अशा गरीब स्थितींत ते म्हणजे दुर्मुखलेले असतात असें नाहीं. 'किस्मतमें जो लिखा हुवा सो होयगा' असें म्हणून आपली समजूत करितात. **दाऊदखान** ह्यानें आपल्या मिळकतीबाहेर अतोनात खर्च करावा. सतत घरीं एकदोन कळावंतणी पडलेल्या असावयाच्या; व खावंद खुष झाले, म्हणजे हात कोण धरणार? असे त्यानें चैनबाजींत पैसे उधळून शेंवटीं तो अन्नाला मोताद होऊन पैगंबरापाशीं आपल्या दुष्कृताची झडती देण्यासाठीं गेला; व आपल्या गुणांचें प्रायश्चित आपल्या साध्वी पत्नीला व हतभाग्य मुलाला भोगावयाला लाविलें.

**फातिमा** ही सुमारें ४५ वर्षांची होती. ही वयाच्या मानानें फार म्हातारी दिसत असे. हिचे बरेच केश पिकले होते. तोंडावर सुरकुत्या पडल्या होत्या. चेहरा वाळलेला होता. हिनें पांढऱ्या कापडाची तुमान घातली होती, व अंगांत पायघोळ अंगरखा घातला होता. ह्या अंगरख्याला छातीपासून खालीं पुष्कळ घोळ होता. अंगरख्यावरून

एक पांढरें कापड डोक्यावरून घेतलें होतें. कानांत पुष्कळ भोंकें पाडून रुप्याच्या मुद्या हिनें घातल्या होत्या. बाकी हिच्या अंगावर कांहीं नव्हतें. हिचे सर्व कपडे मळलेले होते.

गोष्टी निघतां निघतां मूल होण्याविषयीं गोष्टी निघाल्या. **सदू**च्या मनांतील आशय **फातिमा** बिबीला बऱ्याच दिवसांपासून माहीत झाला होता. अनायासें गोष्ट निघाली, म्हणून तिनें आपल्या स्वतःच्या अनुभवाची गोष्ट सांगितली. ती म्हणाली—**सदुबा**, मला किनई बरेच दिवस मूल होत नव्हतें. पुढें आमच्या सासूबाईनीं त्या **मूसासुहाग**च्या दर्ग्याला मानता करावयाला मला सांगितलें; व मीं तसें केलें नी काय, तो पीर खुष होऊन मला एका वर्षाच्या आंत माझा **रहिमू** झाला. परंतु म्हणतात ना अल्ला देतो, पण नशीब आड येतें. तशी झाली आमची गत. **रहिमू** एक वर्षाचा झाला नाहीं, तोंच आमच्या घरावर कालचक्र ओढवलें. थोडक्या दिवसांत माणसेंपरी माणसें जाऊन अगदीं कंगाल झालों. नकोग बाई, मला त्या वेळची आठवण झाली, म्हणजे काळजांत धस्स होतें व भडभडून येतें. शेजारीपाजारी मला सांगत कीं, हा **रहिमू** घराच्या मुळावर जन्मला आहे, तर याला एकाद्या फकिराच्या स्वाधीन कर; म्हणजे घराची दैना सरेल. पण मीं कांहीं त्यांचें ऐकिलें नाहीं, व माझ्या सोनकुल्याला मी अधिकच जीव कीं प्राण करूं लागलें. उगीच लोक कांहीं तरी बडबडतात. कोणी कोणाच्या मुळावर नसतो नी कांहीं नसतें. ही आहे वेडी समजूत. जें व्हायाचें आहे, तें कांहीं केल्या चुकत नाहीं.

**सदू**नें हें बोलणें ऐकून घेतलें. कांहीं वेळ विचार करून ती म्हणाली—पण बाई, आम्ही आहों हिंदू, आणि—

**फातिमा**—हा काय वेडेपणा? देव, पीर, साधु, संत का कोठें वाटून दिलेले असतात? तशांत त्या दर्ग्याला पुष्कळ ब्राह्मणांच्या बायका सुद्धां नवस करितात, व त्यांना मुलें झाल्याचेंही ऐकिवांत आहे. मग तुलाग कसली अडचण आहे? शिवाय मोहरमांत नाहीं कां पंजांना हिंदु पुजीत?

**सदू**—बरें तर, मी घरीं येणें झालें, म्हणजे विचारीन; व होय म्हटल्यास मी तुम्हांला बरोबर घेऊन जाईन. तेथें गेल्यावर त्या पीराला काय दिलें पाहिजे, हें तुम्ही मला कळवून ठेवा.

ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर ती म्हातारी निघून गेली, व **सदू** नवऱ्याजवळ कशी गोष्ट काढावी, ह्याविषयीं विचार करूं लागली. 'एक नेम पाळला आहेस आणखी त्या पीराला कशाला मानता केली पाहिजे' अशी नवरा कदाचित हरकत आणील, म्हणून ती मोठ्या विवंचनेंत पडली होती. साधारणतः कोणतीही वस्तु अतिइष्ट असली, म्हणजे ती साध्य करून घेण्याचीं जितकीं साधनें असतील तीं होतां होईतों करून ती हस्तगत करून घेण्याविषयीं मनुष्यमात्राची फार उतावळ असते. तशांत बायकांना तर उत्कंठा अतिशय असते, म्हणून साहजिक **सदू**नें एका नेमानें आपला इष्ट हेतु तडीस जातो किंवा नाहीं, हें पाह-

ण्याविषयीं धीर न धरितां दुसरा नवस करण्याचें योजिलें.

रात्रीं भेटल्यावर **हरिसिंग** बायकोस म्हणाला–कां, आज कांहीं बेत केला आहेसें वाटतें? मघांपासून ५–७ दां तर बोलायाला लागली होतीस; आणि मध्येंच कां बोलणें थांबवितेस? इतका संकोच तो कशाला? काय असेल तें बाहेर पडूं तर दे! योग्य असल्यास मी कधींही ना म्हणणार नाहीं.

**सदू**च्या मनांत केव्हांपासून विचारावयाचें घोळत होतें; परंतु न जाणो आपला नवरा रागावेल ह्या भीतीनें तिनें पुष्कळ आढेवेढे घेतले. मग जेव्हां नवऱ्यानें साधारणपणें आश्वासन दिलें, तेव्हां **फातिमे**नें सांगितलेलें सर्व कांहीं तिनें सांगितलें.

हरि०–( तिचा बोलण्याचा रोंख न समजलासें दाखवून ) बरें मग, त्यांत काय आहे? **फातिमा** बिबीला **रहिमान** झाला, त्याचें तुला काय?

**सदू**–( चपापून ) नाहीं, कांहीं नाहीं. पण–पण दुसऱ्यानें कोणीं जर तशी मानता केली, तर–

हरि०–मूल होईल अथवा न होईल. तुला ह्याविषयीं उठाठेव पाहिजे कशाला? हो, मी समजलों. चाहाटळ नाहीं तर. काकीनें जोशाच्या सांगण्यावरून एक नेम पाळायाला सांगितला, तर ही काय शेफारली, आणि जसें कांहीं मला नवस आवडतातच, असें समजून दुसऱ्या नवसाविषयीं लागली लाडें लाडें बोलायाला. अशी जर नवसानें मुलें होत असतात, तर मग नवरा तरी कशाला पाहिजे? निलाजरी नाहीं तर. तिला वाटतें, झालें मी शाहाणी. खबरदार माझ्यापुढें नवसाविषयीं फिरून गोष्ट काढलीस तर. माझ्याजवळ नाहीं असले ढंग चालायाचे, बरें. पुनः बोल तर खरी, म्हणजे समजेल काय आहे तें.

**हरिसिंग** पहिल्यानें थट्टेच्या झोंकानें बोलूं लागला होता. परंतु बोलतां बोलतां थट्टा एके बाजूस राहून तो उलटा जास्त रागावत गेला. नवस करायाला सांगून भोंदू लोक खुळसट बायकांना कसें फसवितात, हें त्याच्या लक्षांत येऊन बायकोच्या केविलवाण्या व भयभीत झालेल्या मुद्रेला न जुमानतां तो संतापून बोलूं लागला–काय लबाड असतात लोक? उगाच नादीं लावून त्यांच्याकडून अनन्वित कामें करवावयाचीं. ही तर काय हापापलेली. उद्यां कोणीं सांगूं द्या कीं, कोणाच्या घराला आग लाविल्यानें किंवा लहान मुलाची विष्ठा कांहीं दिवस खाल्ली असतां मुलगा होईल, कीं लागलीच ही तसें करील. कांहीं नाहीं, हिचा पूर्वीचा सुद्धां नेम मोडला पाहिजे. ( तिच्याकडे वळून ) कां डोळ्याला पाणी आणायाला काय झालें? तुला हात तरी लावला का? रागें सुद्धा भरणें सोसत नाहीं, तर मग असले छंद कशाला घेऊन बसतेस? पण छेः हें सर्व ढोंग. रडतांना पाहिलें, म्हणजे माझें म्हणणें कबूल करतील असें तुला वाटतें का? पण मी नाहीं हो तसा बाइलबुद्ध्या. चावट नाहीं तर. रडणें थांबवितेस कीं नाहीं, कां देऊं एक चपराक?

हे सरते शेंवटले शब्द ऐकतांच सदू अगदीं कावरी बावरी झाली व थरथर कांपूं लागली. तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली, व एकाएकीं वाऱ्याच्या सोसाट्यानें जशी केळ पडावी, तशी कल जाऊन ती धाडकन् जमिनीवर पडली. पडत आहेसें पाहतांच हरिसिंग सर्व राग विसरून तिला धरायाला म्हणून पुढें गेला, परंतु त्यापूर्वींच ती निश्चेष्ट पडली होती. दिवस उन्हाळ्याचे, तशांत तिची पित्तप्रकृति व नाजूकपणा. लग्न झाल्या दिवसापासून नवऱ्यानें तिला कधींही बोट लाविलें नाहीं, आणि आज विनाकारण इतकी माराची धमकी दिलेली पाहून भेदरून जाऊन तिला भोंवळ आली. कोणींही फट म्हटल्यास आपले मनोविकार अनावर झाले आहेत असें दाखवायाचें, किंवा प्रसंग पडल्यास वळेंच बेशुद्ध पडायाचें असा नखरेबाजीचा प्रकार कोमलतेचा आव आणणाऱ्या पाश्चिमात्य स्त्रियांत कधीं कधीं आढळतो, तसा मात्र हा नव्हता. कारण सदू बोलून चालूनच मुग्ध होती; तिला आपल्या नवऱ्याविषयीं अतिशय पूज्यबुद्धि होती, व तशीच त्याची भीतीही वाटत असे.

हरिसिंगानें लागलीच तिच्याजवळ जाऊन तिचें डोकें उचलून हळूच आपल्या मांडीवर घेतलें, व जवळच्या कुज्यांतलें थंड पाणी कानशिलावर शिंपलें. त्याबरोबर सावध होऊन तिनें डोळे उघडले. हरिसिंगानें तिच्या तोंडावरून हात फिरवून ममतेनें विचारिलें '.आतां तुला बरें वाटतें ना ? हा वेडे, इतकी भ्यालीस ती कशाला ? तुझ्या एका केशाला तरी धक्का लावण्याची माझी छाती झाली असती का ? ' चांगली शुद्धीवर आल्यावर ती लगेच उठून लाजून दूर जाऊं लागली; परंतु हरिसिंगानें ' तुला उभें राहण्याची शक्ति नाहीं; तर येथेंच बस. ' असें म्हणून, ती ' नको नको, हें हो काय, ' असें बोलत असतां बळेंच तिला आपल्या डाव्या मांडीवर बसविलें. पुढें कांहीं वेळानें तो म्हणाला ' पण हें बघ, मीं नवस नको म्हणून म्हटलें, तर इतकें कां वाईट वाटलें ? मला वाटत होतें कीं, आतां तूं मोठी शाहाणी बायको झाली आहेस; पण अजून तुझे बाळपणाचे चाळे कांहीं सुटले नाहींत. कोणी वडील मनुष्यानें अमुक एक करूं नको म्हणून सांगितल्यास लहान मुलासारखा रडून गोंधळ करावा व हट्ट घ्यावा, हें कांहीं तुला आतां शोभत नाहीं.' तोंडावर हात ठेवून अगदीं तें नवऱ्याच्या छातीशीं भिडवून सदू हळूच बोलली ' जसें आपलें सांगणें असेल, त्याप्रमाणें मी करीन. आपण जर नवस नको, म्हणून म्हणत असाल तर मी तो करणार नाहीं.' परंतु मध्येंच तोंडावरून हात काढून तें थोडेसें वर करून नवऱ्याकडे हळूच पाहत ती म्हणाली 'पण गडे, मामींना तरी विचारणें होईल का ?' हरिसिंगाची चुलती, ' नवस मोडूं नको ' म्हणून सांगेल असें सदूला वाटत होतें, म्हणून तिनें तसें बोलणें लाविलें. परंतु रागाच्या झपाट्यांत आपण पूर्वीचा नेम मोडून टाकण्याबद्दल बोललों होतों, व त्यालाच उद्देशून ही बोलत आहे, असें लक्षांत न येऊन हरिसिंग तिच्या मुखाच्या मोहकतेला भुलून तिचें मन उगाच क्षुल्लक कारणाक-

रितां दुखविलें असें वाटून म्हणाला 'काकीला कशाला विचारायाला पाहिजे? एकून त्या पीराला मानता करावयाची आहे, एवढें चना तुझ्या मनांत? बरें तर तुझ्या मनासारखेंच कर जा. **फातमा**बिबीला **माधोसिंगा**ला बरोबर घेऊन तुला वाटेल त्या दिवशीं त्या घुसा कां नुसाच्या दर्ग्यांत जा, व नवस कर. माझी कांहीं ना नाहीं. आतां तर झालेंना?'

**सदू** गालांत हंसत म्हणाली 'पण मी त्याबद्दल नव्हतें बोलले. मी त्या पूर्वींच्या—' तिचें बोलणें आपल्या ओठांनीं बंद करून **हरिसिंग** म्हणाला 'किती लबाड आहे तरी!'

दुसऱ्या दिवशीं सकाळींच **माधोसिंगा**ला व **फातमा**बिबीला 'आज तिसऱ्या प्रहरीं घरीं या' असा निरोप तिनें पाठविला, व कशासाठीं बोलाविलें हेंही कळविलें. चुलतसासूनें मोठ्या उल्हासानें **माधोसिंगा**ला पाठवून दिलें. **फातमा**बिबीच्या सांगण्यावरून दर्ग्याला वाहण्यासाठीं म्हणून कांहीं कांचेच्या बांगड्या **सदू**नें विकत आणविल्या. तिसरा प्रहर उलटल्यावर **फातमा**बिबी, **सदू** व **माधोसिंग** हे घरून निघाले. वाटेनें धूळ उडत होती व झळा लागत होत्या, त्यामुळें **सदू**चें तोंड अगदीं लालभडक झालें, व कपाळावर, वरच्या ओठावर व हनवटीवर घामाचे टपोरे बिंदू झळकत होते. तिला चालण्यामुळें अतिशय थकवा आला, व केव्हां ह्या फुफाट्यांतून पाय थंड ठिकाणीं नेऊन वर पुष्कळ पाणी ओतेन असें तिला झालें. परंतु कितीही नाजूक बायको असो, ती मुलाकरितां काय म्हणून सायास करणार नाहीं? भावी सुखाकडे लक्ष देऊन प्रस्तुत दुःख व श्रम सोसणें हें मनुष्याला बरें वाटतें.

सुमारें दीड घटकेच्या आंतच ते **मुसा सुहाग**च्या दर्ग्याला येऊन पोंहचले. सुमारें पाऊण घटका ते शहरांत कोटाच्या आंतल्या बाजूनें चालून पुढें **दिल्ही**दरवाज्यांतून बाहेर पडून ते उत्तरेस सुमारें अर्ध कोस गेल्यावर उजव्या हाताला दर्ग्यांत शिरले. वाटेनें ह्यांच्या पाठीमागून कांहीं मंडळी येत होती. परंतु दर्ग्यांत ह्यांच्या पाठोपाठ एक मुसलमान व एक हिंदू असे दोघेजण शिरले.

हल्लीं शेट **हटेसिंग केसरीसिंगा**ची जी भव्य हवेली **दिल्ही**दरवाज्याबाहेर लागते, त्या हवेलीच्या पुढें कांपाला जो रस्ता जातो, त्या रस्त्यावर या हवेली पासून १००० कदमांच्या आंतच हजरत **मुसा सुहाग** ह्यांचा प्रसिद्ध दर्गा लागतो. सुमारें चारशें वर्षांपूर्वीं हा रोझा स्वतः **मुसा** ह्यानें आपल्यासाठीं बांधिला. ह्या अवलियाविषयीं असें सांगतात कीं, एकदा अवर्षण पडलें होतें, त्या वेळीं ह्यानें निमाज पढून परवरदिगाराच्या मोहबतीनें दुनियेवर बरसात आणविला, व तेणेंकरून चौतर्फ सुबत्ता झाली. परंतु नंतर कांहीं करामत करून आपल्याला ह्यानें दुवा द्यावा, म्हणून पुष्कळ लोक ह्याच्या पाठीस लागले. त्यामुळें कंटाळून लोकांनीं आपल्याला ओळखूं नये, म्हणून तो बायकोचा पेहराव करूं लागला; व म्हणूनच ह्याच्या पंथाचे फकीर मुसलमानिणीसारखा पोषाख करितात व नाकाच्या पडद्यांतून बुलाख घालतात. ह्याच्या रोझ्याजवळ एक मोठें व जुनाट असें चाफ्याचें झाड आहे. ह्याच्या कबरीला लागून ४ दुसऱ्या

कबरी आहेत. ह्या कबरींविषयीं अशी दंतकथा आहे कीं, अवर्षण संपल्यानंतर कांहीं वर्षांनीं एकदा अतोनात पाऊस पडूं लागला, म्हणून बादशहानें पाऊस थांबविण्याविषयीं या अवलियाची प्रार्थना केली. परंतु कदाचित् लोक पूर्वीप्रमाणें आतांही पाठीस लागतील, म्हणून त्यानें अल्लाची प्रार्थना करून पाऊस थांबविला; व नंतर तो लागलाच जमिनींत गैब झाला. बादशहानें त्याला बाहेर काढण्यासाठीं ती जागा खोदविली. परंतु तो तेथें न सांपडतां त्याचें डोकें दुसऱ्याच जागीं दिसलें, व लागलींच नाहींसें झालें. तीसुद्धां जागा उकरिली, परंतु त्याचें डोकें तिसऱ्या ठिकाणीं दिसलें व गुप्त झालें. ह्याप्रमाणें ४ वेळां झालें. मग बादशाह म्हणाला ' ह्याच्या रोझ्यावर आपण फुलें वाहिलीं असतां हा दर्शन देईल. ' परंतु तो अवलिया फिरून रोझ्याच्या बाहेरच्या बाजूस प्रगट झाला, व म्हणाला कीं ' फुलें वगैरे मला कांहीं यायाला नकोत.' ह्याप्रमाणें जेथें जेथें तो दृष्टीस पडला होता त्या त्या जागीं कबरी बांधल्या आहेत. ह्या रोझ्यावर दगडी छत्री आहे. कबरींवर अलवानाचें कापड पसरलेलें असतें. छत्रीच्या कमानीला चोहोंबाजूंस बांगड्या, लहान मुलींच्या खेळांतील रंगीत पाळणे, कापडी चिमण्या वगैरे अडकविलेल्या असतात. जवळच्या चाफ्याच्या झाडाच्या खांद्यांत व डाहळ्यांत चोहोंकडे बांगड्या अडकलेल्या दिसतात. कित्येक कांची बांगड्यांचा रंगही कालमानानें फिकटसा दिसतो. कित्येक बांगड्या अशा उंच व बिकट ठिकाणीं आहेत कीं, त्या पाहून साधारण भोळसर मनुष्याचा ह्या पीरावर एकदम भाव बसावयाचाच. कारण एखादी मोठी खांदी जर पाहिली, तर जेथून ती झाडाच्या मधल्या बुंधापासून निघते, तेथपासून तों या खांदीच्या निरनिराळ्या फांद्या व डाहाळ्या ह्यांवर सर्व ठिकाणीं बांगड्या लागलेल्या असतात. अगदीं डाहाळ्यांच्या टोंकांशींच बांगड्या असल्या, तर विशेष कोणींही नवल मानिलें नसतें. परंतु पुढें पुष्कळ फांद्या असून अगदीं बुंधाजवळही अडचणीच्या जागीं व मनुष्याचा हात न पोंहचेल अशा ठिकाणींही त्या असतात; त्यामुळें भाविक लोकांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटतें. असो.

ही मंडळी आंत गेल्यावर त्या पंथांतल्या एका फकिरानें ' काय इच्छा धरून आलां ' म्हणून विचारून त्यांना आंत नेलें.पाठोपाठ ते दोघे मुसलमान व हिंदूही गेले. त्यांपैकीं हिंदू त्या मुसलमानाला म्हणाला ' समजलासना **अबदुल्ला**, तूं त्या पोराशीं बोल, व मी–' हा बोलणारा हिंदू **उत्तमलाल** वाणी चाह्याच्या होय. **हरिसिंग भाटवाड्यां**त राहायला आल्यापासून ह्या दुष्टाची नजर त्याच्या बायकोवर होती. परंतु तसा प्रसंग आला नव्हता म्हणून म्हणा, किंवा हा **हरिसिंगा**स भीत होता म्हणून म्हणा, त्यानें आपला दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याविषयीं यत्किंचितही खटपट केली नाहीं. निव्वळ **सदू**चें अप्रतिम लावण्य मनांत आणून हा फक्त लाळ मात्र घोटीत असे. तो **फातमा** बिबीच्या जवळच्या घरांत राहत असल्यामुळें त्याला तिजकडून पर्यायानें **हरिसिंगा**च्या घरांतील सर्व माहिती मिळत असे. तिला आपला वाईट हेतु कळवून तिच्याकडून कार्य-

भाग साधून ध्यावा, असा त्याचा फार दिवसांपासून मनोदय होता. परंतु तिला डावपेंचांत आणल्याशिवाय असलें निंद्य काम करावयास ती कबूल होणार नाहीं, म्हणून तो पाळतीवर होता. त्याच्या मनांतून बभ्रा न करितां आपला इष्ट हेतु तडीस न्यावयाचा होता. बभ्रा जर केला, तर ही आपल्या हातीं सांपडणार नाहीं, व **बुलाखी**च्या तोंडावरून जशीं पानें पुसलीं गेलीं, तशीच आपली गत होईल, हें जाणून तो सामोपचार योजण्याचा बेत करीत होता. आज **सदू** दर्ग्याला जाणार हें त्याला कळून, त्यानें तिला वाटेनें फुसलावण्याची तजवीज योजिली. **माधोसिंगा**ला बोलण्याच्या नादीं लावण्यासाठीं म्हणून **अबदुल्ला** नांवाचा पठाण बरोबर घेतला; आणि **फातमा** आपल्या ओळखीची आहे, ती फारशी अडथळा आणणार नाहीं, असें तो मनांत समजून होता. साधारणतः **अंधळ्यासी जन सारेंची आंधळे** ह्या न्यायानें लोक आपल्या मनाच्या कलावरून दुसरेही लोक तशाच कलाचे असतील असें समजतात. त्याप्रमाणें आपल्या पैशाच्या भुलथापीला फसून कदाचित् **सदू** आपलें बोलणें मान्य करील, असें त्याला वाटत होतें. म्हणून उंची कपडे घालून, व त्यावरून अत्तराचा हात फिरवून आपलें अग्रें नाक चोहोंकडे वळवीत तो त्या गाईच्या मागोमाग चालला होता. **अबदुल्ला** हा बोलून चालून भामटा व सोदा होता. तो शरिरानें धिप्पाड होता, परंतु दुर्व्यसनामुळें त्याच्या देहाच्या मानानें त्याच्या अंगांत शक्ति नव्हती.

त्या फकिरानें सांगितल्याप्रमाणें **सदूनें** आपल्या मनांतील अभीष्ट कामना पूर्ण करण्याविषयीं त्या पिराजवळ मागणें केलें, व त्याच्या थडग्यावर २९ बांगड्या व फुलें वाहिलीं. फकिरानें धूप लाविला, व आपण सर्वांसहित बाहेर येऊन रोझ्याचे उत्तराभिमुख त्या सोनचाफ्याच्या झाडाजवळचें दार लावून दाराशीं पीरानें म्हणणें मान्य करण्याकरितां म्हणून निमाज पढत बसला. इतक्यांत दुसऱ्या एका फकिरानें आपण ज्या खोलींत राहत होता त्या खोलींतल्या भूयारानें रोझ्याजवळच्या कुंडांतला चिरा ढकलून कबरीजवळ जाऊन त्या बांगड्या चाफ्याच्या एका फांदींत अडकविल्या व आल्या वाटेनें तसाच परत खोलींत येऊन मोठ्यानें त्यानें कलमा पढला. कलम्याचा अवाज ऐकल्याबरोबर तो दाराजवळचा फकीर निमाज आटपलासें दाखवून उठला, व दार उघडून सर्वांना आंत नेऊन कबरीवरील बांगड्या नाहींतशा पाहून म्हणाला ‘बेटा, तेरा शुकर होवे. खुदाता अल्लानें मोहबतसें तुझे लडका देनेका कबूल किया ऐसा मालूम होता है. जा कुछ डरना नहीं. जभी लडका होवेगा, तब सांईकूं भुलना नहीं;’ व फकिरासाठीं म्हणून त्यानें ५ रुपये घेतले. हें ऐकून या तिघांना अत्यानंद झाला. **सदूच्या** आनंदाला तर सीमाच नव्हती. **फातिमा** म्हणाली ‘बाई पाहिलेंतना, हें कसें जागृतस्थान आहे तें? आतां अगदीं बिनधास्त असा. एका वर्षांतच तुम्हांला मूल होईल. दर्ग्यावर बांगड्या नाहींत, हें पाहतांच मला समजलें. परंतु म्हटलें फकिरानें सांगितल्याशिवाय बोलूं

नये. त्या पाहिल्यात कां आपल्या बांगड्या ह्या डाहाळीवर लटकत आहेत. ईश्वराची करणी अगाध आहे. कशा त्या आपोआप तेथें गेल्या कोण जाणें? (इतक्यांत **उत्तम** आंत आलासें पाहून ) कां शेटजी, तुम्ही कोठें इकडे वाट चुकलां? तुमच्या **लाडुबाई**ला मुलगा झाला, म्हणून कां येथें आलां?'

**उत्तमा**नें ही बोलण्याची संधी दवडली नाहीं. त्यानें हळू हळू तिन्हाइताप्रमाणें 'ह्या बाई कोण' वगैरे चौकशी केली. नंतर संध्याकाळ होत आलीसें पाहून ती मंडळी परतली. वाटेनें **अबदुल्ला**नें **माधोसिंगा**ची बाजू कांहीं सोडली नाहीं. ते शिकारीविषयीं बोलत झपाट्यानें पुढें चालले. **माधोसिंग** हळू चालला असतां, **अबदुल्ला**नें त्याला म्हणावें 'तुम्ही खासे मर्द असून एकाद्या बायकोप्रमाणें हळू कां चालतां? बायांना येऊं द्या हळू हळू. त्यांबरोबर आहेतच शेटजी. त्यांची व तुमची ओळख होती, हें मला ठाऊकच नव्हतें. नाहीं तर मीं येतांनाच तुमचा परिचय करून घेतला असता. असो, आतां त्याचें काय? पण कांहीं म्हणा, तुमच्यासारखा हुशार व गुलजार असा तुमच्या वयाचा मनुष्य मिळणें कठीण.' अशा प्रकारचें बोलणें ऐकिल्यामुळें **माधोसिंगा**ला झकत त्याबरोबर चालावें लागे.

पुढें हे बरेच लांब गेले आहेत असें पाहून **उत्तमा**नें **सदू**शीं बोलण्याची सुरवात केली. त्यानें विचारिलें 'पण बाई, तुम्हांला येतांना तुमच्या नाजूक पायांना उन्हापासून फार त्रास झाला असेल नाहीं बरें? पण कांहो तुमच्या अंगावर फारसे डागिने नाहींत. तुमच्या सारख्यांनाच कायते डागिने शोभतील.' **सदू**ला असें चमत्कारिक बोलणें ऐकण्याचा मुळींच प्रसंग नसल्यामुळें त्याचा तिला नीट अर्थही उमजेना; म्हणून व हा परकी मनुष्य म्हणून, ती कांहीं उत्तर न देतां तशीच मुकाट्यानें चालली. **फातिमा** विवीला हें **उत्तमा**चें बोलणें मुळींच रुचलें नाहीं.ती म्हणाली,'शेटजी, ह्यांच्या अंगावर डागिने असोत किंवा नसोत, आपल्याला काय त्यांशीं करावयाचें आहे?' **उत्तम** उद्धटपणानें म्हणाला 'उगी बस म्हातारे, तुला कोणीं मध्यें तोंड घालायाला सांगितलें. त्यांना चांगलें सोन्यासारखें तोंड आहे. त्या मला उत्तर देतील ( व आसपास कोणी पुरुष नाहींसें पाहून **सदू**जवळ जाऊन ) व एखादा गोड साखरेचा सुद्धां बाल नाहीं का. ( ती भिऊन दूर जात आहेसें पाहून ) भिऊं नका, मी तुम्हांला सोन्यानें मढवून काढीन.'

**फातिमे**नें हें पाहतांच **सदू**चा हात धरून ती जलद पळायाला लागली, व तिला 'ओरडूं नको' म्हणून म्हणाली. जरकरितां आपल्यापैकीं कोणीही ओरडलों, तर लोक कांहींही न होतां उगाच **सदू**विषयीं भलताच संशय घेतील, म्हणून ती मुकाट्यानें पळत **सदू**ला घेऊन चालली. परंतु **उत्तम** हा बोलून चालून "पुरुषच. बिचाऱ्या बायका त्या किती दूरवर जाणार? दहापांच पावलें गेल्या नाहींत, तोंच हातांतील पारध पळून जातांना वाघानें पाहिली, म्हणजे जसा तो चवताळून येतो, त्याप्रमाणें **उत्तम** येऊन धडकला; व आतां निदान **सदू**ला धरिल्याशिवाय सोडीत नाहीं, असा विचार करून जो तिला धर-

ण्यासाठीं हात पुढें करितो, तोंच पाठी-मागून कोणी एकानें येऊन त्याला गचांडी देऊन एके बाजूला पाडिलें. आणि पाड-णारा त्याच्या उरावर बसून त्याला ठोक-णार, इतक्यांत **फातिमा** चटकन् म्ह-णाली ' अरे **रहिमान,** तूं अगदीं वेळेवर आलास. पण त्या शेटजींना उगीच जास्त कांहीं दुखापत करूं नकोस. कारण ( जवळ बोलावून त्याच्या कानांत ) ह्याला चांगलें ठोकल्यास उगाच बभ्रा होईल, व नंतर लोक **सदू**विषयीं विनाकारण कुतर्क घे-तील. तर तसें न होईल असें कांहीं केलें पाहिजे. तशांत शेटजी आहेत श्रीमंत, व आपण आहों गरीब. तर आपल्याला भां-डण वाढवितां कामा नये. '

परंतु दैवयोगानें हें भांडण न वाढतां जेथल्या तेथें मिटलें. कारण आपला बेत फसला असें जेव्हां **उत्तमा**नें पाहिलें, तेव्हां ह्या वेळेस गम खाऊन पुढें वचपा काढावा, ह्या हेतूनें तो लगेच उठून म्ह-णाला ' **रहिमान** व **फातमाबू** तुम्हांला कां खरोखरीच वाटलें कीं, मी भलत्या री-तीनें वागेन ? मी उगाच आपली भीति दा-खविली. **सदूबा,** तुमचें मन दुखविलें असल्यास त्याची मला माफी असावी. मी तुम्हांला धाकट्या बहिणीप्रमाणें सम-जतों. मी तसला हलकट मनुष्य नाहीं बरें, असें **फातमाबू** तुम्हांला सांगतील. '

**रहिमाना**ची व **फातमे**ची ह्या बोल-ण्यानें मुळींच खात्री झाली नाहीं; तथापि त्यांनीं वरकांती आपण संशयित आहों, असें कांहीं दाखविलें नाहीं. **रहिमान** म्हणाला ' शेटजी, मीं तरी तुम्हीच आहां, असें जर ओळखिलें असतें, तर कधींही आपल्या अंगाला हात लाविला नसता. मी येत होतों पाठीमागून. घरीं कामावरून आल्यावर मला त्या **घेलाभाई**नें सांगि-तलें कीं, आई **मुसासुहाग**च्या दर्ग्याला गेली आहे म्हणून. म्हटलें आपणही तो दर्गा पहावा. म्हणून मी घराहून दर्ग्याची वाट विचारीत निघालों. पुढें **दिल्ही** दर-वाज्या बाहेर पडून ह्या वाटेनें न येतां त्या पलीकडल्या **शाही** बागेच्या वाटेनें गेलों. लोकांना विचारितां हा रस्ता **शाही**-बागेकडे जातो असें त्यांनीं सांगितले. मग वाट विचारीत मी आड वाटेनें त्या दर्ग्या-ला जाऊन पोंहचलों. परंतु थोडक्या वे-ळापूर्वी तुम्ही तेथून परत निघालां असें तेथल्या फकिरांनीं सांगितलें. परत येत असतां आपण थट्टेनें भय दाखवीत आहां, व आपणही कोण आहां, ह्याबद्दल खुलासा न मिळून मी साहजिक औरत लोकांच्या बचावासाठीं म्हणून तुम्हाला हात लाविला. तर आपणही माझी नजरचूक लक्षांत ठेवणार नाहीं. '

हें बोलणें ऐकून **उत्तमा**च्या मनांतला **रहिमान** व **फातमा** यांविषयींचा राग नाहींसा झाला; व मागेंपुढें त्यांच्याच साहायानें हिला वश करूं असा त्यानें विचार केला. तो उघड म्हणाला ' **रहि-मान,** छेः रागावण्याचें मला मुळींच कारण नाहीं. कारण भलत्या मनु-ष्याला बायकांवर चालून जातांना मीं पा-हिलें असतें, तर तुझ्यासारखाच मला त्वेष येऊन मीं त्याला बेधडक लोळ-विलें असतें. पण मी एवढा मात्र खास वि-चार केला असतां कीं, लोकांची रहदारी चालली असतां साधारण मनुष्य भरउजेडीं दुसरी बायको जवळ असतां एकाद्या बाय-कोवर केवळ वाईट विचारानेंच हात टाक-

णार नाहीं. पण तूं पडलास लहान, म्हणून हें तुझ्या ध्यानांत आलें नाहीं.'

**फातमा** म्हणाली 'शेटजी, आपण थोर आहां, म्हणून तर **रहिमाना**ची चूक आपण लक्षांत घेत नाहीं. (**सदू**कडे वळून हळूच) बाई, ह्याबद्दल आपण घरीं गेल्यावर कोणाजवळही ही गोष्ट काढूं नका बरें. कारण उगाच **हरिसिंग**जी संतापतील.'

**रहिमाना**लाही **फातमे**नें ह्याप्रमाणेंच सांगितलें. कांहीं वेळानें ते **दिल्ही**दरवाज्याजवळ **अबदुल्ला** व **माधोसिंग** ह्यांना जाऊन मिळाले. ते नंतर अगदीं तिनीसांजेस आपापल्या घरीं जाऊन पोंहचले. **माधोसिंगा**नें एकदां वाटेंत विचारिलें 'कांग वहिनी, तुम्हाला यायला कां उशीर लागला? आम्ही किती वेळ **दिल्ही**दरवाज्याजवळ तुमची वाट पाहात उभे होतों.' **फातमे**नें **सदू**ला उत्तर न देऊं देतां मध्येंच म्हटलें '**माधोसिंग**, आम्ही पडलों बायका. तुमच्यासारख्या थोड्याच आम्हाला लांब लांब ढांगा टाकतां येतात.'

नंतर **माधोसिंगा**नें **रहिमाना**स म्हटलें 'तूंरे कोठून यांना मिळालास?' त्यानें **उत्तमलाला**च्या वर्तणुकीशिवाय रस्त्याची चुकामूक झाल्याचें सर्व कांहीं सांगितलें.

**उत्तम** घरीं पोंहचल्यावर **अबदुल्ला** म्हणाला 'कां **उत्तम** शिकार साधली कीं नाहीं?' **उत्तमा**नें आपली फजिती न सांगतां म्हटलें 'साधण्याच्या रंगांत आहे.' **अबदुल्ला** म्हणाला 'असें का? पण मला मात्र विसरूं नकोस. माझा त्यांत हिस्सा असलाच पाहिजे समजलास. नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे.' **उत्तमा**नें उत्तर न देतां मनांत म्हटलें 'ह्या गाढवाला कां असें रत्न देऊन त्या रत्नाची धूळधाण करून टाकावयाची? हा बोलून चालून पशु व ती नाजूक किती? छेः हा कांटा लवकरच उपटून टाकला पाहिजे. **जीवनलाला**ला सांगूं कां हें काम? छेः तसें कशाला? फिरून ह्यानें असली गोष्ट काढिली कीं, दाखवूं ह्याला हात, म्हणजे जाईल पैगंबराकडे.'

रात्रीं नवऱ्याला भेटल्यावर दर्ग्यांतील सर्व हकीकत तिनें मोठ्या आनंदानें कळविली. 'तुला वाटेनें उन्हापासून फार त्रास झाला असेल नाहीं बरें' असें **हरिसिंगा**नें म्हटल्यावर, तिनें **फातमे**चें सांगणें एका बाजूस ठेवून 'कोणी एक शेट मजशीं डागिण्याविषयीं बोलूं लागला होता व जवळ येत होता, इतक्यांत **फातमा**बिबीच्या **रहिमाना**नें त्याला येऊन मारिलें' असें सांगितलें. **हरिसिंगा**ला मात्र ह्यामुळें चटपट लागून, ह्याचा खुलासा हळू हळू काढला पाहिजे, असा त्यानें बेत केला; व त्या वेळेस तो मुकाट्यानें बसला.

## भाग १० वा.

## अवर्षण.

### पिराणा.

मागील भागांत सांगितलेल्या हकीकतीनंतर सुमारें एक महिना विशेष सांगण्यासारखें कांहीं झालें नाहीं. फक्त दरम्यान दरसालापेक्षां उष्मा मात्र जास्त कडक भासूं लागला. तो दिवसेंदिवस कमी न होतां उलट अधिक होत गेला. एक दोन दिवस तर सूर्याच्या तापानें कमाल केली. पूर्वेकडून एकसारखा सोसाट्यानें गरम वारा वाहत होता, त्यामुळें सूर्योदयानंतर ४–५ घटका उलटल्या नाहींत तोंच रस्त्यानें लोकांची रहदारी बंद होऊं लागली. वाऱ्याची झुळूक अंगाला विस्तवाप्रमाणें लागे. घरांत एकसारखें उकडत होतें. वाऱ्याबरोबर मनस्वी धूळ उडत असे. तो धुराळा तापल्यामुळें नाकांत, कानांत, डोळ्यांत व तोंडांत शिरून अतिशय त्रास होई. आकाशांत ढग आल्याप्रमाणें चोहोंकडे दिशा धुळीनें व्यापून गेल्या होत्या. अशा त्या दोन दिवसांत किती वाटसरू लूक लागून जेथल्या तेथें गतप्राण झाले; कित्येक गुरें मेलीं; व चिमण्यासारख्या लहानसहान पक्ष्यांचा रानांत झाडांखालीं सडाच पडला होता. म्हातारेकोतारे म्हणत कीं, इतका कडक उन्हाळा गेल्या ४०-५० वर्षांत पाहिला नाहीं. नंतर थोडा हवेमध्यें तफावत झाला खरा; परंतु तो मनुष्यांना कांहीं सुखावह झाला नाहीं.

त्या वेळेस **माणेकभाईनें** आपल्या **बेचर** गड्याला कामावरून दूर केलें, व त्याच्या जागीं **बाबासाहेबाच्या** शिफारशीवरून **गोकळ ( गोकुल )** नांवाचा गडी ठेविला. **बेचर** हा फार दिवसांपासून **निळकंठभाईच्या** येथें होता. पुढें **माणेकभाईनें** वेगळें बिऱ्हाड केल्यावर, त्या म्हाताऱ्यानें **बेचर** विश्वासूक म्हणून त्याच्या घरीं ठेवविला. पण कर्मधर्मसंयोगानें **माणेकभाईस बेचराविषयीं** कांहीं संशय येऊन त्यानें सासऱ्यास न विचारतां त्याला काढून टाकिलें.

**बेचर** सहज **निळकंठभाईकडे** गेला व म्हणाला ' माझा कांहीं अपराध नसतां नाहक माझ्या पोटावर पाय आणिला, तर आपण दयाळू आहां–मेहरबानीनें.......' **निळकंठभाईनें** त्याला आश्वासन दिलें. परंतु जर करितां याला आपण सध्यांच घरीं ठेविलें, तर जावयाचें मन दुखेल; व जावयाला ह्याविषयीं साफ बोलतांही येत नाहीं म्हणून त्यानें **बेचरास** सांगितलें ' कांहीं काळजी करूं नकोस. गांवीं जाऊन १०-१५ दिवसांनीं परत ये. मग जर **माणेकभाईनीं** तुला लाविलें नाहीं, तर मी तुला माझ्या येथे ठेवीन.' असें म्हणून म्हाताऱ्यानें त्याला खर्चासाठीं जवळचे पैसेही दिले. **बेचर** गेल्यानंतर त्याला कां

काढला ह्याविषयीं **जयलक्ष्मी**ला त्यानें विचारिलें; परंतु विशेष कारण नसतां त्याला काढण्यांत आलें, एवढेंच काय तें त्याला समजलें.

**निळकंठभाई**चा ब्राह्मण **मोहन** ह्याला **बेचर** जाण्यापूर्वीं भेटला होता; व आपल्याला कां काढलें ह्याचें खरें कारणही त्यानें कळविलें. निघतांना तो **मोहना**स म्हणाला 'गरीब विचारा म्हातारा. अगदीं सांवाचा अवतार व दयाळू किती ? मला जें काय समजलें आहे, हें जर त्या भोळ्या म्हाताऱ्याला कळविलें, तर त्याची हल्लींची शांतवृत्ति राहील काय ? छे: आपण कशाला बोला, व बोलून विश्वास कोण ठेवणार ? हर हर, अशा थोर व पवित्र मनुष्यास असला कुलांगार जावई ! मुलीची गत समजली. तिच्याकडे माझ्या मतें मुळींच दोष नाहीं. पण पुढें काय होतें तें पाहावें. माझी चाकरी गेली तर गेली; पण दुःखांत सुख म्हणतां, मजपासून फारसें कांहीं लपलें नाहीं, हें त्या चांडाळाला समजलें नाहीं. नाहीं तर, केव्हांच एकाद्या अंधार भुयारांत माझी गठडी केली असती. असो; एवढें करूनच तो दुष्ट थांबणार नाहीं, असें **बावासाहेबां**शीं त्या रात्रींच्या बोलण्यावरून वाटतें. डोळे झांकले होते, पण कान तर उघडे होतेना. ह्याला म्हणावें झोंपेचें मीष. आपण सावध असलें पाहिजे, समजलां कां **मोहनलाल** ? धूर्तपणानें वागल्यास पुष्कळ उपयोग होईल. बरें तर मी आतां गांवीं जातों. तुम्ही मात्र नीट सावध असा म्हणजे झालें.'

**बेचर** हा जातीचा लेवा कुणबी होता. हा **गिरमथा** नांवाच्या खेड्यांत राहत असे. हें खेडें **अमदाबादे**च्या दक्षिणेस सुमारें ५ कोसांवर आहे. **बेचर** ह्यानें **पिराणा** पंथाची दीक्षा घेतली होती.

**गुजराते**तील खेड्यांची रचना साधारण एकसारखीच असते. **गिरमथ्या** खेड्याला लागून एक लहानसा तलाव आहे. ह्या तलावाच्या कांठावर वड, पिंपळ व आंब्याचीं झाडें आहेत. तेथें एक लहानसें महादेवाचें देऊळ आहे. तलावांत पाणी पाजण्यासाठीं सांजसकाळ येथें गांवकरी गुरें आणीत. तलावाच्यानजीक थोडी पडीत जमीन होती. तेथें एक ४ कमानींची दीर्घ चतुष्कोणी दगडी विहीर होती. इला पाण्यापर्यंत पायऱ्या होत्या. ह्या विहिरीजवळच्या विस्तीर्ण वडाच्या पारावर गांवांतील चार वृद्ध व सभ्य लोक येऊन शिळोप्याच्या गप्पा छाटीत संध्याकाळचे घटका दोन घटका बसत. गांवासभोंवतीं निवडुंगाचें कुंपण होतें. गांव पूर्वाभिमुख होतें. गांवाच्या तोंडाशीं हलालखोर रहात. नवख्या मनुष्याला हेच वाट दाखवीत. गांवाजवळ आसपास धेड, कोळी वगैरे नीच वर्णाचे मजुरी करून पोट भरणारे लोक आपल्या पडक्या झोंपड्यांतून रहात. गांवाच्या मधोमध खाऊन पिऊन सुखी असे कुणबी जातीचे शेतकरी असत. ह्यांच्यापैकीं कित्येकांच्या घरांना मजलेही होते. कित्येक घरांना स्वतंत्र व कित्येकांना दोन तीन घरांमिळून समाईक अशीं अंगणें होतीं. रात्रीस ह्या अंगणांत गुरांना कोंडून ठेवीत. घरांचीं पुढचीं दारें एकसारखीं मोठ्या रस्त्यावर होतीं. घरांच्या पुढच्या भागांवर लांकडी कोरींव काम बरेंच सुरेख

होतें. ह्याशिवाय वाकीचीं घरें म्हणण्यासारखीं नव्हतीं.

ह्या गांवाजवळील वहुतेक जमीन गोराट आहे. हें खेडें खालसांत असल्यामुळें येथें बराच वंदोबस्त होता. सरकारच्या तर्फेनें गांवाचा वंदोवस्त पटेलकडे असे. पटेलाच्या हाताखालीं एक तलाटी ( कुळकरणी ), एक हवालदार, एक चौकीवाला, व पगी ( वाटाड्या ) असत. चौकीवाला व पगी ह्यांना वर्षाअंतीं प्रत्येक घरकऱ्याकडून कांहीं मण धान्य दिलें जात असे. कांहीं चोरी झाल्यास ती भरून देण्यास ते दोघे जबाबदार असत. सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, शिंपी, मोची वगैरे गांवकऱ्यांनीं शहरांतून बोलावून आणिलेल्या लोकांना वसवाया म्हणतात. धान्य व वेळ पडल्यास रोख पैसे देऊन आपलीं कामें गांवकरी त्यांच्याकडून करवून घेत. ह्या गांवांत **छोटालाल** नांवाचा औधिज ब्राह्मण मुख्य गोर होता. गांवकऱ्यांचीं लग्नं वगैरे कार्यें हा चालवीत असे. हा नांवाचाच काय तो **छोटालाल** होता; बाकी नेहमीं यथास्थित तूपरोटी खाऊन तो भला गलेलठ्ठ माजला होता. ह्याला गांवांत चोहोंकडे मान असे; परंतु शरिराच्या मानानें ह्याच्यामध्यें थोरपणा मुळींच नव्हता. एथें एक शाळा होती. तिजवर **छोटालाला**च्या मेव्हणीचा मुलगा **तनसुखराम** हा पंतोजी असे. हा शरिरानें अगदीं पाप्याचें पितर होता. लहान लहान मुलांवर देखील ह्याचा दाव बसत नसे; परंतु गांवकरी ह्याला बराच मान देत असत. सर्व गांवकऱ्यांत मुख्य पाटीदार **वल्लभभाई** म्हणून होता. हा बरेच पैसे बाळगून होता. बाकी नांव घेण्यासारखा राहिला कायतो तलाटी. ह्याचें नांव **गोविंदभाई**. हा **वल्लभभाई** पटेलचाच नातेवाईक होता.

**वेचर** हा संध्याकाळच्या सुमारास आपल्या गांवीं जाऊन पोहोंचला. त्या वेळस गांवांतील वहुतेक मनुष्यें बायकांमुलांसुद्धां त्या तळ्याभोंवतीं येऊन राहिलेलीं त्यानें पाहिलीं. आपल्या घरच्या मनुष्यांचा शोध करीत तो आपल्या वृद्ध पित्यास व धाकट्या भावांस जाऊन भेटला. सर्व क्षेमकुशल विचारल्यावर **वेचरानें** 'भेटण्यासाठीं आलों आहे, एक महिना राहीन' म्हणून सांगितलें. वाप म्हणाला 'वरें झालें. पुष्कळ दिवसांनीं आलास, तर आनंदानें रहा, म्हणजे झालें. पण पाहिलेंसना, आज किती दिवस पाऊस पडत नाहीं. म्हणून आम्हीं गोरजींच्या सांगण्यावरून आज उंजाणी केली. ते म्हणाले **इंदीर** (इंद्र) राजा तुम्हांवर रागावला आहे, तर तुम्ही गांव "उजड पाडा" व गांवाबाहेर एक दिवस सैंपाक करून रहा, म्हणजे तो पाऊस देईल. आज आम्हीं तसें केलें. परंतु ढगाचा कोठें मागमूसही नाहीं. उद्यां त्या आपल्या **पिराण्याला** जाऊन नवस करावा असें माझ्या मनांत आलें आहे. म्हणजे तरी पाऊस जलदी येईल. गुरें पाण्यावांचून मरतात; व शेतांतील रोपें तर जेथच्या तेथें करपून गेलीं. ह्या तलावाचेंच पाहाना किती पाणी सुकून गेलें आहे ? दर वर्षीं पुरुषावर पाणी असतें, तेथें आतां एक गुडघाभरही राहिलें नाहीं. बाबांनो, मी आहें म्हातारा. मला कांहीं विशेष दुःख होणार नाहीं. परंतु पाऊस जर पडला नाहीं, तर दुकाळानें तुमचे मात्र

हाल माझ्यानें पाहवणार नाहींत. **इमाम** काय करील तें खरें. **बेचर** तूं मजबरोबर उद्यां **शिवा** काकाकडे चल बरें. तुजविषयीं ते मागें चौकशी करीत होते.'

रात्र पडल्यावर सर्व गांवकरी आपआपल्या घरीं गेले. दुसरे दिवशीं पटेलच्या सांगण्यावरून **छोटालाला**नें तळयाजवळच्या महादेवाच्या पिंडीवर अभिषेक केला. कांहीं कुणब्यांच्या बाया त्या गांवभर पावसाचीं गाणीं म्हणत गेल्या; त्यांबरोबर एक मुलगा डोक्यावर मातीनें भरलेलें शिपतर घेऊन जात होता. त्या शिपतरांत निंबाच्या तीन डाहळ्या खुपसल्या होत्या. प्रत्येक घराजवळ हा घोळका उभा राही, व घरांतून बाया येऊन त्या शिपतरावर तो मुलगा चिंब भिजेपर्यंत पाणी ओतीत व घोळक्यांतील बायांना धान्य घालीत.

दुपारून **बेचर** आपल्या बापासहीत **पिराण्या**च्या मठाला गेला **गिरमथा** खेड्याच्या पश्चिमेस सुमारें अर्ध कोसाच्या अंतरावर एका टेंकडीवर हा प्रसिद्ध मठ आहे. येथें पुष्कळ झाडी आहे. ह्या मठाभोंवतीं मजबूत भिंत आहे. आंत कांहीं लहानशीं फकिरांचीं घरें आहेत. ह्या फकिरांना काका म्हणतात. मधल्या जागेंत **इमामशाह नूरशाह, बालामहम्मद** व **बाकरअली** ह्यांचे टुमदार दर्गे आहेत; व आसपास पुष्कळ थडगीं आहेत. हिंदू व मुसलमान भिकाऱ्यांसाठीं येथें एक अन्नछत्र आजतागाईत चाललें आहे.

ह्या **पिराणा** पंथाच्या उत्पत्तीविषयीं असें सांगतात कीं, शके १३७१च्या सुमारास **इमामशाह** नांवाचा एक सय्यद **इराण** देशांतून **गुजरात** प्रांतांत ह्या जागीं येऊन राहिला. सतत तीन वर्षे अवर्षण पडल्यामुळें आसपासच्या खेड्यांतील पाटीदार मंडळी अगदीं रडकुंडीस आलेली होती. **इमामशाह** हा कोणी अवलिया फकीर आहे, असें त्यांना वाटून ते पाऊस पाडण्याविषयीं त्याची विनवणी करूं लागले. तेव्हां पाऊस लौकरच येईल असें त्यानें त्यांना अभिवचन दिलें. पुढें त्यानें सांगितल्याप्रमाणें घडूनही आलें, त्यामुळें त्या कुणब्यांची याजवर श्रद्धा बसून त्यांनीं याजपासून दीक्षा घेऊन हा आपला गुरू असें ठरविलें, आणि ह्याला राहण्यासाठीं एक झोंपडीही बांधून दिली. ह्यानंतर कांहीं दिवसांनीं **अहमदाबादे**चा दुसरा **महंमदशाह बादशाह** हा त्या वाटेनें जात असतां, ह्या फकिराची ख्याति ऐकून प्रतीति घ्यावी, म्हणून येथें उतरला. त्यानें दुधाच्या पेल्यांत विष कालवून **इमामशाहा**ला पाजविलें; परंतु बोलून चालून तो अवलियाच, म्हणून त्याला यत्किंचितही इजा झाली नाहीं. नंतर मांजराचें मांस शिजवून त्याच्या ताटांत वाढलें, परंतु फकिरानें तें ओळखून 'बेटा ऊठ' म्हणून म्हणतांच तें मांजर फिरून सजीव झालें. सरतेशेवटीं त्याला न कळत एका तबकांत मांस झांकून ठेवून 'ह्यांत गुलाबाचीं फुलें आहेत' असें बादशाहानें सांगितलें. परंतु फकीर पडला अंतर्ज्ञानी. त्यानें त्या तबकावरचा चटकन् रुमाल काढून मांसाऐवजीं खरोखरीच गुलाबाचीं फुलें दाखविलीं. अशी जेव्हां बादशाहाची खात्री झाली, तेव्हां त्यानें ह्या अवलियाला आपली मुलगी दिली. तिजपासून झालेल्या चार मुलांचे वंशज हे

मठांतील सय्यद होत. ह्यांनाच **पीरजादे** म्हणतात.

आपला अंतकाळ समीप आलासें पाहून, **इमामशाहा**नें स्वतःसाठीं एक रोझा बांधविला, व आपली गादी **सारा काका** नांवाच्या लेवा कुणब्यानें चालवावी असें ठरविलें.

ह्या पंथाचे एकंदर ५ मठ आहेत; त्यांपैकीं मुख्य **पिराणा** मठ. ह्या मठांत, ब्राह्मण, वाणी, लेवा व कडवा कुणबी वगैरे हिंदूच दीक्षा घेतात. दीक्षा घेतल्यानें सर्व प्रकारेंच धर्मांतर होतें असें नाहीं. ह्या गादीवर लेवा कुणब्यांपैकींच कोणी हुशार चेला बसतो; म्हणून ही गादी बहुतेक हिंदूंकडेसच आहे, असें म्हणायाला कांहीं प्रत्यवाय नाहीं. मठाधिकाऱ्याला सर्वसंगपरित्याग करावा लागतो. तो कावेनें रंगविलेलीं भगवीं धोतरें नेसतो. त्याच्या डोकीला पांढरें पागोटें व अंगांत पांढरा अंगरखा असतो.

ह्या पंथाचे लोक दक्षिणेस **वऱ्हाणपूर, खानदेश** येथपासून तों उत्तरेस **काठियावाड, कच्छ** प्रांतांपर्यंत सांपडतात. बहुतेक खालच्या प्रतीचे हिंदू व हिंदूंचे मुसलमान झालेले आणि वर सांगितलेले **पीरजादे** हे सर्व ह्या पिरांना मान देतात. ह्यांपैकीं कांहीं **इमामशाहा**ची देवाप्रमाणें पूजा करितात. **शिक्षापत्री** म्हणून **इमामशाहा**नें लिहिलेल्या वचनांचा संग्रह बहुतेक वाचतात; '**इमामः केवलः**' म्हणून काका जप करितात, व इतर लोक '**शिवोऽहम्**' म्हणून म्हणतात.

असो; **बेचर** बापासहित मोठ्या काकाला भेटण्यासाठीं त्याच्या घरीं गेला. हा उतार वयाचा होता; व बोलण्याचालण्यावरून सज्जन असावा असें वाटे. आंत गेल्यावर सलाम करून हे बापलेंक एका बाजूला बसले. तेथें दुसरी बरीच मंडळी बसली होती. कांहींजण तर बऱ्याच लांबून आलेले होते. सर्वांनीं एकच मागणें लाविलें होतें. ते म्हणाले 'काकाजी, आपण मायबाप आहां. गुराढोरांना चारा नाहीं, पाणी नाहीं. तीं सध्यांच पटापट जीव टाकीत आहेत. पाऊस न आल्यास आमची तीच गत होईल. **इमामशाहू** आम्हां लेंकरांवर कां इतके रागावले, कोण जाणें. आपण तरी मेहेरनजर करून त्यांच्या कानीं आमचें गाऱ्हाणें घाला, व आम्हांवर मोहबत करण्याविषयीं त्यांजवळ रदबदली करा.' काकाजी सर्वांना धीर देऊन म्हणाले 'बाबांनो, काळजी करूं नका. आम्ही **इमामशाहां**ना संकट घालतों. ते तुम्हांला दुःखांत विनाकारण पाडणार नाहींत. तशांतून त्यांच्या नजरेनें आपण जर गुन्हेगार असलों, तर ते आपला निमाज न ऐकतां आपल्याला दंड केल्याशिवाय राहणार नाहींत. म्हणून प्रथम आपल्या पापांबद्दल आपण येत्या शुक्रवार (जुम्या) पर्यंत रोजे केले पाहिजेत. नंतर आपण त्यांजवळ पावसाबद्दल मागणें करूं.'

ते बिचारे लोक पाऊस नसल्यामुळें जीव अगदीं ओंठाशीं धरून आले होते, तर त्यांच्यानें ५-६ दिवस आणखी दम कसचा निघतो. काकाजींनीं तसें म्हटल्यावर त्यांचें बोलणेंच खुंटलें. ते मनांतल्या मनांत अगदीं हताश झाले, कारण त्यांना काकाजींच्या हल्लींच्या दुटप्पी सांगण्यावरून खास वाटलें कीं, पावसाची बहुतकरून ह्या सालीं

नाच दिसते. नंतर काकाजींनीं **बेचरा**कडे वळून 'केव्हां आलास' वगैरे विचारिलें. कांहीं वेळानें सर्व मंडळी आपापल्या बिऱ्हाडीं परत गेली. जरी त्यांना काकाजींच्या सांगण्यावरून विशेष आश्वासन मिळालें नाहीं, तथापि आपण उपास केल्यास कदाचित् काकाजींच्या सांगण्याप्रमाणें आपला हेतु तडीस जाईल असें त्यांना वाटलें. म्हणून कित्येक भाविक उपास करून सांजसकाळ शिक्षापत्री वाचण्यांत व जप करण्यांत दिवस घालवूं लागले. कित्येक वैतागून मनांतल्या मनांत **ईश्वराला** व **इमामशाहा**ला लाखोली वाहूं लागले. ते म्हणत 'कसचा देवनी कसचें काय? सगळें पैसे उकळण्यासाठीं ह्या लुच्या काकाजींनीं थोतांड माजविलें आहे. चांगलें वरें झालें, म्हणजे यांच्या रदबदलीनें झालें. वाईट होतें, तें चटसारें भरा आमच्या पदरीं. काय देव दुष्ट आहे? आणि त्याला म्हणा दयाळू. बिचारीं ढोरें पाण्यावांचून मरतात; त्यांची देखील त्याला कींव येत नाहीं. त्यांनीं तर कांहीं ह्याचें घोडें मारिलें नाहीं. आमची मनुष्यांची गोष्ट राहूंद्या, पण त्या मुक्या जनावरांना तरी पाणी, चारा, त्यानें द्यावयाचा होता.'

**बेचर** बापाला मठांत ठेवून आपण घरीं गेला. बापानेंही कडक उपोषणें चालविलीं. नंतर सर्व भाविक लोकांनीं शुक्रवारीं सकाळपासून तो संध्याकाळपर्यंत न विसंवतां एकसारखा जपघोष चालविला, व पीरजादे निमाज पढूं लागले. रात्रीं काकाजींना विचारितां ते म्हणाले 'साक्षात्कार अद्याप होत नाहीं. पण तो एकदोन दिवसांत व्हावा. उद्यां तुम्ही आपापल्या घरीं बिनदिकत जा. आपली भक्ति देवाच्या घरीं रुजू झाली आहेच, व **इमामशाह**ही आपल्याला दुःखाच्या खाईत लोटणार नाहींत. साक्षात्कार झाल्यावरोबर आम्ही चोहोंकडे वर्दी देऊं म्हणजे झालें.' हें बोलणें ऐकल्यावर सर्वांचे हातपाय गळाले; व आतांवरीक मुळीं आशा नको असें त्यांना वाटलें. नंतर दुसरे दिवशीं ते खिन्न होऊन आपापल्या गांवीं गेले.

पुढें ४ दिवसांनीं **वल्लभभाई** पटेलानें एक भुवा (पंचाक्षरी) वोलावून गांवांतील शिष्ट मंडळींसह तो गांवच्या **वेहचराजी** मातेच्या देवळांत गेला. देवीपुढें धूप जाळून तो भुवा थोड्या वेळानें सर्व अंगाला आळोखेपिळोखे देऊं लागला व नंतर घुमूं लागला. आतां ह्याच्या अंगांत **वेहचराजी** माता आली असें समजून **छोटालाल** गोरजींनीं तिला विचारिलें 'जयमाते **वेहचराजी**. यंदां आम्हां लेंकरांवर कां वरें रागावलीस? अजून पावसाच्या पाण्याचा टिपूससुद्धां तूं पाठविला नाहींस. आम्हीं काय खावें, काय प्यावें बरें?' हातपाय आदळून व डोळे वटारून तो भुवा म्हणाला 'तुमच्यासारख्या श्रद्धाशून्य लोकांना कोठून पाऊस मिळतो तें पाहतेंना? तुम्ही माझीं लेंकरें म्हणवितां, आणि मला बळी देण्याचें कसेंरे वेळोंवेळीं विसरतां?' असें म्हणून त्या भुव्यानें लागलीच गोरजींच्या अंगावर चाल करून एक लखलखीत श्रीमुखांत भडकावली. गोरजींची तारांबळ कोण विचारावी? त्यांचें पागोटें उडून गेलें, कांसोटा फिटला, सर्व अंग लटलट कांपूं ल

गलें. 'आपल्यावर माताजीची इतराजी झाली, असें वाटून त्याला पराकाष्ठेचें भय वाटलें. त्याची बोबडी वळलीसें पाहून, पटेल पुढें सरसावला, व नम्रपणानें म्हणाला 'जय माताजी, आम्ही गरीब अनाथ आहों. आमचे सर्व अपराध पोटांत घाल. आम्ही आजतागाईत तुला विसरून गेलों, ह्याची माफी कर. जें जें मागशील तें तें आम्ही देऊं. आमची सर्व धनदौलत तुझीच आहे. तुझ्या प्रसादानेंच आम्हांला हीं सर्व संसारसुखें मिळतात. तर माते क्षमा कर, क्षमा कर. आम्ही चुकलों.'

भुव्यानें लगेंच सौम्य रूप धारण करून म्हटलें ' बरें बाळांनो, तुम्ही निर्धास्त असा. फक्त दोन मण शिजविलेली खिचडी व चुन्या चुरम्याचे लाडू उद्यां सूर्योदयापूर्वी गांवाच्या बाहेर माझ्या वडाखालीं आणून ठेवा, म्हणजे झालें. आतां मी जातें.'

हा भुवा मोठा लवाड होता. कांहीं दिवसांपूर्वी **छोटालाला**नें त्याची विनाकारण कुचेष्टा केली होती, ह्मणून त्याविषयीं पोटांत आकस ( डाव ) धरून त्यानें गोरजीवर ह्यावेळीं वचपा काढिला. असो; त्याप्रमाणें सांगितल्या वेळेवर मडक्यांच्या खापरांत तें सर्व अन्न व लाडू नेऊन पटेलानें ठेवविले. प्रत्येक घरांतून एक एक खापर ह्याप्रमाणें तेथें झाडांखालीं सुमारें ३०० खापरें पडलीं होतीं. नंतर गांवाच्या धेड व वाघरी लोकांनीं कांहीं वेळानें तें सर्व अन्न खाऊन टाकिलें.

इतकेंही करून पाऊस म्हणून पडला नाहीं.

# भाग १२ वा.

## दुष्काळ.

उद्यां नारळी पौर्णिमा, तर आपल्या येथेंच श्रावणीचा बेत करावा, असें मनीं आणून **केसवा पंडितां**नीं आपले दिवाण **भास्करपंत** ह्यांस सर्व तयारी करावयास सांगितलें; व आपण **भद्रें**त **भाऊसाहेब, यज्ञेश्वर** शास्त्री, वगैरे शिष्ट मंडळीस निमंत्रण करण्यासाठीं म्हणून स्वतः हुजऱ्यानिशीं संध्याकाळच्या सुमारास बाहेर पडले. **भाऊसाहेबां**कडे प्रथम जाऊन नंतर ते **रामवारी**नजीक **यज्ञेश्वर** शास्त्र्यांच्या घरीं गेले. माडीवर दिवाणखान्यांत **यज्ञेश्वर** शास्त्री आपले कारभारी **दामुभाई** यांशीं बोलत होते. जवळ ५ विद्यार्थी रघुवंशाचे श्लोक अन्वयार्थ घोकीत वसले होते. ह्या विद्यार्थ्यांत आपला **आनंदशंकर**ही होता. बाकीचे चौघेजण **भद्रें**तील दक्षणी ब्राह्मणांचे मुलगे होते.

**यज्ञेश्वर** शास्त्र्यांचें वय ह्या वेळेस सुमारें ५५ वर्षांचें होतें. हे मूळचे **माहुली**चे राहणारे. ह्यांचें उपनांव **वोकील** म्हणून सांगितलें आहेच. ह्यांनीं **काशी**स अध्य-

यन केलें होतें. त्यांची बुद्धि तीव्र असल्यामुळें फार परिश्रम न करितां १०-१२ वर्षाच्या आंत व्याकरण, वेदांत व धर्मशास्त्र हीं त्यांनीं तेथें म्हटलीं, व त्यांत निष्णात होऊन निरनिराळ्या गुरूंकडून शाबासकीही मिळविली. वीस वर्षांपूर्वी **पुण्या**हून ह्यांना येथें **फडणिसांनीं** पाठविलें होतें; व कांहीं जमीनही **अमदाबादे**च्या लगत तोडून दिली होती.

ह्यांची मुद्रा फार सौम्य होती, त्यामुळें विद्येचा परिणाम जसा व्हावा, तसा ह्यांवर झालेला दिसत होता. विद्वत्ता, सौजन्य व विनय ह्या तिहींचा संयोग क्वचित् सांपडावयाचा, परंतु ह्यांच्याठायीं तीं तिन्हीं होतीं. **सरस्वती** व **लक्ष्मी** ह्यांचें वैमनस्य ह्यांच्या ठिकाणीं लयास गेलें होतें. हे आपल्या कीर्तीस साजे असें अतिशुभ्र काशीचें धोतर नेसले होते. यांनीं अंगावर शेला घेतला होता. यांचे बहुतेक केश पांढरे झाले होते, व वार्धक्यामुळें दिवसेंदिवस राहिले साहिले केशही पांढरे होत होते, त्यामुळें यांची उज्वल कीर्ति जसजशी दिवसेंदिवस जगभर पसरत गली, तसतशी ती ह्यांजपाशी केशांच्या रूपानें येऊन राहूं लागली असें वाटे. हे क्षौर करवीत, त्यामुळें जणू कीर्तीसारख्या प्रिय वस्तूविषयीं देखील आपण उदासीन आहों, असें दाखवीत. ह्यांचा रंग काळासांवळा होता, तथापि ह्यांच्या तोंडावर तेज झळकत असल्यामुळें हे मोठे भव्य दिसत. ह्यांचें कपाळ रुंद व विशाळ होतें, व तें शरीराच्या मानानें किंचित् मोठें होतें. ह्यांचे डोळे मोठे असून पाणीदार होते. ह्यांनीं कपाळभर आडवें पांढरें गंध लाविलें होतें. ह्यांच्या कानांत रुद्राक्ष होते, व गळ्यांत रुद्राक्ष मण्यांची मढविलेली माळ होती. ह्यांच्या बोटांत जोडवें व पवित्रें होतें. अशा कर्मनिष्ठ व शांत वृत्तीच्या ब्राह्मणास पाहून साधारण पाहुणाराच्या मनाला आल्हाद झाल्यावांचून राहत नसे. स्वतःचें पोर नव्हतें म्हणून म्हणा, किंवा मुलांची आवड होती म्हणा, त्यांना मुलें जवळ असल्यावांचून करमत नसे. घरांत आपली बायको **सावित्रीबाई** आणि पुतण्या **गोविंदराव**, त्याची बायको **रमाबाई** व तिचे दोन मुलगे, एवढींच कायतीं माणसें होतीं; परंतु सर्वजण मोठ्या आनंदानें आपला काळ घालवीत. **सावित्रीबाई रमाबाई**ला अगदीं पोटच्या पोरीप्रमाणें वागवीत असे, त्यामुळें **रमाबाई**ला माहेरची आठवण देखील होत नसे.

**केशवराव पंडित** आले आहेत, असें ऐकतांच **यज्ञेश्वर** शास्त्र्यांनीं आपलें बोलणें थांबवून लागलीच जिना उतरून त्यांना वर आणून लोडाशीं बसविलें. मुलांना घरीं जाण्याविषयीं ते सांगणार, इतक्यांत **पंडित** म्हणाले—शास्त्रीबोवा, **दामुभाईं**ना आपल्याशीं कांहीं बोलावयाचें आहे असें दिसतें. तर त्यांना बोलूंद्या. मला कांहीं परत जाण्याची घाई नाहीं. मी तोंपर्यंत हीं मुलें काय पढतात हें पाहतों. आपण उगाच संकोच धरूं नका. मुलांना असूंद्या येथेंच.

**यज्ञेश्वरशास्त्र्यांनीं पंडितांचें** म्हणणें मान्य करून **दामुभाईस** विचारलें—बरें **दामूभाई**, काय म्हणतां आपल्या शेतावर दरवडा पडला, व आग लागली म्हणून तो **शिवजी** सांगतो? पण हें झालें कसें, हेंच मला समजत नाहीं. दरवडा कशावर पडला नी आहे काय?

**दामूभाई** हा जरी दक्षणी ब्राह्मण होता, तथापि जन्मापासून त्याचें ह्या प्रांतांत राहणें असल्यामुळें त्याच्या बोलण्यांत गुजराती भाषेची भेळवरीच सांपडे. तो म्हणाला-आपण गतसालीं त्या शेतांत कुणब्यांना राहण्यासाठीं म्हणून एक डेहेला नव्हता का बांधविलांत? त्या डेहेल्याच्या मेड्यावर घासाचीं पुळें ठेविलीं होतीं. तेथें काल दिवसां पोरें दिवड्या घेऊन कुदत होतीं. नंतर काय, निसरणी सळगली, व डेहेला बळला.

**शास्त्री—दामूभाई,** मीं कितीदां सांगितलें कीं तुम्ही गुजराती शब्द बोलण्यांत आणूं नका म्हणून? बरें हें आगीविषयीं झालें. पण दरवडा कसा पडला?

**दामू**—अहो, मी तरी काय करूं? मला तसें बोलण्याची टेवच पडली आहे. पण आतां वरीक मी गुजराती शब्द वापरणार नाहीं. बरें देव भला करो—त्या खातर—छत् चुकलों त्या दरोड्याविषयीं असें **शिवजी** बोलतो. आपल्या खेतींत एके बाजूला बासाची वाड केली होती, व त्यामध्यें त्यानें ४० घेटे गिणून पुरले होते. वाडीच्या बाहेर एक पगी फिरत होता, व आंत एक रखारी होता. मग काय, रात्रीं एक खातर आलें, आणि सकाळीं जेव्हां गणती केली, तेव्हां पांच घेटे खुटले. त्या खातरवाल्यांनीं दगडाखालीं कांहीं वर्तनें दाटलीं होतीं, तीं मात्र मिळालीं. आतां **शिवजी** म्हणतो कीं, वरसात नाहीं, खातर आला, तर आम्हाला कांहीं परवडत नाहीं. पगीला जखम लागून तो मांदा झाला आहे; त्याला मिळूनच सकाळीं **शिवजी** येथें आला. तर आतां ह्या तुमाराचें काय करावयाचें?

**शास्त्री**—बरें **शिवजीला** सध्यां टेवून घ्या. मग मी विचार करून सांगेन काय करावयाचें तें.

**दामू**—होच तो. पण मी एक सांगायाला भुललों. **दिनकररावांनीं** आपलें घर वेंचाण घेऊन घेतल्यामुळें त्यांच्यावर लखाण केलें; त्याचा खरच आसरे ३ रुपये आला, तर ह्याची गोठवण कशी करावयाची.

**शास्त्री**—हें सध्यां राहूं द्या.

हें संभाषण होत असतां **पंडितांनीं** मुलांना कांहीं श्लोक लावायाला सांगितले, व त्यांनींही समर्पक उत्तरें दिलेलीं पाहून त्यांना मोठा आनंद झाला. **दामूभाईची** बोलण्याची पद्धत पाहून तीं दक्षिण्यांचीं मुलें गालांतल्या गालांत हंसत होतीं. नंतर **पंडित** शास्त्रीबोवांकडे वळून म्हणाले—मुलें तर हुशार आहेत. पण हुशारीविषयीं शंका घेणेंच, म्हणजे प्रमाद होय. कारण गुरूचें थोडेंना थोडें तरी शिष्य अनुकरण करतात, आणि आपल्यासारखे गुरू मिळताहेत कोठें? पण कांहो, हा मुलगा गुजराती असून इतका हुशार—हें एक नवल म्हणायाचें, तशांत ह्याची वाणी तरी किती शुद्ध? पण ह्याला कधीं तरी पाहिल्यासारखें वाटतें. शास्त्रीबोवा, मी उद्यां ह्यांना देण्यासाठीं ५ धोतरजोडे पाठवून देईन.

शास्त्रीबोवांनीं मुलांना जा म्हणून सांगून **पंडितांकडे** वळून म्हटलें—आपण इतकी त्यांची स्तुति केली, पण तीं शेफारणार नाहींत ना. तो गुजराती मुलगा **निळकंठभाईच्या** येथला **आनंदशंकर.** पोर मोठा सालस व बुद्धिमान् आहे. बरें आज कोणीकडे भेटीचा अनुग्रह केला?

**पंडित**-ह्यांत कसला अनुग्रह ? आपल्यासारख्या विद्वज्जनांपाशीं घटकाभर बसल्यास किती म्हणून ज्ञानप्राप्ति होते ? अशी जर स्थिति आहे, तर मग अनुग्रह कोण करितो बरें, आपण कां मी ? वरें तें असो, उदयीक सालाबादप्रमाणें आमच्या येथें अगत्य येणें. नंतर पंक्तीचाही लाभ करवालच.

ह्याप्रमाणें निमंत्रण केल्यावर सहज रयतेच्या शोचनीय स्थितीविषयीं गोष्टी निघाल्या. **पंडित** म्हणाले-पण शास्त्रीबोवा, पाहिलेंतना, अजूनपर्यंत मेघराजानें कांहीं इकडे कृपादृष्टि केली नाहीं. गेल्या ज्येष्ठ महिन्यापासून धारण वाढत चालली होती; तर आताशीं काय ५-६ शेरांवर येऊन बसली आहे. गरीब लोकांनीं आतां खावें काय ? त्यांचा चरितार्थ चालावा कसा ? आज वाटेनें येतांना कित्येक ठिकाणीं रस्त्यावरतीं भिकार तरमळत पडलेलें पाहून मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. आपण तरी काय करावें ? लोकांचें दुःख निवारण करितां येईल, तितकें करण्याविषयीं सरकारांतून प्रयत्न चालले आहेतच. परंतु हा दुष्काळ किती वेळ पावेतों लोकांस भोंवणार, कोण जाणें.

**शास्त्री-केशवरावजी**, मी बोलतों ह्याचा राग मात्र मानूं नये म्हणजे झालें. आपणच पहा कीं, जर चोहोंकडे अनाचार वाढला, तर पृथ्वीवर अवर्षणादि संकटें कां येऊं नयेत ? धर्माप्रमाणें प्रभू कोठें वागताहेत, तर जनसमाज वागेल. मी बोललों म्हणजे तोंड मात्र दिसतें; पण हेच **भाऊसाहेब** ह्यांनीं तरी धर्मास अनुसरून राहावयाचें होतें. **श्रीमंतांची** तर गोष्ट लांब राहिली. परंतु खरेंच, **भाऊसाहेबांसारख्या** अधिकाऱ्यांना तरी विशेष दोष देतां येत नाहीं. कारण **रायबाजींचेंच** आचरण कोठें सर्वतः शुद्ध आहे ? अथवा हा कलियुगाचाच महिमा, म्हणून आपल्या जिवाची समजूत करून घ्यावी. अनन्वितपणें वागल्यास देवता तरी संतुष्ट कोठून असणार; व सृष्टीचे व्यापार नियमितपणें सुरळीत वेळेवर कसे घडणार ? दान आहे, पण पात्रापात्र विचार नाहीं; याग नाहीं; सर्वतोपरि विषयाधीनता; प्रजेला गांजण्यांत पुरुषार्थ; असे प्रकार ज्या राज्यांत आढळतात, तेथें इंद्रासारख्या सत्यभीरु देवतांनीं कोप करावा ह्यांत नवल तें कोणतें ? बोलून चालून **राजा कालस्य कारणम्.** ह्याच **भाऊसाहेबांना** जरा सन्मार्गाकडे आपली प्रवृत्ति करूंद्या; दीन प्रजाजनांचें हित पाहण्याविषयीं यत्किंचित् लक्ष देऊंद्या; म्हणजे हीच प्रस्तुतची स्थिति जाऊन चोहोंकडे सुख समाधान होईल. पण माझ्या मनाचा असा कांहीं ग्रह झाला आहे कीं, एकंदर आपल्या **शिवाजी** महाराजांनीं मिळविलेल्या हिंदुपदबादशाहीला उतरती कळा लागली, व तिचा थोड्या काळांत लयही होईल. राज्यकर्ते शुचिर्भूत असल्याविना उत्कर्ष होत नाहीं. सद्यःस्थितीवरून तर प्रभूंच्या वर्तनांत पालट होण्याची मुळींच आशा दिसत नाहीं. तर अशा प्रसंगीं सुदिन पाहण्याची आशा स्वप्नींसुद्धां नको. सर्व प्रकारें अनिष्टसूचक अशींही ह्या वर्षाचीं संकटें होत. फार काय सांगूं **केशवरावजी**; पण ह्या संवत्सराचें वर्षफळ पाहतां ह्या दुष्काळानेंच म्हणजे प्रजेची दैना संपेल,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



असें मला मुळींच वाटत नाहीं. काय भगवंताची इच्छा आहे, कोण जाणे. आपण व्यर्थ त्यावद्दल चिंता करीत वसून मनाला उगाच हृद्रोग लावून घेणें मुळींच रास्त नाहीं. बरें आपण ह्या दुष्काळपीडितांस कोण त्याप्रकारें सहाय्य करीत असतां? पण आपण करितां त्याला **भाऊसाहेबांची** संमति तरी आहे का?

**पंडित**—शास्त्री बोवा, आपण जें कांहीं सांगितलेंत तें सर्वथैव यथार्थ आहे. सद्यः-स्थितीविषयीं विचार करीत असतां मी देखील अतिशय दुःखित होतों. पण करावें काय? सर्वचालकत्व हातीं नसल्यामुळें प्रशस्त क्रमाला वळकटी आणिणितां येत नाहीं; व त्यामुळें गौण व निषिद्ध मार्ग परकीय जन अनुसरतात, तें सर्व निमूटपणें मला पहावें लागतें. जेव्हां मेघराजांनीं अवघ्या मृगांत इकडे कृपादृष्टि केली नाहीं, त्यावेळीं न जाणो काळ पडेल, ह्या भीतीनें **भाऊसाहेबांना** ह्याविषयीं तडजोड काढण्याविषयीं पर्यायानें विचारिलें. त्यांच्यानेंही मजसमक्ष एकदम माझें म्हणणें मोडून काढवलें नाहीं. परंतु वेळ टाळून नेण्यासाठीं ते म्हणाले '**केशवरावजी**, आपल्या म्हणण्याप्रमाणें कांहीं तजवीज केली तर पाहिजेच; नाहीं तर ऐन प्रसंगीं कूपखननाचा प्रकार होईल. म्हणून आम्ही पुण्यास लिहून ह्याविषयीं खुलासा मागवितों. आपण **बडोद्याहून** तसें कांहीं तरी आणवालच.' मला म्हणजे त्यांच्याकडून जास्त होईलसें मुळींच वाटलें नाहीं. परंतु आपण न विचारतां कांहीं उपाय योजिल्यास उगाच वैमनस्य वाढून प्रजेला विनाकारण क्लेश सोसावे लागतील. एतदर्थ वहिवाटीप्रमाणें त्यांच्या कानांवर माझें म्हणणें घातलें, व मीं **बडोद्याहून** प्रजेला ऐन प्रसंगीं सहाय करण्याविषयीं लेखी परवानगीही आणविली. पण चमत्कार हाच कीं, तसा कांहीं प्रकार **भाऊसाहेबांकडेस** दिसत नाहीं. मीं शहरांत ४ ठिकाणीं अन्नछत्रें घातलीं आहेत, तेथें अगदीं अशक्त, अनाथ, अंध, पंगु इत्यादि लोकांस कायतें अन्न मिळतें. अगदीं गरीब लोकांसाठीं म्हणून कांहीं ठिकाणीं कामें सुरवात करून तेथें त्यांना लाविलें आहे. इतकें करून देखील रयतेच्या हालांमध्यें यत्किंचितही कमतरता झाली नाहीं. उलट दिवसेंदिवस भिकार जास्त लोटत आहे. धान्याचा पुरवठा पाहिजे तितका नाहीं; ह्यामुळें चोहोंकडे हांकाहांक चालली आहे. **भाऊसाहेबांनीं** तरी ह्यावेळेस असली उदासीनवृत्ति धरावयाची नव्हती. परंतु त्यांना बोलावें कोणीं? ते काय म्हणतात 'अशी जर सरकारांतून दुष्काळपीडितांस मदत पोंहचली, तर भिकार जास्त वाढेल. रयत काम न करितां अन्नछत्रांत येईल. म्हणून ह्या प्रसंगीं सरकारांतून निदान सध्यां तरी मदत नसावी.' परंतु माझ्या मतीस त्यांचें म्हणणें बिलकूल पसंद पडत नाहीं. अन्नावांचून रयतेचे झालेले हाल आपल्याच्यानें नाहीं बोवा पाहवणार. एकंदरीनें **भाऊसाहेबांच्या** पूर्वीच्या व सध्यांच्या बोलण्यांत बरीच तफावत दिसते. त्यांच्या मनांत सरकारांतून व्यय होऊं नये, असें आहेसें वाटतें. पण तसें आपल्याच्यानें कसें करवेल? जर रयतच पटापट मरूं लागली, आणि तिच्या बचावार्थ सरकारानें कांहीं

परिश्रम केले नाहींत, तर नुसत्या ओसाड प्रदेशाला काय जाळायाचें आहे? प्रजा आहे तर राज्य आहे. प्रजेचें जें सुख तेंच राजाचें, असें जर धरून चाललें, तरच राजाप्रजांचे इहलोकीं व परत्र सर्वप्रकारें हित आहे. पण असले विचार **भाऊसाहेबांच्या** चित्तांत वागत नाहींत, त्यामुळें चित्ताला अतिशय खेद होतो. आणि तशांत आमचें हें करणें **भाऊसाहेबांस** न रुचल्यास कदाचित् उभयतांत वैमनस्य वाढून प्रजेला त्रास होईल कीं काय, अशीही भीति वाटते. होतां होईतों प्रजेला दुःख होऊं नये. अशी तरतूद ठेवण्याचा माझा दृढनिश्चय झाला आहे. मग तसें केल्यानें माझें सर्वथैव नुकसान झाल्यास त्याची मी विशेष परवा बाळगीत नाहीं.

**शास्त्री**—**केशवरावजी**, हे आपले हेतू फार स्तुत्य आहेत. आपण जर प्रजेचा पक्ष यावेळेस न उचलतां त्यांना दुःखाच्या खाईत लोटून दिलें, तर तिनें बिचारीनें कोणाकडे पाहावें बरें? असाच न डगमगतां आपला क्रम चालूं द्या. श्री**शंकर**कृपेनें आपल्यास सर्वथैव यश येईल. **आनंदराव** महाराजांनीं ज्या अर्थी आपल्यास थोडीबहुत मुभा दिली आहे, त्याअर्थी ऐन आणीबाणीच्या वेळीं आपण आपल्या जिम्यावर रयतेस सर्वप्रकारें मदत पोंहचवाच. कदाचित तसें केल्यानें मोठी रकम खर्ची पडून इतराजी होण्याचा संभव आहे, परंतु अन्नदान करून सहस्रावधि प्राण्यांस जीवदान जर मिळत आहे, व तेणेंकरून **सेनाखासखेलांस** जर सुकृतप्राप्ति होत आहे, तर तसल्या इतराजीला न जुमानतां आपलें करणें अव्याहत चालूं द्या. मग कोणास त्यापासून विषम वाटलें तरी हरकत नाहीं. अंतीं त्यापासून आपलें सर्वथैव कल्याण आहे. कदाचित गैरमर्जी झाल्यास आपण वैभवादि ऐहिक सुखांस अंतराल; परंतु त्याबद्दल आपल्यास यत्किंचितही खेद वाटण्याचें प्रयोजन नाहीं. कारण बोलून चालूनच तीं सुखें नश्वर, आणि तशांत जर तीं कर्तव्यास जागल्यामुळें नाश पावतील, तर एकप्रकारें मनास संतोषच होईल. कुमार्गानें जाणें फार सुखकर असतें, व सद्यःसुखावहही असतें, परंतु परिणामीं भयंकर व घोर नरकाप्रत नेणारें असतें. तशी कांहीं सदाचरणाची गोष्ट नाहीं. कदाचित त्यामुळें हीं नश्वर सुखें मिळणार नाहींत, परंतु सर्व सुखाचें माहेर जी शांति ती तरी सदाचरणाला अगदीं लागून असते. म्हणून कांहीं होवो, आपण असेंच क्षुधार्तांस अन्नदान करीत जा. पण इतक्यांतच धान्याचा संचय कमी व्हावा, त्याचें मला बरेंच आश्चर्य वाटतें.

**पंडित**—वास्तविक म्हणाल, तर शहरांत जागोजाग धान्यांचीं कोठारें पुष्कळ भरलेलीं आहेत. शिवाय **बंगाल, जबलपूर** व **माळवा** या प्रांतांतून इकडे धान्य येत आहेच. परंतु येथल्या दाणेकऱ्यांच्या महाजनानें कट करून धान्याचा पुरवठा थांबविला आहे, त्यामुळें हा जास्त त्रास होत आहे. मी एकदोन दिवसांत **भाऊसाहेबांच्या** मसलतीप्रमाणें हें सर्व कटाचें बंड मोडून काढितों; म्हणजे बरीच हाकाहाक कमी होईल.

**शास्त्री**—काय दुष्ट हे व्यापारी आहेत तरी? इकडे मनुष्य अन्नावांचून भुकेनें

उपाशीं मरत आहेत, आणि हे कट करून धारण वाढवितात. जसजसा दुष्काळ कडक होत जातो, तसतसा त्यांना दुष्काळ हे नफ्याचें कलम वाटून अत्यानंद होतो. असल्या चांडाळांना यथायोग्य शासन झालें पाहिजे.

**पंडित**—सध्यां फारसें शासनाच्या नादीं न लागतां मी त्यांना **भाऊसाहेबांक**डून अशी जरब घालविणार कीं, जर तुम्ही कट मोडून ७ शेरांची धारण ठेवणार नाहीं, तर सरकारांत तुमचीं दुकानें व कोठ्या जप्त केलीं जातील. त्या जरबीनें बहुतकरून कार्यभाग सिद्धीस जाईल असें वाटतें. तितक्यांत पाहावें आणखी काय होतें तें. **शास्त्रीबोवा**, आपण मला धीर दिला,त्यामुळें माझ्या मनाला फारच आल्हाद वाटतो. कारण आपल्यासारख्या सदसद् जाणणाऱ्यांकडून एकाद्या आचरणाविषयीं संमति मिळाली, म्हणजे तें आचरण अव्याहत चालविण्याविषयीं यत्किंचितही शंका राहत नाहीं. बरें आतां वेळही बरीच झाली, तर आपली रजा घेतों; उदईक मात्र अगत्य येणें. ( पानसुपारी घेऊन ) बरें येतों नमस्कार.

त्या संभाषणावरून दुष्काळाचें स्वरूप बरेंच लक्षांत येईल. **गुजराते**सारख्या सुपीक प्रदेशांत जीवसंहारी दुष्काळानें आपलें ठाणें बसवावें, म्हणजे एक चमत्कार म्हणावयाचा. एकादे वर्षी अवर्षण पडल्यास त्या प्रदेशांत इटकूनच काळाचें उग्रस्वरूप रयतेच्या नजरेस पडतें असें नाहीं. परंतु त्यावर्षी टोळधाड, कडक उन्हाळा व अवर्षण त्या तिन्ही कारणांच्या मिलाफानें दुष्काळानें प्रथमत: त्या प्रांतांत फक्त कायतें डोकावलें. पुढें त्याचा रिघाव झाला मात्र; तों त्यानें लागलीच सर्व प्रदेशभर आपलें अकराळविकराळ शरीर पसरून सांपडेल तेथें मनुष्यादि प्राण्यांस आपल्या कंटकचित स्थूल देहानेंच जणू गतासु केलें.

केवळ त्या तिन्ही कारणांच्या संयोगानेंच म्हणजे असल्या सुपीक प्रदेशांत दुष्काळाला इतकी बळकटी आली नसती. परंतु म्हणतातना **आकाबाईच्या घरीं विप्र सुदामा याचना करी.** त्या वेळीं तशी स्थिति झाली होती. नेहमींच्या गुणाला न विसरून **मारवाड** देशानें गेलीं दोन सालें पावसाविरहीत काढिलीं होतीं. परंतु तेवढ्यानेंच त्या हतभाग्य देशाची दुःखावधि झाली नाहीं. पावसानें **मारवाडावर** अवकृपा केली, तर निदान आपल्यास तरी तसें करणें योग्य नव्हे, अशी परोपकारबुद्धि मनांत आणून टोळांनीं तीं दोन्ही वर्षें त्या देशाला आपली अभिनंदनीय भेट दिल्यावांचून जाऊं दिलीं नाहींत. त्यामुळें त्या देशांतील लोकांवर मोठाच गहजब उडाला. पूर्तें पाणी नाहीं तर नाहीं, पण वृक्षादि उपजीविकेची साधनें तींही शलभप्रसादानें अंतरून, ते '**नच उपाय दुजा**' म्हणून स्वर्गमुमुक्षु झाले; व तेणेंकरून शलभांनीं स्वर्ग दाखविला म्हणून त्यांचे गुणानुवाद वर्णन करीत पुष्कळांनीं आपले जड देह इहलोकीं ठेविले, व कित्येकांनीं पृथ्वीलोकाचीच वसती बरी असा भाव धरून **गुजराते**कडे चाल केली. परंतु टोळ किती निरीच्छ साधू? कदाचित् **मरुदेशस्थ गुजरात** प्रांतांत येऊन अलौकिक स्वर्गवासास अंतरतील, तर तसें कदापिही होऊं

नये, म्हणून त्यांनीं गुर्जरदेशीयांवरही आपला वरदहस्त ठेविला, व तेणेंकरून **मरुस्थ** व **गुर्जरस्थ** पूतजनांना वैकुंठाचा मार्ग खुला करून दिला.

ह्याप्रमाणें दुष्काळानें काबीज केलेल्या **मारवाड** देशांतून मारवाड्यांना पिटाळून लावल्यामुळें जणू मानवदेह धरून टोळांच्या झुंडीच्याझुंडी **गुजरातेवर** गतवर्षापासून उतरूं लागल्या. त्यामुळें ह्या मारवाड्यांचें उदरपोषण करण्याचें गुर्जरस्थांवरच पडलें. **दुकाळांत तेरावा महिना**, ह्या म्हणीप्रमाणें अवर्षणापूर्वीच मारवाडी भिकाऱ्यांच्या आगमनामुळें जी धारण चणचणीत वाटत होती, तीच पुढें अवर्षणामुळें वाढून लोकांना दुष्काळाचीं दुःखें भोगावीं लागलीं. वेळेवर पाऊस पडला नाहीं, म्हणून कदाचित् दुष्काळ पडेल ह्या भीतीनें जो तो धान्याचा संग्रह करून ठेवूं लागला, व पुढें व्यापाऱ्यांनीं नफ्याच्या लोभानें लोकांच्या गरजेला न पुरे इतकें धान्य बाजारांत विकत ठेवण्याचा प्रघात पाडून चोहोंकडे धान्याची चणचण केली. इतकें महाग धान्य विकत घेण्याची ज्या गरीब लोकांमध्यें ऐपत नव्हती, ते मात्र व्यापाऱ्यांच्या असल्या निंद्य व आपलपोटे वर्तनामुळें क्षुधेच्या असह्य वेदना भोगूं लागले. ह्या सर्व गोष्टींनीं धान्याचा पुरवठा असूनही दुष्काळ ज्यास्त कडकसा झाला. व्यापाऱ्यांचा कट लौकरच मोडला गेला, म्हणून बरें झालें; नाहीं तर यमानें सर्वथैव ह्या प्रांतामध्यें जय मिळविला असता, असें म्हणायाला कांहीं चिंता नाहीं.

प्रथम जेव्हां दुष्काळानें आपलें सौम्य स्वरूप दाखविलें होतें, त्या वेळेस धारण ७-८ शेरांपर्यंत होती. परंतु पुढें जेव्हां आपलें अति उग्र स्वरूप त्यानें प्रकट केलें, तेव्हां तीच ४ शेरांपर्यंत चढली. अशा प्रसंगीं गरीब लोकांचे हाल काय काय झाले, त्यांचें केवळ दिग्दर्शन हृदयद्रावक असतें, तर ज्यांनीं स्वतः आपण सुखामध्यें असून ते हाल पाहिले असतील, त्यांच्या मनाची काय बरें स्थिति होईल? कधींही ज्यांना दुपारची ददात माहीत नाहीं, त्यांना देखील ऐन दुष्काळाच्या वेळेविषयीं मनन केल्यास पराकाष्ठेचें वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. हर हर ज्या प्रसंगाची केवळ कल्पना हृदयद्विधा करून टाकिते, त्याचा प्रत्यक्ष अनुभव किती बरें असह्य होईल? आतां एवढें खरें आहे कीं, केवळ मनन केल्यानें निकृष्ठ स्थिति जितकी भयप्रद वाटते, तितकी कांहीं तिचा अनुभव घेणाऱ्यांना ती कदाचित् वाटत नसेल; तथापि त्या स्थितींतील नानाप्रकारच्या दुःखांचीं साधनें आपला धर्म बजाविल्याखेरीज राहतील काय?

**'नास्तिक्षुधासमोव्याधिः'** असें जें म्हटलें आहे, त्यांत तिलप्राय देखील संशय घेण्यासारखें नाहीं. वेळेवर जर मनुष्याला खायाला मिळालें नाहीं, तर त्याच्या मनाची काय चमत्कारिक स्थिति होते? त्याला कांहीं सुचेनासें होतें. त्याच्या सर्व इंद्रियांचा व्यापार शिथिल पडतो, व त्याच्या अंगभर एका प्रकारचा आळस पसरतो. अशी जर एका वेळची गोष्ट, तर सतत पुष्कळ दिवस कधींही मनमुराद अन्न मिळालें नाहीं, अशा मनुष्याची काय दशा होईल?

अन्नमयाःप्राणाः आणि जर अन्नाचाच अभाव, तर प्राण तरी कोठून राहतील? अस्थि, रक्त, मांस, मज्जा इत्यादींनीं युक्त असा जो देहपिंड तो अन्नामुळें बनला जातो, वाढला जातो, व आपलें प्राणरक्षणाचें काम बजावितो. परंतु देहाच्या अस्तित्वाचें जें मुख्य साधन अन्न तेंच नाहीं, तर देह कोठून पूर्ण दशेंत राहील; आणि निरनिराळ्या इंद्रियांच्या अप्रतिहत व्यापारांवर अवलंबून असणारा जो जीव–जर तेच व्यापार देहाच्या क्षीणतेमुळें स्तब्ध पडले तर–तो तरी कोठून राहील? अन्नाच्या दुर्भिक्षामुळें अशी जर देहाची व जिवाची अवस्था, तर मग जेथें अन्नाचा अभाव असून जलाचाही अभाव, तेथें देहाच्या दुःखाची सीमाच झाली म्हणावयाची. तृषेचाही प्रकार थोडाबहुत क्षुधेसारखाच आहे. आणि क्षुधा व तृषा ह्यांनीं जो पीडित त्यास काय अनिर्वचनीय क्लेश सोसावे लागत असतील? बरें, तशांत तृषा उद्दिप्त करणारे ग्रीष्म ऋतूंतील दिवस असले, म्हणजे तर हाल पुसूंच नयेत. वास्तविक ह्या वेळीं ग्रीष्म ऋतु नव्हता, तथापि सूर्याचे प्रचंड किरण ग्रीष्म ऋतूपेक्षांही दुःसह होते.

ह्यां वेळीं चोहोंकडील तळीं, विहिरी, टाकीं वगैरे पाण्याच्या पुरवठ्याचीं कृत्रिम साधनें अगदीं वाळून गेलीं होतीं. नद्या केवळ शुष्क होऊन गेल्या होत्या. एवढी मोठी साबरमती नदी, जिच्या पात्रांत ऐन उन्हाळ्याचे दिवसांतही १५० हात वाहतें पाणी असायाचें, तेथेंच ह्या प्रसंगीं ३० हात देखील पाणी नव्हतें. या नदींत रात्रंदिवस लोकांचे थव्यांचे थवे पाणी घेण्यासाठीं म्हणून सतत येत. नदीच्या रेताळ पात्रांत चोहोंकडे अंतराअंतरांवर लहान लहान कुवे खोदले होते; परंतु जेथें पूर्वी ३ हातांच्या आंतच चांगलें निर्मळ व गोड पाणी लागे, तेथेंच ६-७ हातांशिवाय पाणीच लागत नसे, व तें देखील चांगलें नसून किंचित् खारट असे. या वाहत्या पाण्यांत जीं कांहीं थोडीबहुत अमदाबादेंत गुरें जीव धरून राहिलीं होतीं तीं, व अति कंगाल व कनिष्ठ प्रतीचे भील्ल, वाघरी, कोळी, मारवाडी असे हिंदू लोक पाणी पीत असल्यामुळें, व अतितृषेनें व क्षुधेनें व्याकुळ झालेले असे कित्येकजण धडपडत येऊन तें तसलें नासकें पाणी पिऊन तेथें मरत पडल्यामुळें, तें पाणी बहुतकरून साधारण ऐपतीचे लोक उपयोगांत आणीत नसत. त्यामुळें बहुशः तसल्या कंगाल लोकांचा मारा या वाळवंटांतील कुव्यांवर फार असे. तेथें किती म्हणून धडपड होत असे! जो तो आपल्याला सर्वांच्या अगोदर अति स्वच्छ पाणी मिळावें म्हणून पुढें सरकण्याचा यत्न करी; त्यामुळें असल्या धक्काबुक्कींत कधीं कधीं पुढें विहिरीच्या तोंडाशीं असणारीं माणसें पाठीमागून ढकललीं गेल्यामुळें आंत पडत. बरें, तीं बिचारीं कशीं तरी धडपडत बाहेर निघालीं, तर त्यांना बाकीचे रागावलेले लोक निमुटपणें जाऊं देत नसत. ह्यांनीं मुद्दाम स्नान करण्यासाठीं किंवा दुष्टाव्यानें कुव्यांत उड्या घेतल्या, असा समज करून बाकीचे त्यांना यथास्थित कुंबलून आपला राग शांत करीत. बिचाऱ्या बायकांची त्रेधा कोण म्ह-

णून विचारावी? पुरुषांअगोदर त्यांना कधीं पाणी मिळूं नये. बरें यदाकदाचित् मिळालें व ती विचारी एकटी असली, तर दुसरा एखादा धटिंगण येऊन तिच्याजवळून पाण्यानें भरलेला हंडा हिसकावून घेऊन जाई. पण तिच्या रडण्याकडे कोणीही लक्ष देत नसे. कित्येक घरांतील पुरुष व बायका मिळून पांचपांच सातसात जण असे पाणी आणायाला जात; तथापि त्यांना देखील, घरीं एकदाचें पाणी येऊन पोहोंचलें म्हणजे मिळविली, असें होई.

ज्या घरांत टांकीं होतीं, त्यांत पाणी फारच थोडें उरल्यामुळें त्याचा अगदीं जपून खर्च होई. परंतु तें पाणी कुजट लागे, व आंत किडे वगैरे प्राणी होऊन त्यांपासून शरिरास अपाय होण्याची विशेष भीति असे. ज्या विहिरींचें पाणी खारट, म्हणून ऐन सुवत्तेच्या वेळीं त्यांचा उपसा होत नसे, त्यांचेंच पाणी बिचारे लोक तहान भागविण्यासाठीं म्हणून पटापट धडपडत उड्या टाकून पीत. कसलेंही शेवाळ माजून, पाळलीं पानें पडून, कुजलेलें पाणी असलें तरी तेंही बिचाऱ्या तृषार्तास ऐनप्रसंगीं अमृताप्रमाणें वाटे. चोहोंकडे जलाशयांजवळ सकाळच्या प्रहरीं कांहीं मनुष्यांचे मुडदे दृष्टीस पडत. ही नुसती पाण्याची गोष्ट झाली; परंतु धान्याच्या महर्गतेमुळें साधारण गरीब लोकांची तर धूळधाण झाली.

गरीब बिचारे लोक, कोठून त्यांच्यावर असलें कालचक्र ओढवलें, कोण जाणें! दुष्काळाचें भयंकर स्वरूप **अमदाबादेंत** व जवळच्या खेड्यांत पूर्णपणें दृष्टीस पडत होतें. अवर्षण होण्यापूर्वी शेतकऱ्यांनीं पेरिलेलें खरीपचें बीं वेळेवर पाऊस न पडल्यामुळें जेथच्या तेथें करपून गेलें. साधारणतः शेतकरी वगैरे खालच्या प्रतीच्या लोकांना दुष्काळापासून मनस्वी हाल सोसावे लागतात. वास्तविक सर्व वर्गाच्या लोकांस जे स्वकष्टानें जीवनाचें मुख्य साधन जें धान्य तें तयार करून पुरवितात, त्यांनाच ऐन प्रसंगीं त्याची ददात असावी हा कोण न्याय म्हणावा बरें! हरहर जे अकलुषित अंतःकरणानें केवळ ईश्वरावर हवाला ठेवून आपल्या उपजीविकेच्या साधनाविषयीं सतत घाम काढीत असतात, त्यांना दुष्काळाचे वेळीं दैना व दुःख; आणि जे नानाप्रकारचीं अनन्वित कर्में करून केवळ आपल्या धनाच्या भरावर मान्यतेस पोहोंचतात, त्यांना दुष्काळ असो किंवा सुवत्ता असो दररोज सुखप्राप्ति—तर अशा अन्यायमूलक उद्वेगकारिणी स्थितीस काय नांव द्यावें? ‘ ईश्वरा, तूं दयाळू आहेस, न्यायी आहेस ’ असें जे सतत म्हणतात, त्यांची ईश्वरानें आपली दया व न्याय यांविषयीं अशीच कां खात्री करून द्यावी! हरहर, ज्यांच्या अंतःकरणाचा सरळपणा व साधेपणा पाहून उच्च प्रतीच्या लोकांनीं ज्यांचें अनुकरणच करावें, अशी ज्यांची योग्यता, त्यांच्यावरच पुण्याचरणाबद्दलच कीं काय सैतान कोपाविष्ठ होऊन दुष्काळाच्या मिषानें असला गहजब उडवितो! जे दुसऱ्यांचें दुःख पाहून खऱ्या कळवळ्यानें त्याच्या शमनार्थ उपाय करणारे, जे सदसद्विचाराच्या विवेचनाविषयीं अनभिज्ञ असूनही केवळ

नैसर्गिक प्रवृत्तीमुळें अन्यायास विषाप्रमाणें भिऊन वागणारे, असे जे गांवढळ कुणवी लोक त्यांना दुष्काळाचें प्रायश्चित्त; व जे त्यांच्याच जीवावर वैभवास चढलेले नगरवासी, पापपक्ष मोठ्या अहंतेनें स्वीकारणारे, अशांना फार झालें तर थोडीशी यातायात—'ईश्वरा, असाच का तुझ्या येथें न्याय मिळतो? जर पापाचरणाविषयीं दुष्काळरूप दंड आहे, तर जे निष्पापी त्यांवर कां वरें भडिमार असावा; व जे सन्मार्गास आंचवलेले त्यांना त्या दंडापासून निदान तितके क्लेश कां होऊं नयेत? किंवा आमच्याच अल्पमति. त्यामुळें आम्हांला तुझ्या अतर्क्य महिम्याचा व न्यायीपणाचा पार लागत नाहीं.' अशा प्रकारचे उद्गार निघणें साहजिक होय. असो.

बिचाऱ्या कुणब्यांजवळ पेरणीच्या वेळीं फार झाला तर ३।४ महिन्यांचा सांठा असतो. ही झाली शेतकऱ्यांची गोष्ट. पण रोजच्या मजुरीवर आपलाच चरितार्थ चालविणारे असे जे लोक त्यांच्याजवळ तसा धान्याचा संचय कोठून असणार? आणि आजचा दिवस गेला, उद्यांचें उद्यां हरि आहे, असें म्हणणाऱ्या गरीब लोकांची संख्या पुष्कळ. कसाही दुष्काळ आला, तरी ज्यांना फारशी ददात नाहीं, अशा मध्यम व उच्च प्रतीच्या लोकांची संख्या वरच्या गरीब लोकांच्या मानानें पुष्कळ कमी. अशी जर वास्तविक स्थिति असते, तर दुष्काळापासून किती मनुष्यसंख्येला क्लेश सोसावे लागतात, ह्याचें कांहीं अनुमान बांधतां येईल. शेतकऱ्यांचा तो तीन महिन्यांचा सांठा किती दिवस टिकणार? त्यांपैकीं कित्येकांनीं द्रव्यलोभानें दूरवर विचार न करितां आपल्या गांवाच्या वाण्यांना त्या सांठ्यापैकीं बराच भाग ज्यास्त किंमत येत आहे म्हणून विकून टाकिला. वाणी बोलून चालून व्यापारी. साधारण अवर्षणामुळें दुष्काळ बराच कडक पडेल, असा त्यांनीं तर्क बांधून पुष्कळ धान्य संग्रहीं ठेविण्याचें योजिलें; व त्याप्रमाणें त्यांनीं आसपास जितकें मिळेल तितकें धान्य विकत घेऊन कोठारांत भरून ठेविलें, व परदेशाहूनही त्यांनीं पुष्कळ मागविलें. वाण्यांचेंच अनुकरण साधारणतः श्रीमंत लोकांनीं केलें. त्यामुळें झालें काय कीं, धान्याचा सांठा बहुतेक व्यापारी व श्रीमंत लोकांमध्यें राहिला गेला; व मध्यम व खालच्या प्रतीच्या लोकांजवळ धान्याची शिल्लक राहिली नाहीं. ह्यामुळें वसंतऋतु संपला नाहीं, तोंच धारण फार महागली, व खालच्या प्रतीच्या लोकांना प्रांतांत धान्य असूनही दुष्काळ भासूं लागला. व्यापारी लोकांनीं पाहिजे तसा नफा काढण्याची ही संधि मुळींच घालविली नाहीं, व त्यामुळें मध्यम प्रतीच्या लोकांनाही बरेच हाल सोसावे लागले. गरीब लोकांची दशादशा झाली. बिचाऱ्यांजवळ धान्य विकत घेण्याला अडका राहिला नाहीं. जोंपर्यंत आपल्या घरांत मोडून खाण्यासारखें कांहीं होतें तें सर्व मोडून, त्यांनीं, जो भाव सांगतील तो कबूल करून, धान्य विकत घेऊन आपला चरितार्थ चालविला; परंतु त्यांच्यानें याप्रमाणें एक महिनाभर कांहीं दिवस काढवले नाहींत. शेतकऱ्यांनीं आपलीं शेतें व झोंपड्या गहाण टाकिलीं; परंतु त्यांना त्याबद्दल पैसे तरी पुष्कळ मिळाले का? छेः तसा

प्रकार मुळींच झाला नाहीं. एक तर, जो तो आपापल्या जमिनी गहाण टाकूं लागला, त्यामुळें जमिनीचा भाव अतिशयच उतरला. दुसरें, अडाणी शेतकऱ्यांना प्रसंग पडला खाष्ट वाणगटांशीं, त्यामुळें खऱ्या बाजारभावापेक्षांही अतिस्वस्त रीतीनें जमिनी घरें वगैरे गहाण पडलीं. ही जर स्थावर वस्तूंची गोष्ट, तर मग गुरांसारख्या जंगम वस्तूंचा काय भाव राहणार? कित्येक ठिकाणीं मालकांनीं पोषण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें आपलीं गुरें सोडून दिलीं. त्यामुळें तीं चोहोंकडे रानोमाळ हिंडत; पण जेथें मनुष्यांना खाणें मिळण्याची भ्रांत, तेथें गरीब गुरांना कोठून चारापाणी मिळणार? त्यामुळें अतिशय गुरें प्राणास मुकलीं.

वर्षाऋतु संपल्यावर वर सांगितल्याप्रमाणें दाणेवाल्यांनीं **अमदाबादें**त कट केला, त्यामुळें एक दोन दिवस तर शहरभर एकच आकांत. परदेशाहून आलेलें भिकार होतेंच; आणि धान्याचा सांठा संपून व गुरेंढोरें जमीनजुमला वगैरे सर्व गहाण पडून आसपासच्या खेड्यांतील शेतकरी लोक देखील शहरांत आपला उदरनिर्वाह चालेल ह्या आशेनें आले होते; शिवाय शहरांतील मोलमजुरी करून पोट भरणारे लोक होतेच. ह्यामुळें शहरांत अतिशय भिकार वाढलें, ह्यांना कांहीं मदत करावी, ह्या हेतूनें **सेनाखासखेलांनीं** वरींच अन्नछत्रें घातलीं होतीं, व कित्येक ठिकाणीं मजुरी करणाऱ्या लोकांना कामावरही लाविलें. त्यामुळें पुष्कळ लोकांना आपला कसा तरी गुजारा करितां आला. परंतु आकाशच फाटल्यावर कोठवर ठिगळ लावितां येईल? पुढें वाण्याचा कट हरदू सुभ्यांनीं मोडून काढिला, व आपल्या संमतीनें धान्याची धारण ठेवावी, असा दाणेकऱ्या महाजनांस हुकूम केला. ह्या हुकुमामुळें साधारण मध्यम स्थितीच्या लोकांस बरेंच सुख झालें; परंतु गरीब लोकांस जवळ विकत घेण्यासाठीं पैसा नसल्यामुळें ह्यापासून तादृश अर्थ मुळींच झाला नाहीं. गरीब लोकांचा सर्व भार पडला सरकारांवर व उदार श्रीमंत लोकांवर. **श्रीमंतां**कडून व **गायकवाडीं**तून तशी मदतही झाली, व श्रीमंत लोकांनींही आपल्याकडून कमतरता केली नाहीं. परंतु इतकेंही करून लोकांचे हाल कांहीं कमी झाले नाहींत. सर्व गरीब लोकांना कांहीं अन्न मिळत नसे. त्यामुळें कित्येकांना अतिशय अपेष्टा भोगावी लागे. सकाळीं अन्नछत्रांतून प्रथमतः खिचडी वाटीत. परंतु येथें भिकाऱ्यांची इतकी गर्दी उसळे कीं, कारकुनांना जवळ शिपाई घेतल्याखेरीज ती वाटतांच येत नसे. पोटभर अन्न बरेच दिवस न मिळाल्यामुळें जो तो अन्नछत्राच्या दरवाज्यापाशीं प्रथम जाण्याचा प्रयत्न करी; त्यामुळें कित्येक अशक्त लोक व लहान लहान मुलें चेंगरून जात, व कित्येक प्राणांसही मुकत. बरें, इतकी यातायात करून खिचडी मिळविली, तर ती पोटांत गेली म्हणजे त्याची; नाहीं तर मध्येंच दुसरा दांडगा मनुष्य येऊन ती त्याजपासून हिसकावून घेई, किंवा ती खालीं पाडून टाकी. नंतर बरेच लोक असें खालीं पडलेलें धान्य वांकून टिपून तसेंच कच्चें खात. कित्येकांना खिचडी न मिळाल्यामुळें ते गल्लोगल्लीं घरांशीं मोठ्यानें विवळून अन्नदान मागत फिरत. एकाद्या घरांतून जर एकाद्या

भिकाऱ्याला कांहीं थोडेंसें अन्न मिळालें, कीं लागलीच दुसरे कांहीं भिकारी येऊन तेथें गलबला करीत, व दाराशीं अगदीं रात्र होईपर्यंत कांहीं मिळेल ह्या आशेनें पडून राहत. कित्येक तर भांडीं घासून धुवून आलेल्या पाण्यांतील शितें, आमसोलें खावयाला सोडीत नसत. कधीं कधीं असेंही होई कीं, एकाद्या भिकाऱ्यावर कोणी गृहस्थानें दया करून घरांत घेऊन यथास्थित त्याला खाऊं घालावें; पण लागलीच भिकाऱ्यांची झुंड येऊन तेथें दारांशीं धरणें देऊन बसे, व तो भिकारी बाहेर पडला म्हणजे त्याला सर्वजण घेरून यथास्थित कुंवलीत; त्यामुळें व स्वतःच्या अधाशीपणामुळें तो सर्व खाल्लेलें ओके, तर त्या ओकून पडलेल्यांतील सुद्धां शितें वेचून खावयास ते मागेंपुढें पाहत नसत. जठराग्नि एकदां प्रदीप्त झाल्यावर तो मनुष्याहातीं काय करविणार नाहीं? गुरेंसुद्धां कधीं भक्षण करणार नाहींत, अशा ज्या वनस्पति त्या देखील क्षुधाशांत्यर्थ दुष्काळपीडितांनीं सोडल्या नाहींत. बाभळीचीं काय, चिंचेचीं काय, कोणत्याही झाडाचीं पानें मनुष्यांनीं त्यावेळीं कुरतुडून खाल्लीं. कित्येक ठिकाणीं फाटक्या जोड्यांचें चामडें सुद्धां भुकेनें व्याकुळ होऊन चघळीत असत. कांहीं लोकांनीं तर मढीं सुद्धां खाण्याचें सोडलें नाहीं. अशा प्रसंगीं कसची आई, नी कसचा बाप, व कसचा मुलगा? प्रसंग पडल्यास मुलें विका, करा पैसे; कोणीकडून तरी भरा पोट. स्त्रियांनीं केवळ पोट जाळण्यासाठीं आपला देहविक्रय मांडला होता. तशांत मारवाडच्या भिकारानें तर फारच ताळ सोडिला. सरकारांतून इतकी मदत होत असतां मारवाड्यांनीं म्हणून कांहीं काम करूं नये. तेणेंकरून सरकाराला ह्यांचा विनाकारण ज्यास्त बोजा झाला. अंगमेहनत करून पोट भरण्याचें साधन असतांना ह्या मारवाड्यांनीं भीक मागावी, त्यांच्या बायकांनीं ताळ सोडून आचरण करावें, व सरतेशेवटीं कांहीं खायास न मिळाल्यामुळें आपल्यासारख्याच द्वाड लोकांना मदतीस घेऊन शहरांत चोऱ्या कराव्या, चांगल्या लोकांस लुटावें, खून करावे, व गुरांचें प्रसंगवशात् मनुष्यांचेंही मांस खायाला कमी करूं नये.

फक्त दुष्काळच कायतो एकटा आला, असें कांहीं नव्हतें. लोकांच्या दुराचरणामुळें दुष्काळाबरोबर दुसऱ्याही भयंकर प्राणघाती व्याधी आल्या. स्त्रियांच्या देहविक्रयामुळें त्यांच्या सर्व अंगभर व्रण पडून त्या कुजून प्राणास मुकत. पाहिजे त्या वनस्पतींचा पाला खाल्ल्यामुळें व नासकें पाणी प्याल्यामुळें शरिरास अपाय होऊन हातांपायांस सूज येऊन बरेच लोक गतासु झाले. कोणाचा धरबंद नसल्यामुळें अनाचार जास्त वाढला. प्रत्यक्ष आया आपल्या मुलांचा क्रय करायाला मागें घेत नसत. ह्यामुळें ही संधि विषयांध पशूंनीं जाऊं दिली नाहीं. त्यांनीं कित्येक सुरूप स्त्रियांची लाज हिरावून केवळ क्षणिक सुखासाठीं आपल्या व त्यांच्या जीवांची व देहांची उभयत्र राखरांगोळी केली. कित्येक आयांनीं आपल्या मुली कसबिणीस विकल्या; व काय सांगावें कित्येकांनीं तर आपलें नुकतें प्रसवलेलें बालकही भक्षण करण्यास सोडलें नाहीं.

हाय हाय, अशा प्रसंगाचें वर्णन करणें म्हणजे हृदयाला कुठाराचा घाय घालण्याप्रमाणें आहे. जेथें सर्व महाभूतें क्षोभलीं, तेथें गरीब प्राण्यांचें कोण रक्षण करणार? जिवंतपणीं आपल्या पापांचें प्रायश्चित्तच यमानें त्या वेळीं त्या हतभाग्य लोकांना भोगवायाला लाविलें कीं काय कोण जाणें! दुष्काळानें मरण्यापेक्षां अपघातमृत्यु बरा; कारण अपघातानें देहापासून जीवाची जलदी सुटका होऊन त्याला फारशा यातना सोसाव्या लागत नाहींत. परंतु क्षुधेनें व्याकुळ होऊन झिजत जाऊन 'कोणी मला तुकडा द्या हो' अशी प्रत्येकाजवळ याचना करीत हालअपेष्टेंत प्राणोत्क्रमण झालें, म्हणजे याहून कांहीं **गरुडपुराणां**त सांगितलेल्या नरकयातना जास्त असतील, असें मुळींच नाहीं. '**तूं पोटासाठीं करि खटपट भलतिसी**' अशी जर साधारण भरभराटीच्या काळांत मनुष्याची स्थिति, तर असल्या महान् शत्रूच्या शमनार्थ दुष्काळांत मनुष्याला किती खटपटी कराव्या लागतील? बरें, त्या करूनही शत्रूचें दमन होत नाहीं, व शेवटीं त्याला आपला देहही शत्रूसाठीं सोडावा लागतो. त्या वेळची मनुष्याची स्थिति फारच चमत्कारीक असते. एकतर स्वोदरांत जठराग्नि भडकलेला असतो, दुसरें सर्व अंगभर मांद्य, तिसरें अंतःकरणाच्या व्यग्र वृत्ती, चौथें बाह्य शितोष्णांपासून देहास त्रास; अशा स्थितींत प्राण देहाला कंटाळून कसा जात नाहीं, हेंच मोठें आश्चर्य! ह्या स्थितीविषयीं विचार केला म्हणजे अन्नदानासारखें दान नाहीं, असा जो आपल्या पूर्वजांचा समज होता, तो किती सत्य आहे, हें कळून येईल.

अशा भयंकर प्रसंगीं बहुतेक प्राणिवर्गास अतोनात यातना सोसाव्या लागल्या. परंतु **अमदाबाद** शहरीं श्रावक लोकांच्या अगदीं प्रीतींतलीं व त्यांच्या दानांचीं मुख्य पात्रें जीं ओंगळ कुत्रीं त्यांना मात्र हा भयंकर काळ फार मानवला. रस्त्यांतून गुरांचीं व मनुष्यांचीं मढीं पडलीं न पडलीं कीं, कुत्र्यांनीं केलीच चाल. नंतर नंतर तर हीं इतकीं माजलीं होतीं कीं, मनुष्य मरणोन्मुख पडतांच त्यांनीं त्याजवर तुटून पडावें, व सरकारांतील मनुष्यें प्रेताची विल्हेवाट लावण्याकरितां जों येत, त्यापूर्वींच त्याच्या बहुतेक भागाचा फन्ना करीत. परंतु या अभक्ष्यभक्षणाचा परिणाम फार शोचनीय झाला, कारण कित्येक कुजून मेलेल्या मनुष्यांचीं मढीं ह्यांनीं खाल्ल्यामुळें पुढें ह्यांपैकीं बरींच मेलीं, व कित्येक पिसाळून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर जात, तरीही श्रावक लोकांनीं ह्यांना कोणी मारूं लागल्यास त्याला बंदी करावी.

खेड्यांतील गरीब लोकांचे हाल किती म्हणून सांगावेत? शहराभोंवतीं जागोजाग ह्यांचे थवेच्या थवे रस्त्यांच्या बाजूनें झाडाखालीं बसलेले आढळत. कित्येक क्षुधेनें अगदीं कासावीस झालेले, कित्येक व्याधिग्रस्त व कित्येक मृतप्राय होऊन पडलेले होते. अंगावर बहुतेक चिंध्या असलेले, केवळ हाडांचा पिंजरा राहिलेले, भीक मागण्याची सुद्धां अंगांत शक्ती नसलेले, असे ते दीन लोक सर्वतोपरि हतभाग्य होते. पुष्कळांच्या अंगावर चिंध्या देखील नव्हत्या. पुरुष, बायका, मुलें सर्वांचे घोळके ठिकठिकाणीं एकत्र असत. दिवसां सूर्याच्या कडक तापापासून झाडांच्या केवळ पर्णहीन शाखा राहिल्यामुळें त्यांचें रक्षण होत नसे, व रात्रीं

निजावयास जमीन व पांघरावयास आकाश असे. त्यामुळें वारा लागून कित्येकांचीं अंगें धरलीं जात. दुष्काळाच्या अगदीं प्रथमतः ह्या लोकांनीं आपल्यास मदत व्हावी, एतदर्थ फार दंगा केला होता; परंतु २।३ महिने लोटले नाहींत तोंच त्यांच्यामध्यें शक्ति न राहिल्यामुळें अतिशय विरक्तता आली होती. विचारे करतील काय? ओरडतां येईल तर ओरडतील. बोलण्याची शक्ति नाहीं, चालण्याचें तर नांवच नको, असे ते डोळे खोल गेलेले, हातापायांच्या नळ्या झालेले **सुदामरूप कृष्ण**भेटीच्या आशेनें वैकुंठाकडे धांव घेऊं लागले. भगवंताच्या कृपेनें ह्यांना साधुत्व व सायुज्य अल्पकाळांत प्राप्त झालें. कारण सर्व वस्तूंविषयीं ह्यांची नंतर इतकी कांहीं उदासीनवृत्ति झाली होती कीं, हे परमहंसास देखील मागें सारीत. तेव्हां असल्या महान् साधूंना सायुज्यप्राप्ति होऊं नये, म्हणजे प्रभूच्या घरीं न्याय नाहीं असें झालें असतें.

हे मुक्त झालेच होते; कारण **'आपपर जया नाहीं चैतन्य जैसें'** अशी ह्यांची प्रारंभीं स्थिति होतीच, व नंतर **'कहांकी मात पिता सुत वनिता'** हें खरें वाटून तसें ह्यांनीं आचरणही ठेविलें. सर्वसंगपरित्याग करून दिगंबर होऊन वायु प्राशन करीत, त्यांनीं, **इंद्रानें** पर्जन्य पाठविला नाहीं म्हणूनच काय, त्याचें पद घेण्यासाठीं असलें खडतर तप चालविलें. कलियुगांत यज्ञयागादि होत नसल्याकारणानें **अग्नि**देवता कोणीकडेही थारा नसल्यामुळें जगतांत भ्रमण करीत होती, तीस ह्या उत्तम परोपकारी साधूंनीं आपल्या जठरांत ठाव दिला. देण्याचें सामर्थ्य असून **शिबी**राजानें कपोतरक्षणार्थ आपलें मांस श्येन पक्षास दिलें, परंतु हे परम पवित्र लोक तपासाठीं स्वदेहदंडन करीत असतां, केवळ काळापासून श्वानादि हिंस्र पशूंस वांचविण्यासाठींच, आपले देह अर्पण करीत. ह्यांचें वीतरागत्व सरते शेंवटीं इतक्या पूर्णतेस येऊन पोहोंचलें होतें कीं, आपल्याजवळ अगदीं स्वतःचा मुलगा किंवा आईवाप ह्यांपैकीं कोणी तहानेनें व्याकुळ होऊन प्राणोत्क्रमण करीत आहे, तर त्याबद्दल यत्किंचितही विषाद न मानतां त्यांनीं कांहीं आपला तपोभंग केला नाहीं. ह्यांनाच कायती मुक्तांची पदवी साजे. बरेच दिवस अंगाला पाण्याचा स्पर्शही नसल्यामुळें ह्यांच्या अंगाला अतिशय दुर्गंधी येत असे; तेणेंकरून जणूं भूतदयेनें ह्यांनीं **जिन**मत स्वीकारिलें असें वाटे. ह्यांच्या अस्थिशेषदेहांकडे पाहिलें, म्हणजे जगत्प्रलयानंतर जगदीशापुढें आपल्या कर्माची झडती देण्यासाठीं, म्हणून आपआपल्या थडग्यांतून सर्व यावनी प्रेतें बाहेर निघालीं असें वाटे. ह्यांची दीनावस्था पाहून परकी मनुष्यास तर काय पण प्रत्यक्ष यमासही दया येऊन त्यानें ह्यांचे जीव लौकर नेले नाहींत; परंतु त्या दयेपासून उलट ह्या प्राण्यांना क्लेश मात्र झाले. असे ते व्याधींनीं व्याकुळ झालेले, क्षुधेनें क्षुब्ध झालेले, वेदनांनीं पर्याकुल झालेले प्रत्यक्ष यमासही मित्र मानिते झाले. ज्यांच्या दुःखांच्या पर्वतावरून शोकनद्यांना अतोनात पूर आला, ज्यांचे क्लेश पाहून वृक्षही पर्णाश्रु गाळूं लागले, व ज्यांच्या हृदयतापानेंच नद्या, झरे वगैरे शुष्क झाले–असे हे दुःखार्णवांत बुडणारे प्राणी पाहून त्यांच्या दुःखानें दुःखित होत नाहीं. असा मानव देहधारी कोणी सांपडेल काय!!

# भाग १२.

## दुष्काळ.

### मातृशोक.

मुदतीच्या आंतच **बेचर** आपल्या भावास घेऊन **गिरमथा** मुक्कामाहून परत **निळकंठभाई**च्या येथें आला; व त्यांनीं वचनाप्रमाणें ह्याला घरीं ठेविलें. आपला भाऊ **निळकंठभाई**च्या वशिल्यानें **बेचरानें** **साराभाई**च्या येथें लाविला. पुढें दुष्काळ जसजसा जास्त भासत गेला, तसतसे बाहेर गांवचे लोक शहरांत येऊन दाटी फार झाली. **बेचराचा** बाप, त्याची बायको व दुसरा भाऊ ह्यांनीं घरांतलें सामान विकून बरेच दिवस काढिले; परंतु पुढें कांहीं उपाय चालेना, म्हणून ते बापलेंक शेत व घर ३० रुपयांला गाहाण ठेवून शहरांत पोट भरण्यासाठीं आले. वाटेनें त्यांचे पाण्यावांचून अतिशय हाल झाले. शहरांत **निळकंठभाई**चा शोध करीत असतां कांहीं भामट्यांनीं त्यांना भलत्याच वाटेनें नेऊन एका अडचणीच्या जागीं दिगंबर करून सर्व बुचाडून घेतलें. दोन दिवस पोटांत अन्नपाणी नसल्यामुळें ते अगदीं थकून गेले होते; व अशा स्थितींत **बेचरा**ची भेट ध्यावी ह्याची त्यांना मोठी लाज वाटली. परंतु जोंपर्यंत प्रसंग पडला नाहीं तोंपर्यंत लाज वगैरे असते. पुढें कळ सोसेना म्हणून ते तसेच कण्हत कुंथत तेथून निघाले व शोध करीत चालले. त्यांची अशी दशा पाहून एका बाईनें त्यांना तीन भाकरी दिल्या व एक मळकें चिरगुट शरीर झांकण्यासाठीं दिलें. भाकरी खाऊन पाणी प्याल्यावरोबर त्यांना मोठी हुशारी वाटली. नंतर ते थोड्या वेळानें संध्याकाळच्या सुमारास **निळकंठभाई**च्या येथें येऊन पोंहचले. प्रवासाची दगदग, तशांत वेळेवर पुरतें अन्नपाणी नाहीं, शिवाय ती कंगाल अवस्था, ह्यांमुळें **बेचराला** कांहीं ते प्रथमतः ओळखूं आले नाहींत. परंतु जेंव्हां भावानें विवळून म्हटलें 'भाऊ, अरे हा बावा आला आहे. आम्हांला इतक्यांतच का विसरलास?' तेव्हां स्वर ओळखून **बेचर** लगेच त्यांना आपल्या खोलींत घेऊन गेला, व पराकाष्ठेचें वाईट वाटून म्हणाला 'बावा अशी ही दशा तुमची कशानें झाली?' सर्व हकीगत समजल्यावर **बेचर** मोठा उसासा टाकून म्हणाला 'बरें तुम्ही आतां स्नान करा—मी भाईसाहेबांना कामाविषयीं विचारून काय होतें तें पहातों—हर हर मी येथें येऊन एक महिनाही लोटला नाहीं तों अशी स्थिति व्हावंना? जमीन असून खायाला देखील मिळू नये.'

**निळकंठभाई**ना हा मजकूर समजतांच त्यांना एका प्रकारें संकट वाटलें. कारण ह्यांना जर घरीं ठेवावें तर एक खर्च वाढतो, व दुसरें ह्यांना ठेवल्याचें **बेचराचे**

नातेवाइकांस समजून ते कदाचित् आपल्या घरीं ठाणें द्यावयास येतील–वरें, जर न ठेवावें, तर दुसऱ्या गरीब लोकांना जशी हाल अपेष्टा सोसावी लागते, तशी ह्यांना सोसावी लागेल व विचारा **बेचरा**चा बाप कदाचित् दगावेल–एकंदर त्यांनीं विचार करून दयाळूपणानें त्या दोघांना आपल्या घरीं ठेविलें. ते म्हणाले '**बेचर,** ह्या उपर दुसरा कोणताही मनुष्य तूं आणिलास, तरी येथें त्याला मी राहूं देणार नाहीं बरें.' पण **बेचर** मनांत ओळखून होता कीं, म्हाताऱ्याचा हा कडकपणा केवळ वरकांती आहे.

इतकीं माणसें घरीं असूनही **निळकंठभाईनीं** अन्नदानीं आपला हात आखडून धरिला नव्हता. दररोज सांजसकाळ अंध पंगु अशा पांच भिकाऱ्यांना मनमुक्त जेवूं घालण्याविषयीं **मोहनास** त्यांनीं सक्त ताकीद केली होती. वाटेनें जात असल्यास जवळ नाणें बाळगून अनाथ लोकांना ते वाटीत. ते म्हणत 'कोट्यावधि रुपये खर्च केले तरी जीव हा कांहीं मिळत नसतो. तर असला अमूल्य जीव घासभर अन्नासाठीं जर जातोसें दिसत आहे, तर तेवढें आपण कां देऊं नये. आपण गेल्यानंतर हे पैसे थोडेच 'आपल्याबरोबर यावयाचे आहेत.' कधीं कधीं ते रस्त्यांतल्या दहा पांच पोरक्या मुलांना गोळा करून आपल्यासमक्ष त्यांना जेवूं घालवीत, व त्यांतच आनंद मानीत.

पण ह्यावेळीं सासऱ्याच्या अगदीं विरुद्ध वर्तणूक जावयाची होती. **माणेकभाईनें** कधीं कोणाला उल्हासानें कांहीं दिलें नाहीं–वाटेनें दुष्काळग्रस्त भेटल्यास त्याची किळस आलीसें दाखवून नाक मुरडीत त्यांना हा काठीनें दूर सारी. गोरगोरीब हा श्रीमंत समजून ह्याच्या वाटेंत आडवे पडत, व मोठ्या हृदयद्रावक स्वरानें ह्याची काकुळत करीत. ते म्हणत, 'भाईसाहेब, आम्हांला कांहीं खायाला द्या. आम्ही तुमचे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. (काठी उगारलीसें पाहून) मारा पण तारा. आमच्या ह्या पोटाकडे पहा. ईश्वर तुम्हाला सदैव सुखी ठेवो. तुम्ही आमचे मायबाप. एक घासभर अन्न द्या, मग पाहिजे तें काम सांगा. अहो, या इवलेसें कांहीं खायाला. अरे देवा ह्यांना चांगली बुद्धी देरे–याहो कांहीं पोटाला–जातां–नाहीं आमची करुणा येत–हाय हाय–मला पांच दिवस भाकरीचें दर्शन कींहो नाहीं–काल मी रस्त्यावरची माती कींहो खाल्ली. अहो भाईसाहेब, जरा वळा आणि करा थोडीशी तरी मेहरबानी–अहो माझ्यानें जास्त कींहो बोलवत नाहीं' हर! हर! असले दगडास पाझरविणारे प्रलाप ऐकून कोणाला बरें करुणा येणार नाहीं? पण त्यावेळीं नेहमीं असेच उद्गार ऐकून अशी कांहीं साधारणत: लोकांची वृत्ति झाली होती कीं, त्यांच्या मनावर तसा हृदयंगम प्रकार मुळींच होत नसे. म्हटलेंच आहे '**नित्य मरे त्यास कोण रडे**'–**माणेकभाई**सारखेच कठोर हृदयाचे पुष्कळ होते. **निळकंठभाई**सारखे विष्णूचे अवतार फार थोडे होते. बापाच्या कृतीकडे लक्ष जाऊन **जयलक्ष्मी** होतां होईतों आपल्याकडून नवऱ्यास न जुमानतां गरिबांस भिक्षा घालीत असे. हल्लीं ति-

च्यामध्यें बरीच पालट झालीसें दिसत होतें. तिचा चेहरा कोमजलेला दिसे. एकंदरींत तिची आनंदवृत्ति नव्हती, तथापि ती दररोज नट्टापट्टा करण्यांत बराच वेळ घालवी, व बाहेर नेहमीं हंसतमुख दाखवी. ही गरीबाला पुष्कळ मदत करिते, हें **माणेक भाई**ला मुळीं खपत नसे. परंतु काय असेल तें असो, तो बरेच दिवसांपासून इचे शब्द झेलीत होता, व बहुतकरून हिचें मन दुखवीत नसे.

इकडे **सदू**च्या घरीं फारशी जरी श्रीमंती नव्हती, तथापि आपल्या शक्तीबाहेर सुद्धां कधीं कधीं ती गरिबांना मदत करावयाला भेडीत नसे. बायकांचें अंतःकरण बोलून चालून कोमल. त्या किती जरी वाईट व खाष्ट असल्या, तरीही त्यांना परदुःख पाहवत नाहीं–त्यामुळें स्वाभाविक **जयलक्ष्मी**ची व तशीच पुष्कळ बायकांची अशी परोपकारबुद्धि होती. परंतु **जयलक्ष्मी**ची गोष्ट होती निराळी. तिचा बाप श्रीमंत व नवऱ्याला निषिद्ध आवक बरीच असे. तशांतून **जयलक्ष्मी**ला संसारसुखाविषयीं विरक्तता उत्पन्न होऊन ती पैशाची फारशी परवा बाळगीत नसे. तिचा प्राण काय तो इहलोकीं बापावर, **आनंदशंकरा**वर व **सदू**वर जडलेला होता. परंतु **आनंदशंकरास** बाप कधींही कालत्रयीं विसरणार नाहीं, अशी तिची पक्की खात्री होती, व **सदू**ला आपले पैसे काय कामाचे असें जाणून तिची पैशाविषयीं उदासीनतेची वर्तणूक असे. पण तशी कांहीं **सदू**ची स्थिति नव्हती. ह्यातागाईत तिला म्हणण्यासारखें संसारदुःख माहीत नव्हतें. नुकती संसाराची उभारणी चालली होती. नवरा, दीर, चुलतसासू वगैरे आनंदानें होतीं. बरें जवळ घरची मिळकत मोठी नव्हती. परंतु **सदू**च्या अंतःकरणाची अशी कोमल ठेवण होती कीं, तिच्यानें अनाथाला मदत केल्यावांचून राहवत नसे. **हरिसिंग** हा कठोर हृदयाचा नव्हता खरा. परंतु जर आपण शक्तीबाहेर लोकांचें संकट निवारण करूं लागलों, तर आपल्यालाही तसली दैना भोगावी लागेल, असें मनांत आणून तो बेताबातानें भिक्षा घालण्याविशयीं बायकोला वारंवार सांगे, व कधीं कधीं दरडावीतही असे. पण तिला एक जबर हत्यार ईश्वरानेंच देऊन ठेविलें होतें. नवऱ्यानें तसें सांगितलें कीं, तिनें गहिंवरून म्हणावें 'देवानें आपल्याला काय कमी केलें आहे. आपण जर गोरगरिबांस दिलें, तर ईश्वर आपल्याला देईलच देईल. पण जर नको म्हणणें असेल, तर माझी कांहीं ना नाहीं. पण कनई माझ्यानें ते कांहीं हाल नाहीं पाहवत. आज सकाळींच एक गरीब ५ वर्षांचें पोर आलें होतें. त्याच्या अंगावर अगदीं लक्तऱ्या होत्या. तें बिचारें 'आई खायाला दे' म्हणून म्हणूं लागलें. मला त्याला पाहतांच अतिशय रडूं कोसळलें. येण्याची बरीच वाट पाहिली, पण जेव्हां का तें अगदीं भुईवर भुकेनें गडबडा लोळूं लागलें तेव्हां नाहीं माझ्यानें राहवलें. आणि–' **हरिसिंगा**नें म्हणावें 'अशा मुलांना का नको देऊं म्हणून मी म्हणतों ? वेडी नाहीं तर–पण माझें सांगणें एवढेंच कीं, थोड्या बेतानें ऐस. सगळ्या शहरभर जर हाकाहाक आहे, तर तूं कितीकांना मदत करशील,

थोडासा हात राखून पात्रापात्र विचार करून जर भिक्षा घालशील तर बरें; नाहीं तर मला घरचें सर्व पाहावें लागेल, व तुला विनाकारण वाईट वाटेल, म्हणून सांगतों.'

नवऱ्याच्या सांगण्याप्रमाणें ती वागण्याचा पुष्कळ यत्न करी; परंतु तिचा सर्व निश्चय ऐन प्रसंगीं निष्फळ होई. एकदां तर तिच्या हातून मोठा प्रमादच होत होता; व नवऱ्यालाही ती गोष्ट समजून तो अतिशय तिला रागें भरला. तेवढ्यावरतीच निभावलें म्हणून बरें झालें. तो प्रकार असा:—नुसत्या बाह्यात्कारी विवळण्याकडे लक्ष देऊन ही पाहिजे त्याला मदत करील, असा **केशवभटा**चा तर्क होऊन त्यानें हिला फसविण्याचा बेत केला. आपल्या बायका हें केवळ भलें मोठें नफ्याचें कलम आहे, असें समजणारांपैकीं **केशवभट** हा होता. त्याच्या दोन बायका होत्या म्हणून सांगितलें आहेच. त्यांपैकीं धाकटी ही सुमारें वीस वर्षांची होती. तिच्यामुळें त्यानें बरेच पैसे मिळविले. पुढें दुष्काळांत हिला घरीं ठेवून उगाच खर्च होईल, व तिच्यापासून पैसे उत्पन्न होत नाहींत, असें पाहून त्यानें दुसऱ्या गरीब लोकांप्रमाणें हिला एका मुसलमानाला विकण्याचा घाट घातला, व तसा मुसलमान विकत घेणाराही लागलीच मिळाला. तो **अबदुल्ला** होय. पण हिला विकण्याचा त्याचा अंतस्थ हेतु निराळाच होता. आपल्याला नवरा अमक्याला विकीत आहे, तर कृपा करून त्या मुसलमानाकडून सोडवा, असें बोलणें **सदू**जवळ बायकोकडून लावावयाचें; व मी ही १००रुपयांस **केशवभटा**कडून विकत घेतली, व जर कोणी मला १५० रुपये देईल, तर मी हिला विकत देतों, असें **अबदुल्ला**कडून चौघांत कळवावयाचें. **अबदुल्ला**चा व **केशवभटा**चा आंतून असा करार कीं, ही कांहीं खरोखरी विकत द्यावयाची नाहीं, व १०० रुपये **अबदुल्ला**नेंही त्याला द्यावयाचे नाहींत; परंतु भोळसर लोकांकडून पैसे उपटण्याला ह्या युक्तीची योजना करावयाची. **केशवभटा**ला केवळ येनकेनप्रकारेण द्रव्य मिळवायाची उत्कट इच्छा असल्यामुळें असल्या निंद्य प्रयोगाविषयीं त्याला यत्किंचित्‌ही वाईट वाटलें नाहीं. उलट त्याला आपल्या हुशारीबद्दल पराकाष्ठेची प्रौढी वाटली. परंतु पुढें ह्या प्रकरणांत एकंदरींत त्यानेच दांत त्याच्या घशांत उतरले, त्यामुळें साधारण त्याची खोडकी मोडली असें झालें.

**शिलस्मी** ( **श्रीलक्ष्मी** ) नें त्या दुष्ट भटाच्या सांगण्याप्रमाणें भोळ्या **सदू**पुढें आपल्या पातिव्रत्यभंगाविषयीं व नवऱ्याच्या अधमपणाबद्दल पुष्कळ तिखटमीठ लावून व डोळ्यांत पाणी आणून सांगितलें. त्यामुळें **सदू**ला तें सर्व खरें वाटून ह्या महत्संकटांतून ह्या ब्राह्मण साध्वीचें कसें रक्षण होईल, ह्याविषयीं ती विचार करूं लागली. '१५० रुपये देण्याचें आपल्याजवळ तर सामर्थ्य नाहीं. एकादा डागिना द्यावा, तर नवरा फोडूनच काढील; तो कधीं गय करणार नाहीं. बरें नवऱ्याला कळवावें, तर तो संतापून **अबदुल्ला**शीं भांडण उपस्थित करून एकादे वेळेस भलत्या थराला गोष्ट जाईल.' तर ह्याचा उलगडा आपली मैत्रीण **जयलक्ष्मी** ही करील असें मनांत आणून ती **शिलस्मी**ला बरोबर घेऊन तिच्या येथें गेली व तिनें तिला सर्व

कळविलें. परंतु **जयलक्ष्मीला** **शिलस्मीची** पूर्वीची वर्तणूक पूर्णपणें माहीत होती, म्हणून तिनें **सदूस** एकीकडे बोलावून सांगितलें 'हा वेडे, तूं का इतकी तिच्या गयावया सांगण्याला भाळलीस? अग ही बोलून चालून सगळ्या गांवची चहाटळ. ह्यांत कांहीं तरी लवाडी आहे. थोडेंसें तरी ह्यांत तथ्य आहे, अशी जर माझ्या मनाची खात्री झाली असती, तर मीं पदरचे १५० रुपये दिले असते, व तुझ्या मनाप्रमाणें साध्वीची सुटका मोठ्या आनंदानें केली असती. पण तसा कांहीं हा प्रकार दिसत नाहीं. ह्यांत कांहीं काळें बेरें आहे. मुसलमानानें जर हिला विकत घेतली, तर तो हिला मोकळी सोडील कसें, हें एक अगोदर समजलें पाहिजे. बरें, हिच्या काकुळतीकडे केवळ लक्ष देऊन तो कामांध मुसलमान हिच्या पातिव्रत्याविषयीं फारशी परवा करील कीं काय, ह्याचीच मोठी शंका वाटते; मग तो हिला कशाला परत विकील बरें. सध्यां आपल्याला संशय आला आहे, हें हिला समजूं न देतां उद्यां पैसे देऊन तुझी सुटका करूं असें आतां सांगून तिला वाटेस लावूं. दरम्यान मी शोध काढितें. तर तूं आतां परत घरीं जा. बाकी **केशवभट** पैशासाठीं पाहिजे तें करील, असला तो हलकट व उलट्या काळजाचा आहे. त्याला ह्या उपरांत मी आपला उंबरासुद्धां चढूं देणार नाहीं.'

**सदू** नंतर घरीं आली. इतक्यांत **हरिसिंगाला** ह्यांतील खरी बातमी **रहिमानाकडून** समजली. **अबदुल्ला** हा कैफी होता, त्यामुळें आदल्या रात्रीं कैफांत त्यानें लाडांत येऊन **रहिमानास** सगळी मसलत सांगितली. सरतेशेवटीं तो म्हणाला 'लोकांत तर ती लवंडी मला विकली असें झालें, तर **हरिसिंग** १५० रुपये देवो अगर न देवो, ती कांहीं माझ्या हातून त्या हरामखोर भटुरग्याला परत मिळत नाहीं. तूं मेरा कलिजेका दोस्त है इस लियें मै तुझे ये कह दिया.' **रहिमानास** **अबदुल्लाचा** मनापासून कंटाळा असे. परंतु ह्या विकट काळांत **अबदुल्लानें** बऱ्याच वेळां **उत्तमाच्या** सांगण्यावरून **रहिमानास** पैसे पोंहचते केले होते. तसेंच कांहीं उसनवार मागावयास गेला असतां हें सर्व कच्चाळ त्याला समजलें. त्यामुळें त्याला अतिशय वाईट वाटलें. तो गुकाट्यानें परत आला, व दुसरे दिवशीं दुपारीं हळूच एकांतीं त्यानें **हरिसिंगास** सर्व सांगितलें. **जयलक्ष्मीस** तर अगोदरच संशय आला होता. ह्या दोन्ही कारणांमुळें त्या चांडाळ भटाचा बेत फसला, व **सदूस** वरीच आठवण राहीसें पारिपत्य झालें. **अबदुल्लानें** तर बोलल्याप्रमाणें **शिलछमीला** घरीं परत जाऊं दिलें नाहीं. तेणेंकरून **केशवभटास** थोडेंबहुत शासन झालें म्हणायला कांहीं चिंता नाहीं.

गरीब विचाऱ्या **फातिमेचे** व **रहिमानाचे** ह्या वेळचे हाल किती झाले म्हणून सांगावेत. भिक्षा मागण्याचा कधीं प्रसंग नसल्यामुळें त्यांना लोकांजवळ दांत विचकावयाची मोठी शरम वाटे. बोलून चालून पूर्वीच अठराविश्वें दारिद्र्य. त्यांत दुष्काळाचा गहजब. त्यामुळें महिन्याच्या आंत घरांतील चटसारें सामान विकलें जाऊन अगदीं त्यांना आपली वाऱ्याकडे तोंड करावें लागलें. ह्यांची अशी

स्थिति झाली आहे, असें **केसरीसिंगा**कडून **हरिसिंगास** समजतांच त्यानें **सदूला** त्यांच्या घरीं पाठवून समाचार घेवविला, व वरीच मदतही केली. आपण अशा स्थितींत **हरिसिंगाचे** येथें गेल्यास कांहीं मागण्यासाठीं गेलों, असा त्याचा समज होईल, ह्या भीतीनें **फातिमे**नें त्याच्या घरीं पुष्कळ दिवस जाणें सोडिलें होतें. पुढें **सदू** ह्यांच्या येथें समाचारास आली होती, असें आशाळभूत **उत्तमास** समजतांच त्यानें **अबदुल्ला**करवीं थोडीबहुत मदत केली. परंतु बोलूनचालून हीं मायलेक पडलीं प्रामाणिक; काम केल्याशिवाय लोकांचे विनाकारण पैसे घेणें त्यांना प्रशस्त वाटेना. म्हणून त्या म्हातारीनें रात्रंदिवस कांहीं तरी काम काढून बसावें, व मुलानें मजुरीसाठीं बाजारांत हिंडावें. पण जेथें बेकार लोकांचा भरणा अतोनात झाला, तेथें ह्याला मजुरी तरी कोठून मिळणार. आईला सोडून सरकारी कामावर शहराबाहेर जाणें त्याला बरें वाटेना, म्हणून तो बरेच दिवस तसाच काळ कंठीत राहिला. पुढें आपण किती दिवस लोकांचे उसणवार पैसे घेऊन गुजारा करावा, असें मनाला वाटून अगदीं निरुपायानें बिचारी म्हातारी मुलाला न कळवितां एके दिवशीं अन्नछत्रांत खिचडी घेण्यासाठीं गेली. जें काम जन्मांत देखील केलें नाहीं तसलें करणें भाग पडलें, म्हणजे अंतःकरणाला किती विषम वाटतें! पण म्हातारी करील काय? तिच्यानें पुढें दम निघेना, म्हणून ती एकदांची जीव मुठींत धरून अन्नछत्राला गेली खरी. परंतु तेथें ती सांपडली लोकांच्या गर्दींत. अगदीं नवखी असल्यामुळें तिला केव्हां पुढें जावें हें माहीत नव्हतें. म्हणून ती तशीच पुरुषांबरोबर पहिल्या धडक्याला पुढें दाराशीं जाऊं लागली; तों पाठीमागून एकसारखा लोकांचा नेट लागल्यामुळें व पुढें मनस्वी दाटी असल्यामुळें ती मध्यें चेंगरून जाऊन तिचा जीव अगदीं गुदमरुन गेला. साधारण कोणत्याही बाजूनें मनुष्यामध्यें कमतरता असली, म्हणजे लोकांना थट्टा करायाला व उणें काढून त्रास द्यावयाला फावतें. साधारणतः वार्धक्यामुळें इंद्रियवृत्ति ज्यांच्या क्षीण झाल्या आहेत, अशा गरीब वृद्ध मनुष्यांची यौवनाक्रांत तरुण जनांनीं करीत असलेल्या हेळसांडीवरून वरील सिद्धांताच्या सत्यासत्यतेबद्दल कोणाही मनुष्याची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. असो. ती म्हातारी दुःखानें गुदमरलेल्या आवाजानें कण्हत म्हणाली 'बाबांनो, मला चेंगरूं नका. अहो मी गरीब म्हातारी आहें. जा तुम्ही पुढें. मी तुम्हाला नको थोडेंच म्हणत आहें.' पण हें तिचें बोलणें ऐकतो कोण? पाठीमागच्यांनीं पुढें निर्दयपणें ढकलून व पुढच्यांनीं तिला कोपरांनीं मारमारून तिला त्राही त्राही केलें व तिला नाहीं नाहीं त्या शिव्या दिल्या. त्या मारानें ती अगदीं अर्धमेली होऊन बिचारी जागच्या जागीं मटकन बसली. इतक्यांत अन्नछत्राचें दार उघडलें. मग काय एकच गर्दी उसळली. जो तो पुढें जाऊं लागला, व वाटेंत कोणी पडलें असलें तरी त्याला बेधडक तुडवीत ते तसेंच जात. त्याप्रमाणें त्या हतभाग्य म्हातारीच्या अंगावरून ते कर्मचांडाळ पाय हापटीत गेले, त्यामुळें तेथल्या तेथेंच त्या बिचारीचा अंत झाला.

विचारा **रहिमान** सर्व दिवसभर काम मिळेल, ह्या आशेनें बाजारांत हिंडून सरतेशेवटीं हताश होऊन संध्याकाळीं परत हात हालवीत घरीं आला. आई आतां येईल मग येईल, अशी त्यानें कांहीं वेळ वाट पाहिली. नंतर तिच्या नेहमींच्या जाण्याच्या घरांमध्यें तिजविषयीं शोध केला. परंतु तिचा कांहीं देखील मागमूस लागला नाहीं. ह्यामुळे त्याच्या जीवाला एकदम धक्का बसला, व कदाचित् आईनें दुःखास कंटाळून जीव तर दिला नसेलना, असें त्याला वाटलें. ह्या दुष्ट विचारामुळें त्याच्या जीवाला मुळींच चैन पडलें नाहीं, व जसजसा तो ज्यास्त शोध करीत जाऊं लागला, तसतसा तो भांबावून गेला. त्याला असें वाटे कीं 'ती मला सोडून कशी जाईल? छेः ती प्राण कधींही देणार नाहीं. बरें तसें जर नसलें तर ती गेली कोठें?' असा विचार करीत तो ऐन तिनीसांजेस **इदर्यापुरां**तील अन्नछत्राजवळ येऊन पोहोंचला, तों त्याला एका ओळखीच्या मनुष्यानें हाक मारिलीसें वाटलें, व जों वर पाहतों तों **अबदुल्ला** बोलावीत आहेसें दिसलें. **अबदुल्ला**नें त्याला आईचें प्रेत दाखविलें. तें पाहतांच आपण खरोखरीच आईला मुकलों, असें त्याच्या नीट लक्षांत येऊन तो आपलें अंग तिच्या अंगावर धाडकन टाकून ओकसाबोक्सीं रडूं लागला. तो म्हणाला 'आई, अग आई, अग ऊठ; अग तूं मला एकट्याला ह्या दुनियेंत टाकून कशीगे चालती झालीस? अगे तुझ्यावांचून हा तुझा **रहिमू** येथें कसा राहील बरें? आई, मीं तुझा काय अपराध केला बरें, म्हणून तूं माझ्याशीं बोलत नाहींस? आईग, माझ्याशीं बोल बोल! मी काय करूं? मला आतां कोणी नाहीं. अग तूं येथें कशाला आलीस? अहो **अबदुल्ला**, अहो हिच्या अंगांत जीव आहेका, पहा तरी! अहो, कोण्या हकिमाला तरी बोलवा. माझी आई मला जिवंत द्या. मी तुमचा बंदा गुलाम होईन. अहो, माझी आई म्हातारी आहे. तिला पुष्कळ दिवसांत पुरें खायालासुद्धां मीं दुष्टानें घातलें नाहीं. आई, अग आई, तूं रागावलीस होय, म्हणून का तूं हें ढोंग करून बसलीस? पण आई, चल तर खरी मजबरोबर. मी तुजसाठीं कबाब आणवीन. आई मजकडे पहा तरी! पण छेः ती कसली आतां बोलते? हे पहा तिचे हातपाय किती थंड लागतात! काय म्हणतां, उघड्यावर पडली म्हणून थंड झाले असतील? हो हें खरें असेल. मग हिला मी घरीं घेऊन जातों, व तुम्ही हकिमाला घेऊन या. पण कांहो, हिची मान कां अशी लटकून पडते? अरे हाय हाय, माझी आई मला टाकून खास गेली. ते पहा तिचे डोळे कसे बाहेर आले आहेत? आणि हिच्या अंगाला इतकें काय लागलें आहे? हिचा चेहरा धुळीनें कशानें भरला? मला वाटतें कीं, कोणी तरी दुष्टानें हिला मारिलें वाटतें. कांरे **अबदुल्ला**, तुला कांहीं ह्याची माहिती आहे का? कां बोलतोस कीं मारू? अहो, तुम्ही कां माझ्या हातांतून हिला हिसकावून घेतां? अहो ही माझी आवडती आई आहे. हिला तुम्ही खबरदार हात लावाल तर. काय म्हणतां, सरकारांतून मूठमाती देणार आणि ती कोणाला? माझ्या आईला? आई, पाहिलेंस कां, तुला ते मेली म्हणून समजतात, तर एकदां तूं फिरून मजशीं बोलून ह्यांचा भ्रम दूर कर. पण नाहीं, ती कसली आतां बोलते? अग आई, माझें काळीज फाटत जात आहेग. मला एकदां कसें तरी करून **रहिमू** म्हणून हांक मार. अहो, कोणी मला तरी मारून टाका, म्हणजे मी आईला भेटेन. आतां मला ममतेचें

कोणी राहिलें नाहीं. या खुदा तुलाही माझी म्हातारीरे त्याविशी कां वाटली?अरे,मी चांगला होतों. पण छे: ती माझ्याशिवाय कशी राहिली असती? हाय हाय! मी आतां कोठें जाऊं' नंतर त्याचा शोक अनावर होऊन त्यानें आपलें डोकें फटाफट दगडावर आपटून घेतलें. त्याचें हें दु:ख पाहून **अबदुल्ला**सारख्या मनुष्यालाही गहिंवर आला. सरकारांतून मूठमाती देण्यासाठीं आलेलीं विचारीं मनुष्यें देखील, असे प्रसंग पुष्कळ पाहिले असूनही, गहिंवरलीं. त्या सर्वांनीं त्याला पुष्कळ समजावलें, पण त्याच्या मनाला कसची शांती येते? पुढें त्या मनुष्यांनीं तिचें प्रेत तिच्या झोंपडींत नेऊन ठेविलें. **अबदुल्ला** रात्रभर तेथें राहिला. दुसऱ्या दिवशीं **उत्तमलाला**कडून पैसे काढवून तिला त्यानें चालीप्रमाणें मूठमाती दिली.

पण त्या रात्रीस **रहिमाना**च्या मनाची स्थिति कशी झाली होती बरें? त्या मायलेकांना एकमेकांचाच कायतो ह्या जगतांत आधार होता. त्यांपैकीं मातेचेंच प्रथम देहावसान झाल्यामुळें व **रहिमान** विशीच्या आंतच असल्यामुळें त्याच्या मनाला अतिशय उदासीनता यावी ह्यांत आश्चर्य मुळींच नाहीं. लहानपणापासून हरप्रकारच्या संकटांतून जिनें आपल्या जीवाकडे लक्ष न देतां लालनपालन केलें व वाढविलें, अशी जी माता—जिच्यासारखें जगत्रयीं अन्य दैवत नाहीं—जिला केवळ स्वत:च्या लेकराचें हित पाहण्यांत कायतो आनंद, अशी जी निरिच्छ प्रेमाची प्रत्यक्ष देहधारी प्रतिमा, तिनें इहलोक सोडावा, म्हणजे कसाही पुत्र असो त्याला परमावधीचें दु:ख झाल्यावांचून राहील काय? मग त्यांत **रहिमान**सारख्या नि:सीम मातृभक्ताला किती शोक होईल बरें? मातेच्यापश्चात् जीव धरून राहण्यांत यत्किंचित्‌ही श्रेय नाहींसें वाटू लागतें; चोहोंकडे जगभर व अंत:करणांत शून्यता असते; असें साधारण बाप, भाऊ वगैरे मंडळी असतांना मनुष्यांस वाटतें, तर मग ज्यास दुसरें जवळचें नातेवाईक कोणीही राहिलें नाहीं, अशा समजूं लागलेल्या अनाथ पोराचा जीव शतधा विदीर्ण होणार नाहीं काय? अशा ठिकाणीं म्हणजे मातृमरणझंझावातानें आशावृक्ष समूळ उपटला जातो; शोकनदीस महापूर येऊन औदास्यसागर विस्तीर्ण लाटांनीं खळबळून जातो. जलप्रलय झाला असतां एकाद्या माडाच्या फांदीस धरून कोणीं आपला जीव वांचविला असतां, ती फांदी वाऱ्याच्या सोसाट्यानें व स्वत:च्या भारानें माडापासून तुटून गेल्यानें जशी त्याची तत्क्षणीं नैराश्येची कमाल होते, तद्वत् किंवा किंबहुना ज्यास्तच **रहिमाना**चें मन ह्या वेळीं निराश्र झालें होतें. त्याच्या मनाचा आनंदचंद्र अस्तंगत होऊन घनतिमिर चोहोंकडे व्यापितें झालें. संसारसागरांतील नौकेचा कर्णधारच नाहींसा झाल्यामुळें ती वाहवत जाऊन एकाद्या कड्यावर आडळते कीं काय, अशी **रहिमाना**ला आपल्याविषयीं कालगतीनें भीति उत्पन्न झाली. एतदर्थ,

**मातेसम अन्य दैवत नाहीं ।**
**निर्लोभ प्रेम तिच्यावीण नाहीं ॥**

# भाग १२.

## दुष्टें केला उपकार। परिणामीं घात थोर ॥

## कारस्थान.

दुष्काळानें पुष्कळ लोकांचे हालहाल होऊन ते विचारे प्राणास मुकले. दिवाळीसारखा सण अगदीं सुना गेला. लोकांमध्यें त्राण मुळीं नसल्याकारणानें त्यांना सणवाराविषयीं अगदीं देखील उत्साह राहिला नव्हता. कार्तिकी प्रतिपदेला व्यापाऱ्यांना साधारणतः आनंद होत असतो, कारण त्या दिवशीं अवघ्या वर्षांत किती नफानुकसान झालें, ह्याचा हिशोब काढून नवीन वर्षाच्या खातेवह्या करावयाच्या. पण व्यापारालाच तेजी नव्हती, तर व्यापाऱ्यांना आनंद कोठून होईल? चोहोंकडे एकसारखी हाकाहाक व रडारड अष्टौप्रहर चालली असे. दर दिवसाला नवीन नवीन संकटें उभीं राहत, व नवीन नवीन दुःखाचीं साधनें तयार होत. अशा दुःखाच्या प्रसंगीं आनंदाला यत्किंचितही थारा नव्हता, म्हणून तो केवळ अधमाधमांकडेस आपलें यच्चयावत् बिऱ्हाड घेऊन गेला होता.

आई गेल्यापासून **रहिमाना**ला मुळींच करमेना. ह्या जगांत एक क्षणभर देखील राहूं नये असें त्याला पदोपदीं वाटे. तो आपल्या जीवाला अतिशय कंटाळून गेला होता, परंतु जीव द्यावा अशी कांहीं त्याची छाती झाली नाहीं. पण यांत आश्चर्य मानण्यासारखें मुळीं देखील नाहीं. कारण आत्महत्या करणें म्हणजे पाप लागतें अशी समजूत साधारणतः असतेच. इष्ट, मित्र, आई बाप इत्यादि नातेवाईक, त्यांपैकीं कोणत्याही प्रकारचा, मन मोकळे करून बोलण्याजोगा, कोणीही मनुष्य आपल्या अनावर दुःखाचा विभागी होण्यासारखा नसला, म्हणजे त्या दुःखित मनुष्याच्या अंतःकरणाची काय बरें स्थिती होईल! दुःखार्णवांत बुडत असतां त्याला कोणीही बाहेर काढण्यासाठीं आपला हात पुढें करणारा नसल्यामुळें त्याचें मन किती उदासीन होतें? ऐहिक सुखें सर्व प्रकारें नश्वर आहेत, असें त्याच्या मनांत पक्कें बिंबून त्याला संसाराविषयीं उद्विग्नता प्राप्त होते. आणि अशा अतिशोकास्पद अवस्थेंत मनुष्याला एका हरीवांचून कोणाचा आधार असतो बरें? कितीही निरीश्वरमताविषयीं अभिमान बाळगणारा मनुष्य असला, तथापि त्याच्यावर एकापाठीमागून एक संकटें येऊन ह्या जगांत त्याला कोणी कळवळ्याचा पुसता किंवा कड घेता राहिला नाहीं, तर त्याला ईश्वरासारख्या कसल्या तरी अज्ञेय तत्त्वावर आपला भार घालून आपल्या व्यग्र व दुःखित मनाची समजूत करून द्यावी लागेल. अशी जर दृढनिग्रही हटवादी लोकांची स्थिति, तर सामान्य जनांस राम, शिव इत्यादि काल्पनिक शक्तींवर आपला हवाला ठेवल्याशिवाय राहवेल काय? ईश्वरासारख्या अज्ञेय तत्त्वाविषयीं वाद घालण्यांत तादृश कांहीं अर्थ नाहीं. संसार ज्या अर्थीं दुःखमय आहे, व ज्या अर्थीं मनुष्याची बुद्धि

कुंठित होऊन तो पशुप्रमाणें महत्संकटांत बावरून जातो, त्या अर्थीं तशा स्थितींत तशा काल्पनिक कारणावर अवलंबून दु:खित चित्ताला सुखसमाधान होतें, ही कांहीं त्या कारणापासून लहानसहान कार्योत्पत्ति म्हटली जाणार नाहीं. एतदर्थ असल्या अत्युपयोगी मताविषयीं फारसें वाक्पांडित्य करूं नये हेंच साधारण मनुष्यांस विहित आहे. असो.

पण **रहिमाना**ला सर्व जग सर्व प्रकारें शून्य झालें होतें. त्याच्या मनांत निबिड दु:खांधःकार बरेच दिवस होता. तो वयानें लहान होता म्हणून बरें. जर का हा थोडा वयानें ज्यास्त असता, तर मात्र तसल्या स्थितींत तसल्या दु:खाच्या आवेशानें भान जाऊन त्यानें आपल्या जिवाची हानी केली असती. लहानपणीं आपले इंद्रियव्यापार ज्यास्त जोरदार व क्षणिक असतात. त्यावेळीं क्रोध, हर्ष व दु:ख होण्याला फारसें सबळ कारणही लागत नाहीं, व मनाच्या त्या स्थिती फार काळपर्यंत टिकतही नाहींत. त्याप्रमाणें पहिल्या दु:खाच्या भरांत १०–१५ दिवस **रहिमाना**नें अन्नपाणी सुद्धां घेण्याचें वर्ज केलें होतें. अगदीं भुकेनें व्याकुळ झाला म्हणजे तो थोडेसें खात असे. **हरिसिंगा**च्या येथून त्याचा वरचेवर समाचार घेत असत म्हणून बरें होतें; नाहींतर बिचारा पोर अन्नपाण्यावांचून गेला असता. पुढें आपण किती दिवस बेकार राहून दुसऱ्यांना भार घालावा, असें वाटून तो हळूहळू मजुरी पाहूं लागला; पण ती मिळत नसल्याकारणानें व अंगांत किंचितही शक्ति न उरल्यामुळें तो अन्नछत्रांत जाऊं लागला.

परंतु असल्या स्थितींतही दुष्ट लोकांनीं त्याला निवांत राहूं दिलें नाहीं. एके दिवशीं संध्याकाळीं **उत्तमलाला**नें त्याला आपल्या घरीं बोलावून नेलें, आणि प्रथमत: गोड-गोड बोलून त्याला पुष्कळ धीर दिला. नंतर कांहीं वेळानें **उत्तम** म्हणाला 'बरें **रहिम्**, तूं आमचें एक काम करशील का? आतां म्हणजे तुला हें विचारायाला नकोच होतें. कारण तुझ्यावर आमचे बरेच उपकार झाले आहेत, असें म्हणायाला कांहीं चिंता नाहीं. पण म्हटलें काम आहे नाजूक; म्हणून विचारितों.'

**रहिमान**–हें काय शेटजी विचारतां? मी आपल्यासाठीं जीवसुद्धां खर्चीं घालीन. आपण आयत्या वेळीं मला मदत केल्याचें मी कसा विसरेन? काय हुकूम असेल तो फरमावा. मग माझ्याकडून तें होण्यासारखें नसलें, तरी मी दादा बाबा करून कोणाकडूनही तें शेवटास नेईन.

**उत्तम**–छे: त्यांत दुसऱ्याची मदत मुळीं घेण्याचें प्रयोजन नाहीं. तें तूंच केलें पाहिजे, व तुझ्यानें खास होण्यासारखें आहे. बरें तर, आतां प्रथम मी जें कांहीं सांगेन तें तूं कोठें बाहेर फोडणार नाहींसना. नाहींतर मला तुजवर विश्वास ठेवितां उपयोगीं नाहीं.

**रहिमान**–आपण माझे खावंद आहां. माझ्याकडून काडीमात्रही कसूर होणार नाहीं, व लोकांत गोष्ट प्रसिद्ध होणार नाहीं. काम मात्र खोटेंनाटें नसावें म्हणजे झालें. मग मी जर तें करणार नाहीं, तर मी मुसलमानाचा बच्चाच नव्हे.

**उत्तम**–काम कांहीं वावगें नाहीं; आणि तें केल्यास तुजजवळ पैशाचेंही बोलणें मी

लावणार नाहीं. पण जर का तूं कांहीं त्यांत अडथळा केलास, तर मात्र माझ्याशीं गांठ आहे, हें पक्कें ध्यानांत असूं दे.

कांहीं उत्तर न देतां **उत्तम** काय सांगतो, हें ऐकत **रहिमान** उभा राहिला. **उत्तमा**च्या सांगण्याचा एवढाच आशय होता कीं, **केसरीसिंग** व **हरिसिंग** दिवसां कामावर बाहेर गेले असतां **रहिमानानें सदू**कडे जावें, व एकादे दिवशीं **जयलक्ष्मी**ची भेट घेण्याविषयीं तिचें मन वळवून तिच्याबरोबर सोबतीस म्हणून **वेराईमाते**च्या पोळाला जाणाऱ्या लहानशा दिंडींतून शिरावें, व त्या रस्त्याच्या अंधारांत **अबदुल्ला**नें टपून राहून ओरडण्यापूर्वींच तिला बोळा देऊन जवळच्या घरांत तळघरांत नेऊन ठेवावें. नंतर तो ह्मणाला. '**रहिमान,** ह्या सर्व कामांत तुझ्या केशालाही धक्का लागणार नाहीं. कारण तुझें काम झालें कीं, मी लागलीच तुझी **वडोद्या**ला रवानगी करितों. म्हणजे मुळींच मागमुस लागणार नाहीं. **वडोद्या**ला गेल्यावर तुला माझ्या मित्राचे येथें चाकरीस ठेवण्याविषयीं मीं तजवीज केली आहे. तर मग बोल. कसें काय? कोणत्या दिवशीं ती बाहेर पडेल हें मात्र अगोदर कळीव, म्हणजे पक्का बंदोबस्त होईल. हें काम तुझ्या हातूनच होण्यासारखें आहे. **हरिसिंगा**चा तुजवर विश्वास आहे व तिला तुझी सोबत चांगलीच आहेसें वाटेल. एवढें जर काम केलेंस, तर तुझी दैना सरेल. हें काम लौकर मात्र केलें पाहिजे समजलास. हं तर बोल केव्हां कामाला लागशील.'

**रहिमान** हें सर्व बोलणें ऐकत होताच. परंतु हें असलें अनन्वित काम कसें करावें त्याची त्याला मोठी लाज वाटली व वाईटही वाटलें. असलें निंद्य काम आपण करून भावी सुख अनुभविण्यापेक्षां सदा हाल अपेष्टेंतच दिवस काढलेले बरे, असा मनाचा संकल्प करून तो म्हणाला 'महाराज, ह्या कामाशिवाय आपण दुसरें कोणतेंही काम सांगितलें तरी मी करण्यास राजी आहें. पण असलें काम माझ्यानें कसें होईल? जसें आपण माझें ऐनप्रसंगीं रक्षण केलें, तसेंच **हरिसिंग**जींनींही वेळेनुसार करण्यांत कसूर केली नाहीं. तर त्यांचें अन्न खाऊन मी कशी हरामखोरी करूं? शिवाय दुसऱ्याची लग्नाची बायको पळविण्यांत मी कसें अंग घालूं? तशांतून त्या बाई किती सुस्वभावी आहेत? तर आपण कांहीं करा; माझ्यानें कांहीं हें काम साफ होत नाहीं. त्यापेक्षां माझा जीव गेलेला बेहत्तर.'

**उत्तम**–(संतापून) **रहिम्या,** नीट विचार करून बोल. तुला वाटत असेल कीं, नीतीच्या गोष्टी सांगून मला फसवावें. हरामखोरा, पैशासाठीं तूं पाहिजे तें सांगितलेलें काम करावयाचें टाकून मला शिकवूं पहातोस का? नीट बऱ्या गोष्टीनें तें करितोस कीं नाहीं, कां दाखवूं तुला हात?

**रहि**–शेटजी, आपण थोर आहां खरे, पण मज गरिबाला शिव्या मात्र देऊं नका. आपण मला पैसे दिले ही गोष्ट खरी, व त्या अर्थी मी आपला बंदा गुलाम आहें. पण तें वाईट काम मी प्राण गेला तरी करणार नाहीं. उगाच दटावूं नका व तोंडांतून घाणेरडे शब्द काढूं नका. मला कसची एवढी भीति दाखवितां? येऊन जाऊन कायती माझी झोंपडी आहे. घ्याना ती. मी बोलून

चालून आहें कफल्लक. ना आई ना बाप ना कोणी. होईन फकीर. मग तर तुमचें कांहीं देणें लागत नाहीं.

**उत्तम**–भामट्या, पण तूं माझ्या तावडींतून एवढ्यानेंच कसा सुटशील, तें पाहतों ना. तुला माझें बोलणें ऐकिल्याशिवाय येथून सुटका होत नाहीं, समजलास ? आणि फिरून मला तोंड देतोस–लाज नाहीं वाटत तुला, हरामखोरा ?

**रहिमान** अतिशय संतापून **उत्तमा**च्या अंगावर चालून जात होता, इतक्यांत बाजूच्या दारांतून एक मनुष्य येऊन त्यानें **रहिमाना**ला पाडिलें. **रहिमान** अतिशय कृश झाला होता, त्यामुळें त्याच्यानें मुळींच आपलें रक्षण करितां आलें नाहीं. त्या मनुष्यानें त्याची मोटकुळी बांधून टाकिली. **उत्तमा**नें नंतर आपला राग विचाऱ्या **रहिमाना**वर काढिला. तो म्हणाला '**मुळ्या**, ह्या गाढवाची गठडी रात्र पडली म्हणजे **अबदुल्ला**च्या घरीं तळघरांत नेऊन टाक. म्हणजे तो ह्याची खबरदारी चांगली ठेवील. मग पाहतोना हा कसा वळत नाहीं तो. ५–७ दिवस अन्नपाण्यावांचून ठेविला म्हणजे चट सारें कबूल करील, व सांगितल्यास शेणसुद्धां खाईल. बापाचा नाहीं पत्ता, आणि सांगत आहे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी. ह्या भामट्याची मीं मुळींच परवा केली नसती; पण काय करावें, ह्याच्यावर तिच्या घराण्याचा आहे विश्वास. पण हें काय लागलीच बसलें आहे शेफारून. आतां बरीक अशी खोडकी मोडतों कीं, जन्मोजन्मीं याद राहील.'

रात्रीं सांगितल्याप्रमाणें **मुळजी**नें **रहिमाना**चें तोंड बांधून त्याला **अबदुल्ला**चे येथें पोंहचविलें. थोड्या वेळानें पाठीमागून **उत्तम** आला. त्याला पाहतांच **अबदुल्ला** म्हणाला–कायरे **उत्तम**, अरे तूं इतका बेशरमरे कसा झालास ? त्या औरतेसाठीं आतां तूं गरिबांच्या पोरांना सुद्धां त्रास देऊं लागलास का ? त्या मुलाची आई जाऊन एक महिना झाला नाहीं, तों त्याच्यावर असला कहर करितोस ? मी तुझ्या येण्याचीच वाट पाहत होतों. म्हटलें तूं आलास म्हणजे त्याला सोडून द्यावें. अगोदरच सोडला असता, पण तूं रागावशील म्हणून कांहीं तसें केलें नाहीं.

**उत्तम–अबदुल्ला**, ही कांहीं थट्टेची किंवा चघळपणा करण्याची वेळ नव्हे. त्याला वळवून आपलें काम साध्य करून घेतलेंच पाहिजे. तें त्याच्या हातूनच होण्यासारखें आहे, असा माझा पक्का समज झाला आहे. तुझें देखील तसेंच मत आहे. ती परी जर आपल्या दोघांना लौकर पाहिजे असली, तर मीं सांगितल्याप्रमाणें त्या कारट्यानें केलें पाहिजे. आणखी तुझ्या मनांतून किती दिवस माशा मारीत व लाळ घोटीत बसावयाचें आहे, कोण जाणें. पण मी खात्रीनें सांगतों कीं, तुझ्या **शिलस्मी**पेक्षां ही म्हणजे किती खुबसुरत आहे ? इचा नूर काय, जणूं काय एखादी हौरीच.

**अबदुल्ला**–( मध्येंच ) हो हो ह्यांत काय संशय? एकदां तिची माझी भेट झाली पाहिजे, म्हणजे मजसारख्या खुबसुरत पठाणाला सोडून ती त्या नेभळ्या **हरिसिंगा**कडे कधींही जाणार नाहीं. कांहीं म्हणा, तुम्ही हिंदू अतिशय नामर्द. आमचे मर्द कसे, त्यांना बायका म्हणजे केवळ खेळणीं वाटतात. त्यांना बायकांची विशेष दिक्कत वाटत नाहीं.

**उत्तम**–( राग वर न दाखवितां ) हो हो तुमचे जवानच तसे असतात. त्यांना लहानपणापासूनच दीक्षा देत असाल नाहीं बरें ? बरें पण, त्या हरामखोराकडून आपलें काम करविलें पाहिजे. म्हणून त्याला आतां थोडीबहुत समजूत दिली पाहिजे. तर त्याला जेथें ठेविलें असेल तेथें चल. पण बाहेर त्याचें ओरडणें तर ऐकूं जाणार नाहींना ?

**अब**–छेः त्याची बिलकुल भीति नको.

असें म्हणून ते दोघेजण पणती घेऊन घराच्या मागच्या बाजूस उजव्या हाताच्या भिंतींतून जिन्यानें २०–२५ पाहिऱ्या आंत उतरले. तेथें एक धाकटें तळघर लागलें. त्या तळघराच्या एका बाजूला आणखी एक धाकटें भुयार होतें, त्यांत **अबदुल्लानें** दीर्घश्रमानें मिळवलेली संपत्ति ठेविलेली होती. पण त्या भुयाराचें दार बंद असल्यामुळें **उत्तमाला** आंत काय होतें ह्याचा अजमास काढतां आला नाहीं. मोठ्या भुयारांत ओलसर जमिनीवर एका कोपऱ्यांत बिचारा **रहिमान** पडला होता. तळघराच्या एका बाजूला कोळयांचीं घरें व पुष्कळ कचरा होता. हे कर्मचांडाळ आलेसें पाहून **रहिमानानें** डोळे उघडले, व **अबदुल्लानें** त्याच्या तोंडाचा बोळा काढिला. **रहिमान** लागलीच ह्यांची काकळूत करून म्हणाला 'अहो शेटजी, अहो **अबदुल्लाखान**, मला गरिबाला त्रास देऊन तुम्हांला काय मिळेल बरें ? मी कमनसीब आहें. मला ह्या दुनियेंत दुसरा कोणी नाहीं. तर तुम्ही तरी निदान मजसारख्या कपाळकरंट्यावर आणखी गहजब करूं नका. अहो **अबदुल्ला**, मी पैगंबराला स्मरून तुमच्या पायां पडतों. मजवर थोडी मेहेर करा व मला ह्या दुःखांतून सोडवा. अहो, आपला धर्म एक आहे. जर तुम्हाला माझी करुणा येत नसली, तर तुम्ही माझ्या उरांत कट्यार भोंसकून एकदांचें सोडवा, म्हणजे मी तुमचा उतराई होईन. नंतर हवा तितका माझ्या मढ्याला त्रास द्या.'

**उत्तम**–**रहिमान**, आमचें बोलणें मुकाट्यानें ऐकलेंस, तर तुझें सर्वस्वीं हित आहे, म्हणून मीं मघांच सांगितलें. आतां एक ऐक, नाहीं तर होतील तितक्या वेदना सोस व आपल्या द्वाडपणाला दोष दे. तुझें कल्याण करीत आहों; पण हें समजण्याइतकें तुला कोठें शाहाणपण व माणुसकी आहे ?

**रहिमान**–( **उत्तमास** उत्तर न देतां) अहो **अबदुल्लाखां**, अहो मी तुमच्या मुलाप्रमाणें कीं हो आहे—

**अब**–( बोलून चालून दुष्ट मांग होता म्हणून त्यानें मध्येंच म्हटलें ) अरे **रहिमू**, जर तुझी आई असती, तर ती या वेळीं खरोखर म्हणाली असती कीं, बाळा, **अबदुल्ला** तुझे वडील होत, म्हणून त्यांचें म्हणणें मान्य कर.

हें ऐकून **रहिमान** अतिशय संतापला व म्हणाला ' हा मांगांनो, अरे माझी अशी स्थिति पाहून मला असें छळतां व माझ्या पवित्र आईला कलंक लावूं पाहतां ? या अल्ला काय करूं, मी अगदीं हतवीर्य झालों आहे. जर ह्या वेळेस मी मोकळा असतों, तर ह्या दुष्टांच्या नरड्यांचा घोंटच घेतला असता. हाय हाय काय करूं ?

पण हें बोलणें होत असतां त्या मांगांनीं हाल करण्याच्या साधनांचा उपयोग करण्याचें योजिलें. प्रथमतः त्यांनीं त्याच्या कानास चाप लाविला, व उरावर धोंडा दिला. तो विचारा वेदनेनें अगदीं ठणठणा ओरडत होता. परंतु त्या दुष्टांना यत्किंतूही दया आली नाहीं. ते मोठ्यानें हंसून म्हणाले ' कां हें गोड वाटतें का ? एवढ्यानें ऐकतोस, कां आणखी कांहीं मासलेवाईक गम्मत दाखवूं ? आतां कोण तुला सोडवितो, तें पाहतोंना. तुझें वाटेल तें जरी केलें, तरी कोण आमचा हात धरणार? चल कबूल होतोस कीं (कानाचा चाप काढून)–'

'मला सोडा; मला नाहीं हो हें सहन होत, अरे खुदा ! काय मीं पाप केलें असेल कोण- जाणें ! ' एवढेंच कायतें **रहिमान** ओरडत होता.

मग त्या अधमाधमांनीं त्या चापाचा नाजूक ठिकाणीं उपयोग केला; त्यामुळें त्या प्राणघाती वेदना सहन न होऊन **रहिमान** घसा फोडून ओरडला ' अहो मी करीन, सोडा मला एकदांचें!' असें म्हणून तो लगेच बेशुद्ध पडला.

त्याला त्या स्थितींत पाहून यःकश्चित मनुष्याला खळवळून आलें असतें. पण हे कसले चांडालोत्तम शांत व गंभीर? आपलें काम बहुशः फत्ते झालें, म्हणून त्यांना उलट हर्ष वाटला. नंतर त्यांनीं थोडेसें पाणी शिंपून त्याला सावध केलें व विचारिलें ' कां कबूल आहेसना ?' परंतु फिरून अंतःकरणाची पापभीरुता प्रकट होऊन तो उत्तर न देतां डोळे झांकून कण्हत पडला. हा कांहीं नीट मनापासून रुकार देत नाहीं, असें पाहून हे अधमश्रेष्ठ फिरून तो चाप तेथेंच लावूं लागले. तें पाहून त्या असह्य यातना पुनःआपल्याला सोसाव्या लागतील, अशी भीति उत्पन्न होऊन त्या विचाऱ्याचें मन दहेवश झालें, व तो दीन होत्साता म्हणाला ' बावांनो, मी तुमचें सर्व म्हणणें कबूल करितों. तुम्ही वाटेल तें सांगा, मी तें करण्यास तयार आहें. पण मला त्या दुःखांतून एकदाचें सोडा.'

हें त्याचें बोलणें ऐकून ते दोघे दुष्ट आनंदानें टाळ्या पिटून म्हणाले ? ' कां गुरमी जिरलीका ? कणीक झालीका मऊ ? बरें तर, तुला आम्ही सध्यां त्रास देत नाहीं. उद्यां सकाळीं तुझे हेच विचार कायम राहतात कीं काय, हें पाहून मग तुझ्या सुटकेविषयीं पाहूं. सध्यां रात्रभर तुला येथेंच राहिलें पाहिजे. ' **रहिमान** डोळ्यांत पाणी आणून अगदीं दीनस्वरानें म्हणाला ' अहो शेटजी, मी पळून जाणार नाहीं. मला येथें एकटें टाकून जाऊं नका. मला पाहिजे तर असाच बांधलेला ठेवा, परंतु वरती उघड्या हवाशीर जागेंत घेऊन चला. येथें माझा जीव अगदीं गुदमरून गेला आहे. तर माझ्यावर एवढी मेहेरबानी कराच. मला थोडेसें खायाला द्या. मी अगदीं भुकेनें कासावीस झालों आहे.'

हें ऐकून **उत्तमानें अबदुल्लास** एके बाजूस नेऊन म्हटलें. ' **अबदुल्ला,** मला वाटतें आतां त्याला करावें मोकळें; व वरच्या तुझ्या निजावयाच्या खोलीच्या जवळच्या खोलींत त्याला ठेवून द्यावें. त्याला मनमुक्त चांगलें खाऊं घालावें, म्हणजे त्यालाही वाटेल कीं, आपण कांहीं वाईट करूं इच्छित नाहीं. पण तूं मात्र त्याला हातांतून जाऊं देऊं नकोस. कारण एकदां हा बाहेर

पडला, म्हणजे फिरून असा तावडींत सापडणें जरासें कठीण पडेल. तर तुला कसें काय वाटतें?' 'व: काय खासी नामी युक्ती आहे. तूं ह्याच्याविषयीं अगदीं विनधास्त ऐस. मी नीट खबरदारी ठेवीन' असें **अवदुल्लानें** म्हटलें. त्याप्रमाणें **रहिमानाला** मोकळें करून वरच्या खोलींत घेऊन जाऊन त्याला यथास्थित खाऊं घातलें; व **उत्तम** आपल्या घरीं गेला.

जेवीत असतां **रहिमान** आपली कशी सुटका होईल, ह्याविषयीं विचार करूं लागला 'दंगा करून पळूं लागलों, तर आपल्या अंगांत दंगा करण्याची शक्ती नाहीं, हें एक; व शिवाय आपण चोरी करून पळून जात होतों, अशी एकादी तोहमत आणून ते आपल्याला तावडींतून जाऊं देणार नाहींत. म्हणून कांहीं तरी युक्ती योजिली पाहिजे. ह्या खोलीला कायतें एकच दार आहे, आणि तें दार तर हा दुष्ट बाहेर गेला कीं, लागलीच लावून कुलूप घालील. मग मात्र आज रात्रीच्या रात्रीं सुटका होणें कठीण. बरें, आपण काम करायाला जातों असें उद्यां सांगून जावें व नंतर पोबारा करावा. पण छे: मी काम करितों कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं ते पाळतीवर मनुष्यें ठेवतील, व मला त्यांची नजर चुकवितां येणार नाहीं. एकंदरींत मला वाटतें कीं, हे गैरसावध असतांना न कळत आपण जावें, म्हणजे बरें पडेल. पण तसें होण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. या परवरदिगार खुदा, मी मिस्कीन आहें, तर मला ह्यांच्या तावडींतून आजच्याआज सोडीव, नाहीं तर माझ्या हातून मोठी बुराई होईल.'

पण ईश्वरानें दया करून त्याला लौकरच ह्या चांडाळांच्या हातून सोडविलें. **रहिमानाचें** खाणें आटपल्यानंतर **अवदुल्ला** हातांत कुलूप घेऊन दार लावूं लागला. हें पाहतांच **रहिमान** म्हणाला 'अहो **अवदुल्ला**, माझ्यावर इतकासुद्धां विश्वास नाहींना. मी एकदां वचन दिलें कीं मी जाणार नाहीं; तें मी मोडीन काय? मला थोडा वेळ तरी मोकळी हवा घेऊं द्या. ह्या खोलींत मुळींच हवा खेळत नाहीं.'

**अवदुल्ला**—वचनाच्या बाता मारू नकोस-पण तुला एक दोन घटका पाहिजे तर दुसऱ्या खोलींत हिंडण्याची मोकळीक देतों. ह्या बाहेरल्या खोलीला मात्र कुलूप घालतों. मी परत आलों, म्हणजे तुला आंत गेलें पाहिजे. माझ्या हंथरूणावर जर निजलास, तर मात्र माझ्या कामीं पडणार नाहीं.

नंतर बाहेरच्या खोलीला बाहेरून कुलूप घालून तो दुसऱ्या मजल्यावर एका खोलींत गेला. ३।४ घटका गेल्यानंतर तो बराच झिंगून **श्रीलक्ष्मी**बरोबर आपल्या खोलींत आला. त्याचे झोंक जात होतेच व तसाच अडखळत तो **श्रीलक्ष्मीस** म्हणाला 'प्यारी, मला आतां अतिशय झोंप येत आहे. तर (आपल्या खोलींत चोहोंकोपऱ्यास **रहिमान** नाहींसें पाहून) तूंच ह्या खोलीला कडी घालून हें कुलूप घाल. व दिवा मालवून पाहिजे तर आपल्या खोलींत जा. जातांना दार मात्र ओढून घे.' असें म्हणून तो आपल्या खाटेवर धाडकन पडला. **श्रीलक्ष्मीनें**ही सांगितल्याप्रमाणें केल्यानंतर ती कांहीं वेळानें आपल्या

खोलींत गेली. **अबदुल्लाला** गाढ झोंप लागलीसें पाहून **रहिमान** हळूच त्याच्या खाटेखालून दचकून उठला, व भूईवरून सरपटत दाराशीं येऊन तें हळूच उघडून वाघाच्या दरींतूनच जसा कांहीं बाहेर पडला. **अबदुल्ला** प्रथम कुलूप लावून गेल्यानंतर **रहिमान** थकला असल्याकारणानें थोडा वेळ त्याच्या खाटेखालीं भिंतीजवळ विचार करीत पडला होता. पण विचार करितां त्याला झोंप लागली तों तो खाटेखालीं तसाच पडून राहिला, पण **अबदुल्ला** आल्यानंतर तो जागा झाला, व असेंच गुपचूप पडून राहिलें असतां सुटका होईल अशी त्याला एकदम आशा उत्पन्न झाली. **रहिमान** त्या चांडाळाला नकळत एकदांचा बाहेर पडला; परंतु पुढें कोठें जावें ह्याचा कांहीं त्याला अंधारांत नीट उमज पडेना. तो बराच घोंटाळला; व जरकरितां आपण असे पळून जात असतां चाहूल लागून पकडले गेलों, तर मात्र आपली पुरी दशा दशा होईल, अशी भीति वाटून तो गांगरून गेला. पण तो तसाच चाचपत गेला, तों एका खोलीचें दार लागलें. तें दार उघडें असल्याकारणानें आपण घराबाहेर पडूं, ह्या आशेनें तो तसाच आंत शिरला; परंतु पाहतो, तों बाजूच्या खोलींत एका अंधुक दिव्याजवळ दोन स्त्रीपुरुषें लाडांत आलीं आहेत, असें त्यानें पाहिलें. तीं **श्रीलक्ष्मी** व **अबदुल्ला**चा नोकर **गफूर** हीं होत असें ह्यानें ओळखलें. परंतु त्यांच्या तावडींतून कसें सुटावें असा विचार करीत असतां, **गफूरा**ची नजर दाराच्या उघड्या फळींतून ह्याजकडे गेली; व त्याला जवळच्या खोलींत कोणी उभें राहिलेंसें वाटून तो चटकन दिवा घेऊन, बाहेरच्या खोलींत कोण आहे, तें पाहण्यासाठीं म्हणून आला. तो **अबदुल्ला** नव्हे अशी त्याची खात्री होतीच. कारण त्याला चांगली निशा यावी व आपलें दुर्वर्तन सुरळीत चालावें, म्हणून **श्रीलक्ष्मी**नें दररोज च्याप्रमाणें त्या दिवशींही दारूंत थोडीशी अफू घातली होती. कदाचित् भूत असावें असें **गफूरा**ला वाटलें; पण कांहीं का असेना, पाहूं तर खरें, काय आहे तें, असा बेत करून तो **श्रीलक्ष्मी**च्या भीत भीत विचारण्याकडे लक्ष न देतां बाहेर पडला. परंतु भयानें गर्भगळीत होऊन सर्वांग लटलट कांपत आहे व घामानें डबडबला आहे असा **रहिमान** त्याच्या दृष्टीस पडला. **रहिमाना**ला ओळखतांच **श्रीलक्ष्मीस** बाहेर येण्याविषयीं हळूच हांक मारून तो म्हणाला 'कायग, तूंच म्हणत होतीसना कीं, ह्या कारट्याला आंतल्या खोलींत कोंडून ठेविलें म्हणून. आणि आतां हा बाहेर कसा आला? (नंतर त्याजकडे वळून) कायरे, आम्ही काय करीत होतों, हें पाहण्यासाठीं कां तुला येथें त्या हरामखोरानें पाठविलें? सांग, काय खरें आहे तें. नाहीं तर तुझी गठडी झालीच म्हणून समज.'

**रहिमाना**नें कांपत कांपत सर्व कांहीं खरें सांगितलें. तो म्हणाला 'मला जर मुकाट्यानें बाहेर जाऊं द्याल, तर तुमच्याही वाटेस मी जाणार नाहीं. पण जर तुम्हीं अडविलेंत, तर मी ओरडून **अबदुल्ला**ला जागें करीन व नंतर जें होईल तें होवो.'

**श्रीलक्ष्मी** हें ऐकून भिऊन म्हणाली 'माझ्या लाडक्या **गफुरा**, ह्या पोराला देऊं आपण

सोडून, म्हणजे सर्व कांहीं बिनधोक मिटेल. वास्तविक ह्या पोराचा कांहीं अपराध नसून त्याला विनाकारण कोंडून ठेविलें होतें. आतां ज्या अर्थी हा सुटला आहे, तर ह्याला अडथळा करूं नये हें बरें. व हा खरें सांगतो ह्याविषयीं माझी खात्री झाली आहे. कारण जेव्हां त्या **अवद्यानें** मला कुलूप लावावयाला सांगितलें, तेव्हां मी सहज खोलींत डोकावून पाहिलें; पण मला मनुष्य निजल्यासारिखें कांहीं चांगलेसें दृष्टीस पडलें नाहीं. तेव्हां मला अंधुक उजेडांत बरोबर दिसलें नसेल, असें म्हणून मीं त्या वेळीं समजूत करून घेतली होती. म्हणून ह्याला सोडून द्यावें.'

**गफुराच्या** मनांत तसें करावयाचें नव्हतें; परंतु **श्रीलक्ष्मीचें** मन दुखवूं नये, व **अबदुल्ला** हा मोठा संशयी व खुनशी स्वभावाचा आहे, अशी त्याची खात्री होती; त्यामुळें त्यानें निरुपायास्तव तिच्या म्हणण्याप्रमाणें **रहिमानास** रस्त्यावरच्या दारापर्यंत पोहोंचविलें. उघड्या रस्त्यावर पडतांच **रहिमान** मोठा आनंद मानीत **अवदुल्लाच्या** घरापासून जितकें लांब जाववेल तितका जात चालला.

सकाळीं **उत्तम अबदुल्लाचे** घरीं आला, व **रहिमान** कामगिरी करण्याविषयीं राजी आहे कां नाहीं, हें विचारूं लागला. **अवदुल्ला** म्हणाला 'हातच्या कांकणास आरसा कशाला पाहिजे? ही घे किल्ली, उघड तें दार, आणि विचार पाहिजे तर त्याला. अगोदरच काम आहे फत्ते, पण तुझी खात्री कोठें होते आहे मी सांगून.' **उत्तमानें** कुलूप काढिलें, व दार उघडून आंत पाहतो तों त्याला कोणीही दिसलें नाहीं. तो चपापून म्हणाला '**अवदुल्ला**, अरे येथें मला तर कोणी दिसत नाहीं. शिकार पळाली कीं काय?'

**अबदुल्ला** घाईघाईनें म्हणाला 'छे: काय विशाद आहे ती पळेल. तुला त्या अंधारांत नीट दिसत नसेल. अरे **रहिमान, रहिमान**, असा खोलींतून बाहेर ये, व या भित्र्या शेटजीला तूं जिवंत येथेंच आहेस असें एकदां नीट डोळ्यांनीं पाहूं दे.'

परंतु आंतून मुळींच उत्तर आलें नाहींसें पाहून संतापून **अबदुल्लानें** हातांत आपला बडगा घेऊन म्हटलें '**रहिम्या**, थांब, तुला अदबीनें कसें वागावें हें चांगलें ह्या बडग्यानें शिकवितों. फार पाजी आहे. त्याला वाटतें उत्तर दिलें नाहीं, म्हणजे हा रुसला असें आम्हांला वाटून आम्ही त्याची समजी करूं. पण गाढवा, तुला खेटराचीच पूजा पाहिजे. समजीचें तर नांव नको; पण आतांच खरमरीत समजूत देतों, समजलास.' असें म्हणून तो मोठ्या डौलानें आंत गेला, व एका कोंपऱ्यांत मडक्यांची उतरंड होती, तेथेंच **रहिमान** उभा राहिला आहे असें समजून त्यानें आपला सोडगा तेथें मारिला. त्याबरोबर ती उतरंड ढांसळली, व सर्व मडकीं फुटलीं. नंतर आंत तो नाहीं अशी पक्की खात्री झाल्यावर तो फणफणत बाहेर आला. **उत्तमाच्या** मनांत बोलावयाचें होतें, परंतु जरकरितां बोलावें तर रागाच्या झपाट्यांत **अबदुल्ला** आपल्यावरच हात चालविण्यास मागें पुढें पाहणार नाहीं, ह्या भीतीनें तो उगीच बसला. हा कसा पळून गेला ह्याविषयीं त्याचा कांहींच तर्क चालेना. तो म्हणाला 'काय चमत्कार आहे! कुलुपाची किल्ली माझ्याजवळ. रात्रीं कुलूप ला-

वतांना तर आंत होतांच. मग हें झालें कसें कोण जाणें.' उत्तमानें हळूंच म्हटलें 'कोणी घरांतल्या मनुष्यानें, **अवदुल्ला** लालभडक होऊन म्हणाला 'चीप बैस वाणगटा. माझ्या घरांतल्यांपैकीं कोणाची मगदूर आहे, कीं तो माझ्याजवळच्या किल्या घेईल? बेअक्कल गाढव कोणीकडचा? बोलतांना अलीकडेस तूं फार ताळ सोडायाला लागला आहेस.'

**उत्तमा**नें कांहीं उत्तर न देतां थोड्या वेळानें मनांतल्या मनांत चुरमुरे खात घरची वाट धरिली. तो गेलासें पाहून **अवदुल्ला**नें **श्रीलक्ष्मी**ला ह्याविषयीं विचारिलें. पण ती म्हणाली 'काय बाई चमत्कार? कुलूप लावतांना आंत नव्हता कां तुम्हीं व मीं पाहिला? मग त्यांतून गेला तरी कसा? पुढें मी तर तुमच्याजवळच किल्ली दिली होती. मग हें कसें झालें कोण जाणें. पण थांबा, आपण **गफु**राला विचारूं.'

नंतर **गफुरा**ला बोलावून विचारितां तो म्हणाला 'मी मध्यरात्र होईतोंपर्यंत जागा होतों. परंतु कोणी मनुष्य आल्यागेल्याची कांहीं मला चाहुल लागली नाहीं. मग हा इसम कसा परागंदा झाला, कोण जाणें.' हें ऐकून **अवदुल्ला** घोंटाळ्यांत पडला. नंतर **श्रीलक्ष्मी**च म्हणाली, 'पण बाई, कदाचित् त्याला एखाद्या जीनानें (राक्षसानें) नेलें असेल तर, **अवदुल्ला**लाही तसेंच वाटूं लागलें, व आपण जीनरक्षित मुलाला त्रास दिला असें वाटून तो मनांतल्या मनांत फार भिऊं लागला.

# भाग १४.

## गांठीचा ताप.

त्या सैतानदीक्षितांच्या हातांतून ज्या वेळेला **रहिमाना**ची सुटका झाली, त्याच्यापूर्वीं ४।५ दिवस **दशक्रोशी** परगण्यांत एका प्रकारचा वाखा उद्भवला होता. दुष्काळापासून लोकांना अतोनात हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, त्यांना ह्या वाख्याची भर पडली. हा वाखा **अहमदाबाद** शहरीं सुमारें २ महिने होता; परंतु तितक्या काळांत ह्या अति भयंकर व्याधीपासून अजमासें पन्नास साठ हजारांपावेतों मनुष्यें फक्त या शहरीं प्राणास मुकलीं.

दुष्काळ दिवसेंदिवस ज्यास्त वाढत जात असून त्यामध्यें असलें अरिष्ट **गुजरात** प्रांतावर कोसळावें, म्हणजे आगींत तेल ओतल्याप्रमाणें झालें होतें. बाहेर गांवचे लोक काळापासून आपलें रक्षण व्हावें, म्हणून शहरीं आसरा धरून राहिले. तेथें त्यांचें थोडेंबहुत रक्षण झालें खरें; परंतु चोहोंकडे अतिशय दाटी झाल्यामुळें व तेणेंकरून शहरांत स्वच्छपणाचा लोप झाल्यामुळें ह्या वाख्याला पुष्टीकरण मिळालें, त्यामुळें, दुष्काळापासून कसा तरी बचाव करून आपले जीव कुडींत धरून राहिले, असे जे कांहीं

हजारों भिकारी रस्त्यांतून हिंडत होते, ते अचानक ह्या अतिभीषण संहारकर्त्रीच्या भक्ष्यस्थानीं पडले. ही व्याधी उद्भवली, हें वास्तविक पाहिलें तर ह्या कालास व स्थितीस अनुसरूनच होतें. अन्नपाण्याच्या दुर्भिक्षाचा असाच कोणत्या तरी रीतीनें परिणाम व्हावयाचा; मग तो पटकीच्या रूपाचा असो, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारचा वाखा असो. बोलून चालून सुकाळांतही स्वच्छतेविषयीं लोकांचें बरेंच औदासिन्य असे, तर मग असल्या काळांत **'आधींच उल्हास तशांत फाल्गुनमास'** अशी गत निःसंशय व्हावयाचीच. ह्या शहरीं श्रावक लोकांची वस्ती पुष्कळ आहे. ह्यांच्या विषयीं एका प्रकरणांत उल्लेख झालाच आहे. त्यावरून साधारणतः अशा वेळीं ह्यांनीं गलिच्छतेची किती किळस मानिली असेल, व त्याप्रमाणें कितपत स्वच्छता ठेविली असेल बरें? आणि अशा प्रकारचीच बहुतेक सर्व लोकांची स्थिति झाली होती. साधारण सुखवस्तु लोकांत स्वच्छता असावयाची, परंतु हल्लीं पाण्याच्या कमतरतेमुळें तिचाही बऱ्याच अंशीं लोप झाला होता. मध्यम प्रतीचे लोक कापड ओलें करून आपलें अंग कधीं मधीं स्वच्छ करीत; परंतु त्याच्यापासून स्वच्छतेचें कार्य सिद्धीस जात नसे. गरीब लोकांच्या स्थितीविषयीं तर बोलायलाच नको. जेथें तृषाशांत्यर्थ नासकें पाणी मिळण्याची वानवा, तेथें स्नानाचें नांव तरी कशाला पाहिजे? तीन चार महिने एकसारखें अंगाला पाणी न लागल्यामुळें अंगाला मनस्वी दुर्गंधी येत असे, व त्यामुळें कित्येकांच्या अंगांवर तर जंतु देखील स्वच्छंदपणें वास्तव्य करूं लागले होते. अशा निरुपायाच्या घाणेरडेपणांतही लोकांनीं जर आपलीं आचरणें शुद्ध व नेमस्त ठेविलीं असतीं, तर त्यांच्यावर वाख्याचा इतका कहर उडाला नसता. परंतु खा खा सुटल्यावर मितपणाला फाटाच मिळत असे. ही एक त्यांच्या अधाशीपणाची गोष्ट झाली; परंतु उदरभरणासाठीं स्त्रियांनीं निर्लज्ज होऊन आपला जो देहविक्रय मांडला होता, त्यामुळें दिव्यावरतीं पतंगानें झेंपावून जशी प्राणहानि करून घ्यावी, तद्वत् पापाचरणासक्त उभय स्त्रीपुरुषें आपल्या पापकर्माचें प्रायश्चित्त भयंकर व्रणांच्या रूपानें भोगूं लागलीं. उघड्यावरती गोरगरिबांचे थवे रात्रंदिवस पडून राहत, त्यामुळेंही त्यांच्या कृश देहावर सूर्याचा ताप, रात्रीचे वारे वगैरे आगला अंमल बजाविल्याशिवाय राहत नसत. ज्या अर्थीं चोहोंकडे असा अनाचार व अमंगळपणा मातला होता, त्या अर्थीं वाख्याचा प्रळय झाल्याखेरीज गति नव्हती.

केवळ काळ येऊनच आपली दैना संपेल असें त्या हतभाग्य लोकांना वाटत होतें; परंतु जेव्हां का हें अरिष्ट मध्येंच उद्भवलें, त्या वेळेस त्यांचा आशांकुर जेथल्या तेथेंच कोमेजून गेला. जे थोडे विचारी व दूरदर्शी होते, त्यांनीं लोकांच्या आचरणामुळें कांहीं तरी भयंकर व्याधी उपस्थित होईल असा तर्क बांधला होता; सर्वतोपरी दुःखमय संसार आहे असें मानणारे, जगास कंटाळून गेलेले, व अन्य कारणांनीं उदासीन, असे कित्येक लोक कांहीं तरी ज्यास्त भयप्रद अरिष्ट ओढवेल, असें भाकीत करून शेजाऱ्यांपाजाऱ्यांच्या व ओळखीच्या लोकांच्या

मनांत उगाच भीति मात्र उत्पन्न करीत; आणि साधारण जनसमूहाला भावी अनिष्टाबद्दल नेहमीं फुगवून सांगून त्यांच्या धर्मभोळेपणापासून आपल्याला ऐहिक सुखाचा फायदा करून घेणारे वंचक फकीर, वैरागी, साधु हे लोक अशा प्रकारचे अनिष्टसूचक उद्गार वारंवार काढीत असत. परंतु पुढें झालें काय कीं, असला वाखा निश्चयेंकरून होणार होताच असें पूर्वीच भाकीत झालें होतें, म्हणून जो तो मानूं लागला. त्यामुळें भेकड व सारासारविचारशून्य आतां आपली ह्या वाख्यापासून कधींही सुटका होणार नाहीं, असें खरोखर समजून केवळ भीतीनेंच अर्ध मेले झाले, व कित्येक वाखा लागला न लागला इतक्यांतच परलोकवासी होत.

आपला वेळ नेहमीं कामकाजांत घालून जे शरिराला साधारणपणें व्यायाम देत, त्यांना ह्या वाख्यापासून विशेष त्रास झाला नाहीं. पण जे केवळ आळशी व निरुद्योगी होते, त्यांच्यावर ह्याची गदा झपाट्यानें चाले. रजपूत, मराठे, मुसलमान अशांसारखे जे दांडपट्टा, फेरफटका वगैरे करीत, त्यांना फारसा उपद्रव झाला नाहीं. परंतु ह्या वेळीं दुष्काळामुळें बेकार व आळशी लोकांचाच भरणा विशेष होता; तसल्या लोकांत म्हणण्यासारखा तकवाही नव्हता, ह्यामुळें प्रथमतः त्या बिचाऱ्यांनीं पटापट जीव टाकिले. पुढें पुढें मात्र त्या वाख्यानें उच्च नीच वगैरे भेद न मानतां सर्व प्रतींच्या लोकांवर आपलें हत्यार निर्धास्तपणें चालविलें.

ह्या वाखा इतका भयंकर व प्राणघाती होता कीं, मनुष्य लागला कीं, हटकून जायाचाच. महामारीपेक्षांही हें रामबाण शस्त्र यमानें, जणूं दुष्काळाच्यानें संहाराचें काम नीट नेटत नाहींसें पाहून, चालविलें; किंवा **महाकालीनें** प्राण्यांचें सत्र आरंभून मनुष्यांना आव्हान करण्यासाठीं म्हणून **शंकरा**जवळून पाशुपतास्त्र घेऊन तें वाख्याच्या रूपानें मनुष्यांवर पाठविलें; किंवा आपला बंधू जो काळ त्याला मदत द्यावी म्हणून वाखा कंबर बांधून पुढें सरकावला. मदनवश होऊन मनुष्यें अनुचित कर्में करितात, हें पाहून कोपाच्या आवेशांत **शंकरानें** आपलें हालाहल थोडेसें पृथ्वीवर फेंकून दिलें. सुबत्ता आल्यावर कदाचित् गलिच्छपणामुळें आपल्या धर्माला मिळालेले इतके प्राणी फिरून धर्मांतर करतील व तेणेंकरून त्यांना निर्वाणपदाची प्राप्ती होणार नाहीं,असें वाटून दयाळू होऊन जीनधर्माचे तिर्थंकारांनीं वाख्याच्या रूपानें इतक्या लोकांना निर्वाण दाखविलें. दुष्टकाळ उगाच इतक्या प्राण्यांचे हालहाल करीत आहे, हें वाख्याला न रुचून वेदनेचा अंत व्हावा, म्हणून पाश्चिमात्य कृपा स्वीकारून तो आपल्या कडाविणी चालवूं लागला. शेषशायी **नारायणानें** बौद्धावतार घेतला, म्हणून त्यापासून आपल्यास यत्किंचित्ही भीति बाळगण्याचें आतां प्रयोजन राहिलें नाहीं, बाकी राहिले ऋषी तर तेही हिमाचलावर सध्यां वास्तव्य करीत आहेत,व संतसाधूंचा लोप झाला आहे,असें पाहून राज्यकर्त्यांच्या अनयाला माना डोलवीत **त्राटिका, शूर्पणखा** इत्यादि **रामानें** मारिलेल्या राक्षसिणी पिशाचयोनींत असतां त्यांना मनुष्यभक्षणाचे डोहोळे उद्भवून त्यांनीं आपला सहचर जो वाखा त्याला पाठविलें; किंवा दुष्टकाळ

पाठवूनही आपल्या मनाप्रमाणें मनुष्य जातींत चोहोंकडे अनाचार होत नाहीं, हें पाहून कलीनें आपला पुत्र वाखा याला इष्ट हेतु तडीस नेण्यासाठीं पाठविलें. दुर्भिक्ष सेनापतीनें काबीज केलेल्या राज्यावर अमंगळपणा एकछत्री राज्य चालवूं लागला; व त्या प्रदेशाची व्यवस्था नीट लावण्यासाठीं त्यानें वाख्याला मंत्रीपद दिलें. पृथ्वीला पापाचा भार न सहन होऊन तिनें विषारी वनस्पतींतून विष काढून वायूच्या सहाय्यानें ह्या प्रदेशांत पाठविलें होतें कीं काय कोण जाणें. सूर्याच्या करांला घाणेरड्या वस्तूंचा संपर्क झाला, त्यामुळें संतापून आपला असला अपमान करणाऱ्या मनुष्यांवर त्यानें त्या घाणेरड्या पदार्थांतून अति भयंकर व प्राणघातक रसायन करून तेथें पाठवून दिलें. वनस्पतींचा राजा जो चंद्र त्याला त्याच कारणावरून सुद्धां संताप येऊन त्यानें दुष्ट वनस्पतींचा अर्क आपल्या करांनीं चोहोंकडे पसरला. मलय, हिमाचल, इत्यादि ठिकाणचा सुगंध घेऊन आनंदानें भरारी मारणारा वायू ह्या प्रदेशांत येऊन पराकाष्ठेचा कंटाळून, असल्या लोकांना शासन झालेंच पाहिजे असा संकल्प करून, त्यानें आपले दुष्ट प्राणनाशक वायूंचे अंश तेथें ठेवून दिले. यज्ञ नाहींत तर नाहींत, परंतु चितारूपानें तरी आपला दुष्काळानें गांजलेला आत्मा शांत करावा, असा हेतु धरून अग्निनारायणानें हें अस्त्र पाठवून दिलें.

ह्या वाख्यापासून जी हानी झाली व जे हाल त्या हतभाग्य लोकांना भोगावे लागले, त्या सर्वांचा शतांशही दुष्काळ किंवा परचक्र किंवा प्राणघातक देवीच्या व तापाच्या सातींनीं हाल व हानी होत नाहीं. पुराणांतरीं वर्णिलेल्या अस्त्रांची संहारशक्ति सकृद्दर्शनीं मिथ्या वाटण्याचा बराच संभव असतो. परंतु त्या तसल्या शस्त्रांनाही लाजविणारी अशी ह्या वाख्याची शक्ति होती. मग कलियुगांत आपला कोणीही युद्धांत उपयोग करीत नाहीं, म्हणून रागावून सर्व शस्त्रांनीं मिळून आपआपला अंश ह्या वाख्याला देऊन येथें पृथ्वीवर पाठविलें कीं काय कोण जाणें. आपणच कायते सर्वांपेक्षां असह्य अशा वेदना करूं शकतो, असा इतके दिवसाचा दुष्काळाचा गर्व जाऊन, वाखा आल्याबरोबर सर्व मनुष्यें त्याच्याकडेसच केवळ लक्ष देऊं लागलीं, हें पाहून तो हळू हळू नजर चुकवून जाण्याच्या बेतांत होता.

ह्या वेदना काय काय होत होत्या म्हणून सांगाव्या. वाखा लागला कीं पुरें. प्रथमतः जीवाला कांहीं केल्यानें चैन पडूं नये, मग थोडासा ताप यावा. नंतर कपाळ व कंबर अतिशय दुखूं लागावी, श्वास लागावा व श्वासाला अतिशय घाण यावी. मग सर्व अंगभर गांठी याव्या. नंतर एक दोन प्रहरांच्या आंत अतिशय तहान लागावी व ताप चढत जावा व पुढें त्या तापांतच बहुतेक अंत व्हावा. बहुतेक लोक तीनपासून नऊ दिवसांच्या आंतच प्राणास मुकत. फारच थोडे असल्या मृत्युच्या दाढेंतून वाचत. मेल्यावरही कांहीं वेळ त्यांचें अंग विस्तवासारखे कढत असे. त्या गांठी फुटून पू व दुसरें किल्मिष बरेंचसें गेलें म्हणजे कांहीं त्या मनुष्याची आशा असे. परंतु पुढें त्याला बरें व्हायाला बरेच दिवस लागत. त्याला हगवण लागे; आणि इतक्या मह-

त्संकटांतून वांचला तर मोठें भाग्य म्हणावयाचें. पूर्वीची शक्ति कांहीं फिरून त्या तसल्या लोकांना येत नसे; व कित्येकांच्या तर सर्व इंद्रियशक्ति अतिक्षीण झालेल्या आढळत.

त्यांत वास्तविक दुःसह वेदना तृषेपासून, गांठीच्या ठणक्यापासून व तापापासून होत असत. कितीही पाणी प्या, घसा कोरडा तो कोरडा. आणि असल्या पाण्याच्या दुर्भिक्षतेंत त्या असह्य तृषेपासून कल्पांत होणाऱ्या यातना सोसाव्या लागत. बिचाऱ्यांच्या अंगांत ताप चढला व तहान बळावली म्हणजे बाहेर जणूं अंगावर आगीचा लोळ फिरत आहे व आंत तृषेचा भडका पेटला आहे असें वाटे. त्या दोन्ही आगींतून थोडी जीवाला शांति मिळावी म्हणून 'पाणी द्या पाणी द्या' असें ते ओरडत जलाशयांजवळ कसे तरी धडपडत जात, व तेथेंच बहुतेक प्राणोत्क्रमण करीत. बरें, अंगाला गांठी एके ठिकाणींच येत नसत. त्या चोहोंकडे पसरत. घशाला, काखेंत, मांड्यांत व असल्याच अडचणीच्या जागीं त्या येऊन ठणका लागावा; पाणी पितां येऊं नये, मग खाण्याचें तर नांव नकोच; चालतां येऊं नये; बोलतां येऊं नये; अशी कांहीं चमत्कारिक अतिदुःखदायी स्थिति होत असे. यदाकदाचित् ते फोड फुटले तर त्यांतून नासकें कुसकें रक्त व पू पुष्कळ जाई, व कधीं कधीं त्यांतून अतिशय सळसळीत लस अंगावरून गेल्यानें जेथें जेथें ती लागे तेथें तेथें तरारून फोड येत.

ह्या गांठीच्या ठणक्याशिवायही सर्व अंग पहिल्यापासून दुखत असेंच. कपाळाचा शळ इतका असह्य असे कीं, त्यानें मस्तकाची कवटी फुटते कीं काय असें वाटावें. छातींत, सांध्यांत चोहोंकडे एकसारखी कळ लागे व शिणका मारीत.

अशा जर साधारण त्या भयंकर व्याधीच्याच स्वाभाविक वेदना होत्या, तर मग दुष्काळानें जर्जर झालेल्या, सर्वतोपरी उदास व हताश अशा हतभाग्य लोकांना तिच्यापासून काय अवर्णनीय हाल भोगावे लागले असतील बरें ? यत्किंचित् जर आपली दाढ दुखूं लागली, तर वेडावून जाऊन आपल्याला सुचेनासें होतें, व निदान त्या वेळीं तरी दाढेसारखें मोठें दुष्ट व त्रासदायक दुखणें नाहीं, व त्यापासून कोणत्या तरी उपायानें सुटका करून घ्यावी, असें मनाला वाटूं लागतें; तर मग जेथें सर्व प्रकारच्या वेदना एकवटून एकदम एके वेळीं एकाद्या हतभाग्य अशक्त व पंगु प्राण्यावर आपला हल्ला करितात त्या वेळच्या त्याच्या यातना अनुभवावांचून कल्पनाशक्तीच्या बाहेर राहतात, असें म्हणायाला कांहीं चिंता आहे काय ? लहानसा विंचू चावला, तर मनुष्याला त्राही त्राही करून टाकितो; तर जेथें सर्व अंगाची लाही लाही आंतून बाहेरून होत असून अंगभर सुया टोंचल्याप्रमाणें व तें विदीर्ण होत असल्याप्रमाणें वाटावें, म्हणजे तोच मनुष्य इतके हाल कसे सोसतो ह्याचेंच आश्चर्य वाटतें.

यमसुद्धां इतक्या वेदनांचा एक समयावच्छेदेंकरून अघोर पाप्यांस दंड करीत नसेल; मग पृथ्वीवर जिवंतपणीं असल्या भोगायाला लागणें, म्हणजे एक पूर्वीच्या महापापी चांडाळापेक्षां हल्लीं लोक अधीक दुराचरणी होते, किंवा यमानें नवीन नवीन घोरपातकांबद्दल हें पृथ्वीवरच योजण्याचें नवीन शासन उत्पन्न केलें असावें, असें म्हणावें लागतें.

ह्या वाखा कोणाला लागे ह्याचा कांहीं एक नेम नव्हता. साधारणत: उद्योगी लोकांत फारशी ह्यापासून हानि झाली नाहीं असें वाखा गेल्यानंतर साधारण अजमासावरून समजलें. परंतु वाख्याच्या अगदीं पूर्ण भरांत कोणावरती पाळी येईल, ह्याची कांहींच अटकळ बांधतां येत नसे. निदान त्या वेळेस असा प्रवाद होता कीं, तेलाचा व तुपाचा व्यापार करणारे लोक हे खेरीजकरून बाकी यच्चयावत् श्रीमंतांपासून तों थेट गरिबांपर्यंत, ब्राह्मणांपासून तों धेडापर्यंत, राज्यकर्ते असोत किंवा अगदीं रस्त्यावरचें भिकार असो, सर्वजणांना वाखा लागण्याची भीति असे. कित्येक ठिकाणीं वाख्यानें इतका प्रळय करून टाकिला होता कीं, आळीच्या आळ्या ओसाड झाल्या. जेथें श्रावक लोकांची अति दाट वस्ती होती, असे **जव्हेरीवाडा** व **देनकुवा** या भागांतील घरांत फारच हानि झाली. रस्त्यांवरून भिकार पडलें होतें, त्यांच्यामध्यें मृत्युसंख्या घरंदाजांपेक्षां ज्यास्त सांपडावी, ह्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें; कारण तें भिकार बोलूनचालून अति कंगाल अवस्थेंत, त्याला ना धड खायाला ना प्यायाला ना पांघारायाला, असें होतें. परंतु तशी कांहीं श्रावकांची स्थिति नव्हती. ते इतर लोकांपेक्षां गवर होते. परंतु त्या लोकांचें नुकसान होण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्यांचा अमंगळपणा. एका अर्थी त्यांच्यामुळेंच वाखा उत्पन्न झाला, असें म्हणायाला कांहीं हरकत नाहीं. कारण त्यांचे पोळांत व घरांभोंवतीं इतका दुर्गंध व वाणेरडें भिकार सदा पडलेलें असें कीं, तेथून साधारण जरी मनुष्य भरदिवसां गेला तरी त्याचें कपाळ उठून त्याला वांती व्हावीच. जैनधर्माभिमानी दानधर्म करून पुष्कळ उपयोगी पडतात, व त्यांच्यामध्यें एकंदरीनें भूतदया विशेष असते ही जरी गोष्ट खरी आहे, तरीही त्यांच्यांतील असल्या अमंगळ चालींमुळें लोकांना कधीं कधीं फार पीडा सोसावी लागते. शहराच्या ह्या दोन भागांत अतोनात कहर उडाला. प्रथमत: मनुष्य वारलें कीं, त्याला लागलेंच स्मशानांत नेऊन अग्निसंस्कार करीत. परंतु पुढें जेव्हां पटापट मनुष्यें मरूं लागलीं, तेव्हां कसचा अग्निसंस्कार नि कसचें काय. भिकाऱ्यांची तर गोष्ट बोलूंच नये; त्यांचे प्रेतांचे विधी बहुतेक सरकारांतून होत असत.

ह्या वाख्याचा असला प्रळय पाहून लोकांची अगदीं गर्भगाळण झाली होती. जसा वाघ आला, म्हणजे कितीही मोठा शेळयांचा कळप असला तरी तो भीतीनें मृतप्राय होतो, व आपल्या माना वाघ जवळ आला कीं, इकडे तिकडे न पळतां त्याच्या जबड्यांत मुकाट्यानें देतो, तशी ह्या वेळीं त्या लोकांची स्थिति झाली होती. राज्यक्रांती किंवा दरवडा आला असतां मुग्ध स्त्रियांची जशी अवस्था होते, तशी ह्या वाखारूप नरव्याघ्राला पाहून मर्द म्हणविणाऱ्यांची दशा झाली, तर मग अबलांची व अनाथपंगूंची काय दशा झाली असेल बरें! पहिल्या पहिल्यांदा कोणी मनुष्य लागल्यास त्याचे आप्तसोयरे इष्टमित्र त्याची सुश्रूषा करावयाला मागेंपुढें पाहत नसत. परंतु नंतर चोहोंकडे हाहाकार झाल्यावर कोणी कोणाला पुसेना. घरांत मुलगा वाख्यानें पडला आहे, पाणी मागत आहे, तर आई पलिकडच्या खोलींत

बसली आहे. कसले इष्टमित्र व कसले आप्त-बंधू ? कोणी कोणाला ऐनप्रसंगीं बहुशः उपयोगी पडला नाहीं. जो तो आपापल्या जीवाविषयीं काळजी वाहूं लागला, व तशा-प्रसंगीं ' **कोई नाहिं आपना समज मनारे** ' ह्या उक्तीची सत्यता दिसून आली.

ज्याच्या त्याच्या मनांत एका प्रकारची ह्या भयंकर रोगाची दहशत असल्या कारणानें ह्या रोगाला आपलें प्राबल्य बरेंच माजवायाला सांपडलें. मनुष्य लागला कीं पुरें, तो प्रथमतः अगदीं गांगरून जाई, व आपण ह्यांतून वांचत नाहीं असा त्याच्या मनाचा दृढ समज झाला असल्यामुळें तो लौकरच सर्व प्रकारें त्या रोगाधीन होऊन प्राणास मुके. लोकांचीं मनें उद्विग्न होऊन त्यांना ह्यांतून कोणत्या उपायानें सुटावें हेंच समजत नसे. अगदीं जिवश्चकंठश्च जरी मरणोन्मुख पडला असला, तरी त्याच्याकडे कोणीही जिव्हाळ्याचा मनुष्य ढुंकूनही पाहत नसे. कित्येक घरांमध्यें तर एकदा मनुष्य लागला कीं, त्या घरांतल्या इतर मंडळींनीं कदाचित् आपल्यास त्याच्या संसर्गानें ती व्याधी जडेल असें भय पावून तें घर सोडावें, तेणेंकरून तो बिचारा व्याधीग्रस्त कधीं कधीं वेळेवर औषधपाणी वगैरे कांहीं न मिळाल्यामुळें लौकरच दगावे. बरें, जे भिऊन पळून लांब गेले, ते तरी नीट सुरक्षित राहिले का? छेः तसा मुळींच प्रकार झाला नाहीं. त्यांना ह्या असाध्य रोगाची धडकी भरल्यामुळें त्यांच्यावर यमराजाचे दूत लौकरच चाल करीत. ह्यामुळें चोहोंकडे लोक अगदीं हताश व उदास झाले होते. मदत करण्याची कोणासही मुळीं इच्छा नव्हती. अगदीं एकही मनुष्य गेला नाहीं, असें फारच थोड्या घरांतून झालें. कोणाचा बाप गेला, तर कोणाची आई याप्रमाणें सर्व मंडळी गेली, व आपण एकटाच कायतो, वंश निर्मूळ होईल अशी दया येऊनच जणू यमानें जाणूनबुजून वेगळ्याप्रमाणें, राहिला; असाच प्रकार बरेच ठिकाणीं झाला. प्रथमतः अगदीं जिव्हाळ्याचें मनुष्य गेलें असतां किती रडारड होई; पण नंतर तीही होण्याचें बंद पडलें. **रोज मरे त्यास कोण रडे** अशी स्वाभाविक स्थिति झाली होती. गतमनुष्याबद्दल शोक होण्याचें बंद पडून चोहोंकडे व्याधीग्रस्तांचें असह्य वेदनेंमुळें विवळणें व कण्हणें मात्र ऐकूं येई. ह्या वेळेस कोणी कोणाला पुसेना. ज्याला त्याला आपला जीव प्यारा होऊन बसला होता. अशी कांहीं अति शोचनीय अवस्था झाली होती.

अशा वेळीं ढोंगी व लबाड लोकांचें पिकलें होतें. सगळ्यांत वैद्याच्या धंद्याला फारच तेजी आली होती. ज्यानें उठावें त्यानें यमराजसहोदर व्हावें. बाकीच्या लुच्च्या लोकांनीं पंचाक्षरी व्हावें, मंत्राचे भारलेले ताईत द्यावेत, व कांहीं तरी ढोंगधत्तुरा करून भोळ्या लोकांकडून पैसे उपटावेत. कोणा तरी हकिमानें ' आज मी खात्रीचा दवा शोधून काढला आहे. ह्यानें हटकून गुण येईलच येईल. हा मला एका अवलियानें प्रसन्न होऊन दिला आहे,' अशी एकादी कंडी उठवावी कीं, लागलीच ते बिचारे संकटांनीं पिळून काढलेले लोक लागले त्याच्या दाराशीं खेपा घालायाला. शें दोनशें रोग्यांना औषध देऊन एकाद्या रोग्यास थोडा आराम पडला कीं, वैद्यानें म्हणावें 'पाहिलेंत कसें औषध रा-

मवाण आहे. नाहीं तर तो अमका फलाणें औषध देतो, व लोकांना फसवून पैसे उकळतो. पण आमचें कांहीं तसें नाहीं. येथें येण्याचाच कायतो अवकाश मग तात्काळ गुण.' वरें कदाचित् पुष्कळ लोक औषध घेऊनही मेले, अशी जरी कोणी योग्य शंका काढिली, तर वैद्याचा जवाब तयार असायाचाच 'अहो तुम्ही तरी बरेच दिसतां. अनुपानाप्रमाणें जर रोगी चालला नाहीं, तर वैद्यानें का आपला जीव द्यावा तेथें? तो **गोविंदभाई**, त्याला मी हजारदां सांगितलें कीं, पाणी पिऊं नकोस, पण त्यानें कांहीं ऐकिलें नाहीं, व मीं सांगितल्याप्रमाणें त्याचा ४-५ घटकेच्या आंत अंत झाला. जरा त्यानें एक अर्ध घटका पाण्यावांचून दम काढिला असता, तर नसता येथें तुमच्यासारखाच बोलत उभा. पण म्हणताताना **दैव मारी त्यास कोण तारी**. त्याला पाणी पिण्याची बुद्धी व्हायाला व औषधाचा गुण पाठीमागें पडायाला कां एक वेळ व्हावी?' कोणी बैरागी 'रात्रीं स्मशानांत जाऊन तेथें मढ्यांजवळ बसून वेताळाजवळून मंत्र साध्य करून घेतला आहे' अशा बाता मारून खुळसट लोकांना कांहीं अंगारा देऊन फसवीत. पण जशी बढाई मारणाऱ्या वैद्यांवर, हकिमांवर, मंत्र साधणाऱ्या फकिरांवरच वाऱ्यानें आपला अंमल बजाविण्याची सुरवात केली, तसतशी लोकांची असल्या ठगांवरची श्रद्धा वरीच उडत चालली; व खचित हा रोग दुःसाध्य आहे, अशी त्यांची पूर्णपणें खात्री होऊन ते पराकाष्ठेचे उदासीन व बेपरवा झाले.

चोहोंकडे शिवालयांतून व देवींच्या देवळांतून रुष्ट देवतांच्या कोपशांत्यर्थ अभिषेक, एकादष्ण्या, चंडीपाठ चाललेच होते; परंतु जे पाठ करणारे ब्राह्मण होते, त्यांच्यावरच ह्या राक्षसीची दृष्ट वळल्यावर कसला पाठ नी कसलें काय, ते विचारे आपला स्तुत्य हेतु विसरून जाऊन पटापट हतवीर्य होऊन तिच्या मुखकंदरांत मेंढयांप्रमाणें शिरले. मग, **शिवपार्वती**सारख्या देवतांचें सुद्धां, आपली अंतःकरणप्रेरित जी भक्ती, तिजकडे दुर्लक्ष होतें, हें पाहून रागावून भट्टांनीं त्या राक्षसीचा मोठ्या आल्हादानें स्वीकार केला कीं काय, कोण जाणें. ह्यावरून एकंदर ह्या व्याधीची शक्ती देवादिकांसही अजिंक्य होती, असें सिद्ध होतें. कारण आपल्या निःसिम दासास आपल्या दरबारांतून कोणी फरफर ओढून नेऊं लागला असतां, साधारण यःकश्चित मानवपतीला क्रोध येईल व त्या आवेशांत तसल्या उद्धट व अमर्यादशील चांडाळास तो दंड केल्याशिवाय राहणार नाहीं, मग **शंकरा**सारख्या देवाधिदेवानें स्वस्थ बसावें हें संभवेल तरी कसें? कदाचित् **महेशां**च्या मनांत लौकर प्रलय करण्याचें येऊन त्यांनीं ही व्याधीरूप शक्ती पृथ्वीवर योजून संहार करण्याचें मांडलें; परंतु पुढें आपलेच भक्त त्या शक्तीचा उपसंहार करण्याविषयीं याचीत असतां 'ह्या मानवांची बुद्धी बोलून चालून कोती. कैलासवासाचा अनुभव मिळत असतां हे नको म्हणतात, हें कांहीं योग्य नाहीं' असें मनांत आणून त्यांनीं ह्या वेळीं निद्रेचें मिष घेतलें कीं काय,

कोण जाणे. एकंदरींत असल्या पाठांपासून तादृश अर्थ मुळीं देखील झाला नाहीं.

परंतु या भयंकर व्याधीमुळें लोकांत अनाचार मात्र अतोनात वाढला. अगोदर दुष्काळामुळें चोहोंकडे धुमाळी माजली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. एकसारखी झोटींग पादशाही माजली होती, आणि तशांत व्याधीचें पाठवळ मिळालें. मग काय दुर्वर्तनाला आनंदीआनंद झाला. काल चमत्कारिक व विकट असल्या कारणानें राज्यकर्त्यांच्या हातून असल्या प्रसंगीं व्हावें तसें संरक्षण झालें नाहीं. मऱ्हाठीशाईचा ऱ्हास होत आला, म्हणून कीं काय कोण जाणें, राज्यांत अव्यवस्था पुष्कळ होती. शहरापासून ४।५ कोसांच्या अंतरावर चांगल्या सुवत्तेच्या दिवसांत हाणमार नेहमी चालली असेच; आणि मग अशा प्रसंगीं तर भर दिवसा उजेडीं शहरांत खून सुद्धां कधीं कधीं पडत. आतां एवढें खरें आहे कीं, असली वेवंदी व्हायाला म्हणजे **श्रीमंत** व **सेनाखासखेल** ह्यांचा ह्या प्रांतावर समईक अंमल हें एक मोठें कारण होतें; कारण वास्तविक पाहूं गेलें असतां असें आपल्यास आढळून येतें कीं, सर्व सूत्र जर दोन व्यक्तींच्या हातांत असलें, तर कर्तव्यकर्मांची बहुतकरून एकमेकांवर ढकलाढकल होत असते. त्यांतही आपलें काम न्यायदृष्टीनें विभागून तें मनापासून झटून सचोटीनें करणाऱ्या प्रामाणिक व्यक्ती म्हणजे बहुतकरून आढळायाच्या नाहींतच. बरें, त्या व्यक्तींपैकीं एकीनेंच आपल्या माथ्यावर सर्व बोजा घेऊन तें काम सुरळीतपणें पार पाडण्याचें मनांत आणिलें, तर मत्सरभावानें दुसरी व्यक्ती त्यांत हरप्रकारचा अडथळा करतेच. अशी जर साधारण व्यवहाराच्या संबंधानें गोष्ट, तर मग राष्ट्रांसंबंधीं किती बेबनाव होण्याचा व वाईटपणा येण्याचा संभव असतो? ह्यामुळें ह्या समईक अंमलाच्या प्रांतांत सरकाराची असावी तशी जरब कधींही नव्हती, आणि ह्या वेळीं तर शहरांत केवळ झोटींग स्वतः बादशाह होऊन लोकांना दंगाधोपा, खून, चोऱ्या, लांडीलबाडी, व दुसरीं पुष्कळ अनन्वित कामें करायाला उत्तेजन देत होता. धर्मसंबंधीं पूज्यबुद्धी लयास गेली होती. ईश्वराची भीति दिवसेंदिवस कमी होऊन त्यामुळें सर्व प्रकारचा निंद्य व्यवहार भर रस्त्यांत व उजेडांत दृष्टोपत्तीस पडत असे.

क्षणिक ऐहिक सुखाविषयीं बहुतकरून मनुष्य लोलुप असतोच. परंतु राजदंड किंवा यमदंड ह्या दोहोंच्या भयानें त्यांना इंद्रियें, अन्यायानें सुखोपभोग करूं लागणार नाहींत, अशा रीतीनें आपल्या ताब्यांत ठेवावीं लागतात. परंतु राजदंडाचा जितका पाहिजे होता तितका धाक नव्हता; व यमाचें मुख्य आणि सर्व प्रकारें कडक भीतिप्रद हत्यार जो मृत्यु तो पात्रापात्र विचार न करितां चांगल्यावाइटांचा विशेष भेद न मानतां, जणू ह्या असाध्य व्याधीला मोहून अंध होऊन, सर्वजनांवर एकसारखाच घसरूं लागला. त्यामुळें कुकर्में करून आपल्या पापबुद्धी जगाच्या प्रत्ययास आणायाला दुष्ट लोकांना फावलें. ते असा विचार करीत 'कोण केव्हां जाईल ह्याचा मुळीं थांग लागत नाहीं. चांगल्या रीतीनें

व स्वच्छतेनें आत्मसंयमन करून राहिलें,तरी मृत्यु कांहीं तशा लोकांना सोडीत नाहीं, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. रोग्यांना परोपकारबुद्धीनें मदत जे करायाला जातात, तेच परोपकारबुद्धीमुळें प्रथम बळी पडतात. जे नेमस्तपणा करितात,ते तरी कोठें जिवंत राहत आहेत? सर्व जणांना जर सारखेंच प्रायश्चित्त व शासन आहे, तर मग निदान आपलें जें कांहीं थोडेसें आयुष्य आपल्या नशीबीं असेल तें चैनबाजींत घालवून आपण सुखांत कां राहूं नये? मृत्यु कोठें कोणाला सुटला आहे, पुढचें कोणीं पाहिलें आहे? जिवंतपणीं जें पाहतों तेवढें खरें आहे, तर त्यांत कां नाहीं मजा मारिली? **गेली आजची घडी नये उद्यां रे बापांनो,** म्हणून चला सर्वजण आपली पाळी आली नाहीं तोंपर्यंत तरी निदान चैन भोगूं.'

वास्तविक पाहतां अशी ह्यांची प्रवृत्ति झाली, ह्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नव्हतें. कारण अपराधाच्या मानानें जर शिक्षा नसली व सर्व प्रतीच्या अपराधांस एकच कडक शासन असलें, तर गुन्हेगारांची संख्या कमी न होतां उलट जास्त होते, ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे.

जरी ह्या वेळेस प्रजेचें व्हावें तसें रक्षण होत नव्हतें,तरी सरकारांतून प्रजेच्या दुःखशमनार्थ बरेच स्तुत्य प्रयत्न चालू होते. ही गोष्ट त्यांना भूषणास्पद आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. दोन्ही सुभेदारांनीं रस्त्यांतून पडलेल्या मुडद्यांना मूठमाती देण्यासाठीं म्हणून जागोजाग लोक चाकरीस ठेविले होते, व मागें सांगितल्याप्रमाणें गोरगरिबांस अन्नदान होत होतेंच. पुढें पुढें तर हे मुडदेफरास घरांतून जाऊन मुडद्यांना बाहेर काढून मूठमाती देत. शहराबाहेर मोठे मोठे खळगे करून त्यांत हे मुडदे टाकून देत असत. हिंदूंच्या प्रेतांना दहनक्रियाच योग्य होती. परंतु मृतसंख्या इतकी कांहीं वाढली कीं, सर्पणाचीही बहुतेक महर्गता होऊन त्याचाही काळ पडला होता, असें म्हणायाला कांहीं हरकत नाहीं. ज्या प्रेतांना नातेवाईक घेऊन जात असत, त्यांना जाळायाला नंतर घराच्या तुळया, दारें वगैरे कांकडी सामान काढून द्यायाला देखील लोकांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. परंतु इतकेंही करून शहरांत असा कांहीं दंगा चालला असे कीं, एका मंडळींनीं सरण रचावें तर दुसऱ्याच एकाद्या टोळीनें येऊन हाणमार करून त्या सरणावर आपलें प्रेत जाळावें. कित्येक ठिकाणीं अर्धमुर्ध जळलेल्या मढ्यावर दुसरेंच एकादें मढें जाळायाला टाकीत. कित्येक तर श्मशानांत प्रेत नेत असतां वाटेंतच टाकून देऊन घरीं परत येत. अशी कांहीं चोहोंकडे पुंडाई व अधार्मिकपणा माजला होता; व ही साधारण मध्यमप्रतीच्या लोकांची स्थिति होती, तर मग गरीब लोकांची स्थिति ह्यापेक्षां किती शोचनीय असेल बरें?

**पंडित, कोतवाल** इत्यादि सरकारी कामदार दररोज शहरांत पहाणी करायाला स्वतः जात असत. आपल्या नोकरांची कसूर दिसल्यास त्यांना ते तत्क्षणीं शासन करीत असत; परंतु त्या शासनापासून त्या अधमांच्या मनावर तादृशही ठसा बसत नसे. अन्नछत्रांच्या कारकुनांविषयीं व मुद-

देफरासांविषयीं त्यांच्या कानांवर अश्राव्य अशा कागाळ्या आल्या, व कित्येक ठिकाणीं तर लोक बेफाम होऊन अनाचार करितांना त्यांनीं भररस्त्यांत देखील पाहिलें. असल्या हालअपेष्टेंत कामांधपणा अतिशय वाढला होता ह्याचेंच मोठें आश्चर्य वाटतें; व कांहीं कांहीं ठिकाणीं तो पशूंसही लाजविणारा असा आढळून येत असे. अन्नपाण्यावांचून ज्या स्त्रियांच्या सुकुमार देहांपैकीं अस्थिशेष कायतो दृष्टीस पडत असे, तशांनाही नरपशूंनीं कुकर्माकडे न्यावें हें आश्चर्य नव्हे काय? सर्व प्रकारें विपरीतपणा चोहोंकडे दृष्टीस पडत होता. नारीजनांनीं लज्जा व कोमलता सांडली, पुरुषांनीं पुरुषांस अयोग्य असें क्रूर व निंद्य वर्तन ठेविलें, पशूंपैकीं शहरांत जीं कुत्रीं राहिलीं होतीं, त्यांनीं नरमांसावर अभिरुचि धरिली, व ह्या व्याधीग्रस्तांचें मांस खाल्ल्यापासून पटापट प्राणांसही मुकलीं, मनुष्यांनीं देखील असाच असुरीपणा करायाला सोडला नाहीं— ह्या सर्वांमुळें प्रत्यक्ष कलि निर्विघ्नपणें राज्य करूं लागला कीं काय असें वाटे.

हा काळ म्हणजे सर्वतोपरी दुःखमय होता. ह्या वेळेस पृथ्वीवरच यमानें आपलें राज्य व नरक आणून ठेविलीं होतीं. चोहोंकडे दैना, अन्याय, अधमपणा, रडारड, क्रूरपणा, निंद्यपणा दिसत होते. हरहर असली स्थिति कोणत्याही कट्या शत्रूवरही येऊं नये, अशी प्रत्यक्ष नराधमाची देखील इच्छा होईल; मग असला गहजब **गुजराते**सारखा सुखी प्रांतावर कोणाच्या शापानें झाला असेल तो होवो. ह्या हतभाग्य लोकांच्या छळापुढें **हरिश्चंद्र, नळ** इत्यादिकांचा पुराणांतरीं वर्णिलेला छळ कांहींच नव्हे. कवींनीं केलेल्या काल्पनिक दुःखांचीं वर्णनें ह्या वेळीं केवळ अपूर्ती होतीं असें म्हणावें लागतें. ह्या वेळीं हे लोक निर्दयतेनें यमाप्रमाणें, पापाचरणानें हिरण्यकश्यपुसारिख्या राक्षसाधमांस लाजविणारे, दुःखानें दगडास देखील पाझर आणविणारे, असे होते. ज्यांच्या दुःखांकडे पाहून शोक तेथून त्या वेळीं प्रयाण करिता झाला, मोह अंतर्धान पावला, काम व लोभ बळावला, प्रेम भिऊन कामाला व मोहाला सोडून फरारी झालें. ज्यांच्या कृश देहावर गुल्म व व्रण पाहून व अंगाचा दाह पाहून आकाशाचें अंतर अति दुःखानें होरपळून जाऊन त्याच्यानें अश्रूंचा वर्षाव देखील करवेना. ज्यांचीं पापें पाहून अग्नीनें शरिरास स्पर्श करण्याचें सोडलें. असे हे कृपेला दीन, लज्जेला हीन, सर्वतोपरी अनाथ होते. **विष्णू**नें अशा वेळीं **शंकरा**च्या घरीं कांहीं दिवस वास्तव्य केलें, व **लक्ष्मी** आपल्या थोरल्या बहिणीच्या येथें रहायाला गेली. मेंढपाळानें ओसाड व निर्जल रानांत मेंढ्यांना सोडल्यावर त्यांची जशी स्थिति, तिच्यापेक्षांही ज्यास्त भयंकर दुःखद स्थिति यांची होती. परमदयाळू ईश्वरानेंच सोडल्यावर दयाळूपणा दुसऱ्या कोणाकडून ह्यांना मिळेल बरें?

ह्या भयंकर व्याधीपासून आपल्या ओळखीचे असे बरेच लोक दगावले. **विठूजी** सातारकराची प्रथमतःच गठडी वळली, व त्याला ह्या क्लेशदायी मृत्यूनें एकाप्रकारें फार चांगलें शासन झालें, असें म्हणायाला कांहीं चिंता नाहीं. ह्या दुष्टानें दुष्काळांत बराच ताळ सोडला होता.

याला अगदीं प्रथमतःच वाखा झाला असल्याकारणानें **सटवाजीराव** त्याच्या समाचारास गेला होता. परंतु **विठूजीचे** हाल हाल होऊन तो प्राणास मुकलेला पाहून, **सटवाजीरावास** आपल्या कृतपापांची आठवण होऊन अतिशय भीति वाटली. तो शवाबरोबर श्मशानांतदेखील गेला नाहीं. समाचार घेऊन घरीं परत येत असतां वाटेंत भिकाऱ्यांच्या एका झुंडीनें दंगा केल्याकारणामुळें त्यांचा घोडा बिचकला, व हे पृथ्वीच्या भेटीस तांतडीनें आले. त्यामुळें **सटवाजी**ला थोडीशी दुखापत झाली; परंतु आपल्याला पुष्कळ लागलें आहे असा मनाचा समज करून तो बरेच दिवस घराबाहेर पडला नाहीं, व जो समाचारास येई त्याला म्हणे 'काय सांगूं, एथल्या हकिमांना मुळींदेखील अक्कल नाहीं. मला किती लागलें असून हे चांडाळ म्हणतात, कीं आतां कांहीं दुखापत नाहीं म्हणून—(कण्हत) माझ्यानें नीट बोलवत देखील नाहीं. (मान वांकवून) ही पहा मान वांकवत सुद्धां नाहीं. मी इतका सहनशील आहें म्हणून बरें; नाहींतर दुसऱ्याची ह्या दुखापतीनें केव्हांच गच्छंती झाली असती?' ह्याचें निष्कारण विवळणें ऐकून लोक गालांतल्या गालांत हसत. परंतु पुढें घरच्या मनुष्यांपैकीं दोन दगावलीं, हें पाहतांच त्यानें रजा घेऊन **बडोद्यास** पळ काढला.

**भद्रेंत** ह्या वाख्यापासून म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं, तरी सरकारवाड्यांत सुमारें ३५ मनुष्यें गेलीं. शहरांत **निळकंठभाई**च्या येथें **बेचरा**चा बाप व भाऊ हे दोघेही दगावले. **कोतवालां**च्या येथें ४ गडीमाणसें गेलीं. परंतु म्हणण्यासारखें नुकसान **हरिसिंगा**च्या घरीं झालें. **रायपुरांत** त्याची चुलती राहत होती, ती बिचारी वाखा लागून तिसऱ्या दिवशीं गतासु झाली. **माधोसिंगा**ला अतोनात दुःख झालें; परंतु पुढें **हरिसिंगा**नें त्याला आपल्या घरीं आणून ठेविलें. चुलतीच्या दुखण्यांत **केसरिसिंगा**नें जिवापलीकडे मेहनत केली होती; पण त्या मेहनतीचा परिणाम त्याच्यावर फार भयंकर झाला. चुलतीला पोंचवून ते परत आले नाहींत, तोंच **केसरिसिंग** दुखणाईत पडला. त्याला एक दोन दिवस मुळींच बरें वाटत नव्हतें. परंतु कदाचित जागरणानें हा थकवा आला असेल असें त्याला वाटलें. नंतर त्याला तुरळक बारीक ताप आला व तो वळावत जाऊन दुसऱ्या दिवशींच वाख्याचीं सर्व चिन्हें त्याच्या अंगावर दिसूं लागलीं होतीं. घरांत करतींसवरतीं कायतीं दोन मनुष्यें, **हरिसिंग** व **सदू. माधोसिंग** दुःखानें अगदीं विव्हळ होऊन पडला होता, म्हणून त्याच्यानें कांहीं कामही होईना, व त्याला कांहींच सूचेना. **हरिसिंग** रात्रभर जागला असल्यामुळें त्याला दिवसां स्वाभाविक झोंप घ्यावी लागे. मग **केसरिसिंगा**ची सर्व तरतूद **सदू**लाच करावी लागे. ह्या बिचाऱ्यांना ही भीति पडली कीं, न जाणो हा रोग एकदा घरांत शिरला, तर तो समूळ आपला नाश करितो कीं काय. परंतु ईश्वरदयेनें तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. **सदूनें केसरिसिंगा**ची मोठ्या काळजीनें शुश्रुषा केली. पाणी मागितलें, पाज पाणी. डोकें दुखतें, चेंप तें. अंगाचा अतिशय दाह होत

असल्याकारणानें तिनें वरचेवर ओल्या कपड्यानें वारा घालावा. **हरिसिंगानें** एका **करीमबक्ष** नांवाच्या हकिमाला जाऊन विचारिलें. त्यानें सर्व अंगास तेल लावावयाला सांगितलें. त्याप्रमाणें करून पाहतां **केसरिसिंगा**च्या अंगाची लाही किंचित् कमीही झाली. परंतु आवडतें मनुष्य घरांत दुखणेकरी पडलें असलें, म्हणजे केव्हां प्रकृतीस आराम पडतो व ती अगदीं निकोप होते, अशी साधारणत: घरांतल्या मनुष्यांची स्थिति होते. त्याप्रमाणें **हरिसिंग** व त्याच्या बायकोची स्थिति स्वाभाविकपणें झाली. **हरिसिंगानें** दुसऱ्या एका **घेलाभाई** नांवाच्या नवीन वैद्याची ख्याति ऐकून तो त्याच्या येथें गेला. त्या वैद्यानें नवीन औषध शोधून काढिलें होतें. **हरिसिंग** जातांच प्रथमत: त्या वैद्यानें म्हटलें 'कां, गांवांतले सर्व वैद्यांचे हात थकलेका? काय तुम्ही बेअक्कल लोक अहांरे? मनुष्य अगदीं अर्ध्या श्मशानापर्यंत गेला, म्हणजे तुम्ही मजसारख्या धन्वंतऱ्याकडे येतां. वाखा लागल्या, बरोबर मजजवळ कां येत नाहीं? (जवळच्या मंडळीपैकीं कांहींकडे दाखवून) हे पहा, ह्यांना औषध देऊन अगदीं काळाच्या दाढेंतून सोडविलें, परंतु तुम्हां लोकांना ह्यांच्यासारखी अक्कल कोठें? मजजवळ अशीं कांहीं रामबाण औषधें आहेत कीं, मनुष्य कसाही काळाच्या दाढेंत सांपडला असो, त्याची हा पठ्या सुटका केल्यावांचून राहणार नाहीं. बरें तर, तुम्ही आतां घरीं जा; व त्याला कढत पाण्याचें स्नान घाला. मी हा आलोंच. म्हणजे मग त्याच्या धमनींतलें दूषित रक्त काढून तीं शुष्क करितों, कीं [illegible]वडतोब हटकून गुण आलाच म्हणून मजा.'

**हरिसिंग** हें चऱ्हाट ऐकून घेऊन कांहीं बोलतां परत घरीं आला. त्या दिवशीं [illegible]**सरिसिंगा**ची अत्यवस्था होती. एकदां [illegible]र त्याला खालींसुद्धां काढिला होता. नव[illegible]बायकोचीं तोंडें काळजीनें व दुःखानें [illegible]गदीं कोमेजून गेलीं होतीं. परंतु करितात [illegible]ाय? रात्रभर दोघांचा मुळीं डोळा लागला [illegible]हीं. **केसरिसिंगा**ला मुळींच चैन नव्हतें. [illegible]सला तो सहनशील, परंतु ह्या वेळीं अ[illegible]दीं निरुपाय होऊन तो कण्हत होता. नंतर [illegible]गदीं सकाळच्या प्रहरीं त्याला थोडा डोळा [illegible]गला, व तेव्हांपासून त्याला आराम पडत [illegible]ऊन तो एक महिन्यानें साधारण हिंडू [illegible]रूं लागला. त्याच्या अंगावरचे फोड [illegible]टून त्यांचीं व्रणें भरून आलीं. परंतु ह्या [illegible]खण्यामुळें त्याची पूर्वींची शक्ति कांहीं [illegible]धींही परत आली नाहीं; व तो त्याचा पूर्वींचा [illegible]ल्हासही गेला. आपल्या भावानें व भावज[illegible]नें आपल्याविषयीं फार फार हाल सोसले, [illegible] पाहून ह्यांचा केव्हां उतराई होईन असें [illegible]ाला झालें. तो नंतर वरचेवर म्हणून [illegible]ाखवी 'वहिनी, कांहीं म्हण, तुम्ही होतां, [illegible]हणून मला हे दिवस दृष्टीस पडताहेत. [illegible]हींतर मी केव्हांच पार व्हायाचा. मी हें [illegible]न्मभर कधींही विसरणार नाहीं.' ती म्हणे [illegible]भावोजी, त्यांत आम्हीं ज्यास्त तें काय केलें? [illegible]रांत दुखणाईत असलें, तर त्याचा समा[illegible]ार परक्यांनीं कां घ्यावयाचा? हें काय [illegible]ोलणें, नाहींतेंच?'

# भाग १५.

## स्वामी सहजानंद.

केसरिसिंग दुखण्यांतून उठून हिंडूं फिरूं लागला, त्या वेळेस शहरांतील वाखा बराच कमी झाला होता. अतिशय प्राणहानि झाल्याकारणानें व दुसऱ्या प्रांतांतून धान्याचा पुरवठा चांगला झाल्यामुळें दुष्काळानेंही आपलें ठाणें हळू हळू उठविण्याचा बेत केला. ह्या दोन्हीं कारणांमुळें रयतेला बराच धीर आला. पूर्वी जें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें होतें, व त्यांच्यामध्यें जें पराकाष्ठेचें औदासिन्य भरलें होतें, तें जाऊन जो तो आपापल्या कामधंद्याला लागूं लागला. विकट संकटांतून सुटल्यामुळें त्यांना अतिशय संतोष झाला. परंतु असल्या सुखाच्या दिवसांत आपल्या संतोषाचा विभागी कुटुंबांतला कोणी मनुष्य घरांत न उरल्यामुळें कित्येक लोकांना तसेंच, वाईटही वाटलें. आपला जीव असल्या भयानक काळांतून वांचला खरा, परंतु आपल्या जिव्हाळ्याचें कोणीही मनुष्य राहिलें नाहीं, म्हणजे उलट आपण वांचलों हेंच परमदुःखदायी होतें. शेतकरी वगैरे खेडेगांवांतून आलेले लोक परत आपआपल्या गांवीं जाऊं लागले. परंतु कित्येक गांवें तर जशींचींतशींच ओसाड पडलीं तीं पडलीं. कारण त्या गांवांत परत जाण्याला काळाच्या जबड्यांतून एकही मनुष्य वांचला नाहीं. खालसा अंमलांत कांहीं कांहीं कुळांना सरकारांतून पैशाची पुष्कळ मदत झाली; व इतर ठिकाणीं तशाप्रकारचें कांहीं शक्त्यनुसार करण्याविषयीं शेटसावकार व गिरासदार यांना कमाविसदारांमार्फत सूचनाही झाली होती.

ह्याप्रमाणें सुखासमाधानाचे व सुवत्तेचे दिवस परत लौकरच येतील अशी जेव्हां चोहोंकडे लोकांची पक्की समजूत झाली, तेव्हां त्यांच्या मनाला किती म्हणून आनंद झाला? काळ व वाखा यांमुळें बंद पडलेले धंदेरोजगार पूर्ववत् चालू झाले. बेबंद बादशाहीचा लौकरच लय होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. दिवसेंदिवस अनाचारही कमी कमी होत चालला. रस्त्यांतून भिकारही अदृश्य व्हायाला लागले; व कंगाल अवस्था जाऊन हळूहळू भरभराटी होत चालली. लोक जरी कृश दिसत होते, तथापि त्यांच्या तोंडावर उत्साहवृत्ति दिसत होती. पूर्वीसारखे दुर्मुखलेले लोक फार थोडे आढळून येत.

वास्तविक पाहतां लोकांना इतकें समाधान व आनंद मानण्याला फारसें कांहीं कारण नव्हतें. अजून दुष्काळ कांहीं सर्व प्रकारें नाहींसा झाला नव्हता. बाजारभावांत बरीच चणचण होती. वाखाही तुरळक तुरळक होताच. मग लोकांना इतकें समाधान कां वाटलें? साधारणतः प्राणिमात्रांची अशी वृत्ति असते कीं, त्यांच्या दुःखामध्यें थोडीशी जरी न्यूनता झाली, तर

त्यांना हटकून समाधान होतें. सुख व दुःख हे तारतम्यमूलक मानलेले पर्याय आहेत. अमुक व्यक्तीला अमक्या एका गोष्टीनें जितकी सुखप्राप्ति होते, ती गोष्ट दुसऱ्या व्यक्तीला तितकें सुख देते असें नाहीं, व क्वचित् प्रसंगीं तीच केवळ दुःखदही होते. उदाहरणार्थ, आपण एक श्रीमंत व एक कावाडकष्ट करणारा, असे दोन मनुष्य घेऊं. अतिपरिचयामुळें पंचपक्वान्नी भोजन श्रीमंताला कांहीं विशेष सुखप्रद नसतें; परंतु तेंच भोजन त्या गरीब मनुष्याला अमृताप्रमाणें मधुर भासून किती बरें सुख वाटतें ! तशीच सर्व विषयोपभोगांची गोष्ट होय. अमुक एक स्थिति सतत जर आपण अनुभवूं लागलों, तर तिजपासून चमत्कारिक परिणाम होतात. पहिल्यापासूनच ती जर सुखप्रद असली, तर तिचें नित्य अवलंबन झाल्याकारणानें तिच्याविषयीं ताटस्थ्य उत्पन्न होतें. परंतु तीच जर दुःखद असली, तर जोंपर्यंत आपल्या वृत्तीला तिचें पक्कें वळण बसलें नाहीं, म्हणजे जोंपर्यंत तिचें नूतनत्व पूर्णपणें लयास गेलें नाहीं, तोंपर्यंत कोणत्याही प्रकारचें कमी क्लेशद स्थित्यंतर अनुभूत स्थितीच्या केवळ विरोधानें सुखप्रद वाटतें. आणि एकदा का त्या स्थितीचा दृढ सहवास झाला, म्हणजे कालगतीनें तिच्याविषयीं आपण वैषम्य मानीनासे होतों. एकंदर ह्यावरून असा सिद्धांत निघतो कीं, सुखप्राप्ति होण्याला स्थित्यंतरें, स्थलवैचित्र्य, व वस्तुनानात्व पुष्कळ कारणीभूत असतात. त्याप्रमाणें ह्या दुष्काळपीडित व्याधिग्रस्त लोकांच्या दुःखामध्यें, पूर्वींच्या भयप्रद प्रकाराशीं ताडून पाहतां, थोडीशी कमतरता पडतांच, दृढ बंधन शिथील झाल्यानें जसें एकाद्या अवयवाला सुख वाटतें, तद्वत् त्यांना सुख वाटलें ह्यांत नवल नाहीं. वास्तविक नुसत्या ह्याच कमतरतेनें सर्व प्रकारें दुःखांच्या आदिमूळांचा नाश झाला, असें ते मुळींच समजत नव्हते; परंतु पूर्वींच्या स्थितीपेक्षां हल्लींची बरी, म्हणून त्यांना आनंद झाला होता.

ह्या वेळीं एके दिवशीं सकाळीं **आनंदशंकर** बाजारांतून जात असतां त्यास **माधोसिंग** भेटला. आई गेल्यापासून **माधोसिंग** झुरत चालला होता. **हरिसिंग** व **सदू** **माधोसिंगा**ला विसर पडावा म्हणून आपल्याकडून पुष्कळ यत्न करीत; परंतु **माधोसिंगाचें** दुःख अगदीं नवीन असल्यामुळें त्यानें घेतलेली खंत कांहीं कमी झाली नाहीं. असो. **माधोसिंगा**ला पाहतांच **आनंदशंकरानें** जवळ जाऊन त्याचा हात धरिला व म्हटलें '**माधोसिंग**, तूं मला चुकवून जात होतास, हें तुला शोभतें का? अशीच का आपली मैत्री ?'

**माधो०–आनंदशंकर**, तुला मी चुकवीत नव्हतों. परंतु मला वाटलें तुला कांहीं नेकडीचें काम असेल, म्हणून मीं तुला हांक मारिली नाहीं. आणि खरेंच सांगूं का, मला आतांशीं मुळींच चैन पडत नाहीं. मला एकटें फिरावेसें वाटतें. कोणाशीं बोलूं नये कीं चालूं नये. मी म्हणजे तुझ्याशींच असा वागतो असें नाहीं. तूं जवळ असलास म्हणजे मला बरें वाटतें. ( डोळ्यांत पाणी आणून ) परंतु काय करूं रे, मला

मुलीं देखील करमत नाहीं. आई मला टाकून गेली, तर मी येथें एकटा कसा राहूं हें तूंच सांग.

आनंद०–हें काय बरें, असें वेड्यासारखें करतोस? असें दुःख करून का कोठें माणसें परत मिळत असतात? असेंच दुःख गिळलें पाहिजे. ( गहिंवरून ) पण **माधोसिंग**, तुला जर इतका जगाचा कंटाळा आला, तर मीरे काय करावें? अरे मला आईना बाप. लहानपणींच मी उघडा पडलों. तुझे सखे चुलतभाऊ तरी आहेत. ते अगदीं तुला जीवापलीकडे ठेवितात; आणि मग उगाच खंत करून त्यांना कां दुःख देतोस? झालें त्याला कोणाचा उपाय आहे बरें? ईश्वर त्यांतच चांगला दिवस दाखवील. तूं जर असें केलेंस, तर मग ज्यांचीं अगदीं घराचीं घरें ओस पडलीं, त्यांनीं का आपला जीव द्यावा? कांहीं नाहीं, अशी धास्ती घेऊन उगाच वाळत मात्र चालला आहेस. तर हें सारें टाकून दे. चारचौघांमध्यें बसून वेळ घालवीत जा. दुपारून पाहिजे तर आमच्या घरीं येत जा. नाहीं तर मीच तुझ्या येथें येईन. म्हणजे **केसरिसिंगा**लाही करमणूक होईल. पण **केसरिसिंग** आज दोन दिवसांत कसा आहे?

माधो०–भाऊ आज दोन दिवसांत बराच चांगला झाला आहे. पूर्वीसारखी कांहीं शक्ति अद्याप आली नाहीं, पण तो १०-५ दिवसांत बाहेर देखील जाऊं लागेल. पण गड्या, तूं आमच्या येथें कसा येशील? **निळकंठभाई** आमच्या येथें तुला दुपारचे येऊं देतील का? मीच तुझ्या येथें आलों असतों, परंतु भाऊ एकटाच घरीं बसेल. त्याच्याशीं बोलायचालायाला कोणी पाहिजे. आणि तूं जर आलास, तर आम्हां सर्वांना फार फार बरें वाटेल. तुझ्याशीं बोलत असलों, म्हणजे मला पूर्वीची आठवण देखील होत नाहीं. आणि वहिनीला व भाऊला देखील आनंद होईल.

आनंद०–मी बहुतकरून येईनच तर, आणि मला बाबा येऊं देतीलसें वाटतें. नाहीं तर मी एक युक्ति करितों. मी ताईलाच विचारितों; म्हणजे ताई बाबांना विचारून मला येऊं देईल. आणि ४-५ दिवसांसाठीं बाबा कांहीं ताईला नाहीं म्हणणार नाहींतसें वाटतें.

माधो०–तूं आलास तर, आपण दोघेजण व भाऊ व वहिनी सोंगट्या खेळूं, म्हणजे भाऊला बरें वाटेल. दादा जाईल कामावर. मग आपण गंमत करूं. पण तूं चाललास कोठें?

आनंद०–मी आतां घरीं परत चाललों आहें. भद्रेत **शास्त्रीबोवांच्या** येथें म्हणायाला गेलों होतों. पण खरेंच, तूं मजबरोबर घरीं चल, म्हणजे मी दुपारून येईन किंवा कसें, हें ताईला विचारून तुला लगेच सांगतों. म्हणजे तूं घरीं सोंगट्या, पट बाहेर काढून ठेवशील.

माधो०–हो, माझ्या मनांतही तेंच होतें.

ते दोघेजण हातांत हात घालून मोठ्या आनंदानें मुकाट्यानें कांहीं वेळ गेले. नंतर **आनंदशंकर** म्हणाला–पण **माधोसिंग**,

तुला मी एक गोष्ट सांगायाची अजीबात विसरलों. दोन दिवसांपूर्वी रात्रीं मला एक फार भयंकर स्वप्न पडलें, त्यामुळें मी दच-कून ओरडत उठलों. वाऱ्यानें मनुष्यें जात, त्यामुळें तर मला अतिशय दहशत वसली आहे. संध्याकाळ झाली कीं पुरे, मला अं-धारांत अगदीं जाववत नाहीं. वाटतें कीं, मला कोणी भूत तर येऊन धरणार नाहीं. त्यामुळें मला कांहीं दिवस प्रेतांचीं व भु-तांचीं स्वप्नें पडत. परवां जें कांहीं पडलें त्याची आठवण झाली म्हणजे मला कांपरें भरतें. मी तुला सांगू का?

माधो०-हो हो सांग तर खरें. मी नाहीं तुझ्यासारखा भ्यायाचा समजलास.

आनंद०-पण माझ्यानें नाहीं सांगवत. तूं दूर नको जाऊं हो. माझा हात घट्ट धरून बैस, म्हणजे मला धीर येईल. काय झालें, मला वाटलें कीं, अगदीं मध्यरात्रीं मी अ-गदीं एकटाच श्मशानांत गेलों—

आनंदशंकर भीतीनें स्तब्ध राहिलासें पाहून माधोसिंग त्याला म्हणाला-वरें मग, काय झालें तें सांगशील कीं नाहीं? आतां कांहीं रात्र नाहीं. आणि मी आहेंना तुझ्या-जवळ? भुतें नाहीं भुतांचा बाप असला, तरी मी त्यांना तुझ्या केशालाही धक्का लाऊं देणार नाहीं.

आनंदशंकर अगदीं माधोसिंगाच्या जवळ जाऊन हलक्या स्वरानें म्हणाला-मग काय, चोहोंकडे प्रेतें जळत सरणा-वर पडलीं आहेतसें मीं पाहिलें. आजूबाजूला कांहीं प्रेतें डोळे फाडून जबडा वासलेलीं, हातपाय आंखडलेलीं अशीं जमिनीवर लो-ळण घेत होतीं; व कांहीं अकाळविकाळ राक्षस-( घोगऱ्या आवाजानें ) अरे माधो-सिंग, मला तूं जवळ घे. नाहीं तर मला तो आपल्या दाढेंत घेईल.

माधोसिंगानें त्याच्या कंबरेभोंवतीं हात घालून त्याला जवळच्या एका घराच्या ओट्यावर नेऊन बसविलें; नंतर तो म्हणाला—हा भित्र्या, अरे भर उजेडांत का तूं इतका घावरतोस? मला नव्हतें ठाऊक कीं, तूं इतका भीशील. मला नको स्वप्न सांगूं. अरे बोलून चालून तें स्वप्न, आणि तें का तूं खऱ्याप्रमाणें मानतोस? काय लटलट कां-पतो आहेस? माझा हात इतका आवळूं नको. मला कळ लागली आहे. समजलें पुढें काय स्वप्नांत असेल. तूं मग किंकाळी फोडून उठला असशील वाटतें.

आनंदशंकर—होय, तसें झालें खरें. बावा मला आपल्या खोलींतच निजवीत होते, म्हणून बरें. ते मजजवळ आले, परंतु मला कोठें शुद्ध होती? मी एकसारखा किंका-ळ्यांवर किंकाळ्या फोडीत होतोंच; व ते जवळ येतांच मीं त्यांच्या गळ्याला घट्ट मिठी मारिली. माझ्या किंकाळ्या ऐकून सर्व गडीमाणसें जागीं झालीं. बेचरानें ताईला जाऊन सांगितलें कीं, मला वाखा झाला म्हणून. ताई व माणेकभाई आले आपल्या घरां-तून धांवून. परंतु ते आंत येण्यापूर्वी मी सावध होऊन इकडे तिकडे डोळे फाडून कावरेबावरेपणानें पाहत होतों. बावांनीं काय वाटलें म्हणून मला विचारिलें. मी नुसतें ‘ मला ते खातील. बाबा मला सोडूं नका, ते तेथें लपले असतील ’ असें म्हणूं लागलों. माझ्या साधारण असंबद्ध बडब-

डण्यावरून मला तसें स्वप्न पडलें असेल, असा त्यांनीं तर्क केला. ताई आल्यावर तिनें लागलीच मजजवळ येऊन माझ्या बाळयाला काय झालें म्हणून अगदीं कंठ भरून येऊन विचारिलें. पण बाबांनीं 'वाखा वगैरे कांहीं नाहीं, उगाच भ्याला आहे' असें तिला सांगतांच तिनें मीठमोहऱ्या आणून माझी दृष्ट काढिली. रात्रभर ती व बाबा मजजवळ अगदीं बसलेलीं होतीं. परंतु तेव्हांपासून मला रात्रीचें कोठेंही खोलींत जावयाचें असल्यास बाबा सोबतीस लागूं लागले.

**माधो०**–अरे, तूं तर भीशील ह्यांत कांहीं नवल नाहीं; परंतु आमचा भाऊ देखील आतांशीं इतका दुखण्यानें भित्रा झाला आहे कीं, दादाला रात्रभर त्याच्या खोलींत निजावें लागतें. बरें, ह्याला कांहीं उपाय केला का दुसऱ्या दिवशीं ?

**आनंद०**–होय. दुसऱ्या दिवशीं मी सकाळीं नित्याप्रमाणें **भद्रें**त कां गेलों नाहीं, असा **शास्त्रीबोवां**नीं शोध काढविला.त्यांनीं लागलीच मजसाठीं थोडासा अंगारा पाठविला व मला नित्य शिवकवचाचा पाठ करावयाला सांगितलें; त्यामुळें मला आतांशीं तसलीं स्वप्नें पडत नाहींत, व रात्रभर मला निवांत झोंप लागते. मला वाटतें तसला थोडा अंगारा तूं आमच्या घरांतून **केसरिसिंगा**साठीं घेऊन जा, म्हणजे त्यालाही आराम पडेल. पण मला ताईची मोठी मौज वाटते. मी जणू एकादें लहान पाळण्यांतलें मूल आहेसें तिला वाटतें. आतांशीं ती संध्याकाळीं माझी दृष्ट काढीत असते; व जरा कोठें बाहेरून यायाला वेळ लागला कीं गड्याला शोधासाठीं पाठविते.

**माधो०**–तशीच आमची वहिनीही मोठी अधीर असते. एकादेवेळेस जर मी थोडें कमी जेवलों, तर 'काय होतें' असें विचार विचारून माझा अगदीं पिच्छा पुरविते. निजायाला उशीर केला कीं,लागली रागें भरायाला. मलाच असें वागविते असें नाहीं. आतां भाऊ तर कांहीं कोणी लहान म्हणणार नाहीं, पण त्यानें जरा थोडेसे हातपाय जास्त हालविले, कीं लागली ती त्याला बोलायाला. ही इतकी काळजी घेते, हें पाहून आम्हांला मोठें कौतुक वाटतें; व मी तर कधीं कधीं तिला मुद्दाम खिजविण्यासाठीं बळेंच कांहीं तरी तिच्या म्हणण्याविरुद्ध करितों कीं, लागलीच ती संतापायाला. बरें, मीं जर थोडासा राग आलासें दाखविलें कीं, लागली ती माझी समर्जी करायाला. अशी कांहीं तिची मजा मजा असते.

याप्रमाणें बोलत चालले असतां ते **पाणकोर** नाक्याजवळ आले. तेथें त्यांनीं **रामानंद** ब्रम्हचारीबावांच्या वाडींत पुष्कळ लोक जात आहेतसें पाहिलें. ही वाडी त्या बोवांनीं शके १७०१ च्या सुमारास बांधिली होती. जाण्याचें कारण विचारितां स्वामी **सहजानंद** नांवाचे कोणी महान् साधू आज लोकांना उपदेश करणार आहेत, असें त्यांना कळलें. पुढें आंत जाऊन काय मजा आहे ही पाहावी, किंवा घरीं उगाच वाट पाहत असतील तर घरीं जावें, असे ते घोंटाळ्यांत पडले असतां, **निळकंठभाईं**नीं वाडींत शि-

रतांना ह्यांना बाहेर उभें राहिलेलें पाहिलें. लागलीच ह्या दोघांना जवळ बोलावून ते त्यांना घेऊन आंत गेले.

हल्लीं प्रसिद्धीस पावलेला जो **स्वामीनारायण** पंथ त्याचे संस्थापक **सहजानंद** स्वामी हे होत. हे त्या वेळेस सुमारें ३३ वर्षांचे होते. हे मूळचे **लखनौ** प्रांतांतील ब्राह्मण होत. जन्मतः ह्यांची ईश्वरपरायणता असल्याकारणानें सर्व संसाराचा यौवनावस्थेंतच त्याग करून केवळ लोककल्याणासाठीं जनांस सदुपदेश करीत हे फिरत फिरत **गुजरात**प्रांतीं आले. लोकांस चांगला मार्ग दाखवून पापाचरणापासून पराङ्मुख करावें, हें ज्यांचें कर्तव्यकर्म असे जे धर्माधिकारी व निरनिराळ्या पंथाचे आचार्य, तेच दुराचरणी; तर मग त्यांच्या अनुयायांची काय गत होत असेल, असा विचार करून ह्या परमनिःसीम भगवद्भक्ताचा सगळा कटाक्ष तसल्या दांभिक पुरुषांवर फार असे. ह्यामुळें प्रथमतः सर्व जातींच्या लोकांनीं त्याचा फार छळ केला; परंतु पुढें त्यानें लोकांना कांहीं चमत्कार दाखविले, व त्याचें आचरण सर्वतोपरी शुद्ध होतें; ह्यामुळें कांहींजणांनीं त्यास गुरु करून त्याजजवळून दीक्षा घेतली. याप्रकारें याचा पंथ हळूहळू वाढला. कुपथ टाकून सत्पथ धरा, व **श्री कृष्णजीं**ची कायावाचामनें करून भक्ती करा, एवढेंच कायतें ह्याचें लोकांना सांगणें असें. आचरण शुद्ध ठेवून ऐहिक व पारत्रिक दोन्हीही न्याय्य सुखोपभोग मिळतात, असा ह्याचा सिद्धांत होता. **वल्लभाचार्या**दिकांनीं घालून दिलेल्या पद्धतींत ह्यानें बरीच सुधारणा करण्याचें मनांत आणिलें होतें. महाराजांना **कृष्ण** समजून तनमन अर्पण करावें, व तेणेंकरून धार्मिकपणाच्या आवाखालीं दुष्ट प्रवृत्तींस अवसर मिळावा, हें हा परमनिंद्य समजत असे. देवाच्या व धर्माच्या नांवावर आपलें कपट व पापजाळ भोळसर व अक्कलशून्य स्त्रीपुरुषादि अनुयायांवर पसरणारे धर्मगुरु यांजवर हा आपलें वाग्रूपी शस्त्र चालवायाला मुळीं भीत नसे. ह्यामुळें तत्तत्पंथानुयायी व आचार्य ह्याचे कट्टे द्वेष्टे झाले, ह्यांत कांहीं नवल नव्हतें.

**निळकंठभाई** आंत गेल्यावर त्यांनीं मंडळीची खूप गर्दी झालेली पाहिली. मुलांना व आपल्याला चांगली जागा कोठें मिळेल असें पाहत असतां, मंडळीपैकीं एकानें ह्यांना ओळखून ह्यांना बरोबर घेऊन अगदीं स्वामींच्याजवळ जागा देवविली.

हे स्वामी उंच असून आजानुबाहु होते. ह्यांचा वर्ण गौर असून देहावर अप्रतिम कांति झळकत होती. ह्यांचें कपाळ भव्य. ह्यांची नासिका सरळ व पोपटासारखी अणीदार होती. श्मश्रू करविल्यामुळें हे अगदीं लहान वयाचे असावेसें वाटे. ह्यांचे नयन मोठे व पाणीदार होते. हे भगवें धोतर नेसले होते; अंगावरही भगवें वस्त्र होतें, व डोक्याला लाल टोपी होती. कपाळावर गोपीचंदनाचा टिळा लाविला होता. गळयांत तुळसीची माळ होती; व हातांतील **स्मरणीनें** ह्यांनीं जप चालविला होता. ह्यांचें एकंदर तेज व मुद्रा पाहून, हे कोणी साक्षात् सिद्ध पुरुष किंवा **शार्ङ्गरवा**सारखे प्राचीन **कण्व**शिष्य भूमंडळावर आले असें वाटे. साधारण अपरिचित जनांस ह्यांची मुद्रा क्रोधयुक्त

दिसे. परंतु परिचित जनांस हे परम दयाळू आहेतसें वाटे. पापीजनांची तर ह्यांच्याकडे पाहण्याची छातीच होत नसे. त्यांचे विचाऱ्यांचे डोळेच दीपत. **चैतन्य, नानक, कबीर, तुलसीदास, तुकाराम,** यांसारिखेच अर्वाचीन काळांत हे प्रसिद्ध भगवद्भक्त साधू होऊन गेले, असें म्हणायाला कांहीं चिंता नाहीं.

हे पाप्यास सूर्याप्रमाणें होते. सूर्य जसा गलिच्छतेचा संहार करितो व लोकांचे डोळे दिपवितो, तद्वत् हे पाप्यांचें पाप सदुपदेशानें भस्म करीत व त्यांचे डोळे दीपवीत. हे सज्जनांस चंद्राप्रमाणें आल्हादकर होते. ह्यांच्या कांतीमुळें ह्यांच्या सर्व देहांत पुण्य संचरत आहे असें वाटे. ह्यांचे आजानुबाहु जणू वैकुंठास आपल्या हातांनीं कवळतां यावें म्हणून दीर्घ होते, किंवा आपल्यापासून दूर असणाऱ्या पापी जनांस ओढून जवळ आणण्यासाठीं म्हणून ते लांब होते. ह्यांचा गौर देह जणू सुवर्णाच्छादित दिसत असे. परोपकारबुद्धि जणू तसल्या काळांत ठाव मिळत नाहीं म्हणून संपूर्णतेनें ह्यांच्या अंत:करणांत वास्तव्य करूं लागली होती. हे **वडताळाहून** येथें येत आहेत असें ऐकून जणू भीतीनें व पापाचरणानें दुष्काळ व वाखा ह्यांच्या पाठोपाठ पळ काढिला होता. असा हा परमपवित्र लोकमान्य साधू, कांहीं वेळ **श्रीकृष्णपदचिंतन** करून, जमलेल्या लोकांस उद्देशून बोलूं लागला. ह्याच्या पाठीमागें ह्याचे कांहीं शिष्य भगवीं वस्त्रें नेसून बसले होते; त्यामुळें जणू हा सूर्य व बाकीचे पृथ्वी, शुक्र, बुध वगैरे ग्रह असावे असें वाटलें. ह्याची वाणी अस्खलित व स्पष्ट असल्यामुळें लोकांच्या बोलण्यावर ह्याच्या बोलण्याचा चांगला ठसा उमटत होता, असें श्रोतृजनांच्या एकाग्रतेवरून दिसत होतें. त्यामुळें जणू हा **नारदा**सारखा भक्तश्रेष्ठ आपल्या वाणीरूपी विण्यानें सर्व स्थावरजंगमादि वस्तूंस नामकीर्तन करून तल्लीन करीत आहे असें वाटे. त्या वेळेस सर्वजणांच्या वृत्ती हा पुढें काय बोलतो, हें ऐकण्याकडे उत्कंठेनें लागल्या होत्या. बराच वेळ बोलल्यानंतर तो म्हणाला ‘ लोकहो, **भगवानजी** स्वत: होऊन **अर्जुनास** काय सांगतात. **सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥** वा **भरतकुलोत्पन्ना** माझ्या प्राप्तिविषयींचे नानाप्रकारचे पंथ व खटाटोपी टाकून देऊन अनन्यभावें तूं मलाच कायतो शरण ये, म्हणजे मी तुझी सर्व पापांपासून सुटका करीन; तर तूं यत्किंचित्‌ही शोक करूं नकोस. अशी जर भगवदुक्ति आहे, तर बापहो तुम्ही एकचित्तानें दुजा भाव न धरितां त्या परात्पर प्रभूचें भजन कां करीत नाहीं ? जर तुम्हाला सर्वप्रकारें पापक्षालन व्हायाला पाहिजे आहे, तर आपलें अंत:करण शुद्ध कां करीत नाहीं ? अंत:करणशुद्धीवांचून आचरण शुद्ध कसें असेल बरें ? आचरणशुद्धीवांचून आपल्याला **कृष्ण**पदप्राप्ति कशी होईल ? ‘ **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥** त्या परमदयाळू अनाद्यनंत **जनार्दनानें** वेळोंवेळ पापाचें उन्मू-

लन करण्यासाठीं व मानवप्राण्यांचे दुष्टांपासून रक्षण व्हावें एतदर्थंच केवळ मानवदेह धारण केला, वारंवार सुटका केली, आपल्यास सन्मार्ग दाखविला. तें सर्व विसरून जर आपण पापाच्या खाईमध्यें जाणूनबुजून उड्या घेऊं लागलों, तर त्यानें आपल्याला दंड करूं नये काय ?

अनुतापाशिवाय पापी श्रीकृष्णजीला मुळीं दृष्टीस नको. असें असूनही चमत्कार हा पहा कीं, त्या भगवानाच्याच भक्त म्हणविणाऱ्यांनीं जर आपलें आचरण सर्वतोपरि निषिद्ध प्रकारचें ठेविलें, तर तसल्या कर्मचांडाळांना शिक्षा होऊं नये काय ? दुराचार वाढल्याशिवाय उगाच अग्निप्रलय, काळ, वाखा, धरणाकंप इत्यादि संकटें उद्भवत नसतात. श्री भगवानजी नराधमांस कोपाच्या आवेशांत शिक्षा करितात असें कदापि म्हणूं नये. कारण कृष्णजी हे पूर्ण वीतरागी, त्यांच्याठायीं रागाचा लेशही सापडावयाचा नाहीं. शिवाय, जसें मुलाकडून आज्ञोल्लंघन झालें असतां माता सुताला दंड करिते, परंतु तसें करतांना सुताविषयीं तिच्या अंतःकरणांत पूर्ण प्रेम असतें तद्वत्च कृष्ण माउलीची गोष्ट आहे. तिला कांहीं नको; फक्त पाप्यांना दुराचरणाविषयीं पश्चात्ताप झाला कीं, तिला पान्हा फुटून ती आपल्या हृदयमंदिरांत त्या अनुतापपूत पाप्यांना ठाव देते. तिची कृपा मजसारख्या मंदमतीनें काय वर्णन करावी ? तिचा महिमा व शक्ति किती अज्ञेय ? अशी जी परमपूज्य विश्वमाता तिला आपण शरण जावें, व ह्या भवार्णवांतून पार पडून तिचे सांनिध्य मिळवावें. शरण जाण्याला उपाय केवळ शुद्ध मानस व तद्वत् आचरण. म्हणजे सर्व प्रकारच्या दुःखांतून व पापांतून मुक्तता मिळेल व **पुनरपिजननं पुनरपिमरणं** चुकेल.

सुखदुःख सर्वप्रकारें आपल्या कृत्यावरच अवलंबून असतें. न्याय्य मार्ग स्वीकारल्यामुळें बाह्य दुःखें मानवप्राणी कदाचित् भोगतो असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें, व त्यावरून असत्पथवर्ती असा सिद्धांत काढितात कीं, जगांत जर सर्व प्रकारचें सौख्य अनुभवायाचें तर सत्पथाचें विशेष अनुगमन न केल्यास विशेष श्रेयस्कर असतें. परंतु हा सिद्धांत केवळ भ्रांतिमूलक आहे. मी केवळ स्वानुभवावरून सांगतों कीं, जो ईश्वरास भिऊन चालतो त्याला कधीं सत्यसुख प्राप्ति नसते असें होत नाहीं. थोडा सूक्ष्म विचार केला असतां ह्यांतील सत्यार्थ एकदम लक्षांत येईल. सुखें जशीं पुष्कळ प्रकारचीं आहेत, तशीं त्यांचीं साधनेंही निरनिराळीं आहेत. तद्वत्च दुःखाची गोष्ट होय. मानसिक व शारिरिक असे सुखदुःखाचे दोन विभाग केले असतां आपल्यास असें आढळून येईल कीं, ह्या दोहोंमध्यें महदंतर आहे. शारिरिक सुखापेक्षां मानसिक सुख जास्त प्रशस्त मानण्याचा प्रघात पूर्वापार चालत आला आहे, व तो योग्यही आहे. कारण मानसिक सुख शारिरिक सुखासारखें चंचल व बाह्य उपाधींवर विशेष अवलंबून नसतें. शारिरिक सुखें बाह्येंद्रियग्राह्य असल्यामुळें इंद्रियांना यत्किंचित् अपाय झाला, तर तीं घेतां येत नाहींत. शिवाय, इंद्रियांना सुखोपभोग करितां यायाला बाह्य वस्तूंचें सहाय्य लागतें;

व त्या वस्तू किंवा विषय प्रत्येकाधीन नसल्यामुळें केवळ त्या विषयांचें स्वामित्व येण्यासाठीं विलक्षण दीर्घप्रयास करावे लागतात; आणि तसले खटाटोप बहुत प्रसंगीं अन्यायमूलक असतात. अशी जर वस्तुस्थिती आहे, तर मग बाह्यसुखाविषयीं उदासीन राहून मानसिक सुखांमध्यें श्रेष्ठ जी शांति ती अनुभविणारे सन्मार्गवर्ती साधुजन कसे सुखी नव्हेत? वेळ पडेल तशी पाठ फिरविणारे बहुश: सुखी असतात, असें जें गृहीत मत आहे, तें ह्याप्रकारें दूषित आहे. कारण तसले लोक वेळ पडल्यास सुखप्राप्त्यर्थ पाप करावयास सोडीत नाहींत, व तेणेंकरून ऐहिक चंचल सुख अनुभवून ते जास्त दंडार्ह होतात, व पारत्रिक सुखास तर सर्वथैव अंतरतात. अशी जर स्थिति आहे, तर मग आपण यत्किंचितही न डगमगतां सद्धर्म कां आचरूं नये? तसें केल्यानें आपला कधीं कधीं छल होतो. परंतु त्यांत दु:ख मानण्यासारखें कांहीं नाहीं. कारण छलानें केवळ ऐंद्रियसुखोपसाधनें आपल्यास अंतरतात, परंतु मानसिक सुखांत काडीमात्र कमतरता होत नाहीं; उलट तें जास्त वळावतें म्हणायाला कांहीं चिंता नाहीं. कारण ऐंद्रिय सुखाकडे आपलें व्यवधान नसल्यामुळें आपलें सर्व लक्ष चित्तशांति आदिकरून मानसिक सुखाकडेसच लागतें. बरें, लोक म्हणजे मुद्दाम द्वेषानें तसा छळ करितात असें कोणी समजूं नये. कारण मनुष्यमात्राची अशी प्रवृत्ति आहे कीं, जनसमूह जिकडे जाईल तिकडे जावयाचें; व दुसरें, आपलें मत परकी जनांनीं स्वीकारावें. ह्या दोन्ही प्रकृतींना विरोधकर असे सन्मार्गगामी असतात. कारण ते जनसमूहाचा धरसोडीचा मार्ग टाकून नीट सरळ मार्गानें जातात, व तेणेंकरून गृहीत मताचा अनादर होतो; व असल्या व्यक्तित्वपूर्ण बंडखोर सन्मार्गगाम्यांनीं मानभंग केल्याबद्दल त्यांना दंड करण्याविषयीं साधारण जनांची साहजिक प्रवृत्ति होते. परंतु त्या दंडानें कायतें थोडेंसें ऐंद्रिय चंचलसुखावर पाणी पडतें. वास्तविक पाहतां हे सन्मार्गगामी तेच महाजन होत. '**महाजनो येन गतः स पंथाः**' ह्या वाक्यांत असल्या सत्पथानुसारी जनांचाच मार्ग महाजनपंथ होय, व तो तसा आहे, असें त्या महाजनाच्यापश्चात् लोक कबूल करितात. ह्याला दृष्टांत **कबीर** व **नरसी मेहेता** या साधूंचा पुरे आहे. प्रथमत: ह्या दोघां परमपूज्य भक्तश्रेष्ठांचा त्या वेळच्या साधारण जनांनीं कांहीं थोडा छळ केला! परंतु नंतर हल्लीं तेच महासाधू म्हणून तुम्ही सर्वजण मानतां कीं नाहीं? बरें, त्या छळामुळें त्या भक्तांनीं हरीला सोडलें कीं काय? कधीं नाहीं. त्यांना बाह्य शारिरिक सुखें कदाचित् मिळालीं नसतील; परंतु त्यामुळें त्यांच्या अप्रतिम मानसिक सुखांत न्यूनता आली काय?

सत्पथाश्रय करणें किती सुकर आहे? त्यानें मानसिक सुखें कशीं आपोआप अयत्नेन मिळतात? त्याला कोणत्याही परसाधनांची आवश्यकता नाहीं. शारिरिक सुखांची तशी मुळींच गोष्ट नाहीं. तीं मिळण्यासाठीं आपल्याला किती उपद्व्याप लढवावे लागतात? एक धनाचीच गोष्ट घेऊं. हें एक ऐंद्रिय सुखांचें मुख्य साधनच आहे. परंतु तें बिचारें मिळवितांना कोण सायास करावे लागतात,

कोण यातायात करावी लागते ? वरें, इतकें करून तें सर्वांस साध्य असतें का ? नाहीं. इतकेजण त्याच्या प्राप्त्यर्थ जो दीर्घ उद्योग करितात, त्यांपैकीं कितीजण तें पूर्णपणें मिळवूं शकतात वरें ? जनसमूहाच्याच मतानें फार थोडे. परंतु जे पूर्णपणें तें साधन बाळगून असतात, असा साधारण हताश झालेल्या लोकांचा समज असतो, त्यांनाच जर विचारलें कीं, तें धन तुमच्याजवळ तुमच्या मनासारखें आहे का ? ते तर खास नाहीं म्हणून सांगतात. ह्याचें कारण आशा. जसजशी प्राप्ति तसतशी तृष्णा बळावत जाते. मग एकून झालें काय तें तुम्हीच पहा. एक तर धन मिळवायाला अतोनात कष्ट व बहुश: अनन्वित कामें करावीं लागतात, व तेणेंकरून पापाची जोड होते. वरें, एवढें करून तृप्ति म्हणून नाहीं. शिवाय, त्याचें रक्षण किती कष्टमय असतें ! तर मग, दुष्प्राप, पापमय व कष्टमय धनप्राप्तिमध्यें आपलें अमूल्य आयुष्य खर्चण्यापेक्षां तेंच सुखसाध्य, न्याय्य व आनंदमय उत्तम मानसिक सुख मिळविण्याकडे खर्च केलें, तर वाईट होईल काय ?

ह्यावरून एकंदरींत सत्पथाश्रय हा आपल्या हातचा असतो, ह्याला बाह्य कारणांचें प्रयोजन नसतें, व ह्यानें ऐहिक व पारत्रिक सुखाचा लाभ होतो; परंतु तोच कुपथाश्रय सर्वतोपरि कष्टदायी, दु:खमूलक व दु:खपर्यवसायी, क्वचित् क्षणिक ऐंद्रिय सुख देणारा व अंतीं पारत्रिक सुखास अंतरविणारा असा आहे. एतदर्थ हे बापहो, तुम्ही सर्वजण असा वाईट मार्ग टाकून चांगल्या मार्गावर या; तेणेंकरून **श्रीकृष्णपरमात्मा** संतुष्ट होईल, व तुम्हास तो कनवाळू **हरि**, तुमच्या अघोर पापराशी क्षणार्धांत भस्म करून, उत्तम सुख देईल. एवढा अलौकिक लाभ करून घ्यायाला बाहेरचें धनासारखें कांहीं भांडवल नको. फक्त शुद्धांत:करण व शुद्ध आचरण हेंच पाहिजे; व हें मनुष्याला स्वत: साध्य करितां येतें. त्या भांडवलानें तुम्हाला पुष्कळ पुण्यसंचय पदरीं बांधतां येईल, व तें पुण्य **भगवानजी**च्या पेढीवर अनामत ठेविल्यास काय काय होणार नाहीं !

म्हणून मी एकवार सांगतों कीं, आपलें आचरण शुद्ध करा, म्हणजे **श्रीहरि** पापोन्मूलन करून तुम्हांस शांती देईल. आचरण सुधारण्यासाठीं **कृष्ण समर कृष्ण समर येहि तेरो काज है ॥ ध्रु० ॥ मायाको संग त्याग । प्रभुजीके चरणी लाग । जगतसुख मान मिथिया । येहि तेरो काज है ॥**

असें बोलून त्यानें ' **जय कृष्ण जय कृष्ण** ' असें भजन केलें; व लोकांनीं **सहजानंदस्वामीकी जय** असा एकच घोष केला. नंतर मंडळी आपआपल्या घरीं गेली.

## संघट्टन नामें द्वितीय पुस्तक समाप्त.

---